मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला.

पुस्तक ६८ वें.

# स्वामी रामतीर्थ.

(चरित्र आणि सदुपदेश.)

## भाग दुसरा.

"I come blazing light
And the shadows must flee.

—Rama.

लेखकः—

श्रीयुत नागेश वासुदेव गुणाजी,

बी. ए., एल्एल्. बी.

बेळगांव.

[प्रथमावृत्ति.]

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,

गिरगांव—मुंबई.

किं. १-४-०. सर्व हक्क स्वाधीन. १९१२.

Printed and Published at the Manoranjan Press,
1 Charni Rd., Girgaon, Bombay, by K. R. Mitra.

# पाहिजेत!

सुधारक

दुसऱ्यांचे नव्हेत

तर स्वतः

आणि संपन्न

विश्वविद्यालयाच्या पदव्यांनीं नव्हेत

तर **मनोजयानें.**

**वय**—दिव्यानंदभरित तारुण्य.

**वेतन**—सरूपता.

सत्वर अर्ज पाठवा!

**भिक्षांदेहि नको!**

**निश्चयानें मागा!**

कोणाकडे ?

जगदीशाकडे—

ह्मणजे आपल्या आत्मारामाकडे.

ॐ! ॐ! ॐ!

# समर्पण.

श्रीरामतीर्थवचनामृतसंजीवनीची

ही

मराठी प्रतिकृति

"ही आर्यभूमी जगतांत मान्य-
व्हावी असा यन्मनिं हेतु पुण्य,"

आणि

"जे आर्यभूची निरपेक्ष सेवा-
करावया मानिति तुच्छ जीवा,"

अशा सर्व महाराष्ट्रबंधुभगिनींना मोठ्या प्रेमानें अर्पण करण्यांत येत आहे.

# अनुक्रमणिका.


१ गृहसौख्य कसें साधावें ? ... ... ... ... १७
२ वैवाहिक स्थिति आणि साक्षात्कार. ... ... ... ३६
३ गृहस्थ आणि मोक्ष. ... ... ... ... ... ... ५९
४ हिंदी स्त्रिया. ... ... ... ... ... ... ... ६४
५ पत्नी. .... ... .... .... ... .... ... ६६
६ पाप आणि त्याचा आत्म्याशीं संबंध. .... .... ६८
७ पापाची चिकित्सा आणि निदान. .... .... .... ८३
८ सुखाचें निवासस्थान.... .... .... .... .... ९१
९ सान्तामधील अनंत. .... .... .... .... .... ९९
१० मन:पटलावरील आत्मरवि. .... .... .... .... १०५
११ खरें आत्मतत्त्व. .... .... .... .... .... ११३
१२ स्फूर्तीचें स्वरूप. .... .... .... .... .... १२०
१३ सकलकामनापूर्तीचा उपाय. .... .... .... .... १३१
१४ विजयी आध्यात्मिक शक्ति. .... .... .... .... १४३
१५ मोझेसचा दंड. .... .... .... .... .... .... १६५
१६ धर्मग्रंथांचा विपरीत अर्थ. .... .... .... .... १८३
१७ पद्धतरहित भाषण. .... .... .... .... .... १९६
१८ समतोल मन. .... .... .... .... .... .... २०९
१९ दु:खांतून निजानंदांत.... .... .... .... .... २२३
२० सनातन जीविताचा कायदा. .... .... .... .... २३८
२१ देहविस्मृति. .... .... .... .... .... .... २४९
२२ उच्च शिष्टाचाराचा नियम. .... .... .... .... २५६
२३ वेदान्तावर एक मोठा आक्षेप. .... .... .... २५७

२४ बृहदारण्यकम् [ भाग ७ ते १३ ]. .... .... .... २५९

७ वैवाहिक स्थिति चष्म्यांप्रमाणें असावी.

८ नव्याणणवाचें जाळें.

९ स्तुतीचें जाळें.

१० आयुष्याचें महत्त्व.

११ ईश्वरविषयक खुबीदार प्रश्नोत्तरें.

१२ ग्रीसेल्देची गोष्ट.


१३ राम आनंदांत मग्न.

२५ हिंदुस्तानची प्राचीन दिव्यदृष्टि. .... .... .... २८४

२६ सुधारलेल्या जगावर हिंदुस्तानचें आध्यात्मिक ऋण..... २९६

अज्ञानां चैव यो ज्ञानं दद्याद्धर्मोपदेशतः ।
कृत्स्नां वा पृथिवीं दद्यात्तेन तुल्यं च तत्फलम् ॥

—महाभारत.



स्वामी रामतीर्थ.

# प्रस्तावना.

महाभाग वाचकजन । भाग्य तुमचें उदेलें पूर्ण ।
रामतीर्थांच्या मुखांतून । स्रवतसे ही ज्ञानगंगा ॥
प्राशन करा हें अमृत । नलगे शोधावा अन्य ग्रंथ ।
प्रपंच परमार्थ सुनिश्चित । साधती येणें पूर्णपणें ॥

—दिगंबरदास.

महाराष्ट्रवाचकांनां रामतीर्थसंजीवनी मानवल्यामुळें, आणि त्यांनीं उत्तेजन दिल्यामुळें, त्या ग्रंथाचे पुढील भाग तयार करण्याचा आह्मीं संकल्प केलेला आहे; आणि परमेश्वरकृपेनें दुसरा भाग तयार होऊन आज वाचकांच्या हातीं पडत आहे, याबद्दल आह्माला आनंद होत आहे.

मद्रासच्या 'गणेश आणि मंडळी'नें रामतीर्थांच्या व्याख्यानांचा दुसरा भाग इंग्रजींत प्रसिद्ध केला आहे, आणि दिल्लीच्या लाला अमीरचंदांनीं रामतीर्थांच्या समग्र ग्रंथांचे—'अनुभवकानना'चे चार व्हाल्युम इंग्रजींत प्रसिद्ध केले आहेत. पहिल्या व्हाल्युममध्यें (१) अंतरात्मा, (२) शक्तीचें उगमस्थान (३) साधनबिंदु असे तीन भाग केलेले आहेत. यांतील कांहीं व्याख्यानें आमच्या पहिल्या भागांत आलेलीं असून पहिल्या व्हाल्युममधील राहिलेलीं सर्व व्याख्यानें या आमच्या दुसऱ्या भागांत दिलेलीं आहेत. शिवाय बृहदारण्यक भाग ७ ते १३ दुसऱ्या व्हाल्युममधून, आणि (१) हिंदी स्त्रिया (२) पत्नी, (३) गृहस्थ आणि मोक्ष, (४) हिंदुस्तानची प्राचीन दिव्यदृष्टि, व (५) सुधारलेल्या जगावर हिंदुस्तानचें आध्यात्मिक ऋण, हीं तिसऱ्या व्हाल्युममधून घेतलीं आहेत.

'गणेश आणि मंडळीं'नें स्वामी रामतीर्थांचीं जीं व्याख्यानें आणि लेख पहिल्या भागांत प्रसिद्ध केले आहेत, आणि ज्यांचें भाषांतर आमच्या मराठी, स्वामी रामतीर्थ--चरित्र आणि सदुपदेश-भाग १ ला यांत आलें आहे, त्यांपैकीं बहुतेक व्याख्यानें आणि लेख स्वामीजींच्या हयातींत प्रसिद्ध झाले होते. तीं व्याख्यानें आणि ते लेख पुनः स्वामीजींकडून तपासले गेले. याशिवाय स्वामीजींच्या निधनकाळीं सांपडलेल्या

आणि आतां तीन व्हाल्युममध्यें प्रसिद्ध झालेल्या व्याख्यानांवर आणि लेखांवर त्यांचा हात फिरलेला नाहीं. स्वामींनीं हीं सर्व व्याख्यानें पुनः तपासिलीं असतीं, तर त्यांनीं त्यांत पुष्कळ सुधारणा केली असती, आणि पुष्कळ नवीन भर घातली असती. आपलीं सर्व व्याख्यानें आणि लेख पुनः नीट काळजीपूर्वक तपासून लिहिण्याचा आणि आपला उपदेश सर्वांगसुंदर करण्याचा स्वामीजींचा संकल्प होता. वेदान्त हा भावि पिढींचा वैय्यक्तिक आणि सामाजिक धर्म होण्यास पात्र आहे, असें ते योग्य रीतीनें प्रतिपादन करणार होते; पण दोन कारणामुळें त्यांचा बेत सिद्धीला गेला नाहीं. ( १ ) आपलें काम उत्तम व्हावें या हेतूनें निधनापूर्वीं दोन वर्षें त्यांनीं मूळ वेदांचा पूर्ण अभ्यास शास्त्रोक्त रीतीनें करण्याला आरंभ केला. यामुळें आपलीं व्याख्यानें तपासून त्यांतील विषय पुनः नवीन लिहून काढण्याला लागणारा वेळ आपलें काम भव्य आणि अद्वितीय करण्याच्या तयारींत गेला. ( २ ) स्वामी जर शहरांत लोकवस्तींत राहिले असते, तर लोकांच्या गरजा आणि इच्छा पाहून आपलें काम लवकर पूर्ण करावें, अशी त्यांनां प्रेरणा झाली असती; पण त्यांचा वास त्यांनां प्रिय असलेल्या हिमाचलावरील निर्जन स्थळांत असल्यामुळें त्यांचें मन दिवसेंदिवस संसारापासून निवृत्त होऊन अनंतांत लीन होऊं लागलें. पूरणसिंगजी त्यांनां शेवटीं भेटावयाला गेल्यावेळीं ते बराच वेळ स्तब्ध होते. लिहिणेंवाचणें त्यांनीं अजीबात सोडून दिलें होतें. याविषयीं पूरणसिंगजींनीं प्रश्न विचारतां स्वामीजी आपली देहविस्मृति किंवा समाधि इची स्थिति सांगूं लागले. ते ह्मणाले "जितकाजितका देहाचा विसर आह्मांला अधिक पडत जाईल, तितकेंतितकें अधिक लोकहित आमच्या हातून सहज होऊं लागेल. हातीं घेतलेलें काम माझ्याकडून कदाचित् पुरें होणार नाहीं; पण मी हा लोक सोडून गेल्यावर तें काम पुढें अधिक चांगलें केलें जाईल, अशी मला खात्री वाटते. माझे बेत, इच्छा आणि संकल्प सोडून देऊन मी अनंतांत लीन झालों, ह्मणजे माझ्या मनांत भरून राहिलेले आणि माझ्या आयुष्याला वळण लावणारे

विचार पुढें योग्य काळीं समाजांत पसरतील, आणि आपलें कार्य करितील."

ही कल्पना स्वामीजींच्या मनांत इतकी कांहीं बिंबून गेली होती, कीं, पूरणसिंगजींनीं कितीहि विनवणी केली, तरी त्यांनीं पुनः कांहीं लेखणी हातीं धरिली नाहीं!

याप्रमाणें व्याख्यानांवर त्यांचा हात न फिरल्यामुळें त्यांची मांडणी जरी व्यवस्थित रीतीनें झाली नाहीं, तरी त्यांचे विचार प्रस्तुत स्वरूपांत कां होईना, आमच्यापाशीं आहेत, ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय. दुसऱ्या दृष्टीनें पाहतां हा एक प्रकारचा फायदाच आहे, असें वाटतें. कारण, स्वामीजींचीं व्याख्यानें वाचतांना, ते आह्मांशीं संभाषण करीत आहेत, आणि व्यवस्थितपणा आणि सफाई यांत दिसून येणारी उणीव, गोडी व जोमदारपणा यांनीं चांगली भरून येत आहे, असें वाटतें.

स्वामीजींच्या या व्याख्यानांत आढळून येणारा हा एक विशेष आहे, कीं, वेदान्ताचीं तत्त्वें प्रतिपादन करितांना ते बुद्धिवादाचा किंवा तर्कशास्त्राचा फारसा उपयोग करीत नाहींत. तर त्यांनां जें कांहीं सांगावयाचें आहे, तें ते अंतःकरणापासून सांगतात. कोणत्याहि विषयावर प्रमाणें देत बसण्याच्या भरीला न पडतां, अनुभवशीर व चटकदार अशा गोष्टीच ते सांगतात; आणि खरोखर पाहतां शुष्क बुद्धिवादापेक्षां आयुष्यांत घडलेल्या गोष्टींच्या अनुभवापासून आह्मांला अधिक फायदा होत असतो. आजपर्यंत कोरडा आणि कंटाळवाणा बुद्धिवाद आह्मीं पुष्कळ नाहीं का ऐकिला? तेव्हां स्वामींसारख्या महात्म्यांनीं आयुष्यांत सर्वांनां पदोपदीं येणाऱ्या अनुभवाच्या जोरावर मोठमोठीं तत्त्वें विशद रीतीनें प्रतिपादन केलेलीं पाहून कोण मोहित होणार नाहीं? या दृष्टीनें पाहतां स्वामीजींच्या व्याख्यानांत सत्याचें तर्कशास्त्रानुसार विवेचन केलेलें नसून, सत्य कसें अनुभवावें याविषयींच्या सूचना दिलेल्या आहेत. स्वामी हे उत्तम कवि आणि तत्त्ववेत्ते असल्यामुळें, उत्तम व उदात्त विचार

आणि सुंदर व जोरदार भाषा यांचा अपूर्व मिलाफ त्यांच्या उपदेशांत ठिकठिकाणीं दिसून येतो.

या ठिकाणीं त्यांच्या आत्मोन्नतीविषयीं दोन शब्द सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं. पंजाबांतील एका गरीब सारस्वत ब्राह्मणकुलांत स्वामीजींचा जन्म झाला होता. लहानपणापासून त्यांनां आपल्या विद्याभ्यासांत बऱ्याच अडचणी येत गेल्या, तरी त्यांनीं त्यांतून स्वपराक्रमानें आपला मार्ग बाहेर काढिला. विद्यार्थिदशेंत असतांनाच त्यांनीं आपला पुढील मार्ग आंखून, आपलें अंतिम ध्येय ठरविलें होतें, असें दिसतें. कारण, ते स्वस्थपणें, शांतपणें आणि एकाच विशिष्ट हेतूनें प्रेरित होऊन आपला अभ्यास नेटानें करीत होते. परिस्थिति कितीहि बिकट आणि प्रतिकूल झाली, तरी त्यांनीं तिला कांहीं दाद दिली नाहीं. कितीहि अडचणी आल्या, तरी ते डगमगले नाहींत. यावरून त्यांचा दृढनिश्चय स्पष्ट दिसून येतो. बाह्यत: ते एकाद्या कुमारिकेप्रमाणें भिडस्त आणि विनयशील दिसत, तरी कधींहि न दबणारी अशी प्रबल इच्छाशक्ति त्यांच्यांत पूर्णपणें वसत होती. कोणत्याहि ऐहिक फायद्यासाठीं अगर हेतूसाठीं नव्हे, तर दिवसेंदिवस वृद्धिंगत होणारी ज्ञानलालसा तृप्त करण्यासाठीं अभ्यासावर निष्काम प्रेम करणारे ते एक नमुनेदार विद्यार्थी होते.

अंगांत घालण्याला एकादा आंगरखा नसला तरी चालेल, किंबहुना एकादेवेळीं जेवण चुकलें तरी हरकत नाहीं; पण यांऐवजीं रात्रीं अभ्यास करण्याकरितां तेल घेण्याला कोणीं पैसे दिल्यास, तें त्यांनां फार आवडत असे. विद्यार्थिदशेंत संध्याकाळपासून तों सूर्योदयापर्यंत एकसारखा अभ्यास करीत त्यांनीं पुष्कळ दिवस काढिले. ज्ञानार्जनाची त्यांनां इतकी अनिवार हांव होती, कीं, त्यांनीं आपल्या सुखांकडे किंवा शरीराच्या गरजांकडे बिलकूल लक्ष्य दिलें नाहीं. शीत–उष्ण, क्षुधा–तृषा इत्यादिकांचा त्यांच्या ज्ञानलालसेवर कांहींएक परिणाम झाला नाहीं.

अशा प्रकारें ज्ञानाची उपासना केल्यामुळें ते कवि, तत्त्ववेत्ते, गणितज्ञ, शास्त्रज्ञ बनले; पण हें सर्व ज्ञान मिळविण्याला त्यांनां अत्यंत श्रम करावे

लागले, किंबहुना खडतर तपश्चर्याच करावी लागली, असें ह्मणणें यथार्थ होईल. 'प्राव्हिन्शियल सिव्हिल सर्व्हिस'साठीं आपली शिफारस करितों, असें जेव्हां लाहोर येथील सरकारी कॉलेजांतील प्रिन्सिपॉलनें त्यांनां सांगितलें, तेव्हां त्यांच्या डोळ्यांत पाणी आलें, आणि मस्तक थोडेंसें लववून त्यांनीं उत्तर दिलें, कीं, "महाराज! मीं इतके परिश्रम करून जें ज्ञान मिळविलें आहे, तें अशा रीतीनें त्याचा विक्रय करण्यासाठीं नसून, लोकांनां देण्यासाठीं मिळविलेलें आहे. सरकारी अधिकारी होण्यापेक्षां शिक्षक होणें मला अधिक आवडतें."

विद्यार्थिदशेंत स्वामी फारसे कोणाशीं मिसळत नसत; पण ग्रंथद्वारें ते पुष्कळ साधुसंतांच्या, कवींच्या व महात्म्यांच्या समागमाचा लाभ घेत असत. इराणचे सुफी तत्त्वज्ञ, विशेषतः हाफिझ, अत्तार, मौलाना रूम, शाम्सतब्रेझ हे त्यांचे नेहमींचे मित्र असत. हिंदुस्तानचे अनेक साधुसंत त्यांनां आपलीं गुह्यें सांगत. तुळशीदास आणि सूरदास यांनीं त्यांनां निःसंशय स्फूर्ति दिली. चैतन्यप्रभूचें प्रेम, तुकाराम व नानक यांची मधुर भक्ति, कबीर, फरीद, हसन आणि बो अल्ली कलंदर यांचें ध्यान, प्रल्हाद व ध्रुव यांची श्रद्धा, मिराबाई, बुल्लाशाह आणि गोपाळसिंग यांची तीव्र मुमुक्षा, श्रीकृष्णांचें गूढ रहस्य, शिव आणि शंकराचार्य यांचें ज्ञान, इमर्सन, कँट, गेटी, कार्लाइल यांचे विचार, वाल्ट विटमन आणि थोरो यांचे सहजोद्गार, क्लिफर्ड, हक्सले, टिंडाल, मिल्ल, डार्विन आणि स्पेन्सर यांची शास्त्रीय सत्यता आणि न्यायप्रियता इत्यादि सर्वांचा त्यांच्या मनावर सुपरिणाम झाला होता. या सत्समागमाच्या अजब किमियेमुळें त्यांचें अंतःकरण, धर्मभोळेपणा, अज्ञान, दुराग्रह इत्यादिकांपासून मुक्त होऊन फार उदात्त झालें होतें. त्यांची विद्यार्थिदशेंतील भिडस्त वृत्ति पुढें संन्यास घेतल्यावर पार नाहींशी झाली, आणि नंतर ते नेहमीं दैवीस्थितींत—आत्मध्यानांत राहूं लागले. त्यांची वाणी जोरदार झाली, त्यांचें शील चित्ताकर्षक झालें, त्यांचा अनुभव स्फूर्तिदायक झाला, आणि त्यांच्या देहाचें तेज किंवा कांतिहि

अतोनात वाढली. त्यांच्या समागमांत जे कोणी राहूं लागले, त्यांनां प्रकाश आणि आनंद यांचा लाभ होऊं लागला. त्यांच्या सदुपदेशानें श्रोत्यांच्या नेत्रांत प्रेमाश्रूंचें भरतें येई, किंवा मनांत आनंदाच्या उकळ्या फुटून त्यांनां हंसूं येई. त्यांच्या स्पर्शानें कित्येकांमध्यें कवि, चितारी, योगी, वीर यांच्या वृत्ति उदय पावत, आणि आपली मानसिक शक्तीची वाढ झाली आहे असें साधारण मनुष्यांनां वाटे, असा पूरणसिंगजींनीं आपला अनुभव नमूद केला आहे.

वरील विधानांचा कांहींसा प्रत्यय आह्मालाहि पाहण्यास मिळाला. कांहीं महिन्यांपूर्वीं पुण्याहून मुंबईला आगगाडीनें प्रवास करीत असतां एका गृहस्थानें सांगितलें, कीं, "आपल्या एका मित्रानें रामतीर्थ–चरित्र आणि सदुपदेश हें पुस्तक तीनचारदां वाचलें, आणि त्यानंतर तो चांगल्या कविता करूं लागला." एका मोठ्या शहरीं एका शाळेंतील एका विद्यार्थ्याचें डोकें फार अभ्यास करून बिघडलें. तो एका शिक्षकापाशीं येऊन सांगूं लागला, कीं, "मास्तर, परीक्षा तर अगदीं जवळ आली, आणि माझें डोकें तर बिघडून गेलें आहे. आतां याला कांहींतरी उपाय सांगा." त्या शिक्षकानें रामतीर्थसंजीवनीची मात्रा त्याला दिली, आणि ती त्याला चांगली लागू पडली. थोड्या दिवसांत विद्यार्थ्यानें पुस्तक परत केलें, आणि आतां माझें डोकें साफ झालें आहे, असें त्यानें सांगितलें. आमच्या एका वयोवृद्ध मित्रानें लिहिलें, कीं, "आपले डोळे अधु झाल्यामुळें आपण तूर्त वाचन अगदीं बंद केलें आहे. वाचन सुरू केलें, ह्मणजे आपलें मस्तक दुखूं लागतें; पण रामतीर्थसंजीवनीचा अनुभव निराळाच आहे. त्या पुस्तकाचें वाचन ह्मणजे आपल्या मेंदूला टॉनिक–शक्तिदायक औषध आहे, असें आपल्याला वाटतें." आणखी अशीं कांहीं उदाहरणें विस्तारभयास्तव येथें देतां येत नाहींत. पुस्तकांतील स्वामीजींचे विचार वाचून असा चांगला परिणाम घडून येतो, तर स्वामी हयात असतां त्यांच्या प्रत्यक्ष समागमानें तसा सुपरिणाम घडेल, यांत कांहीं नवल नाहीं!

## प्रस्तावना.

कांहींतरी बोलावें किंवा लिहावें, ह्मणून स्वामी बोलत किंवा लिहीत नसत. लोकांनां कांहींतरी नवीन गोष्टी, अनुभव किंवा ज्ञान द्यावयाचें असेल, तरच ते आपलें तोंड उघडीत, किंवा हातांत लेखणी घेत असत. "वस्तूंची, पदार्थांची किंवा त्यांच्या माहितीची जमवाजमव करण्याविषयीं मी फार कसून प्रयत्न करितों; पण एकदां ती सर्व माहिती माझ्या आटोक्यांत आली, ह्मणजे मी खडकावर—अढळ पदावर उभा राहून माझा सत्याचा संदेश सर्व कालांकरितां जाहीर करितों," असें स्वामी ह्मणत. पदार्थांचा आणि विचारांचा आपल्यावर काय परिणाम होतो, हें ते नीट पहात, आणि नंतर ते त्यावरून अनुमानें काढीत. पण आपल्या आयुष्यांत त्या अनुमानांचा पडताळा पाहण्यांत ते पुष्कळ काल, वर्षांचीं वर्षें घालवीत, आणि त्यांहून अधिक वर्षें दुसऱ्यांच्या आयुष्यांत तीं अनुमानें ते ताडून पहात. एवढी तयारी झाल्यानंतर ते त्यांवर आपले सिद्धान्त बांधीत. आपल्याला लोकांनां काय सांगावयाचें आहे, तें पूर्ण अवगत करून घेतल्याशिवाय ते गुरूचा आव आणीत नसत, किंवा आपलें तोंड उघडीत नसत. त्यांच्या यशाचें गुह्य किंवा रहस्य या त्यांच्या वागणुकींत आहे. अशा या महात्म्याचा सदुपदेश महाराष्ट्रवाचक नीट काळजीनें वाचतील आणि त्याचें मनन करून आपला फायदा करून घेतील, अशी आशा आहे.

मद्रासच्या 'गणेश आणि मंडळी'नें प्रसिद्ध केलेल्या दुसऱ्या भागाचा, दिल्लीचे लाला अमीरचंद यांनीं इंग्रजींत प्रसिद्ध केलेल्या 'अनुभवकानन' नामक रामतीर्थांच्या समग्र ग्रंथांचा, आणि तसेंच प्रोफेसर पूरणसिंगजींच्या लेखांचा, हा द्वितीय भाग तयार करितांना आह्माला फार उपयोग झाला आहे. त्या सर्वांचे आह्मी मनापासून आभार मानितों.

आमचे मित्र श्रीयुत दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर हे चारपांच व्याख्यानांचें भाषांतर करतेवेळीं आह्मांबरोबर होते; पण पुढें कांहीं अपरिहार्य कारणांमुळें आह्मांला सोडून त्यांनां दुसरीकडे जावें लागलें. ते लवकर परत येतील असा संभव न दिसल्यामुळें बाकीचें सर्व भाषांतर

आह्मालाच करावें लागलें. मित्र श्रीयुत यशवंत विठ्ठल सौदलगेकर यांनीं कांहीं व्याख्यानें लिहून काढिलीं, आणि तसेंच मित्र श्रीयुत वासुदेव हरि करंदीकर यांनीं आह्माला अनेक प्रकारें साहाय्य केलें. श्रीयुत करंदीकरांच्या मदतीवांचून हें काम इतक्या लवकर पार पडलें नसतें. नवीनच स्थापन झालेल्या आणि अगदीं बाल्यावस्थेंत असलेल्या **'मनोरंजन'** छापखान्यामध्यें या पुस्तकाच्या छपाईचें काम श्रीयुत काशीनाथपंत मित्र यांच्या देखरेखीखालीं कसें सुबक आणि सुंदर झालेलें आहे, याची साक्ष हें पुस्तकच देत आहे. या सर्व मित्रांचे आह्मी फार फार आभारी आहों.

शेवटीं, अशीच अधिकाधिक सेवा आमच्या हातून होवो, असें परमेश्वरापाशीं मागून ही अल्प प्रस्तावना पुरी करितों.

श्रीगणेशचतुर्थी,<br>ता. ४।९।१३,<br>बेळगांव.

**ना. वा. गुणाजी.**

# स्वामी रामतीर्थ.

## HOW TO MAKE YOUR HOMES HAPPY?

## गृहसौख्य कसें साधावें ? *

कुलीन स्त्रिया आणि सभ्य गृहस्थ यांच्या स्वरूपांत असलेल्या माझ्या आत्म्यांनों !

एकादा वकील बरेचसे कागदपत्र घेऊन कोर्टांत जातो, पण ते सर्व कागदपत्र कोर्ट पहात नाहीं. मुद्द्याच्या आणि महत्त्वाच्या कागदपत्रांचाच कोर्टांत विचार होतो. त्याप्रमाणें आमच्यापाशीं असलेल्या सर्व कागदपत्रांचा आज विचार होणें शक्य नाहीं. दुसरें एक असें कारण आहे, कीं, यांपैकीं बहुतेक कागदपत्रांत परलोकाविषयीं—आध्यात्मिक गोष्टींविषयीं विवेचन केलें आहे. तेव्हां, तुमचा संबंध असलेल्या इहलोकाविषयीं—आणि तुह्मांला प्रिय व उपयुक्त असलेल्या विषयासंबंधीं विवेचन करणें, हें अधिक श्रेयस्कर आहे.

"आपणाला आत्मज्ञान प्राप्त होईल अशी विवाहित मनुष्याला आशा धरितां येईल काय?" हा आज व्याख्यानाचा विषय आहे. विषय मोठा महत्त्वाचा, गहन आणि व्यापक आहे. त्याचें पूर्ण विवेचन आजच्या भाषणांत होणें शक्य नाहीं; तथापि आजच्या व्याख्यानांत याविषयीं आपणांला काय शिकतां येईल, हें आपण पाहूं.

---

* ३० डिसेंबर १९०२ रोजीं 'अॅकाडमी ऑफ् सायन्सीस' येथें झालेलें व्याख्यान.

पूर्वीं हिंदुस्तानांत एक क्रूर गृहस्थ असून आपल्या नोकरचाकरांनां छळण्यांत त्याला मोठी मौज वाटे. एके दिवशीं रात्रीं त्याच्या स्वयंपाक्यानें सुग्रास पक्वान्न केलें. त्या पक्वान्नाचा एक घांसहि दुसऱ्या कोणाला मिळूं नये, आपणच त्या पक्वान्नावर यथेच्छ ताव मारावा, असा बेत करून तो गृहस्थ आपल्या स्वयंपाक्याला ह्मणाला "आतां आपण दोघेहि उपाशी निजावें व ज्याला अधिक चांगलें स्वप्न पडेल त्यानें हें सारें पक्वान्न खावें, असें मीं ठरविलें आहे." स्वयंपाक्यापेक्षां आपणाला अधिक चांगलें स्वप्न पडणार, आणि रात्रीं उपाशीं निजल्यामुळें दुसऱ्या दिवशीं पहांटेस आपणाला भूक चांगली लागून त्यामुळें पक्वान्न अधिक मिष्ट लागणार, अशी त्या गृहस्थाची खात्री होती. दुसरे दिवशीं, तुझें स्वप्न सांग, असें यजमानानें स्वयंपाक्याला विचारल्यावर तो ह्मणाला "स्वप्न प्रथम सांगण्याचा मान धनीसाहेबांचा आहे. आपलें स्वप्न सांगून झाल्यानंतर मी माझें सांगेन." यजमान आपलें स्वप्न सांगू लागला:—"मी स्वप्नांत हिंदुस्तानचा बादशहा झालों आणि यूरोप, अमेरिका येथील राजेहि माझ्या हाताखालीं आले, आणि त्यामुळें माझी सत्ता सर्व जगभर पसरली. सर्व राजेरजवाडे माझ्या दरबारांत येऊन मोठ्या अदबीनें मला मुजरा करूं लागले. देव आणि साधुसंतहि येऊन माझ्या दरबारांत माझ्या उजव्या व डाव्या बाजूला बसूं लागले."

नंतर तो स्वयंपाकी भीतभीत आपलें स्वप्न सांगूं लागला:—"महाराज, आपल्यासारखें सुंदर स्वप्न मला पडलें नाहीं. माझ्या स्वप्नांत एक विद्रूप आणि भयंकर राक्षस माझ्यामागें धांवत आला आणि आपली लखलखित तरवार माझ्या अंगांत खुपसूं लागला. तो मला ह्मणाला, कीं, तें सारें पक्वान्न खाऊन टाक, नाहींतर मी तुला ठार करितों; मीं लगेच स्वयंपाकघरांत जाऊन सर्व पक्वान्न चट्ट करून टाकिलें!"

यजमानानें विचारिलें "अरे मूर्खा, तूं मला कां उठविलें नाहींस?"

स्वयंपाकी म्हणाला "महाराज, मीं आपल्याकडे येण्याचा प्रयत्न केला, पण आपण त्यावेळीं जगाचे बादशहा, सार्वभौम राजे झालां होतां. आपल्या

दरबारांत माणसांची अत्यंत गर्दी झाली होती. तरवारी, बंदुका हातांत असणारे द्वारपाल मला आंत जाऊं देईनात. यामुळें माझी बिकट स्थिति आपणाला कळवितां आली नाहीं, आणि माझा नाइलाज होऊन माझ्या इच्छेविरुद्ध मला एकट्यालाच तें पक्वान्न सेवन करणें भाग पडलें."

वरील गोष्टींतील गृहस्थाप्रमाणें आह्मांला मोठीं सुंदर स्वप्नें पडत असतात, आणि शेखमहमदाप्रमाणें आम्ही मनोराज्यांत मोठमोठे किल्लेहि बांधितों. पण 'रामा'चें मत असें आहे, कीं, बिकट परिस्थितींत सांपडलेल्या आणि ताबडतोब पक्वान्न सेवन केलेल्या स्वयंपाक्याचेंच उदाहरण अधिक अनुकरणीय आहे. परलोकच्या किंवा भविष्यकाळच्या गोष्टींविषयीं विचार करण्यापेक्षां वर्तमानकाळच्या किंवा आपला निकट संबंध असलेल्या अशा प्रस्तुतच्या गोष्टींविषयीं विचार करणें फार चांगलें ! "**जाते घडि ही अपुली साधा, करा काय तें आतां करा !**"

आपल्या लग्नाचें पर्यवसान दुःख, चिंता, कष्ट आणि त्रास यांत होऊं नये, आणि जीवित सुखावह व्हावें, याकरितां दांपत्यानें आपलें आचरण कसें ठेवावें, हा महत्त्वाचा प्रश्न प्रत्येकानें विचार करण्याजोगा आहे. लोक प्रार्थना करितात, कीं, "हे देवा, कृष्णा, बुद्धा अगर ख्रिस्ता ! आमच्या दुःखाचें निवारण कर." 'राम' सांगतो, हे देव मरणानंतर तुमचीं दुःखें नाहींशीं करितील किंवा करणार नाहींत; पण या जन्मीं तुमच्या दुःखाचें निवारण कोण करणार ? **या जन्मांत नवऱ्यानें पत्नीचा ख्रिस्त (तारक) आणि पत्नीनें नवऱ्याचा ख्रिस्त झालें, पाहिजे.** परंतु वस्तुस्थिति अशी आहे, कीं, प्रत्येक बायको आपल्या नवऱ्याचा जुडास इसकॅरिएट ( ख्रिस्ताला दगा देऊन फसविणारा त्याचाच एक शिष्य ) आहे, आणि प्रत्येक नवरा आपल्या बायकोचा जुडास इसकॅरिएट आहे. ही वस्तुस्थिति सुधारावी कशी ?

याला एकच उपाय आहे. प्रत्येक दांपत्यानें त्यागाचा स्वीकार केला पाहिजे. 'त्याग' शब्द ऐकतांच प्रत्येकाच्या अंगावर कांटा येतो, आणि त्याचा थरकांप होतो; परंतु त्यागाशिवाय तुमचीं घरें नंदनवनें ( सुख-

मय) करून सोडणें बिलकूल शक्य नाहीं! त्यागाविषयीं बराच गैरसमज आढळून येतो; याकरितां त्यागाचा खरा अर्थ समजून घेणें इष्ट आहे. त्याग तुह्मांला हिमालयाच्या दाट जंगलांत जाऊन राहण्यास सांगत नाहीं, सर्व कपडे फेंकून देऊन दिगंबर व्हा, अनवाणी आणि शिरस्त्राण घातल्यावांचून चाला, असें ह्मणत नाहीं. त्यागाचा असा अर्थ असेल, तर दांपत्याला त्याग कसा आचरितां येईल? मिळकत, घरदार, मुलेंबाळें असलेल्या दांपत्याला त्यागी कसें होतां येईल? हिंदुधर्मग्रंथांमध्यें दिलेलें त्यागाचें उत्तम उदाहरण ह्मटलें ह्मणजे आपल्या मुलांबाळांनां घेऊन सर्व कुटुंबासहित बसलेले उमानाथ शंकर हेंच होय.

हिंदु लोकांच्या मतें त्यागाचा अर्थ अरण्यवास, समाजापासून दूर राहणें, प्रत्येक वस्तूचा त्याग करणें, प्रत्येक वस्तूचा द्वेष करणें, असा आहे, असें कित्येक समजतात; पण ही चूक आहे. हिंदूंनां त्याग घरांमध्यें आचरावयाचा आहे. हें त्यागरूपी तत्त्वज्ञान--सत्य--वेदान्त कांहीं शेलक्या अरण्यवासी लोकांकरितांच असेल, तर त्याचा आह्मांला काय उपयोग? आह्मांला तें नको आहे, तें गंगेंत बुडविलेलें बरें!

खरा त्याग प्रत्येकाला पाहिजे आहे, व तोच यशःप्राप्तीची गुरुकिल्ली आहे. त्यागी असल्याशिवाय कोणाहि वीराला समरांगणांत आपलें नांव गाजवितां येणार नाहीं, आणि कोणाहि कवीला उत्तम काव्य निर्माण करितां यावयाचें नाहीं. बायरनची विशाल बुद्धि त्यागामुळेंच त्याला प्राप्त झाली, आणि वॉशिंग्टनच्या अंगीं त्याग नसता तर त्याला युद्धांत यश खरोखर मिळालें नसतें. नेपोलियन बोनापार्ट, वॉशिंग्टन, वेलिंग्टन, अलेक्झान्डर, सीझर यांनां किंवा दुसऱ्या कोणाहि वीराला युद्धांत यश मिळविण्यास, राष्ट्रांचीं राष्ट्रें जिंकून हस्तगत करण्यास, सैन्यांचीं सैन्यें हालवून सोडण्यास, जगापासून--आसक्तीपासून अगदीं अलिप्त रहावें लागलें. अशा कोणाहि वीराचें मन अत्रस्त, शांत आणि स्वस्थ असलें पाहिजे, आणि तें एकाच ध्येयाविषयीं पूर्ण एकाग्र झालें पाहिजे. दुसऱ्या

गोष्टींनीं अगर परिस्थितींनीं त्या मनाला भंडावून सोडतां कामा नये. यांतील मर्म काय ? **एकाच ध्येयाशिवाय बाकी सर्व इतर गोष्टींचा त्याग** हेंच तें मर्म होय, आणि अशा तऱ्हेचा जितका त्याग एकाद्या मनुष्याच्या अंगीं असेल, त्या मानानें तो श्रेष्ठ होतो. नेपोलियनला एका शब्दानें हजारों शत्रूंनां थांबविण्याची शक्ति कशी आली? तो आपल्या ईश्वरीतत्त्वामध्यें पूर्ण लीन होत असे ह्मणून. आणि यायोगेंच न्यूटनसारख्या महात्म्यांनींहि तत्त्वज्ञान आणि शास्त्र यासंबंधाच्या आपल्या नूतन शोधांनीं जगावर उपकार केले आहेत. त्यांनां आपला देह, मन इत्यादिकांपासूनहि अलिप्त रहावें लागलें. ते घरीं बसले असले, तरी त्यांनां घरदाराची व आप्तेष्टांची स्मृति नसे. काय ही समाधि ! लोक ह्मणतील, कीं, कांहीं काम न करितां हे लोक स्वस्थ बसले आहेत. जेव्हां हे लोक स्वस्थ बसतात, तेव्हांच ते उत्तम काम करूं शकतात. वरपांगीं पहाणारांनां ते स्वस्थ बसलेले दिसतात खरे, पण आंत ते उत्तम काम करीत असतात. असे मोठे बुद्धिमान् लोक, वीर अगर महात्मे, न कळत जो त्याग आचरणांत आणितात, आणि ज्या त्यागाच्या योगें ते प्रसिद्धीला येतात, तो त्याग लोकांपुढें मांडणें आणि त्याचें शास्त्रीय विवेचन करून त्याच्या साधनार्थ नियम बांधणें आणि त्याचें स्पष्टीकरण करणें, हा हिंदु तत्त्वज्ञानाचा उद्देश आहे.

हिंदु लोक या त्यागाला ज्ञान असेंहि ह्मणतात. ह्मणजे त्यांच्या मतें त्याग आणि ज्ञान हीं एकच आहेत. ज्ञान ह्मणजे ऐहिक वस्तूंचें ज्ञान, असें मात्र येथें समजूं नये. ऐहिक वस्तूंच्या ज्ञानाचासुद्धां बराच उपयोग होतो; पण तें खरें ज्ञान नव्हे. खऱ्या ज्ञानानेंच शांति प्राप्त होते. ज्ञान अथवा त्याग ह्मणजे सत्याचें–आत्म्याचें–आपण कोण आहों याचें ज्ञान. आपण कोण आहों याचें ज्ञान बुद्धीला करून देतां येईल; पण तेवढ्यानें भागेल काय ? कांहींसें भागेल; पण त्यानें तृप्ति ( शांति ) होणार नाहीं. आपण ज्ञानी व्हावें, जीवन्मुक्त व्हावें, हें सर्व जग नंदनवन व्हावें, असें तुह्मांला वाटत असेल, तर आपण देव आहों, सच्चिदानंद

ब्रह्म आहों, अव्यक्त आदिशक्ति अथवा सत्ता–काय वाटेल तें नांव द्या–आपण तें ईश्वरी तत्त्व आहों, हें ज्ञान अनुभवांत आणून सोडलें पाहिजे. आपण कोण आहों हें ज्ञान नुसतें बुद्धीनें समजून उपयोगी नाहीं; तर तें आपल्या अंत:करणांत बिंबलें पाहिजे, आचरणांत उतरलें पाहिजे, आपल्या रक्तांत तें मिसळून हृदयाच्या प्रत्येक ठोक्यासरशीं उसळत राहिलें पाहिजे, व आपल्या प्रत्येक रोमरोमांत तें स्फुरण पावलें पाहिजे! असें ज्ञान किंवा विज्ञान हाच त्याग होय. हें ज्ञान मिळालें म्हणजे तुम्ही त्यागी झालां.

अरण्यवास किंवा एकांतवास हें एक नुसतें साधन आहे. अरण्यवास म्हणजे विश्वविद्यालयांतील अभ्यासच होय. विश्वविद्यालयांत आपण ज्ञानसंपादन करण्याकरितां जातों, पण सदैव तेथेंच रहावें असें कोणी समजत नाहींत. तसेंच वर सांगितलेलें विज्ञान मिळविण्यास, जरूर वाटत असेल तर तुम्ही अरण्यवास पत्करा; पण अरण्यवास म्हणजे त्याग, असें कांहीं वेदान्त सांगत नाहीं. त्यागाला तुमच्या धंद्याशीं, जाग्याशीं, अगर देहस्थितीशीं कांहीं कर्तव्य नाहीं! तुम्हीं कोठेंहि व कसेहि असा, त्याग तुम्हांला उच्च स्थितींत ठेवितो, तुमची शक्ति वाढवितो, तुम्हांला ईश्वर बनवून सोडतो. तुमचीं सर्व दु:खें, चिंता, काळजी यांचें निवारण करून तुम्हांला सुखी आणि निर्भय करून टाकितो.

दांपत्याला या त्यागाचा स्वीकार कसा करितां येईल? परस्परांचें कल्याण साधण्याचें जर नवराबायकोंनीं ठरविलें, तर हें ताबडतोब आजच्या आज साधतां येईल. नवराबायकोंनीं एकमेकांनां तारण्याचा निश्चय केला नाहीं, तर जगांतील सर्व धर्मग्रंथांचा फारच थोडा उपयोग होईल, याचा नीट विचार करा. लोक पुराणकीर्तन ऐकण्यास देवालयांत जातात. तेथें "सर्व ऐहिक वस्तूंचा त्याग करावा, संपत्तीचा मालक ईश्वर, आपण फक्त वहिवाटदार, आपण देह नसून देहांत वास करणारा आत्मा किंवा ईश्वर आहों," अशा तऱ्हेचा उपदेश ऐकण्यास सांपडल्यामुळें कांहींसें ज्ञान मिळतें खरें; पण तेथून घरीं आल्यानंतर काय प्रकार

घडतो ? “ मला नवी पैठणी आणा, मला ठुशी करून द्या, ” असें बायको सांगत असते; “ बाबा, आह्मांला खेळणीं द्या, ” ह्मणून मुलें पाठीला लागतात; “ माझी प्रिया, माझीं चिमुकलीं ” ह्मणून यजमान उत्तरें देऊं लागतो. बायकामुलें, घरदार, बंधुभगिनी सर्व कांहीं देवालयांत असेतोंपर्यंत ईश्वराच्या स्वाधीन केलें होतें, घरीं येतांच सर्व कांहीं ईश्वराकडून परत घेतलें, ‘ माझें माझें ’ सुरू झालें; नंतर ईश्वराचें कांहीं राहिलें नाहीं ! देवालयांत असतांना ‘ हे देवा, मी तुझा आहें, सर्व कांहीं तुझें आहे, तूं मालक आहेस, ’ अशी जी भावना क्षणभर उत्पन्न झाली होती, ती घरीं आल्यानंतर बायकामुलांचें तोंड पहातांच पार मावळून गेली ! याप्रमाणें आध्यात्मिक उन्नति आणि कौटुंबिक स्थिति यांमध्यें विरोध दिसून येतो. देवालयांत जें कांहीं साधिलें जातें, तें घरीं येतांच गमाविलें जातें. होमरच्या काव्यांत पेनिलोपीस नांवाची स्त्री दिवसभर धागा गुंडाळीत असे, आणि रात्रौ गुंडाळलेला सर्व धागा सोडून टाकीत असे, त्याप्रमाणें हा प्रकार होतो. देवालयांतील पुराणकीर्तनांनीं जी कांहीं थोडीशी उन्नति होते, ती घरीं येतांच साफ नाहींशी होते. असाच प्रकार जर नेहमीं चालू राहील, तर उद्धाराची आशा बाळगणें व्यर्थ आहे ! देवाशीं थट्टा करावयाची नसेल, व आमच्या प्रार्थना ह्मणजे नुसतें एक सोंग नसेल, तर आध्यात्मिक उन्नतीच्या आड येणारे अडथळे दूर सारून आम्हीं आमचें घरचें वर्तन सुधारलें पाहिजे. प्रत्येक बायकोनें आपल्या नवऱ्याचा ख्रिस्त ( तारक, ) झालें पाहिजे, आणि प्रत्येक नवऱ्यानें आपल्या बायकोचा ख्रिस्त ( तारक ) झालें पाहिजे.

कांहीं लोक ह्मणतात “मी तुझ्यावर प्रेम करितों.” पण काय ढोंग हें ! जर तुमची आपल्या नवऱ्यावर किंवा बायकोवर खरी प्रीति असेल, तर तुह्मीं त्याच्याकरितां किंवा तिच्याकरितां कांहीं झीज सोसली पाहिजे, कांहीं स्वार्थत्याग केला पाहिजे. बायकोला आपल्या सुखासाठीं नवरा पाहिजे, आणि नवऱ्यालाहि त्याचकरितां बायको पाहिजे आहे;

इतकी, कीं, जणूं काय ती एक निर्जीव पदार्थच आहे, आणि त्या पदार्थावर जशी त्याची सत्ता असते, तशी बायकोवरहि त्याला सत्ता पाहिजे असते ! परस्पर एकमेकांला परतंत्र करूं पाहतात. खरें प्रेम असेल, तर परस्परांनीं एकमेकांचें हित साधलें पाहिजे व वाढविलें पाहिजे. नवराबायको परस्परांचें हित साधितात काय? नवऱ्याच्या किंवा बायकोच्या वैषयिक इच्छा तृप्त करणें ह्मणजे त्यांनीं आपलें हित साधणें किंवा कल्याण करणें नव्हे. वैषयिक इच्छा तृप्त करणें ह्मणजे परस्परांचें कल्याण करणें, असें असतें, तर जगांतील सर्व कुटुंबें सुखी झालीं असतीं; पण तीं सर्व सुखी आहेत काय? हजारांत एकादें कुटुंब क्वचित् सुखी असेल. परस्परांच्या पशुवासना तृप्त करणें ह्मणजेच कल्याण साधणें, अशी खोटी समजूत करून घेतल्यानें, व खरें हित कसें साधावें हें माहीत नसल्यानें पुष्कळ कुटुंबें सुखी नसतात.

कोणीएक ग्रंथकार ह्मणतो, कीं, प्रेम ह्मणजे दुःखाशीं तडजोड करणें होय. ( To love is to make a compact with sorrow.) पुष्कळ कादंबरीकार, इतिहासकार वगैरेंचा अनुभव असाच आहे. पण प्रेमामध्यें असें काय आहे, कीं, त्यापासून दुःख व्हावें ? प्रेमांत तर तसें कांहीं नाहीं ! प्रेमाचा दुरुपयोग केल्यानें मात्र दुःख उत्पन्न होतें. श्रीकृष्णांची अशी एक गोष्ट सांगतात, कीं, त्याला एका राक्षसानें खाल्लें. कृष्णाच्या हातांत एक कट्यार होती, तिच्यासहित राक्षसानें त्याला गिळून टाकलें. राक्षसाच्या पोटांत गेल्यावर आपल्या हातांतील कट्यारीनें राक्षसाचें पोट फाडून कृष्ण बाहेर निघाला व राक्षस मरण पावला. आमच्या प्रेमाची अशीच स्थिति होते. प्रेम ह्मणजे काय ? प्रेम ह्मणजे श्रीकृष्ण अगर देव. विषयी मनुष्याच्या हृदयांत प्रेम प्रवेश करितें, आणि तेथें त्याला ठाणें मिळालें ह्मणजे तें हृदयावर घाव घालितें; आणि मग हृदय विदीर्ण होऊन दुःख, वेदना, आक्रोश इत्यादि प्रकार सकाम प्रेमांत आमच्या अनुभवाला येतात. हें असें होतें. एकाद्या ऐहिक वस्तूवर आमची आसक्ति जडली आणि त्या वस्तूवर आह्मी प्रेम करूं

लागलों, ह्मणजे श्रीकृष्णदेव ( प्रेम ) आंत शिरतो आणि अंतःकरणावर घाव घालितो; मग अंतःकरण विदीर्ण होऊन आह्मी शोक करूं लागतों, कीं, " हें प्रेम मोठें निर्दय आहे, आणि यानें आमचा घात केला.!" इत्यादि.

कायदा असा आहे, कीं, या जगांत कोणी एकाद्या व्यक्तीशीं अगर ऐहिक वस्तूशीं आसक्ति जडवून घेईल, तर त्याला निःसंशय दुःख प्राप्त होईल. ती व्यक्ति अगर ती वस्तु त्याच्यापासून हिरावून घेतली जाईल, किंवा दोघांपैकीं एकादा नष्ट होईल, अगर दोघांमध्यें कांहीं वितुष्ट तरी येईल. हा सृष्टिनियम अपरिहार्य आहे. ऐहिक वस्तूंवर ममता ठेविल्यानें सुख केव्हांहि मिळणार नाहीं. उलट दुःख मात्र होईल. ' सर्वशक्तिमान् ' पैशावर अगर कोणत्याहि वस्तूवर विश्वास न ठेवितां, देवावर—आत्म्यावर सर्व भार ठेवा. समजा, तुमच्या एका मित्रानें आपली एक सुंदर तसबीर तुमच्यापाशीं दिलेली आहे. तुह्मी ती मोठ्या प्रेमानें बाळगितां. तुह्मीं त्या तसबिरीचें चुंबन घेतां, तिला गोंजारितां आणि तिच्यावर इतकें प्रेम करितां, कीं, तो मित्र स्वतः तुमच्याकडे आला तरी तुह्मी त्याकडे दुर्लक्ष्य करितां, त्याला ढुंकूनहि पाहत नाहीं ! तुमचें हें वर्तन योग्य होईल काय ? अशानें तुमचा मित्र आपली तसबीर तुमच्यापाशीं क्षणभर तरी ठेवील काय ? कधींहि नाहीं ! आपली आठवण रहावी ह्मणून त्यानें ती तसबीर तुमच्याकडे दिली; आपली विस्मृति पडावी म्हणून त्यानें ती तुमच्याकडे दिली नाहीं ! त्या तसबिरीला इतका मान देण्याचें कांहीं कारण नाहीं. त्या तसबिरीचीच पूजा करणें ही मूर्तिपूजा होय. त्याचप्रमाणें या जगांतील सर्व वस्तु परमेश्वराच्या तसबिरी अथवा प्रतिमा होत, आणि सर्व तसबिरींचा धनी अथवा मालक याचीच तुह्मीं पूजा केली पाहिजे. पुष्कळ दांपत्यें नुसत्या बाह्य प्रतिमांनां बळी पडून त्यांचीच पूजा करितात, आणि मूळ मालकाला विसरतात. मूर्तिपूजा ती हीच ! ईश्वराच्या प्रतिमा अगर मूर्ति उभारूं नयेत व मूर्तिपूजा करूं नये, असें जें बायबलांत सांगितलें

आहे, त्याचा अर्थ इतकाच आहे, कीं, आम्हीं मूळाला विसरून प्रतिमांनांच भुलतां कामा नये.

हिंदुस्तानांतील एका स्मशानभूमींतील एका थडग्यावर खालीं दिलेला लेख खोदलेला होता:—

‡ विश्रांति घेत, अधुना मृत बाल येथ,
जें कीं पुरा निवसलें मम मानसांत;
झालें जरी, प्रभु करीं बहु योग्य जें तें,
आह्मां वियोग घडणेंच अवश्य होतें !

हा लेख एका स्त्रीनें खोदविलेला होता. आपल्या मुलाच्या आंत असणाऱ्या ईश्वरी तत्त्वाकडे लक्ष्य न देतां ती त्याच्या देहावर–चित्रावर विशेष प्रेम करूं लागली होती, आणि ह्मणूनच वर सांगितल्याप्रमाणें त्या मुलाला तिच्यापासून दूर करणें इष्ट होतें. कायदाच तसा आहे! चित्रांचा आह्मीं योग्य उपयोग केला, तर चित्रें आमच्यापाशीं राहतील. त्यांचा दुरुपयोग केला, तर त्यांपासून आह्मांला दुःख होईल. चित्रांचा योग्य उपयोग करणें ह्मणजे चित्रांपेक्षां त्यांच्या मूळ मालकावर विशेष प्रेम करणें होय. आणि असें प्रेम केलें, तरच आह्मीं चित्रें जवळ बाळगावींत, नाहींतर बाळगूं नयेत. त्याग तो हाच. आणि याच तऱ्हेनें प्रत्येक कुटुंबांत त्यागाचा अभ्यास झाला पाहिजे.

समजा, एका नवऱ्याचें आपल्या पत्नीवर अत्यंत प्रेम आहे. त्याला मोहून टाकणारें, त्याचें चित्त आकर्षण करणारें असें तिच्यांत काय आहे? तिची शरीरकांति, सुंदर नेत्र, कर्ण, नासिका वगैरे त्याचें मन मोहित करतात काय? छेः, कधींहि नाहीं! कवीपेक्षां अधिक विवेकी व्हा आणि विचार करा. या अवयवांत जर खरी आकर्षणशक्ति असती, तर

‡ "Here lies the babe that now is gone
An idol to my heart.
If so, the wise God has justly done
'Twas needful we should part."

मेल्यानंतरहि हे असेच चित्ताकर्षक झाले असते; पण हेच अवयव मरणोत्तर निस्तेज होतात आणि आमचीं मनें आकर्षण करीत नाहींत. तेव्हां सौंदर्य कशांत असतें आणि मोह कोण पाडितो ? क्लीओपाट्रा नामक इजिप्तमधील एका नीग्रो कन्यकेनें रोमच्या अँटनी बादशहाला आपल्या लावण्यानें आणि हावभावानें पूर्ण वश करून घेतलें होतें. सौंदर्य, लावण्य, हावभाव आणि त्यांनां मूलभूत असलेली चलनवलनशक्ति कोठून आली ? आम्हीं जीवंतपणीं डोंगरावर चढतों, एका जागेपासून दुसऱ्या जागीं जातों; पण मेल्यानंतर ही आमची शक्ति कोठें जाते? पूर्वीं जीवंत असतांना जी सत्ता अगर शक्ति ( परमेश्वर–आत्मा ) आम्हांला चलनवलनादि सर्व कामें करण्याला मदत करीत होती, ती मेल्यानंतर करीत नाहीं. सर्व वस्तूंनां सौंदर्य, लावण्य, चलनवलन इत्यादि जें कांहीं प्राप्त होतें, तें सर्व परमात्मशक्ति–अंतःशक्ति–आत्मा यापासूनच मिळतें. तेव्हां तुह्मीं हें पक्कें ध्यानांत ठेवा, कीं, तुमच्यासमोर उभा राहून जो कोणी तुह्मांला पहात आहे, आणि तुमच्याबरोबर बोलत आहे, तोच परमात्मा–अंतरात्मा होय. बाह्यनेत्र, कर्ण, त्वचा आणि शरीर हें सर्व त्या अंतरात्म्याचा पोषाख होय.

जेव्हां या जगांतील लोक ऐहिक वस्तूंवरच प्रेम करितात, तेव्हां ते पोषाखाच्या आंत असणाऱ्या आत्म्यापेक्षां वरच्या पोषाखावरच विशेष लक्ष्य देतात, सद्वस्तूला विसरून बाह्य आवरणांचीच पूजा करितात, आणि यामुळेंच ते दुःख भोगतात. त्यांनां या पापाचें फळ भोगावें लागतें. या पापापासून तुह्मीं अलिप्त असावें. नवराबायकोंनीं परस्परांच्या अंतर्यामीं असणाऱ्या आत्मदेवाला पहावें व त्याचीच पूजा करावी. नवरा किंवा बायको हीं नरकाचें द्वार न होतां परमात्मस्वरूप दाखविणारा आरसा झालीं पाहिजेत. तसेंच याप्रमाणें प्रत्येक वस्तु परमात्मस्वरूप वाटली पाहिजे.

आतां नवराबायकोंनीं ही दिव्य दृष्टि एकमेकांनां कशी साध्य करून द्यावी, हें पाहूं. बायकोला आपल्या नवऱ्याला जर तारावयाचें असेल,

तर तिनें सर्व बाह्य मोहांपासून त्याला परावृत्त केलें पाहिजे. अविवाहित मनुष्य अनेक तऱ्हांच्या मोहपाशांत पडण्याचा संभव असतो. सुकाणूं नसलेली नौका वाऱ्यांनीं आणि वादळांनीं हेलकावे खात इकडेतिकडे जाते, तशी अविवाहित मनुष्याची स्थिति होते; आणि त्यांत त्याला कांहीं परमार्थज्ञान नसेल, तर सर्व बाजूंनीं त्याला धक्के खावे लागतात. सर्व बाह्य मोहांपासून बायकोनें नवऱ्याचें प्रथम रक्षण केलें पाहिजे. पण नेहमीं काय प्रकार घडतो ? बायका आपल्या नवऱ्यांचें मोहांपासून रक्षण तर करीत नाहींतच; उलट स्वतः आपण नवऱ्यांच्या डोक्यावर मोठें ओझें होऊन बसतात. ज्याप्रमाणें सर्व बारीकसारीक चिल्लर नाणीं देऊन त्या रकमेची एकच नोट करून ठेवावी, त्याप्रमाणें स्त्रीचा मोठा मोह इतर मोहांनां मागें टाकितो आणि पुरुषाला चीत करून सोडितो.

पूर्वीं घोडा अरण्यांत रहात असे, तेव्हां त्याला तेथें हरिण, सांबर इत्यादि सर्व जंगली प्राण्यांपासून बराच त्रास झाला; ह्मणून त्यानें मनुष्याची मदत मागितली. “मला पाटीवर घेऊन चल, ह्मणजे मी तुझ्या शत्रूंचा संहार करितों,” असें मनुष्यानें त्याला सांगितलें. घोड्यानें ती गोष्ट कबूल केली. नंतर मनुष्य अश्वारूढ होऊन जंगलांत गेला, आणि त्यानें बाण मारून घोड्याच्या सर्व शत्रूंनां ठार केलें. घोड्याला फार आनंद झाला. तो मनुष्याचे आभार मानून परत जाऊं लागला; पण मनुष्य त्याला कांहीं जाऊं देईना ! तो ह्मणाला “तूं किती उपयोगी प्राणी आहेस हें मला कळून चुकलें. मी आतां तुला सोडणार नाहीं, मी तुला आतां माझा गुलाम करून ठेवणार.” घोड्याच्या शत्रूंचा नाश झाला खरा, पण त्याची स्वतंत्रता मात्र गेली. विवाहित मनुष्याची स्थिति या घोड्यासारखी होते. बायको त्याचें अनेक मोहांपासून रक्षण करते खरी, पण ती स्वतःच एक मोठा जबरदस्त मोह होऊन बसते. पुष्कळ मोहांपासून ती त्याला तारिते, ही गोष्टसुद्धां कांहीं कमी नाहीं. यापुढची पायरी ह्मटली ह्मणजे नवराबायकोंनीं परस्परांनां एकमेकांचे गुलाम करतां कामा नये. इतकें झालें तरच कांहीं आशा आहे.

येशू ख्रिस्त हा जगाचा तारक आहे, तो सर्व पापें नाहींशीं करून पृथ्वीवर धर्मराज्य सुरू करणार आहे, असें बायबलांत सांगितलें आहे. बायबल, कुराण अथवा वेद कांहींहि सांगोत; जग तर पूर्वींप्रमाणेंच अधर्मी आहे. याचें कारण काय? अनिष्टाचें खरें कारण नाहींसें झालें नाहीं हें होय, आणि तें कारण आमच्या कुटुंबांतच आहे. नवराबायकोंनीं परस्परांचें कल्याण साधण्याचा निश्चय केल्याखेरीज धर्माची वाढ होणार नाहीं, व तो धर्म जीवंत राहण्याचीहि आशा राहणार नाहीं. हे ख्रिस्ती, हिंदु व मुसलमान बांधव हो ! जर जगांतील दुःखें नाहींशीं व्हावीं आणि मनुष्यांनीं सुखी व्हावें असें तुह्मांला वाटत असेल, तर तुह्मीं तुमचे वैवाहिक संबंध नीट दुरुस्त केले पाहिजेत. प्रत्येक नवरा-बायकोंनीं परस्परांचें तारक झालें पाहिजे, हें तत्त्व सर्वांच्या अंतःकरणांत बिंबविलें पाहिजे. हें कसें साध्य होईल ? जर नवऱ्याच्या मनांत बायकोला आणि बायकोच्या मनांत नवऱ्याला गुलाम करावयाचें नसेल, तरच हें होईल. तुह्मी दुसऱ्यांनां मुक्त–स्वतंत्र करा, ह्मणजे तुह्मी स्वतः मुक्त–स्वतंत्र आपोआप होतांच. नियम असा आहे. आघात आणि प्रत्याघात हे सारखे असतात. तुह्मी आपल्या बायकांनां ताब्यांत ठेवा, त्यांनां गुलाम करा, ह्मणजे तुह्मीहि गुलाम बनलांच ह्मणून समजा. हें विधान कित्येकांनां भयंकर वाटेल. पण सत्य नेहमीं भ्यासुरच असतें. ख्रिस्तानें भ्यासुर सत्याचा उपदेश केला, लोकांनीं त्याचा छळ करून त्याला सुळावर चढविलें. तसेंच साक्रेटिसालाहि विष प्यावें लागलें. लोक केव्हांहि सत्याचा स्वीकार आनंदानें करीत नाहींत.

मनुष्य बैलाच्या नाकांत वेसण घालून शिंगांनां दोऱ्या बांधून त्या आपल्या हातीं धरितो आणि बैल आपला नोकर, गुलाम आहे असें ह्मणतो; परंतु बैल जितका त्याचा बंदा गुलाम आहे, तितकाच तोहि पण बैलाचा बंदा गुलाम आहे. बैल आपला गुलाम आहे असें ह्मणण्यास त्याला कारण काय, तर, त्याला सोडून बैलाला दुसरीकडे जातां येत नाहीं. हेंच कारण असेल, तर जसें त्याला सोडून बैलाला जातां येत नाहीं,

तसेंच बैलाला सोडून मनुष्यालाहि जातां येत नाहीं. तो जर स्वतंत्र असता, बैलाला सोडून त्याला जर जातां आलें असतें, तर बैलहि त्याचा गुलाम न होतां स्वतंत्र झाला असता. सृष्टिनियम अथवा कायदा असा आहे !

सर्व कुटुंबें दुःखी आहेत, हें तुम्हांला दिसत नाहीं काय ? ही गोष्ट खरी नाहीं काय ? यूरोप, अमेरिका, हिंदुस्तान, जपान अथवा जगांतील कोणत्याहि देशांतील कुटुंबांत सुख नाहीं, हें खरें नाहीं काय ? लोक तोंडानें म्हणतात, कीं, आमचें घर किती तरी सुखी ! (Happy Home !) काय ढोंग हें ! सुख शब्दांत मात्र राहिलें आहे. तें स्वप्नवत् झालें आहे. लोकांनां दुःखें भोगावीं लागत आहेत आणि कुटुंबें सुखी नाहींत. हें असें कां ? कुटुंबें सुखी असावीं असें तुह्मांला मनापासून वाटत नाहीं काय ? जर सुख पाहिजे, तर कुटुंब किंवा घर थट्टा न समजतां त्यांविषयीं तुम्हीं खरी कळकळ बाळगिली पाहिजे. दुःखाचें खरें कारण, नीट विचार करून शोधून काढिलें पाहिजे, व तें दूर केलें पाहिजे. कुटुंबांत सुख नसतें, याचें कारण म्हटलें म्हणजे कुटुंबांतील लोकांनां सृष्टिनियमांचें ज्ञान नसतें; निसर्गाची योजना कशी आहे, उत्क्रांतितत्त्वाची गति कशी चाललेली आहे, हें ज्ञान नसतें; अज्ञान मात्र भरपूर भरलेलें असतें, हें होय. 'राम' सांगतो, कीं, उत्क्रांतितत्त्वाची अथवा निसर्गाची अशी मुख्य योजना आहे, कीं, सर्वांनीं–प्रत्येकानें हळुहळू–सावकाश आपल्या अंतर्यामीं असलेल्या ईश्वरी तत्त्वाचा, आत्म तत्त्वाचा, अनुभव घ्यावा. ही योजना न समजल्यामुळेंच जगांत सर्वत्र कलह व त्रास माजत चालला आहे.

आपल्या नवऱ्याशीं अगर बायकोशीं आपण असें वर्तन ठेवावें, कीं, निसर्गाच्या योजनेप्रमाणें योग्य दिशेनें आपली उन्नति होत असावी. निसर्गाची योजना ह्मटली ह्मणजे मुक्ति किंवा स्वतंत्रता. तुमच्या बायकोला स्वतंत्र करा, ह्मणजे तुह्मीहि आपोआप स्वतंत्रच व्हाल. याचा अर्थ काय ? 'एक घाव दोन तुकडे,' या न्यायानें सर्व नैतिक संबंध तोडून अथवा

झुगारून देऊन स्त्रीपुरुषांनीं पाहिजे तसें स्वैर आचरण करावयाचें काय ? स्वैर वर्तन ह्मणजे मुक्ति किंवा स्वतंत्रता नव्हे, उलट तें दास्य किंवा गुलामगिरी होय ! आपल्या मित्राला स्वतंत्र करणें ह्मणजे त्याला किंवा तिला नुसत्या बाह्य देहावर नव्हे, तर अंतर्यामीं असलेल्या परमात्म्यावर विश्वास व सर्व भार ठेवावयाला लावणें होय. दांपत्याचें खरें प्रेम ह्मटलें ह्मणजे बायकोमध्यें असणाऱ्या परमात्म्यावर नवऱ्यानें प्रीति करणें व स्वतःमध्यें असलेल्या परमात्म्यावर तिला प्रीति करावयाला लावणें, हें होय. कित्येक लोक येशू ख्रिस्तावर, कित्येक कृष्णावर, आपला विश्वास आहे असें ह्मणतात. 'राम' सांगतो, कीं, तुह्मी आपापल्या नवऱ्यांवर व बायकांवर विश्वास ठेवा. आपापल्या मित्रांच्या मांसमय देहांवर मात्र तो न ठेवितां आंतील आत्मतत्त्वावर ठेवा. अस्थिस्नायुचर्ममय बाह्य देहांकडे तुह्मीं असें पहावें, कीं, ते जणूं काय पारदर्शक पडदे आहेत, आणि त्यांतून आंतील आत्मवस्तु तुह्मांला स्पष्ट दिसत आहे.

हालणाऱ्या फांदीवर बसणाऱ्या पक्ष्याला फांदी खालीं लवते हें माहीत असतें; पण तो पक्षी यत्किंचित्‌हि न घाबरतां मोठ्या आनंदानें गात असतो. कारण, त्याचा सर्व विश्वास हालणाऱ्या फांदीवर नसून स्वतःच्या पंखांवर असतो. त्याप्रमाणें तुह्मी कोठेंहि असलां, तुमच्या बायकामुलांवर तुमची कितीहि आसक्ति असली, तरी तुमचें सर्व अंतःकरण तेथेंच ठेवूं नका. तुमचें अंतःकरण देवाकडे—आत्म्याकडे पूर्ण लागलेलें असावें. हाच काय तो मार्ग आहे. या रीतीनें तुह्मीं स्वतः वागावें, व याच रीतीनें आपल्या बायकामुलांनांहि वागण्यास लावावें. असें केल्यानें तुह्मीं स्वतंत्र व्हाल व बायकामुलांनांहि स्वतंत्र कराल. कोणी कोणावर अवलंबून राहणार नाहीं.

३. एका भव्य मंचकावर एक रूपवती राणी मरणोन्मुख होऊन पडली आहे, आणि जवळच राजा व तिचीं मुलें हीं शोक करीत बसलीं आहेत, असें एका उत्तम चितारऱ्यानें काढलेलें सुंदर चित्र एके ठिकाणीं पाहण्यांत आलें होतें. हें चित्र इतकें उत्तम व मोहक होतें, कीं, पाहणा

राला हें चित्र आपल्यापाशीं असावें असें वाटे. श्रीमंतांनीं भारी किंमत देऊन हें विकत घेतलें असतें. पण या चित्रांतील राणी, राजा किंवा त्यांचीं मुलें यांपैकीं कोणीहि आपण व्हावें असें कोणाला तरी वाटलें असतें काय ? नाहीं—कोणालाहि वाटणार नाहीं !

वेदान्त तुह्मांला सांगतो, कीं, तुह्मीं ईश्वराप्रमाणें, अलिप्त साक्षी याप्रमाणें आपल्या घरांत, कुटुंबांत आणि संसारांत रहावें. कोणत्याहि मोहपाशांत आपणांला गुंतवून न घेतां आपलें मन तुह्मीं आंतील आत्म–तत्त्वाकडे लावावें. वर सांगितलेल्या चित्राकडे जसें तुह्मीं पाहिलें असतें, तसेंच तुह्मीं संसारांतील सर्व गोष्टींकडे पहावें. साक्षी या नात्यानें जेव्हां आह्मीं कोणत्याहि गोष्टीकडे पाहतों तेव्हां आह्मांला सुख होतें. पण कोणत्याहि गोष्टीवर अगर वस्तूवर आमची आसक्ति जडली, ह्मणजे आह्मांला दुःख होतें हें तुह्मांला माहीत आहे * 'रामा'चीं सर्व व्याख्यानें नीट लक्ष्यपूर्वक ऐका व त्यांचें मनन करा. म्हणजे हळुहळू तुमच्या शंकांचें निरसन होईल आणि आत्मप्रत्यय येऊं लागेल. प्रथम आपण ईश्वर आहों अशी भावना धरा, आणि त्याप्रमाणें, 'रामा'नें सांगितलेल्या उपायाप्रमाणें साक्षात्कार करून घेण्याचे प्रयत्न करा. आपल्या गृहस्थितीकडे आणि संसारांतील गोष्टींकडे हें सर्व एकादें चित्र आहे असें मानून अलिप्तपणें पहात चला. या गोष्टींवर आसक्ति जडल्याशिवाय आमची प्रगति होणार नाहीं, असा कांहीं लोकांचा समज आहे; पण तो चुकीचा आहे. आसक्ति जडून संसाराच्या गोष्टींत तुह्मीं स्वताला गुरफटून घेतलेंत, कीं, तुमची प्रगति बंद झालीच ह्मणून समजा. जेव्हां तुह्मी लिहीत असतां, तेव्हां लिहिण्याचें काम अकर्तृकपणें चाललेलें असतें, तुमचा हात एकाद्या आपोआप चालणाऱ्या यंत्राप्रमाणें काम करीत असतो. असें कां होतें ? तर तुह्मी आपला अहंकार किंवा मीपणा त्यांत घुसडीत नाहीं ह्मणून. 'मीं हें

* कुस्ती खेळणारापेक्षां कुस्ती पाहणाराला विशेष आनंद होत नाहीं काय !—विवेकानंद.

उत्तम लिहिलें आहे, फार उत्तम करीत आहें,' अशा अहंकाराचा उदय मनांत होऊं लागतांच, हात कचरतो आणि भराभर चुका होऊं लागतात.

एवंच, क्षुद्र स्वार्थी अहंकाराचा त्याग केला असतां काम उत्तम वठतें, आणि अहंकाराचा प्रादुर्भाव झाला ह्मणजे कामाची घडी बिघडून जाते. उत्तम काम अकर्तृकपणेंच होत असतें. क्षुद्र स्वार्थी अहंकार टाकणें हाच खरा त्याग होय. आपण काम करीत आहों, ही भावना सूर्याला नसते. तो अकर्तृकपणें प्रकाशत असतो, आणि त्यामुळेंच तो इतका मोहक आणि आल्हादजनक असतो. नद्याहि त्याप्रमाणेंच अकर्तृकपणें वाहत असतात, ह्मणूनच त्यांच्याकडून इतकें उत्तम कार्य होतें. दिवा प्रकाशत असतो, पण आपण पेटत आहों व प्रकाश देत आहों, ही भावना त्याला नसते. हंसणारीं फुलेंहि चहूंकडे आपला परिमल पसरीत असतात, पण आपण इतकीं उत्तम, सुवासिक व मधुर आहों, ही कल्पना त्यांनां नसते. त्याचप्रमाणें, तुमचें कामहि अहंकार-विरहित आणि कर्तृभावशून्य असें होऊंद्या. स्वार्थी अहंकाराची बाधा तुह्मांला केव्हांहि न होवो. सूर्य, चंद्र आणि तारे यांप्रमाणें तुमचें काम होऊंद्या, ह्मणजे तें यशस्वी आणि नांवाजण्याजोगें होईल. जगांतील थोर पुरुष, वीर, महात्मे यांनां यशाचें हें वर्म माहीत होतें. अहंकाराला दूर सारून त्यांनीं आपलीं कामें अकर्तृकपणें केलीं, ह्मणून त्यांनां इतकें उत्तम यश लाभलें. कोणत्याहि कामांत गुंतवून घेतल्याशिवाय यश यावयाचें नाहीं, असा जो तुमचा समज झालेला आहे, तो भ्रामक आहे, तो टाकून द्या.

कायदा असा आहे, कीं, मनानें स्थितिशास्त्राच्या, व शरीरानें गतिशास्त्राच्या नियमांप्रमाणें वागावें; ह्मणजे मन नेहमीं शांत व स्वस्थ असावें आणि देह सदोदित कार्यरत असावा. हा कायदा जाणून आणि त्याप्रमाणें वागून तुम्हीं मुक्त व्हावें. तुमच्या समोरील सृष्टीचा एकादा सुंदर देखावा तुमच्या नेत्रांत संथपणें भरतो. त्यापासून नेत्रांनां यत्किंचित्‌हि त्रास होत नाहीं, किंवा त्यांवर कांहीं ओझें पडत नाहीं. नेत्रांत तो सर्व देखावा भरूनहि

ते अलिप्त असतात. त्याप्रमाणेंच घरांतील, कुटुंबांतील, संसारांतील सर्व गोष्टींविषयीं तुमची स्थिति असावी. म्हणजे जगांतील सर्व गोष्टींचें तुह्मीं निरीक्षण करावें, पण तुमच्यावर त्यांचा कांहीं भार न पडतां तुह्मीं अनासक्त, अलिप्त व मुक्त असावें. आणि ही मुक्ति किंवा स्वतंत्रता तुह्मांला सत्यज्ञानानें किंवा आत्मज्ञानानेंच मिळणार आहे. हें ज्ञान तुह्मांला मिळालें, कीं, ग्रह, तारेसुद्धां तुमचा हुकूम पाळतील !

ग्रह–तार्‍यांनों ! भ्रमा फिरा हो,
अपुलीं गात्रें मज दावा हो !
सर्व बाजुंनीं मज पाहूंदे,
चैतन्यामधिं नाचा मोदें !
भूजल तारे भानू तैसे
फिरती सगळे भासे ऐसें;
परि ती माया, सत्य पहातां,
जातो फिरतो मीच तत्त्वतां !

गतिस्थितिहि ना विश्रांतीही 'मम' 'तव' कांहीं नाहीं,
दुजें मजविना कांहिं नसे या जगतीं सत्यचि पाहीं !
भूवरि विचरे, नभीं फिरे जें, चकमक झगमग करितें,
नेत्रा दिसतें, मना भासतें, मीचि एक सर्वहि तें !
शक्ति कुणा नच मज वर्णाया शब्दापरता मी हो !
नक्षत्रांनों ! मी तुमचेंही जीवन पूर्ण पहा हो !
खुणावितां मज कुठें यावया ? वदा ऐकुंद्या मजला,
भरलोंसें मी सर्वांठायीं भेदभाव तो हरला !
जलनिधिराया ! खडपासन्निध आपटिं अपुल्या लाटा,
मत्पदिंही तूं जगता ! येईं त्यजुनी सर्वहि ताठा !

तुमचा खरा आत्मा असा आहे ! याचा अनुभव घ्या आणि मुक्त व्हा. तुम्हीं त्याचा साक्षात्कार घ्या म्हणजे तुम्ही विश्वाचे स्वामी व्हाल, आणि तुमचे सर्व व्यवहार आणि कामें तुह्मांला पाहिजेत तशीं जुळून येतील;

आणि शेवटीं यशाच्यामागें तुह्मीं लागावयाचें एकीकडे राहून यशच तुमच्यामागें धांवत येईल! अंतर्यामीं असलेल्या ईश्वरी तत्त्वावर श्रद्धा ठेविल्यानें आणि त्या तत्त्वाचा साक्षात्कार घेतल्यानें सर्व विश्व तुमचा बंदा गुलाम होईल, सर्व कांहीं तुह्मांला वश होईल. यश आणि अभ्युदय तुह्मांला शोधूं लागतील. 'पर्वत महंमदाकडे गेला नाहीं तरी महंमदाला पर्वताकडे जावें लागेल.' विश्वाचें नियमन करणारें हें गूढ तत्त्व किंवा वर्म असें आहे. तुह्मीं त्या तत्त्वाचा स्वतः अनुभव घ्या, आणि तुमच्या बायकामुलांनांहि त्याचा प्रत्यय आणून द्या. स्वतः मुक्त होऊन त्यांनांहि मुक्त करा. असें झालें, ह्मणजे तुरुंग देखील स्वर्ग होईल, आणि तुमचीं घरें नंदनवनें होऊन जातील! आणि तंटेबाज कुटुंबांतहि शांति नांदूं लागेल. याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. हा मार्ग किंवा ही गुरुकिल्ली मिळवा, ह्मणजे या जगांतील सर्व भांडारें तुमच्या हातीं लागतील. अंतर्यामीं असलेल्या ईश्वरी तत्त्वाचा तुह्मीं साक्षात्कार करून घेतलात, ह्मणजे तुह्मी मुक्त झालां. दुसऱ्यांनांहि तो साक्षात्कार प्राप्त करून घेण्यास मदत करा.

## MARRIED LIFE AND REALIZATION.

## वैवाहिक स्थिति आणि साक्षात्कार.*

आपलीं बायकामुलें, आप्तेष्ट यांसह राहणाऱ्या गृहस्थाला किंवा संसारिकाला सत्याचा अगर आत्मज्ञानाचा साक्षात्कार घेतां येईल काय? असा एक मोठा प्रश्न आहे.

या प्रश्नाचा प्रथम आपण एकाच बाजूनें विचार करूं. वेदान्त तुह्मांला विचारतो, कीं, तरवारीनें तुमच्या शत्रूंनां मारतां येईल काय? जर या प्रश्नाचें उत्तर होकारार्थी देतां येईल, तर 'संसारिकाला सत्याचा साक्षात्कार घेतां येईल काय,' या प्रश्नाचेंहि उत्तर होकारार्थींच दिलें पाहिजे. तरवारीचा किंवा कौटुंबिक स्थितीचा आह्मी कसा उपयोग करूं, यावर सर्व कांहीं अवलंबून आहे. एकाच तरवारीनें आह्मी स्वतःला मारून घेऊं, किंवा शत्रूंच्या हल्ल्यापासून स्वतःचें रक्षण करून घेऊं. त्याप्रमाणें कौटुंबिक स्थितीचा दुरुपयोग केला, तर आमची अवनति होईल, आणि तिचा सदुपयोग केला तर आमची उन्नति आह्मांला करून घेतां येईल.

तसेंच, आहार, विहार यांचा योग्य उपयोग केला असतां आह्मांला आरोग्य व सुख हीं प्राप्त होतील; पण त्यांचा दुरुपयोग केला असतां आह्मांला दुःख व त्रास होईल. कौटुंबिक स्थितीचेंहि तसेंच आहे.

एका धन्याची अशी एक गोष्ट सांगतात, कीं, तो धनी जितका सज्जन होता, तितकाच–किंबहुना त्याहूनहि अधिक त्याचा नोकर दुर्जन होता. तो आपल्या धन्याचीं कामें इतक्या वाईट रीतीनें करी, कीं, तीं पाहून अत्यंत शांत मनुष्यालाहि चीड किंवा संताप येत असे. पण आश्चर्य हें, कीं, त्या धन्याला त्याचा कधीं राग येत नसे. उलट तो त्याला फार ममतेनें वागवी. एकदां त्या धन्याच्या घरीं एक पाहुणा आला होता. त्यानें त्या चाकराची काम करण्याची तऱ्हा पाहून, याला

* रविवार, १ फेब्रुवारी १९०३ रोजीं झालेलें व्याख्यान.

कायमची रजा लवकर द्यावी, असा यजमानाला सल्ला दिला. त्या सज्जन मनुष्यानें त्याला असें उत्तर दिलें, कीं, "तुह्मी जो सल्ला किंवा उपदेश मला देत आहां, तो माझ्या हितार्थच आहे, हें मी जाणतों. माझा चाकर दुष्ट, लबाड, अविश्वासु आहे, आणि त्यामुळें माझा फार तोटा होतो, हेंहि मला माहीत आहे; पण तो असा वाईट व पापी आहे, ह्मणून मीं त्याला मुद्दाम ठेवून घेतलें आहे, आणि तो मला प्रिय झाला आहे."

तो धनी पुढें ह्मणाला "या नोकराशिवाय माझ्या परिचयांतील सर्व मंडळी, माझे आप्तेष्ट वगैरे सर्व माझ्याशीं फार प्रेमानें व ममतेनें वागतात. त्यांच्यापासून मला यत्किंचित्‌हि त्रास होत नाहीं. हा नोकर मात्र मला अद्वितीय किंवा लोकोत्तर असा वाटतो. याच्यापासून माझ्या आध्यात्मिक उन्नतीला मदत होते. आपल्या स्नायूंची शक्ति वाढवून शारीरिक आरोग्य मिळविण्यासाठीं लोक डंबेल्स, वजनें यांचा उपयोग करितात, त्याप्रमाणेंच शांतीचा किंवा सहनशीलतेचा धडा शिकण्यास आणि माझी आध्यात्मिक उन्नति करून घेण्यास डंबेल्ससारखा या चाकराचा मला फार उपयोग होतो."

ग्रीस देशांत साक्रेटीस या नांवाचा एक मोठा तत्त्ववेत्ता होऊन गेला. त्याची बायको झांटिपी मूर्तिमंत त्राटिकाच होती. एके दिवशीं साक्रेटीस कांहीं प्रश्नांचा विचार करीत बसला असतां झांटिपी तेथें आली आणि नेहमींप्रमाणें अद्वातद्वा बोलूं लागली, आणि आपल्या नवऱ्यानें अमुक करावें, तमुक करावें, असें मोठमोठ्यानें सांगूं लागली. एवढ्यानें तिची तृप्ति न होतां ती शिव्यांची लाखोली वाहून यथेच्छ तोंडसुख घेऊं लागली. तिच्या वरळण्याकडे बिलकूल लक्ष्य न देतां साक्रेटीस आपल्या विचारांत मग्न होऊन राहिला. यामुळें तर तिला अतिशय चीड आली. ती लगेच घरांत धांवत गेली, आणि घाणीनें भरलेलें पोतेऱ्याचें भांडें आणून तिनें तें त्याच्या डोक्यावर ओतलें. साक्रेटिसाला यामुळें क्रोध आला असेल काय? छेः, बिलकूल नाहीं! तो हंसला आणि शांतपणें ह्मणाला "इतकी गर्जना झाली त्याअर्थीं अशी वृष्टि होणें जरूर होतें!"

या उदाहरणांवरून हें सिद्ध होतें, कीं, क्रोध किंवा दुसरा कोणताहि मनोविकार आपल्या ताब्यांत ठेवितां येणें अशक्य आहे ह्मणून कोणींहि निराश होऊं नये. साक्रेटीस हा एक मनुष्यच होता, आणि त्याला जर आपल्या मनोविकारांवर पूर्ण ताबा ठेवितां आला, तर इतर मानवांनांहि हें साध्य होईल. आपल्या मनोविकारांवर पूर्ण ताबा असलेले लोक हल्लींहि पाहण्यांत येतात, आणि कोणालाहि अभ्यासानें असा ताबा मिळवितां येईल.

या जगांतील सर्वांचा मुख्य उद्देश—उत्क्रांतितत्त्वाचा हेतु—असा आहे, कीं, प्रत्येकानें हळुहळू आपल्या अंतर्यामीं असलेल्या ईश्वरीतत्त्वाचा—आत्मतत्त्वाचा अनुभव घ्यावा, आणि ईश्वराशीं पूर्णैक्य होईपर्यंत अभ्यासक्रम चालू ठेवावा. देह जावो अथवा राहो, कांहींहि किंमत पडो, ईश्वराशीं असलेलें आपलें ऐक्य अनुभविलेंच पाहिजे.

ध्येय तर असें आहे. या ध्येयाप्रत जाण्यास कांहीं लोकांनां कौटुंबिक स्थिति आड येत असेल, पण याबद्दल 'रामा'चें ह्मणणें असें आहे, कीं, या ध्येयाप्रत जाण्यास कौटुंबिक संबंध आम्हांला मदत करितील, आणि आमचीं बायकामुलें आमच्या आड न येतां तीं आह्मांला उलट साहाय्य करितील.

पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते. तिला तसें फिरलेंच पाहिजे. चंद्र, हा पृथ्वीचा उपग्रह असल्यामुळें तिला तो चिकटूं पहातो. तेव्हां पृथ्वी काय करिते ? ती चंद्रादि उपग्रहांनां बरोबर घेऊन सूर्याभोंवतीं भ्रमण करिते. तद्वत् हे नरनारींनों ! तुह्मीं जर सूर्याचा सूर्य, प्रकाशाचा प्रकाश —आत्मरवि याकडे जाण्याचें मनांत आणिलें असेल, तर तुह्मी एकटे जाऊं नका. आपल्या मुलांबाळांनां आणि सोबत्यांनां बरोबर घेऊन चला. तुह्मांबरोबर त्यांनांहि प्रकाशाचें सेवन करूंद्या. तुह्मी कोठें गेलां तर तुमच्या हस्तपादादि अवयवांनां बरोबर घेऊन जात नाहीं काय ? तुमच्या मुलाबाळांचे, आप्तेष्टांचे देह हे तुमचेच नव्हत काय ? ते तुमच्या देहाचे अवयव नाहींत काय ? याकरितां वेदान्त आग्रहानें

सांगतो, कीं, जर एकाद्याला आत्मरवीकडे जावयाचें असेल, तर त्यानें एकटेंदुकटें न जातां आपलीं सर्व अंगें बरोबर घेऊन जावें. ज्याप्रमाणें तुह्मी आपलें मस्तक, अंतःकरण, हस्तपादादि अवयवांनां बरोबर घेऊन जातां, त्याप्रमाणें तुह्मी तुमच्या अर्धांगाला—अर्धांगीला ( पतीला अथवा पत्नीला ) आणि इतर अंगांनां ( मुलाबाळांनां व आप्तेष्टांनां ) बरोबर घेऊन चला. ईश्वराशीं असलेलें आपलें ऐक्य अनुभविण्याच्यापूर्वीं आपल्या बायकामुलांशीं असलेल्या ऐक्याचा अनुभव घ्या. ज्यानें आपल्या बायकामुलांशीं असलेल्या ऐक्याचा अनुभव घेतला नाहीं, त्याला सर्व-स्वरूपी ईश्वराशीं असलेल्या ऐक्याचा अनुभव कसा येणार ?

वेदान्ताप्रमाणें स्वाभाविक अभ्यासक्रम असा आहे, कीं, तुह्मीं तुमच्या अगदीं जवळच्या आप्तांशीं ऐक्य अनुभविण्यास प्रथम सुरुवात करावी. त्यांचे व तुमचे हितसंबंध एकच व्हावेत. त्यांचे व तुमचे देह मिळून एकच देह किंवा एकच प्रवाह आहे, असें तुह्मांला वाटूं लागावें. अशा रीतीनें तुह्मी अनुभव घ्या. शेजारच्या कुटुंबांतील मंडळींनांहि आपल्या वर्तुळांत घ्यावें, आणि क्रमाक्रमानें हा अभ्यास वाढवीत जावें. ह्मणजे सर्व कुटुंबें आपलाच देह आहेत, असें तुह्मांला वाटूं लागेल, आणि ईश्वराशीं असलेलें आपलें ऐक्य अनुभवितां येईल, व सर्वांनां आपल्या बरोबर घेऊन जातां येईल.

बायबलांत असें सांगितलें आहे, कीं, सेंट जॉन नामक शिष्यावर ख्रिस्त फार प्रेम करीत असे. 'सेंट जॉनवर ख्रिस्त प्रेम करीत असे,' असें ह्मणण्याऐवजीं 'ख्रिस्तावर सेंट जॉन भक्ति करीत असे,' असें थोडा फेरफार करून ह्मटलें असतां 'ख्रिस्ताच्या द्वारें मुक्ति मिळते,' या ख्रिस्ती तत्त्वाचा लवकर बोध होईल.

क्रिया, प्रतिक्रिया, आघात, प्रत्याघात हे सर्वदा समान असतात. * या न्यायानें, ख्रिस्ताचें जर आपल्या शिष्यांवर प्रेम होतें, तर शिष्याची

* ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ।

—गीता.

भक्ति ख्रिस्तावर असली पाहिजे. ख्रिस्तानें ईश्वरी साक्षात्कार मिळविला होता, आणि त्यानें पित्याशीं—परमेश्वराशीं—असलेलें आपलें ऐक्य अनुभविलें होतें. जॉन, पीटर, पाल आणि इतर शिष्य यांनीं ख्रिस्तावर प्रेम व भक्ति केल्यामुळें आणि ख्रिस्त व आपण एकच आहों असें त्यांनां वाटूं लागल्यामुळें ते ख्रिस्तांतील ईश्वरी तत्त्वाचे—त्याच्या आत्मज्ञानाचे—वांटेकरी झाले. आणि जर ख्रिस्त स्वतः तरला असेल, तर त्याचे शिष्यहि त्या प्रेमामुळें तरले असले पाहिजेत. विजेनें भारलेल्या पात्राला लागून दुसरें एकादें पात्र ठेविलें असतां त्यांत पहिल्या पात्रांतील विद्युत् शिरते, हें आपण पहातों.

वेदान्ताप्रमाणें, विश्वव्यापि प्रेम अंगीं बाणल्याशिवाय आणि सर्व विश्व आपला देह आहे असें वाटूं लागल्याशिवाय, कोणालाहि ईश्वराचा साक्षात्कार व्हावयाचा नाहीं. सर्व विश्व आपला देह आहे असें वाटणें, ही पहिली पायरी आहे; व त्यापलीकडे जाणें म्हणजे परमात्मस्वरूपीं लीन होणें, ही त्यापुढची दुसरी पायरी आहे. भ्रम दोन प्रकारचे आहेतः— १ अंतर्गत, व २ बाह्य. आपण परस्परांहून भिन्न आहोंत, आपण निरनिराळ्या व्यक्ति आहोंत, ही कल्पना पहिल्या प्रकारच्या भ्रमापासून होते, आणि त्यामुळें सर्वांमध्यें असलेलें ईश्वरी तत्त्व आह्मांला ओळखतां येत नाहीं. दुसऱ्या प्रकारचा भ्रम म्हणजे नामरूपांच्या भेदाचा भ्रम होय.

संसारिकानें हे दोन्ही भ्रम दूर सारले पाहिजेत. प्रथम सर्व देहांमध्यें असलेलें ऐक्य अनुभविलें पाहिजे. विश्वांतील सर्व वस्तूंचा आत्मा आपण आहों, मानवजात, वनस्पतिवर्ग, वृक्ष, नद्या, कृमिकीटक यां सर्वांमध्यें आपणच आहों, असें त्यानें अनुभविलें पाहिजे. ही पहिली पायरी आहे. पहिल्या पायरीचा अभ्यास करीत असतां, प्रथमारंभीं आपल्या बायकामुलांशीं असलेलें आपलें ऐक्य अनुभविलें असतां त्यापासून आपणाला अधिक मदत होते. दुसरी पायरी, सर्व बाह्यभेद, नामरूपें, विश्व या सर्वांचा लय परमात्मस्वरूपीं करणें, ही होय. प्रथम,

हें विश्व आपला देह आहे असें अनुभविलें पाहिजे; आणि नंतर त्या देहाचा ह्मणजे विश्वाचा परमात्मस्वरूपांत—सत्यांत—लय केला पाहिजे.

खरा साक्षात्कारी पुरुष प्रथम विश्वरूप—विश्वमय बनतो, आणि नंतर परमात्मस्वरूपीं लीन होऊन उद्धार करितो. आपण स्वतःच आपले तारक आहोंतः—

उद्धरेदात्मनाऽऽत्मानं नाऽऽत्मनमवसादयेत्
आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः

—भगवद्गीता.

असें वेदान्त सांगतो.

आतां 'ख्रिस्ताच्या द्वारें ईश्वराचा साक्षात्कार होतो—मुक्ति मिळते,' या वाक्याचा अर्थ आह्मांला नीट समजेल. '**यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह**' अशा परमात्मस्वरूपाचा साक्षात्कार होण्यापूर्वीं, प्रथम आपला आत्मा विश्वांतील सर्व नामरूपांत व्यापून राहिला आहे असें ज्ञान —अशा स्थितीचें ज्ञान—झालें पाहिजे. या स्थितीलाच 'ख्रिस्तावस्था' असें नांव आहे. या ख्रिस्तावस्थेंतून पुढें आह्मांला परमात्म्याकडे गेलें पाहिजे. प्रत्येकाशीं, सर्वांशीं आपलें ऐक्य आहे, असें क्रमाक्रमानें अनुभवून ही अवस्था प्राप्त होते. या अवस्थेचा ओनामा ह्मणजे आपले मातापितर, बायकामुलें, आप्तेष्ट यांच्याशीं आपलें ऐक्य अनुभविणें हा होय. नंतर क्रमाक्रमानें, आपल्या देशाशीं, आणि त्यापुढें सर्व जगताशीं आपल्या ऐक्याचा अनुभव घेतला पाहिजे. हा अभ्यास वाटतो तितका कठिण नाहीं. आरंभीं थोडेंसें जड जातें, पण थोड्या कालानंतर प्रगति भराभर होऊं लागते.*

एकदां आपण एकाद्या व्यक्तीशीं पूर्णपणें ऐक्य अनुभविलें, ह्मणजे नंतर इतर व्यक्तींशीं सर्वांशीं, आपलें ऐक्य अनुभविणें सुकर होऊन जातें.

---

* असाध्य तें साध्य करितां आयास । कारण अभ्यास तुका ह्मणे ॥

येथें अनुभवी लोकांनां माहीत असलेला एक निसर्गाचा नियम किंवा ईश्वराची चतुर योजना सांगितली पाहिजे. ती ही, कीं, प्रेमाचा अगर भक्तीचा आमचा अभ्यास जसजसा वाढत जाईल, तसतसें आमचें मन रंग, वर्ण, आकार, मुद्रा, प्रतिमा इत्यादि बाह्य गोष्टींपासून निवृत्त होऊन तें अंतर्यामीं असलेल्या आत्मतत्त्वाकडे–वरील बाह्य गोष्टींनां आधारभूत असलेल्या सत्य तत्त्वाकडे अधिकाधिक वळूं लागतें. या विधानाची सत्यता कोणालाहि अनुभवानें पटणारी आहे. जसजसे आह्मी वयोवृद्ध होत जातों, तसतसें आमच्या प्रेमाचें केंद्र अगर विषय सूक्ष्म, विरल व अधिक शुद्ध होत जातो, असें आह्मांला आढळून येतें.

या जगांतील प्रत्येक व्यक्तीनें वरील गोष्टीचा थोडाबहुत तरी अनुभव घेतला नाहीं काय ? आमच्या प्रेमामध्यें असा एक काल येतो, कीं, त्यावेळीं आह्मीं चेहरेपट्टी, चेहऱ्यांतील गुणदोष, मुखावरील सुरकुत्या इत्यादि बाह्य चिन्हांकडे बिलकूल लक्ष्य देत नाहीं; तर आंतील जीवात्मा, शुद्ध अंतःकरण, शुद्ध आणि पवित्र मन, शुद्धप्रेम इत्यादि गोष्टींकडे आमचें मन विशेष वेधतें. आम्हांला बहिर्दोष न दिसतां सर्वच सुंदर दिसतें, आणि आम्ही मोहित होऊन जातों. वर्ण, चेहरा इत्यादि बाह्यांगांवर जें आमचें यावेळपर्यंत प्रेम होतें, तें आतां अंतःस्थितीकडे व गुणांकडे लागल्यामुळें अधिक शुद्ध झालें आहे; ह्मणजे आमचें प्रेम स्थूल देह आणि बाह्य चिन्हें यांवरून निघून शुद्धभाव, शुद्धगुण यांवर जडलें आहे. याहिपलीकडे आणखी एक स्थिति आहे, आणि त्या स्थितींत भाव किंवा गुण अथवा मनाची पवित्रता इत्यादि गोष्टी आमच्या प्रेमाचे विषय न होतां, आम्हीं अंतर्यामीं असलेल्या ईश्वरीतत्त्वावर अगर आत्म्यावरच प्रेम करतों. ही स्थिति प्राप्त झाली, ह्मणजे जगांतील सर्व वस्तु ईश्वराचींच चित्रें किंवा प्रतिमा वाटतात; आह्मांला वस्तु दिसत नाहींत; परंतु त्या वस्तूंच्या मागें असलेलें निर्विकल्प तत्त्व दिसतें. एकादद्दुसऱ्या वस्तूकडे आमचें लक्ष्य जातें, पण आमचें अंतःकरण त्या वस्तूंतील ईश्वरीतत्त्व किंवा आत्मतत्त्व पहातें. ही स्थिति प्राप्त झाली

असतां, आह्मांला अखिल विश्वाशीं ऐक्य अनुभविणें सुगम होतें. ऐक्यस्थितीलाच खिस्तस्थिति असें ह्मणतात. या स्थितींत कांहीं काल राहिल्यानंतर यापुढें प्राप्त होणारी याहूनहि उच्च स्थिति, ह्मणजे परमात्मस्वरूपांत पूर्णपणें लीन होऊन जाणें, ही होय. या दैवीस्थितींत आमचें परमात्म्याशीं पूर्ण ऐक्य–तादात्म्य होऊन जातें, व असें झालें ह्मणजे या स्थितीला निर्वाण किंवा समाधि असें ह्मणतात.

या निर्वाणस्थितीला क्रमाक्रमानें जात असतां आमच्या नातलगांची आणि आप्तेष्टांची कशी मदत होते, याचा आतां आपण विचार करूं.

एक वृद्ध बाई आपल्या नातवाला बरोबर घेऊन एका साधूपाशीं आली, आणि विचारूं लागली, कीं, "महाराज, घरदार सोडून वृंदावनांत जाऊन रहावें व कुटुंबाचे मोहपाश तोडून राहिलेलें आयुष्य तेथें घालवावें, असें मनांत आहे. हा माझा विचार योग्य आहे का?"

साधु ह्मणतो "अहो बाई, तुह्मी नीट विचार करा. तुमच्या नातवाच्या नेत्रांतून पाहणारा कोण आहे? त्याच्या प्रत्येक रोमरोमांतून स्फुरण पावणारी दिव्य शक्ति कोणती आहे?"

यावर ती बाई ह्मणते "या मुलामध्यें पाप, मोह, दुष्टपणा इत्यादि कुविचारांचा संपर्क नाहीं. हा अगदीं शुद्ध आणि निष्पाप आहे. तेव्हां याच्या आंत ईश्वरीतत्त्व वास करीत असलें पाहिजे."

हें ऐकून साधु ह्मणतो "तुह्मीं वृंदावनांत गेलां, तर तेथें तुह्मांला कृष्णाच्या मूर्तीचा आश्रय करून परमेश्वराची सेवा केली पाहिजे. या मुलाचा देह श्रीकृष्णाची–परमेश्वराची मूर्ति नाहीं काय? आणि ही मूर्ति (देह) वृंदावनांतील प्रतिमेइतकीच चांगली नाहीं काय?"

साधूचें हें भाषण ऐकून त्या बाईला बरेंच आश्चर्य वाटलें. साधूच्या ह्मणण्याचा तिनें पुनः नीट विचार केला, आणि नंतर तिची अशी खात्री झाली, कीं, वृंदावनास जाण्यापेक्षां आपल्या नातवालाच कृष्णाचा अवतार मानून परमेश्वराची सेवा करावी, हेंच बरें. कारण त्या मुलाच्या नेत्रांतून पाहणारा ईश्वरच आहे, त्याच्या सर्व अवयवांमधून, रोमरोमांमधून प्रगट होणारी शक्तिहि ईश्वरच आहे. पुढें त्या साधूच्या उपदेशा-

प्रमाणें ती आपल्या मुलाला नातू असें न मानतां, ईश्वर असें मानूं लागली. याप्रमाणें तिनें क्रमाक्रमानें आपले इतर कौटुंबिक व सांसारिक संबंध बदलून टाकून सर्वत्र एक ईश्वरी संबंध कायम ठेविला. त्यागाचा मार्ग हाच आहे.

त्याग ह्मणजे तपश्चर्या करणें किंवा दुसरीं कडक व्रतें आचरणें नव्हे. प्रत्येक वस्तुसंबंध पवित्र करून टाकणें ह्मणजेच खरा त्याग होय. मुलाचा त्याग करणें ह्मणजे मुलाशीं असलेला आपला संबंध तोडून टाकणें हें नव्हे, तर त्या मुलाला ईश्वर मानणें हें होय. प्रत्येक व्यक्तीमधील ईश्वरीतत्त्वाची ओळख करून घेणें याचें नांव त्याग. नवराबायको, शत्रुमित्र आणि इतर संबंध यांचा त्याग करा, असें वेदान्त सांगतो. याचा अर्थ त्या त्या व्यक्तींमधील ईश्वरी तत्त्व जाणा, असा आहे.

आपले स्वार्थी संबंध टाकून द्या, आणि प्रत्येक व्यक्तीमधील ईश्वरी तत्त्व--आत्मतत्त्व ओळखा. याप्रमाणें प्रत्येक दांपत्यानें रहावें, असें हिंदुधर्मशास्त्राचें सांगणें आहे. या शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें 'रामा'च्या घरचा क्रम असा असे. 'रामा'ची पत्नी मोठ्या पहांटेला उठे आणि 'राम' ध्यानांत--ईश्वरचिंतनांत--समाधिसुखांत मग्न झाला असतां ती 'रामा'पाशीं येत असे, व तेथें 'रामा'समोर थोड्या अंतरावर बसून ती रामाकडे पहात असे. मग 'रामा'प्रमाणेंच तीहि आपलें सर्व लक्ष्य देहावरून काढून ईश्वरी तत्त्वाकडे--आत्मतत्त्वाकडे लावी. तिची अध्यात्मविद्येंत विशेष प्रगति नसल्यामुळें ती आपलें सर्व लक्ष्य 'रामा'च्या कपाळाकडे लावीत असे, आणि प्रणवाचा उच्चार करून 'रामा'च्या देहाचें इतकें ध्यान करी, कीं, इतर सर्व गोष्टींचा व आपल्या देहाचाहि तिला विसर पडे. 'रामा'चा देह आपला देह आहे, 'रामा'चा आत्मा आपला आत्मा आहे, असें तिला भासे. ती इतकी 'राम'मय होऊन जाई, कीं, 'राम' ईश्वराचें ध्यान करीत नसून आपणच तें करीत आहों, असें तिला वाटे. 'रामा'चें ध्यान तें आपलें ध्यान, आणि आपला

आत्मा तो सर्व विश्वाचा आत्मा, अशी तिची भावना होई. याप्रमाणें ती 'रामा'ला मदत करीत असे, आणि तिलाहि रामाकडून साहाय्य होत असे. याप्रमाणें जर एकाद्या स्त्रीचे विचार झाले, आणि ती जर आपल्या पतीला ईश्वर मानूं लागली, तर यापासून आपलें तत्त्व ओळखण्याला त्याला मदत होणार नाहीं काय ? खचित होईल. आपल्या मर्जीप्रमाणें आह्मी दुसऱ्या लोकांनां वाटावयाला लावतों, त्यांचे विचार बदलूं शकतों, असें ख्रिश्चन साएन्टीस्ट लोक [या लोकांचा एक विशिष्ट धर्मपंथ आहे,] अनुभवानें सांगतात.

'आपला पति ईश्वर आहे' अशा प्रकारचे दैवी विचार जर एकादी स्त्री करीत राहील, तर त्यायोगें ईश्वरी तत्त्व ओळखण्याला तिच्या नवऱ्याला मदत होईल. उलट पक्षीं, याचप्रमाणें नवराहि जर आपल्या पत्नीविषयीं असेच विचार करीत राहील, तर यापासून तिचीहि बरीच प्रगति होईल. अहाहा ! परस्परांनां साहाय्य करणारें हें आध्यात्मिक तत्त्व किंवा ऐक्य किती उदात्त आहे ! आणि अशा आध्यात्मिक-तत्त्वानें—ऐक्यानें प्रेरित झालेला विवाह किंवा लग्न किती धन्य आणि सुखी आहे ! याशिवाय रंग, आकृति, शरीरसौंदर्य, पैसा इत्यादि बाह्य गोष्टींवर आसक्ति ठेवून केलेले इतर सर्व विवाह परिणामीं अहित-कारक, दुःखदायक आणि शोकास्पद होतात. कोणत्याहि बाह्य गोष्टींकडे लक्ष्य न देतां केलेला, आध्यात्मिक तत्त्वानें प्रेरित झालेला आणि अंतर्यामीं असलेल्या ईश्वरी तत्त्वाकडे पहाणारा विवाहसंबंध सुरक्षित, कायमचा आणि परिणामीं सुखकारक होतो.

एकदां एका साधूपाशीं एक गृहस्थ आला, आणि त्यानें आपलें एकुलतें एक मूल गमावलें, त्याचा वियोग सहन होणें आपल्याला असह्य झालें आहे, यासाठीं आपण आत्महत्या करणार, असें तो ह्मणूं लागला. दुसरा एक गृहस्थ, आपली बायको इहलोक सोडून गेली आणि यापुढें जगण्यांत आतां राम नाहीं, असें सांगूं लागला. आणखी एक बाई त्या साधूकडे आली, आणि आपला नवरा कांहीं महिन्यांपूर्वीं वारला, असें

सांगून आतां त्याचें हित-कल्याण-माझ्या हातून कसें होईल, असा तिनें त्या साधूला प्रश्न केला.

ही स्त्री फार खिन्न व आपल्या नवऱ्याचें कांहींतरी हित साधण्यास उत्सुक होती, असें दिसलें. साधूनें तिला धीर देऊन ह्मटलें "बाई, जेव्हां जेव्हां नवऱ्याची तुला आठवण होऊन उदासीनता वाटेल, तेव्हां एकदम स्वस्थ बैस, डोळे झांक आणि नवऱ्याची मूर्ति मनांत आण; आणि ती तुझ्या मनांत आली ह्मणजे दुःख किंवा शोक करूं नको, हुंदके देऊं नको किंवा रडूं नको. रडण्यानें आणि शोक करण्यानें तुझ्या नवऱ्याची उन्नति न होतां त्याचा पुढील मार्ग कुंठित होईल, आणि त्याला भूलोकालाच चिकटून रहावें लागेल. असें अवनतिकारक कर्म तूं कदापि करूं नकोस ! तुझा नवरा नष्ट झालेला नाहीं-तर तो जीवंत असून दुसऱ्या लोकांत आहे. त्याची मूर्ति तुझ्या मनांत आली ह्मणजे ती सजीवच आहे असें मानून तो ईश्वर आहे अशी कल्पना कर. तूं ईश्वर आहेस, तूं देव आहेस, तूं परमात्मा आहेस, आणि या मूर्तीच्या रूपानें तूं मला दिसत आहेस, असें त्याला वारंवार वजावून सांग. टेलिफोनच्या यंत्रामधून आह्मांला ध्वनि ऐकूं येतो. हा ध्वनि त्या यंत्राचा नसून यंत्राच्या दुसऱ्या टोंकाकडे असणाऱ्या अदृश्य मित्राचा असतो. त्याप्रमाणें तुझ्या नवऱ्याचें चित्र तुझ्या मनांत आलें, ह्मणजे त्या चित्राच्या मागें, त्या चित्राला आधारभूत असें आत्मतत्त्व आहे, असें तूं जाण, आणि त्याला 'तूं देव आहेस, तूं ईश्वर आहेस' असें तूं सांग. अशा रीतीनें तूं आपल्या नवऱ्याचें कल्याण करूं शकशील.

एवंच, आमच्या गतमित्रांचें कल्याण आह्मीं जर अशा रीतीनें करूं शकतों, तर त्याच रीतीनें आमच्या जीवंत असलेल्या मित्रांचें कल्याण आह्मांला करतां येणार नाहीं काय ?

वर दर्शविलेल्या पद्धतीप्रमाणें राहणाऱ्या दांपत्याचा वैवाहिक संबंध परस्परांनांहि सुखकारक होतो, आणि त्यांची आध्यात्मिक उन्नति करतो. आपल्या पत्नीचें हित साधावें, तिचें कल्याण करावें, असें प्रत्येक नव-

ज्याच्या मनांत असतें, असें सर्वत्र सांगण्यांत येतें; पण खरें हित कसें साधावें याविषयीं पूर्ण अज्ञान असल्यामुळें, परस्परांच्या कामवासना तृप्त करण्यांतच खरें हित आहे, असें त्यांनां वाटूं लागतें. हा त्यांनां हित साधण्याचा योग्य उपाय वाटतो; पण, तो उपाय होण्याच्याऐवजीं अपायच होतो. कारण, या मार्गानें त्यांची अवनति होते. सृष्टिनियम असा आहे, कीं, ज्या गोष्टीनें आपलें हित होतें, तिच्यायोगानें दुसऱ्याचेंहि हित झालें पाहिजे. ज्यानें आमचें कल्याण साधतें, त्यानें इतरांचेंहि साधलें पाहिजे. सर्वांनां आजारी पाडल्यावांचून आह्मीहि आजारी पडत नाहीं; आणि आह्मी निरोगी असलों, तर सर्व जगहि निरोगी राहतें. क्रिया प्रतिक्रिया, आघात प्रत्याघात हे समान असतात.

जर तुह्मांला दुसऱ्याचें हित खरोखर साधावयाचें असेल, तर तुह्मीं आपला संकुचितपणा टाकून देऊन तुमच्या मित्राचा आणि तुमचा आत्मा एकच आहे, असें जाणिलें पाहिजे. नवऱ्याला जर आपल्या पत्नीचें खरें हित साधावयाचें असेल, तर त्यानें तिला सामर्थ्य दिलें पाहिजे, आणि तें तिच्या अंगीं प्रगट झालें पाहिजे. खऱ्या हिताच्या आवश्यक अशा गोष्टी ह्मटल्या, ह्मणजे ज्ञान, आध्यात्मिक स्वतंत्रता ( मुक्ति ) या होत, व याच तिला दिल्या पाहिजेत. आपल्या पत्नीला सुशिक्षित करणें हें प्रत्येक नवऱ्याचें कर्तव्यकर्म आहे. आपल्या पत्नीला शिक्षण न देणारा नवरा व आपल्या पतीच्या उन्नतीला मदत न करणारी पत्नी, या दोघांचेंहि आयुष्य अगर जीवनक्रम सुखकारक होणार नाहीं.

ख्रिस्ताच्या अपौरुषेय जन्माविषयीं 'रामा'चें ह्मणणें असें आहे:— ख्रिस्ताची आई मेरी ही पवित्र, धार्मिक आणि साध्वी होती, व तिला थोडाबहुत ईश्वराचा साक्षात्कारहि झाला होता. ख्रिस्ताचा बाप जोसेफ हाहि पवित्र, उदार, धर्मनिष्ठ व ईश्वरीसाक्षात्कार मिळविलेला असा होता. दोघेंहि प्रौढ होतीं. एकदां असें घडलें, कीं, दोघें ईशचिंतनांत—ध्यानांत मग्न असतांना त्यांचा समागम होऊन मेरी गर्भवती झाली; पण, तिला या गोष्टीचें भान राहिलें नाहीं.

पुष्कळदां आह्मी असें पाहतों, कीं, रात्रौ मुलाला दूध किंवा खडीसाखर आह्मी देतों. दुसऱ्या दिवशीं विचारल्यावेळीं तो मुलगा सांगतो, कीं, छे:--मला रात्रीं मुळींच कांहीं दिलें नाहीं. तसेंच निद्राभ्रमानें पछाडलेले लोक अनेक चेष्टा करतात, आणि दुसऱ्या दिवशीं त्या गोष्टीविषयीं आपणांला कांहीं माहीत नाहीं असें सांगतात. मेरीची स्थिति कांहीं अंशीं अशीच झाली असावी. गर्भधारणेच्या वेळीं जोसेफ आणि मेरी हीं नेहमींच्या जागृतावस्थेंत नसून ईश्वरध्यानांत मग्न झालेलीं होतीं. या स्थितींत त्या दोघांनां आपल्या देहाचें भान विशेषसें नसावें. यामुळें गर्भधारणा कशी झाली, याबद्दल तिला कांहीं सांगतां येईना. ख्रिश्चन लोक असें ह्मणतात, कीं, ही मेरीची गर्भधारणा पवित्र आत्म्याकडून * झाली, आणि ख्रिस्त हा पवित्र आत्म्याचा पुत्र आहे. पवित्र आत्म्याकडून गर्भधारणा होणें ह्मणजे ईशचिंतनांत—ध्यानांत मग्न होणें हेंच होय. निसर्गाचे नियम पूर्वींप्रमाणें आतांहि चालू आहेत, आणि जर तुह्मांला आपली संतति मिल्टन, ख्रिस्त यांप्रमाणें मोठी व्हावी असें वाटत असेल, तर तुह्मीं जोसेफ आणि मेरी या जोडप्याप्रमाणें तुमचीं अंतःकरणें पवित्र आणि धर्मनिष्ठ केलीं पाहिजेत; आणि क्षुद्र, स्वार्थी संबंध दूर सारून सदैव ईश्वरीतत्त्वांत—आत्मतत्त्वांत राहिलें पाहिजे. नवराबायकोंच्या मनांत जर नेहमीं पवित्र, उदात्त आणि जोमदार विचार घोळत राहतील, तर त्यांची संतति ख्रिस्ताप्रमाणें होईल. आजहि ख्रिस्तासारखी संतति पैदा करतां येईल !

तुमचें घर अगर बायकामुलें ही तुमच्या प्रेमाला कोंडणारीं कुंपणें न होतां तुमचें प्रेम सर्व जगभर पसरण्याचें केंद्र झालीं पाहिजेत. बहुतेक लोक प्रेमाला कोंडून ठेवून त्याला आपल्या घराबाहेर जाऊं देत नाहींत. पतीच्या क्षुद्र व स्वार्थी विचारांनीं, पत्नीचीच नव्हे, तर त्याची स्वतःचीहि अवनति होते. प्रेमाचा पहिला धडा तुह्मांला पत्नी देते. आणि पुढें, तें प्रेम शुद्ध आणि उन्नत करून तुह्मी, फलपुष्पें, नदीनाले, झाडझुडपें, तृणधान्य,

* Holy Ghost=पवित्र आत्मा. ही ख्रिश्चन लोकांच्या त्रिमूर्तींपैकीं एक देवता आहे.

दरीखोरीं इत्यादि विश्वांतील सर्व वस्तूंकडे समदृष्टीनें पाहिलें पाहिजे. अखिल विश्वाशीं तादात्म्य कसें पावावें, हें पत्नीनें शिकविलें पाहिजे. तिनें या तादात्म्यांत विघ्न आणतां कामा नये.

एकाद्या गाडी हांकणाराला रस्त्याची चांगली माहिती नसली, तर तो वाटेंतील दगडांवर अगर अडथळ्यांवर जाऊन आदळतो, किंवा खांचखळग्यांत जाऊन पडतो; पण या अडथळ्यांची अगर खांचखळग्यांची त्याला माहिती असेल, तर तो हुषार राहतो आणि गाडी सावधगिरीनें हांकतो. त्याप्रमाणेंच आमच्या आयुष्यांत संकटें, दुःखें, अपयश, अपघात इत्यादि कठिण प्रसंग आमच्यावर येतात, आणि या आपत्ति कां येतात याचें ज्ञान नसल्यामुळें आह्मांला बरेंच दुःख होतें; पण, वरील आपत्ति कोणत्या आध्यात्मिक नियमांनुसार प्राप्त होतात हें जर समजेल, तर आह्मांला बहुतेक दुःख टाळतां येईल. 'राम' आतां तुह्मांला गणितशास्त्रांतील कोणत्याहि सिद्धान्ताप्रमाणें निश्चित आणि सत्य असा एक आध्यात्मिक नियम सांगणार आहे. तो नियम असाः—

जेव्हां एकाद्या स्त्रीचें अगर पुरुषाचें प्रेम एकादी आकृति, व्यक्ति, किंवा एकादी जड वस्तु इत्यादिकांवर जडतें, तेव्हां तिला अगर त्याला कांहीं कालपर्यंत ती प्रेमवस्तु उपभोगावयाला मिळते; आणि जेव्हां ती वस्तु तिच्या अगर त्याच्या अंतःकरणांत पूर्ण भरते, जेव्हां तीं तन्मय होऊन जातात तेव्हां त्यांच्यापासून ती वस्तु हिरावून नेली जाते. अत्यंत प्राचीन कालापासून तों तहत आजमितीपर्यंत या नियमाचें प्राबल्य एकसारखें चालत आलें आहे. याला अपवाद असा एकहि दिसून आला नाहीं. हा नियम टाळण्याचें अगर यांत फेरबदल करण्याचें सामर्थ्य कोणाच्याहि अंगीं नाहीं!

कोणत्याहि बाह्य वस्तूवर आसक्ति ठेवा, एकाद्या व्यक्तीला अगर नांवाला चिकटून रहा, किंवा एकाद्या महात्म्यावर विश्वास ठेवा, त्याच्यावर आपला सर्व भार घाला, ह्मणजे वरील नियमानुसार तुमचा हा आधार काढून घेतला जाईल आणि तुह्मांला बरेंच दुःख होईल.

या तऱ्हेचा अनुभव आह्मांला नेहमीं येत नाहीं काय ? यापासून आह्मीं काय धडा घ्यावा? आह्मीं आमचें अंतःकरण स्थूल जड पदार्थांवर लावूं नये. आमच्या अंतःकरणांत स्थूल जड पदार्थांवांचून प्रेम उत्पन्न होत नाहीं, हें खरें आहे. प्रथम या स्थूल जड पदार्थांपासूनच आह्मी प्रेमाचा धडा शिकतों. पण, हा धडा शिकल्यानंतर निसर्गाचा नियम आह्मांला असें सांगतो, कीं, तुमचें प्रेम जड वस्तूलाच खिळून राहूं नये. तें उन्नत झालें पाहिजे, व तें त्या जड वस्तूला आधारभूत असलेल्या आत्मतत्त्वाकडे लागलें पाहिजे. तें जर तसें न लागेल, तर तुह्मीं फसाल, आणि अधोगतीला जाल. पतिपत्नींची उन्नति एकसारखी होत असावी, आणि पत्नीनें शिकविलेलें प्रेम, पतीनें तिच्या देहापुरतेंच न ठेवितां, तें सर्वत्र, जगभर पसरविलें पाहिजे.

ऐहिक वासनेच्या भूमिकेंत आत्मोन्नतीच्या बीजाची वाढ होणार नाहीं. पतीच्या अगर पत्नीच्या देहावर जडलेलें प्रेम जमिनींत पेरलेल्या बीजाप्रमाणें आहे. हें प्रेम जर त्या बीजाप्रमाणें मुरून हवेंत ( बाहेर ) फलपुष्पादि रूपानें आलें, तरच चांगलें. पतिपत्नींच्या देहभूमिकेंत प्रेमबीज पेरा, आणि त्या बीजाला फलद्रूप होण्यासाठीं त्या भूमिकेमधून बाहेर अनंतांत येऊंद्या. ऐहिक वस्तूविषयींच प्रेम ठेवाल, तर नेहमीं अपयश हें खात्रीनें ठेविलेलेंच आहे, ह्मणून समजा. पण तेंच प्रेम त्या वस्तूंवरून निवृत्त होऊन पुढें सरसावेल, तर निसर्गाच्या नियमाप्रमाणें ईशसाक्षात्कार करून देईल. ज्या मानवानें प्रेम कधींहि केलेलें नाहीं, त्याला ईश्वराचा साक्षात्कार केव्हांहि व्हावयाचा नाहीं.

धर्माचा ऐहिक प्रेमाशीं कांहीं संबंध नाहीं, असें नेहमीं सांगण्यांत येतें. पण 'राम' तुह्मांला सांगतो, कीं, धर्माचा ऐहिक प्रेमाशीं संबंध आहे. प्रेमाचा योग्य उपयोग केला असतां आह्मांला ईश्वराचा साक्षात्कार होतो, आणि त्याचा ऐहिक सुखाकडे दुरुपयोग केला, ह्मणजे व्यर्थ शीण होतो. ईश्वरी साक्षात्कार शुद्ध प्रेमानेंच होतो आणि शुद्ध व पवित्र प्रेम हेंच ईश्वराचें नांव, ईश्वराचें स्वरूप होय !

## वैवाहिक स्थिति आणि साक्षात्कार.

वैवाहिक संबंध पवित्र व उन्नत करणें, हें पतीचें कर्तव्य आहे. द्रव्य मिळवून संचय करणें किंवा कौटुंबिक संबंधाचा दुरुपयोग करणें, हें त्याचें कर्तव्य नव्हे. ज्या वस्तु प्रथम आमच्या सुखाचीं साधनें होऊन राहिलेल्या असतात, त्यांनां आयुष्यांतील इतिकर्तव्य किंवा साध्य मानल्यामुळें त्या दुःखदायक होतात. साधनाला साध्य मानूं नका! शीतोष्णांपासून रक्षण व्हावें, क्षुधातृषा इत्यादिकांचें निवारण व्हावें, आसऱ्याकरितां घर असावें, एवढ्याचसाठीं केवळ आपणांला संपत्ति हवी असते, आणि या कामाला ती कितीतरी थोडी पुरते!

लोक ह्मणतात, आम्हांला थंडी पछाडते; पण वस्तुतः आम्हांला थंडी पछाडत नसून आम्हीच थंडीला आमंत्रण देतों. रोग आमच्यामागें येत नाहीं, तर आम्हीच त्याच्यामागें लागून त्याला आपलासा करितों. शीतोष्णांपासून स्वतःचें निवारण करण्यास कपडेलत्ते पाहिजेत; पण ते जाडेभरडे, साधे आणि स्वस्त असावेत; मौल्यवान असूं नयेत. आसऱ्याकरितां किंवा रानटी श्वापदांपासून बचाव होण्यासाठीं आम्हीं स्वच्छ व टुमदार—पण लहान अशा घरांत रहावें; अलीकडील पद्धतीच्या भव्य सदनांची किंवा प्रासादांची जरूरी अगदीं नाहीं. मोठमोठीं मंदिरें बांधावीं, सुंदर कपडेलत्ते वापरावे, गोडगोड पक्वान्नें खावीं, हेंच लोकांचें इतिकर्तव्य होऊन बसलें आहे—हेंच त्यांच्या सुखाचें साधन आणि साध्य झालें आहे!

जगाच्या इतिहासाकडे पाहूं लागल्यास आपणांला असें दिसून येईल, कीं, मोठमोठ्या वीरपुरुषांची रहाणी अगदीं साधी होती. प्लेटोचें नांव सर्वांनां माहीत आहे. 'प्लेटो' याचा अर्थ पीप किंवा पेटी असा आहे. प्लेटोचें घर लहान पेटीसारखें होतें, आणि या घरांतच तो विचार करीत बसे. अव्हान नदीवरील स्ट्राफर्ड येथील शेक्सपियरचें घर फारसें मोठें नव्हतें. त्याचें पूर्ववय फारच गरिबींत गेलें. त्यावेळीं नाटकाला येणाऱ्या प्रेक्षकांची तो सेवा करीत असे. पुढें त्यानें किती संपत्ति व कीर्ति मिळविली, हें जगद्विख्यात आहे. न्यूटनहि गरीब होता.

गरिबांनां दानधर्म करण्यास किंवा पुस्तकें विकत घेण्यास त्याच्यापाशीं पैसा नसला ह्मणजे त्याला फार वाईट वाटे; पण, इतर कोणत्याहि वेळीं आपल्या दारिद्र्याबद्दल त्याला दुःख झालें नाहीं. प्रेमाचें, ज्ञानाचें आणि मुक्तीचें शास्त्र—वेदान्त जगाला देणारे आर्यऋषि अरण्यांत कंदमुळें सेवन करीत असत. अगदीं साधेपणानें राहणाऱ्या या थोर विभूतींनीं जगाचें कितीतरी कल्याण केलें आहे!

स्वतः मोठे होण्याची हांव धरा. मोठमोठीं घरें किंवा मंदिरें बांधण्याच्या कामीं आपले विचार व शक्ति खर्च करूं नका. इमारती मोठ्या सुंदर आणि भव्य असतात, पण त्यांत राहणाऱ्या व्यक्ति क्षुद्र असतात. कांहीं थडगीं, छत्र्या भव्य असतात. पण, त्यांत प्रेतें, कृमिकीटक, सर्प यांशिवाय दुसरें कांहीं नसतें!

मोठमोठीं घरें बांधून आणि तीं घरें सर्व तऱ्हांच्या सामानांनीं व उपकरणांनीं सजवून स्वतःला व आपली पत्नी, मित्र, आप्तेष्ट इत्यादिकांनां मोठे करण्याचा प्रयत्न करूं नका. द्रव्यसंचय करणें हेंच आयुष्याचें इतिकर्तव्य नव्हे, व यासाठीं, यांतच तुह्मीं आपली सर्व शक्ति व्यर्थ खर्च करूं नये. आपलें अंतःसामर्थ्य वाढविणें, स्वतःला सुसंस्कृत करणें, आत्मतत्त्व ओळखून मुक्त होणें, हेंच आपलें ध्येय आहे, अशी जर तुमची खात्री होईल, आणि या ध्येयाकडेच जर तुमच्या प्रयत्नांचा रोख वळेल, तर कौटुंबिक संबंध तुमच्या उन्नतीच्या आड येणार नाहींत.

येथें कांहींजण असा आक्षेप घेतील, कीं, "आपण ह्मणतां तें सारें ठीक आहे. साध्या राहणीप्रमाणें आह्मांला राहतां येईल; पण, आमची साधी मीठभाकर, पर्णकुटिका आणि जाडेभरडे कपडे पाहून आमचे सोयरेधायरे आणि पाहुणे काय ह्मणतील?" 'राम' अशा आक्षेपकांनां विचारतो, कीं, बाबांनों! तुह्मीं स्वतःकरितां जगतां किंवा दुसऱ्याकरितां? तुह्मीं तुमच्याकरितांच जगा! तुमच्या आयुष्यक्रमांत इतरांनां हात घालण्याचें काय प्रयोजन? तुमच्या भोजनाच्या वेळीं तुमच्यासाठीं अन्न तुह्मी खातां कीं ते खातात? खाल्लेलें अन्न तुमचें तुह्मी पचवितां

किंवा ते पचवितात ? तुह्मी पहात असतांना तुमच्या नेत्रांनां पाहण्यास कोण मदत करतात ? तुमच्या नेत्रांचे स्नायु, कीं, त्यांच्या नेत्रांचे स्नायु ? तुमचा गुरुत्वमध्यबिंदु तुह्मीच व्हा, स्वतःवर विश्वास ठेवा, कांहींतरी अभिमान किंवा करारीपणा बाळगा, आणि सोयऱ्याधायऱ्यांच्या मतांविषयीं फारशी पर्वा बाळगूं नका ! गोडगोड पक्वान्नें आणि मऊमऊ गाद्या यांतच आदरातिथ्याचें सर्वस्व आहे, असें समजूं नका. पाहुण्यांच्या जेवणाखाणाची व निजण्याची उत्तम सोय झाली नाहीं, तर आपल्याकडून पाहुणचार बरोबर झाला नाहीं, अशी कांहीं लोकांची कल्पना असते. ही कल्पना घरच्या यजमानाला त्याच्या मिळकतीचें पुच्छ बनविते. अशा रीतीनें आपल्या मालमत्तेचें उपांग न होतां तिलाच आपलें उपांग बनवा. आपली योग्यता, आपलें सामर्थ्य जाणा.

तुमच्या घरीं आलेला पाहुणा तुमचें घर सोडून जातांना अधिक शहाणा, सुसंस्कृत आणि उन्नत होऊन परत जावा. इतर मानवी बंधूंविषयीं तुमचें हेंच कर्तव्यकर्म असावें. सुखी होण्याचा हाच मार्ग आहे. हें कर्तव्यकर्म चांगलें बजावीत गेल्यास तुमचें कुटुंब किंवा तुमचा संसार तुमच्या मार्गांत कोणताहि अडथळा आणणार नाहीं; उलट तुह्मांला साहाय्य करील. पाहुणा तुमचें घर सोडतांना शहाणा अधिक झाला, कीं, बस्स; मग तुह्मांला त्याच्या खाण्यापिण्याविषयीं किंवा निजण्याबसण्याविषयीं फिकीर करावयाला नको. पाहुण्याला माहिती, ज्ञान द्या. त्याला तुमच्या प्रेमाचा वांटेकरी करा. तुमच्याजवळ पैसाअडका नसेल किंवा सेवा करण्याची शक्ति नसेल, तर तुमच्या पाहुण्याशीं खऱ्या प्रेमानें आणि कळकळीनें हंसा. या प्रेमस्मितानें त्याला धैर्य आणि उत्साह मिळालाच पाहिजे, आणि त्याची उन्नतिहि झाली पाहिजे. ही एक उत्तम प्रकारची सेवाच होय. एकाद्या मनुष्याला नुसता पैसा देऊन निरोप देणें ह्मणजे कांहींच नव्हे. हें कृत्य ह्मणजे एकाद्या नवऱ्यानें आपल्या स्त्रीला पैसा देणें आणि नंतर तिच्याशीं घटस्फोट करणें, यासारखें आहे. पत्नीला पैसा नव्हे, तर प्रेम हवें असतें.

एकाद्याला पैसा देऊन मुक्त होणें ह्मणजे गुन्हेगाराप्रमाणें आपलें मुख्य कर्तव्य टाळण्यासारखें आहे. त्याला प्रेम द्या, ज्ञान द्या, त्याची उन्नति करा, त्याला सुसंस्कृत करा. मुख्य आदरातिथ्य काय तें हेंच आहे. आणि तुह्मीं सर्वांचें आदरातिथ्य या रीतीनेंच करीत असावें, व अशाच धर्तीचें प्रेम तुह्मीं तुमच्या बायकामुलांवर करावें.

# CAN A MARRIED MAN ASPIRE TO REALIZATION?

## गृहस्थ आणि मोक्ष*

वेदान्तावर घेतलेले कांहीं आक्षेप 'रामा'च्या नजरेला आले आहेत. परवां कोणी एकजण म्हणाला, कीं, हेंच जर हिंदूंचें तत्वज्ञान असेल, तर हिंदुस्तानची अवनति कां झाली, हें सहज कळण्यासारखें आहे. दुसऱ्या एकानें 'रामा'ला विचारिलें, कीं, वेदान्तशास्त्र हें जगांतील सर्व धर्मांपेक्षां श्रेष्ठ आहे, तर हिंदुस्तान इतकें खालावलेलें कां, आणि ख्रिस्ती देशांची इतकी भरभराट कां ?

अशा प्रश्नांचीं उत्तरें देण्यास 'रामा'ला तूर्त वेळ नाहीं. सवडीप्रमाणें या प्रश्नांचा विचार करण्यांत येईल, आणि या प्रश्नांचीं उत्तरें, वेदान्तामुळें हिंदुस्तानची अवनति झालेली आहे असें वाटणाऱ्या लोकांनां आश्चर्यचकित करून सोडतील. श्रोत्यांनीं उतावीळपणानें एकदम कोणतेंहि अनुमान काढूं नये. थोडासा दम धरून त्यांनीं व्याख्यात्याचें समग्र भाषण ऐकून घ्यावें, अशी 'रामा'ची त्यांनां विनंति आहे.

**'खाना, पीना, मजा मारना**
**और मट्टीमें मिलजाना !'**

अशा अर्थाचा मजकूर कुराणांत आहे. एक मुसलमान गृहस्थ दारू पीत असतांना व इतर व्यसनांत मग्न झालेला असा दृष्टीला पडला. तेव्हां "तूं आपल्या पैगंबराच्या उपदेशाविरुद्ध वागत आहेस, तुझें हें करणें बरोबर नाहीं,' अशी एका काजीनें त्याची कानउघाडणी केली. त्यावर त्या दुर्व्यसनी गृहस्थानें कुराणांतील वरील अर्थाच्या कवितेचा

* २८ डिसेंबर १९०२ रोजीं झालेलें व्याख्यान. या व्याख्यानाचा मथळा 'पापाचा प्रश्न' (The Problem of sin) असा इंग्रजी पुस्तकांत दिलेला आहे. पण व्याख्यानांतील विषय 'गृहस्थ आणि मोक्ष' यांविषयींच असल्यामुळें आम्हीं मथळा विषयानुरूप बदलला आहे.

पहिला भाग तेवढा काजीला ह्मणून दाखविला. तें ऐकून काजीनें उत्तर दिलें "प्यारे भाई, हें तूं काय करतोस? शेवटचा भाग 'और मट्टीमें मिल जाना' वाच!"

त्या मद्यप्यानें उत्तर दिलें "सर्व कुराण कोणाला तरी आचरणांत आणितां येईल काय? कित्येकांनां थोडें, कांहींनां अधिक, असें तें आचरणांत आणितां येईल, व याप्रमाणें मला पाहिजे तेवढें 'खाना पीना मजा मारना' मी आचरण्यांत आणितों."

यासाठीं 'राम' असें सांगतो, कीं, या मुसलमान मद्यप्याचें तर्कशास्त्र कोणींहि लढवूं नये. आधीं सर्व भाग वाचावा, नंतर अनुमान काढावें.

एकदां रामाजवळ सोन्याचें घड्याळ होतें. त्या घड्याळाच्या सांखळीला एक लहानसें घड्याळ व एक होकायंत्र अडकविलेलें होतें. हें लहानसें घड्याळ चालत नव्हतें; पण त्यांत एक अशी कळ बसविली होती, कीं, होकायंत्रांतील सुई एका विशिष्ट तऱ्हेनें लाविली ह्मणजे लहान घड्याळांत एकाचा ठोका बसे. नेहमीं एकाची–अद्वैताची घंटा; द्वैताला ठाव नाहीं! दिक्काल आणि कार्यकारणभाव यांच्या पलीकडे असलेलें आत्मतत्त्व तुह्मी आहां. दिक्कालादिकांवर तुमची सत्ता आहे, त्यांची तुमच्यावर नाहीं! ते तुमचे दास आहेत–ते असत्य व मायिक आहेत–आत्मतत्त्व दिक्कालादिकांपासून अलिप्त आहे.

गृहस्थाला आत्मसाक्षात्कार प्राप्त करून घेतां येईल काय? असा एकानें प्रश्न केला. त्यावर, हा प्रश्न बाजूला ठेवून नेमलेला विषय (पापाचा प्रश्न) घ्यावा, अशी दुसऱ्यानें सूचना केली.

'राम' उत्तर देतो, कीं, सर्व विषय 'रामा'चे आहेत. वरील प्रश्नाचा पूर्णपणें विचार केला, तर तुमचें फार कल्याण होईल. कदाचित् या प्रश्नाच्या विवेचनानें तुह्मी दचकून जाल. किंबहुना येथील लोकांनां तें आवडणार नाहीं. 'रामा'चें लक्ष्य लोकांच्या आवडीकडे नसून त्यांच्या हिताकडेच आहे.

## गृहस्थ आणि मोक्ष.

गृहस्थाला आत्मसाक्षात्कार प्राप्त करून घेतां येईल काय ? या प्रश्नाला ‘ होय, खचित येईल,’ असें वेदान्त उत्तर देतो. औषध रोग्यांनांच दिलें जातें, निरोग्यांनां त्याची गरज नाहीं. प्रपंचदुःखांत सांपडलेल्या व प्रपंचांत असणाऱ्या लोकांनां औषधाची अत्यंत जरूर आहे. अविवाहिताला अनुभव लवकर येत नाहीं; प्रपंच नेटका करणाराला मात्र तो येतो; पण प्रापंचिक मनुष्य निष्काळजीपणानें वागूं लागल्यास त्याला अनुभव न येतां तो खालावतो. पतिपत्नींच्या संबंधाविषयींच्या योग्य ज्ञानाची हेळसांड केल्यानें पुष्कळ दुःख होतें. इतका महत्त्वाचा आणि प्रिय विषय कां टाळावा ? या विषयाचें एक अंग— लग्नाची तयारी हें आहे. पण यासंबंधीं विचार करण्यास आतां सवड नाहीं. हा एक स्वतंत्र विषय आहे, यास्तव याविषयीं पुढें विवेचन करितां येईल.

‘ रामा’चें लग्न झाल्यावर आह्मी दोघें दोन वर्षें पूर्ण ब्रह्मचर्यव्रतानें वागलों. लग्न किंवा संसार हें कांहीं बंधन नाहीं. मात्र यांसंबंधीं दौर्बल्य, भीति, आणि रूप, आकृति, वस्तु इत्यादिकांवरील आसक्ति, तसेंच ‘मी देह आहें,’ ‘माझी पत्नी देह आहे,’ इत्यादि भावनांची वाढ, ‘ माझें माझें ’ अशी अनिवार हांव, वगैरे प्रकार फार विघातक आहेत, आणि या प्रकारांचा संसारांत जोर झाला, ह्मणजे अनुभव येणें अशक्यच आहे.

पेनिलोपिसप्रमाणें ( दिवसा गुंडाळलेला धागा रात्रीं सोडणें ) आह्मीं जर करीत राहिलों, तर आमचें काम संपावें कसें ? मिळविलेलें जर आह्मीं गमावून सोडिलें, तर आमची प्रगति कशी होईल ? वेदान्त सांगतो, कीं, धागा गुंडाळा, सोडूं नका ! सामर्थ्य, उच्च प्रेम—प्रेमाचा नुसता आभास नव्हे—यांनीं पूर्ण प्रेरित व्हा. पतिपत्नींच्या देहावरच तुमची दृष्टि गेली, कीं, झाला सारा घोंटाळा ! अशानें तुमची उन्नति कशी होईल ? मग, लोकांनीं लग्न करूं नये असें ‘रामा’चें ह्मणणें आहे काय ? छेः, तसें नाहीं. पण लग्नाचा—लग्नसंबंधाचा उपयोग

निराळा केला पाहिजे. वेदान्ताचा अर्थ नीट समजून घ्या. तुमचें लग्न तुह्मांला बंधन न होतां तुह्मांला तें तारक व्हावें, अशी खबरदारी बाळगा. कामवासनेचा जर तुमच्यावर पगडा असेल, तर मात्र तुमचें लग्न किंवा संसार तुह्मांला तारक न होतां मारक होईल, आणि तुह्मी तुमची कामवासना जसजशी तृप्त करूं लागाल, तसतसें तुमचें बंधन अधिक वाढून तुमची अवनति होत जाईल.

स्त्री हें एक नरकाचें द्वार आहे, असें पुष्कळ साधुसंत ह्मणतात. एकदां एक मनुष्य खिशांत दारूची बाटली घालून रस्त्यानें चालला होता. वाटेंत भेटलेल्या एका साधूला त्यानें विचारिलें "महाराज! मी तुरुंग पहावयाला जाणार आहें, तुरुंगाचा रस्ता कोठला?"

साधूनें आपल्या हातांतील दंडानें दारूच्या बाटलीला स्पर्श करून ह्मटलें "बंधो! हाच तुरुंगाचा जवळचा मार्ग, तो तुला तेथें खचित नेईल."

याप्रमाणें स्त्रीविषयीं साधुसंत बोलत असतात. पण 'रामा'ला हें मत मान्य नाहीं. स्त्री जर नरकाचें द्वार आहे आणि नवराबायको परस्परांनां खालीं ओढणारीं आहेत, तर वेद निर्माण करणाऱ्या परमेश्वरानें पुरुषाच्या अंतःकरणांत स्त्रीविषयीं इतका ओढा, इतकें प्रेम कां उत्पन्न केलें? याचा खुलासा करा. या प्रेमामध्यें-संबंधामध्यें गूढार्थ आहे. अज्ञानामुळें हा संबंध-हें प्रेम अवनतीचें साधन होतें. याचा दोष त्या प्रेमाला न देतां अज्ञानाला द्या, आणि अज्ञान दूर करण्यास झटा. वस्तुतः शून्याला कांहीं किंमत नाहीं; पण तेंच शून्य दशांशचिन्हाच्या उजवीकडे ठेविलें तर आंकड्याची किंमत कमी करितें, व डावीकडे ठेविलें तर आंकड्याची किंमत वाढवितें. त्याप्रमाणें तुमची उन्नति किंवा अवनति होणें हें लग्न-संबंधाचा तुह्मीं कसा उपयोग करितां, यावर अवलंबून आहे.

एकाद्याला आपल्या बायकोंत सुख कां वाटतें, याचा नीट विचार केला पाहिजे. या सुखामुळेंच पुरुष बंदे गुलाम होतात. एका सुंदर तरुणीमुळें--नायिकेमुळें झालेल्या ट्रोजन युद्धानें हें सिद्ध केलें आहे.

बायकोपासून सुख होतें असें ह्मणणें खोटें आहे. खरें पहातां बायकोंत –तिच्या देहांत सुख नाहीं.

आपल्या प्रीतिपात्रावर सर्व सुख अवलंबून नसलें, ह्मणजे नवराबायकोंनां परस्परांपासून नेहमीं सुख होईल काय ? होणार नाहीं. एकदां तुह्मीं सुखाचा उपभोग घेतला ह्मणजे तुह्मीं कोणत्या स्थितींत असतां ? तुह्मांला नंतर अधिक सुख होत नाहीं. तुह्मीं अशक्त, दुर्बल असलां, तर तुमच्या पत्नीपासून तुह्मांला सुख होतें काय ? होत नाहीं. अगर तुमची पत्नी रोगी, बेइमानी असली ह्मणजेहि तिच्यापासून सुख बिलकूल होत नाहीं. येथें तुह्मीं दोन निरनिराळ्या व्यक्ति आहांत, ह्मणजे येथें द्वैत आहे, आणि द्वैतांत खरें सुख नाहीं. जेव्हां हें द्वैत नाहींसें होईल, आणि देहाचेंच नव्हे तर मनाचें व आत्म्याचेंहि ऐक्य होईल, तेव्हां मात्र अवर्णनीय अशी स्थिति प्राप्त होईल. मग येथें देह, जग यांचें भान नाहीं. ऐक्य, अद्वैत, स्वर्ग, निर्भयता, मुक्ति इत्यादिकांचा लाभ होईल. मी देह नाहीं किंवा तीहि देह नाहीं; देह, मन, जग, याहिपलीकडे आह्मी आहोंत. नंदनवन, स्वर्ग, किंवा ध्येय तें हेंच ! वेदान्त सांगतो, कीं, अशा वेळीं तुह्मीं पूर्णसत्ता आणि आनंद (सच्चिदानंद) असतां. धनविद्युत् (पुरुष) आणि ऋणविद्युत् ( स्त्री ) एकत्र मिळाल्यामुळें तुमच्या शरीररूपी विद्युद्यंत्रांत आत्मविद्युत् पूर्णपणें वाहूं लागते व प्रकाशूं लागते. दोन्हीं टोंकें मिळतात आणि निजावस्था प्राप्त होते. आनंद, निर्भयता, सत्ता हीं प्राप्त होतात, आणि "ईश्वरपुत्र" ही संज्ञा प्राप्त होते. नवराबायको हीं ऐक्यांत–आत्मतत्त्वांत लीन झालीं, ह्मणजे अखिल विश्वहि त्यांत विरघळून जातें, आणि आत्मतत्त्वानें ग्रासल्यामुळें वर्ण, रंग, पंथ इत्यादि सर्व भेद भाताप्रमाणें आहेत व मृत्यु हा फोडणीप्रमाणें आहे असें वाटूं लागतें.

वेदान्ताप्रमाणें ही एक बाजू झाली. आतां दुसरी बाजू ह्मणजे ही, कीं, अज्ञानी मनुष्य कांहीं विचार न करितां बाह्यस्वरूपालाच भुलतो. आत्मतत्त्वाकडे कांहीं लक्ष्य न देतां बाह्यचिन्ह हेंच सर्व कांहीं आहे, असें मानूं लागतो.

अरण्यांत एक मनुष्य जमिनीवर पडलेलें एक पुस्तक पहात होता. इतक्यांत वीज कडाडली. त्याला वाटलें, कीं, पुस्तकानेंच विजेला खालीं आणिली. दुसरें कांहीं सांगितलें तर त्याची खात्री होईना. त्यानें त्या दोन वस्तु पाहिल्या, आणि एक दुसरीचें कारण आहे, असा त्यानें आपल्या मनांत संबंध जोडला. आणि हा संबंध मानवांनीं केलेला नसून ईश्वरानेंच घडवून आणिला आहे, असें वाटून त्याला समाधान वाटलें.

या गोष्टीपासून आम्हीं काय धडा घ्यावा ? जेव्हां तुह्मीं जड वस्तु आणि कामवासना यांवरून आपलें मन काढून खऱ्या शक्तीकडे —आत्मतत्त्वाकडे लावितां, तेव्हां पुनः मनाच्या खालच्या भूमिकेकडे येण्याची जरूरी नाहीं, असें तुह्मांला वाटलें पाहिजे. हें दिव्य आत्मतत्त्व-सूर्य—अनंत शक्ति असें असून दिक्कालातीत आहे. हें महासमुद्रासारखें असून इतर सर्व वस्तु, लहरी, आवर्त, एकाच मूल तत्त्वाचीं रूपें आहेत. एक मुलगा नदीकडे पाहून आपल्या बंधूला ह्मणतो "दादा, हें पहा, किती मोठी लाट येत आहे." लाटेंत पाणी आहे खरें, पण दृश्य आकृती-कडेच त्याची विशेष नजर आहे. मी तुला मोठी लाट दाखवितों, असें तो ह्मणतो. नदी दाखवितों, असें तो ह्मणत नाहीं. त्याप्रमाणेंच ईश्वरी तत्त्व किंवा आत्मतत्त्व एकच, अखंड आहे. सूर्य, चंद्र, तारे आणि इतर पदार्थ हे आमच्या मानससमुद्रांतील लहरि आहेत, ह्मणून मनुष्याला 'माझें तुझें' असें वाटून द्वैत पुढें येतें. अनेक पदार्थ दिसतात आणि लहरीप्रमाणें ते एकमेकांवर आदळूं लागतात. वस्तूंच्या आघातापासून-संघट्टणापासूनच—सुख होतें अशी जर कल्पना असेल, तर ती चुकीची आहे. आत्मतत्त्वाच्या अस्तित्वापासूनच सुख होतें. कारण लहरि एक-मेकांवर आदळून फुटल्या, ह्मणजे मूलतत्त्व पाणीच शिल्लक राहतें.

आपल्या मुलाच्या मनांत सोन्याची कल्पना नीट भरवून देण्यासाठीं वेदान्ती त्याला आंगठी दाखवून ह्मणतो "मुला, हें पहा सोनें." मुलगा विचारतो "बाबा, वर्तुलाकार सोनें काय?" "छेः;" 'रंग सोनें काय?' 'नव्हे.'

'तर मग, सफाई किंवा वजन हें सोनें काय ?' 'छे, छे.' तर मग सोन्याची कल्पना तरी कशी करवून द्यावी ? त्यानें आपल्या मुलाला इतर कांहीं सोन्याचे पदार्थ दाखविले आणि शेवटीं मुलाला सोन्याची कल्पना स्पष्टपणें कळली. याप्रमाणें पदार्थांचे गुणधर्म ओळखून त्यांचा आचरणांत उपयोग करावा.

जगांत अंधांची संख्या जास्त आहे किंवा डोळस लोकांची संख्या विशेष आहे, असा बिरबलनें बादशहाला एकदां प्रश्न केला. डोळसांची संख्या जास्त, असें बादशहानें उत्तर दिलें. यावर दोघांची पैज ज़ुंपली. आपलें ह्मणणें सिद्ध करण्याकरितां बादशहा एक कपडा घेऊन आला आणि तो आपल्या मस्तकाभोंवतीं गुंडाळून, "हें काय आहे ?" असें त्यानें लोकांनां विचारिलें. "फेटा," असें त्याला उत्तर मिळालें. पुनः तेंच वस्त्र अंगाभोंवतीं गुंडाळून त्यानें "हें काय आहे ?" असें दुसऱ्या लोकांनां विचारिलें. "शाल आहे," असें उत्तर मिळालें. मग त्यानें तें कापड कंबरेभोंवतीं गुंडाळिलें, तेव्हां ती "कौपीन आहे" असें लोकांनीं सांगितलें. तेव्हां बादशहा ओरडून ह्मणाला "सारे लोक अंध आहेत ! हें वस्त्र फेटा, शाल किंवा कौपीन नसून हा नुसता कपडा आहे—नामरूपांनीं हें वस्त्र आच्छादिलेलें आहे."

आत्मतत्त्वाचा साक्षात्कार घ्या. सोनें काय आहे हें पाहण्यासाठीं त्याची मोडतोड करण्याची जरूरी नाहीं. ज्यावेळीं नरनारी, वस्त्रालंकार, आवर्त आणि लहरि इत्यादिकांविषयीं तुह्मी विचार करितां, तेव्हां या वस्तूंच्या मागें असलेलें सत्यतत्त्व—आत्मतत्त्व तुमच्या ध्यानांत येत नाहीं.

संसार धर्माच्या आड येतो, असें ह्मणूं नका. खरें सुख कशापासून मिळतें, आपला खरा आत्मा कोणता आहे, याचा विचार करा. मुमुक्षूंनीं मूलभूत तत्त्वांचें—सत्याचें—सच्चिदानंदाचें ध्यान करावें. मनुष्य, फेटा, शाल इत्यादि भावना नाहींशीं झाली, ह्मणजे नीट मनन करा, बंधनाचें कारण नाहींसें करा आणि आत्मतत्त्वांत बुडी मारा.

मी ' प्रणव ' आहें, याचा अनुभव घ्या. माझें खरें स्वरूप प्रणवच काय, मी प्रवणच आहें काय? तसें असेल, तर हें जग ह्मणजे एक तरंग आहे. मी त्याच्यामागें कां लागावें ? देहात्मभावना, कामवासना, इच्छा इत्यादिकांविषयींहि तुह्मी असा विचार करून पहा, आणि हा अभ्यास आधारचक्रापासून सुरू करा; ह्मणजे इच्छाशक्तीचा ( कुंडलिनीचा ) प्रवाह वरवर—मेंदूच्याहि वर जाऊं लागेल. सर्व मनोविकार सहजगत्या दबले जातील. पराभूत वस्तु निस्तेज होते. हें कसें ह्मणाल, तर ऐन सूर्यप्रकाशांत विजेच्या दिव्याचें तेज पडत नाहीं; अंधारांतच तो चकाकतो व प्रकाश देतो. आत्मरवीच्या तेजांत हळुहळू प्रवेश करा, ह्मणजे दिव्याप्रमाणें किंवा काजव्याप्रमाणें कामवासनांचें तेथें कांहीं तेज पडणार नाहीं. संसार किंवा प्रपंच धर्मसाधनाच्या आड येतो किंवा नरकाप्रत नेतो, अशी ओरड करणें अस्वाभाविक आहे. त्याहून उच्च स्थितीला गेल्याशिवाय त्याचा नाश तुह्मांला करितां येणार नाहीं. भाईहो ! संसाररूपी साधनाचा उपयोग करा, आणि आपली उन्नति करून घ्या.

'जग' हा एक मोठा चमत्कार आहे. याहून अन्य चमत्काराची जरूरी नाहीं. भीति हें पापाचें मूल आहे. ती आत्मज्ञानानेंच समूळ नाहींशीं होते. पवित्रतेचें महत्त्व ओळखून पवित्र व्हा. या व्यतिरिक्त अन्य उपदेश करणें अस्वाभाविक आहे.

ये वा तूं अथवा न येशि जरि तूं माझ्यामधें राहसी,
कोठें दूर अदूर वास घडुं दे, माझ्यामधें नांदसी;
नाहीं बा इतुकेंच, लेशहि नसे भिन्नत्व दोघांमधीं,
जा तूं शीघ्र मदंतरींच मिळुनी हो पूर्ण सौख्योदधि!

न होई जगीं दान घेता, कदाही !
परी दानदाताच होऊन राहीं !
प्रयत्नें अशा घेइं सर्वस्व माझें,
निजानंद आनंद सेवीं स्वतेजें !

## गृहस्थ आणि मोक्ष.

हिंदुस्तानांत चालू असलेली क्रमवार, शास्त्रीय आणि स्वाभाविक पद्धत अशी आहे, कीं, पत्नी नवऱ्याला मदत करिते, त्याच्या उन्नतीच्या आड येत नाहीं.

साक्षात्कार झाल्यानंतर दोन वर्षें 'रामा'नें प्रपंच केला. 'रामा'नें आपल्या पत्नीला वेदान्ताचा उपदेश केला. तिची पद्धत ह्मटली, ह्मणजे ती पूजेचें साहित्य घेऊन येई आणि आत्मध्यानांत मग्न होई. आसन घालून ती 'रामा'च्या देहाकडे आपलें लक्ष्य लावी, प्रणवाचा उच्चार करी, 'रामा'चा आत्मा आपलाच आत्मा आहे असें मानी आणि ती आपल्यामध्येंहि ईश्वरीतत्त्व पाही. अशा प्रकारचे तिचे विचार असल्यामुळें आह्मां उभयतांनां परस्परांमध्यें ईश्वर दिसे, परस्परांचें एकमेकांनां साहाय्य होई, आणि अनुभव मिळे. 'रामा'नें तिची उन्नति होण्यास बरीच मदत केली. हा अभ्यासक्रम कांहीं काल चालला. त्यानंतर कांहीं महिने आह्मीं एकत्र घालविले; पण, त्यावेळीं आमच्या मनांत क्षुद्र विचार आले नाहींत, मनोविकारांवर आमचा पूर्ण ताबा राहिला. याप्रमाणें आह्मां दोघांमध्यें पूर्णैक्य होऊन आह्मीं स्वतंत्र--मुक्त झालों. पतिपत्नींची भावना मावळली. कोणतेंहि बंधन राहिलें नाहीं. बद्धस्थितींतच केवळ देहावर लक्ष्य असतें.

क्षुद्र व स्वार्थी विचारांनींच गृहकलह माजतात. नंतर परस्परांच्या हितसंबंधांत विरोध येऊन दांपत्यांत वितुष्ट उत्पन्न होतें. वेदान्त नीट समजून घ्या आणि मुक्त व्हा. बंधनें–संबंध फक्त नांवाचेच असतात. प्रत्येकानें स्वतंत्र--मुक्त होणें इष्ट आहे. मुलांबाळांनां स्वतंत्रपणें वागूं द्या. त्यानें तीं बिघडणार नाहींत. असें केल्यानें अखिल जगत् नंदनवन बनून शेवटीं सर्वांनीं स्वतंत्र—मुक्त होण्याचा ईश्वराचा हेतु सिद्धीला जाईल!

## INDIAN WOMAN-HOOD.

## हिंदी स्त्रिया.

हिंदुस्तानांतील एका वर्तमानपत्रानें प्रसिद्ध केलेला, लंडनमध्यें एका इंग्लिश बाईनें दिलेल्या व्याख्यानाचा कांहीं भाग, 'राम' आतां वाचून दाखविणार आहे. हिंदुस्तानांतील रहाणीबद्दल चुकींचे विचार आणि खोट्या कल्पना लोक या देशांत कसे पसरवितात, हें तुह्मांला नीट कळावें, ह्मणून, 'राम' हें तुह्मांला वाचून दाखवीत आहे. हिंदुस्तानांत जाणाऱ्या लोकांनां कांहीं काम करितां येत नाहीं, तेथें जातिभेद इतका प्रखर आहे, कीं, कोणाहि अमेरिकनाला लोकांत मिसळतां येत नाहीं, असा कित्येकांचा गैरसमज झालेला आहे. हिंदुलोकांशीं मिळूनमिसळून न वागणाऱ्या कांहीं लोकांनीं असे बरेच गैरसमज उत्पन्न केले आहेत.

आह्मी ज्यावर प्रेम करितों, अशा व्यक्तीसाठीं प्राण देणें किती उदात्त आणि धन्य आहे !

आपल्या प्रेमपात्राकरितां जीव वेंचण्यास तयार असणारा मनुष्यच खरोखर प्रेम करितो. अशा तऱ्हेच्या प्रेमानेंच आह्मांला जगतां येतें, व मोठमोठीं कामें करितां येतात. असल्या प्रेमाचीच तूर्त हिंदुस्तानाला अपेक्षा आहे. हिंदुस्तानांत येऊन कांहीं काम करूं इच्छिणारे प्रेमळ स्त्रीपुरुष हिंदुस्तानाला हवे आहेत.

हिंदुस्तानांत राहणारे, पण तेथील स्थितीचें नीट निरीक्षण न करणारे लोक बऱ्याच खोट्यानाट्या गप्पा उठवितात. मेणकापडांत गुंडाळलेलें पुस्तक पाण्यांत बुडविलें तरी त्याला पाण्याचा बिलकूल संपर्क होत नाहीं, तें जसेंच्या तसेंच राहतें, त्याप्रमाणेंच हे लोक हिंदुस्तानांत राहतात, पण तेथील लोकांशीं मिसळून त्यांच्याशीं एक होऊन जात नाहींत. येथें एक स्त्री आहे. ती हिंदुस्तानांत जाऊन हिंदी लोकांच्या राहणीप्रमाणें राहून आलेली आहे. ती माझ्या विधानांच्या

सत्यतेची साक्ष देईल. अमेरिकन लोकांनीं या बाईप्रमाणें हिंदुस्तानांत जाऊन लोकांशीं मिळूनमिसळून वागावें, अशी 'रामा'ची इच्छा आहे. हिंदुस्तानचें खरें कल्याण करावें अशा हेतूनें तुह्मी तेथें जात असाल, तर तुह्मांला स्वतःचा कांहीं पैसा खर्च करावा लागणार नाहीं. तेथील लोक लाखों लोकांनां आज पोशीत आहेत. तेथील लोक गरीब आहेत हें खरें, पण ते फार उदार आहेत.

हिंदुस्तानांतील संन्यासी, यति इत्यादि लोकांजवळ पैसा असलेला 'रामा'नें केव्हांहि पाहिला नाहीं. जेव्हां हे लोक रस्त्यानें फिरत असतात, तेव्हां क्षुधेच्या तृप्तीसाठीं यांनां भिक्षेची अपेक्षा असते, असें समजलें जातें. आपल्या दारावरून जाणाऱ्या क्षुधित गरीब लोकांनां भिक्षा, अन्न वगैरे देणें हें ईश्वरानें नेमिलेलें आपलें पवित्र कर्तव्यकर्म आहे, अशी प्रत्येक हिंदी स्त्रीची भावना असते. एकादा क्षुधित यति आपल्या घरावरून गेला आणि त्याची क्षुधा तृप्त करण्यास घरांत कांहीं नसलें, तर काय प्रकार घडेल हें 'रामा'ला माहीत आहे. त्या घरांतील स्त्रीच्या नेत्रांतून भराभर अश्रु येऊं लागतील, आणि तिला अतिशय वाईट वाटेल. गरीब, क्षुधित असा कोणीहि येवो, त्याला हिंदी स्त्रिया यति किंवा बैरागी असें समजतात. यति किंवा बैरागी ह्मणजे स्वामी नव्हे. तुह्मी किंवा कोणीहि हिंदुस्तानांत अन्नवित्तरहित असे गेलां, तर तुमचा यतीप्रमाणें आदरसत्कार होईल!

# WIFE-HOOD.

## पत्नी.

हिंदुस्तानांत पत्नीला मान मिळत नाहीं, तिच्यावर प्रेम केलें जात नाहीं, असें बहुश: अमेरिका व इंग्लंड येथें सांगण्यांत येतें.

हें अगदीं खोटें आहे! कारण, येथल्यापेक्षां (अमेरिकेपेक्षां) हिंदुस्तानांत पत्नीला अधिक मान मिळतो, आणि तिच्यावर अधिक प्रेम केलें जातें. येथें चारचौघांत उघडपणें पत्नीचे मुके घेतात, तिला कुरवाळितात, आणि तिच्यावर प्रेम केलेंसें दाखवितात, आणि एकान्तीं तिचा त्याग करितात. हिंदुस्तानांत याच्या उलट प्रकार आहे. तेथें नवरा पत्नीला उघडपणें अगदीं थोडा किंवा क्वचित् मान देतो. पण त्याच्या अंत:करणांत ती त्याचें दैवतच होऊन बसलेली असते.

या देशांत पत्नीला एकांतीं कसें वागविलें जातें, हें कोणी पहात नाहीं. तिला चारचौघांत कसें वागविलें जातें, हेंच महत्त्वाचें मानितात. हिंदुस्तानांत तेंस नाहीं. तेथें उघडपणें नवरा आपल्या पत्नीकडे लक्ष्य देत नाहीं, पण स्वत: त्रास सोसून तो शक्य तितकें आपल्या पत्नीचें हित साधीत असतो, व या कामीं तो बिलकूल कसुरी करीत नाहीं. हिंदुस्तानांत पुरुषांइतक्या स्त्रिया सुशिक्षित नसतात, हा मात्र मोठा भेद आहे खरा; पण येथें तरी स्त्रिया पुरुषांप्रमाणेंच सुशिक्षित असतात काय? हिंदुस्तानांतील पुरुष येथील लोकांइतके सुशिक्षित नाहींत, तसेंच तेथील बायकाहि येथील स्त्रियांसारख्या सुशिक्षित नाहींत.

याचा सर्व दोष आज हिंदुस्तानांत विवाहसंबंधाकडे लावण्यांत येतो. पण हें योग्य व खरें नाहीं. अशा दोष देण्यानें या प्रश्नाचा नीट उलगडा होत नाहीं.

हिंदुस्तानांत नवरा आपल्या पत्नीला 'माझी प्रिया, माझी पत्नी,' अशी केव्हांहि हांक मारीत नाहीं, किंवा तिच्याविषयीं बोलतांना 'माझी पत्नी' असा उल्लेख करीत नाहीं. अशा प्रकारचें भाषण ग्राम्य, अधर्म्य

आणि लज्जास्पद मानिलें जातें. पत्नीविषयीं उल्लेख करण्याचा प्रसंग आलाच, तर तो माझ्या मुलाची आई—उदाहरणार्थ ‘ कृष्णाची आई ’ किंवा ‘ रामाची आई ’ असेंच तिला संबोधितो.

प्लेगानें आजारी असलेल्या रोग्याजवळ दुसऱ्या कोणाला—त्याच्या कुटुंबांतील मनुष्यांनांहि येऊं देऊं नये, असा कायदा पूर्वीं एके काळीं होता. ( आतां तो कायदा रद्द झाला आहे. ) त्यावेळीं एका झोंपडींत एक मुलगा प्लेगानें आजारी होता. त्याची मोठ्या खटपटीनें शुश्रूषा करावी या हेतूनें *या उदार बाईनें आपला त्या झोंपडींत प्रवेश करून घेतला, आणि मरणाला न भितां ती त्याची सेवा करीत राहिली. सरतेशेवटीं त्या मुलाच्या आईचाहि आंत शिरकाव झाला. शेवटीं तो मुलगा बरा न होतां आपल्या आईच्या पायावर मस्तक ठेवून त्यानें आपला प्राण सोडिला. ख्रिस्ताच्या पायावर मस्तक ठेवून मरण येणें हें जसें ख्रिस्ती लोक पवित्र समजतात, त्याप्रमाणें या मरणाला हिंदुलोक अत्यंत पवित्र मानितात.

या देशांत लोक परमेश्वराला पिता असें मानून भजतात; ‘ हे आकाशांतील बापा ’ अशी त्याची प्रार्थना करितात. हिंदुस्तानांत परमेश्वराला पिता असें न मानितां, माता ह्मणून भजतात. आई किंवा माता हा शब्द हिंदुस्तानांतील भाषेंत अत्यंत प्रिय, गोड आहे. ‘माताजी’ हें त्या परमप्रिय, पवित्र परमेश्वराचें नांव आहे.

एकादा हिंदु आजारी पडला किंवा त्याला असह्य वेदना होऊं लागल्या, ह्मणजे त्याच्या मुखांतून ‘ माझ्या देवा ’ असे शब्द न येतां ‘ मा मा ’ ( आई आई ) असेच शब्द बाहेर पडतात. हे शब्द त्याच्या हृदयांतून, अंतःकरणांतून येतात, आणि मोठा कळवळा उत्पन्न करितात.

---

* नांव दिलेलें नाहीं.

## SIN—ITS RELATION TO THE ATMAN OR REALSELF.

## पाप आणि त्याचा आत्म्याशीं संबंध.*

बंधुभगिनींनों!

हिंदुस्तानांत अशी एक चाल आहे, कीं, लोक आनंदाच्या प्रसंगीं गोरगरिबांनां मेवामिठाई, पेढे किंवा साखर वांटीत असतात. एकदां एका देवालयांत एकजण पेढे वांटीत होता. याचें कारण काय, असें विचारतां तो ह्मणाला "माझा घोडा हरवला, ह्मणून मी आनंदानें पेढे देत आहें." लोकांनां हें उत्तर ऐकून आश्चर्य वाटलें. "घोडा गमावला हाच काय आनंद?" असें ते विचारूं लागले, तेव्हां तो मनुष्य ह्मणाला "आपला गैरसमज करून घेऊं नका. चोरांनीं माझा घोडा चोरून नेला, त्यावेळीं मी जर घोड्यावर बसलों असतों, तर मलाहि त्यांनीं चोरून नेलें असतें. फक्त घोडाच चोरीला गेला, याबद्दल मला देवाचे आभार मानिले पाहिजेत." हें ऐकून लोक पोट धरून हंसले आणि ह्मणाले, "काय भोळा मनुष्य हा!"

बंधुभगिनींनों! ही गोष्ट चमत्कारिक दिसते; पण, ही प्रत्येकानें आपल्याशीं ताडून पहावी. आणि त्या मनुष्याहूनहि वाईट रीतीनें आपण वागत आहों किंवा नाहीं, याचा अनुभव घ्यावा. त्यानें घोडा गमाविला, पण स्वतःचा बचाव केला. पण, अरेरे! आह्मांपैकीं हजारों, लाखों लोक काय करीत आहेत? ते घोडा बाळगून ठेवीत आहेत, पण स्वार गमावीत आहेत! स्वाराचा घोड्याशीं जो संबंध आहे, तोच आत्म्याचा

* रविवार ता. १६ नोवेंबर १९०२ रोजीं झालेलें व्याख्यान.

शरीराशीं आहे,* हें प्रत्येकाला माहीत आहे; पण चमत्कार हा, कीं, आपण जर एकाद्याला तुझें स्वरूप काय, तूं कोण आहेस, असा प्रश्न केला, तर तो उत्तर देतो, कीं, मी अमुक अमुक आहें, आणि फलाण्या आफिसांत काम करीत असतों! अशा प्रकारचीं उत्तरें बरोबर नसून तीं स्थूल शरीरासंबंधींच असतात. आम्ही स्वाराविषयीं विचारतों, आणि आह्मांला घोड्याविषयीं माहिती मिळते. याचा मथितार्थ आह्मी घोड्याला स्वार मानतों, देहालाच आत्मा मानतों, असाच होत नाहीं काय? 'घात झाला! घात झाला! घात झाला!' असें मोठ्या कंठरवानें सांगण्याचा प्रसंग आला आहे. प्रत्येकजण घोड्याविषयीं—शरीराविषयीं कांहींना कांहींतरी सांगतोच; पण, स्वाराविषयीं कांहींच सांगत नाहीं. वास्तविक गमावलेली वस्तु स्वार किंवा आत्मा होय! किती आश्चर्य हें!

हा आत्मा कसा शोधून काढावा, या प्रश्नाचीं उत्तरें मागें सांगण्यांत आलीं आहेत. आज आपण या प्रश्नाचा निराळ्या दृष्टीनें—पापाच्या दृष्टीनें विचार करूं. पापाचें मूळ कारण काय? तें जगांत कसें आलें? या प्रश्नांविषयींचें माझें ह्मणणें थोडेंसें चमत्कारिक आणि असंबद्ध असें तुह्मांला वाटेल. पण माझ्या विधानाची वरवर दिसणारी असंबद्धता तुमच्या बायबलांतील तत्त्वांनां तंतोतंत जुळते, असें सिद्ध करितां येईल. बायबल हिंदी लोकांप्रमाणें यूरोपियनांनां समजणार नाहीं. कारण, ख्रिस्त हा आशियांतील व हिंदुस्तानांतील आहे. बायबलांतील उपमा, दृष्टांत वगैरे हीं हिंदूंच्या धर्मग्रंथांमध्यें वेळोवेळां आलेलीं आहेत. या कारणास्तव पाश्चात्य लोकांपेक्षां आशियांतील हिंदु लोकांनां बायबल अधिक चांगलें कळतें. माझें ह्मणणें बायबलाच्या विरुद्ध नसल्यानें जरी

---

*आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव च ।
बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च ॥
इंद्रियाणि हयानाहुर्विषयास्तेषु गोचरान् ।
आत्मेंद्रियमनोयुक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिणः ॥

कठोपनिषत्.

तें तुह्मांला सकृद्दर्शनीं तुमच्या कल्पनेच्या विरुद्ध वाटलें, तरी तुह्मी तें नीट ऐकून घ्यावें. पापाच्या प्रश्नाविषयीं विचार करण्यापूर्वीं प्रास्ताविक मुद्याचा आणखी थोडा खल करूं.

एकदां यक्षानें धर्मराजाला प्रश्न केला, कीं, "या जगांत सर्वांत मोठें आश्चर्य कोणतें?" धर्मराजानें सांगितलें "लोक प्रत्यहीं आपल्यासमोर मरत असलेले पाहूनहि आपण मरणार आहों असें मनुष्याला वाटत नाहीं, हें होय." 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः' हा सिद्धांत सर्वांनां माहीत आहे. तसेंच कौरव गेले, पांडव गेले, मृतांनां उठविणारे महात्मेहि गेले, 'तो मोठा नृपति, त्याची रम्य नगरी, त्याचे मांडलिक राजे, राजसभेंतील रत्नें (विद्वान् लोक), त्याच्या चंद्रबिंबानना,' इत्यादि सर्व कांहीं नामशेष होऊन गेलें आहे, हेंहि सर्वांनां ठाऊक आहे. आमच्यासमोर कोणी मेलेलें दिसलें, कीं, आमच्या अंगांत कांपरें भरतें, व आपणहि एकाद्या दिवशीं जाणार, असें त्यावेळीं वाटूं लागतें. हा देह शंभर किंवा दोनशें वर्षें राहील, किंवा फार झालें तर चांगदेवासारखा पांचशें वर्षें वांचेल; पण, त्यानंतर तो पतन पावणार हें खास, अशी आमच्या मनाची खात्री झालेली असते; पण, चमत्कार हा, कीं, असें असूनहि आपण मरणार आहों असें कोणालाच वाटत नाहीं! जो तो मरणाविषयीं विचार करण्याचें टाळतो, आणि आपण अमर आहों असें समजून धन आणि विद्या मिळविण्यास लागतो; आणि आपलें काम, आपला व्यवहार आणि इतर प्रापंचिक संबंध एकसारखे वाढवीत असतो. एकापक्षीं हा सिद्धान्त पटतो; पण उलट पक्षीं, जसा पक्षी आपल्या पंखांवर पडलेलें पाणी झाडून टाकितो, तसा मरणाच्या विचाराला मनुष्य आपल्या मनांत बिलकूल थारा देत नाहीं. मृत्यूचीं कितीहि सुंदर कवनें आह्मी ऐकिलीं, तरी मृत्यूवर आमचा विश्वास आचरणांत कांहीं बसत नाहीं. याचें कारण काय असावें?

वेदान्त सांगतो, कीं, याचें खरें कारण ह्मटलें ह्मणजे तुमचा आत्मा अमर आहे, तो कधींहि मरण पावणार नाहीं. मरण ह्मणजे विकृति होय. नाशिवंत देह—घडोघडी झिजून जाणारा देह हा कांहीं तुमचा

आत्मा नव्हे; पण या नाशिवंत देहांत अविनाशि असें कांहीं तत्त्व आहे. तुह्मी ह्मणाल, कीं, रोजच्या व्यवहारामध्यें 'आत्मा अमर आहे,' असें आह्मीं समजत नाहीं; पण 'आमचीं शरीरेंच अमर आहेत,' असें आह्मीं समजतों. याविषयीं वेदान्त असें सांगतो, कीं, आत्मा मरण पावत नाहीं, देह मरण पावतो, हें खरें आहे; पण, आत्म्याचे गुणधर्म चुकीनें आणि अज्ञानानें नाशिवंत देहाला लाविले जातात. हा प्रकार सर्वत्र सर्व प्राणिकोटीमध्यें आढळतो. अमरत्वाविषयींची ही जी सार्वत्रिक कल्पना आहे, हिचें कारण काय आहे हें पाहिलें पाहिजे. कोणत्याहि गोष्टीचें कारण इतर बाह्य वस्तूंमधून शोधून काढण्याचे दिवस आतां गेले. शास्त्रीयपद्धतीप्रमाणें आह्मीं ज्या त्या वस्तूचें कारण ज्या त्या वस्तूमध्येंच शोधिलें पाहिजे. देहाकडे पहावें तर अमरत्वाची कल्पना उत्पन्न होण्यासारखें त्यांत कांहीं नाहीं. क्षणोक्षणीं बदलणाऱ्या चंचल मनांतहि तसें कांहीं नाहीं; ह्मणून वेदान्त सांगतो, देहाच्या पलीकडे चला, मनाच्या पलीकडे चला, ह्मणजे तुह्मांला अविनाशि असें आत्मतत्त्व दिसेल. आत्मा अमर, साक्षी, प्रकाशरूप आणि सनातन असा आहे, आणि आत्म्यांतच आह्मांला वरच्या सार्वत्रिक कल्पनेचें कारण सांपडतें. रोजच्या व्यवहारांत ग्यालिलिओच्या पूर्वीं, लोकांनीं केलेल्या चुकीप्रमाणें आमची चूक होते. ग्यालिलिओच्या शोधापूर्वीं पृथ्वीची गति सूर्यावर आरोपित करीत असत. (पृथ्वी न फिरतां सूर्यच पृथ्वीभोंवतीं फिरतो असें मानीत असत.) त्याप्रमाणें आत्म्याचें अमरत्व चुकीनें देहाकडे लावण्यांत येत आहे.

यांत आह्मीं तीन वस्तु पाहिल्या. अविनाशि आत्मतत्त्व, नाशिवंत शरीर आणि अज्ञान. या तीन्ही वस्तु मनुष्याच्या अंतर्गत आहेत. यांतील कोणतीहि वस्तु बहिर्गत नाहीं. या तीन अंतर्गत वस्तूंच्या साहाय्यानें देहाला मरण नाहीं, या सार्वत्रिक कल्पनेचें स्पष्टीकरण होतें.

पुनः असें पहा, कीं, या जगांत कोणीहि मुक्त किंवा स्वतंत्र नाहीं. तथापि प्रत्येकजण आपण मुक्त आहों असें समजतो, आणि प्रत्येकाला स्वतंत्रता–मुक्ति अत्यंत इष्ट वाटते. मनुष्य स्वतंत्र आहे असें तुह्मी

ह्मणाल; पण, तुमच्यामागें इतके मनोविकार, वासना, मोह असतांना तुह्मी स्वतंत्र कसें ह्मणून घेतां ? गोड गोड फळें, मिष्ट पक्वान्नें, सुंदरवर्ण आणि अभ्युदयाची मधुर कल्पना तुह्मांला मोहित करून गुलाम बनवून टाकिते. आपल्या मनाला वाटेल तसें आचरण तुह्मांला करितां येतें काय ? मध्यंतरीं कांहीं तरी बिघडल्यानें तुह्मांला राग येत नाहीं काय ? क्रोधादि मनोविकारांचे तुह्मी तर दास आहां. लोकांनां स्वतंत्रपणें वागतां येत नाहीं; तरीपण स्वतंत्रतेविषयीं–मुक्तीविषयीं नेहमीं त्यांच्या मनांत कल्पना येते, आणि ती त्यांनां फार इष्ट व मधुर वाटते.

हिंदुस्तानांत रविवारीं मुलांनां स्वतंत्रता–सुटी असते. सुटीच्या लालुचीनें त्यांनां आठवड्याचे दिवस शिकविले जातात. आज कोणता वार, असें प्रत्येक दिवशीं मुलें आपल्या आईला विचारतात. ती सांगते, कीं, आज सोमवार किंवा मंगळवार. नंतर मुलें आपल्या बोटांनीं सोमवार, मंगळवार असें मोजूं लागतात, आणि ह्मणतात, रविवार केव्हां येईल ! सुट्टी केव्हां मिळेल !

पृथ्वीच्या पाठीवर इतका रक्तपात कोणत्या कारणानें होतो ? स्वतंत्रतेच्या कल्पनेनें. याच कल्पनेनें अमेरिकन लोकांनां आपल्या मायदेशाशीं असलेला आपला संबंध तोडून द्यावा लागला. प्रत्येक धर्माचा तरी हेतु काय आहे ? तर स्वतंत्रता किंवा मोक्ष. प्रत्येकजण या स्वतंत्रतेसाठीं–मोक्षासाठीं हपापलेला असतो; पण, खरोखर मुक्त असलेले असे लोक कितीसे आहेत ? अगदीं थोडे !

वेदान्ताप्रमाणें, तुह्मीं या जगांत दुःख, दिक् आणि कार्यकारणभाव या तीन भिंतींच्या तुरुंगांत सदैव कोंडलेले आहां. तुमची प्रत्येक क्रिया, प्रत्येक विचार कार्यकारणभावाच्या शृंखलेनें बद्ध असतां, तुह्मांला या जगीं मुक्त कसें होतां येईल ? पण अशी स्थिति असूनहि स्वतंत्रता–मुक्ति हा प्रत्येकाचा छंद आहे. हा चमत्कारिक विरोधाभास नाहीं काय ? याचा खुलासा करा.

वेदान्त सांगतो, कीं, यालाहि कारण आहे, व तें बाह्य नसून तुमच्यामध्येंच आहे. सर्वांमध्यें आढळून येणारा स्वतंत्रतेचा विचार स्पष्टपणें असें सिद्ध करतो, कीं, तुमच्यामध्यें अमर्यादित, स्वतंत्र, मुक्त असें कांहीं तत्त्व आहे, व तें ह्मटलें ह्मणजे तुमचा आत्मा होय. ज्याप्रमाणें अज्ञानी लोकांनीं पृथ्वीची गति सूर्यावर आरोपित केली—पृथ्वीच्याऐवजीं सूर्य फिरतो असें ते मानूं लागले, त्याप्रमाणें आत्म्याचे गुणधर्म अज्ञानामुळें आम्हीं मनावर, स्थूल देहावर लादूं पहात आहों.

दुसरा एक चमत्कारिक प्रकार नेहमीं आमच्या पाहण्यांत येतो. या जगामध्यें प्रत्येक मनुष्यांत कांहींना कांहींतरी दोष, पाप, न्यूनता असते. पण, आपण पापी आहों असें कोणालाहि वाटत नाहीं. उलट आपण पवित्र आहों असेंच प्रत्येकाला वाटतें.

'पापोऽहं पापकर्मात्मा पापयोनिः पापसंभवः'

असें कित्येकजण तोंडानें ह्मणत असतात; पण यांत देखील लोकांनीं आपणांला पवित्र व धार्मिक मानावें असा त्यांचा उद्देश असतो. एकाद्या अत्यंत वाईट गुन्हेगाराला "तूं हा गुन्हा, हें पाप केलें आहेस काय?" असा प्रश्न कोर्टानें विचारला असतां, "मीं गुन्हा केला नाहीं, मी निर्दोष आहें," असेंच तो सांगतो. मी दोषी आहें, मीं गुन्हा केला आहे, असे कबुलीजबाब गुन्हेगार केव्हांकेव्हां देतात; पण त्यांत कांहींतरी घोंटाळा असतो. जरी त्यांनीं कबुलीजबाब दिला, तरी आपण निर्दोष आहों, असें त्यांनां आपल्या अंतःकरणांत वाटत असतें. देवालयांत पाद्र्यांसमोर कांहीं लोक आपलीं पापें कबूल करितात. पण देवालयाबाहेर 'चोर किंवा गुन्हेगार' अशी त्यांनां हांक मारल्यास लगेच ते तुमच्या अंगावर धांवून येतील, आणि आपली बेअदबी केली ह्मणून कोर्टांत तुमच्यावर फिर्यादहि करितील. देवालयांत मात्र ते देवाच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा प्रयत्न करितात, आणि बाहेर येतांच आपलें खरें स्वरूप प्रगट करूं लागतात.

हाहि प्रकार किती विसंगत दिसतो? व याचा खुलासा तुह्मी कसा करणार? वेदान्त सांगतो, कीं, आह्मी पापी नाहीं, आह्मीं पापापासून दूर—अलिप्त आहों, असा सार्वत्रिक आढळून येणारा समज आत्म्याच्या पावित्र्याची व निर्मलत्वाची उत्तम साक्ष देतो. तुमचा आत्मा खरोखर निष्पाप आणि पवित्र असाच आहे. माझें हें विवरण आपणांला कबूल नसेल, तर आपण आपला दुसरा खुलासा सांगा.

जगांतील सर्व पैसा आपणांला मिळवितां यावयाचा नाहीं, आणि आपल्या मनाप्रमाणें आपणांला श्रीमंत होतां यावयाचें नाहीं, अशी प्रत्येकाची खात्री असते. एकाद्या लक्षाधीशाकडे किंवा कोट्यधीशाकडे जाऊन, आपली तृप्ति झाली आहे काय, असें त्यांनां विचारा. आपण तृप्त झालों नाहीं, आपणांला अधिक संपत्ति हवी, असेंच त्यांच्याकडून उत्तर येईल. **'आशावधिं को गतः?'** कांहीं लोकापाशीं संपत्ति असूनहि शांति असली तर तो कांहीं संपत्तीचा गुण नव्हे. वेदान्त नकळत त्यांनीं आचरणांत आणिल्यामुळें त्यांनां शांति मिळाली असली पाहिजे. कारण, संपत्ति स्वतः केव्हांहि श्रीमंतांनां सुख व शांति देत नाहीं.

संपत्ति, ऐश्वर्य इत्यादिकांपासून सुख व शांति मिळत नाहीं, हें सर्वांनां माहीत आहे. तरी प्रत्येकजण संपत्तीकरितां इतका कां हपापत आणि लाळ घोंटीत आहे? या प्रश्नाचा नीट उलगडा वेदान्ताशिवाय दुसऱ्या कोणत्याहि धर्मानें अगर तत्त्वज्ञानानें केलेला नाहीं. वेदान्त सांगतो, कीं, संपत्ति किंवा वैभव सर्वांनां पाहिजे हें खरें; पण, तुमच्या देहाला जगाचें वैभव किंवा स्वामित्व मिळवितां येणार नाहीं. आणि जर कदाचित् तुह्मांला तें मिळालें, तर नंतर चंद्रलोकावरील स्वामित्व मिळावें असें तुह्मांला वाटूं लागेल. सीझर, नेरोसारख्या रोमच्या बादशहांनीं त्या वेळचें सर्व जग मिळविण्याचा प्रयत्न केला. नेरोनें तर सर्व प्रकारचीं पक्वान्नें आपल्या पोटांत कोंबण्याचा एकदां प्रयत्न केला. पण त्यांनां सुख किंवा समाधान कांहीं झालें काय? सर्व जग जरी मिळालें, तरी त्यापासून प्राप्ति काय? सर्व जग मिळविलें आणि आपला आत्मा गमाविला, हाच का

नाहीं पुरुषार्थ? हें जग किंवा ही पृथ्वी आहे तरी काय? ज्योतिषशास्त्रांत स्थिर तार्‍यांचें गणित करतांना तुमची पृथ्वी ह्मणजे एक नुसता बिंदु आहे,असें मानिलें जातें. पृथ्वीची स्थिति (स्थान) एका लहानशा बिंदूनें दर्शवितात, तिला महत्त्वमान कांहीं देत नाहींत. अशा या पृथ्वीच्या स्वामित्वापासून खरें सुख व समाधान केव्हांहि मिळणार नाहीं, असें कळत असून, प्रत्येकजण त्यासाठीं एकसारखी धांवपळ कां करीत आहे? याचें उत्तर वेदान्त असें देतो, कीं, तुमचा आत्मा सर्व विश्वाचा धनी आहे, व या कारणास्तवच तुह्मी सर्व जगतावर स्वामित्व मिरवूं पहातां!

पूर्वीं हिंदुस्तानांत शहाजहान नांवाचा बादशहा होऊन गेला; त्याला त्याच्या मुलानें कैद करून आपण त्याचें सारें राज्य बळकाविलें. त्यानंतर तुरुंगांतून शहाजहाननें आपल्या मुलाला लिहून कळविलें, कीं, "आतां माझा वेळ जात नाहीं; यास्तव कांहीं विद्यार्थी येथें पाठवावे, ह्मणजे मी त्यांनां शिकवून माझी करमणूक करून घेईन." औरंगझेब ह्मणाला "पहा माझा बाप कसा आहे! त्यानें इतकीं वर्षें राज्य केलें, तरी अद्याप त्याची सवय जात नाहीं. आतां त्याला कांहीं विद्यार्थी हवे आहेत, आणि त्यांवर तो आपलें प्रभुत्व गाजविणार! जुन्या सवयी त्याला टाकून देतां येत नाहींत."

हें अगदीं खरें आहे. जुन्या सवयी आह्मांला चिकटून रहातात. त्या टाकून देणें अशक्य आहे. 'शहाजहान' याचा मूळ अर्थ जगाचा बादशहा असा आहे. तुमचा आत्मा तर विश्वाचा स्वामी आहे. तुम्हीं तुमच्या शहाजहानला--आत्म्याला--देहरूपीं तुरुंगांत टाकिलें आहे. तो तुमचा आत्मा--शहाजहान--आपल्या जुन्या सवयी कशा टाकून देईल? त्याला आपला स्वभाव कसा सोडून देतां येईल? '**स्वभावो दुरतिक्रमः**' असा सर्व साधारण नियम असल्यानें देहरूपी तुरुंगांत देखील तुमचा शहाजहान जगावर--विश्वावर आपलें स्वामित्व मिळवूं पहातो. कितीहि उपदेश केला, तरी तो आपल्या जुन्या सवयी सोडणार नाहीं.

वेदान्त सांगतो, कीं, कितीहि उपदेश केला, व्यासपीठावरून कितीहि व्याख्यानें दिलीं, तरी संचयवृत्ति--ऐश्वर्य संपादण्याची आणि

तें मिळवून ठेवण्याची हांव तुह्मांला केव्हांहि नाहींशी करितां यावयाची नाहीं. याचें कारण, तुह्मांला आत्म्याचें प्रभुत्व किंवा सत्ता दाबून टाकितां येणार नाहीं. मग, या रोगाला कांहींच औषध नाहीं काय? (असा प्रश्न उद्भवतो.) याला औषध आहे. अज्ञानामुळें आत्म्याचें वैभव तुह्मी शरीरावर लादतां, आणि तसेंच देहाचें दुःख आत्म्यावर घालतां. हें अज्ञान नाहींसें करा; आणि मग पहा काय चमत्कार होतो तो! संपत्तीशिवाय तुह्मी श्रीमंत होतां आणि जमीन किंवा मिळकत यांशिवाय तुह्मी अखिल विश्वाचे स्वामी होतां. जोंपर्यंत अज्ञान आहे, तोंपर्यंत महत्त्वाकांक्षा, लोभ हे सर्व प्रकार असणारच. त्याला इलाज नाहीं. अज्ञान नाहींसें करून आपलें खरें स्वरूप ओळखा, आत्म्याला तुरुंगांत अधिक काल ठेवूं नका, त्याला लवकर मुक्त करा, ह्मणजे विश्वाचा स्वामी, नियंता, विभु, सनातन आत्मा–परमात्मा याचा साक्षात्कार करून घ्या, ह्मणजे तुह्मी अत्यंत पवित्र–पूर्ण असे व्हाल, आणि नंतर ऐहिक संपत्ति किंवा ऐश्वर्य यांविषयीं विचार करणें ह्मणजे पाप आहे, असें तुह्मांला वाटूं लागेल.

अलेक्झांडर दि ग्रेट हा जगांतील सर्व देश जिंकून हिंदुस्तानांत आला. तो तेथें जाण्यापूर्वीं त्यानें आर्यलोकांविषयीं पुष्कळ गोष्टी ऐकलेल्या होत्या. तो हिंदुस्तानांत फिरत असतां सिंधुनदाच्या तीरावरील वाळवंटांत त्याला एक साधु भेटला. त्या साधूच्या अंगावर वस्त्रप्रावरण कांहीं नव्हतें, आणि उद्यांची भाकर कशी मिळेल याची त्याला काळजी नव्हती. अलेक्झांडरच्या मस्तकावर झकझकीत रत्नखचित मुकुट होता. थोडक्यांत सांगावयाचें ह्मटलें, ह्मणजे त्यावेळचें जगांतील सर्व ऐश्वर्य अलेक्झांडरच्या देहावर एकवटलें होतें, आणि साधूच्या अंगावर मूर्तिमंत दारिद्र्य वास करीत होतें. पण त्या दोघांच्या मुखांकडे पाहिलें असतां आध्यात्मिक संपत्तींत कोण श्रेष्ठ आहे, हें सहज कळून येण्याजोगें होतें.

साधूचें आध्यात्मिक वैभव फार श्रेष्ठ दर्जाचें असून त्यानें आत्म्याचें वैभव पूर्णपणें जाणलेलें होतें. त्याच्या चर्येवर प्रसन्नता झळकत होती;

पण त्याच्याजवळ उभा राहिलेला अलेक्झांडर आपली आध्यात्मिक दरिद्रता बाह्यालंकारानें लपवूं पहात होता. साधूची प्रसन्नवृत्ति पाहून अलेक्झांडरला फार आश्चर्य वाटलें, आणि तो त्याच्यावर खूष होऊन त्याला ह्मणाला "चला, आपण ग्रीस देश पहावयाला जाऊं–"

साधु हंसून ह्मणाला "हें जग माझ्यामध्यें आहे. मी विश्वांत मावत नाहीं. हें विश्व माझ्यामध्यें असून मी या विश्वानें कोंडिला जात नाहीं. ग्रीस आणि रोम माझ्यामध्येंच आहेत. सूर्य आणि तारे यांचा उदयास्त माझ्यामध्येंच होतो."

हें भाषण ऐकून अलेक्झांडरला फारच आश्चर्य वाटलें. कारण, असें भाषण त्यानें पूर्वीं कधींहि ऐकिलेलें नव्हतें. अलेक्झांडर त्याला ह्मणाला "मी आपणाला संपत्ति देतों, ऐहिक सुखाची तुमच्यासाठीं रेलचेल करून सोडतों, लोकांनां हव्या असणाऱ्या आणि त्यांनां मोहित करून टाकणाऱ्या सर्व कांहीं वस्तु आपणाला मुबलक मिळतील. कृपा करून आपण मजबरोबर ग्रीसला यावें."

हें ऐकतांच साधु पोट धरून हंसला, आणि ह्मणाला "हिरे, सूर्य, तारे इत्यादिकांनां प्रकाश माझ्यापासूनच मिळतो. सर्व वस्तूंनां वैभव आणि रमणीयता माझ्यापासूनच मिळते. असें असल्यामुळें मी सुखाकरितां त्या वस्तूंच्या मागें धांवणें ह्मणजे फारच अपमानकारक होय. त्यांनां वैभव मीं दिलेलें आहे, आणि आतां त्यांच्याकडेच मी भिक्षा मागणें केव्हांहि बरोबर होणार नाहीं!"

हें ऐकून अलेक्झांडरला फार त्वेष आला व 'तुला आतां ठार करतों,' असें त्या साधूला ह्मणून त्यानें आपली तरवार उपसली. हें पाहून साधु पुनः पोट धरधरून हंसला आणि ह्मणाला "अलेक्झांडर! तुझ्या जन्मांत तूं असें कधीं खोटें भाषण केलें नाहींस! मला मारणार? पण, असें पहाः—

नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः।*
न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः॥
अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च।
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः॥

—भगवद्गीता.

तुझ्या हाताला चलन देणारी शक्ति मीच आहें; तुझ्या स्नायूंची हालचाल मीच करतों."

हें ऐकून अलेक्झांडरची तरवार गळून खालीं पडली.

त्यागाचें मर्म नीट जाणण्याला फक्त एकच मार्ग आहे, हें वरील उदाहरणावरून दिसतें. पारमार्थिक दृष्ट्या जेव्हां आह्मी श्रीमंत होतों, तेव्हांच आह्मीं प्रत्येक वस्तूचा त्याग करण्यास तयार होतों. व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें असतां हें योग्यच दिसतें. आह्मी विपत्तींत जें कांहीं मिळवितों तें चिरंतन असतें, असा शास्त्राचा ठाम सिद्धांत आपण ऐकला नाहीं काय? अंतःसामर्थ्य वाढून पूर्ण आत्मज्ञान झालें ह्मणजे बाह्यत्याग किंवा न्यास शक्य आहे. त्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

कधींहि रागावूं नये, असा उपदेश आह्मीं नेहमीं ऐकतों. पण प्रसंग आला ह्मणजे राग आमच्यानें आवरत नाहीं; असें कां होतें? राग, द्वेष, आप्पलपोटेपणा, कामवासना इत्यादि पापें कां उद्भवलीं? काम-क्रोधादि षड्रिपु आम्हांला त्रास कां देतात? वर विवेचन केल्याप्रमाणें एकाच पद्धतीनें या सर्व पापांचा वेदान्तांत विचार केला आहे. या सर्व पापांचें सविस्तर वर्णन करण्यास वेळ नाहीं. यामुळें 'राम' आतां

---

याला न तोडिती शस्त्रें, याला अग्नि न जाळितो।
न पाणी भिजवी याला, न करी शुष्क वायु ही॥
छेदा दाहा न हा योग्य, शोषाया भिजवावया।
नित्य सर्वांत जो स्तब्ध, जो शाश्वत अचंचळ॥

—समश्लोकी, वामनपंडित.

त्याचा गोषवारा थोडक्यांत सांगत आहे. तुह्मी हें पक्कें लक्ष्यांत ठेवा, कीं, हीं सर्व पापें अज्ञानामुळें होतात. या अज्ञानाच्या योगानें तुमचा आत्मा आणि स्थूल व सूक्ष्म शरीर ( देह व मन ) यांचा घोंटाळा होतो. हें अज्ञान नाहींसें करा ह्मणजे पापें नाहींशीं होतील. दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें हीं पापें नाहींशीं करण्यास तुह्मीं प्रयत्न केला, तर त्यांत तुह्मांला यश येणार नाहीं. वस्तूंचा नाश करतां येणार नाहीं. पण, अज्ञानाचा नाश करतां येईल. लहानपणीं मुलें अज्ञानी असतात, आणि जसजशीं तीं प्रौढदशेंत येऊं लागतात, तसतसें त्यांचें अज्ञान कमी कमी होतें, हें आह्मी पाहतों.

क्रोध, लोभ, कामवासना, संचयवृत्ति इत्यादि पापांकडे प्रवृत्त करणारी अशी शक्ति आमच्यामध्यें आहे. व्याख्यानांनीं किंवा उपदेशांनीं ही शक्ति नाहींशी करतां येत नाहीं, किंवा दाबून टाकितां येत नाहीं. यास्तव वेदान्त सांगतो, कीं, या शक्तीचा दुरुपयोग करूं नये. तिचा योग्य उपयोग करून घ्यावा. ही शक्ति तुह्मांमध्यें असलेल्या अद्वितीय अशा आत्म्याचीच आहे.

प्रत्येकाला आपण स्वतंत्र--मुक्त व्हावें असें वाटतें. या इच्छेचें स्वरूप किंवा मुख्य लक्षण काय आहे? आपणाला प्रतिस्पर्धी नाहीं अशा, ह्मणजे अद्वितीय स्थितीपर्यंत पोहोंचणें, हेंच त्या स्थितीचें लक्षण होय. आपण पूर्ण, मुक्त व्हावें ह्मणजे अद्वितीय अशा स्थितीप्रत जावें, अशी तुमच्या आत्मिक शक्तीची प्रेरणा असते. स्वार्थ किंवा आप्पलपोटेपणा इत्यादिकांपासून दूर रहावें अशी तुमची इच्छा असेल, तर तुम्हांला ती शक्ति दाबून टाकितां येणार नाहीं, किंवा ती नाहींशी करतां येणार नाहीं. आपण शक्तीचा दुरुपयोग केला असतां स्वर्ग नरक होईल, आणि तिचा योग्य उपयोग केल्यास नरकहि नंदनवन होऊन जाईल!

इंग्लंडांत एक ख्रिस्ती पाद्री होता. त्यानें डार्विन, हक्स्ले इत्यादि शास्त्रज्ञांचे मृत्युलेख वाचले, आणि हे लोक स्वर्गास गेले असतील, कीं,

नरकास गेले असतील, याविषयीं तो आपल्या मनांत विचार करूं लागला. तो आपल्याशींच ह्मणाला "हे लोक फार चांगले होते, त्यांनीं कांहीं गुन्हे--पापें केलीं नाहींत; पण त्यांचा ख्रिस्त व बायबल यांवर विश्वास नव्हता, यामुळ ते नरकास गेले असावेत; पण, छे, तसें नसेल. या लोकांनीं जगाचें बरेंच कल्याण केलेलें आहे, आणि खाचित ते नरकास जाण्यास योग्य नव्हते. बरें, ते आतां असतील तरी कोठें?" असे त्याचे विचारतरंग चालले असतां त्याला झोंप लागली आणि एक चमत्कारिक स्वप्न पडलें. आपण मरून स्वर्गास गेलों आहों, आणि तसेंच आपल्या देवालयांत येणारी सर्व भक्तमंडळीहि स्वर्गास आलेली आहे, याप्रमाणें त्याला दिसलें. डार्विन, हक्स्ले इत्यादि शास्त्रज्ञांविषयीं त्यानें चौकशी केली; तेव्हां, हे लोक पाताळांत आहेत, असें ख्रिस्ती चित्रगुप्तानें त्याला सांगितलें.

बायबलावर विश्वास न ठेविल्यामुळें त्यांनां अशी गति प्राप्त झाली, आतां तरी आपलें वर्तन सुधारा, असें सांगण्याकरितां आणि त्यांनां बायबलाचा उपदेश करण्याकरितां पाताळास जावें, असें मनांत येऊन तेथें आपणाला जातां येईल, कीं नाहीं, याची त्यानें चौकशी केली. बरीच खटपट केल्यानंतर त्याला पाताळांत जाण्यास परवानगी मिळाली. पाताळाकडे जाणाऱ्या आगगाडीच्या पहिल्या क्लासांत बसून ही स्वारी निघाली. वाटेंत बरींच स्टेशनें लागलीं. अतल, वितल, सुतल इत्यादि घांट उतरून जेव्हां पाताळाकडे गाडी जाऊं लागली, तेव्हां दुर्गंधी अतिशय वाढूं लागली. महातलाकडे गाडी येतांच पाद्र्याला हातरुमाल, टावेल घेऊन आपलें नाक बंद करावें लागलें. दुर्गंधि इतकी कडक होती, कीं, त्याला एकदम मूर्च्छा आली. घाणीशिवाय दुःखाचें रडणें, ओरडणें इत्यादि प्रकारहि चालले होतेच. कांहीं थोड्या मिनिटांनीं तो शुद्धीवर येतो, तोंच 'पाताल, पाताल' असें ओरडणें चाललेलें त्याच्या कानीं आलें. नंतर खिडकीच्या बाहेर तो डोकावून पाहूं लागला, तेव्हां त्याला एक सुंदर स्टेशन दृष्टीला पडलें,

आणि हें पाताळ नसावें असें त्याला वाटूं लागलें. इतक्यांत पोर्टर आले, आणि हें पाताळच आहे अशी त्यांच्या सांगण्यावरून त्याची खात्री झाली, व तें पाताळच असल्यामुळें त्याला तेथें उतरणें भाग पडलें. स्टेशनांतून बाहेर पडतांच त्याला सुंदर उपवनें, सुवासिक फुलें, सुगंधि वारे इत्यादि प्रकार जिकडेतिकडे आढळून आले, व हें स्थान स्वर्गाहूनहि रम्य आहे, असें त्याला भासलें. तेथें त्याला एक उंच गृहस्थ भेटला. हा हक्स्ले होता. पाद्रानें 'हें स्थान पाताळ काय?' असें त्याला विचारिलें. 'होय,' असें हक्स्लेनें उत्तर दिलें. नंतर पाद्री त्याला ह्मणाला "येथें मी तुह्मांला बायबलचा उपदेश करण्यास आलों आहें. पण प्रथम हें स्थळ इतकें रम्य कसें, याचा खुलासा करा.' तें ऐकून हक्स्ले ह्मणतो "आह्मीं प्रथम येथें आल्यावेळीं ही जागा अत्यंत वाईट होती. येथें ठिकठिकाणीं घाणेरडीं डबकीं असून कांहीं जागीं तप्त वाळू, तप्त लोखंड आणि दुर्गंधयुक्त पदार्थ इत्यादि प्रकार येथें आढळून येत होते. प्रथम आह्मीं डबक्यांतील घाणेरडें पाणी घेऊन तप्त लोखंडावर आमच्या हातांनीं शिंपण्यास सुरुवात केली. यानंतर एके ठिकाणीं प्रवाही तेल जळत होतें, तेथें आह्मांला नेण्यांत आलें. मग थंड झालेलें लोखंड ज्योतीवर धरून आह्मीं त्याची कांहीं हत्यारें बनविलीं. इतकें झाल्यावर आह्मांला मलाच्या ठिकाणीं नेण्यांत आलें. त्याठिकाणीं गेल्यावर आह्मीं तेथें तयार केलेल्या हत्यारांनीं खणण्यास सुरुवात केली, आणि मलाचा खताच्या कामीं उपयोग करून आह्मीं पेरणीचें काम सुरू केलें. व याप्रमाणें क्रमाक्रमानें शेवटीं आह्मीं नरकाचें नंदनवन बनवून सोडिलें."

या गोष्टीचें तात्पर्य ह्मटलें, ह्मणजे पाताळांत कांहीं वस्तु होत्या, त्यांचा योग्य उपयोग करून त्या योग्य ठिकाणीं ठेविल्यानें पाताळाचा स्वर्गहि बनवितां आला; यास्तव वेदान्त सांगतो, कीं, तुह्मांमध्येंहि वस्तु आहेत, दिव्य आत्मा आहे, नाशवंत शरीर आहे. यांचा तुह्मीं योग्य उपयोग करा. 'घोड्याच्या पुढें गाडी' असा उलटा प्रकार करूं नका.

तसें कराल तर संसार कष्टमय होईल. कोणत्याहि वस्तूचा, शक्तीचा नाश करितां येणार नाहीं. त्याचा योग्य उपयोग करून नरकाचें नंदनवन बनवा.

या जगांतील सर्व दुःखें नाहींशीं करण्याला—सर्व पापांपासून आणि मोहांपासून अलिप्त राहण्याला एकच गुरुकिल्ली, एकच मार्ग आहे. आणि तो हा, कीं, तुह्मीं तुमच्या आत्म्याला जाणिलें पाहिजे. चित्तवेधक सौंदर्यापासून आणि मोहकारक वैभवापासून अलिप्त राहिल्याशिवाय तुह्मांला कामवासनांनां—क्षुद्र मनोविकारांनां जिंकतां येणार नाहीं. एकदां तुह्मांला आत्मज्ञान झालें, ह्मणजे मनोविकार, कामवासना इत्यादिकांपासून तुह्मांला कांहीं त्रास न होतां तुह्मी त्यांपासून अलिप्त रहाल, आणि पूर्ण मुक्त, पूर्ण आनंदी व्हाल. स्वर्ग किंवा नंदनवन तें हेंच !

ॐ

# PROGNOSIS & DIAGNOSIS OF SIN.

## पापाची चिकित्सा आणि निदान.*

बदकें जरी घाणेरड्या डबक्यांत राहतात, तरी पाणी अगर घाण त्यांच्या पंखांनां लागत नाहीं. त्याप्रमाणें तुह्मांमध्यें एक तत्त्व आहे, तेंहि तुमचे दोष, चुका यांनीं दूषित होत नाहीं. निर्मलत्व–पावित्र्य हा आत्म्याचा गुण आहे; पण व्यवहारांत तो देहाचा आहे असें मानिलें जातें. देह किंवा मन पवित्र आहे हें मानण्याची कल्पना कोठून उत्पन्न झाली? ही कल्पना लोकांच्या अंतःकरणांत कोणीं उत्पन्न केली? दुसऱ्या कोणींहि नाहीं. उत्पन्नकर्ता कोणी बाहेरचा नाहीं. तो तुमच्यामधीलच–तुमच्या अंतरांत वास करणाराच कोणी आहे. आणि तो ह्मटला ह्मणजे निष्पाप, पवित्र असा तुमचा आत्मा होय. कोणत्याहि वस्तूचें कारण त्या वस्तूच्या आंतच शोधिलें पाहिजे. तें वस्तूच्या बाहेर शोधणें, शास्त्र आणि तत्त्वज्ञान यांनां अनुसरून नाहीं. देह कितीहि पवित्र किंवा पापी असो, त्यांतील आत्मा सदा निष्पाप व पवित्रच असतो; आणि तो आपलें अस्तित्व भासवितो.

आतां आह्मी निरनिराळ्या पापांचा किंवा पापांच्या गोष्टींचा विचार करूं. खुशामतीविषयीं प्रथम पाहूं:–खुशामत ही कांहीं मोठ्याशा पापांत गणली जात नाहीं. पण ती सर्वत्र आढळून येते. यःकश्चित् किड्यापासून तों तहत ईश्वरापर्यंत सर्वांनां स्तुति आवडते, हें कसें? आपणाला मान द्यावा, आपली स्तुति करावी, आपणाला सर्वांनीं मोठें ह्मणावें, अशी प्रत्येकाची इच्छा असते–हें कसें?

---

*२० डिसेंबर १९०२ रोजीं अक्याडेमी ऑफ सायन्सीसमध्यें झालेलें व्याख्यान. हें मागील व्याख्यानाचा उत्तरभाग आहे.

कुत्रे, घोडे आणि पाळीव शिकारी वाघ यांनांहि स्तुति प्रिय असते; आणि त्यांनां थोडेंसें थोपटलें किंवा गोंजारिलें ह्मणजे तेहि थोडे उल्हसित आणि आनंदित होतात. कुचकामी मनुष्याचीहि स्तुति केली ह्मणजे त्याचा चेहराहि लगेच प्रफुल्लित दिसूं लागतो.

अनेक देवतांनां भजणाऱ्या देशांतील देवहि स्तुतीनें समाधान पावतात. एकेश्वरी पंथांतील लोकांच्या प्रार्थना किंवा उपासना या तरी काय आहेत? त्यांचा तुह्मीं शांतपणें विचार केल्यास त्यांत स्तुतीशिवाय दुसरें कांहीं नाहीं, असें तुह्मांला आढळून येईल. स्तुति किंवा खुशामत ही इतकी सार्वत्रिक कां झाली आहे? प्रत्येकाला स्तुति आवडते हें खरें, पण तो त्या स्तुतीला योग्य असतो असें नव्हे! खुशामत करणारानें स्तुति सुरू केली ह्मणजे आह्मांला आनंद वाटतो, आणि आह्मी फुगून जातों, याचें कारण, ती स्तुति खरी असते हें नसून, तें आमच्या आत्म्यांत आहे. आमच्या पाठीमागें उच्चांत उच्च, थोरांत थोर अशी एक प्रबल आणि अविनाशी शक्ति—आत्मतत्त्व आहे, आणि सर्व स्तुति किंवा खुशामत ही त्याला शोभते, व आह्मीं कितीहि स्तुति केली, तरी ती कमीच पडते.

यावरून 'राम' खुशामतीचें समर्थन करीत आहे, असें कोणीं अनुमान काढूं नये. 'रामा'ला 'स्तुति' बिलकूल पसंत नाहीं. 'राम' सांगतो, कीं, स्तुति परमेश्वराची—आत्म्याचीच करावी. नराची—देहाची कधींहि करूं नये. 'सीझरच्या वस्तु सीझरला द्याव्या आणि परमेश्वराच्या वस्तु परमेश्वराला द्याव्या.' परमेश्वराची वस्तु (स्तुति) सीझरला (मानवाला—देहाला) दिली, ह्मणजे 'घोड्याच्या पुढें गाडी' यासारखा उलटा प्रकार होऊन आह्मांला पाप लागतें. आत्मज्ञान मिळवा आणि मुक्त व्हा, ह्मणजे तुह्मी सर्वांत थोर व श्रेष्ठ होतां. जर असें न करितां आत्म्याची थोरवी व मोठेपणा देहाकरितां मिळवूं पहाल, तर मात्र तुमची मोठी चूक होईल.

एकदां एक गृहस्थ 'रामा'पाशीं आला आणि ह्मणूं लागला "आमच्या धर्माचे भक्त व अनुयायी अधिक असल्यामुळें आमचा धर्म सर्वांत उच्च व श्रेष्ठ आहे." 'रामा'नें उत्तर दिलें "हे बन्धो, तूं योग्य विचार करून नंतर तुझें ह्मणणें सांग. तुझा सैतानावर विश्वास आहे काय?" 'होय' असें तो ह्मणाला. "तर मग, तुझ्या धर्माचे भक्त अधिक आहेत किंवा सैतानाच्या धर्माचे भक्त अधिक आहेत हें सांग पाहूं? बहुमतानेंच सत्याचा निर्णय करावयाचा असेल, तर बहुतेक सर्वांवर सैतानाची सत्ता आहे."

गर्व किंवा अभिमान याला सैतानाचें एक मुख किंवा अंग ह्मणतां येईल. आणि गर्वानें तर या जगांत बहुतेकांनां पछाडलेलें आहे. देहाला अभिमान बाळगण्याचें, श्रेष्ठपणा मिरविण्याचें कांहीं कारण नाहीं; असें असूनहि प्रत्येकजण अभिमान कां बाळगतो? आणि हा अभिमान सर्वत्र कां आढळून येतो? याचें कारण आम्हीं आमच्यांतच शोधिलें पाहिजे. थोरांत थोर, श्रेष्ठांत श्रेष्ठ अशी एक वस्तु आमच्यामध्यें आहे. आणि ती ह्मणजे आमचा आत्मा होय. या आत्म्याला तुह्मीं एकदां जाणलेंत, एकदां कां तुह्मांला आत्मज्ञान झालें, कीं, या देहाविषयीं स्तुति ऐकणें ह्मणजे कमीपणा आहे, आपला अपमान करून घेण्यासारखें आहे, असें तुह्मांला वाटूं लागेल.

तुमचा आत्मा हा देवांचा देव, सर्वांत श्रेष्ठ असा असल्यामुळें त्याला आपला उच्चपणा केव्हांहि सोडतां येणार नाहीं. आपण कृमिकीटकां-सारखे क्षुद्र आहों असें त्याला केव्हांहि वाटणार नाहीं. त्यानें इतकें खालीं कसें जावें? त्याला आपला स्वभाव सोडतां येत नाहीं, हेंच, अभिमान सर्वत्र आढळतो याचें कारण आहे. पण यावरून देहाविषयीं अभिमान बाळगण्याचें समर्थन होत नाहीं.

सूर्य स्थिर आहे आणि पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते, हें आम्हांला माहीत आहे. तरीपण सूर्य फिरतो आणि पृथ्वी स्थिर आहे, असें आम्ही समजतों. आत्मा सूर्याप्रमाणें सर्व वैभवांचा उगम, स्थिर, अचल

असा आहे. आणि देह हा पृथ्वीप्रमाणें नाशवंत, क्षणोक्षणीं बदलणारा असा आहे. आम्ही आत्मरवीचें वैभव देहावर लादतों आणि पृथ्वीचे गुणधर्म आत्मरवीवर आरोपित करितों; या चुकीमुळें—अज्ञानामुळें आम्हीं क्षुद्र देहाला मोठेपणा व मान देण्याचा प्रयत्न करितों. या अज्ञानाला सैतान असें नांव दिलें, तर सैतान सर्व घोंटाळा करून टाकितो, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. हें अज्ञान नाहींसें करा, या सैतानाला ठार करा, ह्मणजे गर्व किंवा अभिमान आपोआप नाहींसा होईल.

स्वार्थ किंवा लोभहि सर्वत्र आढळतो. जनावरांनां लोभ असतो, पुरुषांनां असतो, बायकांनां असतो. सर्व वस्तु आपल्या देहाभोंवतीं जमवाव्या असें प्रत्येकाला वाटतें. जसजशा अधिक वस्तु, अधिक संपत्ति मिळावी, तसतसा लोभ अग्नींत तेल ओतल्याप्रमाणें अधिक वाढतो. सहस्राधीश लक्षाधीश होऊं पाहतो, आणि लक्षाधीश कोट्यधीश होण्याचा प्रयत्न करितो. चर्चमध्यें, देवालयामध्यें आणि मशिदीमध्यें **'लोभमूलानि पापानि'** लोभ सोडा, असें उपदेशक, लोकांच्या कानींकपाळीं ओरडून सांगत असतात. आजपर्यंत साधुसंत हेंच सांगत आले. वेद, बायबल, कुराण इत्यादिकांतहि हेंच सांगितलें आहे. तरीपण लोभ कांहींकेल्या सुटत नाहीं. लोभ तुह्मांला नाहींसा करून टाकावयाचा असेल, तर लोभाचें कारण शोधून काढा. रोगाचें कारण समजल्याशिवाय तुह्मांला रोग बरा करतां येणार नाहीं. लोभ ही एक शक्ति आहे. आधुनिक शास्त्राप्रमाणें जड वस्तूंचा किंवा शक्तीचा नाश करितां येणार नाहीं. अनादिकालापासून सर्व धर्मांनीं लोभावर उभें शस्त्र धरिलें आहे, तरीपण लोक कांहीं सुधारलेले नाहींत. लोभशक्तीला मारून टाकण्याच्याऐवजीं तिचा योग्य उपयोग करून घ्या.

सर्वांत उत्तम शब्द God ( देव ) घ्या. या शब्दाचीं अक्षरें जर तुह्मी उलट वाचूं लागलां, तर हा शब्द 'Dog' ( कुत्रा ) असा होतो. त्याप्रमाणें तुह्मीं तुमच्यामधील देव—आत्मा याला योग्य रीतीनें जाणत नाहीं, त्यामुळें जे तुह्मीं देव होतां ते कुत्रा बनून जात आहां.

या चुकीमुळें—अज्ञानामुळें ह्मणजे आत्म्याचे गुणधर्म देहावर व देहाचे आत्म्यावर आरोपित केल्यामुळें तुह्मी लोभाला बळी पडतां; हें अज्ञान नाहींसें करा, आत्मज्ञान मिळवा, आपण सर्वांत पवित्र असून विश्वाचे स्वामी आहोंत असा अनुभव घ्या, ह्मणजे बाह्य वस्तूंच्या मागें लागणें आणि त्या आपल्या देहाभोंवतीं जमविणें ( लोभ )हें अशक्य होईल.

आतां आह्मी आसक्ति किंवा शोक याकडे वळूं. आपल्याभोंवताlची परिस्थिति बदलूं नये, असें आसक्त मनुष्य ह्मणतो. आपला प्रिय आप्त मरण पावला, ह्मणजे त्याला फार दुःख होतें. पण त्यानें नीट विचार करून पहावें. आहे तशी परिस्थिति नेहमीं राहील काय ? आमचे आप्तेष्ट सदैव आमच्यापाशीं राहतील काय ? या जगांतील प्रत्येक वस्तु क्षणभंगुर नाहीं काय ? हा सर्व प्रकार तुह्मांला माहीत असून आपल्याभोंवतीं कांहीं फेरफार होऊं नये असें तुह्मीं इच्छितां, हें कसें ! वेदान्त सांगतो, कीं, तुह्मांमध्यें कधींहि न बदलणारें, सनातन, अविनाशि असें आत्मतत्त्व आहे. अज्ञानानें आत्म्याचे गुणधर्म देहावर लादूं नका. अज्ञान नाहींसें करा ह्मणजे आसक्तीपासून तुह्मी दूर राहाल.

सुस्ती किंवा आळस याचें कारण काय ? आमच्यामधील आत्मतत्त्व एकच आहे, अनंत आहे, शांत आहे. आत्मा अनंत, **‘एकमेवाद्वितीय’** असल्यामुळें त्याला गति, चलनवलन असणें संभवनीय नाहीं. पण अज्ञानामुळें आत्म्याचा हा गुण ( पूर्ण शांति ) शरीरावर लादण्यांत येतो, आणि त्यामुळें शरीर सुस्त व आळशी होतें. अज्ञान नाहींसें करा, ह्मणजे सर्वत्र आढळून येणाऱ्या आळसाचा आपोआप नाश होईल.

आपण विश्वाचा स्वामी व्हावें व आपणांला कोणीहि प्रतिस्पर्धी असूं नये, असें सर्वांनां वाटतें; याचें कारण काय ? तुमच्यामधील आत्मा **‘एकमेवाद्वितीय’** असा आहे. त्याचा हा गुण शरीरावर लादण्यांत येतो, आणि त्यामुळें आपणांला कोणी प्रतिस्पर्धी असूं नये असें आह्मांला वाटतें.

वरील विवेचन इतर सर्व पापांनांहि लागू आहे. मोठमोठ्या पापांचें विवरण वर केलें आहे. इतर पापांचें विवरण करण्याची जरूरी नाहीं. या सर्व पापांपासून मुक्त होण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे आत्मा व देह यांचा घोंटाळा करून सोडणारें अज्ञान नाहींसें करणें हाच होय.

एकाला नेत्राचा व पोटशूलाचा असे दोन विकार जडले होते. त्यानें वैद्यापाशीं जाऊन औषध मागितलें. वैद्यानें दोन पुड्या दिल्या. त्यांपैकीं डोळ्यांत घालण्याच्या पुडींत सुरमा ( यांत Lead sulphide & antimony—नामक विषारी द्रव्यें असतात, ह्मणून हें पोटांत घेतां कामा नये. ) असून पोटांत घेण्याच्या पुडींत मिरीं, मसालादि जालीम पदार्थ होते. त्या मनुष्यानें चुकीनें डोळ्यांत घालण्याची पुडी पोटांत घेतली, आणि पोटांत घेण्याचें औषध डोळ्यांत घातलें ! या घोंटाळ्याचा परिणाम असा झाला, कीं, त्याचे डोळे बिघडावयाचे बिघडून त्याचें पोटहि नादुरुस्त झालें.

हाच प्रकार सर्व जगभर चाललेला आहे, आणि जगांतील सर्व पापांचें कारण हेंच आहे. प्रकाशांचा प्रकाश, आत्मा तुह्मांमध्यें आहे, तसेंच तुह्मांला पोट किंवा देह आहे. देहाला जें कांहीं करावयाचें तें आत्म्याला करण्यांत येत आहे, आणि आत्म्याचा मान किंवा गौरव देहाला दिला जात आहे. असा हा गोंधळ झाल्यामुळें जगांतील सर्व पापें अस्तित्वांत आलीं आहेत. वस्तु योग्य ठिकाणीं ठेवा, त्यांचा योग्य उपयोग करा, ह्मणजे तुमची भौतिक व आध्यात्मिक उन्नति होईल. वस्तूंचा दुरुपयोग केला, तर देवाला—आत्म्याला खालीं ओढल्यासारखें होतें आणि देहालाच सारा मान मिळतो, व स्वर्गाचा नरक होऊन जातो. त्याचा सदुपयोग केला ह्मणजे तुमचीं मोठमोठीं पापेंहि तुमचें ईश्वरत्व—तमचें पावित्र्य प्रगट करितात. सम्यक् दृष्टि मिळवा, ह्मणजे तुह्मी देवाप्रमाणें श्रेष्ठ व समर्थ होतां.

कोणी एका नास्तिक वकिलानें आपल्या घराच्या भिंतीवर "God is nowhere" (ईश्वर कोठेंहि नाहीं) असें लिहून ठेविलें होतें.

त्याच्या घरीं एकदां एक पक्षकार येऊन आपल्या कज्ज्यासाठीं त्याला दीड हजार रुपये देऊं लागला. पण वकिलानें तीन हजार रुपये मागितले. पक्षकार ह्मणाला "बरें, कांहीं हरकत नाहीं, तुह्मी केस (खटला) जिंकाल, तर मी तीन हजार रुपये देतों. पण ही रक्कम मागाहून देईन. आधीं फी घेत असाल, तर दीड हजार रुपये मी आतांच मोजतों." या कज्ज्यांत आपणाला यश येणार अशी त्या वकिलाला खात्री वाटल्यामुळें त्यानें तीन हजार रुपये मागाहून घेण्याचें कबूल केलें. पुढें ठरलेल्या दिवशीं कज्ज्याचे कागदपत्र नीट वाचून तो कोर्टांत गेला. तेथें विरुद्ध बाजूच्या वकिलानें असे कांहीं बळकट मुद्दे काढिले, कीं, त्याला त्यांवर कांहीं तोड काढितां येईना. शेवटीं तो हरला व त्याचे तीन हजार रुपये बुडाले. उदास आणि निराश होऊन तो घरीं परत आला आणि आपल्या मेजावर डोकें ठेवून विचार करीत बसला. इतक्यांत त्याचा एक आवडता मुलगा तेथें आला. तो वाचण्यास नुकताच शिकत होता. त्यानें त्यावेळीं भिंतीवर लिहिलेलें वाक्य वाचण्याचा यत्न केला आणि पहिले दोन शब्द 'God is' (ईश्वर आहे) हे त्यानें बरोबर वाचले. पुढचा शब्द (nowhere) बराच लांब असल्यामुळें त्याला तो वाचतां येईल. त्यानें त्याचे दोन भाग now-here (आतां येथें) असे पाडले. झालें! त्या मुलाला आनंद झाला, आनंदानें त्यानें उड्या मारिल्या. आपणांला उत्तम वाचतां येतें हें पाहून त्याचें त्याला आश्चर्य वाटलें. God is nowhere' (ईश्वर कोठेंहि नाहीं) हें वाक्य त्यानें 'God is now here' (ईश्वर आतां येथें आहे) असें वाचून टाकिलें!

या मुलाप्रमाणें बरोबर वाचण्यास शिका, असें वेदान्त तुह्मांला सांगतो. 'God is nowhere' (ईश्वर कोठेंहि नाहीं) हें वाक्य 'God is now here' (ईश्वर आतां येथें आहे) असें वाचा. ह्मणजे 'पापाच्या देखाव्यांत-पापांत ईश्वरीतत्त्व-आत्मतत्त्व पहा. या आत्मतत्त्वाचा साक्षात्कार घ्या, ह्मणजे हें जग नंदनवन बनून जाईल.

तुमच्यामधील आत्मतत्त्वाचा अनुभव घ्या. ख्रिस्ताप्रमाणें पिता व पुत्र एकच आहेत असा साक्षात्कार घ्या. प्रथमारंभीं शब्द (प्रणव) होता, आणि तो ईश्वरापाशीं होता. त्या प्रणवाचा साक्षात्कार घ्या. स्वर्ग, नंदनवन सर्व कांहीं तुमच्यामध्यें आहे. त्याचा अनुभव घ्या, ह्मणजे घाणेरडें पाणी चकाकणारें अमृत होईल, आणि तुरुंग स्वर्गासारखा वाटूं लागेल! तुम्हांला कोणताहि त्रास किंवा दुःख होणार नाहीं. तुह्मीं सर्वांचे स्वामी व्हाल.

## HAPPINESS WITHEN.

## सुखाचें निवासस्थान.

युरोपियन किंवा खिस्ती राष्ट्रें, परराष्ट्रें जिंकण्याकरितां सैन्येंचीं सैन्यें घेऊन स्वारी करितात. याबद्दल 'राम' त्यांनां मुळींच दोष देत नाहीं. कारण, राष्ट्राच्या प्रगतींत कांहीं काळ याचीहि आवश्यकता असते. प्रगतीची ही एक पायरी होय. हिंदुस्तानाला देखील ही पायरी ओलांडावी लागली आहे. भारतवर्ष अति प्राचीन राष्ट्र आहे. त्यानें संपत्तींतील तथ्य पाहिलें आहे, आणि संपत्तीचा फोलपणा त्याच्या नजरेला आला आहे. आज जीं राष्ट्रें वैभव आणि ऐश्वर्य यांच्या अनिवार लालसेनें धडपडत आहेत, त्यांनांहि हाच अनुभव येईल. कारण असें पहा, सर्व राष्ट्रें युद्धाच्या जय्यत तयारींत कां आहेत ? परराष्ट्रांवर स्वाऱ्या करून त्यांनां काय मिळवावयाचें असतें ? अर्थात्, सुख, आनंद आणि समाधान. कांहीं लोक ह्मणतात, कीं, आह्मांला सुख नको, ज्ञान हवें आहे. दुसरे कांहीं ह्मणतात, कीं, आह्मांला सुख नको, फक्त कर्म पाहिजे. गोष्ट खरी असेल. परंतु साधारण मनुष्यांचीं मनें ताडून पहा, ह्मणजे प्रत्यक्ष, जाणून बुजून किंवा नकळत सुखाच्या मागें ते लागले आहेत, असें अनुभवाला येईल.

आतां सुख असतें कोठें, हें पाहूं. तें काय राजवाड्यांत असतें, का झोंपडींत असतें, का युवतीच्या लावण्यांत तें असतें, किंवा पैशानें तें मिळतें? सुखाचें निवासस्थान कोणतें? सुखाविषयींचा देखील इतिहास आहे. आजकाल वाफ आणि विद्युत् यांनीं दिक्कालांची मर्यादा मोडून टाकिली आहे, आणि प्रवासाचीं साधनें सुलभ केलीं आहेत. अनेक लोक आतां बराच प्रवास करूं लागले आहेत. आणि प्रवासवर्णनांचीं पुस्तकेंहि आतां विपुल झालीं आहेत. इतरांबरोबर सुख देखील प्रवास करूं लागलें आहे! तेव्हां आपण सुखाचा थोडा प्रवासवृत्तांत पाहूंया.

लहानपणीं प्रथम मातेचें दूध पीत असतां आपल्याला जें सुख होतें, तेथून आपण सुरुवात करूं. लहान मुलाला सुखाचें निधान ह्मणजे आपल्याला दूध देणारें मातेचें वक्षःस्थल होय. सुखाच्या प्रवासांतील हें पहिलें स्टेशन ह्मणतां येईल. आईच्या पदराखालीं लपलें ह्मणजे मुलाला कितीतरी आनंद होतो! या सुखाखेरीज इतर पदार्थ, ह्मणजे पुस्तकें, संपत्ति, पक्वान्नें देखील त्याला अगदीं तुच्छ वाटतात.

दुसरें वर्ष लोटतें न लोटतें, तोंच सुख तेथून कुच करून दुसरा मुक्काम गांठतें. आतां त्याला गाडा, बाहुली वगैरे खेळणीं यांतच सुख वाटूं लागतें. या स्थितींत मुलाला आईपेक्षां खेळणींच अधिक आवडतात. कधींकधीं आपल्या बाहुलीसाठीं मूल आपल्या प्रेमळ आईशीं-सुद्धां भांडतें.

कांहीं काळ गेल्यानंतर हींच खेळणीं त्याला नकोशीं होतात. सुखानें आणखी एक मजल मारिलेली असते. आणि आतां त्या मुलाला पुस्तकें आवडूं लागतात. चटकदार गोष्टींच्या पुस्तकांखेरीज त्याला दुसरें कांहीं दिसत नाहीं. पण सुख येथेंहि थांबत नाहीं. तें आपलें पुढें जातें. आतां आमचा मुलगा कॉलेजांत जातो आणि तेथें त्याला शास्त्र आणि तत्त्वज्ञान या विषयांवरील ग्रंथच सुखावह वाटतात. हीं पुस्तकें कांहीं दिवस वाचतो न वाचतो तोंच विश्वविद्यालयांतील मान आणि पदव्या यांची त्याला हांव सुटते, व या मानांतच सुख आहे असें तो समजतो. मोठ्या मानानें सर्व परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर एकादी मोठीशी नोकरी तो पटकावतो, आणि आतां त्याचें सुख ह्मणजे पैसा, संपत्ति हेंच होतें. आतां खूप पैसा सांठवून त्याला श्रीमंत व्हावयाचें असतें. बराचसा पैसा गांठीं पडल्यानंतर त्याचें मन कोठें जातें हें सांगावयाला नकोच. आतां या तरुणाला एकटेंच राहूं नये असें वाटतें. संसारांत त्याला एक सोबतीण हवी असते. तिच्याकरितां इतक्या कष्टानें मिळविलेला पैसा पाण्यासारखा खर्च करण्यास आतां तो तयार असतो. आईच्या दुधाचें सुख गेलें, खेळण्याचा वीट

आला, गोष्टींचीं पुस्तकें धूळ खात पडलीं. कौटुंबिक सुखाचें स्वारस्य समजून घेण्याकरितां कादंबऱ्यांचें वाचन मात्र मधुनमधून चालू असतें. आतां सुखाचें स्थान बनलेल्या रमणीच्या क्षुल्लक हौसेकरितां देखील तो निढळाच्या घामानें मिळविलेल्या पैशाचा चक्काचूर उडवितो. याप्रमाणें कांहीं दिवस जातात न जातात, तों सुख अजून थोडें दूर आहे असें त्याला भासतें. आणि आतां त्या पतिपत्नींचा जीव पुत्रप्राप्तीसाठीं कासावीस होतो. आतां आपल्या घराला शोभविणारें पुत्ररत्न लाभावें, ह्मणून तें जोडपें मंत्रतंत्र, नवस—व्रतें इत्यादिकांच्या मागें लागतें. इतकी खटपट करून त्याला एकदांचा मुलगा झाला, ह्मणजे सुखाचें नवीन स्टेशन गांठलें जातें. त्याला आतां स्वर्ग दोनच बोटें राहिला आहे असें वाटतें. पुत्रमुख पाहतांच त्याच्या सुखाची परमावधि होते. पुढें मुलगा जसा वाढत जातो, तसतसें बापाचें हें सुख कमी कमी होत जातें.

मातेचें दूध, खेळणीं, पुस्तकें, पैसा, बायको, मूल, इत्यादि वस्तूंमध्यें सुख खरोखर असतें काय? याचा आपण विचार करूं. सुख हें सूर्यप्रकाशाप्रमाणें आहे. सूर्यप्रकाश देखील सुखाप्रमाणेंच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं प्रवास करितो. हिंदुस्तानांतून यूरोप, तेथून अमेरिका, आणि तेथून जपान असा तो फिरत असतो. सूर्य मावळत असतांना त्याचे किरण एका ठिकाणांहून दुसऱ्या ठिकाणाकडे धांव घेतांना आपण प्रत्यक्ष पाहतों. सूर्यप्रकाश एका जागेहून दुसऱ्या जागीं जातो, तरी यापैकीं कोणचीहि जागा त्याचें खरें निवासस्थान नसतें. अर्थात् सूर्यप्रकाशाचें निवासस्थान ह्मणजे सूर्य होय. सूर्यप्रकाशाप्रमाणें एका जागेहून दुसऱ्या जागीं प्रवास करणाऱ्या सुखाचें निवासस्थान कोठें असतें? या सुखाचा उगम कोठें असतो? हें आपण पाहूं. सुखाच्या सूर्याला आपण शोधूं.

आतां उदाहरणार्थ एक कुटुंबवत्सल गृहस्थ घेऊं. समजा, आपल्या कचेरींत काम करीत असतां त्याला एकदम बातमी लागली, कीं, आपल्या घराला आग लागली आहे. त्याक्षणीं हातांतलें काम तेथच्या तेथेंच

टाकून तो एकदम थेट घराकडे जावयाला निघतो. वाटेंत कोण कोण भेटले याची त्याला शुद्धिहि असत नाहीं. त्याचें सर्व लक्ष्य घराकडे लागलेलें असतें. घराकडे जाऊन पाहतो, तों घर भडकलें असून ज्वाळांचे लोळचे लोळ येत आहेत, आणि घरची सर्व मंडळी रस्त्यावर उभी असून आकांत करीत आहेत, असें त्याला दिसून येतें. पुढें क्षणार्धांत तो सर्वांचे चेहरे पाहूं लागतो. पण आपलें प्रिय बालक त्याला कोठें दिसेनासें होतें. चौकशी करितां त्याला कळतें, कीं, घरांतून बाहेर निघण्याच्या गडबडींत बालक विसरलें जाऊन आंतच राहिलें आहे. मग त्यावेळचा आकांत काय विचारावा? घरची सर्व मंडळी आणि यजमान दिसेल त्याला "आमच्या बाळाला कसेंहि करून वांचवा, त्याला आगींतून बाहेर काढा. आह्मी तुह्मांला लागाल तेवढे पैसे देऊं. आमची सर्व संपत्तिहि देऊं!" असें मोठमोठ्यानें ओरडून विनवूं लागतात. आपल्या मुलाकरितां ते सर्वस्वाचाहि त्याग करण्यास तयार होतात. अर्थात् मूल हें सुखाचें निधान ठरत नाहीं काय? थांबा, मुलाकरितां सर्वस्वाचा त्याग करण्यास ते तयार होतात, पण आगींत उड्या घालून आपला जीव धोक्यांत घालण्यास त्यांच्यापैकीं कोण तयार होतो? अर्थात्, कोणी नाहीं. तेव्हां मुलाहून अधिक प्यार असा दुसरा कांहीं पदार्थ असला पाहिजे, आणि तो पदार्थ आपल्या सर्व सुखाचें केंद्र असला पाहिजे. हा पदार्थ ह्मटला ह्मणजे आपला आत्मा होय.

शेवटीं आपणांला असें दिसून येतें, कीं, सुखाची परमावधि जें मूल त्यामध्यें कांहीं सुख नाहीं. तें मूल सुखाचें स्थान झालें, याचें कारण आपल्या आत्म्याचा प्रकाश त्या मुलावर पडून तें प्रिय झालें. हा प्रकाश त्या मुलामध्यें नसून तो स्वतःच्या आत्म्यामधून निघतो. जर तो मुलांत असता, तर मूल सर्वकाळ प्रिय वाटलें असतें. सर्व सुखें आत्म्यामधूनच उद्भवतात.

आतां आपण सुखाच्या उगमाकडे येत चाललों.

"न वा अरे पुत्राणां कामाय पुत्राः प्रिया भवन्ति।आत्मनस्तु कामाय पुत्राः प्रिया भवन्ति । न वा अरे जायायै कामाय जाया प्रिया भवति । आत्मनस्तु कामाय जाया प्रिया भवति । न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवति । आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति" ।

हेंच काय तें सत्य. एकाद्या पदार्थावर आपलें प्रेम आहे तें स्वतःकरितां नसून त्या पदार्थाकरितांच आहे, असें कित्येक लोक समजतात. पण हें शक्य नाहीं.

"न वा अरे वित्तस्य कामाय वित्तं प्रियं भवति ।

आत्मनस्तु कामाय वित्तं प्रियं भवति ।"

नवराबायको हीं परस्परांचें हित पाहीनाशीं झालीं, ह्मणजे तीं एकमेकांनां सोडून निराळीं राहतात. वित्त उपयोगीं पडेनासें झालें, ह्मणजे तें सुद्धां टाकून दिलें जातें. रोमचा बादशहा नेरो याची गोष्ट अशीच आहे. एक प्रचंड वणवा पाहण्याची आपली हौस भागविण्याकरितां त्यानें आपल्या राजधानीला ह्मणजे जगत्प्रख्यात रोम शहराला आग लावून दिली, आणि स्वतः मोठ्या आनंदानें एका टेंकडीवर सारंगी वाजवीत मौज पहात बसला. पूर आला असतांना स्वतःचा जीव वांचविण्याकरितां स्वतःच्या पोराला पायांखालीं घालणाऱ्या माकडीची गोष्ट सर्वांनां माहीत आहेच. आपलें हित बुडतें असें पाहतांच आपण सर्व कांहीं गोष्टींचा त्याग करितों.

तेव्हां एवढें सिद्ध झालें, कीं, सुखाचें स्थान किंवा उगम आपल्यामध्येंच कोठें तरी आहे. पण आपल्यामध्येंच ह्मणजे कोठें ? पायांत, का हातांत, का नाकांत, कीं डोळ्यांत ? यांत तर कोठेंच नाहीं; कारण, यांच्याहून अधिक प्रिय दुसरें कांहीं आहे. तर मग मनांत किंवा बुद्धींत आहे असें ह्मणावें, तर त्यांतहि नाहीं; कारण आपण पाहतों, कीं, मरणापेक्षां बुद्धिविहीन दुर्दैवी जीवित देखील मनुष्याला प्रिय वाटतें. वेड्याला सुद्धां जगावेंसेंच वाटतें. तर मग सुखाचें स्थान ह्मणजे प्राण. पण येथें देखील वेदान्त सांगतो, कीं, नाहीं—हें देखील सुखाचें स्थान

नव्हे. खरें सुख—स्वानंदसाम्राज्य आपल्या प्राणाहूनहि उच्च वस्तूंत आहे. तर मग तें कोठें आहे?

आपण असें पाहतों, कीं, अंतकालच्या प्राणांतिक वेदना होत असतांना 'देवा, हे देवा, मला जीव नकोसा झाला आहे. माझे प्राण केव्हां निघून जातील?' असें लोक ह्मणत असतात. एकादा मनुष्य मेला असतां पाश्चात्य लोक, त्यानें आपला आत्मा टाकून दिला ( He gave up his ghost ) असें ह्मणतात. आह्मी, त्यानें आपला देह ठेविला, असें ह्मणतों. एवढ्यांतच फरक दिसून येतो. त्यांनां वाटतें, कीं, देह ह्मणजेच आपण, आणि आत्मा हा त्यामध्यें येऊन राहिलेला निराळा पदार्थ. आह्मांला देह ह्मणजे आपल्याहून कांहीं भिन्न पदार्थ आहे, आणि आत्माच काय तो सत्य आहे, असें वाटतें. आह्मांला देह पतन पावला असतां आत्मा मृत झाला असें वाटत नाहीं. देह बदलतो; पण आत्मा मरत नाहीं.

तेव्हां प्राणाहून श्रेष्ठ असें कांहीं आपणांला सांपडलें; माझा जीव, माझा प्राण, असें आपण बोलतांना ह्मणतों. अर्थात्, प्राण किंवा जीव यांवर स्वामित्व चालविणारा आणि प्राणाहून प्रिय असा "मी" ह्मणून कोणी आहे. या 'मी' करितां आपण प्राण देखील टाकावयाला तयार होतों. अर्थात्, हेंच आनंदाचें माहेरघर असलें पाहिजे. बुद्धीपेक्षां प्राण अधिक प्रिय असतो, याचें कारण प्राण बुद्धीपेक्षां आत्म्याच्या अधिक जवळ आहे. डोळ्यासारख्या इंद्रियांहून बुद्धि अधिक प्रिय असते. याचें कारण बुद्धि इंद्रियांच्या मानानें आत्म्याच्या अधिक जवळ आहे. एकाद्या मनुष्याला आपलें मूल किंवा आपण लिहिलेलें पुस्तक सर्वांत श्रेष्ठ आणि सुंदर वाटतें; कारण त्यानें ते ते पदार्थ आपल्या आत्म्याचा मुलामा चढवून सुंदर केलेले असतात; ह्मणून वेदान्त ह्मणतो, कीं, सुखाची राजधानी आपल्यांतच असते. स्वर्गदेखील स्वतःमध्येंच असतो. अशी वस्तुस्थिति असतां, सुख बाहेर शोधणें हें किती वेडेपणाचें आहे?

## सुखाचें निवासस्थान.

एकदां एक लहान मूल रांगत असतां त्यानें आपली सावली पाहिली. त्याला आश्चर्य वाटून त्या सावलीचें डोकें धरावयाला तें पुढें पुढें रांगूं लागलें, तों सावलीहि पुढें पुढें जाऊं लागली. शेवटीं, त्याच्या आईनें त्याला स्वतःचें डोकें धर असें सांगितलें. त्यानें तसें करितांच त्या सावलीचें मस्तक आपोआपच पकडलें गेलें. तत्त्व हेंच आहे. स्वतःचें डोकें पकडा, ह्मणजे सावली तुमच्या हातीं येईल. स्वर्ग आणि नरक हे दोन्ही तुमच्यामध्येंच आहेत. तसेंच तुमच्या कुलदेवता, स्थानदेवता आणि राष्ट्रदेवता या तुमच्यामध्येंच आहेत. सर्व संसारी लोकांनीं हीच गोष्ट समजून घेतली पाहिजे. सर्व जगभर याच तत्त्वाचा प्रसार झाला पाहिजे. तथ्य हवें असेल तर छायेचा नाद सोडून द्या. स्वतःमध्येंच शिरा, अंतर्मुख व्हा. तेवढें साधलें, तर तुह्मांला सहज कळून येईल, कीं, बाह्य जगांतील सर्व प्रिय वस्तु वस्तुतः तुमच्याच छाया आहेत. मग घर मोडून मंडप कां बांधतां, विळा मोडून खिळा कां करितां?

एका बाईची सुई घरांत हरवली. घरांत तर दिवा नव्हता, तेव्हां रस्त्यावर कंदील आहे ह्मणून ती रस्त्यावरच आपली सुई शोधूं लागली! सुई कोठें तरी शोधिली पाहिजे खरी, आणि घरांत तर नाहीं दिवा; मग चला रस्त्यावर! काय मूर्खपणा हा! पण सर्व लोक असेच वागतात. खरें सुख स्वतःमध्येंच आहे. पण तेथें तें मिळवितां येत नाहीं, ह्मणून सर्व लोक बाह्य वस्तूंमध्यें तें शोधूं लागतात. विलक्षण खरेंच!

एका वेडगळानें मुलांनां फसविण्याकरितां 'गांवच्या नगरशेटानें सर्व लोकांनां मेजवानी द्यावयाचें ठरविलें आहे,' अशी कंडी पिकविली; आणि नंतर, खरोखरच मेजवानी असेल, तिला आपण मुकूं, ह्मणून स्वारी स्वतःहि मुलांबरोबर तेथें हजर! लोकदेखील असेंच वागतात. आपणच आपल्या भावनेनें एकाद्या वस्तूमध्यें सौंदर्य आणि सुख निर्माण करितात, आणि मग तें सुख आपणांला मिळावें, ह्मणून वेड्यासारखें त्या पदार्थांच्या मागें धांवतात.

**सिद्धान्त**—अंतरींचें स्वानंदसाम्राज्य अनुभवा, ह्मणजे सर्व वासना तृप्त होतील, आणि सर्व दुःखशोक कायमचे नाहींसे होतील.

संसारचक्र मी, हें वन, उपवन, वृक्ष, वल्लि, पाषाण,
मन्मांस मृत्तिका, नगचारि शिवा मत्त्वचा असे जाण.

गोमाशीप्रति तीक्ष्ण, भ्रमरीशीं स्नेहसौख्यदायक मी;
सुंदर सुरभि कुसुमही मत्प्रेमाचा विकास तो नामी!

मन्मानसीं वृत्ति जशा उदेती,
सर्वत्र वाहे जल त्याच रीती;
भानुस्वरूपें नाभिं लोंबताहे—
जें तें जणूं मत्प्रिय पुष्प आहे!

विद्युल्लतांतर्गत मी प्रकाशी
स्पर्शे न मृत्यू मज आत्मयासी;
जन्मासि मी यें न कधीं खरा हो,
विवेक हा नित्य मनीं धरा हो.

अखंड चित्सौख्य समुद्रवीचि
निश्वास माझे जणुं तेहि मीचि;
श्वासेंचि माझ्या कुसुमें सुगंधि
होती, धरा नित्य अशीच बुद्धि.

अहाहा! स्वानंदसाम्राज्य तुमच्यामध्येंच आहे. विषयांमध्यें सुख शोधूं नका. तुमचें सुख तुमच्यामध्येंच आहे; याचा अनुभव घ्या, आणि समाधान पावा!

# THE INFINITE IN THE FINITE.

## सान्तामधील अनंत.

विषयाला प्रारंभ करण्यापूर्वीं श्रोतृजन कशा प्रकारचे असतात, हें पाहूं. बहुधा लोक स्वतःच्या डोळ्यांनीं पहात नाहींत, स्वतःच्या कानांनीं ऐकत नाहींत. दुसरे सांगतील त्यावर ते अंधपणानें विश्वास ठेवितात. एके दिवशीं ‘ राम ’ रस्त्यानें जात असतां ‘रामा’चा भगवा पोषाख विचित्र वाटून एकजण त्याला ह्मणाला, कीं, “तुमच्या पोषाखाचें मला हंसूं येतें. असला विचित्र पोषाख तुह्मीं कां वापरितां?” ‘रामा’नें उत्तर दिलें “ तुमच्या हंसण्याचें मला हंसूं येतें. पोषाखाचा रंग निराळा असला, तर तेवढ्यानें तुमचें काय बिघडतें? लोक ह्मणतात, ह्मणून तुह्मी माझ्या पोषाखाला नांवें ठेवूं नका. स्वतःच्या डोळ्यांनीं पहा. पोषाखाला कोणता तरी रंग हा असलाच पाहिजे. मग याच रंगानें काय पाप केलें आहे? ” अर्थात् तो निरुत्तर झाला. तेव्हां ‘रामा’ नें त्याला उपदेश केला. बाबारे, स्वतःवर थोडी दया कर, दुसऱ्याच्या मतांनीं भुळून जाऊं नको. स्वतःच्या डोळ्यांनीं पहा, स्वतःच विचार कर. वर्तमानपत्रें जें जें सांगतील, तें तें लोक प्रमाण मानितात; आणि वर्तमानपत्रकार बहुधा अर्धवट शिकलेल्या अपरिपक्व बातमीदारांच्या नेत्रांनीं पाहणार. एकाद्या शिष्टानें एकाद्याची स्तुति केली, कीं, लगेच तो प्रतिष्ठित बनून त्याचें स्तोम माजतें. खरोखर दास्य तें हेंच! खरें स्वातंत्र्य ह्मणजे सर्वदां आपलेच डोळे, कान, वापरणें हें होय. अशा स्वतंत्र वृत्तीनें जर पुढील विचार पहाल, तर तुमचें कोटकल्याण होईल.

पुष्कळ लोकांनां वक्तृत्वपूर्ण व एकदम गार करून सोडणारीं भाषणें हवीं असतात. पण अशी इच्छा करणें ह्मणजे लहान मुलाप्रमाणें मोहोर टाकून पेढा घेण्यासारखें आहे. कॉलेजामधील प्रोफेसर क्वचित्‌च

वक्तृत्वाचा आविर्भाव आणितात. ते शांतपणानें आपल्या मुद्याकडे लक्ष्य देऊन विषयांचें विवेचन करीत असतात. तरीपण, विद्यार्थी मोठ्या उत्सुकतेनें त्यांचा प्रत्येक शब्द काळजीपूर्वक ऐकतात. माझे विचार तुह्मीं अशा विद्यार्थ्यांप्रमाणें घ्यावे.

एवढी प्रस्तावना पुरे. "सान्तामध्यें अनंत" हा आजचा विषय आहे. विषय गहन आहे खरा, पण त्याचें आकलन केलें पाहिजे. कारण, ज्ञानानेंच मनुष्याला श्रेष्ठत्व येतें. ज्ञानाच्या अंगीं सर्व सत्ता आहे. सॉक्रेटिस ह्मणतो, कीं, 'ज्ञान ह्मणजे सद्गुण.' ज्ञानानेंच कर्माकडे प्रवृत्ति होते. परिणामीं ज्ञानाचाच विजय होत असतो.

आपण अगदीं सूक्ष्म वस्तूपासून सुरुवात करूं. उदाहरणार्थ, मोहरीसारखें एकादें बारीक बीज घ्या. आणि तें काय आहे, त्यापैकीं कशाला आपण बीज हें नांव देतों, याचा विचार करा. तशाच आकाराचें, रंगाचें आणि वजनाचें, फार तर काय, तशाच स्वादाचेंहि कृत्रिम बीज आपणांला तयार करितां येईल; पण, त्याला खरें बीज ह्मणतां येईल काय? अर्थात् नाहीं. तर मग बीजाचें बीजत्व कशांत असतें, हें आपण पाहूं. तें बीज जमिनींत पेरा. कांहीं कालानें तें नष्ट होऊन त्याचें झाडामध्यें रूपांतर होईल, आणि त्या झाडाला पहिल्यासारखींच कितीतरी बीजें येतील. तीं पेरा ह्मणजे त्यांच्यापासून पुनः लक्षावधि बीजें उत्पन्न होतील. अशा रीतीनें एका बीजापासून अनंत बीजें होतात, आणि तीं सर्व पहिल्या बीजाप्रमाणेंच असतात. त्यांच्यांतील बीजत्व तीळमात्र कमी अधिक झालेलें नसतें. तेव्हां आपणांला असें दिसून येतें, कीं, "बीज" या शब्दाचे दोन अर्थ आहेत. (१) व्यावहारिक अर्थ ह्मणजे बीजाचा आकार, रुचि रंग वगैरे (नामरूप); आणि (२) पारमार्थिक दृष्टया बीज ह्मणजे प्रत्येक बीजामध्यें गुप्त असलेली अनंत आणि अव्यक्त अशी शक्ति—बीजत्व. अर्थात् आपणांला सान्तांत अनंत सांपडलें. नामरूपात्मक बीज मरून जातें, नाहींसें होतें; पण

खरें बीज अनंत असल्यामुळें त्याचा नाश मुळींच व्हावयाचा नाहीं. बीजामधील शक्ति—आत्मा अविनाशी आहे.

आतां दुसरें उदाहरण घेऊं. प्राणिशास्त्राचें अध्ययन करणारांनां अणुजीवाची (Monads) माहिती आहे. हे जीव द्विधा होऊन वाढतात. एक जीव मोठा झाला ह्मणजे तो मध्येंच तुटतो व त्याचे पूर्वीसारखे दोन जीव होतात. त्यांची वाढ झाली ह्मणजे पुन: ते तुटून त्यांचे चार जीव होतात. याप्रमाणें एका अणुजीवाचे असंख्य अणुजीव निर्माण होतात. तरी पण त्यांची द्विधा होण्याची शक्ति जशीच्या तशीच असते. तिला अंत नाहीं. अर्थात् या अणुजीवांचें स्वरूप नष्ट झालें, तरी त्यांच्यांतील चिच्छक्ति आहे तशीच असते. ती नष्ट होत नाहीं. देहाचा नाश केल्यानें त्यांतील चैतन्य नाहींसें होत नाहीं. खरोखर तुह्मी ईश्वरस्वरूप आहांत, म्हणून तुम्ही अमर आहांत. मूळच्या एका अणुजीवामध्यें असंख्य अणुजीव पैदा करण्याची शक्ति गुप्त होती. सान्तामध्यें अनंत होतें. देह किती जरी वाढले, तरी त्यांतील अनंत चिच्छक्ति कमी अधिक होत नाहीं. जें अनंत आहे, तें अव्यय आणि अक्षर असलेंच पाहिजे. याच तत्त्वाची उपपत्ति एका उदाहरणानें सांगतां येईल. एका आरशांत एकच तोंड दिसतें; पण त्याच आरशाचे फोडून दहा तुकडे केले, तर एका तोंडाचीं दहा तोंडें बनतात. हीं प्रतिबिंबें वाढलीं, तरी ज्याप्रमाणें आपलें मूळचें तोंड (बिंब) वाढत नाहीं, तें आहे तसेंच असतें, त्याप्रमाणें सान्त वस्त कितीहि वाढल्या किंवा कमी झाल्या, तरी त्यांतील अनंत शक्ति आहे तशीच राहते. केवढें आश्चर्य! आणि केवढें अनंत सुख! देहाचा नाश झाला, तरी मी मरत नाहीं. माझा देह जाळा, पोळा, कापा, काय वाटेल तें करा; पण मी अच्छेद्य, अदाह्य असाच आहें. संसारिक जनहो! स्वत:मधील या अनंततत्त्वाचा अनुभव घ्या. आपण अनंत आहों ही जाणीव प्राप्त करून घ्या. ह्मणजे तुमचा मोह, शोक, भीति, दु:खस्थिति हीं सर्व पार नाहींशीं होतील!

अहाहा! केवढें आश्चर्य हें, कीं, एकच अनंतशक्ति या भिन्न भासणाऱ्या सर्व देहांमध्यें वास करीत आहे. अहाहा! श्रेष्ठ, कनिष्ठ, उच्च,

नीच, पावन, पतित या सर्वांमध्यें मीच आहें ! आनंद ! आनंद ! मी देह नसून अनंत शक्ति आहें ! याचा अनुभव घ्या ह्मणजे तुह्मी मुक्त झालां.

आयनेमहालामध्यें गेल्याबरोबर ज्याप्रमाणें आपण गांगरून जातों, आणि त्यामधील चित्रविचित्र आरशांमध्यें आपलीं अनेक तऱ्हेचीं सुरूप विद्रूप प्रतिबिंबें पाहून हे निरनिराळे चेहरे आहेत असें आपणांला वाटतें, त्याप्रमाणें या सृष्टीमध्यें प्रत्येक जीव या जगांत मूढ होऊन भेदाची कल्पना करीत असतो. अशा एका आयनेमहालांत एक कुत्रा गेला, व तेथें आपल्यासारखे असंख्य कुत्रे पाहून तो त्यांच्यावर भुंकूं लागला. अर्थात् सर्व बाजूंनीं असंख्य कुत्रे त्याच्यावर भुंकूं लागले. आणि तो कुत्रा गांगरून जाऊन भुंकूनभुंकून मरून गेला. या जगांतील आपली भीति आणि मत्सर हीं अगदीं अशींच आहेत ! प्रतिबिंबांकडे न पाहतां आपल्या बिंबाकडे पहा, त्याची एकदां ओळख करून घेतलीत ह्मणजे मग प्रतिस्पर्धी, शत्रुमित्र वगैरे सर्व प्रकारचीं प्रतिबिंबें पाहून तुह्मांला सुख होईल. कोणाचेंहि वैभव पाहून तुह्मांला धन्यता वाटेल; आणि पृथ्वीचा स्वर्ग बनेल!

आतां आपण मनुष्याकडे वळूं. एक बीज मरून त्याच्या जागीं शेंपन्नास बीजें उत्पन्न होतात, तरी पण बीजाचा खरा बीजपणा वाढतहि नाहीं, आणि कमीहि होत नाहीं. किंवा तसेंच, एक अणुजीव नष्ट होऊन त्याचे दोन आणि दोन्हींचे अनेक अणुजीव होतात, तरी पण त्यामधील जीवित्व आहे तसेंच कायम राहतें; किंवा आरसा फुटून त्याचे जितके तुकडे होतील तितकीं प्रतिबिंबें होऊनहि बिंब कायमच राहतें; तद्वत् मनुष्य मेला तरी त्याच्यांतील मनुष्यत्व–त्याचा आत्मा नाहींसा न होतां पुत्ररूपानें तरी राहतो. ( **आत्मा वै पुत्रनामासीत् –उपनिषद्** )

बायबलमध्यें सांगितल्याप्रमाणें मानवाचीं आदिपितरें एकच आहेत असें समजलें, तर आज त्यांचा वंशविस्तार केवढा झाला आहे पहा. वेदान्त सांगतो, कीं, ज्याप्रमाणें वरील सर्व उदाहरणांत एकच अनंत तत्त्व या अनेक सान्त पदार्थांत असतें, त्याचप्रमाणें एकच अनंत

ईश्वरी तत्त्व किंवा शक्ति निरनिराळ्या नामरूपांत प्रतिबिंबित झालेली असते. आत्मा वाढत नाहीं किंवा कमी होत नाहीं, तो सर्व शरीरांत सर्वकाळीं सारखाच असतो.

कोणा एका मनुष्याला, तूं कोण आहेस, असें विचारिलें असतां, तो, मी अमुक आहें, असें आपलें नांव सांगतो. त्याला विचारा, कीं, तूं मनुष्य आहेस किंवा नाहींस? तो उत्तर देईल, कीं, मनुष्य तर मी अर्थात् आहेंच! प्रत्येक मनुष्यांत हें सामान्य मनुष्यत्व असूनहि, प्रत्येकाची, आपण एक निराळीच व्यक्ति आहों, अशी भावना झालेली असते. व्यक्तित्व-रहित शुद्ध मनुष्यत्व आपणांला स्वतंत्र असें कोठेंच आढळत नाहीं. तरीपण, तें प्रत्येक मनुष्यांत असतेंच. तेवढें काढून टाका, ह्मणजे व्यक्तींत कांहींच उरत नाहीं. तें इंद्रियातीत आहे. त्याच्याच साहाय्यानें इंद्रियें आपापलीं कामें करितात. एवंच सान्तांतील अनंत, इंद्रियांनां किंवा मनाला देखील अगोचर आहे. तरी पण त्याच्याच साहाय्यानें इंद्रियें आपापला व्यापार करितात.

शेवटीं 'राम' आपणांला एकच मेहेरबानगी करावयाला सांगत आहे. ती तुह्मीं स्वतःवरच केली पाहिजे. सर्व शरीरें ह्मणजे जणूं काय असंख्य दंवाचे थेंब आहेत, आणि आपला आत्मा ह्मणजे या सर्व थेंबांमधून चकाकणारा स्वयंप्रकाश सूर्य आहे. सर्व देह ह्मणजे माळें-तील मणि आहेत, आणि आत्मा हा त्यांनां वेधून राहणारा दोरा आहे, हें तुह्मीं लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. क्षणभर निश्चित बसून, हा विश्वात्मा मी आहें, अशी भावना करा, ह्मणजे सर्व कांहीं मी आहें, सर्व मनुष्यें माझ्याच प्रतिमा आहेत, नाम, रूप, जाति, यांच्या पलीकडे मी आहें, असा तुह्मांला साक्षात्कार होईल, आणि अखिल विश्वाशीं तुमचें ऐक्य होईल.

**अव्यक्त परमानंदरूपी मी एकला असें,**
**व्यापून भूतमात्रासी, कांहीं मजविना नसे.**

चंद्रसूर्यांत नक्षत्रांमाजिंही मी प्रकाशतों,
ज्वाला मी अग्निची, सिंधु, लहरी तेंवि वायु तो.
ललना नरही मीच, युवा युवति कन्यका,
बाल वा वृद्ध तो चाले यष्टीच्या आश्रयें निका.
व्याघ्र, सिंह, पशू, पक्षी, तेंवि भ्रमर मत्स्य मी,
लता, वृक्ष, तृणादि मी, मेघ, विद्युत् पराक्रमी.
दिन, रात्री, ऋतु, मास, वर्ष मी युगही खरा,
सर्व मी, आदि सर्वांचा, अंतही मीच, तो बरा !

तुह्मीं अनंत आहांत; हें सर्व जग, सर्व देह नुसत्या कल्पना आहेत, नुसते आयनेमहाल आहेत. या सर्वांना व्यापून राहणारे तुह्मीच आहांत !

## THE SUN OF LIFE ON THE WALL OF MIND.

## मनःपटलावरील आत्मरवि.

बौद्धभिक्षु पीतवस्त्र कां परिधान करितात, आणि संन्यासी भगवें वस्त्र कां धारण करितात, असा प्रश्न मला वारंवार करण्यांत येतो. मी ह्मणतों, हा एक आचार आहे. प्रत्येक धर्माचीं तीन अंगें असतात. (१) तत्त्वज्ञान-(अध्यात्मज्ञान), (२) पुराण, व (३) आचार. ज्ञात्यांकरितां तत्त्वज्ञान, मनोवृत्त्यानुरूप वागणाऱ्या भाविकांकरितां पुराण, आणि मूढजनांकरितां आचार आहे.

पूर्ण स्वार्थत्यागाचें द्योतक, देहात्मभाव नष्ट झाल्याची खूण, ह्मणून ज्याप्रमाणें ख्रिस्ती लोक क्रूस धारण करितात, त्याप्रमाणें बौद्ध लोक प्रेतवर्ण पीतवस्त्र धारण करितात. आणि संन्यासीहि वैराग्यानें देह जाळून टाकिला आहे, आणि अग्नीप्रमाणें पावनशक्ति प्राप्त झाली आहे, याचें द्योतक ह्मणून अग्निज्वालेप्रमाणें भासणाऱ्या भगव्या रंगाचें वस्त्र धारण करितात. कोणच्याहि पंथामध्यें, मग तो रोमन क्याथोलिक असो अगर प्रॉटेस्टंट असो, आचार हा थोडाबहुत असावयाचाच. बायबलमध्यें तर असें सांगितलें आहे, कीं, तुह्मांला स्वतःचा क्रूस धारण केला पाहिजे. अर्थात् आपली ममता, लोभ, अहंकार या सर्वांचा त्याग केला पाहिजे. रोमन क्याथोलिक पंथांत एकाद्या मनुष्याला यतीची ( Monk ) दीक्षा द्यावयाची असली, ह्मणजे त्याचा सर्व प्रेतविधि करण्यांत येतो. अर्थात्, त्यानें सर्व ऐहिक सुखांला व वासनांला आपण मेलों, अशी भावना करावयाची असते. पीतवस्त्र धारण करण्यांत बौद्ध लोकांचाहि तोच उद्देश आहे. पिंवळ्या रंगापेक्षां भगव्या रंगांत कांहीं विशेष अर्थ आहे. भगवा रंग, देह जाळून टाकिला आहे, आत्मयज्ञ केला आहे, सर्व वासना दग्ध झाल्या आहेत, हें तर व्यक्त करितोच; पण याशिवाय आपणाला ठाऊक आहे, कीं, अग्नीमध्यें चैतन्य आहे, अग्नीनें प्राण धारणा होते, अग्नि

ही एक प्रचंड शक्ति आहे; अर्थात् भगव्या वस्त्रानें हे सर्व गुण सूचित होतात. संन्याशाचें जीवित हें एका दृष्टीनें मरण आणि दुसऱ्या दृष्टीनें दिव्य जीवन आहे. खिस्ती लोक पाण्यानें बाप्तिस्मा घेतात. आम्ही अग्नीनें बाप्तिस्मा ( दीक्षा ) घेतों.

संसारी लोक आपल्या भ्रामक कल्पनांनीं आपलें आयुष्य तुरुंग बनवितात. काल्पनिक भीतीचा प्रचंड पर्वत उरावर घेऊन दडपले जातात. घड्याळांतील लंबकाप्रमाणें हंसणें व रडणें (आनंद व दुःख) यांत हेलकावे खातात. वेदान्ताचें ह्मणणें असें आहे, कीं, ही सर्व भ्रामक कल्पना टाकून द्या, ज्ञानाग्नीनें ती सर्व जाळून टाका, आणि शुद्ध ज्ञानानें देदीप्यमान असे व्हा.

आतां आपण आपल्या विषयाकडे वळूं. नाशवंत देहांतील अविनाशि तत्त्व, हा आजचा विषय आहे.याला आपण सूर्याची उपमा देऊं. सूर्य हा आह्मां सर्व संन्याशांचा आद्यगुरु आहे. रोज पहांटेला भगवें वस्त्र परिधान करून तो आह्मांला दर्शन देतो. या सूर्याला आपण अविनाशी, अव्यय, सनातन असा आत्मा समजूं, आणि पंचमहाभूतें हीं स्थूल सूक्ष्मादि नाशवंत शरीरें समजूं.

या तीन शरीरांची आणि आत्म्याची स्पष्ट कल्पना येण्याकरितां आपण एक दृष्टांत घेऊं. कारण येथें वादविवाद करून आपला विषय सिद्ध करावयाचा नसून, विषय काय आहे हेंच आपल्यापुढें मांडावयाचें आहे. खरोखर पाहतां, वेदान्तांतील तत्त्वें, किंवा कोणतेंहि सत्य स्पष्टपणें मांडल्याबरोबरच तें पटतें. युक्ति लढवून तें सिद्ध करण्याची आवश्यकता नसते. नीट पहा, कीं, पटलेंच. कोणचीहि वस्तु पहावयाला प्रकाश पाहिजे असतो. पण प्रकाश पहावयाला दुसऱ्या कशाची जरूरी लागत नाहीं. आतां आपण क्षणभर हिमालयाच्या शिखरावर जाऊं. येथें सर्व कांहीं बर्फमय असतें. झाडझुडूप, जनावरें इत्यादि कांहीं नसतें. जणूं काय बर्फाचा चकाकित रमणीय समुद्र एकसारखा पसरलेला आहे! आणि या मोहक प्रदेशावर सर्व चैतन्याचा

उगम—सूर्यनारायण एकटाच प्रकाशत असतो. अहाहा! काय तें अप्रतिम सौंदर्य! मधुनमधून ते सूर्यकिरण ढगांमधून येऊन सर्व प्रदेशांवर तेजःपुंज भगवी छटा पसरवितात. हिमालयाच्या या बर्फमय प्रदेशांत, गंगा, ब्रह्मपुत्रा इत्यादि हिंदुस्तानांतील महानद्यांचे उगम आहेत. या बर्फामध्यें या नद्यांचा कारण देह आहे.

आतां बर्फाला वर सोडून थोडें खालीं उतरूं. सूर्याच्या उष्णतेनें बर्फ वितळून नद्यांचा बनलेला सूक्ष्म देह येथें आपणांला पहावयाला मिळतो. येथें मैलांचे मैल गुलाबासारखीं फुलें पसरलेलीं असतात, आणि त्यांच्या सुगंधानें सर्व प्रदेश दरवळून गेलेला असतो. सुंदर सुंदर पक्षी सर्व ऋतूंमध्यें श्रवणमनोहर कूजित करीत असतात, आणि या अशा सुंदर प्रदेशांतून वृक्षमूलांमधून वाऱ्यासारखें चंचल असें गंगेचें अगर दुसऱ्या एकाद्या प्रवाहाचें पाणी वळणांवळणांनीं झुळझुळ वहात असतें. पर्वताच्या कड्यांवरून उड्या मारण्याची आणि खांचखळगे भरून तेथें प्रशांत सरोवरें करण्याची कोण त्यांची त्वरा आणि उतावीळपणा! हें नदीचें सूक्ष्मरूप झालें; व तें सूर्याच्या प्रकाशानें आणि उष्णतेनें कारणदेहावर परिणाम घडून निर्माण झालें आहे.

आतां आपण पर्वत सोडून सपाट प्रदेशावर येऊं. येथें सर्व कांहीं निराळेंच भासतें. बर्फांतून निघालेला व पर्वतांतून काव्यमय क्रीडा करीत खालीं येणारा तोच प्रवाह आतां बदलून येथें विस्तीर्ण पण गढूळ झाला आहे. मूळची त्याची स्फटिकासारखी प्रसन्नता आतां उरली नाहीं. आतां त्याची गतिहि मंद झाली आहे. पण तो अधिक उपयुक्त झाला आहे. कारण, त्याच्या पृष्ठभागावरून होड्या, मचवे, पडाव, जहाजें हीं सगळीं येत जात आहेत, व मालाची नेआण करीत आहेत. या प्रवाहांत लोक स्नान करितात, आणि त्याचे पाट, कालवे काढून सभोंवतालचा प्रदेश सुपीक करून सोडतात.

नदीचें हें स्थूल शरीर होय. आतां चैतन्यरूपानें या नदीला मूळ गति कोणीं दिली? या नदीचा आत्मा कोण? तर अर्थात् तो तेजोराशी सविता.

आतां दृष्टांताप्रमाणें आपले तीन देह आणि त्यांचा आत्म्याशीं संबंध कसा आहे, हें पाहूं.

मनुष्य गाढ झोंपी गेला असतांना त्याला कांहींहि समजत नाहीं. हें सर्व जग त्याला नसल्यासारखेंच असतें. वेदान्तांत सांगितलें आहे, कीं, हा कारणदेह होय. गाढ झोंपेच्या वेळीं हा कारणदेह पर्वतावरील बर्फाप्रमाणें आत्म्याच्या प्रकाशांत स्वस्थ पडलेला असतो. झोंपेमध्यें हें जग आपणांला दिसत नाहीं. जागे झाल्यानंतर निद्रावस्थेंत कांहींहि नव्हतें, असें आपण ह्मणतों. परंतु हें कांहीं नाहीं असें जें आपण ह्मणतों, त्यांत देखील कांहीं आहेच; आणि असें जें कांहीं आहे, तोच कारणदेह होय. असतामध्यें देखील सत् आहे. हें आमच्या पूर्वजांनीं जर्मन तत्त्वज्ञ हेगेल याच्यापूर्वीं हजारों वर्षे सिद्ध केलें आहे. "**असतः सदजायत**" अशी कल्पना बायबलांतहि व्यक्त झाली आहे, व तेथें असत् याचा अर्थ कारणदेह असाच घेतला पाहिजे.

निजून उठल्यावर आपण ह्मणतों "मला इतकी गाढ झोंप लागली होती, कीं, स्वप्नांत मला कांहींहि दिसलें नाहीं." एकदां एका साक्षी-दारानें न्यायाधीशासमोर असें सांगितलें, कीं, "अमुक एका ठिकाणीं मध्यरात्रीं कोणीहि नव्हतें." न्यायाधीशानें विचारलें, कीं, "तूं ही गोष्ट ऐकींव सांगतोस किंवा प्रत्यक्ष अनुभवानें सांगतोस ? ही गोष्ट तूं पाहिली आहेस काय?" साक्षीदार ह्मणाला "पाहिली आहे." न्यायाधीशानें लगेच ह्मटलें "एकूण पाहणारा तूं तरी निदान तिकडे होतासच. अर्थातूच ती जागा निर्जन नव्हती!" माझ्या झोंपेंत कांहींहि नव्हतें, हें ह्मणणें ह्मणजे वरच्यासारखेंच आहे. कांहींहि नव्हतें असें ओळखणारा तुमचा आत्मा-सूर्य तरी तेथें होता कीं नाहीं ? अशा रीतीनें सुषुप्तीमध्यें ( १ ) कांहीं नसणें व ( २ ) तें पाहणारा तुमचा आत्मा, या दोन वस्तूंचें अस्तित्व सिद्ध झालें. पुढें स्वप्नें पडूं लागलीं ह्मणजे मूळचें 'कांहीं नसणें' नष्ट झालें, आणि क्षणभंगुर सृष्टि दिसूं लागली. यावरून असें सिद्ध होतें, कीं, आपला कारण देह तत्त्वतः खरा नाहीं. असतापासून सत् उत्पन्न होतें,

याचें आश्चर्य मानूं नका. खरोखरीच तें सत्य आहे. ही पृथ्वी तरी कोठून आली ? सुषुप्ति अवस्थेप्रमाणें असणाऱ्या तेजोमेघांतून ( Nebula ) कीं नाहीं ? त्या अव्यक्त स्थितींतून वनस्पतिकोटी, प्राणिकोटी आणि मनुष्यकोटि निर्माण झाल्या आहेत. जो क्रम सृष्टीचा, तोच अध्यात्माचा. जागृत स्थितींतील सृष्टींतून स्वप्नसृष्टि निर्माण झाली, असें कित्येक लोक ह्मणतात. मोठमोठ्या पाश्चात्य तत्त्वज्ञांनां देखील स्वप्नाची उपपत्ति नीट कळली नाहीं.

सुषुप्ति अवस्थेंतून आह्मीं आतां स्वप्नसृष्टींत येऊं. आतां आपण पर्वतशिखरावरील बर्फाचा प्रदेश सोडून पर्वतापर्यंत वाहणाऱ्या प्रवाहापर्यंत येऊन पोहोंचलों. आतां तुह्मीं स्वप्नसृष्टींत गर्क होऊन गेलां आहांत. आणि क्षणांत राव, क्षणांत रंक, क्षणांत येथें तर क्षणांत जगाच्या दुसऱ्या टोंकाला, असा प्रकार पाहतां. पर्वतांतील प्रवाहाप्रमाणें येथें तुम्हांला सैरावैरा धांवावें लागतें. स्वप्नांत मेलेले लोक जीवंत होतात, आणि जीवंत असलेले मृत होतात. सगळीच विचित्र काव्यसृष्टि! यानंतर आपण सपाट प्रदेशावर ह्मणजे जागृदवस्थेंत येऊन पोहोंचतों, व येथें गढूळ नदीप्रमाणें स्थूल देह तयार होतो. एवंच, सुषुप्ति ह्मणजे कारणदेह, स्वप्न ह्मणजे सूक्ष्मदेह आणि जागृति ह्मणजे स्थूलदेह. अर्थात्, पुढच्या देहांमध्यें मागील देह गुप्तरूपानें असतात, आणि आपण झोंपी गेलों असतां पुनः ते आपलें काम करूं लागतात. ज्याप्रमाणें झोंपी जातांना लोक आपले कपडे काढून ठेवितात, त्याप्रमाणें निजतांना आपण हे स्थूलादि देह बाजूला ठेवितों. सूक्ष्म देह देखील जडच समजला पाहिजे. ज्याप्रमाणें शिखरावरील बर्फावर, पर्वतांतील प्रवाहावर आणि सपाट भूमीवरील नदीवर एकच सूर्य सारखा प्रकाशत असतो, त्याचप्रमाणें तुमचा आत्मा देखील तीनहि देहांवर सर्वदां प्रकाशित असतो. मग भेद कोठून आला?

फरक प्रतिबिंबांमध्यें येतो. सूर्य जेव्हां बर्फावर ह्मणजे कारणदेहावर प्रकाशित होता, तेव्हां तेथें प्रतिबिंब मुळींच दिसत नव्हतें. कारण-

देहाचा सूक्ष्मदेह बनल्यानंतर चंचल असें प्रतिबिंब दिसूं लागलें. पुढें संथ स्थूलदेहामध्यें तेंच प्रतिबिंब स्थिर दिसतें. हाच दृष्टांत मनुष्याला लावितां, सुषुप्ति अवस्थेमध्यें ह्मणजे कारणदेहांत, मी झोंपीं गेलों आहें, मी पचन करीत आहें, वगैरे कोणताच अहंकार जागृत नसतो. स्वप्नाच्या सूक्ष्मदेहांत, चंचल अहंकाराच्या रूपांत तें प्रतिबिंब दिसूं लागतें. पुढें जागृदवस्थेच्या स्थूलदेहांत आत्म्याचें तें अहंकाररूपि भासमान प्रतिबिंब स्थिर व दृढ होतें.

येथें अधिक विवरणाची आवश्यकता आहे. स्वप्नसृष्टीपासून स्थूलसृष्टि निर्माण झाली, असें ह्मणण्यास काय आधार आहे ? असा एक आक्षेप येईल. याचें उत्तर देण्यापूर्वीं जागृदवस्थेंतील आमच्या ज्ञानाचे घटक काय आहेत, हें पाहूं.

आमचें सर्व ज्ञान, दिक्, काल, कार्यकारणभाव यांनीं व्याप्त ( व्यवच्छिन्न ) आहे. या तीन्हींवांचून ज्ञानाची कल्पनाच करितां येत नाहीं. सर्व ज्ञान याच सांच्यांतून आलें पाहिजे. जर्मन तत्त्ववेत्ता कॅन्ट यानेंहि आपल्या 'क्रिटिक ऑफ् प्युअर रीझन' (बुद्धीची मीमांसा ) या ग्रंथांत हें सिद्ध केलें आहे. या विषयावर लिहितांना मॅक्समुल्लर ह्मणतो "वेदान्तांत सांगितलेली गोष्ट कॅन्टनें सिद्ध केली आहे. मात्र दिक्, काल आणि कार्यकारणभाव हीं इंद्रियगोचर नसून मनोगत (a priori) आहेत, असें वेदान्तानें सि केलें नव्हतें, तें कॅन्टनें प्रथम केलें." मॅक्समुल्लरसाहेबानें जर आमचे शास्त्रग्रंथ पुरेसे वाचले असते, तर त्यानें वरील विधान केलें नसतें. वरील सर्व गोष्टी हिंदूनीं सिद्ध करून दिल्या आहेत, आणि ह्मणूनच स्थूलसृष्टि, सूक्ष्मसृष्टीचें परिणत स्वरूप आहे, हें त्यांनां ठरवितां आलें. कारणदेहांत, दिक्कालादिकांचा अभाव असतो, किंवा तीं बीजरूपानें असतात. सूक्ष्मदेहांत त्यांनां अंकुर फुटतो. आमच्या वाढीप्रमाणें दिक्कालादि कल्पनेचीहि वाढ होते. स्वप्नांतील दिक्काल हीं क्षणिक आणि चंचल असतात. नारदाचा स्वप्नसृष्टींतील जन्म, महंमदाचें आठव्या स्वर्गाप्रत गमन आणि ख्रिस्ताचीं प्रभूशीं अनेक भाषणें, या सर्व गोष्टी वरील तत्त्वाची साक्ष देतात.

जागृदवस्थेंत सर्व कांहीं स्पष्ट व नियमित होतें. एवंच, या तीन्ही अवस्था ह्मणजे एक प्रकारची उत्क्रांति किंवा विसृष्टि आहे. स्वप्नांतील ज्ञान परिणत होऊन जागृदवस्थेंत आकाराला येतें. स्वप्नांतील आपलीं अनुमानें जागे झाल्यावर पोरकट किंवा विचित्र वाटतात. स्वप्नांतील आपल्या कविता जागेपाणीं विसंगत व विचित्र ठरतात. सूक्ष्म आणि स्थूलदेहाचा संबंध असाच आहे. कोणी ह्मणेल, स्वप्नांतील अनुभव ह्मणजे जागृदवस्थेंतील स्मृति होय (मनीं वसे तें स्वप्नीं दिसे); पण तसें झालें तरी कोठें बिघडतें? बीजापासून अंकुर, अंकुरापासून वृक्ष आणि वृक्षापासून बीज, असा हा क्रम चालूच आहे. झाडांतील सर्व शक्ति बीजामध्यें पुनः एकवटली जाते. तद्वत् ज्ञानाचा क्रम आहे.

सुषुप्तीमध्यें शुद्ध अज्ञान किंवा अविद्या असते. आणि त्यांतूनच ज्ञाता आणि ज्ञेय हीं गाईच्या शिंगाप्रमाणें एकदम उद्भवतात. स्वप्नांत ज्ञाता आणि ज्ञेय हीं दोन्हीं तुमच्या मनाचीं रूपें असतात, आणि तीं एकदम उद्भवतात. त्याचप्रमाणें स्वप्नांतील तीनहि काल, दिक्, व कार्यकारणभाव हीं एकदम उद्भवतात.

वेदान्त ह्मणतो, जागृतींतहि तीच गोष्ट घडते. ज्ञाता आणि ज्ञेय—तुह्मी स्वतः आणि तुह्मांला दिसणारें दृश्य, हीं तुमचींच स्वरूपें आहेत. तुमचे शत्रु मित्र तुह्मीच आहांत, आणि त्यांनां पाहणारे तुम्ही एकच आहांत. मात्र या तीनहि अवस्थेंतील रूपें क्षणिक, विनाशि, चंचल अशीं आहेत. आणि ज्याला आपण नदीवर प्रकाशणाऱ्या सूर्याची उपमा दिली, तो आत्मा अविनाशी, अव्यय आणि स्थिर असा आहे. तोच तुमच्या तीनहि अवस्था प्रकाशित करितो, आणि ज्याप्रमाणें सूर्य एकच नव्हे तर जगांतील सर्व नद्यांवर प्रकाशतो—जगांतील सर्व नद्यांवर एकच सूर्य प्रकाशतो, त्याचप्रमाणें एकच आत्मा सर्वांच्या अंतर्यामीं प्रकाशत असतो. नद्यांप्रमाणें देह भिन्न असले, तरी आत्मा एकच, विभु आणि सनातन आहे आणि तो तुह्मी आहांत!

एवढी गोष्ट तुह्मी स्वतःला पटवून द्या, ह्मणजे सर्व मोह, शोक, चिंता, ा सर्वांच्या पलीकडे तुह्मी जाल. तुह्मांला कोणीहि इजा करूं शकणार ाहीं!

जळनिधिराया खडपासन्निध आपटिं अपुल्या लाटा
मत्पदिं ही तूं जगता ! येईं त्यजुनी सर्वहि ताठा

## अभंग.

सूर्य नक्षत्रांनों आणि वादळांनों
यावें भूकंपांनों युद्धांनोंहो !
स्वागतहि तुह्मां करितों मी बरें
बळ वेंचा सारे आपुलालें.
मजवरि शक्ति आपुली चालवा
पाहूं दे प्रभावा तुमचीया.
तोफा शतघ्नी त्या माझीं व खेळणीं
उल्कापात ह्मणीं बाण माझे.
अग्निनारायणा जाळिशील काय ?
वदे गतभयपणें मज.
मजपासुनीयां ज्वाळा जी निघाली
भीति एवढाली काय तीची ?
लखलखित तीक्ष्ण खड्ग आणि ज्वाळा
तोफेचा तो गोळा अस्वतंत्र
खड्ग गोलकांनों माझीच ती शक्ति
प्रेरित निश्चितीं तुह्मांसी जी.
प्राशितां हा ऐसा रामतीर्थबिंदु
ज्ञानधैर्यसिंधु उचंबळे.

# THE REAL SELF.

## खरें आत्मतत्त्व.

जर्मनभाषेंतील एका कहाणींत एका गृहस्थाची छाया (सांवली) सांडल्याचा उल्लेख आहे; व त्यामुळें त्या मनुष्याला ह्मणे, लोकांकडून फार छळ सोसावा लागला! त्याच्या सर्व मित्रांनीं त्याला सोडून दिलें, आणि त्याची विलक्षण दैना झाली. आतां कल्पना करा, कीं, एकाद्या मनुष्याची छाया (प्रतिबिंब) न सांडतां त्याचें शरीर (बिंब) सांडलें आहे, तर त्याची स्थिति काय होईल? प्रतिबिंब सांडल्यास एकवेळ चालेल, पण बिंब नाहींसें झाल्यास सर्वच आटोपल्यासारखें होईल.

जगांतील बहुतेक लोकांची स्थिति खरोखर पाहतां अशीच आहे. त्यांचें बिंब ह्मणजे अंतरात्मा सांडलेला असतो. केवढें आश्चर्य! प्रत्येकाला आपल्या देहासंबंधानें माहिती असते,* परंतु आत्मज्ञान असणारे असे फार विरळा. जगांतील सर्व संपत्ति मिळविली आणि आत्मा सांडला, तर त्याचा काय उपयोग?

या विषयाचें, एका प्रत्यक्ष घडलेल्या संवादाच्या रूपानें विवरण केल्यास ठीक पडेल. हिमालयांतील एका संस्थानिकाच्या मुलाबरोबर हा संवाद चालला असतांना त्या मुलानें विचारलें, कीं, "स्वामीजी, ईश्वर ह्मणजे काय?" प्रश्न जितका प्राचीन, तितकाच महत्त्वाचा आहे. सर्व देशांमध्यें व सर्व धर्मांमध्यें सर्व काळीं मोठमोठे लोक याचा ऊहापोह करीत आले आहेत.

राजपुत्र ह्मणाला "देव कसा असतो हें कसेंहि करून मला सांगाच."

स्वामीजी ह्मणाले "असें पहा, तुह्माला देव ओळखावयाचा आहे, त्याची ओळख करून घ्यावयाची आहे. आतां तुह्माला हा शिष्टाचार माहीत आहे, कीं, एकाद्या मोठ्या मनुष्याची भेट घ्यावयाची असली, ह्मणजे प्रथम त्याला आपल्या नांवाचें कार्ड पाठवावें लागतें; आपण कोण आहों हें प्रथम त्याला सांगावें लागतें. तर मग देवाकडे पाठ-

---

* दुर्दैवाची गोष्ट ही, कीं, पुष्कळांनां तीहि नसते!

विण्याकरितां तुम्ही आपलें एक कार्ड तयार करून मजजवळ द्या, म्हणजे मी तुमची ईश्वराशीं ओळख करून देईन."

राजपुत्र म्हणाला "रास्त आहे." असें म्हणून त्यानें एका कागदावर अमुक संस्थानच्या अमुक राजाचा मुलगा असें लिहिलें.

स्वामीजी म्हणाले "अहो, पण तुम्हीं आपलें नांव बरोबर लिहिलें नाहीं! तुम्हाला जर आपलें नांव बरोबर लिहितां येत नाहीं, तर देव तुम्हाला कसा भेटेल?"

राजपुत्रानें बराच वेळ विचार केला. नंतर कांहीं सुचल्यासारखें होऊन तो म्हणाला "खरें, स्वामीजी, माझी चूक झाली खरी; मीं माझ्या देहाचा नुसता पत्ता लिहिला. मी कोण हें लिहिलेंच नाहीं. कारण, देह हा माझा आहे, अर्थात् मी कांहीं देह नव्हे. मला वाटतें, मी म्हणजे मन."

स्वामीजी म्हणाले "बरें, पण असें पहा, तुमच्या शरीरांत एकंदर हाडें किती आहेत, आज सकाळीं सेवन केलेलें अन्न शरीराच्या कोठल्या भागांत व कोणत्या स्वरूपांत आहे, हें तुम्ही सांगूं शकाल काय?"

राजपुत्र म्हणाला "नाहीं. माझी बुद्धि तेथपर्यंत पोहोंचत नाहीं. मी प्राणिशास्त्र किंवा शारीरशास्त्र वाचिलें नाहीं, यामुळें माझ्या बुद्धीला त्याचें आकलन करितां येत नाहीं."

स्वामीजी म्हणाले "कांहीं हरकत नाहीं. पण एवढें तरी सिद्ध झालें, कीं, तुमचें मन व तुमची बुद्धि हीं कांहीं तुम्ही नव्हत. तीं तुमचीं आहेत. या दोहोंचे स्वामी तुम्ही आहांत. तेव्हां आतां पुनः विचार करून तुम्ही कोण तें सांगा, म्हणजे लागलीच तुमची देवाशीं भेट करून देतों."

बराच वेळ विचार करून पुनः राजपुत्रानें उत्तर दिलें "यापुढें माझी बुद्धि चालत नाहीं."

खरोखर हें अक्षरशः खरें आहे. आत्मतत्त्व, वाणी व मन यांनां गोचर नाहीं. (अवाङ्मनसगोचरम्.)

स्वामीजी म्हणाले "आतां थोडा वेळ येथें बसा, व मी देह नाहीं, मन नाहीं इत्यादि ज्या गोष्टी तुम्हाला कळल्या आहेत, त्यांची भावना

दृढ करा, त्यांचा अनुभव घ्या. हीं तत्त्वें समजलीं आहेत असें शब्दांनीं न सांगतां क्रियेनें दाखवा. मी देह नाहीं, मन नाहीं, बुद्धि नाहीं, याचा एकदां साक्षात्कार झाला, देह आणि मन यांच्यापलीकडे तुह्मी गेलां, ह्मणजे मोह, शोक, भीति, चिंता हीं सर्व नष्ट होतील."

राजपुत्रानें बराच वेळ चिंतन केल्यानंतर संवाद पुढें सुरू झाला.

स्वामीजी ह्मणाले "काय हो, आज सबंध दिवसांत आपण काय काय केलें, हें सांगाल काय?"

राजपुत्र ह्मणाला "सकाळीं उठून स्नानादि प्रातर्विधि उरकून थोडासा उपहार केला. नंतर बराच वेळ कांहीं वाचून कांहीं पत्रें लिहिलीं, कांहीं मित्रांच्या भेटी घेतल्या व आपल्या दर्शनाला येथें आलों. एवढेंच, याखेरीज कांहीं केलें नाहीं."

स्वामीजी ह्मणाले "पहा, जरा विचार करा; याहून शेंकडों, हजारों दुसऱ्या गोष्टी तुह्मीं केल्या आहेत, पण तुह्मी त्या सांगत मात्र नाहीं. हें कांहीं बरें नाहीं. सर्व कांहीं सांगा."

राजपुत्र आश्चर्यचकित झाला. त्याला कांहीं सांगतां येईना.

स्वामीजी ह्मणाले "आतां असें पहा, तुह्मी हे समोरचे पदार्थ पाहतां, तेव्हां डोळ्यांतील लहान स्नायु चलन पावतात, त्यांनां तें चलन कोणीं दिलें? खात्रीनें दुसऱ्या कोणीं दिलें नाहीं; तुह्मींच तें दिलें."

राजपुत्रानें ही गोष्ट कबूल केली.

स्वामीजी ह्मणाले "आतां हें संभाषण तुह्मी ऐकत आहांत, तेव्हां कर्णेंद्रियांचें व्यापार कोणीं करविले? अर्थात् तुह्मींच. सकाळपासून आतांपर्यंत तुमचे जे जे देहव्यापार घडले, ते सर्व कोणीं केले? अर्थात् तुह्मीं स्वतः. दुसऱ्या कोणीं केले नाहींत. ते एकाद्या भूतानें केले असतील असें ह्मणण्याचा काळ आतां राहिला नाहीं. केंस, अवयव इत्या[illegible] वाढणें, अन्नपचन होणें वगैरे सर्व क्रिया तुह्मी स्वतःच करितां."

राजपुत्राला दिसून आलें, कीं, प्रत्यक्ष आपल्या देहांत [illegible] बुद्धीला अगम्य अशा कोट्यवधि क्रिया आपण करीत अस[illegible]

आपल्या शारीरिक क्रिया दोन प्रकारच्या असतात. ऐच्छिक आणि अनैच्छिक; बुद्धया केलेल्या, आणि स्वाभाविक होणाऱ्या. चालणें, बोलणें, लिहिणें, वाचणें या सर्व जाणूनबुजून केलेल्या क्रिया होत; आणि श्वासोच्छ्वास, रुधिराभिसरण, केशवर्धन, या सर्व स्वाभाविक, आपणांला नकळत होणाऱ्या क्रिया होत. पण लोकांची अशी चूक होते, कीं, ते बुद्धिपूर्वक केलेल्या क्रियांनां आपल्या असें समजत असतात, आणि इतर क्रिया आपल्या आहेत असें त्यांनां मुळींच वाटत नाहीं. अशा रीतीनें आपल्या अनंत आत्मतत्त्वाला आपल्या बुद्धीइतकें स्वतःच आकुंचित करून घेऊन ते विनाकारण कष्टी होतात.

कांहीं लोक ह्मणतात "अहो, आह्मीं अन्न खातों आणि पचनक्रिया प्रकृति ( Nature ) करिते." त्यांच्या एवढें लक्ष्यांत येत नाहीं, कीं, ती प्रकृति आपणच आहोंत. आपण नुसता देह नव्हे. पूर्वग्रह, अज्ञान, दुराग्रह हीं सर्व बाजूला सारून जर तुह्मीं शांतपणें या गोष्टीचा मनांत विचार कराल, तर तुमच्या सहज अनुभवाला येईल, कीं, निसर्ग किंवा प्रकृति आपणच आहों.

राजपुत्राला हें नीटसें कळलें नाहींसें दिसलें. तेव्हां विवेचनाची दिशा बदलण्यांत आली. स्वामीजींनीं विचारलें " जेव्हां तुह्मी झोंपीं जातां, तेव्हां तुह्मी जीवंत असतां, कीं, मरतां ?"

राजपुत्र ह्मणाला "अर्थात् मी जीवंत असतों."

स्वामीजी ह्मणाले "त्या वेळीं बुद्धि कोठें असते ?"

राजपुत्र ह्मणाला " मला स्वप्नें पडत असतात तेथें."

स्वामीजींनीं विचारिलें " आणि गाढ झोंपेंत?"

राजपुत्र थोडासा विचार करून ह्मणाला " शून्यांत लय पावते-ींशीं होते."

...मीजी ह्मणाले " मग तुह्मी तेथें असतां, कीं, नाहीं?"

...त्र ह्मणाला " ह्मणजे? मी तर तेथें असलोंच पाहिजे, मी कांहीं ...ीं."

स्वामीजी ह्मणाले "यावरून हें तुमच्या लक्ष्यांत आलें असेल, कीं, निजतांना ज्याप्रमाणें आपण कपडे खुंटीवर काढून ठेवितों, त्याप्रमाणें गाढ निद्रेमध्यें आपली बुद्धि बाजूला ठेवितों."

राजपुत्र ह्मणाला "बुद्धि नसून मी जीवंत राहतों, हें कोडें मला समजत नाहीं!"

स्वामीजी ह्मणाले "कां नाहीं? निजून उठल्यानंतर रात्रीं मला मुळींच स्वप्नें पडलीं नाहींत, मला सुंदर गाढ झोंप लागलेली होती, असें आपण ह्मणतों कीं नाहीं? परंतु झोंपेमध्यें कांहींहि नव्हतें असें ह्मणणारा कोणी तरी साक्षी होता, हें तरी सिद्ध झालेंना? झोंप लागली होती हें तुह्माला समजलें, यावरूनच हें सिद्ध होतें, कीं, तुह्मी–तुमचा आत्मा–जागे होतां. नाहींतर तुह्माला हें कळलेंच नसतें. ज्यावेळीं मेंदु, मन हीं सर्व विश्रांति घेतात, त्यावेळीं सतत जागा असणारा तुमचा आत्मा तेथें असलाच पाहिजे. नाहींतर रुधिराभिसरण, पचन, वर्धन इत्यादि क्रिया गाढ झोंपेंत कोण करवितो? ह्मणून कधींहि न निजणारा असा आत्मा तुह्मी आहांत. बुद्धि निजते, पण आत्मा निजत नाहीं. तो बुद्धीच्याहि पलीकडे आहे."

राजपुत्र ह्मणाला "येथपर्यंत मला स्पष्ट समजलें. आणि आतां मला कळून चुकलें, कीं, मी ह्मणजे कधींहि न निजणारी, केव्हांहि न बदलणारी अशी एक प्रचंड दैवी शक्ति आहे."

स्वामीजी ह्मणाले "बालपणींचा देह आतां तरुणपणीं नाहीं, बालपणींचें मन आतां बदललें, बुद्धिहि पण पालटली, तरी 'मी' आहे तसाच आहे. बालपण, यौवन, आणि वार्धक्य वगैरे सर्व अवस्थांमध्यें मीपणाची भावना मात्र अखंड राहते. मूर्च्छा, झोंप इत्यादि मूढ अवस्थेमध्यें देखील ती भावना असते. आतां याविषयीं आणखी थोडा विचार करा, ह्मणजे लगेच देवाची व तुमची भेट करून देतों. कारण आह्मीं प्रथमच कबूल केलें आहे, कीं, तुह्मी आपलें नांव बरोबर लिहा, ह्मणजे देवाची भेट करून देऊं."

स्वामीजी पुढें ह्मणाले "या समोरच्या वृक्षाला वाढविणारी शक्ति ही त्या दुसऱ्या वृक्षाला वाढविणाऱ्या शक्तीहून भिन्न आहे काय ?"

राजपुत्र ह्मणाला "अर्थात् नाहीं. ती एकच शक्ति असली पाहिजे. आतां त्याचप्रमाणें या झाडांनां वाढविणारी शक्ति आणि प्राण्यांच्या देहांनां वाढविणारी शक्ति या एकच असल्या पाहिजेत. थोडक्यांत सांगावयाचें, ह्मणजे एकाच अनंत चिच्छक्तीच्या योगानें वारा वाहतो, आणि वृक्षलतांपासून पुष्पफलें मिळतात. आणि तीच शक्ति तुमच्या देहाची वाढ करीत असते. सर्व विश्वांत तीच शक्ति भरून राहिली आहे."

स्वामीजी ह्मणाले "आतां तुह्मी कोण आहांत याचा विचार करा, ह्मणजे झालें. मन, बुद्धि यांच्या पलीकडे असणारी, रुधिराभिसरण, पचन, वर्धन इत्यादि क्रिया करविणारी शक्ति तुह्मीच आहांना ? आणि तीच शक्ति या सर्व विश्वाचें नियमन करिते ना ? झालें तर मग. या सर्व विश्वाला व्यापणारें तें अनंत ईश्वरी तत्त्वच तुह्मीं आहांत. **तत्त्वमसि.**"

राजपुत्राला आनंदाच्या उकळ्या फुटल्या आणि तो ह्मणाला "खरेंच, खरेंच, मला देव समजून घ्यावयाचा होता आणि मीच देव ठरलों ! माझा खरा आत्मा ह्मणजेच ईश्वर. मला देव समजून घ्यावयाचा आहे, असा कसा मूर्खपणाचा प्रश्न मीं केला ? मी कोण आहें एवढेंच काय तें मला समजून घ्यावयाचें होतें. एवढें समजलें, ह्मणजे देव आपोआप प्राप्त होतो."

आत्मसाक्षात्काराच्या मार्गांत अडचण काय ती एकच आहे; आणि ती ही:—लोक मुलाप्रमाणें वागतात. पहा कीं, घरांतील सर्व भांडीं आपलींच असतांहि लहान मूल एकच ताट आपलें असें समजून त्या ताटांतच जेवण्याचा हट्ट घेऊन बसतें, व दुसरीं ताटें आपलीं नव्हत, असें त्याला वाटूं लागतें. मोठीं माणसेंहि याचप्रमाणें आपल्या देहानें, मेंदूनें, बुद्धीनें केलेलें काम तेवढेंच काय तें आपलें, असें समजतात, व अशा रीतीनें स्वतःला संकुचित करून घेतात. सर्व यशापयश, सुखदुःख या संकुचित देहाला चिकटलेलें असावें, असें त्यांनां वाटतें. हाच स्वार्थ आणि यामुळेंच दुःख आणि चिंता प्राप्त होतात. ही भ्रामक

कल्पना टाकून द्या, आपलें विश्वात्मत्व ध्यानांत घ्या, ह्मणजे सर्व सुख तुह्मांला मिळेल. सर्व संस्थान आपलें असूनहि आपली राजधानी किंवा आपला वाडा हेंच आपलें निवासस्थान, असें एकाद्या राजाला वाटतें. लोकांचीहि हीच चूक होते.

मेंदु किंवा बुद्धि ही आत्म्याची राजधानी होय. पण तेवढीच माझी आहे आणि इतर स्थानें माझीं नव्हत, असें ह्मणण्याचा तुह्मांला अधिकार नाहीं. हें सर्व विश्व, हे सर्व सूर्य, तारे इत्यादि सर्व कांहीं तुमचेंच आहे. आपला हा वारसा मिळवा आणि सुखी व्हा.

स्वातंत्र्य, मुक्ति यासंबंधीं आपण पुष्कळ गोष्टी ऐकितों. पण आपण बद्ध कशानें झालों आहोंत, हेंच प्रथम पाहिलें पाहिजे. मुक्त व्हावयाचें असल्यास बंधनाचें कारण आधीं शोधिलें पाहिजे. आपलें बंधन माकडाच्या बंधनासारखें आहे. माकडाला पकडावयाचें असलें, ह्मणजे एक बारीक तोंडाच्या भांड्यांत कांहीं फळें, फुटाणे वगैरे घालून तें भांडें जमिनींत पुरून ठेवितात. माकड येऊन त्यांत हात घालून मूठ भरून घेतें, पण भांड्याचें तोंड लहान असल्यामुळें भरलेली मूठ बाहेर येत नाहीं. अशा रीतीनें माकड अडकून पडतें. तेंच माकड जर या फळांची आशा सोडून मूठ उघडून हात बाहेर काढील, तर त्याला बंधन मुळींच होणार नाहीं, त्याला सर्व अरण्यांत कोठेंहि विहार करितां येईल, व तेथील सर्व स्वादिष्ट फळें त्याचींच होतील.

आपणच स्वतःला बद्ध करून घेतों. हें विश्वरूपि महदरण्य आपलेंच असतां देहरूपि लहानशा भांड्यालाच आपण आपलेंसें ह्मणतों. माझा देह, माझें मन, माझी बुद्धि, हेंच कायतें ‘मी,’ असें प्रत्येकाला वाटत असतें. यामुळेंच आपणाला दास व्हावें लागतें. भीति, मोह आणि सर्व प्रकारच्या आपत्ति यांचा दास व्हावें लागतें. जगांतील सर्व दुःखांचें मूळ हेंच होय. ही क्षुद्र भावना टाकिली, हें अज्ञान नाहींसें झालें, ह्मणजे तुह्मी मुक्तच आहां!

# THE NATURE OF INSPIRATION.

## स्फूर्तीचें स्वरूप.*

हिंदुस्तानांत एका सभेंत पुष्कळ विद्वान् पंडित जमून शास्त्राचा ऊहापोह करीत होते. एके दिवशीं संध्याकाळीं सभा बरखास्त होण्याच्यावेळीं, गांवांत नदीतटाकीं कोणी उत्तम साधु आला आहे, असें श्रोत्यांपैकीं एकानें सांगितलें, आणि त्यानें त्या साधूची फार स्तुति केली. तेव्हां या साधूविषयीं अधिक माहिती मिळेल तर बरें, असें तेथील लोकांनां वाटूं लागलें. तेथें जवळच पिंजऱ्यांत एक राघू होता, तो त्या गृहस्थाचें भाषण ऐकून त्या गृहस्थाला ह्मणाला "तूं माझ्याबद्दल त्या साधुपुरुषाकडे जा, आणि माझी या बद्धस्थितींतून सुटका कशी होईल, याचा कांहीं तरी उपाय समजून घेऊन ये." पुढें तो मनुष्य त्या साधूकडे गेला आणि साधु नदींत स्नान करीत असतां त्याला त्यानें विचारिलें, कीं, "महाराज, त्या पिंजऱ्यांत बद्ध झालेल्या राघूची सुटका कशी होईल एवढें मला सांगा." हा प्रश्न ऐकतांच साधु मूर्छित होऊन पडला. साधूची ही दशा पाहून लोकांनां आश्चर्य वाटलें, आणि राघूच्या वतीनें असा वेडावांकडा प्रश्न केल्याबद्दल लोक त्याला बोलूं लागले. त्या दिवशीं तो साधु शुद्धीवर कांहीं आला नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सभेंत "आपला निरोप त्या साधूला कळविला काय?" असें राघूनें त्या गृहस्थाला विचारिलें. "होय" असें त्यानें उत्तर दिलें, आणि तो ह्मणाला "तुझ्याविषयीं साधूला विचारून मीं मोठी चूक केली. कारण, मीं तुझा प्रश्न विचारतांच साधुमहाराज मूर्च्छित होऊन पडले!" हें काय कोडें आहे तें सभासदांनां कांहीं कळेना. पण राघूनें त्यांतील मर्म जाणिलें. त्या गृहस्थाचें असें बोलणें ऐकून तो राघूहि कांहीं वेळानें निश्चेष्ट होऊन पडला, व तो मेला असें पाहून लोकांनां फार आश्चर्य वाटून खेद झाला, आणि आतां या मृत राघूला पिंजऱ्यांत ठेवून काय उपयोग, असें वाटून लोकांनीं पिंजऱ्याचा दरवाजा

* २१ फेब्रुवारी १९०३ इसवी रोजीं झालेलें व्याख्यान.

उघडिला. तत्काळ तो राघु भुरकन् उडाला आणि लोकांनां ह्मणाला "बाबांनों, तुह्मीं रोज येथें धर्मशास्त्राचा ऊहापोह करितां; पण साक्षात्कार, मुक्ति आणि स्फूर्ति कशी मिळवावी, हें कांहीं तुह्मांला ठाऊक नाहीं. मात्र साधूनें दिलेल्या प्रश्नाच्या उत्तरावरून मी हें सर्व शिकलों. साधूला खरें पाहूं गेल्यास मूर्च्छा आली नाहीं. त्यानें मूर्च्छेनेंनें माझ्या प्रश्नाचें उत्तर दिलें, आणि आपली सुटका अशी करून घ्यावी—मोक्ष कसा मिळवावा, हें मला शिकविलें. वरपांगी मरण, देहाची विस्मृति, अहंकाराचा त्याग हाच खऱ्या जीविताचा—स्फूर्तीचा किंवा मोक्षाचा मार्ग होय!"

संस्कृतांत 'भोग' आणि 'योग' असे दोन अन्वर्थक शब्द आहेत. यांचा अर्थ सकृद्दर्शनीं भिन्न दिसतो. भोग ह्मणजे सुखाचा अनुभव घेणें, आणि योग ह्मणजे (अहंकाराचा) त्याग आणि परमेश्वराशीं ऐक्य होय. या जगांत लोक भोगाविषयीं, सुखाविषयीं धडपड करीत असतात; पण सुख ह्मणजे काय? सुखाचा आपण नीट विचार केला, तर योगावांचून—त्यागावांचून सुख नाहीं, त्यागावांचून स्फूर्ति नाहीं, असें तुह्मांला दिसून येईल. क्षुद्र अहंकार उराशीं बाळगून तुह्मांला खऱ्या सुखाचा अनुभव केव्हांहि घेतां येणार नाहीं. 'मी हें करितों, मला हें माहीत आहे' अशी भावना नष्ट झाल्याशिवाय स्फूर्तीचा उदय कदापि होणार नाहीं, असें मोठमोठ्या महात्म्यांनीं सांगितलें आहे. अहंकार किंवा मीपणा बाळगणारा मनुष्य कवितादेवीचें द्वार व्यर्थ ठोठावीत असतो. उत्तम काव्य लिहिणें आणि त्याचा स्वाद घेणें हीं दोन्हीं कामें एकदम होणार नाहींत. आपण लिहीत आहों अशी भावना राखून कोणालाहि चांगलें लिहितां येणार नाहीं. कोणतेंहि काम उत्तम वठविण्याला अहंकाराचा त्याग केला पाहिजे; आणि असें झालें ह्मणजेच लोकांच्या दृष्टीनें तुह्मी उत्तम कारागीर बनतां. पण, स्वतःच्या दृष्टीनें पहाल, तर 'मी काम करीत आहें,' ही भावना तुह्मांला नसते. तुह्मीं हातीं घेतलेल्या कार्याशीं तन्मय होऊन जातां. स्फूर्तीचें मर्म--गुह्य हेंच आहे. आपणाला स्फूर्ति

झाली आहे असें ज्याला वाटूं लागतें, त्याला खरी स्फूर्तिच झाली नाहीं, असें समजावें. दुरून पाहणाऱ्या लोकांनां इंद्रधनुष्यांत तऱ्हतऱ्हेचे मोहक आणि सुंदर रंग दिसतात; पण तुह्मी इंद्रधनुष्याच्या ठिकाणीं गेलां, तर तुह्मांला इंद्रधनुष्य आहे असें दिसून येणार नाहीं. तसेंच दुसऱ्याच्या दृष्टीनें एकादा मनुष्य उत्तम लेखक, उत्तम कवि, उत्तम तत्त्वज्ञ आहे असें वाटेल; पण त्याच्या स्वतःच्या दृष्टीनें मी हें लिहीत आहें किंवा मला स्फूर्ति झालेली आहे, असा त्याला कदापि भ्रम उत्पन्न होणार नाहीं. कारागिरानें आपल्या कामासाठीं आपणाला वाहून घेतलें पाहिजे. मधमाशांप्रमाणें त्यानें आपलें जीवित आपल्या चाव्यांत-कार्यांत खर्च केलें पाहिजे. स्फूर्तीचें सारें मर्म यांतच आहे. स्फूर्तीचा आणि सुखाचा अनुभव एकाच वेळीं तुह्मांला घेतां येणार नाहीं. कोणत्याहि गोष्टीचा तुह्मी उपभोग घेऊं लागलां, कीं, स्फूर्ति बंद झालीच. तुह्मांला स्फूर्ति झाली, ह्मणजे दुसऱ्या लोकांनां तुमच्यापासून सुख होईल. तुह्मांला कांहीं सुख होणार नाहीं—पण तुह्मीं प्रत्यक्ष सुख किंवा आनंद होऊन जाल !

पतंग दिव्याच्या ज्योतीवर धांव घेतो आणि आपलें प्रेम व्यक्त करितो. पतंग हा साधारण माशीहून भिन्न आहे हें आपणांला केव्हां समजतें ? तो दिव्यावर झडप घालून भस्म होऊन जातो, तेव्हां त्याप्रमाणें आपल्या देहाचा, क्षुद्र अहंकाराचा त्याग केल्याशिवाय—योगी बनल्याशिवाय कोणालाहि खरी स्फूर्ति होणार नाहीं. असा त्यागी झालेला मानव जगाची पर्वा न करतां निर्भय होत्साता फिरत असतो.

कोणाहि बुद्धिवान् पुरुषाला या सजीव सृष्टीपासूनच स्फूर्ति मिळते, हें सृष्टींतील एक उदाहरण घेऊन स्पष्ट करून दाखवितां येईल. पाणी आमच्या पृथ्वीला जीवन देतें. पृथ्वीवरील सर्व पदार्थांची वाढ प्रकाश आणि पाणी यांपासून होते. आमचीं सर्व पिकें पाण्यानें पिकतात. पाणी ही एक ईश्वराची अत्युत्कृष्ट देणगी आहे. या देशांत (अमेरिकेंत) लोकांनां पर्जन्य किंवा पाणी फारसें आवडत नाहीं; पण हिंदु-

स्तानांत आणि पूर्वेकडील इतर सर्व देशांत पर्जन्य ह्मणजे परमेश्वराची एक अत्युत्तम देणगी आहे असें मानिलें जातें. मोठमोठे तत्त्वज्ञ, उत्तम कवि आणि स्फूर्तीची इच्छा करणारे मोठे लोक, आकाशांत मेघगर्जना होत आहे, आणि पाऊस जोरानें पडत आहे, अशा संधीचा उपयोग करून घेतात. 'रामा'चाहि अनुभव असा आहे, कीं, बाहेर पर्जन्यवृष्टि होत असली, ह्मणजे 'रामा'ला काव्य लिहिणें सोपें जातें; इतर प्रसंगीं तसें सोपें जात नाहीं. पाऊस पडण्याचा समय आला किंवा पावसाची बुरबूर सुरू झाली, ह्मणजे मन एकदम उन्नत होतें आणि मेंदूला कवित्व करण्याची स्फूर्ति होते. या स्फूर्तीचें कारण पर्जन्याच्या द्वारें होणारें स्वर्गाचें आणि पृथ्वीचें ऐक्य हें होय. या ऐक्याशिवाय या आल्हादकारक आणि स्फूर्तिदायक प्रसंगाचें दुसरें कोणतेंहि कारण दिसत नाहीं. स्वर्ग आणि पृथ्वी यांनां पर्जन्य एकत्र करितो. अशा शुभ मुहूर्तावरच हिंदुस्तानांत लग्नसमारंभ होत असतात. पावसाच्या योगानें स्वर्गाचें आणि पृथ्वीचें ऐक्य—लग्न होतें. त्याप्रमाणेंच नरनारींचें—नवरानवरींचेंहि ऐक्य होऊंद्या, अशी लोक इच्छा करितात, आणि पर्जन्यदेवता (समुद्र, नद्या वगैरे) वधूवरांचें कल्याण करो—'कुर्यात् सदा मंगलम्'—अशी मागणी करितात.

आह्मांला शीत सुगंध वायु, दंव, पर्जन्य यांच्याबरोबर स्फूर्ति किंवा उत्साह हें सर्व कसें मिळतें, याचा आतां आपण विचार करूं. आधुनिक शास्त्राप्रमाणें पर्जन्याचें कारण, पूर्णव्याप्ति—पूर्णमिश्रण हें आहे. पूर्णव्याप्ति किंवा पूर्णमिश्रण ह्मणजे काय, हें अधिक स्पष्ट करून सांगितलें पाहिजे. एक प्यालाभर दूध घ्या आणि त्यांत साखर टाकीत चला. साखर दुधांत विरघळत जाईल, पण कांहीं वेळानंतर तुह्मांला असें आढळून येईल, कीं, साखर दुधांत न विरघळतां तळाशीं जशीच्या तशी जाऊन बसत आहे. तसेंच तुह्मी पाण्यांत मीठ किंवा माती टाकीत राहिलां, तर तुह्मांला हाच प्रकार आढळून येईल. कांहीं कालानंतर पाण्याची अशी स्थिति होईल, कीं, त्यांत अधिक मीठ किंवा माती

विरघळूं शकणार नाहीं, आणि माती अगर मीठ जसेंच्या तसें पाण्याच्या तळाशीं जाऊन बसेल. दुधाच्या किंवा पाण्याच्या या स्थितीला पूर्णव्याप्ति-पूर्णमिश्रण असें ह्मणतात. आकाशांत किंवा वातावरणांत ऑक्सिजन, नायट्रोजन, कर्बिकाम्ल, इतर सेंद्रिय पदार्थ, सजलबाष्प (पाण्याची वाफ) इत्यादि पदार्थ असतात. पाण्याचे थेंब हवेंत लटकत असतात. हवेंत किंवा वातावरणांत सजलबाष्प केव्हांकेव्हां कमी असतें, केव्हां-केव्हां अधिक असतें. सजलबाष्पाचें प्रमाण अधिक वाढूं लागलें ह्मणजे ते हवेंत राहीनासें होतें; आणि योग्य मर्यादेहून अधिक असलेलें बाष्प—वाफ, दंव, बुरबूर, पर्जन्य इत्यादि रूपानें खालीं पडूं लागतें. पर्जन्यवृष्टीपूर्वीं वातावरण सजलबाष्पानें अतिशय गच्च भरून गेलें पाहिजे. आमचें मन हें वातावरणाप्रमाणें किंवा हवेप्रमाणें आहे. एकादी कल्पना आमच्या मनांत भरून गेली-तिनें आह्मांला वेधून टाकिलें, ह्मणजे आमचें मन त्रस्त होऊन तें एका विलक्षण स्थितींत असतें. मनाची ही अवस्था पर्जन्यवृष्टीपूर्वीं असणाऱ्या वातावरणावस्थेप्रमाणेंच आहे. पाऊस पडण्यापूर्वीं आकाश मेघांनीं व्याप्त असतें, वारा निवांत असतो, आणि उकाडा होऊं लागतो; व असें झालें ह्मणजेच वृष्टि होते. तसेंच, आमच्या रोमरोमांत एकादी कल्पना व्यापून राहिली, ह्मणजे आमच्या मनाचाहि उकाडा--संताप होऊं लागतो. मनाच्या या अवर्णनीय स्थितीच्या पलीकडे आम्ही गेलों, ह्मणजे आपण कवि होतों, आणि आमच्यांमधून उत्तम काव्यांचा बाहेर वर्षाव होऊं लागतो. प्रथम आम्हीं एकाद्या गोष्टीनें--कल्पनेनें पूर्ण प्रेरित—पूर्ण व्याप्त झालें पाहिजे, आणि नंतर आम्हांला त्याहिपलीकडे गेलें पाहिजे. ह्मणजे उत्तम विचार, सुंदर काव्यें आपोआप प्रगट होऊं लागतील.

गणिताचा किंवा तत्त्वज्ञानाचा एकादा मोठा बिकट प्रश्न कसा सुटतो, याचा आपण विचार करूं. असा एकादा प्रश्न सोडविण्याचें काम जेव्हां आह्मी हातीं घेतों, तेव्हां ‘ अमुक वस्तु मला मिळावी, अमक्या एका वस्तूविषयींची लालसा पूर्ण व्हावी,’ असे नानातऱ्हेचे

तरंग मनांत येऊं लागतात, व त्यामुळें प्रश्न लवकर सुटत नाहीं. हें पाहून मन थोडेंसें चलबिचल होऊं लागतें. असें झालें ह्मणजे आपण इतर विचारांकडे दुर्लक्ष्य करून प्रश्नाकडेच बहुतेक लक्ष्य वळवूं पहातों. तरीपण प्रश्न सुटत नाहीं. कारण, इतर विचार जरी कमी झाले, तरी 'मी हें करीत आहें, कूटप्रश्न मी सोडवीत आहें,' असा सूक्ष्म अहंकार मनांत असतो. कांहीं कालानंतर, ह्मणजे आपलें सर्व लक्ष्य त्या कूटप्रश्नांतच एकसारखें घातल्यावर, देशकाल माझें-तुझें, अहंकार इत्यादि सर्व कल्पना लुप्त होऊन जातात, आणि आपण एकच विचाराशीं—कूटप्रश्नाशीं पूर्ण तादात्म्य पावतों, तन्मय होऊन जातों. 'पतंगाचें भस्म होऊन जाणें—मधमाशीनें आपला जीव देणें—अहंकाराला सुळावर चढविणें' इत्यादि संज्ञा या स्थितीला देतात. या स्थितींत गेल्याबरोबर, लगेच स्फूर्ति उत्पन्न होते, आणि कूटप्रश्नाचा उलगडा सहज होऊन जातो. 'मला हें सुचलें किंवा आठवलें--मला याचें स्फुरण झालें,' असें लोक ह्मणत नाहींत काय? देह आणि मन यांच्या मरणाशिवाय--विस्मृतीशिवाय खरें सुख आणि स्फूर्ति आपणांला मिळणार नाहीं.

उत्तम चित्रकार, शिक्षक, कवि, तत्त्वज्ञ इत्यादिकांनां याच मार्गानें—अहंकाराला सुळावर चढविल्यानें, आपापल्या विषयांत स्फूर्ति उत्पन्न होते. आपण कर्ता असावें, भोक्ता असावें, असें लोकांनां वाटतें; पण वेदान्त सांगतों, कीं, हें (तुह्मीं भोगी—भोक्ता होणें) सृष्टिनियमाविरुद्ध आहे. क्षुद्र स्वार्थी अहंकारच—तुमचा आत्मा नव्हे--भोक्ता होऊं पहातो. सर्व तत्त्वज्ञान्यांनां, लोकांच्या किंवा जगाच्या कल्याणाकरितां आपले देह व मनें यांचे बळी द्यावे लागतात. याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. तुह्मां स्वतःलाच भोक्ता व्हावयाचें असेल, तर तुमच्या कल्याणाचा, मुक्तीचा मार्ग खुंटलाच ह्मणून समजा. तुमचा देह, तुमचें मन आणि तुमचें सर्वस्व लोकांकारितां, परमात्म्याकरितां अर्पण करणें, हाच काय तो एक निःश्रेयसाचा मार्ग आहे. प्रभुभोजनसमयीं 'माझें मांस खा, माझें रक्त

प्राशन करा,' असें ख्रिस्त ह्मणतो. याप्रमाणें जो नेहमीं स्वतःला बळी देतो, जो लोकांकरितां आपलें जीवित खर्च करितो, तो खरोखर धन्य होय!

जेव्हां एकादी कल्पना आमच्या मनांत पूर्ण भरून जाते, जेव्हां एकादा विचार आमच्या अंगांत नखशिखान्त संचरूं लागतो, तेव्हां गंधर्वराज ( परमात्मा ) आमचें देहमनोरूपि वाद्य आपल्या हातीं घेतो, आणि त्यांतून अपूर्व संगीत, अद्भुत प्रभाव, उत्तम स्वरैक्य आणि मधुरालाप बाहेर काढतो. पण जोंपर्यंत मूल (अहंकार) हें वाद्य आपल्याच हातीं ठेवितें, पित्याच्या—परमात्म्याच्या हातीं देत नाहीं, तोंपर्यंत त्यांतून बेसूरच निघणार. यासाठीं आपला देह व आपलें मन परमात्म्याच्या हवालीं करा. क्षुद्र स्वार्थी अहंकार नाहींसा करा. त्याच्यापलीकडे जा, आणि परमात्मस्वरूपीं लीन व्हा. असें झालें, ह्मणजे गंधर्वराज तुमचें यंत्र आपल्या हातीं घेतील, आणि त्यांतून दिव्य स्वरालाप—संगीतामृत आपोआप स्रवूं लागेल. अशी स्थिति प्राप्त झाली, ह्मणजे स्फूर्ति झाली, असें समजावें. स्फूर्ति ह्मणजे ईश्वराची करणी. क्षुद्र अहंकारानें आह्मांला सोडिलें, ह्मणजे पुढें परमात्मा सर्व कांहीं करितो.

ख्रिस्तानें आपलें मिशन ( धर्मकार्य ) सुरू करण्यापूर्वीं सैतानानें त्याला मोहांत पाडण्याचा प्रयत्न केला. त्यानें ख्रिस्ताला सप्त लोक, त्या लोकांमधील ऐश्वर्य, अपार संपत्ति, गोड गोड पक्वान्नें, साम्राज्यपद इत्यादि आमिषें दाखविलीं; पण ख्रिस्तानें काय उत्तर दिलें? "हे सैताना, तूं मागें हो, तुझ्या हातचें ऐश्वर्य मला कांहीं नको!" किती चोख आणि सरळ उत्तर! अमेरिका आणि यूरोप येथील लोकांनों! ख्रिस्ताचा हा उपदेश ध्यानांत ठेवा. जडवाद कितीहि प्रबल झाला आणि त्यानें कितीहि धुमाकूळ माजविला, तरी "सैताना मागें सर, तुझ्या ऐश्वर्याची मला जरूरी नाहीं," हा ख्रिस्ताचा उपदेश विसरूं नका. ख्रिस्तानें सर्व ऐश्वर्य टाकून दिलें आणि त्याग व क्रूस ( सूळ ) यांचाच आश्रय केला. स्फूर्तीची निशाणी किंवा चिन्ह तें हेंच. 'मी कर्ता आहें, मी भोक्ता आहें,' ही कल्पना तुमच्या मनांत असे तोंपर्यंत स्फूर्ति तुह्मांपासून लांब राहते;

पण ही कल्पना सोडतांच ती तुमच्या सन्निध येते, ती तुह्मांला प्राप्त होते, असें समजा.

हिंदूंच्या पुराणांमध्यें तीन असुरांची गोष्ट आहे. हे तीन असुर फार विलक्षण योद्धे, अद्भुत शक्तीचे वीर असत. पुष्कळ राजे मोठमोठीं सैन्यें घेऊन त्या तिघांशीं लढण्यास येत; पण पराभव पावून ते परत जात. पुष्कळदां पराजित झाल्यामुळें हे लोक निराश होऊन एका मोठ्या साधूपाशीं गेले, आणि त्या तीघां असुरांचा पराभव कसा करतां येईल, असें विचारूं लागले. ते इतके अजिंक्य कसे झाले, याचा प्रथम शोध लाविला पाहिजे, असें साधूनें सांगितलें. शेवटीं महत्प्रयासानें त्यांच्या अजिंक्यतेचें गुह्य त्या साधूनें शोधून काढिलें. तें हें होतें, कीं, आपण कर्ते किंवा भोक्ते आहों, अशी कल्पना त्या तिघांच्या मनाला शिवली नव्हती. जय मिळाला, तरी त्यांचें त्यांनां कांहीं महत्त्व वाटत नव्हतें. आपणांला जय प्राप्त झाला अशी प्रौढि मिरविण्याचें त्यांनां कधीं माहीत नव्हतें. युद्ध चाललें असतांना 'आपण लढत आहों' ही कल्पना त्यांनां नव्हती. जगांतील शूर पुरुष असेच असतात. खरा श्रोता जसा सर्वस्वीं श्रवणांत तल्लीन होऊन जातो, तद्वत् खरा योद्धा युद्धांत गुंग होऊन जातो. 'मी लढत आहें,' हें त्याला भान नसतें. त्याचें शरीर एकाद्या यंत्राप्रमाणें किंवा बाहुल्याप्रमाणें काम करीत असतें, आणि सूत्रधारानें ( परमात्म्यानें ) हालविल्याप्रमाणें नाचतें.

त्या असुरांच्या अजिंक्यतेचें मर्म समजल्यानंतर त्यांनां जिंकण्याचे उपाय त्या साधूनें लोकांनां सांगितले. "तुह्मीं त्यांनां युद्धाला बोलवा, आणि कांहीं वेळ युद्ध झाल्यावर पलायन करून जात चला; असें कांहीं खेपा झाल्यावर आपण जेते आहोंत ही कल्पना त्यांच्या मनांत येऊं लागेल, आणि तशी कल्पना त्यांच्या मनांत आली, कीं, तुमचें काम फत्ते झालें ह्मणून समजा." असा त्या साधूचा उपदेश होता. लोकांनीं त्या साधूच्या उपदेशाप्रमाणें केलें. कांहीं खेपा त्या असुरांनीं लोकांचा पराभव करून त्यांचा पाठलाग केला, आणि नंतर त्यांनां आपण

जेते आहोंत असें वाटूं लागलें. झालें. आपल्या अजिंक्य स्थानावरून, 'आह्मीं हें करीत आहों, आह्मी मोठे आहों,' अशा भावनेंत–देहरूपी तुरुंगांत ते आले. त्यांच्यामधील परमात्म्याला दूर सारून तेथें अहंकारानें आपलें ठाणें बसविलें. मग त्यांनां जिंकण्यास फारसा त्रास पडला नाहीं.

आतां आपण या गोष्टींचें तात्पर्य पाहूं. परमात्मा सूत्रधार किंवा यंत्री आहे, आणि आह्मी यंत्रें किंवा बाहुलीं आहोंत; व त्याच्या–परमात्म्याच्या मर्जीप्रमाणें आह्मी सर्व काम करीत आहों, अशी जेव्हां तुमची भावना असते, तेव्हां 'मी कर्ता, मी भोक्ता' अशा अहंकारापासून तुह्मी अलिप्त असतां, आणि त्या तिघां असुरांप्रमाणें तुह्मी अजिंक्य होतां. पण लोक जेव्हां आमची खुशामत करूं लागतात, जेव्हां चारी बाजूंनीं स्तुतीचा वर्षाव कानांवर येऊं लागतो, तेव्हां आह्मी फुगून जातों. शिवाय 'आह्मी मोठे आहों, आह्मी जेते आहों, आह्मीं शत्रूंचा पराभव केला आणि जय मिळविला,' असें आह्मांला वाटूं लागतें. ही कल्पना आह्मांला आमच्या अजिंक्य स्थानावरून देहभावनेंत--देहरूपी तुरुंगांत आणून सोडिते, आणि आमचा नाश करिते. बायबलांतसुद्धां असें सांगितलें आहे, कीं, ख्रिस्त जेव्हां प्रथम पर्वतावरून खालीं आला, तेव्हां तो फार शुद्ध, पवित्र आणि सामर्थ्यवान् होता; पण पुढें तो मित्रमंडळींत मिसळल्यावर आणि त्यांच्यांशीं बरेंच संभाषण झाल्यावर आपली शक्ति कमी झाली आहे असें त्याला वाटूं लागलें, आणि तो ह्मणाला "मला कोणीं स्पर्श केला; कारण, माझें सामर्थ्य बाहेर जात आहे–कमी होत आहे, असें मला वाटतें." ख्रिस्ताच्या गोष्टीवरूनहि हेंच सिद्ध होतें, कीं, जेव्हां 'मी कर्ता आहें' असा अहंकार नसतो, तेव्हां परमात्मा तुमच्यामधून काम करतो, तुह्मांला स्फूर्ति देतो; पण जेव्हां लोकांनीं केलेली अनुकूल टीका, स्तुति किंवा खुशामत तुह्मी ऐकून घेऊन मान डोलवितां, तेव्हां तत्काल शक्ति कमी होऊं लागते–ती बाहेर निघून जाते. अहंकारपिंजराच्या बाहेर या, ह्मणजे स्फूर्ति तुह्मांला वरिते–माळ घालिते. पिंजऱ्यांत सांपडाल तर नाश हा ठेविलेलाच !

तुमच्यापाशीं एक सुंदर घड्याळ आहे, आणि तें अहोरात्र चांगलें चालतें. तुह्मीं त्या घड्याळाजवळ एक भलें मोठें लोहचुंबक आणून ठेविलें, तर काय होईल? घड्याळामधील पोलादी कमानी चुंबनधर्मयुक्त (Magnetised) होतील, आणि घड्याळ एकदम बंद पडेल. हें घड्याळ पुनः चालावें असें तुह्मांला वाटत असेल, तर तें जमिनींत पुरा--लोहचुंबकापासून दूर ठेवा. असें केलें ह्मणजे कांहीं कालानंतर पुनः तें पूर्ववत् चालूं लागेल. आमच्या प्रपंचांतहि आसक्ति, मोह, कामादि षड्रिपु इत्यादि बरींच मोठमोठीं लोहचुंबकें आहेत. तीं आम्हांला भंडावून सोडितात, आणि आमचें घड्याळ नीट चालूं देत नाहींत. आह्मीं त्या लोहचुंबकांनां योग्य अंतरावर ठेवीत नाहीं, त्यांनां जवळ येऊं देऊन आमच्याशीं लगट करूं देतों, ही आमची चूक आहे. तुह्मांला तुमची मूळ शक्ति किंवा स्फूर्ति पाहिजे, तर तुह्मीं या लोहचुंबकापासून फार दूर--अलिप्त राहिलें पाहिजे, आणि आत्मस्वरूपांत--परमात्म्यांत लीन झालें पाहिजे. कांहीं वेळ एकान्तांत घालवा, परमात्म्याचें चिंतन करण्यांत रोज कांहीं ठरीव काळ घालवीत चला, ह्मणजे लोहचुंबकाचे तुमच्यावर झालेले दुष्परिणाम दूर होऊं लागतील, आणि तुमचें मनोरूपि घड्याळ पूर्ववत् बरोबर चालूं लागेल. प्रत्येक मनुष्य ईश्वराचा पुत्र( प्रेषित ) आहे--कवि आहे, आणि जर तो ईश्वरी नियमांप्रमाणें राहूं लागला, परमात्म्याच्या चिंतनांत काल घालवूं लागला, तर स्फूर्ति त्याची दासी होऊन जाईल!

जहाजांनीं फार दिवस समुद्रांत प्रवास केला, ह्मणजे तीं थोडीशीं बिघडतात, आणि त्यांची दुरुस्ती करण्याकरितां त्यांनां कांहीं कालपर्यंत गोदींत आणून ठेवावें लागतें. तसेंच संसारांत, मोहांत आणि प्रतिकूल परिस्थितींत राहिल्यानें तुमची घडी बिघडून जाते, तुमची अवनति होते. तुमच्या जहाजांप्रमाणें तुमच्या देहांचीहि व्यवस्था तुह्मीं ठेवावी. निदान कांहीं थोडा काल तरी तुमचीं शरीरें गोदींत--परमात्मस्वरूपांत ठेवा. स्फूर्तिदायक ग्रंथ वाचा, स्फूर्तिदात्या सज्जनांच्या समागमांत काळ

घालवा, आणि एकान्तवासांतहि रहा. रोज नियमानें ध्यान करीत चला म्हणजे स्फूर्तीची शक्ति तुह्मांला प्राप्त होईल. तुह्मी रोज तुमचें शरीर धुऊन निर्मळ ठेवीत नाहीं काय? तुमचें घर झाडून लोटून तुह्मी स्वच्छ राखीत नाहीं काय? देह आणि घर यांप्रमाणें मनहि पवित्र आणि निर्मळ ठेवणें अवश्य नाहीं काय? ऐहिक कामना, आसक्ति, भोगाच्या कल्पना, मी कर्ता आहें वगैरे अहंकारादि प्रकार तुमच्यामध्यें असतील तोंपर्यंत तुमच्या उद्धाराची आशा नाहीं. अहंकाराला सुळावर चढविल्याशिवाय-तो समूळ नाहींसा केल्याशिवाय गत्यंतर नाहीं!

# THE WAY TO THE FULFILLMENT OF ALL DESIRES.

## सकलकामनापूर्तीचा उपाय.*

आजच्या विषयाला सुरुवात करण्यापूर्वीं हिंदुस्तानच्या आधिभौतिक अवनतीविषयीं दोन शब्द सांगितले पाहिजेत. पूर्वीं एकेकालीं हिंदुस्तानांत, सध्यां यूरोपांत आहे त्यापेक्षां अधिक संपत्ति होती, आणि सध्यां अमेरिकेंत आहेत त्याहून अधिक हिरे, मोत्यें, रत्नें आणि माणिकें होतीं. हिंदुस्ताननें ऐहिक ऐश्वर्याचे दिवस पाहिले आहेत, आणि एकामागून एक अनेक राष्ट्रांनीं वेळोवेळां हिंदुस्तानावर स्वाऱ्या केल्या आहेत. ग्रीस, इराण, अफगाणिस्तान इत्यादि राष्ट्रें हिंदुस्तानच्या संपत्तीनें श्रीमंत झालीं होतीं. खरोखर पूर्वीं हिंदुस्तान ह्मणजे सुवर्णभूमि होती.

पण आम्हांला याबद्दल कांहीं पश्चात्ताप होत नाहीं. हिंदुस्तान सांपत्तिकदृष्ट्या खालावलेलें आहे, याबद्दल आम्हांला यत्किंचितहि वाईट वाटत नाहीं. कारण, जगांतील सर्व घडामोडींचें नियमन करणारी एक मोठी शक्ति आहे, आणि तिच्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं घडून येतें, हें आम्हांला माहीत असल्यामुळें, हिंदुस्तानच्या आधिभौतिक अवनतीबद्दल आम्हांला कांहीं दुःख होत नाहीं. आमचें ऐहिक ऐश्वर्य नाहींसें झालें आहे, ह्मणून आम्ही त्रास करून घेत नाहीं. ऐहिक ऐश्वर्य, ऐहिक वस्तु यांची हिंदुलोकांनीं पारख केलेली आहे, आणि त्या वस्तु फोल आहेत असें त्यांनीं ठरविलें आहें. अमेरिका व यूरोप हीं राष्ट्रें तरुण पोरें आहेत, आणि तीं सध्यां ऐहिक वस्तूंचा अनुभव घेऊन पहात आहेत—याविषयीं त्यांचे प्रयोग चाललेले आहेत. हिंदु लोकांनीं हे प्रयोग करून पाहिलेले आहेत; आणि ऐहिक वस्तु फेंसाप्रमाणें कुचकामाच्या आहेत, असें त्यांनीं प्रयोगान्तीं ठरविलें आहे. ऐहिक वस्तूंपासून तुम्हांला केव्हांहि सुख मिळत नाहीं. सोन्यारुप्याच्या योगानें तुम्हांला सोनेंरुपें खरेदी करितां येईल, त्यांच्यापासून तुह्मांला खरें सुख

* ता. १३ दिसेंबर १९०२ रोजीं 'हरमेटिक ब्रदरहुड' समोर झालेलें व्याख्यान.

केव्हांहि मिळणार नाहीं. सुख या ऐहिक वस्तूंहून भिन्न आहे आणि या वस्तूंच्यायोगें तें खरेदी करितां येणार नाहीं.

सुखाचें मर्म कांहीं निराळेंच आहे. तें असें, कीं, वस्तूंचा तुह्मी जितका पाठलाग करितां, तितक्या त्या तुमच्यापासून दूर पळतात. तुह्मी इच्छेच्या, गरजेच्या पलीकडे गेलां, कीं, वस्तु तुमच्या मागें लागतात. हें मर्म माहीत नसल्यामुळें, आणि परिस्थितीचें निरीक्षण नीट न केल्यामुळें, कांहीं शहाणे लोक 'हिंदुस्तानची अवनति कां झाली आहे, हिंदुस्तान सांपत्तिकदृष्ट्या इतकें कां खालावलेलें आहे,' याविषयीं चुकीचीं कारणें सांगतात. याचें खरें कारण ह्मटलें, ह्मणजे हल्लींचे हिंदुलोक, हिंदुस्तानची अवनति सुरू झाल्यानंतरच्या हिंदुलोकांचे वंशज आहेत, आणि त्यांच्या अंगीं व्यावहारिक वेदान्त नाहीं. वेदान्ताचें माहेर घर, ऐक्याच्या--'**सर्वं खल्विदं ब्रह्म**' या कल्पनेचें मूलस्थान, ज्ञानगंगा--आध्यात्मिक ज्ञान, आत्मश्रद्धा, आत्मज्ञान, आत्मविश्वास यांचा उगम असलेल्या हिंदुस्तानांत व्यावहारिक वेदान्ताचा अभाव आहे, आणि हेंच त्या देशाच्या अवनतीचें कारण आहे, हें ऐकून तुह्मांला फार आश्चर्य वाटेल. राष्ट्रें वर खालीं कशीं जातात, एका राष्ट्राचा अस्त आणि दुसऱ्या राष्ट्राचा उदय कोणत्या अज्ञात कारणांमुळें होतो, राष्ट्रांची भरतीओहटी कोणत्या चंद्रामुळें होते, इत्यादि विषय फार मोठा आहे. त्याचें विवेचन पुढें केव्हां तरी करितां येईल. 'राम' आतां येथें आपणांला एवढेंच सांगतो, कीं, 'रामा'नें हिंदुस्तानचें आणि इतर राष्ट्रांचें सूक्ष्म निरीक्षण केलेलें आहे, आणि त्यावरून त्याचें असें मत झालेलें आहे, कीं, आध्यात्मिक अवनति झाल्याशिवाय कोणतेंहि राष्ट्र निकृष्ट अवस्थेला पोहोंचणार नाहीं. कदाचित् हें मत हिंदी गृहस्थाला मान्य होणार नाहीं. कोणी विचारतील, कीं, अमेरिकेची इतकी भरभराट कशी होत आहे, आणि अमेरिकेचें ऐश्वर्य कसें वाढत आहे? याचें कारण, अमेरिकन लोक लौकिक गोष्टींत वेदान्त नकळत आचरणांत आणीत आहेत. ते, हें कसें करीत आहेत, हें आतां

सांगण्याची जरूरी नाहीं, 'सत्यमेव जयते' सत्याचा,सद्वर्तनाचा,शीलाचा उत्कर्ष आणि जय होतो, इतरांचा होत नाहीं!

इतकी प्रस्तावना पुरे. आतां आपण आजच्या विषयाकडे वळूं.

बायबलांत असें सांगितलें आहे, कीं, 'मागा, ह्मणजे तुह्मांला मिळेल. ठोठावा, ह्मणजे द्वार उघडेल.' हिंदूंच्या कर्मतत्त्वांतहि असेंच सांगितलें आहे. एकदां फुलझाडाला कळी आली ह्मणजे क्रमाक्रमानें तिचा विकास होऊन शेवटीं त्या कळीचें मोठ्या सुंदर फुलांत रूपांतर होतें. त्याप्रमाणें तुमच्या मनांत एकादी इच्छा उत्पन्न झाली, कीं, ती केव्हांना केव्हां तरी सफल होणार. या जगांत जड वस्तूचा अगर शक्तीचा नाश केव्हांहि होत नाहीं, असें आधुनिकशास्त्रानें सिद्ध केलें आहे. तेव्हां आमच्या मानसिक शक्तीचा, मनांतील इच्छेचा नाश कसा होणार? आमच्या सर्व कामना, आशा सफल झाल्याच पाहिजेत, असें कर्मतत्त्व सांगतें. हें तात्त्विक विवेचन बरोबर असेल; पण व्यवहारांत या तत्त्वाची सत्यता नेहमीं पटून येते काय? नाहीं. तर मग असें कां होतें? 'मागा, ह्मणजे मिळेल,' या विधानांत सर्व सत्य सांगितलेलें नाहीं; सत्याचा कांहीं भाग आलेला आहे. पूर्ण सत्याचा बोध साधारण लोकांनां बहुतेक होत नाहीं. मागा ह्मणजे मिळेल, पण तुह्मांला योग्य किंमतहि द्यावी लागेल,फुकट कांहीं मिळणार नाहीं! किंमतीविषयीं बायबलांत असें सांगितलें, आहे, कीं, स्वतःकरितां जगणें ह्मणजे मरण होय! खरें जगणें किंवा जीविताचें साफल्य करून घेणें ह्मणजे आपल्या जीवितावर पाणी सोडणें होय.* या वचनाचा अर्थ नीट लक्ष्यांत आला काय? जो कोणी जीविताची इच्छा धरितो, जीविताला चिकटून राहतो, त्याला खरें जीवित मिळत नाहीं, त्याच्या जीविताचें साफल्य होत नाहीं. इच्छा करणें, आशा बाळगणें, ह्मणजे खरें जीवन गमावणें होय.

---

*He, that would keep his life, will lose it, and he who w ould save his life, must lose it.

*‘मनुष्यानें अन्नावरच राहूं नये,’ आणि ‘परमेश्वरा रोजची मीठभाकर आह्मांला दे,’ अशीं परस्परविरोधि वाक्यें बायबलांत आढळतात. या वाक्यांचा मेळ आपण कसा घालणार ? तसेंच, ज्यांनां अन्नपाण्याची केव्हांच ददात नसते असे श्रीमंत लोक आणि राजेरजवाडेहि ‘ परमेश्वरा, आह्मांला मीठभाकर दे,’ अशी प्रार्थना करीत असतात, हें किती चमत्कारिक आणि असंबद्ध दिसतें बरें ! या प्रार्थनेचा शब्दशः अर्थ घेतला, तर असंबद्धता दूर होत नाहीं, आणि अर्थबोध स्पष्ट होत नाहीं; पण जर सूक्ष्म विचार केला, तर या प्रार्थनेंत याचकवृत्ति किंवा भिक्षांदेहि नसून, पूर्ण सन्यस्तवृत्ति किंवा त्यागवृत्ति भरलेली आहे, असें दिसून येईल. “हे परमेश्वरा, या विश्वांतील सर्व ऐश्वर्य तुझें आहे, अखिल संपत्तीचा मालक तूं आहेस, माझें असें कांहीं नाहीं, सर्व कांहीं तुझेंच आहे,”अशी भावना राजानें मनांत आणिली, आणि मला मीठभाकर दे अशी जर त्यानें प्रार्थना केली, तर सर्वसंगपरित्यागाचें श्रेय किंवा फल त्याला मिळेल, आणि ही प्रार्थना किती तरी योग्य आणि अन्वर्थक होईल ! शिवाय ‘ मनुष्यानें अन्नावरच सर्वस्वीं राहूं नये,’ या वाक्याचा वरील प्रार्थनेशीं मेळ घालितां येईल.

बायबलांत असेंहि सांगितलें आहे, कीं, स्वर्गाचें राज्य–प्रभुकृपा संपादन करा, ह्मणजे सर्व वस्तु तुह्मांला आपोआप प्राप्त होतील. ‘प्रभुकृपा संपादन करा’ हें प्रार्थनेचें गुह्य आहे, आणि याला ख्रितानें बरेंच महत्त्व दिलें आहे. दुसऱ्या एका ठिकाणीं असें सांगितलें आहे, कीं, ‘तिला कष्टानें मूल होईल.’ मूल होईल पण किंमत पडेल. कष्ट किंवा त्रास ही किंमत होय. हें वाक्य स्त्रीकडेच न लावितां सर्वत्र लागू केलें पाहिजे. आशा सफल होतील, पण किंमत द्यावी लागेल. किंमत कोणती ? त्रास किंवा कष्ट. सर्व कामनांचा, आशांचा त्याग केल्यामुळें सकृद्दर्शनीं होणारे त्रास किंवा कष्ट हीच किंमत. कामना कोणाच्या सफल होतात,

---

* Man should not live by bread alone, and Give us our daily bread.

असें तुह्मांला वाटतें ? जो आशेचा दास होतो, कामनांनां चिकटून राहतो, त्याच्या काय ? छे, मुळींच नाहीं. तर जो आशेचा स्वामी होतो, कामनांची पर्वा करीत नाहीं, त्याच्याच इच्छा परिपूर्ण होतात.

आमच्या प्रार्थना सफल होतात, असें लोक ह्मणतात. प्रार्थना ह्मणजे याचना, भिक्षांदेहि, आर्जव असें जर कोणाला वाटत असेल, तर तें चूक आहे. प्रार्थना ह्मणजे याचना किंवा भिक्षांदेहि असेल, तर प्रार्थना केव्हांहि सफल होणार नाहींत. तुह्मीं याचना करून पहा, तुह्मांला केव्हांहि कांहीं मिळणार नाहीं. 'भिक्षांदेहि करा' ह्मणजे तुह्मांला नकारच मिळेल. प्रार्थना —खरी प्रार्थना—याहून उच्च आहे. इच्छेच्या किंवा कामनेच्या पलीकडे जाणें, ईश्वरेच्छेप्रमाणें सर्व कांहीं घडत आहे अशी मनांत भावना असणें, या स्थितीला प्रार्थना ह्मणतात. लोकांनां वाटतें, कीं, आपल्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं घडत असावें, व यास्तवच ते याचना—प्रार्थना नव्हे—करीत सुटतात. 'माझ्या नव्हे, तर ईश्वरा, तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं घडत आहे,' असें वाटणें, यांतच प्रार्थनेचें सार आहे. कितीहि संकटें येवोत, देहाला कितीहि त्रास व वेदना होवोत, परिस्थिति कितीहि प्रतिकूळ असो, खरा भक्त **'राजी है हम उसीमें, जिसमें तेरी रजा है'** असेंच ह्मणतो. शरणागति, अहंकाराचा त्याग, खरी प्रार्थना ती हीच. 'ईश्वरा, तुझी इच्छा मान्य' यांतच प्रार्थनेचें सार किंवा गुह्य आहे. स्वार्थी इच्छेंत पर्यवसान होणाऱ्या प्रार्थना केव्हांहि सफल होत नाहींत. खऱ्या प्रार्थनेंत देह, मन, अहंकार, जग, आप्त, गणगोत इत्यादि सर्वांची विस्मृति असते. अशा तऱ्हेच्या प्रार्थनेंत तुमचा थोडा काल जरी गेला, आणि त्यानंतर तुमच्या मनांत एकादी इच्छा उद्भवली, तर ती सफल झालीच पाहिजे. देह व अहंकार यांची विस्मृति, जगाचीहि विस्मृति, सर्वस्वार्पण, पूर्ण शरणागति हीच खरी प्रार्थना, आणि हीच सफल होते.

आह्मी असे कांहीं लोक पहातों, कीं, ते कांहीं स्तोत्रें ह्मणत नाहींत, किंवा इतर लोकांप्रमाणें प्रार्थना करीत नाहींत. तरी पण त्यांच्या कामना सफल होतात. हें कसें होतें, आणि या लोकांत काय विशेष असतें,

याचा आपण विचार करूं. अमुक एक वस्तु हवी असें आपणांला वाटूं लागलें, कीं, आह्मी त्या वस्तूसाठीं याचना करूं लागतों. ती कशी मिळेल या विवंचनेंत असतों. आह्मी या दीन याचकवृत्तींत असेपर्यंत ती वस्तु आह्मांला मिळत नाहीं. एकाद्या श्रीमंतापाशीं जावयाचें असेल, तर आह्मी नीटनेटका पोषाख करून जातों. ईश्वर तर सर्वांत श्रेष्ठ, सर्वांत उच्च आहे. तो सर्व इच्छा, वासना आणि गरजा यांच्या पलीकडे आहे. त्याच्याकडे जावयाचें असेल, तर त्याला साजेल अशा वेषांत आह्मीं त्याकडे गेलें पाहिजे. ह्मणजे तुह्मीं ही दीन याचकवृत्ति सोडून देऊन, परिपूर्ण झालें पाहिजे. भिकाऱ्यावर कोणी प्रेम करीत नाहींत, जे ते त्यांनां टाळतात, आणि धुडकावून देतात. या देशांत भिकाऱ्यांनां जागा नाहीं. ईश्वराकडे जावयाचें तर त्याला साजेशा दिव्य पोषाखांत—दीन याचकवृत्तींचा, कामनांचा संपर्क नसलेल्या दिव्य वेषांत-गेलें पाहिजे; आणि तसे तुह्मी त्याच्याकडे जाल, तरच तुमचें स्वागत होईल.

इच्छा, कामना किंवा गरजा असलेला मनुष्य नेहमीं विवंचनेंत व काळजींत असतो, आणि त्यामुळें त्याला सुख होत नाहीं. इच्छा सफल झाली किंवा हवी असलेली वस्तु प्राप्त झाली, ह्मणजे सुख होतें. वस्तु-कामना आणि वस्तुप्राप्ति या दोन गोष्टींमध्यें विरोध आहे. पहिलींत सुख नाहीं, दुसरींत सुख आहे. तुह्मांला एकादी वस्तु हवी असली, ह्मणजे तुह्मी त्या वस्तूच्या मागें धांवत असतां. याचा अर्थ असा, कीं, ती वस्तु श्रेष्ठ होते, आणि तुह्मी दीन--त्या वस्तूहून हीन असे होतां. तुह्मी त्या वस्तूकडे खेंचले जातां, ती वस्तु तुमच्याकडे येत नाहींत. अशा स्थितींत कांहीं काळ गेला ह्मणजे तुह्मीं कंटाळतां, निराश होतां, आणि त्या वस्तूचा नाद सोडून देतां. त्या वस्तूकडे तुह्मीं पाठ फिरविलीत ह्मणजे पारडें बदलतें. तुह्मी त्या वस्तूपेक्षां श्रेष्ठ होतां आणि ती वस्तु मग तुमच्याकडे येऊं लागते. अशा तऱ्हेचा अनुभव तुमच्या-पैकीं पुष्कळांनां आला असेल. एकाद्या व्यक्तीवर किंवा वस्तूवर तुमचें मन जडलें, तिच्याकरितां तुह्मी हपापूं लागलां, ह्मणजे तुमचा हेतु

सिद्धीला जात नाहीं; पण जेव्हां तुह्मी उच्च ध्येय मनांत आणून 'मी–तूं' हा भाव टाकून त्या व्यक्तीचा अगर वस्तूचा नाद सोडून देतां, तेव्हां तुमचा हेतु सिद्धीला जातो, आणि तुह्मीं इच्छिलेली व्यक्ति अगर वस्तु तुह्मांला प्राप्त होते. वस्तुस्थिति किंवा सत्य असें आहे.

हें होतें कसें? 'सम समाला आकर्षून घेतें,' या तत्त्वाप्रमाणें सूर्य, पृथ्वी आणि ग्रह हे एकाच जड वस्तूचे केलेले आहेत. त्यांपैकीं सूर्य, पृथ्वी व ग्रह यांनां आकर्षण करितो. पृथ्वी सूर्याला आकर्षूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें धनविद्युत् ऋणविद्युत्‌ला आकर्षून घेते. पदार्थ भिन्न वस्तूचे नसतात; पण त्यांमध्यें उच्चनीचभावाचा–दर्ज्याचा फरक असतो. मोठा पदार्थ लहान पदार्थाला आकर्षून सोडितो, हा आधुनिक शास्त्राचा नियम सर्वांनां माहीत आहे. त्याप्रमाणें तुह्मी जेव्हां एकाद्या वस्तूचा नाद सोडितां आणि निरिच्छ व पूर्ण होतां, तेव्हां तुह्मी सूर्याप्रमाणें श्रेष्ठ होतां; आणि ती वस्तु पृथ्वीप्रमाणें किंवा ग्रहांप्रमाणें तुमच्याकडे खेंचली जाते.

याप्रमाणें इच्छिलेली वस्तु तुह्मांला प्राप्त झाल्यानंतर तुह्मी फुगून जातां, आणि नंतर त्या वस्तूची महती तुह्मांला वाटूं लागते. असें झालें ह्मणजे पुनः घोंटाळा होतो. तुह्मी राज्यपदारूढ झालां ह्मणजे ज्याप्रमाणें जहागीरदार सरदार तुमच्या भेटीला मुद्दाम येतात, त्याप्रमाणें निरिच्छतेच्या आणि पूर्णतेच्या श्रेष्ठ पदावर तुह्मी गेलां, ह्मणजे इच्छा, कामना आणि इतर पदार्थ तुह्मांला शोधीत येतात. पण लोक नेहमीं त्या अवर्णनीय श्रेष्ठ पदावर राहत नाहींत. पदार्थांनां भुलून जाऊन ते खालीं येतात, आणि चिंता, काळजी, गरजा यांनीं त्रस्त होतात. त्यामुळें ते पदार्थ त्यांनां सोडून जातात. याप्रमाणें हें चाललेलें असतें.

दुसऱ्या एका उदाहरणानें हें अधिक स्पष्ट करून सांगतां येईल. आगगाडीच्या डब्याच्या दरवाज्यापाशीं एक मनुष्य उभा आहे. 'इकडे ये, इकडे ये,' असें ह्मणून तो आपल्या एका मित्राला बोलावितो. मित्र

तेथें आल्यावर आपण दरवाज्यांतून निघून मित्राला आंत येण्यास वाट द्यावी, याचें भान, अत्युत्सुकतेमुळें त्याला राहत नाहीं. तो दरवाज्यांतच बोलत उभा रहातो. यामुळें मित्राचा आंत प्रवेश होत नाहीं. गाडी तर इतक्यांत निघून जाते, आणि हा आपला एकटाच राहतो. त्याप्रमाणें हें होतें.

तुह्मीं एकादी वस्तु मिळावी अशी इच्छा करितां. ही तुमची इच्छा तीव्र झाली, ह्मणजे इच्छिलेली वस्तु तुमच्याकडे येऊं लागते. पण तुमच्या अत्युत्सुकतेमुळें तुह्मी त्या वस्तूला आंत येऊं देण्याचा मार्ग मोकळा करून देत नाहीं. प्रथम तुह्मी इच्छा करून—मागणी किंवा याचना करून वस्तूला तुमच्यापाशीं आणितां. पण पुढें तिचा प्रवेश होऊं देण्याकरितां तुह्मीं दरवाजा सोडून—निरिच्छ होऊन आंत गेलें पाहिजे. वस्तुप्राप्ति, द्वार खुलें करण्यावर (निरिच्छतेवर) अवलंबून आहे.

या जागेची हवा सूर्याच्या उष्णतेमुळें गरम होते व हलकी होऊन वर जाऊं लागते; आणि बाहेरील हवा आंत येऊन मोकळी झालेली जागा भरून काढिते. पहिल्या हवेनें आपलें ठाणें सोडिलें नाहीं, तर बाहेरच्या हवेला आंत येण्यास मार्ग नाहीं. त्याप्रमाणें जोंपर्यंत तुह्मीं इच्छा, वासना, अहंकार इत्यादि प्रकार बाळगिले आहेत, तोंपर्यंत तुमच्या वासनेचे विषय तुमच्याकडे येणार नाहींत. सर्व वासना सोडून देऊन निरिच्छ व्हा, ह्मणजे त्या वासना सफल होतात.

असे कांहीं लोक आहेत, कीं, त्यांचे हुकूम सूर्य, चंद्र आणि पंचमहाभूतें पाळितात. त्यांच्या या अचाट शक्तीचें आणि प्रभावाचें गुह्य काय आहे? तें गुह्य इतकेंच, कीं, त्यांच्या इच्छा किंवा कामना स्वतःविषयीं नसतात. त्या क्षुद्र व स्वार्थीहि नसतात. त्यांच्या इच्छा एकाद्या निरिच्छ व निष्काळजी राजाच्या वचनाप्रमाणें असतात. राजा मौजेकरितां हुकूम सोडितो. त्याचे हुकूम पाळिले किंवा न पाळिले तर त्याबद्दल त्याला कांहीं वाटत नाहीं. राजाला स्वतःविषयीं कांहीं इच्छा नसते. आणि

तो स्वतःविषयीं कांहीं करीत नसून लोकांच्या कल्याणासाठीं झटत असतो. अशा राजाप्रमाणें निरिच्छ असलेल्या लोकांचे हुकूम सूर्य, चंद्र आणि महाभूतें पाळितात. तुह्मी निरिच्छ झालां ह्मणजे तुमच्या इच्छा सफल होतात. हेंच कामनापूर्तीचें गुह्य आहे.

या जगांत सूर्य सर्व कांहीं करीत आहे. सूर्य नसता तर हवा थंड आणि स्थिर झाली असती, आणि कोणताहि आवाज आमच्या कानावर आला नसता. सूर्याच्या उष्णतेमुळें आह्मांला घ्राणेंद्रियाचा आणि रसनें-द्रियाचा उपयोग करितां येतो. सर्व पिकें सूर्याच्या उष्णतेमुळें पिकतात. सर्व कांहीं आह्मांला सूर्यापासून बिनतक्रार मिळतें. हें सर्व सूर्याला कसें करितां येतें? याचें कारण, तो कोणत्याहि गोष्टीमध्यें मिसळत नाहीं, कशा-वरहि आसक्ति ठेवीत नाहीं. तो साक्षी या नात्यानें आपल्या वैभवांत असतो, आणि सर्व गोष्टी आपोआप होऊं लागतात. एकादा राजा किंवा बाद-शहा आला ह्मणजे लोक त्याला आसन देतात, त्याच्या खाण्यापिण्याची, निजण्याबसण्याची सर्व कांहीं व्यवस्था करितात. राजाला स्वतः होऊन कांहीं करावें लागत नाहीं. त्याप्रमाणें सूर्याभोंवतीं पृथ्वी आणि इतर ग्रह भ्रमण करितात, आणि आपल्या सर्व बाजू त्याला दाखवितात. सूर्य उगवला ह्मणजे पर्वतावरील बर्फाच्या नद्या वाहूं लागतात, वारा धावूं लागतो, आणि पिकें वाढूं लागतात; जिकडे तिकडे आनंदी-आनंद होऊन जातो. हें सर्व सूर्य साक्षी या नात्यानें आपल्या वैभवांत असल्यामुळें घडून येतें. ह्मणून वेदान्त सांगतो, कीं, संसारांत राहत असतां, तुह्मीं जर संसारांतील कोणत्याहि वस्तूवर आसक्ति ठेवणार नाहीं, कोणत्याहि वस्तूंशीं मिळणार नाहीं, सूर्याप्रमाणें साक्षी या नात्यानें राहून ईश्वरचिंतनांत—आत्मध्यानांत आपला काळ घालवाल, तर तुह्मी समर्थ व्हाल, आणि तुमचे हुकूम सर्वजण पाळतील. ज्या-प्रमाणें एकादा सृष्टीचा सुंदर देखावा तुमच्या नेत्रांनां यत्किंचित् त्रास न देतां तुमच्या मनांत संथपणें भरतो, त्याप्रमाणें संसारांतील सर्व गोष्टी, सर्व सुखदुःखें, संपत्तिविपत्ति, मानापमान इत्यादिकांचें ओझें किंवा

त्रास तुह्मांला बिलकूल वाटूं नये. कोणत्याहि गोष्टीनें त्रस्त न होतां, अलिप्त—साक्षी या नात्यानें तुह्मीं संसारांत रहावें. याप्रमाणें तुह्मी राहूं लागलां, कीं, तुह्मी मुनीप्रमाणें श्रेष्ठ व्हाल, आणि निसर्गांतील सर्व देवदेवता तुमच्या आज्ञा शिरसा मान्य करितील.

कामनांच्या पलीकडे चला, निरिच्छ व्हा, ह्मणजे त्या कामना पूर्ण होतील. येथें कोणी असा आक्षेप घेतील, कीं, तुह्मी ह्मणतां हें सर्व ठीक आहे. हा तुमचा कर्मवाद किंवा प्रयत्नवाद झाला. याचा दैववादाशीं तुह्मी कसा मेळ घालणार ? याचें उत्तर असें आहे, कीं, आमच्या इच्छा किंवा कामना यदृच्छेनें कशा तरी उत्पन्न होणाऱ्या नसून त्या स्वाभाविक आहेत. निसर्गाच्या नियमांप्रमाणें पुढें घडून येणाऱ्या गोष्टींचीं त्या पूर्वचिन्हें आहेत. भावी गोष्टी आपल्या छाया तुमच्या मनांत पूर्वींच पाडतात, आणि त्या इच्छारूपानें प्रगट होतात.

अशी एक गोष्ट सांगतात, कीं, एक बाई आपला फोटो काढून घेण्यासाठीं एका उत्तम फोटोग्राफरकडे गेली. फोटोग्राफरनें आपला क्यामेरा व्यवस्थित लाविला, आणि एक फार नाजूक प्लेट--कांच घालून त्यानें तिचा फोटो घेतला. नंतर कांच तपासून पहातां त्या स्त्रीच्या मुखावर देवीच्या व्रणांची छटा दिसून आली. त्याला मोठें आश्चर्य वाटलें. बाईचा चेहरा तर दिसतो सुरेख आणि साफ, आणि हे डाग आले कोठून, याचा कांहीं उलगडा होईना. त्यानें तिचे बरेच फोटो घेतले, पण प्रत्येक कांचेवर देवीच्या व्रणाची छटा आहेच. शेवटीं निराश होऊन त्यानें तिला, आणखी कांहीं दिवसांनीं यावें, चांगला फोटो घेऊं, असें सांगून निरोप दिला. ती स्त्री घरीं गेली आणि कांहीं तासांनीं तिला देवीचा आजार झाला. हें कसें ? त्या बाईच्या एका बहिणीला देवीचा आजार झालेला होता. तिनें आपल्या हातानें लिहिलेलें आणि ओठानें चिकटविलेलें एक पत्र या बाईला पाठविलेलें होतें. हिनें तें पत्र उघडून वाचलें, त्यावेळीं देवीची कांहीं लस हिच्या आंगांत शिरली असावी. साध्या नेत्रांनां ही लस दिसण्याजोगी नव्हती. तरी

नाजूक द्रव्यांच्या साहाय्यानें क्यामेऱ्यानें ती दृष्टोत्पत्तीला आणिली. या गोष्टींत प्रत्ययाला आल्याप्रमाणें आमच्या इच्छा किंवा कामना ह्मणजे अद्यापि मुखांवर ( प्रगट ) न दिसणाऱ्या भावी गोष्टीचे डाग—मनोरूपी क्यामेऱ्यांतील डाग ( चिन्हें ) होत. या दृष्टीनें पाहतां, आमच्या मनांत इच्छा उत्पन्न झाल्या, कीं, त्या पुढें पूर्णत्वाला येणार हें सिद्ध होतें. किंवा या इच्छा आमच्या भावी गोष्टींच्या सूचक आहेत, असेंहि ह्मणतां येईल.

एका दृष्टीनें पाहतां, आमच्या नशिबांतील सर्व गोष्टी, बाह्य परिस्थितीनें मर्यादित असतात. दुसऱ्या दृष्टीनें पाहतां, आमच्या इच्छा अनियंत्रित किंवा स्वतंत्र असतात, आणि त्या पूर्ण होतात असें वाटतें. आह्मी ह्मणतों, आह्मी स्वतंत्र—मुक्त आहों आणि आमच्या इच्छा सफल होणारच. या रीतीनें प्रयत्नवाद आणि दैववाद यांचा मेळ घालितां येतो. आमच्या इच्छा जर पूर्ण होतात, तर मग इतकें दुःख कां होतें? आणि इच्छापूर्तीसाठीं आह्मांला किंमत कां द्यावी लागते? असा कोणी प्रश्न करील. पण तेंहि अवश्य आहे. हें एका उदाहरणानें स्पष्ट करून दाखवितां येईल.

आपल्या मित्राच्या भेटीविषयीं फार उत्सुक झालेला एक गृहस्थ त्याला पत्र लिहीत होता. पुष्कळ दिवस तो मित्र त्याला भेटला नव्हता, आणि त्याचें कांहीं वर्तमान त्याला समजलें नव्हतें. लिहितां लिहितां पत्र बरेंच लांबलें, आणि तो त्या कामांत इतका मग्न झाला, कीं, त्याला दुसऱ्या कशाचीहि स्मृति राहिली नाहीं, किंवा आजूबाजूला त्यानें ढुंकूनहि पाहिलें नाहीं. याप्रमाणें पाऊणतास त्याचें पत्रलेखनाचें काम एकसारखें चाललें. शेवटीं पत्र लिहून झाल्यावर आणि त्यावर आपली सही केल्यावर त्यानें आपलें डोकें वर केलें, तों काय चमत्कार सांगावा! त्याचा प्रिय मित्र त्याच्यासमोर उभा! एकदम त्यानें उडी मारून आपल्या मित्राला आलिंगन दिलें आणि ह्मणाला "आपली स्वारी येथें केव्हां आली?" "मला येथें येऊन अर्धा तास झाला." मित्रानें उत्तर दिलें. यावर तो ह्मणाला "तर मग तूं मला तेव्हांच कां कळविलें नाहींस?"

मित्र ह्मणाला "तूं कामांत पूर्ण गढून गेला होतास, त्यांत व्यत्यय आणणें मला आवडलें नाहीं." आमचें सर्व असेंच होतें.

तुमच्या इच्छा–कामना या त्या पत्रलेखनाप्रमाणें आहेत. तुह्मी ज्याला पत्र लिहीत आहां, ह्मणजे ज्या वस्तूविषयीं इच्छा करीत आहां, तो मित्र किंवा ती वस्तु तर कर्मतत्त्वाच्या गूढ नियमांप्रमाणें तुमच्यासमोर आहे. मग ती तुह्मांला गोचर कां होत नाहीं? कां कळत नाहीं? कारण, तुमचें पत्र लिहिण्याचें–इच्छिण्याचें काम एकसारखें चाललें आहे. तुह्मीं पत्र लिहिण्याचें बंद केल्याबरोबर–निरिच्छ झाल्याबरोबर, इच्छित वस्तु तुमच्यासमोर येऊन उभ्या राहतात. किंमत ती याकरितांच द्यावी लागते.

हा विषय प्रतिपादन करणाऱ्या शेंकडों गोष्टी हिंदुधर्मग्रंथांमध्यें आहेत. त्यांपैकीं एक येथें सांगतों. एका राजाच्या प्रधानानें लक्ष्मीचा साक्षात्कार व्हावा ह्मणून अनेक साधनें व अनुष्ठानें केलीं. साक्षात्कार करून देणाऱ्या मंत्रांचा त्यानें कोटि जप केला, पण सर्व व्यर्थ. लक्ष्मीचें त्याला कांहीं दर्शन झालें नाहीं. अखेरीला तो निराश झाला, आणि मंत्रतंत्रांवरील त्याचा विश्वास अगदीं उडाला. शेवटीं संन्यास घेऊन साधु होण्याचें त्यानें ठरविलें. संन्यासदीक्षा घेऊन ज्यावेळीं तो अरण्यांत जावयाला निघाला, तेव्हां लक्ष्मीदेवी मूर्तिमंत त्याच्यासमोर उभी राहिली. तेव्हां तो तिला ह्मणाला "देवि, आतां तूं येथें कां आली आहेस? चालती हो. मला तुझी गरज नाहीं. मी साधु झालों आहें. मला आतां संपत्ति, ऐश्वर्य, भोग इत्यादिकांशीं काय कर्तव्य आहे? मला जेव्हां तुझी गरज होती, तेव्हां तूं आली नाहींस; आतां मला तुझी इच्छा नाहीं, अशा स्थितींत तूं माझ्यासमोर आली आहेस!" देवीनें उत्तर दिलें "माझ्या मार्गात तूंच आडवा होतास. जोपर्यंत तूं इच्छा करीत होतास, तोंपर्यंत तूं द्वैतांत होतास, दीन झाला होतास; आणि दीन याचकाला कांहीं मिळत नाहीं हें तर स्पष्ट आहे." तुह्मी इच्छेच्या, कामनेच्या पलीकडे गेलां, तिला झिडकारून देऊन निरिच्छ झालां, ह्मणजे तुह्मी देव–समर्थ होतां, आणि जयश्री समर्थालाच माळ घालिते.

# THE SPIRITUAL POWER THAT WINS.

## विजयी आध्यात्मिक शक्ति.*

प्रश्न–दुसरे आह्मांला जसें पाहतात, तसें आह्मीं स्वतःला पाहण्यास कसें शिकावें ?

उत्तर.–दुसरे जसें तुह्मांला पाहतात, तसें तुह्मीं स्वतःला पाहण्यास शिकण्यापासून कांहीं फायदा नाहीं! दुसरे लोक आमचें खरें स्वरूप पाहत नाहींत. मातापिता, बंधुभगिनी, शत्रुमित्र, आप्तइष्ट वगैरे सर्व, आह्मी जें कांहीं नाहीं–आमचें जें खरें स्वरूप नव्हे, तेंच आमच्या कानींकपाळीं ओरडत असतात. कोणी आह्मांला पुत्र ह्मणतो, कोणी बंधु ह्मणतो; कोणी मित्र, कोणी शत्रु ह्मणतो. कोणी स्तुति, कोणी निंदा करितो. अशा रीतीनें सर्वजण आह्मांला संकुचित आणि मर्यादित करून सोडतात. या सर्वांनां न जुमानतां जो कोणी आपलें ईश्वरत्व–आपलें आत्मतत्त्व सदा प्रतिपादन करितो, तो मनुष्य धन्य होय. जो जगाची किंवा अखिल विश्वाची पर्वा न करितां, आपल्या आत्मतत्त्वाचें समर्थन करितो, तो जगाला तुच्छ लेखण्याइतका समर्थ होतो. तुह्मी आत्मतत्त्वाचें समर्थन करूं लागलां, कीं, अखिल विश्वानें तुह्मांला देव असें मानिलेंच पाहिजे.

प्रश्न–राजयोगाचा अर्थ कृपा करून सांगा.

उत्तर–राजयोग ह्मणजे ध्यानाचा, एकाग्रतेचा राजमार्ग. हा शब्दशः अर्थ आहे.

प्रश्न–वेदान्ताचा फैलाव करण्यास कोणता उपाय, कोणती पद्धति उत्तम आहे, हें सांगा.

उत्तर–वेदान्ताचा फैलाव करण्याचा उत्तम उपाय ह्मटला ह्मणजे, वेदान्त स्वतः आचरणांत आणणें, त्याप्रमाणें आपण वागणें, हा होय. याहून अन्य मार्ग नाहीं.

---

* तारीख ५ फेब्रुवारी १९०३ इसवी रोजीं, जी. जी. हॉलमध्यें झालेलें व्याख्यान.

लोकांनां नेहमीं जडवस्तु पाहिजेत, हातांत धरितां येण्याजोग्या कांहीं स्थूल वस्तु पाहिजेत, पण त्या त्यांनां मिळत नाहींत; आणि नेहमीं त्यांची निराशा होत आहे, तरी त्यांची इच्छा नाहींशी होत नाहीं. त्यांनां रोकड नाणें, रोख पैसा हवा. नामरूपांचा त्याग करावा, असें त्यांनां वाटत नाहीं.

बाबांनों! हें तुमचें रोकड नाणें, स्थूल वस्तु इत्यादि सर्व इंद्रियांचा भ्रम आहे, हें लक्ष्यांत ठेवा. अशा पदार्थांवर—'वस्तुस्थिति आणि आंकडे-शास्त्र' यांवर सर्व भार ठेवणाऱ्या मनुष्याला कधींहि यश येत नाहीं. सूक्ष्मतत्त्वावर—सत्यावर विश्वास ठेविल्यानेंच मनुष्य विजयी होतो. त्या सूक्ष्मतत्त्वाचा आश्रय करा, त्याचा अनुभव घ्या, ह्मणजे तुमचे स्थूल पदार्थ, नामरूपें हीं तुह्मांला शोधीत येतील.

हें एका उदाहरणानें अधिक स्पष्ट होईल. एकदां दोन मनुष्यें नदीच्या जोरदार प्रवाहांतून वाहून जात होतीं. त्यांपैकीं एकाला एक मोठा ओंडका सांपडला. दुसऱ्याला तीरावरील लोकांनीं टाकलेली एक लहानशी दोरी मिळाली. ओंडका धरलेला मनुष्य प्रवाहाच्या जोरानें वाहून गेला आणि बुडाला; पण दोरी धरलेल्या मनुष्याचे प्राण वांचले. त्याप्रमाणें नांवलौकिक, वित्त, जमीनजुमला, ऐश्वर्य हें सर्व त्या लांकडाच्या ओंडक्याप्रमाणें मोठें वाटतें, परंतु तें तारक नाहीं. तारक तत्त्व त्या सूक्ष्म धाग्याप्रमाणें आहे. बाह्य वस्तूंपेक्षां या सूक्ष्म तत्त्वावर—सत्यावरच अधिक निष्ठा ठेवा. तुह्मीं या सूक्ष्मतत्त्वाचा—आत्मतत्त्वाचा साक्षात्कार घेतलात, ह्मणजे तुह्मी अरण्यांत रहा किंवा दाट वस्तीच्या शहरांत रहा, सर्व जग तुह्मांला अनुकूल होईल.

हें समोरचें मेज हलवावयाचें असल्यास दुरून किंवा मधून हात घालून जोर केल्यानें तें हलावयाचें नाहीं. परंतु आपल्या जवळच्या मेजाच्या बाजूला किंवा कोपऱ्याला नेट लाविला, तर तें सहज ओढतां किंवा हालवितां येतें. हें सर्व जग मेजाप्रमाणें आहे. तुमचा देह हा

त्या मेजाचा एक कोना किंवा बिंदु आहे. या बिंदूला—देहाला धरून तुह्मीं त्याला जोरानें हालविलें—उन्नत केलें—तो आत्मा, ईश्वर आहे असें मानिलें, ह्मणजे सर्व दुनिया हालून जाईल ! ज्या मानानें आपण आपल्याला हालवितों, त्या मानानें आपणांला जग हालवितां येतें. मोठमोठ्या संस्था, देवालयें आणि मिशनें यांवर विश्वास ठेवणें ही मोठी चूक आहे. आणि यानें अपयशाशिवाय दुसरें कांहीं आपल्या पदरांत पडत नाहीं, असें पुढेंमागें जगाच्या निदर्शनाला येईल. तसेंच मोठमोठ्या संस्था आणि सभा यांवर भार न ठेवितां, जे कोणी एकावरच--आपल्या स्वत:वरच अवलंबून राहतात, तेच जगांत मोठी क्रांति करून सोडितात. संस्थेंतील लोक—सभासद वर्गणी गोळा करितात, इमारती बांधितात, कपडेलत्ते खरेदी करितात, पण अशा तऱ्हेचा जय—जमवाजमव ह्मणजे कांहीं आध्यात्मिक उन्नति नव्हे !

अरण्यांत कोल्हे मोठमोठ्या संस्था करितात आणि सभा भरवितात. ते एकत्र राहतात, मिळून फिरतात, आणि मिळून ओरडत असतात. तसेंच मेंढ्याहि कळप करून राहतात. पण मेंढ्या आणि कोल्हे आपल्या शत्रूंसमोर उभे राहूं शकतात काय ? नाहीं. सिंह कळप करून राहिले आहेत, एकत्र फिरत आहेत, असें तुह्मीं कधीं ऐकिलें आहे काय ? गरुडपक्षी कळप ( संस्था ) करून राहतात काय ? नाहीं. लहानसहान पक्षीच मिळून उडतात. सिंह आणि गरुडपक्षी एकटेच राहतात, पण पशूंच्या आणि पक्ष्यांच्या संस्थांनां—कळपांनां पळवून लावण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं असतें. हत्ती फार बळकट असून ते कळप करून राहतात; पण एकच सिंहाचा छावा त्यांचा धुव्वा उडवितो. याकरितां मोठमोठ्या संस्था आणि सभा यांवर अवलंबून राहूं नका. आपलें अंत:सामर्थ्य वाढविणें हें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म आहे. तसेंच वेदान्ताचा फैलाव करण्याचा उत्तम मार्ग ह्मटला ह्मणजे तो जनान्तीं किंवा एकान्तीं आपल्या आचरणांत आणणें हा होय. वेदान्त आचरणांत आणून तर पहा. हवा, सूर्य, चंद्र, तारे आकाश

इत्यादि सर्व तुमच्यापासून धडा घेतील, आणि वेदान्ताचा प्रसार करितील!

ख्रिस्त किंवा शंकराचार्य यांनीं कांही सभा अथवा समाज स्थापन केले काय? छे, ते बिचारे एकटेच राहिले. प्रत्येकानें एकटेंच आपल्या पायांवर उभें राहिलें पाहिजे, आणि आपल्या अंतर्यामीं असलेल्या आत्मतत्त्वाचा–ईश्वरी तत्त्वाचा साक्षात्कार घेतला पाहिजे. तुह्मांला एकदां आत्मसाक्षात्कार झाला–आत्मज्ञान झालें, ह्मणजे सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें तें सर्वत्र पसरूं लागेल.

संपत्ति, बाह्य मदत, याचना इत्यादि गोष्टींच्या साहाय्यानें लोकांनां सुधारण्याचे प्रयत्न शेवटीं फिसकटणार, हें ध्यानांत ठेवा. अंतर्यामींच्या सत्य तत्त्वावरच अवलंबून रहा, आणि बाह्य मदत आपण होऊन तुमच्याकडे येईल, तर मेहेरबानगी ह्मणून तिचा स्वीकार करा. बाह्य वस्तूंवर तुह्मीं आपली सर्व भिस्त ठेविलीत, ह्मणजे त्या वस्तु तुह्मांला सोडून जातात, असा नियम आहे. याकरितां बाह्य मदतीचें स्तोम माजवूं नका. आपल्या स्वतःवर विश्वास ठेवा; बाह्य आकार, मोठमोठ्या पदव्या, किताब यांच्यापासून कोणाचें कांहीं चांगलें झालें नाहीं, कोणाचें खरें हित झालेलें नाहीं. त्याचें पर्यवसान दुःख व त्रास यांतच होतें.

विजेच्या योगानें शवांत देखील थोडीशी चेतना आणितां येईल; शवाचे ओंठ, हातपाय किंवा इतर अवयव हालवितां येतील. पण, हें कांहीं चैतन्य–जीवित नव्हे. त्याप्रमाणें बाह्यमदत, संपत्ति व कपडेलत्ते यांपासून मिळणारी शक्ति, वर्तमानपत्रांतील स्तुति, अनुकूल टीका, शिष्य–भक्तमंडळींनीं दिलेला मान, इत्यादि प्रकार शवाला हालविणारे विजेचे झटके होत. यांच्यापासून दुःखाचें निवारण होत नाहीं आणि खरें चैतन्य मिळत नाहीं, कोणीहि स्वतंत्र–मुक्त होत नाहीं. कितीहि तुताऱ्या वाजविल्या, तरी देखील जीवितांचा लाभ होत नाहीं. जीविताची प्राप्ति किंवा वाढ ही बीजापासून आंतूनच होत असते. बीज

दिसतांनां अगदीं क्षुल्लक व लहान दिसतें खरें, पण त्यांतच खरें जीवित असतें; आणि कांहीं कालानंतर तें प्रगट होतें. आह्मांला जीवित किंवा चैतन्य पाहिजे, भपका किंवा सोंग नको. 'राम' सांगतो, कीं, बीज पेरा, सत्याचा उपदेश हृदयांत बिंबवा. बीज एकदां रुजलें, कीं, पुनः काळजी करण्याचें कारण नाहीं. वेदान्ताचा उपदेश, त्याचा प्रसार करावयाचा असेल, तर तुह्मी सत्याचा अनुभव घ्या; ह्मणजे बीज पेरल्यासारखें होईल. पुढील वाढीची काळजी करण्याचें कारण नाहीं. ती मग आपोआप होऊं लागेल.

एका साधूचा एक पट्टशिष्य होता. तो रोज आपल्या गुरूच्या भेटीला येऊन उपदेश श्रवण करीत असे. मध्यंतरीं गुरु कांहीं कामानिमित्त बाहेर गांवीं गेला, आणि कांहीं दिवसांनीं परत आपल्या गांवीं आला. त्यानंतर तो शिष्य आपल्या गुरूच्या दर्शनाला कधींहि आला नाहीं. दुसऱ्या लोकांनीं शिष्याच्या या गैरहजिरीबद्दल गुरूपाशीं तक्रार केली. साधु हंसून ह्मणाला "अहो, तुह्मीं त्याच्याविरुद्ध तक्रार कां करितां? त्यानें रोज माझ्याकडे कां यावें? माझ्या देहावर त्यानें इतकी ममता (आसक्ति) कां ठेवावी? मी ह्मणजे माझा देह नव्हे. माझा देह ह्मणजे मी, अशी जर त्याची समजूत असेल, तर याबद्दल त्याला प्रायश्चित्त मिळेल. मी आत्मा आहें, सत्य आहें, सच्चिदानंद आहें, असेंच त्यानें मला मानावें. माझ्या उपदेशावर श्रद्धा ठेवून त्याप्रमाणें त्यानें आचरण ठेविलें, तर तो खरोखर मुक्त व आनंदी होईल."

साधु पुढें ह्मणाला "उपदेशाचें बीज रोंविलें जात आहे, आणि त्याचा परिणाम योग्यकालीं होणारच. त्याविषयीं मी कांहीं काळजी करीत नाहीं." तसेंच, 'राम' तुह्मांला सांगतो, कीं, तुह्मीं सभा भरविण्याचें काम चालू ठेवा, न ठेवा; 'रामा'चें नांव लक्ष्यांत ठेवा, विसरा किंवा पायाखालीं चिरडा; स्तुति करा, निंदा करा किंवा या देहाची छीः थू करा, 'रामा'ला त्याचें कांहीं नाहीं! बीज रोंविलें जात आहे. त्याची वाढ—परिणाम होऊंद्या. जगाविषयीं किंवा जगांत जें जें कांहीं आहे,

त्या त्याविषयीं आह्मीं व्यर्थ त्रास कां करून घ्यावा ? जगाचे सुधारक ह्मणून आह्मी उभे राहिलों, कीं, तत्काल आह्मी जगाचे दुर्धारक होतों. 'वैद्या, तूं स्वतःला आधीं बरा कर.'

वेदान्ताप्रमाणें जग हें ईश्वराशिवाय कांहीं नाहीं ( ईश्वरच आहे ). तें पूर्ण आहे, माझा आत्मा आहे, सर्व जग एकच आहे. असें जर आहे, तर एक सुधारणेची दिशा घेऊन तुह्मीं मागसलेले लोक आहां, क्षुद्र कामनांमुळें तुह्मी दुःखी आणि त्रस्त आहां, ह्मणून मी यत्न करूं लागलों, तर तुह्मांला मीं विकल केल्यासारखें–माझ्याहून तुह्मी भिन्न आहांत असें मानण्यासारखें होईल. सुधारकांनों, तुह्मी लोकांनां पापी, विकल असें समजतां आणि त्यांनां शिव्या देतां काय ? तुमच्या मदतीची अपेक्षा करण्याइतकें जगानें अकिंचन कां व्हावें ? कृष्ण, बुद्ध, ख्रिस्त इत्यादि महात्मे आले, आणि त्यांनीं लोकांनां सुधारण्याचा, त्यांची उन्नति करण्याचा प्रयत्न केला. पण जगाची सुधारणा न होतां, तें होतें तसेंच आहे. पूर्वींप्रमाणें सध्यांहि जगांत दुःख, त्रास आणि संकटें भरलेलीं आहेत. आज लोक अधिक सुखी आहेत काय ? आगगाड्या, तारायंत्रें, टेलिफोन, मोठमोठीं जहाजें इत्यादि तुमच्या आधुनिक शास्त्रांच्या शोधांनीं लोकांनां अधिक सुखी केलें आहे काय ? एकाद्या अपूर्णांकाचें भाज्य आणि भाजक हे दोन्ही वाढविले असतां तो अपूर्णांक मोठा दिसतो खरा, पण त्याची किंमत कांहींहि न वाढतां, आहे तशीच राहते. जर तुमचें उत्पन्न किंवा मिळकत वाढली, तर तुमच्या आशाहि वाढतात आणि खर्चहि वाढतो. हा प्रकार कुत्र्याच्या शेंपटासारखा आहे. तें सरळ धरलें तर सरळ राहतें. पण तें सोडून देतांच पूर्वींप्रमाणें वांकडें होतें. तेव्हां जगाची सुधारणा करण्याचा आव घालणारे किंवा लोकांचे सुधारक ह्मणून मिरविणारे लोक स्वतःच्या डोळ्यांत धूळ घालून घेतात, आणि आत्मवंचक होतात. ह्मणून तरुणांनों, लक्ष्यांत ठेवा, कीं, जगाशीं असा कांहीं व्यवहार सुरू करणें ही मोठी चूक आहे. स्वतःचा गुरुत्वमध्य

आपल्या बाहेर टाकूं नका. आपल्या ईश्वरत्वाचा अनुभव घ्या, आणि तुह्मीं हा साक्षात्कार मिळविल्याबरोबर तुमच्यामधून चैतन्य, सत्ता, शक्ति हीं बाहेर पडूं लागतील. सत्याचा प्रसार करण्याचा मार्ग हाच.

आर्किमिडीज नांवाचा एक ग्रीक गणितशास्त्रज्ञ असें ह्मणत असे, कीं, मला पृथ्वीबाहेर उभें राहण्यास स्थिर जागा आणि एक भला मोठा लांब दांडा मिळेल, तर मी सर्व पृथ्वीला हालवून सोडीन! पण त्या बिचाऱ्याला असें स्थिरस्थान मिळालें नाहीं. बाबांनों, ज्यावर उभें राहून सर्व पृथ्वी हालवितां येईल, असें स्थान ह्मणजे आपला आत्माच होय. आणि तो तर सर्व सौंदर्य, सर्व शक्ति, सर्व सत्ता यांचें उगमस्थान आहे. त्याचा तुह्मी साक्षात्कार घ्या. ह्मणजे तुह्मी विश्वाचे स्वामी व्हाल, जगाला हालवून सोडाल!

सूर्य वेदान्ताच्या तत्त्वांप्रमाणें वागत असतो. तो सर्व जगाला प्रकाश, उष्णता, चैतन्य देतो. अहंकार किंवा स्वार्थ बिलकूल न बाळगतां तो आपलें काम अकर्तृकपणें करीत असतो. आपण आतां येणार आणि अमुक करणार, अशी तो टिमकी वाजवीत नाहीं, किंवा नोटिसी अथवा जाहिराती वांटीत नाहीं. पण तो उदयाचलावर आला, कीं, काय चमत्कार होतो पहा! सर्व पृथ्वी हळुहळू सचेतन होऊं लागते, निसर्ग जागा होतो, रात्रौ गोठलेल्या नद्या सजीव होऊन नाचूंबागडूं लागतात, उपवनांतील गुलाब आणि सरोवरांतील कमलें प्रफुल्लित होतात, मनुष्यांचीं नेत्रकमलेंहि विकसित होतात, आणि त्यांच्या अंगीं शक्तीचा व चैतन्याचा संचार होऊं लागतो; रम्य वारे वाहूं लागतात, पक्ष्यांचें मधुर गायन सुरू होतें, आणि जिकडेतिकडे आनंदीआनंद होऊन जातो. या सर्व उल्हासाचें आणि आनंदाचें कारण काय? तर सूर्य साक्षी या नात्यानें आपल्या वैभवांत असतो. तो कोणत्याहि वस्तूशीं मिसळत नाहीं आणि कशाचेंहि श्रेय घेऊं पहात नाहीं. तत्त्व तें असें आहे. तुह्मीं आपला गुरुत्वमध्य स्वतःमध्येंच ठेवा, स्वतःवरच अवलंबून रहा, आपल्याचकरितां जगा. अंतर्यामीं असलेल्या आत्म्याचा अनुभव घ्या,

आपण परमेश्वर आहों, विश्वाचा स्वामी, न्याय, सत्ता, सौंदर्य यांचें उगमस्थान आहों, असा साक्षात्कार घ्या. हे आध्यात्मिक प्रयोग करून तरी पहा !

लहान मुलाला–अर्भकाला खूष करण्यासाठीं लोक किती प्रयत्न करितात. आईबाप व इतर नातलग त्या मुलाचे शिष्य किंवा खिजमतगार बनतात. ते मुलाप्रमाणें बोलूं लागतात, नाचतात, वेडींवांकडी तोंडें करितात, आणि आमचे हे चिमुकले जुलमी राजे त्यांच्या खांद्यावर आरूढ होतात. मूल निर्दोष, निष्पाप आणि पवित्र असतें. त्याला कशाचीहि भीति नसते. तुमचे डिमास्थेनीस किंवा बर्क यांच्या वक्तृत्वापेक्षां त्याचे फुगविलेले ओंठ अधिक जोरदार आणि अधिकारयुक्त असतात. हा जुलमी राजा अशक्त दिसतो. त्याचे हातपाय लहान असतात. पण त्याला आत्मविश्वास असल्यामुळें सर्व कांहीं त्याच्या इच्छेप्रमाणें घडून येतें. शरीरानें जरी तो दुर्बल असला, तरी आत्मविश्वासानें तो सशक्त असतो. त्या मुलाच्या हितासाठीं आईबाप आपली सर्व मिळकत खर्च करण्यास, पाहिजे तें करण्यास तयार असतात. मूल जगाची, शहाणपणाची पर्वा करीत नाहीं. तें आपल्या सुखांत मग्न असतें. तें पवित्र–निष्पाप असतें, हेंच त्याच्या सत्तेचें गुह्य आहे. त्याप्रमाणें तुह्मी वेदान्त आचरणांत आणा. आपण ईश्वर आहों, जगाचा स्वामी–विश्वाचा नियंता आहों, असा साक्षात्कार घ्या. मी सत्य आहें, मी ईश्वर आहें, असें तुमच्या रोमरोमांत वाटूं द्या. असें झालें, ह्मणजे तुह्मांलाहि अनेक शिष्य मिळतील. मुलांनांहि वर्तमानपत्रांत जाहिरात किंवा नोटीस दिल्याशिवाय अनेक शिष्य मिळतात. जो कोणी अर्भकाकडे सहज पाहतो, तो त्याचा शिष्य बनत नाहीं काय ?

वेदान्त आचरणांत आणा, ह्मणजे तुमचें भाषण ऐकण्यास हवे तेवढे लोक जमतील. चंद्र उगवल्यावर त्याचें दर्शन घेणारे लोक थोडथोडके नसतात. हिंदुस्तानांत कांहीं ठिकाणीं अमावास्येनंतर द्वितीयेच्या चंद्राचें दर्शन घेण्यास लोक फार उत्सुक असतात. त्यादिवशीं ते घरीं

सणावारासारखीं कांहीं गोडगोड पक्वान्नें करितात, आप्तइष्टांनां भेटण्यास जातात, सायंकाळीं घराबाहेर येऊन चंद्राचें दर्शन घेतात, आणि अंतर्यामीं असलेल्या ईश्वराची पूजा करितात.

तुमच्या अंतःकरणांत चंद्रोदय—आत्मोदय होऊंद्या, ह्मणजे पुढील कामाची--परिणामाची काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं. मार्ग आणि साधनें तुह्मांला शोधीत येतील. गुलाबाची कळी उमलली, कीं, भ्रमरांनां काय तोटा ! मध जिकडे आहे, तिकडे मुंग्या धांवणारच! याकरितां तुमच्या हृदयांत मध उत्पन्न करा, तुमच्या अंतःकरणांतील ज्ञानाची कळी उमलूंद्या. ह्मणजे तुह्मांला कशाचीहि जरूरी राहणार नाहीं. सर्व कांहीं तुमच्यापाशीं येईल. मुख्य गोष्ट ह्मणजे अंतर्यामींच्या ईश्वराचा—आत्म्याचा साक्षात्कार घेणें ही होय. या गोष्टीपासून तुह्मीं ढळलां, ह्मणजे प्रत्येक वस्तु तुह्मांला सोडून जाईल. पण, तुह्मी आत्म-साक्षात्कारांत चांगले गढून गेलां, वेदान्त आचरणांत आणिला, तर हें जग कुत्र्याप्रमाणें तुमच्यामागें धांवत येईल. जगाच्या मागें तुह्मी धांवूं नका. शक्तीचें--सामर्थ्याचें सर्व सार बाहेर कोठें नसून तुमच्यांतच आहे.

कॅलिफोर्निया प्रांतांतील 'शास्ता' झऱ्याचें पाणी फार उत्तम आहे. प्रत्येकजण तेथें जाऊं इच्छितो. येथें प्रेक्षक कसे येतील, जाहिरनामे किंवा नोटिसी काढून लोकांनां माहिती द्यावी काय, इत्यादि काळजी 'शास्ता' झऱ्यानें बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. लोकांनीं आपण होऊन तो झरा शोधून काढिला पाहिजे; आणि ते तसें करितात.

त्याप्रमाणें तुमच्या हृदयांतून ज्ञान, चैतन्य, पावित्र्य आणि प्रेम यांचे स्वच्छ झरे वाहूं लागले, ह्मणजे तुमच्या अंतःकरणांत 'शास्ता' झरा असल्याप्रमाणें झालें. मग प्रेक्षक आणि लोक तुह्मांला शोधीत येतील. नियम असा आहे. स्वच्छ झरे आपल्या अंतःकरणांत उत्पन्न करणें हीच महत्त्वाची गोष्ट आहे. तुह्मी एका गांवीं राहतां किंवा गांवोगांव फिरत असतां, यांत कांहीं विशेष नाहीं. तुह्मी कोठेंहि असा; जर तुमच्यामध्यें सत्य आहे, परमार्थ भरलेला आहे, तर लोक तुह्मांला

हुडकून काढतील. बाह्य वर्तनावर कांहीं अवलंबून नाहीं. अंतःकरणांत स्वच्छ झरे उत्पन्न करणें ह्मणजे ईश्वराला—आत्म्याला आपल्या आंत यथेच्छ वावरूं देणें होय.

आपला जन्म केव्हां झाला, हें कँटला माहीत नव्हतें, असें सांगतात. पण सर्व जग कँटला ओळखितें. एकाच स्थळीं राहिल्यानें यश मिळतें, असें कांहीं नाहीं. तुह्मी आध्यात्मिक शक्ति मिळवा, आणि कोठेंहि कोचावर पडा. तेथें येऊन, लोकांनीं तुमच्यापासून सत्याचा धडा घेतला नाहीं, तर विचारा.

न्यायाधीश कोर्टांत येऊन आपल्या स्थानावर आरूढ होतांच, पक्षकार, कारकून, वकील, साक्षीदार इत्यादि सर्व लोक आपोआप तेथें येतात. न्यायाधीशाला, त्यांनां बोलावणें पाठविण्याची जरूरी नाहीं. त्याला खोल्या झाडणें, साफ करणें, बैठक घालणें इत्यादि गोष्टी कधीं कराव्या लागत नाहींत. हीं सर्व कामें दुसरे लोक करितात.

'राम' सांगतो, कीं, प्रभूचें राज्य ( परमार्थ ) आपल्या हस्तगत करा—अंतर्यामीं असलेल्या ईश्वराला आपलासा करा. हे मानवांनो—नव्हे, हे ईश्वरांनो! तुह्मी राजे आहां, देव आहां, तेव्हां तशा तोऱ्यांत —ऐटींत तुह्मी चाला. तुमचे व्यवहार, पोषाख, आगगाडीचें भाडें, मालमत्ता, घरदार इत्यादि गोष्टींविषयीं काळजी करूं नका. हें सर्व बाह्य जगाचें, क्षुद्र देवतांचें काम आहे. तुह्मी पुढें व्हा, आपल्या ईश्वरी तत्त्वाचा--आत्मतत्त्वाचा साक्षात्कार घ्या. सूर्याचा सूर्य--सूर्य, चंद्र, तारे इत्यादिकांचा स्वामी आपण आहों असें जाणा, ह्मणजे देवदूत तुमची चाकरी करितील; जग तुमच्यामागें येईल. कायदा असा आहे, सत्य असें आहे, आणि यशाचें मर्म हेंच आहे. कृत्रिम नियम, 'सर्वशक्तिमान्' डालर ( पैसा ), नातलग, मित्र, नोकरचाकर इत्यादि गोष्टींवर यश अवलंबून आहे, असें लोक चुकीनें समजतात, आणि आपला नाश करून घेतात. अशा चुकीच्या समजुतीनें केलेले प्रयत्न बुलबुल पक्ष्याला बळजबरीनें गावयाला लावण्याच्या प्रयत्नासारखे आहेत. बुल-

बुल पक्ष्याला हिमालयाच्या एकाद्या उच्च सुरूच्या वृक्षावर बसूंद्या, ह्मणजे सुस्वर आपोआप ऐकूं येतील. त्याप्रमाणें जेव्हां तुह्मी अनुभवाच्या --साक्षात्काराच्या उच्च शिखरावर आपलें ठाणें मांडतां, ईश्वरी तत्त्वांत गढून जातां, तेव्हां तुमच्यामधून सत्कृत्यें, उदात्त जीवन, पवित्र आचरण हीं आपोआप प्रगट होऊं लागतील.

कृत्रिम नियम घालून आणि शिस्त लावून देऊन मोठीं मनुष्यें पैदा करावीं, आणि त्यांच्यावर आपला हुकूम चालवून लोकांचे आपण परीक्षक व्हावें, असें सुधारकांनां वाटतें. हें अस्वभाविक आणि अशक्य आहे. कांहीं लोक ह्मणतात, याला अभ्यास पाहिजे. पण 'राम' विचारतो, अभ्यास कोठून सुरू करणार ? बुलबुल पक्ष्याचा गळा धरून आणि 'हे पक्ष्या, खालीं ये आणि गा,' असें सांगून त्याचें मधुर गाणें ऐकावयाला मिळणार नाहीं. बुलबुल पक्ष्याला जेव्हां मुक्त करावें—मोकळा सोडावें, तेव्हांच तो सुंदर गाणें गाऊं लागेल. एरवीं नाहीं. त्याप्रमाणें तुह्मी जेव्हां मुक्त असतां—ईशचिंतनांत किंवा आत्मध्यानांत मग्न असतां, तेव्हां तुमच्या हातून उदार आचरण मर्दुमकीचीं कृत्यें होतील.

येथें एक लोखंडाचा तुकडा आहे असें समजा. त्या तुकड्यापाशीं दुसरे लोखंडाचे लहानसहान तुकडे ठेविले, तर त्यांनां आकर्षून घेण्याची शक्ति पहिल्या तुकड्यांत आहे काय ? नाहीं. पण जर तुह्मीं एक चांगला लोहचुंबक पहिल्या तुकड्याला लागून ठेविलात, तर तो तुकडा चुंबनधर्मविशिष्ट होतो, लोहचुंबक होतो आणि इतर लहानसहान तुकड्यांनां आकर्षितो. पण जर तुह्मीं पहिल्या तुकड्याला लोहचुंबकापासून दूर केलें, तर त्यांतील चुंबनधर्म नाहींसा होतो, व तो दुसऱ्या तुकड्यांनां आकर्षू शकत नाहीं. जोंपर्यंत पहिल्या तुकड्याचा लोहचुंबकाशीं संबंध असतो, तोंपर्यंत तोहि लोहचुंबक होतो. त्याचा तो संबंध तुटला, ह्मणजे त्याची आकर्षणशक्ति नाहींशी होते. खिस्ताची स्थिति पहिलीं तीस वर्षें त्या लोखंडाच्या पहिल्या तुकड्याप्रमाणें होती. तो एका अप्रसिद्ध सुताराचा मुलगा होता. त्याच्या आईबापांची

किंवा त्याची कोणाला विशेष माहिती नव्हती. पण पुढें त्यानें लोहचुंबकाशीं—आत्म्याशीं परमात्म्याशीं—आपला संबंध जोडला. यामुळें त्याच्या अंगीं विलक्षण शक्ति आली. कांहीं लोक त्याचे शिष्य झाले, आणि बरेचजण त्याला मान देऊं लागले. शेवटीं कांहीं कालापर्यंत खिस्ताचा लोहचुंबकाशीं असलेला संबंध तुटला असावा, असें दिसतें. कारण, त्यावेळीं कांहीं शिष्यांनीं त्याला दगा दिला, इतर शिष्य त्याला सोडून गेले. पूर्वीं ज्या लोकांनीं त्याला मान दिला होता, ते त्याच्याकडे पाहींनातसे झाले, आणि त्याला सुळावर चढविण्यांत आलें. त्याच वेळीं 'हे पित्या, मला तूं कां सोडिलेंस, माझा त्याग कां केलास?' असे उद्गार खिस्तानें काढिलेले आहेत. या उद्गारांवरून संबंध तुटला होता असें दिसतें. पण पुढें लागलीच त्यानें तो संबंध जोडून घेतला. त्याला जेव्हां क्रुसावर चढविलें, तेव्हां तो मृत्यु पावला नाहीं तीन दिवस योग्याप्रमाणें तो समाधींत होता, आणि नंतर तेथून तो काश्मीरास राहण्यास गेला असावा. 'राम' काश्मीरास गेला होता, तेव्हां त्याला खिस्ताच्या काश्मीरनिवासाविषयींचा कांहीं पुरावा—बऱ्याच खुणा सांपडल्या. काश्मीरांतील कांहीं शहरांनां जेरूसेलम प्रांतांतील शहरांचीं नांवें आहेत; काश्मीरांत त्या वेळेपासून सुरू झालेले कांहीं खिश्चन पंथ आहेत. हजार दोनहजार वर्षांपूर्वींचें एक थडगें आहे. त्याला इसाचें ( हिंदी भाषेंत येशू खिस्ताला 'इसा' असें ह्मणतात ) थडगें ह्मणतात. तेथें कांहीं लोक जखमेवर लावण्यास एक अंजन तयार करितात, त्याला 'इसांजन—खिस्तांजन' असें ह्मणतात. याच अंजनानें खिस्तानें क्रुसावर झालेल्या आपल्या जखमा बऱ्या करून घेतल्या होत्या, असें अंजन तयार करणारे लोक सांगतात, आणि या अंजनानें जखमा तावडतोब भरून येतात.

या खिस्तचरित्रापासून आह्मीं काय बोध घ्यावा ? जोंपर्यंत आमचा लोहचुंबकाशीं--आत्म्याशीं—परमात्म्याशीं संबंध असतो, तोंपर्यंत आमच्या अंगीं खिस्ताप्रमाणें शक्ति व सामर्थ्य असतें, आणि आमचा तो संबंध

तुटला, ह्मणजे तें सामर्थ्य नाहींसें होतें. ख्रिस्ताचा हा संबंध कसा तुटला, हें विचार करण्यासारखें आणि बोधप्रद आहे. त्याला अनेक बाह्य गोष्टी कारण झाल्या. तो लोकांशीं—सर्व तऱ्हांच्या लोकांशीं बराच मिसळला, त्यामुळें परमार्थाचें साधन किंवा अभ्यास चालू ठेवण्यास त्याला अवसर मिळाला नाहीं. आपलें सामर्थ्य कमी होत चाललें आहे, असें ख्रिस्तालाहि वाटलें, आणि तो आपल्या शिष्याला ह्मणाला, कीं, "मला कोणीं स्पर्श केला? माझी शक्ति जात चालली आहे." परमार्थसाधन सोडल्यानें किंवा लोकांत फार मिसळल्यानें शक्तीचा नाश होतो. ख्रिस्ताच्या या चुकीपासून आह्मीं चांगला बोध घ्यावा. कारण ख्रिस्ताचें किंवा दुसऱ्याचें चरित्र योग्य रीतीनें समजावून घेतलें असतां त्यापासून आमचा फायदा होतो.

वरील विवेचनावरून हें सिद्ध होतें, कीं, खरी शक्ति लोहचुंबकाशीं —परमात्म्याशीं संबंध ठेविल्यानें मिळतें. पण पुष्कळ लोक शक्तीचें कारण दुसरें कांहींतरी आहे, असें चुकीनें समजतात. अर्भकामध्यें जें कांहीं सामर्थ्य दिसतें, तें त्याच्या आत्म्याचें—परमात्म्याचेंच असतें. पण लोक या गोष्टीकडे लक्ष्य न देतां देहालाच सर्व महत्त्व देतात, आणि त्यामुळें आपलें व मुलांचें नुकसान करून घेतात.

वेदान्त हिंदुस्तानापुरताच आहे असें समजूं नका. तो जसा हिंदु-लोकांकरितां आहे, तसाच ख्रिश्चनलोकांसाठींहि आहे. 'ख्रिस्ताच्या द्वारें मुक्ति मिळते,' या सिद्धांताचा वेदान्ताच्या दृष्टीनें विचार करूं.

एकदां एका खुळ्या आईनें, खोलींत बागुलबोवा आहे असें आपल्या मुलाला सांगितलें. मुलाला तें खरें वाटलें. संध्याकाळीं बापानें खोलींत जाऊन कांहीं जिन्नस आण, असें त्या मुलाला सांगितलें. "बाबा, खोलींत बागुलबोवा आहे, मी तेथें जात नाहीं," असें मुलगा घाबरून ह्मणाला. "तेथें बागुलबोवा नाहीं, कांहीं नाहीं. तूं खोलींत जाऊन जिन्नस आण," असें बापानें कितीहि सांगितलें, तरी तो मुलगा खोलींत जाण्यास धजेना. बाप शहाणा होता. त्यानें मुलाच्या डोक्यां-

तून बागुलबोवाला हांकलण्याची एक युक्ति काढिली. एका चाकराला त्यानें सामील करून घेतलें, आणि एका उशीला नाक, तोंड, कान इत्यादि अवयव लावून त्या उशीसहित त्याला खोलींत पाठविलें. कांहीं वेळानें खिडकीच्या एका भोकांत उशीचा एक काळा भाग बाहेर दिसूं लागला. तेव्हां बाप मुलाला ह्मणाला "हें काय असेल बरें ? हा त्या बागुलबोवाचा कान तर नाहींना ?" मुलगा ह्मणाला "होय, तो त्याचा कानच; मीं सांगितलें नाहीं, त्या खोलींत बागुलबोवा आहे ह्मणून ?" बाप ह्मणाला "होय, तुझें ह्मणणें बरोबर आहे; पण, हें पहा, तूं शूर व धीट मुलगा आहेस; माझी काठी आण, आह्मी त्या राक्षसाचा समाचार घेऊं." मुलानें काठी आणिली आणि बागुलबोवाच्या कानावर एक तडाका दिला. आंतून रडणें सुरू झालें. कांहीं वेळानें खोलीच्या दरवाज्याच्या फटींत बागुलबोवाचे दोन कान दिसूं लागले. "मुला, सोडूं नको, पाहतोस काय, काठी चालूं दे," असें बापानें प्रोत्साहन देतांच मुलानें एकसारखें मारण्याचें काम सुरू केलें, तों आंतून किंकाळ्या ऐकूं येऊं लागल्या. "पहा, राक्षस कसा जेरीला आला!" असें बापानें ह्मणतांच मुलाच्या अंगीं अधिक हुरूप येऊन त्यानें एकसारखा मारण्याचा संपाटा चालविला. शेवटीं किंकाळ्या बंद झाल्या आणि राक्षस धपकन् खालीं पडला. तेव्हां दरवाजा उघडून उशी दाखवून बापानें मुलाला ह्मटलें " पहा, तूं बागुलबावाला इतकें बेदम मारिलें आहेस, कीं, तो उशीचें रूप धारण करून मृत होऊन पडला आहे!" मुलाला हें सर्व खरें वाटलें, आणि त्याची सर्व भीति नाहींशी झाली. बापानें मागितलेला जिन्नस नंतर त्यानें खोलींतून स्वतः आणून दिला.

लहान मुलांची भीति घालविण्याकरितां किंवा त्यांनां ताळ्यावर आणण्याकरितां हा योग्य उपाय असेल. पण कोणीहि समंजस बाप प्रौढ मुलांकरितां असा उपाय योजणार नाहीं. उशीला प्रहार केल्यानें बागुलबोवा नाहींसा झाला नाहीं. बागुलबोवा मुळींच खोलींत नव्हता. तो तेथें आहे, असें त्या मुलाच्या डोक्यांत भरलेलें होतें, असें त्याच्या

मनानें घेतलें होतें; आणि ही त्याची कल्पना बापाला काढून टाकावी लागली. प्रौढ मुलांची कल्पना निराळ्या रीतीनें काढून टाकिली पाहिजे.

बायबलमध्यें जुना करार ( Old Testament ) आणि नवा करार ( New Testament )असे दोन भाग आहेत. जुन्या करारांत पहिला मानव 'आदम' हा मोहाला कसा बळी पडला, निषिद्ध वृक्षाचें फळ त्यानें कसें खाल्लें, त्यायोगानें पाप व मरण या जगांत कसें आणिलें, आणि त्याचे वंशज ( सर्व मानवजात ) पापी, दुःखी आणि मर्त्य कसे झाले, इत्यादि कथा आहे. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे, जुना करार, वरील गोष्टींतील खुळ्या आईप्रमाणें पापाचा आणि नरकाचा बागुलबोवा, लहान मुलांच्या–अज्ञानी लोकांच्या मनांत उत्पन्न करितो, आणि नवा करार त्या समंजस बापाप्रमाणें उशीवर प्रहार करून—बाप्तिस्म्याच्यायोगें त्या बागुलबोवाचें निरसन करूं पहातो. तुह्मांला पापापासून मुक्त व्हावयाचें असेल, नरकयातना चुकवावयाच्या असतील, तर तुह्मी येशूच्या कळपांत शिरा, बाप्तिस्मा घ्या, चर्चमध्यें दाखल व्हा, रोज प्रार्थना ह्मणा, पाद्र्यांनां दक्षिणा द्या, ख्रिस्तावर विश्वास ठेवा; तुह्मीं असें केलें ह्मणजे तुह्मांला मुक्ति मिळेल, तुमचें नांव प्रभूच्या जीवनबुकांत नोंदलें जाईल, असें नव्यां करारांत सांगितलें आहे. 'राम' सांगतो, कीं, बाप्तिस्मा घेऊन नव्या करारांत सांगितल्याप्रमाणें सर्व विधि आचरून जर कोणाला, आपण तरलों आहों अशी खरीखुरी श्रद्धा उत्पन्न होत असेल, तर तो खरोखरीच तरतो-मुक्त होतो. उशीवर प्रहार करण्यामुळें त्या मुलाच्या मनांतील बागुल-बोवाविषयींची भीति समूळ नाहींशी झाली नाहीं काय? त्यासारखा हा प्रकार होतो.

नास्तिकवाद्याप्रमाणें आणि अज्ञेयवाद्याप्रमाणें ख्रिश्चन लोकांच्या या श्रद्धेची टर उडविणें 'रामा'ला पसंत नाहीं. जर तुमच्या श्रद्धेनें तुमच्या अंगीं मानसिक धैर्य येतें, आह्मी तरलों आहों अशी तुमची भावना दृढ होते, तर तुह्मी खरोखरच तरतां, मुक्त होतां; पण येथें

हेंहि नमूद करतों, कीं, जग आज त्या मुलाप्रमाणें शैशवावस्थेंत नाहीं, तें सध्यां युवावस्थेंत आहे. तुमच्या अनुशासनानें (जुन्या धर्मविधीनें) मागें लाखों लोक तरले असतील; पण आम्ही क्षुद्र कृमिकीटक नाहीं, पापी नाहीं, तर शुद्ध, अपापविद्ध, पवित्र असे आहों,—ईश्वर आहों—परमात्मा आहों! अशा तऱ्हेच्या वेदान्तांत सांगितलेल्या भावनेच्या अभ्यासानें पापाच्या आणि नरकाच्या बागुलबोवांचें समूळ उच्चाटन करण्याची वेळ आतां आलेली आहे. या भावनेचें श्रवण करा, मनन करा, ध्यान करा. 'आत्मा वाऽरे श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः' अनेक तऱ्हेचा द्राविडी प्राणायाम व्यर्थ कां करितां?

वेदान्त सांगतो, कीं, वरील गोष्टींतील खुळ्या मुलाप्रमाणें—अज्ञानी लोकांप्रमाणें वागूं नका; प्रौढ मुलांप्रमाणें किंवा समंजस लोकांप्रमाणें वागा. आपण देह नाहीं, बद्ध नाहीं, तर आपण मुक्त आहों, असें तुह्मांला वाटेल, तर खरोखरच तुह्मी मुक्त होतां, जगाचे तारक होतां. सर्व विधि, सर्व संस्कार आचरल्यानंतर 'मी मुक्त झालों, मी तरलों,' अशी तुमची भावना असावी लागते, नाहीं काय! पहा, ख्रिस्तिधर्मांत सुद्धां वेदान्त व्यापून राहिला आहे, आणि वेदान्तांत सांगितलेली अभ्यासाची रीत—साधनपद्धति किती तरी उत्कृष्ट आहे? उशीला प्रहार करीत बसण्यांत आपला वेळ दवडूं नका, आणि बाह्यविधि, नामरूपें यांनां फाजील महत्त्व देऊं नका.

जेरूसलेम शहर मुसलमानांकडून घेण्याकरितां ख्रिस्ती लोकांनीं ज्या ज्या स्वाऱ्या केल्या, त्या सर्वांनां क्रुसेड्स् (Crusades) असें नांव आहे. या धर्मयुद्धांतील एका स्वारींत, एकदां ख्रिस्ती लोकांचा चांगला पराभव झाला, त्यामुळें ते सर्व नाउमेद झाले. ख्रिस्ती सैन्यांत एक धर्मवेडा शिपाई होता. नांव मिळविण्याची संधि हीच आहे, असें जाणून त्यानें त्यावेळीं एक युक्ति योजिली. येशूख्रिस्ताच्या देहस्पर्शानें पवित्र झालेला एक भाला अमुक ठिकाणीं पुरलेला आहे, तो जर मिळाला,

तर ख्रिस्ती लोकांनां खाचत यश येईल, असें एका देवदूतानें माझ्या स्वप्नांत येऊन सांगितलें, अशी त्यानें कंडी उठविली. हां हां ह्मणतां ती सर्व सैन्यभर पसरली. लोकांचा या दृष्टांतावर विश्वास बसला, आणि त्या पवित्र भाल्याच्या शोधार्थ ते जागोजाग शोधूं लागले. पुष्कळ ठिकाणीं खणून पाहिलें तरी त्यांनां तो भाला कांहीं मिळाला नाहीं. शेवटीं ते निराश होत चालले. इतक्यांत त्या धर्मवेड्या शिपायानें एक जागा दाखविली. तेथें खणून पाहतात, तों, त्या ठिकाणीं मातीनें गंजलेला असा एक जुना भाला सांपडला. सर्व लोकांनां मोठा आनंद झाला, आणि त्यांच्या अंगीं उत्साहाचें नवीन वारें शिरलें. पुनः त्यांनीं शत्रूंवर हल्ला केला, आणि त्यांनां त्यांत यश आलें. नंतर हे लोक यूरोपांत परत आले. त्या पवित्र भाल्यामुळें यश आलें, अशी सर्वांची समजूत होती. कांहीं दिवसांनीं तो धर्मवेडा शिपाई आजारी पडला आणि मरणोन्मुख झाला. त्यावेळीं त्यानें भाल्याविषयींची खरी हकीगत पाद्र्याजवळ कबूल केली. "भाल्याविषयींचा दृष्टांत खोटा आहे, तो भाला आपल्या पणज्याचा. युद्धाला जातेवेळीं आपण तो बरोबर नेला होता, आणि एका खळग्यांत फेंकून दिला होता; नांव मिळविण्याकरितां ही दृष्टांताची हूल आपण उठविली होती," असें त्यानें सांगितलें. इतिहासकारांनीं हा कबुलीजबाब ऐकिला,आणि भाल्यांत कांहीं गुण नसून लोकांत असलेल्या उत्साहामुळें व श्रद्धेमुळें त्यांनां जय मिळाला, असें त्यांनीं जगजाहीर केलें. त्याप्रमाणें वेदान्त जाहीर करतो, कीं, ख्रिस्ती, मुसलमान, वैष्णव आणि जगांतील इतर धर्मांतील लोकहो! ख्रिस्त, महंमद, बुद्ध, कृष्ण किंवा दुसरा कोणी महात्मा यांच्या नांवानें आह्मी तरलों जात आहों असें जर तुह्मांला वाटत असेल, तर ख्रिस्त, बुद्ध, कृष्ण किंवा दुसऱ्या कोणाहि महात्म्यांत तसा खरा गुण—तारकशक्ति नाहीं, हें पक्कें समजा. खरी तारकशक्ति तुमच्यामध्येंच—तुमच्या आत्म्यामध्येंच आहे ! पंथ आणि श्रद्धा यांतील भेद लक्ष्यांत ठेवा. भाल्याची गोष्ट हा एक विशिष्ट पंथ किंवा मत. पण त्या लोकांतील उत्साह,

कार्यशक्ति ही त्यांची श्रद्धा. विशिष्ट पंथ–मत नव्हे, तर खरीखुरी जीवंत श्रद्धा तारक आहे.

जर या खऱ्याखुऱ्या श्रद्धेमुळें, ख्रिस्ती लोकांनां युद्धांत यश आलें, तर ही जीवंत श्रद्धा तुह्मी 'माझ्या प्रिय'—तुमच्या आत्म्याकडे कां लावीत नाहीं? असें 'राम' तुह्मांला विचारतो. ख्रिस्त, बुद्ध, कृष्ण इत्यादि महात्म्यांवर तुह्मी तुमची जोरदार किंवा मिळमिळीत श्रद्धा कां ठेवितां? तुमच्या अंतर्यामीं असलेल्या ईश्वरावर--आत्म्यावर ती कां ठेवीत नाहीं? आपल्या आत्म्यावर श्रद्धा ठेवणें हें किती सोपें आणि स्वाभाविक आहे?

"तुमचा वेदान्त जर असा आहे, इतका चांगला आहे, त्याचा उगम हिंदुस्तानांत झालेला आहे, तर हिंदुस्तान इतकें खालावलेलें कां आहे?" असा प्रश्न 'रामा'ला विचारण्यांत येतो. लोक वेदान्त आचरणांत आणीत नाहींत, हेंच त्यांच्या अवनतीचें कारण आहे. अमेरिकन लोक हिंदु लोकांपेक्षां वेदान्त अधिक आचरणांत आणितात, आणि त्यामुळें त्यांची एकसारखी भरभराट होत आहे. हिंदुस्तानची अवनति वेदान्तामुळें झाली असें ह्मणण्याचा जगाला हक्क नाहीं, हें पुढील गोष्टीवरून चांगलें सिद्ध होईल.

हिंदुस्तानांत एका खेडेगांवांतील एक मुलगा फार हुषार निघाला. तो एकसारख्या परीक्षा पास होत गेला, आणि एका मोठ्या शहरीं जाऊन कॉलेजांत अभ्यास करूं लागला. उन्हाळ्याच्या सुटींत घरीं येतांना त्यानें एक घड्याळ आपल्याबरोबर आणिलें. त्याची घरची मंडळी फार जुन्या पद्धतीची आणि भोळसर होती. त्यांनां घड्याळ ह्मणजे काय, किंवा त्याचा उपयोग काय, हें कांहीं माहीत नव्हतें. घरांतील मंडळीला—विशेषत: त्याच्या आजीला यानें हें काय लचांड आणिलें आहे, असें वाटूं लागलें. नवीन वस्तु घरीं कोणाल्गाहि न आवडल्यामुळें त्यानें ती आपल्या खोलींत एकीकडे ठेवून दिली. यांत टिक् टिक् आवाज काय होतो, हें कांहीं तरी भयंकर, अशुभ आहे, असें त्या ह्मातान्या

आजीला वाटूं लागलें. कांहीं दिवसांनीं त्यांच्या घरीं एकदां चोर आले आणि त्यांनीं बराच माल लांबविला. म्हातारी नातवावर रागावली आणि म्हणाली "मीं सांगितलें नाहीं का, ही घड्याळाची ब्याद आमच्या घरीं नको म्हणून ? चोर तरी किती शहाणे ! त्यांनीं घड्याळाला हात लाविला नाहीं, दुसरा बराच माल नेला. घड्याळ बरोबर नेलें तर आपल्यावर कांहीं तरी अरिष्ट येईल हें त्यांनां माहीत होतें." म्हातारीच्या भाषणाचा मुलावर कांहीं परिणाम झाला नाहीं. त्यानें तें तसेंच राहूं दिलें. पुढें कांहीं दिवसांनीं त्या घरांत कोणी मरण पावलें. तेव्हां म्हातारी अतिशय संतापली, व ही ब्याद घरांत ठेवूं नको, असें आपल्या नातवाला बजावूं लागली. त्यानें तिचें कांहीं ऐकिलें नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं त्या घरांत दुसरा एक मृत्यु झाला, त्यावेळीं तर म्हातारीचा संताप विकोपाला गेला ! घड्याळानेंच हीं अरिष्टें आपल्या कुटुंबावर आणिलीं, असें त्या म्हातारीला वाटलें. ती एके दिवशीं नकळत आपल्या नातवाच्या खोलींत गेली, आणि घड्याळावर मोठा धोंडा घालून तिनें तें फोडून टाकिलें ! आतां विचार करा. हिंदुस्तानांतील आजीबाईचीं अशीं कृत्यें ऐकून तुम्ही हंसाल; पण तुम्ही स्वतः देखील इतर कांहीं बाबतींत आजीबाईप्रमाणें वागत आहां. लोक दोन गोष्टी पुढें मांडतात, आणि एक दुसरीचें कारण आहे असें आपलें मत ठोकून देतात. विशेषतः यूरोपियन लोकांचा वेदान्ताविषयीं बराच गैरसमज झालेला आहे, आणि वेदान्त हिंदुस्तानच्या निकृष्ट स्थितीचें कारण आहे, असें ते चुकीनें म्हणतात. यूरोप आणि अमेरिका या देशांची भरभराट ख्रिस्ताच्या व्यक्तीमुळें झालेली नाहीं. त्या भरभराटीचें खरें कारण वेदान्ताचें नकळत झालेलें आचरण, हेंच आहे. हिंदुस्तानच्या अवनतीचें कारण तेथें वेदान्त आचरणांत आणला जात नाहीं, हें आहे.

मानवजातीची--जगाची उन्नति करण्यास माता कशा हातभार लावितात, याविषयीं 'राम' आतां तुम्हांला दोन शब्द सांगणार आहे. जगांतील सर्व मोठमोठे वीर पुरुष हे तेजस्वी मातांचे पुत्र आहेत.

जगाची उन्नति माता करूं शकतात. देशाची उन्नति करणें न करणें त्यांच्या हातीं आहे. मोठमोठे वीर सुमातेपासून उत्पन्न होतात. लहानपणींच मातांनीं उच्च विचारांचें, सद्विद्येचें बाळकडु मुलांनां पाजिलें, तर ते मुलगे पुढें कृष्ण, ख्रिस्त यांसारखे महात्मे होतील!

मातांनां आपल्या मुलांचा स्वभाव बिघडून टाकितां येईल किंवा त्यांनां सुधारतां येईल. मातेचा कार्यभाग असा आहे. लढाईवर जाणाऱ्या पुत्राला एक स्पार्टन माता ह्मणाली होती, कीं, "तरवार घेऊन अगर तरवारीवर तूं ये, तरवारीवांचून येऊं नको–मृत किंवा जीवंत ये; पण पराभूत होऊन येऊं नको!"

हिंदुस्तानांतील एका राणीनें, आपल्या नवऱ्यानें आंत येऊं नये ह्मणून शहरचे दरवाजे बंद करविले, आणि तिनें नवऱ्याला असा निरोप पाठविला, कीं, "आपण चालते व्हा. आपण माझे पति नव्हे. तुह्मी पराभूत होऊन परत आलेले आहां. मी आतां आपणाला ओळखीत नाहीं!"

हिंदुस्तानांत फार प्राचीनकालीं ऋतुध्वज किंवा कुवलयाश्व नांवाचा राजा होऊन गेला. त्याची मदालसा नांवाची राणी विदुषी आणि ब्रह्मनिष्ठ होती. आपल्या सर्व मुलांनीं ज्ञानी व्हावें, अशी त्या राणीची इच्छा होती, आणि तिनें त्या कामीं बरेच प्रयत्न करून यश मिळविलें. ती आपल्या मुलांनां दूध पाजवितांना वेदान्ताचें बाळकडु पाजवीत असे. तिचीं अंगाई गीतेंहि वेदान्ताच्या उपदेशांनीं भरलेलीं असत.*

तीं गीतें खालील नमुन्याचीं असत:–

**निज रे निज बाळा। स्वच्छंदें। अंतरिंच्या आनंदें॥**
**गद्गदकंठें तूं। रडूं नको। अश्रुबिंदु ढाळुं नको॥**

---

*मदालसेनें आपल्या पुत्रांनां केलेला बोध ज्ञानेश्वर महाराजांनीं सहा प्रकरणांमध्यें सविस्तर दिला आहे. जिज्ञासूंनीं हीं प्रकरणें (ज्ञानेश्वरांचा गाथा, मदालसा प्रकरण) पहावीं. तसेंच वासुदेवानंद सरस्वतीकृत श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथांतील अध्याय २८ मधील मदालसेनें आपल्या पुत्रांनां केलेला बोध (ओंव्या ७० ते १०७) पहावा, अशीहि शिफारस आहे.

टाकुनि भय, घेई । विश्रांति; । सुरमुनि तुजला स्तविती ॥
धन बल तनु कांती । वर दाता । अखिल जगा चालविता ॥
आत्मा विमल तुझा । विमलमना । चैतन्योद्गमस्थाना ॥
विरोधकलहांचें । कारण तूं । होशी मंगलहेतु ॥
निद्राविश्रांति । उभयांचें । जागृत गृह तूं साचें ॥
अगाध ज्ञानाचें । तूं मूळ । क्रियावंत तूं प्रबळ ॥
साक्षी वृत्तींचा । सुनिर्मळ । कांहीं न करिं तळमळ ॥
परि तूं त्यागीं बा । सुमुळेसी । सत्वरि तमोगुणासी ॥
बंधन तोचि करी । जीवासी । फिरवि लक्ष चौऱ्यांशीं ॥
विश्वात्म्यैक्याचा ।कोणाहि । प्रत्यय न मिळे पाहीं ॥
स्वामी राम ह्मणे । केव्हांहि । सत्त्वशुद्धिविण कांहीं ॥

आपल्या मातेच्या बोधानें, विक्रांत, सुबाहु, शत्रुजित् इत्यादि मदालसेचे पुत्र फार ज्ञानी आणि ब्रह्मनिष्ठ झाले. प्रवृत्तिमार्गांत गढून गेलेल्या राजाला आपल्या राणीनें मुलांनां दिलेलें निवृत्तीचें शिक्षण आवडलें नाहीं. ह्मणून अलर्क नांवाच्या शेवटच्या मुलाला त्यानें राणी-कडून व्यवहाराचें, प्रवृत्तिमार्गाचें शिक्षण देवविलें. राणीनें आपल्या मरणसमयीं एक पेटी ( ताईत ) अलर्काच्या हातांत बांधिली, आणि "ताईत जपून ठेव; कठिण प्रसंग आला असतां तो ताईत उघडून त्यांतील उपदेश वाच, त्या उपदेशाचें ध्यान कर," असें बजावून तिनें प्राण सोडिला. राजाहि कांहीं दिवसांनीं मरण पावला, आणि त्या-नंतर अलर्कानें बरींच वर्षें राज्य केलें. त्यानें अनेक स्त्रिया वरिल्या आणि नानातऱ्हेचे उपभोग घेण्यांत तो गढून गेला. दिवसेंदिवस तो जास्त जास्तच बिघडूं लागला. त्याला ताळ्यावर आणण्यासाठीं सुबाहूनें एक युक्ति योजिली. तो अलर्कापाशीं येऊन राज्याचा हिस्सा मागूं लागला. अलर्क तो देईना. सुबाहूनें काशीराजाचें सहाय्य घेऊन अलर्काचा पराभव केला. अलर्क मोठ्या संकटांत पडला. त्याला आपल्या आईचे शब्द आठवले. स्नान करून शुचिर्भूत होऊन त्यानें तो ताईत उघडिला,

आणि त्यांत असलेला उपदेशाचा कागद वाचिला. कागदावर बाकी मुलांनां केलेला उपदेश होता. त्याशिवाय त्यावर हे श्लोक होतेः—

*त्याज्यः सर्वात्मना संगः । स चेत्त्यक्तुं न शक्यते ।
सद्भिःसह सः कर्तव्यः । संतो दुःसंगभेषजम् ॥
कामः सर्वात्मना हेया । हातुं चेच्छक्यते न सः ।
मुमुक्षांप्रति कर्तव्यः । सैव कामार्तिभेषजम् ॥

या उपदेशाचें मनन अलर्कानें केल्याबरोबर त्याला उपरति झाली, त्याची चिंता नाहीशी झाली, भीति गेली आणि त्याला मोठें समाधान वाटलें. तो आपण होऊन सुबाहूपाशीं गेला, आणि, राज्य आपलेंच आहे, स्वीकार करा, असें विनवूं लागला. अलर्कांत झालेला हा फरक पाहून सुबाहूला फार आनंद झाला, आणि त्यानें हिस्सा मागण्याचा आपला मूळ उद्देश अलर्काला सांगितला. अलर्कावरच सर्व राज्य सोंपवून तो वनांत निघून गेला. पुढें अलर्कानें फार सुखानें राज्य केलें, तो ईश्वराचा मोठा भक्त झाला व त्याला तदनंतर कसलेंहि दुःख झालें नाहीं.

पूर्ण, सनातन आनंद, अखंड शांति ही तुमची आहे—नव्हे ती तुह्मी आहांत. तुमचें केंद्र—आत्मतत्त्व जाणा आणि त्यांतच सदैव रहा.

---

*संग सोडावा सर्वथा । हें न घडे तत्त्वतां ।
तरी साधूचा संग धरितां । भवव्यथा नासेल ॥
टाकावा सर्वथा काम । हें न करवे जरी काम ।
मुमुक्षेचा करावा काम । मिळेल धाम अनायासें ॥

श्रीदत्तमाहात्म्य.

# THE ROD OF MOSES.*

## †मोझेसचा दंड.

काहीं दिवसांमागें एकानें व्याख्यानाच्या शेवटीं 'रामा'ला असा प्रश्न केला होता, कीं, "सर्व इच्छा सोडाव्या, सर्व ऐहिक संबंध (आसक्ति) तोडून टाकावे, असें तुह्मी कां सांगतां, आणि त्यागाचा उपदेश कां करितां? जगाशीं असलेला आपला संबंध सोडावा, जगाविषयीं असलेलें प्रेम नाहींसें करावें, असें तुमचा वेदान्त सांगतो. तुमचा वेदान्त आमच्या अंतःकरणांतील मानवजातीविषयींच्या प्रेमाचा चुराडा करितो."

उत्तर—जेव्हां तुह्मांला खरें सौख्य किंवा आत्मज्ञान होतें, तेव्हां तुमचीं सर्व कर्तव्यकर्में चांगलीं होतात, आणि तुमच्यापासून आपोआप सर्वांचें अभीष्ट-कल्याण होऊं लागतें. स्वतःला सुख मिळालें नाहीं, असा मनुष्य जगाचें कल्याण कसें करणार! ज्याला आनंद मिळालेला आहे, तोच जगाचें हित करील. दरिद्री, उपासमार काढणारा मनुष्य दुसऱ्याची क्षुधा कशी निवारण करणार?

प्रश्न—महाराज, सुख किंवा आनंद ह्मणजे काय, हें सांगा.

उत्तर— यो वै भूमा तत्सुखं नाल्पे सुखमस्ति।
अथ यदल्पं तन्मर्त्यं तद्दुःखम्॥‡

असें श्रुति सांगते.

---

*हें व्याख्यान तारिख ५ मार्च १९१३ इसवी रोजीं झालें.

†मोझेस हा ज्यू लोकांचा पैगंबर होय. यानें ईशाज्ञेनें इजिप्तमधील ज्यू लोकांना गुलामगिरींतून सोडविलें. बायबलांत जुन्या करारांत मोझेसची हकीगत आहे.

‡भूमा ह्मणजे अनंत। सर्वथा न असे ज्यास अंत।
जो ऐसा अनंत तोचि अत्यंत। सुख ह्मणावा॥
ज्यास असे अंत। सुख नसे त्यांत। वृत्ति तितकी अंतवत।
अत्यंत तें जें असे अतिक्रमूनि त्यांतेहि॥
श्रुति ही ह्मणे कांहीं। जें अल्प त्यांत सुख नाहीं।
अल्पीं त्या सुख नसोनि ही। अल्प तें दुःख आणि नश्वर॥

—यथार्थदीपिका.

भूमा किंवा अनंत ह्मणजे काय, तें आह्मांला कसें समजेल, याविषयीं सविस्तर विवेचन करण्याची जरूरी नाहीं. **'यो वै भूमा तत्सुखं, नाल्पे सुखमस्ति'** या श्रुतिवाक्याचें तुह्मीं नीट मनन करावें, ह्मणजे तुह्मांला योग्य कालीं सर्व कांहीं समजेल.

इंग्रजी भाषेंत 'Whole' असा एक शब्द आहे. त्याचा अर्थ 'पूर्ण' असा आहे. पूर्ण असणें ह्मणजे सशक्त व निरोगी असणें. जोंपर्यंत तुह्मी स्वतःला औट हात लांब, एक हात रुंद अशा आकाराची आणि दीडशें पौंड वजनाची आकृति आपण आहों, आपण देह आहों, मर्यादित आहों, असें मानितां, तोंपर्यंत तुह्मी पूर्ण नाहीं, अंश आहां, सशक्त व निरोगी नाहीं. समुद्रापासून पाण्याचा एक थेंब वेगळा केला तर तो सडून जाईल. त्याप्रमाणें जो कोणी स्वतःला मर्यादित–देशकालानें बद्ध असा समजतो, तो खरोखर अपवित्र आणि अशुद्ध होय. त्याला सुख केव्हांहि होणार नाहीं. जेव्हां आपण मर्यादित नाहीं, आपण हें विश्व आहों, अनंत आहों, असें तुह्मांला वाटूं लागतें, तेव्हां तुह्मी पूर्ण होतां, आणि तुमच्या आधिव्याधि पार नाहींशा होतात.

सर्व रोग बरे करण्याचें ( वैद्यकीचें ) आणि मोहनीविद्येचें गुह्य हेंच आहे. तुह्मी पूर्ण व्हा. तुह्मी पूर्ण आहां हेंच सत्य. सत्यांत–अनंतांत –आत्मतत्त्वांत रहा. आपण ईश्वर आहों–परमात्मा आहों–असा साक्षात्कार घ्या.

प्रश्न—हें अनंत ह्मणजे काय आहे ?

उत्तर—मर्यादा किंवा परिमिति तीन प्रकारची असते. १ दिक्मर्यादा, २ कालमर्यादा, ३ कार्यकारणभाव–मर्यादा. पूर्ण होणें ह्मणजे दिक्, काल, कार्यकारणभाव यांच्यापलीकडे असलेल्या आत्मतत्त्वाचा साक्षात्कार घेणें होय. जेव्हां एकादा, दुसरें कांहीं पाहत नाहीं, दुसरें कांहीं ऐकत नाहीं, दुसरें कांहीं समजत नाहीं, एक आत्मतत्त्वच जिकडे तिकडे भरलेलें आहे असें पाहतो, तेव्हां तो पूर्ण किंवा अनंत असतो.

कारण, जेव्हां तुह्मांला दुसऱ्याचें भान आहे, तोंपर्यंत तुह्मी मर्यादित आणि सान्त आहां. हरवलेल्या किंवा दृष्टीआड झालेल्या वस्तु पाहण्याची शक्ति—सूक्ष्मदृष्टि जरी तुह्मीं मिळविली, भूतपिशाचांनां पाहण्याचें आणि त्यांच्याशीं बोलण्याचें सामर्थ्य जरी तुह्मीं मिळविलें, तरी तुह्मी सान्तच आहां; तुह्मी मार्गावर आहां, अद्याप पूर्ण ध्येयापर्यंत गेलां नाहीं. ध्येय ह्मणजे अनंताशिवाय दुसऱ्या कशाचीहि जाणीव ( भान ) नसणें. अनंत अमर आहे आणि सान्त मर्त्य आहे.

प्रश्न—महाराज, अनंत कोठें असतें ? कोणत्या भूमिकेवर ?

उत्तर.—तें, वैभवांत—नव्हे आपल्याच वैभवांत असतें. याचा अर्थ असा, कीं, ‘ अनंत ’ दिक्कालातीत आहे. तरमग, तुह्मी त्याला दिक्कालांनीं कसें मर्यादित कराल? अनंत कोठें राहतें, असा प्रश्न करणें ह्मणजे ‘ समुद्राच्या लाटांचा अर्धा औंस आणा ’ असें ह्मणण्यासारखें आहे. समुद्राच्या लाटा, पौंड, औंस यांनीं मोजल्या जात नाहींत. त्याप्रमाणें अनंत हें कसें, केव्हां आणि कां, यांनीं मापिलें जात नाहीं. तसें तें मापितां आलें तर तें अनंतच नव्हे.

‘रामा’ला असा प्रश्न विचारण्यांत आला होता, कीं, कामना व आसक्ति टाकून द्या, ह्मणजे आमच्या अंतःकरणांतील मानवजातीविषयींचें प्रेम नाहींसें करून द्वेष वाढवा, असेंच वेदान्ताचें ह्मणणें आहे, नाहीं काय? वेदान्त तसें कांहीं सांगत नाहीं. प्रेमपाशमोह ( Love ) आणि आसक्ति सोडा, असें तो सांगतो; पण तुह्मी ह्मणतां, कीं, प्रेम ह्मणजे देव, आणि आह्मीं प्रेमपाश सोडिले ह्मणजे देवाला टाकून दिल्यासारखें होईल. या देशांत प्रेम ( Love ) ह्मणजे विषयलालसा, मूढपणा असें लोक समजतात. हिंदुस्तानांत मूढ विषयवासनेला निराळेंच नांव आहे.

येथें लोक असें ह्मणतात, कीं, “अहो, तो प्रेमपाशांत आहे—O, he is in love.” पण वास्तविक पाहतां, त्याचा हा विकार खरें प्रेम नसून दुसरीच कांहीं तरी अपवित्र—अघोरी वस्तु आहे. दुसऱ्या

कोणत्याहि गोष्टीपेक्षां 'राम' सत्याला अधिक मान देतो. अशा प्रकारची दैहिक आसक्ति तुह्मांला, तसेंच तुमच्या प्रिय व्यक्तीला मर्यादित करून तुह्मां उभयतांची अवनति करिते. अशी आसक्ति किंवा मूढ विषयलालसा टाकून द्यावी, असें वेदान्त सांगतो. खरें प्रेम टाकून द्या असें तो केव्हांहि सांगत नाहीं. खरें प्रेम तुह्मीं टाकून देऊं नये.

मुलाचें उदाहरण पहा. मूल प्रियकर-प्रेमी ( Lover ) असतें काय ? छे, छे. मूल प्रियकर नसतें, पण तें मूर्तिमंत प्रेमच असतें. ह्मणून वेदान्त सांगतो, कीं, प्रियकर होऊं नका, तर मूर्तिमंत प्रेम व्हा. मूल इतकें मोहक व चित्तार्षक कां असतें ? तें प्रियकर नसून मूर्तिमंत प्रेम असतें ह्मणून. मुलाला आसक्ति, स्वार्थ, कामना नसते. तें मूर्तिमंत प्रेम असतें. त्यासारखें तुह्मी मूर्तिमंत प्रेम व्हा, ह्मणजे तुह्मी मोहक आणि पूर्ण होतां, असें वेदान्त सांगतो.

स्वतः निरोगी व्हावें, दुसऱ्याचे रोग बरे करावे, असें लोक बोलत असतात. पण तुम्हांला संकुचित आणि मर्यादित करणारे विचार व पद्धति यांनां प्रथम दूर सारा. इच्छा, कामना ह्मणजे आसक्तिच होय. ही टाकून द्या, ह्मणजे तुह्मी मूर्तिमंत पावित्र्य बनतां. तुह्मी पवित्र झालां ह्मणजे तुमचा देह, तुमची बुद्धि, हीं पूर्ण निरोगी, सशक्त, पूर्ण राहतील. पावित्र्य ह्मणजे वेदान्तांत उपदेशिलेला त्याग होय.

हें पावित्र्य मिळवा. मूल पवित्र नसतें काय ? तें प्रत्येक वस्तूविषयीं अनासक्त असतें. पहा, हें मूल किंवा आमचा चिमुकला जुलमी राजा बलिष्ठांच्या खांद्यावर आरूढ होतो; आणि सन्मान्यांच्या डोईचेंहि केंस उपटतो. मूल किती तरी मोहक आणि सुंदर असतें ! याचें कारण काय ? तर पावित्र्य. हें पावित्र्य मिळवा ह्मणजे तुह्मी प्रेम—मूर्तिमंत प्रेम होतां. आणि तुमच्या हातून जगाचें, मानवजातीचें कल्याण आपोआप होऊं लागतें. आम्हीं स्वतः चांगलें झाल्याशिवाय दुसऱ्याचें चांगलें आह्मांला करितां यावयाचें नाहीं. स्वतः प्रकाशमय आणि तेजःपुंज झाल्याशिवाय इतरांनां प्रकाश ( ज्ञान ) देतां येणार नाहीं.

सर्पाचे नेत्र फार सुंदर आणि मोहक असतात, आणि त्यामुळें लहानसहान पक्षी त्याच्या तोंडांत उड्या घेतात. सर्पाच्या नेत्रांच्या मोहनीचें मर्म काय आहे ? तर ते अनासक्त असतात; ते कशाशीं बिलगून राहत नाहींत. ' सर्पाप्रमाणें शहाणे व्हा*' अशी ह्मण आहे. मोहिनीविद्येचें, सामर्थ्याचें आणि आरोग्याचें गुह्य हेंच आहे. सर्प आपलीं पोरें स्वतःच खाऊन टाकितो, तो शहाणा कसा ? असा आक्षेप कोणी घेतील. सर्पाला शेंकडों पोरें होतात. हीं सर्व जीवंत राहिलीं तर इतर प्राण्यांनां जगांत राहणें फार कठिण जाईल. जगाच्या परित्राणाविषयीं निसर्गाची तशी योजना आहे, ह्मणून सर्प आपलीं पोरें खाऊन चट्ट करितो. पण हें लक्ष्यांत ठेवा, कीं, सर्पाला आसक्ति नसते. तो आपली कात टाकून देतो. 'राम' तुह्मांला सांगतो, कीं, जर तुह्मी सर्पाप्रमाणें आपला देह ( देहात्मभावना ) मनानें टाकून द्याल, मी देह नाहीं, आणि इंद्रियें, अहंकार यांच्याशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं असें मानून, आपण आत्मा, विश्व–ईश्वर आहों, असा साक्षात्कार घ्याल, तर तुह्मी पूर्ण पवित्र, पूर्ण मोहक आणि अनंत व्हाल. तुह्मी प्रेममय व्हाल आणि तुमच्यांतून आपोआप मंगल वाहूं लागेल.

'तुह्मी प्रेमपाशांत आहां,'( You are in love ) ह्मणजे तुह्मीं कोणत्या मनोविकारानें प्रेरित झालां आहां, हें तुह्मीं नीट पाहिलें काय ? खरें पुसाल, तर यांत–तुमच्या प्रेमपाशांत प्रेमाचा लेश नसून, आसक्ति किंवा द्वेष भरलेला आहे. एका वस्तूवर आसक्ति जडली ह्मणजे इतर सर्व वस्तूंविषयीं द्वेष वाटूं लागतो. मूल एकदोन महिन्यांचें असतें तेव्हां त्याला हवें त्यानें घ्यावें, गोंजारावें, कुरवाळावें. मूल मूर्तिमंत प्रेम असतें, आणि सर्व त्याला एकसारखेच वाटतात. पण तें मूल वाढून त्याचा तरुण मनुष्य झाला, ह्मणजे काय प्रकार घडतो ? त्याला आईबाप, बंधुभगिनी, आप्तइष्ट नकोशीं वाटूं लागतात. एका आपल्या प्रियेशिवाय दुसऱ्या कशांतहि त्याला सुख वाटत नाहीं. एका प्रियेवरच त्याचें प्रेम (आसक्ति)

*Be wise as the serpent.

असतें. इतर सर्वांचा–जगाचा त्याला तिटकारा किंवा द्वेष वाटतो. आसक्ति ह्मणजे जगापासून—सर्वांपासून स्वतःला विभक्त किंवा अलग करून घेणें—सडून जाणें होय. अशा प्रकारें तुह्मी आपला घात करून घेऊं नका, असें वेदान्त तुह्मांला सांगतो.

तरुणाप्रमाणें आसक्त होऊं नका व सर्वांचा द्वेष--तिटकारा करूं नका. लहान अर्भकाप्रमाणें मूर्तिमंत प्रेम व्हा, ह्मणजे तुह्मीं विश्वाशीं एक व्हाल आणि मानवजातीचें कल्याण कराल.

जगाचे कल्याणकर्ते महात्मे जे होऊन गेले, ते पूर्ण पवित्र आणि अनासक्त होते, हें तुह्मांला माहीत नाहीं काय ? ख्रिस्तानें लग्न केलें काय? नाहीं. इतर साधुसंतांनीं आणि महात्म्यांनीं केलें काय ? नाहीं. ‘रामा’च्या विधानाचा रोंख लग्नाविरुद्ध नाहीं ! आमचें मन ईश्वराशीं संलग्न असावें, विश्वाशीं एक व्हावें, असें ‘रामा’चें सांगणें आहे. कांहीं साधुसंतांनीं लग्नें केलीं होतीं, ते कुटुंबांत राहत होते, आणि त्यांनां मुलेंबाळें होतीं; पण त्यांनीं आपलीं मनें पूर्ण अनासक्त आणि पवित्र ठेविलीं होतीं. आमचे देह जेथें असतात तेथें आह्मी राहत नाहीं; तर जेथें आमचीं मनें असतात तेथें आमचें खरें वास्तव्य असतें. या तत्त्वाप्रमाणें बहुतेक साधुसंत कुटुंबांत राहत असले, तरी ते सदैव सत्यांत–प्रकाशांत–आत्मध्यानांत राहत असत. याकरितां आसक्ति क्रमाक्रमानें पूर्ण नाहींशी करा, निरिच्छ व्हा, मूर्तिमंत प्रेम व्हा आणि अखिल मानवजातीचें कल्याण करा, असें वेदान्त तुह्मांला सांगतो.

अमेरिकेंत हल्लीं प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयांत, मोहनीविद्या, वशीकरण-विद्या, सूक्ष्मदृष्टि इत्यादि विषयांचा बराच खल केलेला असतो; आणि देह व मन निरोगी व सशक्त कसें ठेवावें, रोग बरे कसे करावे, यांविषयीं पुष्कळ सांगितलेलें असतें. यांपैकीं कांहीं पद्धति चांगल्या आहेत, त्यांचा हेतु स्तुत्य आहे, हें सर्व खरें; पण, कांहीं थोडे अपवाद खेरीज करून इतर सर्व लेखक स्वार्थानें, अहंकारानें, दिमाखानें, स्तुति-

प्रियतेनें, सर्व-हक्क-स्वाधीनतेनें, सत्याच्या विरुद्ध असलेल्या तत्त्वानें प्रेरित झालेले दिसतात. हे लोक आपल्या हातून होईल तितकें लोककल्याण करण्याचे प्रयत्न करीत आहेत, आणि त्यांचें कार्य मोठें व उदात्त आहे, हेंहि खरें आहे; पण जर तुह्मांला खरें सामर्थ्यवान् आणि यशस्वी झालें पाहिजे, तर सत्य विरोधाभासात्मक, विपरीत वाटणारें आहे, हें तुह्मीं जाणिलें पाहिजे. कोणतीहि गोष्ट मिळविण्याचा उपाय ह्मटला, ह्मणजे आपण त्याच्या विरुद्ध होणें हा आहे. याशिवाय दुसरा इलाज नाहीं. 'राम' हें पूर्ण सत्य आपल्यापुढें मांडीत आहे. त्याची तुह्मीं अनुभवानें कसोटी पहावी. हवेंतर दुसऱ्या मार्गाचें प्रथम अवलंबन करावें, आणि शेवटीं सवडीनुसार 'रामा'च्या विधानाची प्रतीति पहावी.

दान करणें, त्याग हेंच कोणतीहि वस्तु मिळविण्याचा मार्ग आहे. जीवित मिळवावयाचें असल्यास—जीविताचें साफल्य करून घ्यावयाचें असल्यास, त्यावर पाणी सोडावें लागतें. पुष्कळ लोक या सत्यावर आक्षेप घेतात, असें 'रामा'च्या नजरेला आलें आहे.

तुह्मांला यश हवें असेल, तर तुह्मीं लोहचुंबक—लोहचुंबकाप्रमाणें आकर्षक—झालें पाहिजे. लोहचुंबकाकडे लोखंडाचे कण चोहोंबाजूंनीं खेंचले जातात, हें आपण पाहतोंच. इच्छा किंवा कामना लोहचुंबकाप्रमाणें आहे. विजयी मनुष्य लोहचुंबकाप्रमाणें असतो. कोणालाहि स्वतःला लोहचुंबक—आकर्षक बनवितां येईल. याला उपाय किंवा पद्धत कोणती?

कोणतीहि एकादी वस्तु घ्या. त्यामध्यें दोन तत्त्वें असतात. (१) धनतत्त्व किंवा धनविद्युत्; (२) ऋणतत्त्व किंवा ऋणविद्युत्. लोहचुंबकांत हीं तत्त्वें व्यवस्थित रीतीनें संचय पावलेलीं असतात. ह्मणजे धनविद्युत् एका बाजूला असते, आणि ऋणविद्युत् त्याच्या समोरच्या बाजूला असते. यामुळें लोहचुंबकांत आकर्षणशक्ति असते. इतर पदार्थांत हीं तत्त्वें अशा व्यवस्थित रीतीनें नसतात, आणि त्यामुळें त्या पदार्थांत आकर्षणशक्ति नसते. बायबलांत अशी एक कथा आहे,* कीं, मोझेसनें आपल्या

*एक्झोडसचा १४ वा अध्याय पहा.

हातांतील दंडानें तांबड्या समुद्राला स्पर्श केला, आणि त्यानें तो समुद्र दुभागला. लोहचुंबकांतहि धनविद्युत् व ऋगविद्युत् अशीं दोन तत्त्वें दुभागलेलीं–विभक्त केलेलीं असतात. तुह्मांलाहि लोहचुंबक–आकर्षक व्हावयाचें असेल, तर तुमच्यामधील दोन्हीं तत्त्वें पृथक् पृथक् केलीं पाहिजेत. त्यागाचा उपदेश करणारा वेदान्त हा मोझेसच्या दंडाप्रमाणें आहे. तो तुमच्यामधील धान्य व भूस (कोंडा), उच्चतत्त्व व निकृष्टतत्त्व, ईश्वरीतत्त्व व पशुवृत्ति यांनां वेगवेगळे करितो. तुमच्यामध्येंहि उच्च नीच, किंवा अनन्त सान्त, अशीं दोन तत्त्वें आहेत. नीचतत्त्व–पशुवृत्ति–अहंकार हा इच्छा करितो, कामना बाळगितो. उच्चतत्त्व किंवा अनन्ततत्त्व हें इच्छा, कामना यांपासून अलिप्त असून पूर्ण आहे. हीं दोन्ही कशींबशीं मिसळूं नका, आणि आपण कोणी क्षुद्र लहानसा प्राणी आहों असें मानूं नका, असा वेदान्त तुह्मांला उपदेश करितो.

सीझरच्या वस्तु सीझरला द्याव्या, आणि ईश्वराच्या वस्तु ईश्वराला द्याव्या. इच्छा, कामना व अहंकार यांची योग्य किंमत करावी, आणि त्यांत कांहीं तथ्य नाहीं असें अनुभवावें. आपण देवाचा देव, ईश्वराचा ईश्वर, अनन्त आहों, असें जाणा. आत्म्याला--अनन्ताला–पूर्णाला इच्छा, कामना कशा असणार? प्रत्येक वस्तु,प्रत्येक गोष्ट तुमच्यामध्यें आहे;नव्हे, संपत्ति, वैभव, सर्व कांहीं तुह्मीच आहां, याचा अनुभव घ्या. प्रणवोच्चारण करून याचा अभ्यास करूं लागा, ह्मणजे तुह्मांला प्रत्यय येईल. आपण देह आहों अशी तह्मीं भावना केली आहे, आणि तुह्मी देहच बनलां आहां. ईश्वराचें ध्यान करा, आत्मध्यानांत सदैव रहा, ह्मणजे इच्छेला--कामनेला वावच मिळणार नाहीं. अशा रीतीनें तुह्मी वागूं लागलां, ह्मणजे तुमच्यामधील दोन्ही तत्त्वें पृथक् पृथक् होतील, आणि तुह्मी लोहचुंबकाप्रमाणें आकर्षक व्हाल.

'राम' आतां कांहीं महत्त्वाचा विषय सांगणार आहे. अमुक एक वक्तयाला विलक्षण आकर्षणशक्ति आहे, असें कांहींजण ह्मणतात.

पण वक्त्याची एकच शक्ति आह्मांला हवी असते, असें नाहीं. विचार, संपत्ति, सौंदर्य इत्यादि गोष्टी आकर्षण करून घेण्याची शक्ति आह्मां-पैकीं कित्येकांनां हवी असते. पण त्या सर्व शक्तीचें गुह्य किंवा मर्म त्याग हेंच आहे. त्यागाशिवाय दुसरें कांहीं नाहीं!

वरील उपदेश ध्यानांत ठेवा आणि त्याप्रमाणें वागूं लागा, ह्मणजे तुह्मी लोहचुंबक–आकर्षक होतां. स्वतःच्या अनुभवानें 'राम' तुह्मांला हें सांगत आहे, त्याची प्रचीति घ्या. विचारांचें—सर्व तऱ्हेच्या ज्ञानांचें आकर्षक व्हावें, असें जर तुम्हांला वाटत असेल, तर 'हे परमेश्वरा! मला प्रकाश दे, तूं प्रकाशमय आहेस, मला प्रकाश–ज्ञान दे' अशी प्रार्थना करून भागेल काय? छे, कधींहि नाहीं! जसे तुमचे विचार असतात तसे तुह्मी होतां. '**यो यच्छ्रद्धः स एव सः**' 'मला प्रकाश मिळूं दे' अशी जर नेहमीं तुमची भावना असली, तर काय परिणाम होईल? प्रकाश किंवा ज्ञान नेहमीं तुमच्यापासून दूर राहील. प्रकाशाची याचना, किंवा मागणी नेहमीं करीत गेलां, तर प्रकाश केव्हांहि तुह्मांला मिळणार नाहीं.

श्रीमंत कुलांत जन्मलेला एकादा इसम असतो. त्याचा जन्मसिद्ध किंवा वारसाचा हक्क एक कोटि रुपयांचा असतो. पण, तो हक्क त्याला केव्हां मिळतो? त्याला बरींच वर्षें वाट पहावी लागते. वारसाहक्क मिळावा ह्मणून तो आपल्या मातापितरांच्या मरणाची वाट पहात असतो. याप्रमाणेंच आमच्या प्रार्थनेची गत होते. आह्मी प्रार्थना करतों, कीं, "हे परमेश्वरा! मी तुझा भक्त आहें, शिष्य आहें, हक्कानें मला अमुक मिळावें, तमुक मिळावें." आमची प्रार्थित वस्तु मिळण्यासाठीं आम्हांला परमेश्वर मरेतोंपर्यंत वाट पाहिली पाहिजे! परमेश्वर केव्हांच मरत नाहीं, आणि इच्छित वस्तु आम्हांला केव्हांहि मिळत नाहीं. प्रकाश—ज्ञान मिळविण्याचा हा मार्ग नव्हे. भिक्षांदेहीनें किंवा याचनेनें कोणाला कांहींहि मिळालेलें नाहीं!

हें विधान तुह्मांला फार आश्चर्यकारक वाटेल, पण तें तत्त्वज्ञानानें सिद्ध केलेलें आहे. खरें सामर्थ्य किंवा खरा मगदूर ह्मणजे प्रकाशाच्या

( ज्ञानाच्या ) इच्छेचासुद्धां त्याग होय. जोंपर्यंत तुह्मी प्रकाशाची इच्छा करितां, तोंपर्यंत प्रकाश तुमच्या हातीं लागत नाहीं. माझ्यापाशीं ये, अशी मीं प्रकाशाची याचना करावी काय? याचनेनें आह्मीं प्रकाशाला दूर पळवितों—प्रकाशाचे मार्ग बंद करून सोडतों.

'राम' आतां एक गमतीची गोष्ट सांगणार आहे. कोणीं एकानें आपल्या प्रियेचें मन वश करण्याकरितां एका फकिराजवळ मंत्र मागितला. त्या महात्म्यानें एक दिव्य मंत्र दिला, व त्याची फलप्राप्ति होण्याला त्यानें एक अट सांगितली. ती ही, कीं, "सांगितलेल्या मुदतीपर्यंत तो मंत्र ह्मणत असतां माकडाची कल्पना डोक्यांत येतां कामा नये!" तो गरीब बिचारा दुसऱ्या दिवशीं फकिराकडे कुरकुरत येऊन ह्मणाला "महाराज, मला जर तुह्मीं मुद्दाम बजाविलें नसतें, तर माकडाची कल्पना माझ्या डोक्यांत आली देखील नसती! पण आतां ही कल्पना मला, माकडाच्या पकडीप्रमाणें चिकटून राहिली आहे, आणि ती कांहीं केल्या जात नाहीं!" याप्रमाणेंच अज्ञान आणि दौर्बल्य यांनां नाहींसें करून टाकण्याच्या प्रयत्नांनींच आह्मी त्यांनां घट्ट करून ठेवितों.

याकरितां प्रकाशाविषयीं इच्छा किंवा हांव धरूं नका, ती सोडून द्या, आणि नंतर तुह्मांला किती आनंद होईल तो पहा. सत्याचा अनुभव घ्या. प्रकाश मिळो न मिळो, मला त्याची काय पर्वा? मी विश्वाचा सूर्य, विश्वाचा प्रकाश आहें, अशी भावना धरा, असा प्रत्यय घ्या. असें तुह्मीं केलें, ह्मणजे तुह्मी प्रियकर नव्हे, मूर्तिमंत प्रेमच होतां. नंतर तुह्मी प्रकाशाची इच्छा करीत नाहीं. कारण तुह्मी प्रकाशच आहां, प्रकाश—ज्ञान क्षुद्र अहंकाराला कोठून मिळणार? देह, मन किंवा अहंकार मी नाहीं, मी प्रकाश आहें, अशी भावना नेहमीं बाळगा, याचा प्रत्यय घ्या, ह्मणजे तुह्मी निरिच्छ आणि पूर्ण होतां. 'तुह्मांला इच्छा किंवा कामना नाहींत, तुह्मी निरिच्छ आहां, तुह्मी मधु आहां' अशा अर्थाची एक सुंदर कविता हिंदी भाषेंत आहे.

याविषयीं आतां 'राम' स्वतःचा अनुभव तुह्मांला सांगतो. एकाद्या कठिण प्रश्नावर किंवा विषयावर जेव्हां जेव्हां 'रामा'नें विचार करावा, तेव्हां कितीहि प्रयत्न केले तरी त्याला यश येऊं नये, असें पुष्कळदां झालेलें आहे. शेवटीं कंटाळा येऊन 'रामा'नें त्याविषयीं विचार करणें सोडून द्यावें; आणि आपल्याशीं ह्मणावें "आतां जाऊंदे, मला त्याच्याशीं काय करावयाचें आहे ? विषय सुटो अगर न सुटो, मला त्याची कांहीं क्षिति नाहीं!" असें ह्मणतांच "अरे, प्रकाशाची–ज्ञानाची इच्छा किंवा हांव कां बाळगतोस? तिला टाकून देऊन निरिच्छ हो!" अशीहि एक कल्पना डोक्यांत येत असे; आणि नंतर प्रकाश आपोआप पडून प्रश्नाचा उलगडा होत असे.

पंजाब विश्वविद्यालयांतील वरच्या वर्गांत अभ्यास करीत असतांना प्रोफेसरांची, किंवा सोडविलेल्या प्रश्नांच्या पुस्तकांची मदत घेऊन कोणतीहि गोष्ट करावयाची नाहीं, असा 'रामा'नें पण केला. याप्रमाणें अभ्यास करीत असतां कांहीं प्रश्न 'रामा'ला सहज सुटत असत, आणि पुष्कळ प्रश्न त्याला फार त्रास देत. संध्याकाळचे पांच वाजल्यापासून पहांटे पांच वाजेपर्यंत खटपट केली, तरी कांहीं प्रश्न सुटूं नयेत! शेवटीं कंटाळून पहांटेची स्वच्छ हवा घेण्याकरितां 'राम' गच्चीवर जात असे. त्यावेळीं, प्रश्न तर अद्याप सुटले नाहींत, यास्तव गळ्यावर सुरी ठेवावी, असा विचार 'रामा'च्या मनांत येई. याप्रमाणें देहाविषयीं उदास झाल्यावर, कठिण प्रश्न आपोआप सुटत असत. एवंच, जेव्हां आह्मी स्वतःला विचाराचा लोहचुंबक–केंद्र बनवितों, तेव्हांच आह्मी विचाराच्या पलीकडे जातों, विचारातीत होतों. आतांसुद्धां 'राम' अशाच रीतीनें वागतो. मी हें करीत आहें, तें करीत आहें, अशी कल्पना तो बाळगीत नाहीं. मला कांहीं लिहावयाचें नाहीं, मला तें घेऊन काय करावयाचें आहे, असें तो ह्मणतो. मी प्रकाश आहें, मी माझ्या वैभवांत असतों, हेंच खरें यश आणि आनंद, इतर सर्व कांहीं भ्रम आहे. ऐहिक ऐश्वर्य प्राप्त झालें, तर मी त्याकडे ढुंकूनहि पाहणार नाहीं. माझें

सर्वस्व, माझा आनंद ह्मणजे परमेश्वर आहे. अशा रीतीनें आत्मज्ञान, आत्मकृपा मिळवा, ह्मणजे इतर सर्व कांहीं आपोआप तुमच्यामागें धांवत येईल. 'मला हें किंवा तें घेऊन काय करावयाचें आहे? माझ्यावर कोणतीहि जबाबदारी नाहीं, किंवा मला कसलीहि भीति नाहीं. मी कोणाचा कांहीं जबाबदार नाहीं, मी कोणाचें कांहीं देणें नाहीं, मी पूर्ण आहें, मी प्रकाश आहें,' असे विचार नेहमीं मनांत बाळगा.

जग तुह्मांला काय सुख देणार आहे? सर्व सुख, सर्व आनंद तुह्मांला तुमच्यामधूनच मिळतो. तुमचा आत्मा आनंदघन आहे. त्याचाच नेहमीं उपभोग घ्या. इतर वस्तूंचा उपभोग घेऊं नये. असें झालें, ह्मणजे उत्तम कल्पना, उदात्त विचार आह्मांला शोधीत येतात, आणि आमच्या मनांत भरून जातात. कायदा किंवा नियम असा आहे. विचारांचें—ज्ञानाचें लोहचुंबक—केंद्र व्हावें, असें तुमच्या मनांत असेल, तर तुह्मांला प्रकाशाची—ज्ञानाची इच्छा सोडून दिली पाहिजे. ही अकरणरूप ( Negative ) बाजू झाली. नंतर मी प्रकाश आहें, मी ज्ञान आहें, मी माझ्या वैभवांत असतों, असें वाटलें पाहिजे, व याला करणरूप ( Positive ) बाजू ह्मणतात.

तुह्मांला मित्रमंडळी किंवा संपत्ति हवी आहे, असें समजा. तर प्रथम तुह्मीं ती इच्छा किंवा कामना सोडून द्यावी. ही अकरणरूप बाजूची तयारी झाल्यावर नंतर करणरूप बाजूच्या कार्याला लागावें. मी ईश्वर आहें, मी सच्चिदानंद आहें, मी विश्वाचा स्वामी आहें, अशी भावना मनांत बाळगावी. नंतर मित्र किंवा संपति प्राप्त झाल्यास मी **'सर्व खल्विदं ब्रम्ह'** या न्यायानें त्या वस्तूंतहि परमात्म्याला पाहीन आणि त्याचाच साक्षात्कार घेईन, असा निश्चय करावा. असें झालें ह्मणजे दुसऱ्याच्या दृष्टीनें तुह्मी यशस्वी होतां, पण स्वतःच्या दृष्टीनें त्याहून फार श्रेष्ठ होतां.

सूर्याच्या उष्णतेनें एकाद्या स्थळांतील हवा उष्ण व हलकी होऊन वर जाते आणि त्यामुळें तेथें पोकळी उत्पन्न होते. मग काय होतें?

बाहेरची हवा आंत शिरून पोकळी भरून काढिते. त्याप्रमाणें तुह्मी कामनातीत झालां, देहभावना, अहंकार यांचा तुम्हीं त्याग केला, आत्मतत्त्वांत लीन झालां, ह्मणजेसुद्धां पोकळी उत्पन्न होते, व अशा समयीं प्रत्येक पर्थाला तुमच्याकडे धांव घेणें भाग पडतें.

कित्येक शास्त्रज्ञांच्या मतें, लोहचुंबकाचें स्वरूप पोकळी ( Vacum ) हेंच आहे. तुह्मी क्षुद्र व स्वार्थी कामनांनीं गच्च भरून गेलां आहां. त्या कामना सोडून देऊन जेव्हां तुह्मी निरिच्छ व्हाल, तेव्हांच लोह चुंबक—आकर्षक व्हाल. ह्मणजे, पोकळी उत्पन्न होईल आणि सर्व पदार्थ तुमच्याकडे आकर्षिले जातील.

प्रश्न—रोग बरे करण्याला, जड वस्तूचा—जगताचा निषेध करणें जरूर आहे काय ?

उत्तर—रोग बरे करावयाचे असतील, तर प्रथम आपण पूर्ण आहों असें तुह्मांला वाटलें पाहिजे, आणि सर्वत्र ईश्वर दिसला पाहिजे. आपण ईश्वर आहों असें माना, ह्मणजे रोग नाहींसा होईल. आरोग्य, शक्ति, विचार, सर्व कांहीं, तुह्मी त्यांच्याहून श्रेष्ठ झालां ह्मणजे तुमच्याकडे धांवत येईल. देवाचें दर्शन घेण्याची किंवा त्याच्याशीं बोलण्याची इच्छा बाळगूं नका. कारण तुह्मी स्वतः देव आहां. तुह्मीं देवाला पहावें असें मनांत आणिलें, ह्मणजे तुह्मी देवाला तुमच्याबाहेर, दूर ठेवितां. *

मानवजातीचें कल्याण करावें अशी तुमची इच्छा आहे काय ? पण तुमच्या मदतीची अपेक्षा करण्याइतकें अकिंचन जगानें कां व्हावें ? न्यूटननें सर्व कामना सोडून दिल्या आणि आपल्यासमोर असलेल्या विषयांत—गणितांत तो मग्न झाला. याचा परिणाम असा झाला, कीं, तो जगाचा कल्याणकर्ता झाला. मानवजातीवर उपकार करावा किंवा

---

*इमरसन ह्मणतो "ईश्वर माझ्या आंत आहे असें दर्शविणारी गोष्ट मला शक्ति देते; ईश्वर माझ्याबाहेर आहे असें दर्शविणारी गोष्ट मला चामखीळ किंवा अवाळू यांसारखें कुचकामाचें करून सोडिते."

जगाला आपल्या ऋणांत ठेवावें, अशा विचारानें गणिताचे कूटप्रश्न सोडविण्यास तो बसला नाहीं. न्यूटननें आपलें स्वतःचें कर्तव्य योग्य रीतीनें केलें. कर्तव्याचरणापासून त्याला आनंद झाला आणि जगाचें कल्याण झालें.

लोकांनीं तुमची स्तुति केली नाहीं, तुमचें नांव झालें नाहीं, तरी कांहीं काळजी करूं नका. लोकांच्या दृष्टीनें यश मिळणें किंवा नांव होणें ह्मणजे एक भ्रमच आहे. आपण विश्वाशीं–परमात्म्याशीं, यशाशीं एक झालों आहों असें तुह्मांला वाटलें, कीं, तुह्मी तात्काल विजयी झालांच ह्मणून समजा.

मग जडवस्तूचा–जगाचा निषेध केला पाहिजे ? खचित ! आपण ईश्वर आहों, ब्रह्म आहों, असें तुह्मांला वाटलें ह्मणजे जग गेलेंच. जग मिथ्या आणि ब्रह्म सत्य* आहे, असें माना.

या दोन क्रिया नाहींत, एकच आहेत. तसेंच तुमचा आत्मा विश्वाचा आत्मा आहे; सूर्य, चंद्र, तारे, वृक्ष इत्यादिकांचा नियंता आहे, असें तुह्मांला वाटलें पाहिजे. असें वाटल्यावर याहिपलीकडे चला, आणि तुह्मांला ‘ रामा’प्रमाणें असें वाटूंद्या, कीं, सूर्य हा मेघ, धुकें उत्पन्न करतो. पृथ्वी, पाणी यांपासून मेघ, धुकीं हीं उत्पन्न होतात, असें लोक चुकीनें समजतात. पण हीं सर्व खरोखर सूर्यामुळें उत्पन्न

---

***अपूर्वं, अनपरं, अनंतरं, अबाह्यं, अस्थूलं, अनणु, अदीर्घं, अन्हस्वं,**

**—बृहदारण्यक.**

असें ब्रह्माचें वर्णन असून जगत् मिथ्या असल्याबद्दल योगवासिष्ठांत खालीलप्रमाणें उल्लेख आहेः—

**यदिदं दृश्यते किंचित्तन्नास्ति किमपि स्फुटम् ।**
**यथा गंधर्वं नगरं यथा वारि मरुत्स्थले ॥**

जें जें ह्मणून दृश्य आहे, तें तें सर्व मिथ्या आहे. आकाशांत गंधर्वनगरीचा किंवा मारवाडदेशांत पाण्याचा--मृगजलाचा जसा भास होतो, त्याप्रमाणचें जगाचा आभास--मिथ्या आहे.

होतात. सूर्य यांनां उत्पन्न करून जेव्हां तो त्यांच्याकडे जोरानें पाहतो, तेव्हां तीं नाहीशीं होतात. प्रखर सूर्याप्रमाणें आपण विश्वाचा नियंता आहों, आणि आपण मेघ, धुकें या रूपानें असणाऱ्या अज्ञानाला दूर घालवीत आहों, असें वाटणें हा एक अनुभवाचा–साक्षात्काराचा प्रकार आहे.

आपण ईश्वराच्या प्रतिमा आहोंत, तसें—प्रतिमारूपानें ईश्वरानें आपणांला उत्पन्न केलें आहे, असें लोक ह्मणतात. ‘ राम ’ ह्मणतो, तुह्मी प्रतिमा असाल तर सदैव दुःखी रहाल. तुह्मी देवाची प्रतिमा नाहीं, पण देवच आहां !

सूर्याचें प्रतिबिंब पाण्यांत पडलें आहे असें समजा. पाण्यांत पडलेल्या प्रतिबिंबाच्या सापेक्षतेनें सूर्याला बिंब किंवा परमात्मा असें ह्मणतात. वर सांगितलेल्या साक्षात्काराच्या प्रकारांत मनुष्याला आपला आत्मा बिंबासारखा–सूर्यासारखा वाटतो.

नेत्र उघडले आणि झांकले, ह्मणजे ‘रामा’ला असें वाटतें, कीं, ‘सूर्य, चंद्र, तारे इत्यादिकांनां मी व्यापून आहें; मी त्यांनां प्राण, शक्ति आणि चैतन्य देतों; मी त्यांचा आधार आहें, मी परमात्मा आहें.’ ही एक साक्षात्काराची तऱ्हा आहे. ही स्थिति अनुभविली, ह्मणजे ईर्ष्या, असूया, भीति–आपलें कांहीं तरी दुसरे चोरून नेतील आणि त्याचा फायदा करून घेतील अशी भीति किंवा शंका, हे सर्व प्रकार पार नाहींसे होतील.

एकादें पुस्तक मुलानें उचलिलें, तर त्याची आई क्षुब्ध होते काय ? नाहीं. कारण पुस्तक तिचें आणि मुलहि तिचेंच. मग तिनें कां क्षुब्ध व्हावें ? त्याप्रमाणें एकाद्यानें तुमचें कांहीं चोरिलें, तर असें समजा, कीं, तो आणि तुह्मी एकच आहां. त्यानें जें चोरलें, तें तुमचें, तसें त्याचेंहि आहे; मग भीति कां ? तुह्मांला उत्कर्ष किंवा आनंद याचनेनें मिळवावयाचा नाहीं. किंवा लोकांच्या दृष्टीनें त्याच्याकडे पहावयाचें नाहीं. तुमचें ध्येय, सत्य–आत्मतत्त्व हें आहे, आणि जर इतर सुखें आणि वस्तु तुह्मांला

प्राप्त होतील, तर "सैताना, मागें सर; मला तुझें कांहीं नको," असेंच तुह्मीं ह्मटलें पाहिजे. नंतर तुह्मांला आत्यंतिक सुख होतें. तुह्मी स्वर्गच बनून जातां आणि तुमचें जीवित कृतार्थ होतें.

आरोग्य मिळविण्याकरितां, रोगाचा प्रतिकार करण्याकरितां जड वस्तूचा निषेध करणें जरूर आहे काय? 'राम' ह्मणतो, नाहीं. फक्त तुमच्या आत्मतत्त्वावर जोर द्या, आणि वर सांगितलेल्या–'सूर्य जोरानें पाहून मेघ, धुकें वगैरे पार नाहींसें करितो' या साक्षात्काराच्या स्थितीचा अनुभव घ्या, ह्मणजे झालें.

प्राणायाम किंवा श्वासोच्छ्वास याविषयीं सांगतांना अभ्यासावर जोर द्यावा असें लोक सांगतात. पण 'राम' सांगतो, कीं, जेव्हां तुमचें मन सत्यांत लीन होतें, तेव्हां श्वासोच्छ्वास आपोआप उत्तम चालूं लागतो. प्रणवोच्चार करून आम्ही आत्मतत्त्वांत गढून गेलों, कीं, प्राणापानाची क्रिया अत्युत्तम रीतीनें चालू होते. फुप्फुसें भरून जातात आणि श्वासोच्छ्वास दीर्घ व लांब होऊं लागतो. सत्याची भावना हीच मुख्य गोष्ट आहे; आणि ती असली, ह्मणजे इतर सर्व कांहीं आपोआप जुळतें.

या देशांत कांहीं लोकांनां सुंदर नेत्र, सुंदर नासिका व सुंदर हनुवट्या पाहिजे आहेत. 'राम' सांगतो, कीं, तुह्मांला कांहीं आध्यात्मिक शक्ति मिळाली, तरी तुह्मी मर्यादित आहां आणि सुखी नाहीं. मानसिक शक्तीचा उपयोग संपत्ति मिळविण्याकडे कांहीं लोक करितात, त्यांच्याप्रमाणें तुह्मी मर्यादित, कष्टी आणि दुःखी आहां.

सौंदर्य, वर्ण, संपत्ति, आरोग्य इत्यादि कांहीं ईप्सित वस्तु तुह्मांला हव्या असतील, तर तुह्मांला वेदान्तांतील त्यागाचा अभ्यास थोडासा करावा लागेल; आणि त्यामुळें तुमचा थोडा फायदाहि होईल; पण असें अर्धेंमुर्धें काम करून भागावयाचें नाहीं. तर मग तुह्मीं मुळाशीं कां जात नाहीं, व त्याग पूर्णपणें आचरणांत कां आणीत नाहीं? तसें केल्यास तुमच्या इच्छित वस्तु आणि इतर सर्व कांहीं तुह्मांला मिळेल.

यासाठीं कांहीं विशिष्ट वस्तूंच्या नादीं न लागतां, राजमार्गानेंच जाण्याचा निश्चय करा. ‘ आपण स्वर्ग आहों, ईश्वर आहों ’ असें वाटणें, हाच स्वर्गप्राप्तीचा सर्वांत सुगम मार्ग आहे.

साक्षात्कार दोन तऱ्हेनें मिळतो. श्रद्धेनें आणि ज्ञानानें. वेदान्तावरील ग्रंथ वाचून आपल्या शंका तुह्मीं निवारण करून घ्याव्या. ‘राम’ वेदान्ताचें स्पष्ट व पूर्ण विवरण पुढें लवकरच करणार आहे.*

वेदान्तग्रंथ वाचून तुह्मांला साक्षात्कार मिळत नाहीं, तर त्यावर श्रद्धा ठेवा. ‘**श्रद्धावान् लभते ज्ञानम्.** ’ ख्रिश्चन लोकांनां कांहीं थोडा अनुभव मिळाला, तरी ख्रिस्ताप्रमाणें त्यांनां साक्षात्कार होत नाहीं. तरी पण ते विश्वास ठेवितात. तसेंच तुह्मांला वेळ असेल, व आवडत असेल, तर वेदान्तवाङ्मय वाचा. नाहींतर ‘रामा’वर, ईश्वरावर—आपल्या आत्म्यावर विश्वास ठेवा, ह्मणजे तुह्मी तराल. आपला उद्धार आपणच केला पाहिजे. “ **उद्धरेदात्मनाऽऽत्मानम्** ” दुसरा मार्ग नाहीं.

---

* हें काम स्वामीजींच्या हातून त्यांच्या अकालिक मृत्यूमुळें पार पडलें नाहीं, हें आमचें दुर्दैव होय !

## VEDANTIC IDEA OF EATING MEAT AND MISREADING OF SCRIPTURES.

## वेदान्तदृष्ट्या मांसाशन आणि धर्मग्रंथांचा विपरीत अर्थ.

प्रश्न—मांसाशनाविषयीं आपलें काय मत आहे?

उत्तर—जनावरांवर दया करावी, ह्मणून हिंदुस्तानांतील लोक मांस खात नाहींत, असें कांहीं लोक समजतात; कांहीं लोक या कारणामुळें मांस खात नसतील; पण वेदान्ती, स्वामी वगैरे मांस खात नाहींत, याचें कारण निराळें आहे.

वेदान्ताप्रमाणें कृपा किंवा कींव हें दौर्बल्य आहे. कदाचित् हें विधान चमत्कारिक वाटेल; पण तत्त्वज्ञांनीं नीट विचार करून असें ठरविलें आहे, कीं, कृपोक्ति अगर कृपा मुळाशीं असलेली, दुसऱ्याच्या मर्जीप्रमाणें वागण्याची वृत्ति हें एक प्रकारचें दौर्बल्य असून तें अज्ञानमूलक आहे. या वृत्तीपासून समाजाचें कांहीं हित होत नाहीं; उलट कितीतरी दोष आणि पापें हिच्यापासून उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, खावें, प्यावें, मजा मारावी, असेंच ज्यांचें ध्येय आहे, अशा तरुण मंडळीच्या कंपूंत एकाद्या नवीन मनुष्याला जाण्याचा प्रसंग आला असतां, त्यांपैकीं कोणीतरी, सर्वत्रांनीं पान करावें अशी सूचना पुढें आणितो, आणि बाकी मंडळी त्याला दुजोरा देतात. झालें. मग त्या नवीन मनुष्याला, त्या मंडळीला खूष करण्यासाठीं आपल्या इच्छेविरुद्ध पान करावें लागतें; व अशा मंडळींत कांहीं वेळां जाण्याचा त्याला प्रसंग आला, ह्मणजे त्याला पान करण्याचा मोह पडतो, आणि असे कांहीं दिवस गेले ह्मणजे त्याला दारूचें व्यसन जडतें. त्याप्रमाणें स्त्रियांनांहि दुसऱ्यांनां खूष करण्याकरितां आपल्या इच्छेविरुद्ध पुष्कळ गोष्टी कराव्या लागतात, आणि हळुहळु पुढें त्यांनां

त्या सवयी जडतात. याकरितां वेदान्त सांगतो, कीं, दुसऱ्यांनां खूष ठेवण्याच्या वृत्तीमध्यें अज्ञान, दौर्बल्य आणि पोकळ अभिमान, यांशिवाय कांहीं नसतें. दुसऱ्यांनां खूष करण्याकरितां कांहीं करूं नका. जो मानव योग्य वेळीं, 'छे, नाहीं' असें ह्मणूं शकतो, तो खरा शूर होय! तुमच्या स्वभावांतील करारीपणा आणि शौर्य हीं तुमच्या नकाराच्या--नाहीं ह्मणण्याच्या पात्रतेनें प्रगट होतात.

सत्याप्रमाणें आचरण केलें असतां क्रूरपणा होईल, कोणाचें हृदय विदीर्ण होईल, आपले नातलग, आप्तेष्ट विरुद्ध आहेत, ह्मणून दया करणारे लोक किती दुःखें भोगीत आहेत, याचा विचार करा. सत्याचा खून करण्यापेक्षां एकाद्याचें अंतःकरण विदीर्ण झालेलें फार चांगलें. सत्याला मान दिला, कीं, तुमच्या मित्रांनां मान मिळाल्यासारखा आहे. मित्राच्या वासनांनां व अभिमानाला मान किंवा महत्त्व देणें, ह्मणजे त्याच्या आत्म्याचा--सत्याचा खून करण्यासारखें आहे. बाह्य देहापेक्षां सत्याला अधिक मान द्या!

तसेंच, स्वतःविषयीं आदर किंवा मान ह्मणजे आपल्या क्षुद्र देहाचा आदर, असें पुष्कळ लोक चुकीनें समजतात, आणि दुःख भोगतात. आदर देहाकरितां नसून सत्याकरितां-आत्म्याकरितां असावा. तुमच्या अंतर्यामीं असलेल्या ईश्वराचा साक्षात्कार तुह्मीं घेतला, ईश्वरी भावनेनें तुह्मीं भरून गेलां, ह्मणजे तुह्मी आदरानेंहि भरून जातां, पूर्ण आदरयुक्त होतां; पण तुह्मी देहाचे चोंचले करूं लागलां, देहाला विशेष मान देऊं लागला, कीं, तुह्मी आत्मघात करितां आणि स्वतः-करितां खळगा खणून ठेवितां.

आतां मांसाशनाचा वेदान्तदृष्ट्या विचार करूं. वेदान्त सांगतो, कीं, देहावर आसक्ति ठेवूं नका. देह राहो अथवा जावो, त्याची काळजी करूं नका. देहाला कोणी मान देवो, कोणी दगड मारो, त्याची फिकीर करूं नका. 'निंदास्तुति करणारा आणि निंदास्तुति करून

घेणारा हे दोघे एकच आहेत, तेव्हां त्या निंदास्तुतीची किंमतच नाहीं. वेदान्ताप्रमाणें तुह्मीं आत्मसाक्षात्कार घेतला, कीं, तुमची देहभावना नष्ट होते. स्वतःची देहभावना गेल्यावर दुसऱ्याच्या देहाविषयीं आदर नाहींसा होईल. आत्मसाक्षात्कारामुळें जो स्वतःच्या देहाची पर्वा करीत नाहीं, तो दुसऱ्याच्या देहाची कशी पर्वा करील? आपला देह खरा वाटला, तर तो इतरांचे देह खरे मानील. त्याच्या वांट्याला त्याचाच नव्हे, तर इतरांचे देहहि नाहींसे झालेले असतात. लाखों सूर्य आणि तारे नाहींसे झाले, तरी त्याला कांहीं वाटत नाहीं. मेंढ्या, बकरीं आणि गुरें मेल्याबद्दल त्याला कांहीं वाटत नाहीं.

महाभारतांतील कुरुक्षेत्रावरील कौरवपांडवांचें घनघोर युद्ध सुरू होण्याच्या वेळीं, आपले गणगोत युद्धाला सज्ज झालेले पाहून अर्जुनाचें मुखकमल म्लान झालें, त्याच्या शरीराला कंप सुटला, त्याच्या अंगाची लाही झाली आणि त्याच्या हातांतून गांडीवधनुष्य गळून पडलें. याप्रमाणें विषण्ण—खेदपरिपूर्ण आणि कृपायुक्त( कृपयाविष्ट ) झालेल्या अर्जुनाला पाहून त्याचा सारथी—जगदुद्धारक श्रीकृष्ण परमात्मा यानें त्याला असा बोध केला, कीं, "अर्जुना ! तूं देह नाहींस; पहा, कर्ता-करविता परमेश्वर आहे; आत्मा अमर, अविनाशी आहे. तो अज, नित्य, शाश्वत आहे; आणि देहाचा नाश झाला, तरी त्याचा नाश होत नाहीं. याकरितां तूं अगदीं न घाबरतां आपलें कर्तव्यकर्म कर, आणि तुझें कर्तव्यकर्म--युद्ध करीत असतां तुला हजारों लोक मारावे लागतील, ते तूं बिनधोकपणें मारून टाक. मी देवांचा देव आहें आणि मलाहि क्षणो-क्षणीं लाखों प्राण्यांचा संहार करावा लागत नाहीं काय ? बरें, इतकें करून हि मी अलिप्त, निर्दोष आहें. मीं हे लोक पूर्वीं मारून टाकलेले आहेतच; आतां, हे सव्यसाचिन्, तूं केवळ निमित्त मात्र हो." अशा प्रकारचा अर्जुनाला सत्याचा–वेदान्ताचा उपदेश मिळाल्यावर, त्यानें आपले गुरु, काकेमामे, आप्तइष्ट यांनांहि ठार करण्यास मागेंपुढें पाहिले नाहीं, व वेदान्त-तत्त्वाप्रमाणें अर्जुनाला कांहीं दोष लागला नाहीं. मग बकरीं,

मेंढ्या, बैल यांनां मारण्यानें दोष लागेल,असें वेदान्त कधीं तरी सांगेल काय?

मांस न खाण्याचें खरें कारण, वेदान्ताच्या दृष्टीनें निराळें आहे. ज्याप्रमाणें दारू, अफू, सोमल इत्यादि द्रव्यांचे विशिष्ट परिणाम घडतात, त्याप्रमाणेंच मांसाशनाचाहि एक विशिष्ट परिणाम घडतो. मांसाशनानें तुमची अशी स्थिति होते, कीं, तुमचें मन एकाग्र करितां येत नाहीं, व ही चित्तव्यग्रतेची स्थिति धार्मिक व मुमुक्षुजनाला नको असते. जर कदाचित् तुह्मांला मांसाशनाची सवय सोडून देतां येत नाहीं, किंवा तुह्मीं जर क्षत्रिय असाल, योद्धे असाल, तुमचें काम फार मेहनतीचें असेल, तर तुह्मीं मांस खावें; नुसत्या वनस्पत्याहारावर राहूं नये, असें वेदान्त सांगतो. इतर धंद्यांविषयीं लोकांनीं अनुभव घेऊन काय परिणाम होतो तो पहावा. कित्येकांचें मांसाशनावांचून चालतें, पण कित्येकांचें त्यावांचून चालत नाहीं. सर्वांत योग्य जे प्राणी असतील, तेच जिवंत रहावेत ( The survival of the fittest ) अशी निसर्गाची योजना आहे. मोठा मासा पुष्कळ लहान माशांनां खातो, आणि आपण जगतो. खनिज–कोटीवर वनस्पतिवर्ग वाढतो. वनस्पति जनावरांच्या उपयोगीं पडतात आणि जनावरें मनुष्याच्या उपयोगीं पडतात. मनुष्यामध्यें जे योग्य असतील, तेच वाढत जातात. लढाया, सांथी, दुष्काळ, इत्यादि प्रकार सुरू झाले, ह्मणजे अशक्त जीव मरून जातात. योग्य असतील, तेवढे मात्र उरतात. निसर्गाच्या योजनेप्रमाणें मांस खाऊन तुह्मांला जगाचें कांहीं हित करतां आलें, तर तुह्मी तें अवश्य खा; पण, मांसाशनाशिवाय तुह्मीं जगाचें हित करूं शकाल, तर तुह्मी तें खाऊं नका. प्रत्येकानें, आपण ईश्वराच्या हातांतील साधन आहों, असें समजून आपलें काम अकर्तृकपणें आणि निरहंकारपणें केलें पाहिजे; आणि अशा रीतीनें काम करीत असतां, जसें यंत्रांतील चक्रांनां वंगण पाहिजे, तसें तुमच्या शरीरांतील चक्रांनां मांसरूपी वंगण हवें असल्यास, तें उपयोगांत आणण्यास, मांस खाण्यास कचरूं नका.

पण नुसत्या स्वादाकरितां--रुचीकरितां मांस खाणें हें पाप आहे ! आपल्या क्षुद्र वासना तृप्त करण्यासाठीं मांस खाणें किंवा दुसरें कांहीं करणें हें पाप आहे. तुह्मीं जर मांस औषधाप्रमाणें घ्याल, महत्त्वाचें काम करण्यासाठीं किंवा मानवजातीचें कल्याण करण्यासाठीं आपलें शरीर तयार असावें, या हेतूनें त्याचा उपयोग कराल, तर मात्र पाप नाहीं. लोकांची नजर नेहमीं रुचीकडेच असते. एकादी वस्तु गोड असली आणि तिच्या योगानें सत्याची प्रगति होत असली, तर तिचा अवश्य स्वीकार करावा. पण, ती नुसती गोड आहे, ह्मणून घेऊं नये. केव्हांकेव्हां, कांहीं वस्तु गोड आणि उपयुक्त असतात, पण नेहमीं त्या तशा नसतात.

वरील प्रश्नाचा विचार करितांना दुसरा एक प्रश्न उपस्थित होतो. तो असा, कीं, पुष्कळ धर्मग्रंथांचा भलताच अर्थ केला जातो, आणि त्यायोगें समाजाचें फार नुकसान होतें. मिल्टन समजण्याला मिल्टन झालें पाहिजे, ख्रिस्त समजण्याला ख्रिस्त झालें पाहिजे, असें ह्मणतात, तें खरें आहे. ही कल्पना आमच्या प्राचीन ऋषींनां फार पसंत होती. उपनिषत्कार ऋषींनीं सत्याचा इतका साक्षात्कार घेतला होता, आणि वाचकांशीं ते इतके ऐक्य पावले होते–तन्मय झाले होते, कीं, त्यांनीं आपलीं नांवें देखील लिहून ठेविलीं नाहींत. वेदांतसुद्धां असें लिहिलें आहे, कीं, जनहो, तुह्मी वेदांच्या पलीकडे जा, उपेदशाप्रमाणें वागा आणि फायदा करून घ्या. बायबलांतसुद्धां अशीं कांहीं वाक्यें आढळतात. उदाहरणार्थ.—The Kingdom of God is within you [ ईश्वराचें साम्राज्य--सत्ता तुमच्या अंतर्यामीं आहे. ] लोक अशा वाक्यांचा कसा विपरीत अर्थ करितात, हें पुढील गोष्टीवरून अधिक स्पष्ट होईल.

एकदां एक गुरु फार दमून आला आणि तो ओट्यावर आडवा पडला. पुढें, शिष्याला हांक मारून तो ह्मणाला "बेटा, माझें सर्वांग दुखत आहे. यास्तव, माझें अंग चोळ आणि पाय तुडीव." हिंदुस्तानांत मर्दनाची आणि पाय तुडविण्याची चाल आहे. गुरूचें भाषण ऐकून

तो शिष्य ह्मणाला "महाराज, आपला देह फार पवित्र आहे, माझे पाय मी त्या देहाला लावणार नाहीं; कारण, तसें करणें महत्पाप होईल. मी हवें तें करीन, माझा जीव देईन, पण आपला पवित्र देह माझ्या पायानें विटाळणार नाहीं." त्यावर गुरु ह्मणाला "बाबा, असें करूं नको; माझे पाय फार दुखत आहेत, ते थोडेसे तुडीव." शिष्य रडूं लागला, आणि कितीहि त्याची समजूत घातली, तरी आपल्या गुरूचे पाय तुडविण्यास तो कबूल होईना. शेवटीं गुरु ह्मणाला "जा मूर्खा! तूं माझें अंग तुडविण्यास कबूल नाहींस, तसें करणें तुला पाप वाटतें; पण माझा शब्द, माझें वचन आपल्या पायाखालीं तुडवून टाकण्यास तुला दिक्कत वाटत नाहीं." अंग तुडविण्यापेक्षां, गुरूच्या वचनाची पायमल्ली करणें हें अधिक पाप नाहीं काय? ख्रिस्त, महम्मद इत्यादि महात्म्यांचीं आणि वेदांतील वचनें लोक सहज पायाखालीं तुडवितात; पण, त्या महात्म्यांच्या देहाला पवित्र मानतात आणि विशेष महत्त्व देतात. त्या महात्म्यांनां आपल्या देहाची कांहीं किंमत नसते; प्रभुभोजनसमयीं भाकरीचा तुकडा मोडते वेळीं ख्रिस्तानें 'माझें मांस खा आणि माझें रक्त प्राशन करा,' असें ह्मटल्याप्रमाणें ते आपल्या देहाचें बलिदान करितात.

कांहीं लोकांनां आपला क्षुद्र अहंकार सोडतां येत नाहीं. ते आपली उन्नति करून घेत नाहींत; उलट ख्रिस्ताला, देवाला खालीं ओढूं पाहतात. बायबलांतील एका वाक्यांतील कांहीं शब्दांच्या योगानें हें विशेष स्पष्ट होईल. हिंदुस्तानांत एका दारुविक्याचा मुलगा, मिशनऱ्याच्या इंग्रजी शाळेंत शिकत होता. तेथें बायबलाचा पाठ वाचतांना त्यानें "The spirit of God brooded over the waters "(परमात्मा क्षीरसागरांत ध्यानस्थ बसला होता) असें वाचिलें. त्याला spirit ह्मणजे दारू आणि water ह्मणजे पाणी हें माहीत होतें. शिवाय, यव, द्राक्षें आणि इतर धान्यें पाण्यांत मिसळून त्याचें मद्य तयार करतात, हें त्यानें पाहिलें होतें. मात्र God (देव) ह्मणजे काय हें त्याला माहीत नव्हतें. God ह्मणजे ज्यापासून दारू तयार करितात असें एक प्रकारचें धान्य

असावें, असें त्याला वाटलें. याप्रमाणें लोक धर्मग्रंथांचा विपरीत अर्थ करितात. त्यांनां दारूच्या दुकानांत--विषयपंकांत राहणें फार आवडतें. त्यामुळें उच्च धर्मतत्त्वांचा भलताच अर्थ त्यांच्याकडून होतो.

कोणा एका लष्करी अम्मलदाराचें प्रेम एका स्त्रीवर जडलें होतें. त्याच्या वरिष्ठ अम्मलदारालाहि ती स्त्री आपणाला मिळाल्यास फार चांगलें होईल, असें वाटूं लागलें, आणि तो तिला वश करण्यासाठीं खटपट करूं लागला; पण, त्या स्त्रीचें मन कनिष्ठ अम्मलदारावरच आहे असें त्याला दिसून आलें.एकदां तो कनिष्ठ लष्करी अम्मलदार रजा घेऊन आपल्या घरीं गेला. कर्मधर्मसंयोगानें ती स्त्रीहि त्याचवेळीं तेथें गेली. दोघांचीं मनें पूर्णपणें जुळलीं आणि त्यांनीं लग्नाचा घाट घातला. पुढें, आपली रजा कांहीं दिवस वाढवावी ह्मणून त्या कनिष्ठ अम्मलदारानें अर्ज केला. हा अधिक रजा कां मागत आहे हें कळल्यामुळें आणि त्याला त्याचा हेवा वाटल्यामुळें 'Join at once' (एकदम कामावर रुजू हो) अशी त्या वरिष्ठ अम्मलदारानें त्या अर्जाच्या उत्तरादाखल त्याला तार केली. हा जबाब वाचून तो फार निराश आणि खिन्न झाला; इतक्यांत ती स्त्री तेथें येऊन असें खिन्न होण्याचें कारण काय, अशी विचारपूस करूं लागली. त्यानें तिला लगेच वरिष्ठ अम्मलदाराची तार दाखविली. ती पाहून तिला फार आनंद झाला आणि ती फार गडबडीनें जाऊं लागली. इतकी घाई कां, असें प्रियकरानें तिला विचारतां, ती ह्मणाली 'Join at once' (लवकर लग्न उरकून टाका) असा आपल्या वरिष्ठाचा हुकूम आहे, तेव्हां लग्नाच्या तयारीसाठीं मी गडबडीनें जातें. याप्रमाणें लोक धर्मग्रंथांचा आपणाला पाहिजे तसा अर्थ करितात. लग्न जुळविण्यासाठीं एकाद्या स्त्रीनें असा अर्थ केला तर साजेल; पण धर्मग्रंथांचा असा विपरीत अर्थ करतां कामा नये.

धर्मग्रंथ सांगतात, कीं, 'शरीर हें ईश्वराचें-आत्मारामाचें मंदिर आहे.' या वाक्याचा अर्थ लोक भलताच करितात. देहाचे चोंचले करावे, देहाला सर्वस्व मानावें, आणि देवाळ्यांतील देवाला विसरावें,

असा याचा अर्थ नाहीं. लोक देवाला विसरतात आणि देवालयालाच विशेष महत्त्व देतात. 'The body is the temple of God' (शरीर हें आत्मारामाचें मंदिर आहे) या वाक्यांतील 'Temple' या शब्दाचा अर्थ मंदिर असा न घेतां, कपाळ असा घेऊन एका मुलानें असा प्रश्न केला, कीं, तर मग, ईश्वराचे कान कोठें आहेत? याहून अर्थाचा अधिक विपर्यास तो कोणता?

देवालयाचें महत्त्व आंत असलेल्या देवासाठींच आहे; देवालयाला—देहाला विसरून जाणें, आंतील देवाला—आत्म्याला पाहणें हाच देवालयाचा उपयोग आहे. परमात्मा विभु नाहीं काय? आणि त्याचें देवालय सर्वत्र नाहीं काय? सूर्य आणि तारे हीं त्याचीं मंदिरें नव्हत काय? प्रत्येक पदार्थ, प्रत्येक वस्तु त्या परमात्म्याचें मंदिर आहे. प्रत्येक वस्तूचा उगम परमात्म्यापासून असून ती आम्हांला आपल्या उगमस्थानाचा बोध करीत असते.

आतां 'राम' तुह्मांला एक सनातन तत्त्व किंवा कायदा सांगणार आहे. तो नीट ऐकून घ्या, आणि भीति, संकटें, त्रास यांपासून मुक्त व्हा. तो कायदा असा. लोकांनीं आपणाला भजावें असें ज्याला वाटतें, ज्याला मान पाहिजे, त्यानें प्रथम स्वतःला क्रूसावर चढविलें पाहिजे, सुळावरच्या यातना सोसल्या पाहिजेत. खिस्त, बुद्ध, सॉक्रेटिस, ब्रुनो यांनीं प्रथम त्रास सोसले, आणि नंतर सारें जग त्यांनां मान देऊं लागलें. त्यांनीं प्रथम किंमत दिली आणि नंतर बक्षीस (मान) मिळविलें. जगांतील इतर स्त्रीपुरुष प्रथम बक्षीस, मान आधीं मिळवूं पाहतात आणि किंमत देण्याचें नाकरितात. पण, किंमत दिल्याशिवाय वस्तु मिळते कोठें? हा कायदा अढळ, अपरिहार्य असल्यामुळें खिस्त, कृष्ण यांसारख्या महात्म्यांची देखील तो पर्वा करीत नाहीं. मग, इतरांची काय कथा? नेपोलियन, वाशिंग्टन, न्यूटन यांनांहि किंमत द्यावी लागली. न्यूटनला तर इतका त्रास सोसावा लागला, कीं, कित्येक वेळां त्याला जेवणाचीहि स्मृति नसे. कायदा व्यक्तीकडे लक्ष्य देत नाहीं.

पापी, साधुसंत, तत्त्वज्ञ इत्यादि सर्व त्याच्या दृष्टीनें सारखेच आहेत. तुमच्या देहापुरतीच त्यानें खैर करावी असे ढुड्ढाचार्य तुह्मी कोण? जगाकडून मान पाहिजे, तर प्रथम आपली मान खोड्यांत-त्रासांत घातली पाहिजे, वस्तूची किंमत दिली पाहिजे, हें विसरूं नका. 'ज्युवेस' नामक एका नाटकांत, एका यहुदी नायिकेची अशी इच्छा होती, कीं, जोसेफनें आपणाला मान द्यावा--आपल्यावर प्रेम करावें. पण तिनें प्रथम किंमत दिली नाहीं. तिला जोसेफकडून मान मिळाला, पण तिला नंतर तरी किंमत द्यावी लागली--त्रास सोसावा लागला. पांच वर्षें, विरहानें वेडी बनून तिला भटकत फिरावें लागलें. प्रत्येक नाटकांत किंवा कादंबरींत प्रत्येक नायक किंवा नायिका यांनां आलेला अनुभव जगाच्या इतिहासांत दृष्टोत्पत्तीला येतो. अहंकाराला दूर सारल्याशिवाय योग्य मान किंवा प्रेम मिळत नाहीं.

वासना तृप्त करण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे त्या सोडून देऊन निरिच्छ होणें हा आहे. फारशी भाषेंत 'मतलब' नांवाचा एक सुंदर शब्द आहे. त्याचे दोन अर्थ आहेतः-( १ ) इच्छा, ( २ ) मागूं नका ( निरिच्छ व्हा ). वासना फलद्रूप झाल्या पाहिजेत, तर त्या सोडून द्या. त्यांच्या पलीकडे जा-निरिच्छ व्हा.

पतंगांनां दिवा फार आवडतो. दिव्यावर त्यांचें निःसीम प्रेम असल्यामुळें ते दिव्यावर झडप घालतात आणि भस्म होऊन जातात. भस्म होणें हें हिंदुस्तानांत प्रेमाचें चिन्ह समजतात. पतंगाचें दिव्यावर इतकें प्रेम असतें, कीं, ते स्वतःला भस्म करून घेतात. वेदान्त सांगतो, छेः, खरा प्रकार असा नाहीं. दिवा प्रथम आपणाला जाळून घेतो, नंतर त्याच्यावर पतंग प्रेम करितात. त्याप्रमाणें तुमच्या व्यक्तित्वाला, अहंकाराला जाळून टाका, नाहींसें करा, ह्मणजे तुमच्या इच्छा तृप्त होतील, तुह्मांला मान मिळेल आणि तुमच्यावर प्रेम केलें जाईल. अहंकाराला मारा, स्वार्थत्याग करा, असें तोंडानें ह्मणणें सोपें आहे; पण नुसतें तसें ह्मणून भागत नाहीं; त्याप्रमाणें आपलें आचरण झालें

पाहिजे. देवालयांत किंवा देवघरांत नियमित वेळीं कांहीं प्रार्थना ह्मटल्या, कांहीं विधि पाळले, ह्मणजे सर्व कांहीं झालें, असें समजूं नका. प्रत्येक दिवशीं, हरघडीं हा स्वार्थत्यागाचा धडा आचरणांत आणिला पाहिजे. आपले मित्र, नातलग यांच्याशीं होणाऱ्या आणि प्रपंचांतील इतर व्यवहारांत तुह्मीं स्वार्थत्यागाचा अभ्यास केला पाहिजे.

स्वार्थत्याग करा, असें नुसतें कोष्टकासारखें पाठ करून भागावयाचें नाहीं. एकादा मुलगा पाढे व गुणाकाराचे नियम तोंडानें पाठ करतो, पण तेवढ्यानें काम भागतें काय ? आणि त्याला गुणाकार चांगला करितां येतो काय ? नाहीं. नुसते नियम लक्ष्यांत ठेवून भागत नाहीं. अभ्यांस केला पाहिजे, हजारों उदाहरणें सोडविलीं पाहिजेत, पाठ केलेले नियम आडवेतिडवे लावून पाहिले पाहिजेत. असें कराल, तेव्हांच गणितविषय–उदाहरणें आपल्या करतलामलकवत् होतील. नियम पाठ केले आणि उदाहरणें सोडविलीं नाहींत, तर पुष्कळ चुका होण्याचा संभव असतो. पण, बरींच उदाहरणें सोडवून नियमांचा पडताळा पाहत गेलें, तर चुकीशिवाय सर्व काम होतें. त्याप्रमाणें स्वार्थ-त्यागाचा अभ्यास नेहमीं करीत राहिलें पाहिजे. येतांजातां, बसतां-उठतां, प्रपंचांतील सर्व व्यवहार करीत असतां, स्वार्थत्यागाचें तत्त्व आचरणांत आणीत असावें. वेदान्तांतील तत्त्वें किंवा उपदेश तोंडानें सांगणें सोपें आहे, पण त्याप्रमाणें आचरण झालें पाहिजे; आणि हें होण्यासाठीं विवेक, सतताभ्यास यांची कास धरिली पाहिजे.

'राम' गणिताचा प्रोफेसर असतांना, उदाहरणें फळ्यावर लिहीत असतांअसतांच सोडवीत असे. तसेंच, १८ अंकांचें गुण्य आणि १७ अंकांचें गुणक घेऊन त्यांचा गुणाकार तत्काळ एकाच ओळींत 'रामा'ला लिहितां येत असे. अशी हातोटी त्याला कशी साधली होती ? अभ्यासानें. यासाठीं वेदान्ताची शाळा केवळ तुमच्या हृदयांतच असूं नये. दुकान, रस्ता, घर, देवघर, अभ्यासाची खोली, दिवाणखाना, भोजन-गृह इत्यादि सर्व वेदान्त शिकण्याच्या शाळा होत. या सर्व शाळांत

अभ्यास करा, स्वार्थत्यागाचीं उदाहरणें सोडवा, आणि वेदान्त करतलामलकवत् करून 'हस्तामलक' व्हा.

एके दिवशीं ' राम ' रस्त्याच्या बाजूनें पुस्तक वाचीत चालला होता. एका गृहस्थानें ' रामा'ची थट्टा करून ह्मटलें " अहो, चिमुकले महाराज, आपण येथें काय करितां ? ही शाळा नव्हे. पुस्तक द्या फेंकून आणि व्हा चालते. " रामा'नें उत्तर दिलें "सर्व विश्व ही माझी शाळा आहे ! " आमची शाळा कोणती असावी, हें ' रामा'ला आतां चांगलें कळतें.

वेदान्त रोज आचरणांत आणिला नाहीं, तर त्याचा काय उपयोग? पुस्तकांत छापलेला आणि कसरीनें खाण्याकरितां कपाटांत टाकून सोडलेला वेदान्त कांहीं कामाचा नाहीं. वेदान्त आचरिला पाहिजे. वेदान्ताला अग्नि—ज्ञानाग्नि असें ह्मणतात. या ज्ञानाग्नीनें आमचीं दुःखें, संकटें यांचें निवारण झालें नाहीं, तर थंडीचें निवारण करणाऱ्या आणि आमचें अन्न शिजविणाऱ्या साध्या अग्नीइतकीहि त्याची योग्यता नाहीं. तुमच्या चिंता, काळज्या, तुमचीं दुःखें यांचें निवारण करून वेदान्तानें तुह्मांला सुखी केलें नाहीं, तर त्याला लाथाडून सोडा.

वेदान्त आचरणांत आणिला—त्याचा अभ्यास केला, ह्मणजे वेदान्ताचें खरें ज्ञान कसें होतें, याविषयीं एक गोष्ट सांगतों.

युधिष्ठिर लहानपणीं इतर राजपुत्रांबरोबर एका पंतोजीच्या शाळेंत शिकत असे. वर्षाच्या शेवटीं परीक्षक शाळातपासणीला आले. त्यावेळीं त्यांनीं, तुझा कितपत अभ्यास झाला आहे, असा प्रश्न युधिष्ठिराला केला. युधिष्ठिरानें धीटपणें उत्तर दिलें " मी धुळाक्षरें आणि पहिल्या पुस्तकांतील एकच पहिलें वाक्य शिकलों आहें, " हें उत्तर ऐकून पंतोजीला राग आला, आणि त्यानें त्याला दरडावून विचारलें "आणखी कांहीं तुला येतें कीं नाहीं ? " " दुसरें एक वाक्य मला येतें, " असें युधिष्ठिरानें चांचपत उत्तर दिलें. परीक्षक शाळा तपासून निघून

गेल्यावर पंतोजीनें एक छडी आणविली, आणि युधिष्ठिराला समोरं आणून त्याचा समाचार घेण्यास सुरुवात केली. कांहीं मिनिटें शिक्षकानें बेदम मार दिला, तरी युधिष्ठिराला राग आल्याचें किंवा दुःख झाल्याचें चिन्ह त्याच्या तोंडावर दिसेना. पंतोजीला याचें फार आश्चर्य वाटून तो आपल्या मनांत ह्मणाला "हें असें कसें ? मीं याला इतकें झोडपलें, तरी हा रडत नाहीं, रागावत नाहीं, हें कसें ?" इतक्यांत पंतोजीची दृष्टि सहज त्या पुस्तकांतील 'कधींहि रागावूं नये,' या पहिल्या वाक्याकडे गेली. फिरून त्यानें युधिष्ठिराच्या मुखाकडे पाहिलें, तों त्याच्या मनांत चक्क प्रकाश पडला. पहिल्या वाक्याचा अर्थ युधिष्ठिराच्या चेहऱ्यानें त्याला स्पष्ट सांगितला. पंतोजीनें हें वाक्य पुष्कळदां वाचिलें होतें—पोपटाप्रमाणें तोंडपाठ केलें होतें; हें वाक्य आचरणांत आणितां येतें किंवा आणावें, ही कल्पना त्याला नव्हती. आपण एकहि वाक्य खरें शिकलों नाहीं, मुलानें तें खरें जाणलें, याविषयीं त्याला लाज वाटूं लागली, आणि त्याच्या हातांतून छडी खालीं पडली. नंतर तो युधिष्ठिराची पाठ थोपटून ह्मणाला "शाबास, राजपुत्रा, शाबास! तूं एक तरी वाक्य चांगलें शिकलास, आम्हांला तेवढेंसुद्धां येत नाहीं; यःकश्चित् कारणानें आह्मी रागावतों. तूं आमच्यापेक्षां शहाणा खरा." या प्रमाणें युधिष्ठिराची स्तुति चालली असतां तो ह्मणाला "गुरुजी, माफ करा. मी तें पहिलें वाक्य नीट शिकलों नाहीं; कारण, आपण मला मारीत असतांना एकदोन मिनिटांतच रागाचा—कांहीं सूड घेण्याचा विचार माझ्या मनांत आला." याप्रमाणें उत्तर देऊन दुसरें वाक्य 'खरें बोलावें' हें आपणाला येत आहे, असें युधिष्ठिरानें नकळत सिद्ध केलें. पंतोजीनें त्याची स्तुति चालविली होती; वास्तविक आपल्या मनांतील विचार प्रगट करण्याचें त्याला कांहीं कारण नव्हतें; उलट मनांतील खरे विचार छपविण्याचा मोह होता, तरी त्यानें सत्य तेंच सांगितलें ! पुढें आयुष्यांत त्यानें दुसरें वाक्य आचरणांत आणिलें.

युधिष्ठिराप्रमाणें आम्हीं शिकलें पाहिजे. युधिष्ठिराप्रमाणें वेदान्ताचा अभ्यास केला पाहिजे, वेदान्त आचरणांत आणिला पाहिजे.

दुसरा कोणी तुह्मांला तारणार नाहीं, तुह्मीं आपला उद्धार स्वतः करून घेतला पाहिजे. मोठ्या पहांटेळा जेव्हां तुह्मी प्रणवोच्चार करितां, तेव्हां वेदान्त आचरणांत आणण्याचा दृढ निश्चय करा. प्रत्येक काम हातांत घेतांना सावध रहा. नदींत पोहावयाला पडतेवेळीं, अंगावरील कपडेलत्ते काढून तुह्मी तयार होतां, त्याप्रमाणें तुह्मीं कोणत्याहि कामाचा अंगिकार करितांना किंवा मित्राच्या भेटीला जातांना देहभावना, अहंकार बाजूला काढून ठेवा, सर्व अभिमान सोडून द्या, सर्वांत ईश्वराला पहा, आत्म्याचा साक्षात्कार घ्या. अशी तुमची तयारी असली, ह्मणजे तुह्मांला अपयश येणार नाहीं, आणि तुमच्या मनाची समता बिघडणार नाहीं.

तुमचे हात घाण झाले, कीं, ते तुह्मी धुवून स्वच्छ करितां. कपड्यांवर कांहीं डाग दिसला, कीं, लगेच तो साफ करितां. त्याप्रमाणें तुह्मी एकाद्या समाजांत गेलां आणि तेथें तुमच्या व्यक्तित्वानें किंवा अहंकारानें उचल खाल्ली, तर परत आल्यावर तुमचें पहिलें काम, ह्मणजे हातपाय धुऊन आत्मध्यान करीत बसणें, हें आहे. तुह्मांला त्रास किंवा दुःख झालें, तर तेव्हांहि असेंच 'ईशचिंतन किंवा आत्मध्यान' करावें. डॉक्टरचा तराजू बाहेर हवेंत ठेविला, कीं, तो हलूं लागतो, त्याचीं पारडीं खालींवर होतात. असें झालें, ह्मणजे त्या तराजूला निवांत स्थळीं ठेवितात. तेथें कांहीं कालानंतर पारडीं खालींवर जाण्याचें बंद होऊन तराजू स्थिर राहतो. त्याप्रमाणें तुमचें मन त्रस्त किंवा क्षुब्ध झालें, कीं, तुह्मी खोलींत कोंडून घ्या. मित्रांची संगत सोडून एकान्तांत चला, प्रणवोच्चार करा. ईश्वराचें—आत्म्याचें ध्यान करा, ह्मणजे तुमचें मन पुनः शांत व स्वस्थ होईल. एकान्तवासांत कांहीं काल घालविल्यानें मनाला पुष्टता येते.

एकाद्या गृहस्थाचें किंवा स्त्रीचें मुख किंवा कपडे मलिन झालेले असले, ह्मणजे तीं माणसें बाहेर येऊन समाजांत मिसळत नाहींत. त्याप्रमाणें तुमचें मन क्षुब्ध झालें असेल, किंवा क्रोध, द्वेष, भय, चिंता इत्यादि

मनोविकार तुमच्या मनांत प्रबल झाले असतील, तर तुम्हींहि बाहेर येऊं नये. देवीच्या व्रणाचें तोंड चारचौघांत दाखवूं नये. वर सांगितलेले मनोविकार हे कॉलरा, प्लेग यांच्यासारखे स्पर्शजन्य आहेत. ते तुमच्या मनांतून नाहींसे होईपर्यंत तुह्मीं क्वारंटाईनमध्यें–एकान्तवासामध्यें राहिलें पाहिजे. एकान्तांत बसा, प्रणवाचें गान करा, आणि ईशचिंतन–आत्मध्यान करा व नंतर बाहेर पडा. याप्रमाणें तुह्मी अभ्यास करून शक्तीचा अनुभव घेऊं लागलां, ह्मणजे तुमच्या जीवितांत विलक्षण क्रांति होईल.

लोकांनां फळें खावयाला पाहिजेत, आणि तो फलवृक्षहि तोडून टाकावयाला पाहिजे. त्यांनां सुख पाहिजे, उपभोग पाहिजे; पण सत्याप्रमाणें रहावयाला नको. ईशचिंतनांत–आत्मध्यानांत राहिल्यानें भोग आणि आनंद मिळतात.

आपल्या देहाला मान मिळावा, देहाला सर्व कांहीं सुखें मिळावीं, असें लोकांनां वाटतें; पण त्यांची किंमत त्यांनां द्यावयाला नको. किंमत दिल्याशिवाय कसें भागेल ? तुमच्या अंगीं पाणी असेल, तर शहरांत राहूनहि भगीरथप्रयत्नानें तुह्मांला आपली उन्नति करून घेतां येईल.

'राम' भीति, चिंता, त्रास इत्यादिकांपासून अलिप्त आहे. पण, त्यानें हें सतताभ्यासानें साध्य केलें आहे. दौर्बल्य आणि धर्मभोळेपणा यांच्या अत्यंत नीच अवस्थेपासून 'रामा'ला सतताभ्यासानें वर काढिलें आहे. एकेकाळीं 'राम' अत्यंत धर्मभोळा होता, आणि यःकश्चित् गोष्टीनें त्याच्या मनाची समता बिघडून जात असे. पण, आतां सर्व पारडें फिरलें आहे. एका मनुष्याला असें करितां आलें, तर तुह्मांलाहि तसें कां करितां येणार नाहीं ?

# INFORMAL TALKS.

## पद्धतरहित भाषण.*

प्रश्न—'आह्मी मुक्त होऊं' याचा अर्थ स्वामी काय करितात?

उत्तर—'आह्मी मुक्त होऊं' हें विधानच चुकीचें आहे! कारण, आह्मी आत्तां–या क्षणाला मुक्त आहों. केव्हांहि आह्मी बद्ध नव्हतों. नेहमींच्या भाषणसांप्रदायामध्यें 'आह्मी मुक्त होऊं' या वाक्याचा जेव्हां उपयोग करितात, तेव्हां त्याचा अर्थ 'ज्ञान' किंवा 'ज्ञान-संपादन' असा असतो. बद्ध स्थिति किंवा बंधन हें मुळीं खरें नसतें. तें अज्ञानाचा, चुकीच्या विचारांचा, खोट्या ज्ञानाचा परिणाम होय. तुह्मांला खरें ज्ञान झालें, आत्मज्ञानाचा लाभ झाला, ह्मणजे तुह्मी सदैव मुक्त होतां, किंवा आहां. तुमची मुक्ति केव्हांहि गमावली नव्हती. मुक्ति हा तर तुमचा स्वभावसिद्ध हक्क आहे.

एक मनुष्य आपल्या गळ्यांत अमोलिक रत्नांचा कंठा घालीत असे. एकदां त्याला आपल्या कंठ्याची विस्मृति पडली. कंठ्याचा त्यानें पुष्कळ शोध केला, आणि तो हरवला, असें समजल्यानें त्यानें फार शोक केला. "अरे, तूं शोक कां करतोस? कंठा तर तुझ्यापाशीं–तुझ्या गळ्यांतच आहे, नीट पहा," असें दुसऱ्या एकानें त्याला सांगितलें. कंठा आपल्यापाशींच आहे, असें त्याला कळून आल्यावर त्याला मोठा आनंद झाला. खरें पाहूं गेलें असतां, कंठा सांपडला असें ह्मणणें चुकीचें होईल; कारण कंठा एका ठिकाणींच होता. तो हरवला नसून त्याची केवळ विस्मृति झाली होती. त्याप्रमाणें, तुमचा आत्मा सनातन, मुक्त असा आहे; पण, तुमचें मन, तुमची बुद्धि अज्ञानानें आवृत झाली असल्यामुळें आपण बद्ध आहों, असें तुह्मांला वाटतें. विसरलेला कंठा सांपडला, असें आह्मी ह्मणतों, त्याप्रमाणें आह्मांला मुक्ति मिळेल, आह्मी

---

* गोल्डनगेट–हॉल, गुरुवार–तारीख २२ जानेवारी, १९१३.

मुक्त होऊं, असेंहि आह्मी ह्मणतों; पण, वस्तुतः आमची मुक्ति किंवा हार–मुक्ताहार केव्हांच हरवला नव्हता.

प्रश्न—आमचें व्यक्तित्व पुढें तसेंच चालू ( कायम ) राहतें काय ?

उत्तर—व्यक्तित्व ह्मणजे आपला आत्मा असें समजत असाल, तर आत्मा, अज आणि अमर आहे. त्याला जन्म आणि मरण नसल्यामुळें पुढें चालू राहण्याचा प्रश्नच संभवत नाहीं; पण, व्यक्तित्व ह्मणजे जन्मांतर करणारें आपलें सूक्ष्म शरीर–मन असें तुह्मीं समजत असाल, तर व्यक्तित्व पुढें चालू राहतें.

याज्ञवल्क्याला, मैत्रेयी आणि कात्यायनी अशा दोन बायका होत्या. याज्ञवल्क्य हा जनकराजाचा गुरु होता, आणि त्याच्याजवळ बरीच संपत्ति होती. आपली सर्व संपत्ति उभयतः स्त्रियांनां सारखी वांटून देऊन आपण अरण्यांत निघून जावें, असा याज्ञवल्क्यानें बेत केला. संपत्तीनें अमरत्व मिळणें शक्य असतें, तर आपल्या नवऱ्यानें संपत्तीचा–वैभवाचा त्याग केला नसता, असा विचार करून मैत्रेयीनें आपला हिस्सा घेण्याचें नाकारिलें. तिनें असा विचार केला, कीं, आपला पति ज्याअर्थीं घरदार सोडून वनांत जाण्यास आणि दुसरा आश्रम घेण्यास तयार झाला आहे, त्याअर्थीं त्या आश्रमांत अधिक सौख्य व आनंद असला पाहिजे. तसें असल्याशिवाय आपला सध्यांचा आश्रम तो सोडण्यास कधींहि तयार होणार नाहीं. शेवटीं बराच विचार करून तिनें आपल्या पतीला विचारलें " महाराज, अधिक आनंद संपत्तींत–प्रपंचांत आहे, किंवा परमार्थांत आहे ? " यावर याज्ञवल्क्य ह्मणाला " प्रिये, श्रीमंतांनां प्रपंचांतील सुखें मिळतात हें खरें; पण त्यांनां खरा आनंद–मुक्ति किंवा अमरत्व मिळत नाहीं. " मैत्रेयी ह्मणाली " महाराज, तर मला संपत्ति नको. मुक्ति–अमरत्व देणारें असें कांहीं द्या. " हें ऐकून याज्ञवल्क्याला फार आनंद झाला, आणि त्यानें आपली सर्व मिळकत कात्यायनीला दिली, व आपली आध्यात्मिक संपत्ति–ज्ञान मात्र त्यानें मैत्रेयीला दिलें.

**स होवाच । न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवत्यात्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति ॥ न वा अरे जायायै कामाय जाया प्रिया भवत्यात्मनस्तु कामाय जाया प्रिया भवति ॥ ***

—बृहदारण्यकोपनिषत्.

याचे दोन प्रकारांनीं अर्थ करण्यांत येतात, आणि हे दोन्ही प्रकार बरोबर असल्याचें दिसून येतें. पहिला प्रकार—पति इतका प्रिय वाटतो, याचें कारण पतीमध्यें कांहीं चांगले गुण आहेत, किंवा कांहीं विशेष आहे ह्मणून नव्हे, तर तो पत्नीला आदर्शासारखा आहे, ह्मणून प्रिय वाटतो. आपणांला ज्याप्रमाणें आरशांत आपलें रूप दिसतें, तसें पत्नीला पतिरूप आदर्शांत तिचें स्वरूप दिसतें, ह्मणून पति तिला इतका प्रिय वाटतो. दुसरा प्रकार–पतीवर पत्नी इतकें प्रेम करते, तें पतीकरितां नसून पतीमध्यें असलेल्या आत्म्याकरितां–ईश्वराकरितां आहे.

प्रेम जर अन्योन्यगामि नसेल, तर कोणी कोणावर प्रेम करणार नाहीं. यावरूनसुद्धां, दुसऱ्यामध्यें प्रतिबिंबित झालेल्या आत्मस्वरूपावर आम्ही प्रेम करितों, असें सिद्ध होतें. आम्ही अंतर्यामीं असलेल्या आत्म्याला—ईश्वराला पाहतों. कोणत्याहि वस्तूवर त्या वस्तूसाठींच आह्मी

---

* पतिनिमित्त पती तुजला, प्रिये,
प्रिय असें ह्मणतां सहसा नये;
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज, टाकुनि मीपणा.
पुरुषहि स्वसुखार्थ सुखें स्त्रिया,
ह्मणतसे; सकळाहुनि ते प्रिया;
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज, टाकुनि मीपणा.

–वामन पंडित, प्रियसुधा.

प्रेम करीत नाहीं. खरें सुख, खरा आनंद आत्म्यामध्यें—ईश्वरामध्यें आहे, हें जाणा, आणि निरिच्छ व मुक्त व्हा.*

**न वा अरे पुत्राणां कामाय पुत्राः प्रिया भवन्त्या।**
**त्मनस्तु कामाय पुत्राः प्रिया भवन्ति ॥**

—बृहदारण्यकोपनिषत्.

अर्थ—खरोखर पुत्राकरितांच पुत्र प्रिय नाहींत, तर आत्म्याकरितां ते प्रिय आहेत. जेव्हां पुत्र आमच्यावर उठतात, तेव्हां आह्मांला वाईट वाटतें आणि आम्ही त्यांनां दूर घालवून देतों. यावरून पुत्र कोणाकरितां प्रिय आहेत हें चांगलें सिद्ध होतें.

**न वा अरे वित्तस्य कामाय वित्तं प्रियं भवत्या**
**त्मनस्तु कामाय वित्तं प्रियं भवति ॥ †**

—बृहदारण्यकोपनिषत्.

अर्थ—खरोखर, वित्त वित्ताकरितां नव्हे, तर आत्म्यासाठीं प्रिय असतें.

तुह्मी नाना देवतांनां भजतां आणि ह्मणतां 'हे देवा, तूं इतका श्रेष्ठ, दयाळु, कृपाळु आहेस; तूं आमचें सर्व प्रकारें कल्याण करतोस.'

---

* कळलिया हरिची सकलात्मता,
मग कळे हरिभक्ति अखंडता;
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज, टाकुनि मीपणा.

—वामनपंडित.

† सुनयने ! सदनें विविधें धनें
निजसुखार्थ समस्तहि साधनें;
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज, टाकुनि मीपणा.

—वामनपंडित.

तुह्मी अशी प्रार्थना कां करितां ? कारण, देव तुमच्या गरजा भागवितो, तुमच्या उपयोगीं पडतो. पहा, देवहि देवाकरितां नव्हे, तर; आत्म्यासाठींच इतका प्रिय आहे. आत्मा हाच सर्व सुखाचा, आनंदाचा उगम आहे.*

हिंदुस्तानांतील, कळसूत्री बाहुल्यांच्या खेळांत, बाहुल्यांशीं संबंध असलेल्या सूक्ष्म तारा हातांत धरून सूत्रधार पडद्यामागें बसलेला असतो. प्रेक्षकांनां त्या सूक्ष्म तारा किंवा तो सूत्रधार दिसत नाहीं. फक्त बाहुल्या त्यांच्या दृष्टीला पडतात. त्याप्रमाणें या जगांतील जडदेह त्या खेळांतील बाहुल्यांप्रमाणें आहेत. साधारण लोक या जडदेहांनांच कर्ते असे समजतात. कोणी इष्टमित्रांनीं त्यांचें कांहीं चांगलें केलें, कीं, त्यांनां सुख होतें. पण, त्यांनीं जर कांहीं त्यांच्याविरुद्ध केलें, तर ते त्यांचा द्वेष करूं लागतात. याहून उच्च असे दुसरे लोक असतात, आणि ते त्या सूक्ष्म तारांकडेच विशेष लक्ष्य देतात. हे अधिक शहाणे, तत्त्ववेत्ते आणि धार्मिक असतात; पण, त्यांची धांव सूक्ष्म शरीरापर्यंत—मनापर्यंत असते. ते, आत्मा ह्मणजे सूक्ष्म शरीर किंवा मन असें समजतात—ते कार्य आणि कारण पाहतात. त्यांनां सूक्ष्म तारा, आणि बाहुल्या ( जड देह )—यांचा संबंध दिसतो. पडद्यामागें असलेला सूत्रधार—दिक्, काल, कार्यकारणभाव यांच्यापलीकडे असलेला आत्मा फारच थोड्यांनां दिसतो.

जगांतील सर्व संबंध, सर्व बिघाड ( संकटें ) मानवजातीला एकच धडा शिकवितात. त्यांचा सर्व रोंख आह्मीं पडद्यामागें असलेल्या सूत्रधाराची—आत्म्याची ओळख करून घ्यावी, असाच असतो. जेव्हां

---

* 'इतर ईश्वर मानिति त्या जना,  
निजसुखार्थचि कीं तदुपासना;  
परम आवडि आपुलि आपणा,  
वळख तूं तुज, टाकुनि मीपणा.'

—वामनपंडित.

तुह्मी एकाद्या मित्राला पहातां, तेव्हां आपण त्या मित्रांत असलेल्या परमात्म्याला पाहतों; जेव्हां तुमचा मित्र बोलतो, तेव्हां परमात्मा त्या मित्राच्या द्वारें बोलत आहे, असें तुह्मांला वाटलें पाहिजे. सर्वत्र परमात्मशक्ति ओळखून जर तुह्मी आपला सर्व व्यवहार कराल, तर तुह्मांला कांहीं त्रास होणार नाहीं, कांहींहि संकट तुमच्यावर येणार नाहीं. बाहुल्यांनां नाचविणारा--विश्वाचें नियमन करणारा सूत्रधार--परमात्मा ओळखिला पाहिजे. बाह्य नामरूपासारखा तो स्पष्ट दिसला पाहिजे.

ब्रह्म तं परादाद्योऽन्यत्रात्मनो ब्रह्म वेद ।
क्षत्रं तं परादाद्योऽन्यत्रात्मनः क्षत्रं वेद ।
लोकास्तं परादुर्योऽन्यत्रात्मनो लोकान्वेद ।
देवास्तं परादुर्योऽन्यत्रात्मनो देवान्वेद ।
भूतानि तं परादुर्योऽन्यत्रात्मनो भूतानि वेद ।
सर्वं तं परादाद्योऽन्यत्रात्मनः सर्वं वेद ।
इदं ब्रह्म, इदं क्षत्रं, इमे लोकाः, इमे देवाः
इमानि भूतानि, इदं सर्वं यदयमात्मा ॥

--बृहदारण्यकोपानिषत्--चतुर्थब्राह्मण.

"आत्म्याशिवाय अन्य ठिकाणीं ब्राह्मणवर्गाला जो पाहतो, त्याला ब्राह्मणवर्ग सोडून देतो; आत्म्याशिवाय अन्यठिकाणीं क्षत्रियवर्गाला जो पाहतो, त्याला क्षत्रियवर्ग सोडून देतो; आत्म्याशिवाय अन्य ठिकाणीं लोक, देव, आणि भूतें यांनां जो पाहतो त्याला लोक, देव आणि भूतें सोडून देतात; आत्म्याशिवाय अन्य ठिकाणीं सर्व जो पाहतो, त्याला सर्व कांहीं सोडून देतें. हा ब्राह्मणवर्ग, क्षत्रियवर्ग, हे लोक, हे देव, हीं भूतें, हें सर्व कांहीं ह्मणजे हा आत्मा आहे."

ही आत्म्याची व्याख्या फार उत्तम आणि स्पष्ट अशी केलेली आहे. हिचें मनन आणि निदिध्यासन करा, ह्मणजे तुह्मी मुक्त व्हाल, तुमचा स्वभावसिद्ध--जन्मसिद्ध हक्क तुह्मांला मिळेल.

तुह्मीं एकाद्या जड वस्तूवर, त्या वस्तूसाठींच अवलंबून रहाल, सर्व भार ठेवाल, तर शेवटीं फसाल. इच्छेच्या--कामनेच्या विषयापलीकडे गेलें पाहिजे, असा कायदा आहे. तुह्मी एकाद्या राजाकडे किंवा महात्म्याकडे गेलां, आणि त्याच्या व्यक्तीवर सर्व भार ठेवून त्यांच्या देहालाच विशेष मान देऊं लागलां, तर यःकश्चित् काडीवर अवलंबून राहिल्यासारखे होऊन तुह्मी पतन पावाल. अंतर्यामीं असलेल्या आत्म्या-कडे--ईश्वराकडे न पहातां देहालाच विशेष मान देणें हें पाप आहे, ही मूर्तिपूजा आहे, आणि याबद्दल तुह्मांला दुःख सोसावें लागेल. संसा-रांत, प्रपंचांत तुह्मी वावरत असतां, अंतर्यामीं असलेल्या आत्मतत्त्वा-कडे तुमचें सर्व लक्ष्य असावें, आणि तुह्मीं सर्व व्यावहारिक कामें आत्मतत्त्वाहून कमी लेखावीं. देहापेक्षां--व्यक्तीपेक्षां सत्याला--आत्म्याला विशेष मान द्यावा. मित्राच्या तसबिरीला, त्या तसबिरीसाठीं नव्हे, तर आमच्या त्या मित्राकरितां आह्मीं विशेष महत्त्व देतों. चित्रापेक्षां मित्र आह्मांला अधिक प्रिय आहे. पदार्थापेक्षां पदार्थांतील तत्त्वाकडे--आत्म-तत्त्वाकडे विशेष नजर दिली असतां सर्व व्यवहार सुरळीत चालतो; नाहींतर सर्व घडी बिघडून जाते, आणि आह्मांला त्रास व दुःख होतें. कायदा असा आहे.

एका खेडेगांवांत एक वेडगळ बाई रहात असे. त्या बाईजवळ एक कोंबडा होता. गांवांतील लोक तिची थट्टा करीत आणि तिला चिडवून फार त्रास देत. एके दिवशीं ती फार त्रासून त्या लोकांनां ह्मणाली "बाबांनों, तुह्मी मला छळतां, यासाठीं मी तुमचा एका विलक्षण रीतीनें सूड घेणार आहें. तुह्मांला मग फार पश्चात्ताप होईल." "बाई, तुह्मी आमचा सूड कसा घेणार?" असें लोकांनीं विचारतां ती ह्मणाली "मी उद्यां सूर्याला तुमच्या गांवावर उगवूं द्यावयाची नाहीं." "हें आपण कसें करूं शकाल?" "माझा कोंबडा आरवला, कीं, सूर्य उगवतो; तुह्मीं मला असें छळूं लागाल, तर मी माझा कोंबडा घेऊन दुसऱ्या गांवीं जाईन, व मी गेलें, ह्मणजे तुमच्या गांवावर सूर्य उगवणार नाहीं."

कोंबडा आरवला, कीं, सूर्य उगवतो हें खरें आहे. पण, कोंबड्याचें आरवणें हें सूर्योदयाचें कारण नव्हे, हें त्या बाईला माहीत नव्हतें. शेवटीं कंटाळून त्या बाईनें तो गांव सोडिला आणि ती दुसऱ्या गांवीं जाऊन राहिली. तेथें तिचा कोंबडा आरवला आणि सूर्य उगवला. पण, पहिल्याहि गांवीं तो उगवलाच! आमच्या कामना कोंबड्याच्या आरवण्याप्रमाणें होत, आणि कामनेचे विषयभूत पदार्थ प्राप्त होणें हें सूर्योदयाप्रमाणें होय. जगांतील सर्व व्यवहार आत्मसूर्याच्या नियमनाप्रमाणें—परमात्म्याच्या मर्जीप्रमाणें चालत आहेत. माझ्या कोंबड्यामुळें सूर्य उगवतो, असें श्रेय अहंकारानें कोणींहि घेऊं नये. कोंबड्याचें आरवणें, पहांट होणें इत्यादि गोष्टी सूर्याच्या प्रभावामुळें—प्रकाशामुळें होतात. त्याप्रमाणें सर्व पदार्थ, विचार, कामना यांचें नियमन परमात्म्याच्या इच्छेप्रमाणें होतें. याकरितां विपर्यास करूं नका, आणि पदार्थ वस्तुतः खरे आहेत, असें मानूं नका. सुखदुःखांचें खरें कारण पदार्थ आहेत, असा गैरसमज करून घेऊं नका. जग ह्मणजे लीला किंवा रंगभूमि आहे, आणि आपण क्लीओपाट्रा, मॅकबेथ इत्यादि सोंगें आहोंत, असें माना. सोंगाची बतावणी करा; पण आपण ईश्वर आहों, हें विसरूं नका. तुमचा आत्मा सनातन, सच्चिदानंद आहे हें विसरूं नका.

**स यथा दुन्दुभेर्हन्यमानस्य न बाह्याञ् शब्दाञ् शक्नुयाद्ग्रहणाय, दुन्दुभेस्तु ग्रहणेन दुन्दुभ्याघातस्य वा शब्दो गृहीतः ॥**

—बृह० उपनिषत्.

"दुन्दुभि वाजविली असतां उत्पन्न होणाऱ्या शब्दांचें ग्रहण करतां येत नाहीं; पण, दुन्दुभि वाजविणाराचा हात किंवा दुन्दुभि धरली असतां, दुन्दुभीच्या शब्दांचें ग्रहण होतें (आवाज बंद होतात), त्याप्रमाणें, सर्व कामना, पदार्थ ज्याच्यापासून उत्पन्न होतात, त्याला—आत्म्याला धरिलें असतां, सर्व पदार्थ, कामना आपल्या हातीं येतात."

**स यथा शंखस्य ध्मायमानस्य न बाह्याञ् शब्दाञ् शक्नुयाद् ग्रहणाय, शंखस्य तु ग्रहणेन शंखध्मस्य वा शब्दो गृहीतः ॥**

"शंख वाजविला, ह्मणजे उत्पन्न झालेले आवाज बाहेरून धरितां येत नाहींत; पण, शंख वाजविणारा अगर शंख यांनां धरिलें असतां, आवाज धरितां येतात (बंद होतात)."

ब्रह्माशीं तुमचें ऐक्य झालें असतां, तुमच्या सर्व कामना तृप्त होतात. नंतर, तुह्मांला दुःख, त्रास होत नाहीं; आणि कोणीहि तुह्मांला फसवीत नाहीं.

> स यथा सर्वासामपाॅ समुद्र एकायनमेवॅ सर्वेषाॅ स्पर्शानां त्वगेकायनमेवॅ सर्वेषां गन्धानां नासिके एकायनमेवॅसर्वेषाॅ रसानां जिव्हैकायनमेवॅ सर्वेषाॅ रूपाणां चक्षुरेकायनमेवॅ, सर्वेषाॅ शब्दानाॅ श्रोत्रमेकायनमेवॅ सर्वेषाॅ संकल्पानां मन एकायनमेवॅ, सर्वासां विद्यानाॅ हृदयमेकायनमेवॅ सर्वेषां कर्मणाॅ हस्तावेकायनमेवॅ सर्वेषामानन्दानामुपस्थ एकायनमेवॅ, सर्वेषां विसर्गाणां पायुरेकायनमेवॅ, सर्वेषामध्वनां पादावेकायनमेव ॅ, सर्वेषां वेदानां वागेकायनम् ॥

" ज्याप्रमाणें सर्व पाण्याचें मुख्य स्थान-केंद्र, ह्मणजे समुद्र, सर्व स्पर्शांचें केंद्र त्वचा, सर्व गंधांचें केंद्र नासिका, सर्व रसांचें केंद्र जिव्हा, सर्व रूपांचें चक्षु, सर्व शब्दांचें श्रोत्र, सर्व संकल्पांचें मन, सर्व विद्यांचें हृदय, सर्व कर्मांचें हस्त, सर्व आनंदाचें उपस्थ, सर्व विसर्गाचें गुद, सर्व गमनांचें पाद, सर्व वेदांचें वाक्, हीं आहेत, त्याप्रमाणें या सर्व जगाचें—विश्वांतील सर्व पदार्थांचें केंद्र ह्मणजे आत्मा होय, आणि आत्म्यापासून सर्व कांहीं उत्पन्न होतें."

> स यथा सैन्धवखिल्य उदके प्रास्त उदकमेवानुविलीयेत नहास्योद्ग्रहणायेव स्याद्यतो यतस्त्वाददीत लवणमेवैवं वा अर इदं महद्भूतमनन्तमपारं विज्ञान घनएवै-

तेभ्योभूतेभ्यः समुत्थाय तान्येवाऽनु विनश्यति न प्रेत्य संज्ञास्तीत्यरे ब्रवीमीति होवाच याज्ञवल्क्यः ॥

" ज्याप्रमाणें मिठाचा खडा पाण्यांत टाकिला असतां तो विरघळून जातो, तो तसाच पुनः बाहेर काढितां येत नाहीं, पण तें पाणी तुह्मी कुठूनहि चाखून पहा, तुह्मांला तें खारट लागतें, त्याप्रमाणें, हे मैत्रेयि! महद्भूत, अनन्त, विज्ञानघन असा आत्मा या भूतांपासून उत्पन्न होतो, आणि नंतर त्यांतच लीन होतो, आणि असा लीन झाल्यानंतर त्याला कांहीं संज्ञा ( ज्ञान, नांव ) नसतें, असें याज्ञवल्क्य बोलला. "

मनुष्यानें सत्याचा अनुभव—आत्म्याचा साक्षात्कार घेतला, ह्मणजे तो त्याच्याशीं एक होऊन जातो, आणि नंतर तो नामरूपांवर अवलंबून रहात नाहीं. नंतर मैत्रेयी ह्मणाली " महाराज, नंतर संज्ञा नसते, असें सांगून आपण माझा घोंटाळा केला. "

'सा होवाच मैत्रेय्यत्रैव मा भगवानमूमुहन्न प्रेत्य संज्ञास्तीति ।'

सर्व कांहीं आत्म्याच्या नियमनाप्रमाणें होतें. आपलें मन, आपलें व्यक्तित्व याचें कांहीं चालत नाहीं, तर आत्म्यांत लीन होणें, ह्मणजे आपला नाश करून घेणें होय, अशी शंका मैत्रेयीला आली. यास्तव तिनें ह्मटलें "महाराज, मला नाश नको आहे. आत्मा ह्मणजे नाशमृत्यु असें असेल, तर तो मला नको आहे. "

स होवाच याज्ञवल्क्ये न वा अरेऽहं मोहं ब्रवीम्यलं वा अर इदं विज्ञानाय ॥ १३ ॥ यत्र हि द्वैतमिव भवति, तदितर इतरं जिघ्रति, तदितर इतरं पश्यति, तदितर इतरꣳ शृणोति, तदितर इतरमभिवदति, तदितर इतरं मनुते, तादितर इतरं विजानाति, यत्र वा अस्य सर्वमात्मैवाभूत्तत्केन कं जिघ्रेत्तत्केन कं पश्येत्तत्केन कꣳ शृणुयात्तत्केन कमभिवदेत्तत् केन कं मन्वीत तत् केन कं विजानीयाद्येनेदꣳ सर्वं विजानाति तं केन विजानीयाद्विज्ञातारमरे केन विजानीयादिति ॥ १४॥

याज्ञवल्क्य ह्मणाला "हे मैत्रेयि, मी तुला मोहांत पाडण्यासारखें असें कांहीं सांगत नाहीं. ज्ञानप्राप्तीसाठीं मी सांगतों, तितकें पुरें आहे. जेथें द्वैत असतें, तेथें एक दुसऱ्याशीं बोलतो, खेळतो, विचार करतो, पाहतो, नमस्कार करितो, जाणतो; पण, जेव्हां हें सर्व आत्मा (अद्वैत) होऊन जातो, तेव्हां कोणीं कोणाशीं बोलावें, चालावें, खेळावें ? सर्व जो जाणतो, त्याला कसें जाणावें–जाणणाराला कसें ओळखावें?"

ऐकतां न येणें याला दोन कारणें असूं शकतील. ( १ ) एकादा बहिरा व मुका असेल; ( २ ) ऐकणाराच्या बाहेर आवाज नसेल. तसेंच न पाहणें हें दोन गोष्टींमुळें होतें. ( १ ) एकादा आंधळा असेल; ( २ ) पाहण्याजोगें असें पाहाणाराच्या बाहेर कांहीं नसेल. तसेंच वास घेतां न येणें हें, (१) एकाद्याला घ्राणेंद्रिय नसेल, किंवा (२) वास घेण्याजोगें असें बाहेर कांहीं नसेल, यामुळें होत असेल. मैत्रेयीची शंका अशी आहे, कीं, जर आत्म्याच्या–परमात्म्याच्या योगानें आमच्या क्रिया–पाहणें, बोलणें वगैरे क्रिया चालतात, तर वस्तुतः आह्मी बहिरे, मुके, आंधळे असल्यासारखेच झालों. याचें उत्तर याज्ञवल्क्यानें असें दिलें आहे, कीं, आमच्यामध्यें कांहींतरी व्यंग आहे, ह्मणून आह्मांला दिसत नाहीं, ऐकूं येत नाहीं. असा प्रकार नसल्यास पाहण्याजोगें, ऐकण्याजोगें असें आमच्याबाहेर कांहीं नाहीं; तर द्वैत किंवा आंकुचितपणा नाहीं, हेंच त्याचें कारण होय. आत्मा अनंत–एकमेवाद्वितीयम् असा असल्यामुळें त्याच्याच शक्तीच्यायोगें आह्मीं पाहणें, ऐकणें इत्यादि क्रिया करितों, व आमच्या सर्व इंद्रियांनां आत्म्यापासूनच सामर्थ्य मिळतें.

जें, मन, नेत्र किंवा इतर इंद्रियांपैकीं कोणत्याहि इंद्रियानें जाणिलें जात नाहीं; परंतु जें, मन, चक्षुरादि इंद्रियांनां व्यापार करावयाला लावितें, तें ब्रह्म किंवा अनंत होय. ब्रह्म–परमात्मा हा बुद्धीचा किंवा मनाचा विषय होऊं शकत नाहीं. मन, वाचा आणि विचार तेथून निराशेनें परततात. चिमट्याला आपल्या पकडींत हवा तो पदार्थ धरितां येतो. परंतु, उलट वळून चिमटा धरणारीं बोटें त्याला कशीं धरितां

येतील ? तुमचें मन किंवा बुद्धि ही चिमट्याप्रमाणें आहे. चिमट्याला दोन हात किंवा पाय असतात. पण बुद्धिरूप चिमट्याला, कोठें, केव्हां आणि कां--दिक्, काल, कार्यकारणभाव, असे तीन पाद असतात. या तीन पादांच्यायोगें जेव्हां बुद्धि एकाद्या गोष्टीचें ग्रहण करिते, तेव्हां ती गोष्ट पूर्णपणें समजते, असें आह्मी ह्मणतों. एकादी गोष्ट कां, कोठें व केव्हां झाली हें समजलें, ह्मणजे ती गोष्ट आमच्या ज्ञानशक्तीच्या—बुद्धीच्या आटोक्यांत येते. पण, बुद्धिरूप चिमटा हा बोटांच्या--आत्म्याच्या ताब्यांत आहे, आणि आत्म्याकडून त्या चिमट्याचें ( बुद्धीचें ) नियमन होत असतें.

तुमचें मन किंवा बुद्धि ही स्वतंत्र आहे काय ? स्वतंत्र असेल, तर ती शांत, स्वस्थ, सुषुप्ति अवस्थेंत कां राहत नाहीं ? मन स्वतंत्र असतें, तर तें सर्वहि अवस्थेंत राहूं शकलें असतें. तें तसें स्वतंत्र नाहीं. तें दुसऱ्या एका उच्च शक्तीच्या--आत्म्याच्या ताब्यांत आहे. बुद्धीला किंवा मनाला उलट वळून इतर पदार्थाप्रमाणें बोटांचें--आत्म्याचें ग्रहण करितां येत नाहीं. आत्म्यासंबंधीं कां, कोठें आणि केव्हां हे प्रश्न बुद्धीला करितां येत नाहींत. कारण आपलें उगमस्थान जाणणें तिला शक्य नाहीं. **'बुद्धेः परतस्तु यः'** आत्मा बुद्धीच्या पलीकडे आहे.

मनाला जरी आत्म्याचें ग्रहण करितां येत नाहीं, तरी त्याला सागरांतील बुडबुड्याप्रमाणें आत्म्यांत लीन होऊन जातां येईल. बुडबुड्यांनां समुद्राच्या बाहेर येतां येत नाहीं, पण फुटून जाऊन त्यांनां सागरांत लीन होतां येतें. त्याचप्रमाणें बुद्धीला आत्म्यांत लीन होतां येतें. मायावादाचें सार तें हेंच आहे.

या सत्यसागराचें--आत्म्याचें मनन आणि निदिध्यासन करून आह्मीं त्याच्याशीं एक होऊन गेलें पाहिजे.--आत्मा दिक्कालातीत आहे—यालाच ' **अहमस्मि—अहं ब्रह्मास्मि** ' असें ह्मणतात. आणि ॐकारानें याचा निर्देश करितात. प्रणवाचा, ॐकाराचा अर्थ **'अहं ब्रह्मास्मि अहमस्मि,'** असा आहे. ॐकाराचा उच्चार करतेवेळीं आपण दुसऱ्या कोणापाशीं बोलत आहों अशी कल्पना करूं नका. प्रणवोच्चाराच्या

वेळीं आपण परमात्म्याशीं एक होऊन गेलों आहों अशी भावना बाळगा. या दृढ भावनेनें, अशा जोरदार जाणीवेनें मनाचा फुगा फुटून तो सत्यसागरांत–आत्मोदधींत लीन होऊन जातो. साक्षात्काराचा–मुक्तीचा मार्ग तो हाच.

हा आत्मा सर्व शरीरांत सारखा भरलेला आहे. ही विश्वनियामक अनंतशक्ति, अणुरेणूसारख्या लहान पदार्थांत, तसेंच सागरासारख्या प्रचंड वस्तूंत सारखी दिसून येते. ही दिक्कालातीत असून सनातन आहे. ही शक्ति आपण आहों, सर्व दिक्काल आपण व्यापून राहिलों आहों, दिक्कालादिकांनां आपण आधार आहों, अनंत दिक्, अनंत काल, अनंत शक्ति आपण आहों, असें तुह्मांला वाटूंद्या—असें तुमच्या अंतःकरणांत भिनूंद्या, ह्मणजे पहा कसें तुमचें रूपांतर होतें तें ! अशी तुमची भावना दृढ होत गेली, ह्मणजे तुमचे स्वार्थी विचार, दुःखें, काळज्या, त्रास वगैरे सर्व कांहीं नाहींसें होतें, आणि कल्पनातीत आनंदाचा तुह्मांला लाभ होतो. आपण सच्चिदानंद आत्मा आहों, असें तुह्मांला वाटूंद्या, ह्मणजे तुह्मी तसेच व्हाल.

रेशमी उपरण्याला जर कोणत्याहि वस्तूशीं आपलें ऐक्य सिद्ध करून दाखवावयाचें असेल, तर त्यानें रेशमाशीं आपलें ऐक्य सिद्ध करून दाखविलें पाहिजे. कारण, त्याची उत्पत्ति आणि स्थिति रेशमांतच आहे. वस्त्राची लांबी, रुंदी, जाडी इत्यादिकांशीं ऐक्य सिद्ध करण्याचा त्याला कांहीं हक्क नाहीं. त्याप्रमाणें बुद्धीला आपलें कोणाशीं ऐक्य प्रस्थापित करावयाचें असेल, तर तिनें तें आपल्या मूलस्वरूपाशीं –उगमस्थानाशीं केलेलें बरें. तिनें बुडबुड्याप्रमाणें फुटावें आणि आत्मोदधीशीं एक होऊन जावें. तिनें देहाशीं आपलें ऐक्य कधींहि प्रस्थापित करूं नये. देह हें कार्य आहे. कार्याशीं आपलें ऐक्य प्रस्थापित करण्याचा बुद्धीला कांहीं हक्क नाहीं. तसेंच ऐहिक संबंधांत, ऐहिक व्यवहारांत गुरफटून जाण्याचा तुह्मांला हक्क नाहीं. तुह्मी सत्यसागर, सच्चिदानंद आत्मा आहांत. त्याचें श्रवण, मनन, निदिध्यासन करा, आणि दुःखातीत–मुक्त व्हा.

# BALANCED MIND.

## समतोल मन.*

या युगामध्यें वेदान्ताप्रमाणें आचरण करितां येईल काय, असा परवां एकानें प्रश्न केला; आणि आणखी एकानें असें सुचविलें, कीं, वेदान्ताप्रमाणें आचरण करावयाचें असेल, तर घरादाराचा त्याग करून हिमालयाच्या अरण्यांत गेलें पाहिजे. पण 'राम' सांगतो, कीं, छे, छे, तुह्मांला अरण्यांत जाण्याची कांहीं जरूरी नाहीं.

हल्लीं एक सर्वसाधारण तक्रार आह्मांला वेळ मिळत नाहीं अशी आहे. लोक ह्मणतात "आह्मांला आमचीं सर्व कामें पाहिलीं पाहिजेत, संसारांतील आमच्या पाठीमागें असणाऱ्या काळज्या, त्रास यांकडे लक्ष्य पुरवून मुलेंबाळें, आप्तेष्ट यांच्याकडेहि आह्मांला पाहिलें पाहिजे. शिवाय आमचे मित्र तर आमची इतकी वेळ घेतात, कीं, 'हे परमेश्वरा, आमच्या मित्रांपासून आमचें रक्षण कर,' अशी प्रार्थना करण्याची पाळी येते! आमच्या कर्तव्यकर्मीकडे आह्मांला लक्ष्य पुरवावें लागतें, व तिकडे आह्मी लक्ष्य देऊं लागलों, ह्मणजे केव्हांकेव्हां आह्मांला जेवणालाहि वेळ मिळत नाहीं. मग आध्यात्मिक उन्नतीसाठीं आम्हीं वेळ कोठून आणावा?" यावर आमचा एकच प्रश्न आहे. हीं सर्व कर्तव्यकर्में कोठून उद्भवतात? हीं तुमच्यावर कोण लादतो? तुह्मी स्वतःच. तुह्मांला गुलाम करून सोडणारीं सर्व कामें तुह्मीं आपण होऊन आपणांवर लादून घेतलीं आहेत, व तीं अवघड किंवा सोपीं वाटणें हें तुमच्यावरच अवलंबून आहे. कर्तव्यकर्माचा उगम तुमच्यापासूनच आहे, हें तत्त्व एकदां समजलें, ह्मणजे तुह्मांला तुमची स्थिति सुधारतां येऊन सुखी होतां येईल.

एकदां एक मनुष्य डॉक्टर जॉन्सनकडे जाऊन सांगूं लागला "डॉक्टरसाहेब, माझा सर्वस्वीं घात झाला! कोणतेंहि काम करण्यास मी अगदीं नालायक आहें. माझ्या हातून कांहीं होणें शक्य नाहीं."

---

* ता. १५ फेब्रुवारीं १९१३ रोजीं झालेलें व्याख्यान.

"अहो, झालें तरी काय ?" डाक्टर जॉन्सननें त्याला विचारलें.

तो मनुष्य ह्मणाला " डॉक्टरसाहेब, या जगांत मनुष्याचें आयुष्य फार झालें तर शंभर वर्षे आहे; आणि ही आयुर्मर्यादा अनंत-कालापुढें कांहींच नव्हे. शंभर वर्षांतील अर्धें आयुष्य झोंपेंत जातें. आमचें बालपण बहुतेक झोंपेंत जातें; ह्मातारपण झोंपेंत निर्बलता आणि पराधीनपणा यांनीं व्यापलेलें असतें, व तें जवळजवळ बालपणाप्रमाणेंच व्यर्थ होतें. तरुणपण तर, कुविचार, मोह, विषयवासना यांत खर्च होतें. याशिवाय राहिलेला वेळ खेळण्यांत, खाण्यापिण्यांत लुप्त होतो. राग, द्वेष, चिंता, विवंचना, त्रास यांतसुद्धां आमचा बराच वेळ खर्च होतो. शिवाय आमचीं मुलेंबाळें, आप्तेष्ट, गणगोत यांच्याकडेहि कांहीं वेळ खर्च करावा लागतो. अशी स्थिति असल्यामुळें कोणाहि मानवाला उपयुक्त काम कसें करितां येईल ? देवाकडे त्याचें लक्ष्य कसें लागेल ?" हें सर्व ऐकून डॉक्टर जान्सन हंसला नाहीं, किंवा त्या मनुष्यावर रागावलाहि नाहीं; उलट त्याच्याशीं सहानुभूति दाखवून तो स्फुंदूनस्फुंदून रडूं लागला, आणि त्याला ह्मणाला " ईश्वराकडे मन लावण्यास जर वेळ मिळत नाहीं, तर आत्महत्या करणें बरें. बन्धो, माझी एक तक्रार आहे आणि ती तुझ्यापेक्षां वाईट आहे." हें ऐकून "आपली कसली तक्रार?" असें तो मनुष्य डाक्टराला विचारूं लागला. त्यावर डॉक्टर जॉन्सन ह्मणाला "माझाहि सर्वस्वीं घात झाला ! माझ्या पोटाला पुरेल इतकें धान्य पैदा करण्याजोगी जमीन उरली नाहीं. " डॉक्टरचें हें भाषण ऐकून तो मनुष्य ह्मणतो " छेः, असें कसें होईल ? आपला आहार मोठा असून आपण दहाजणांइतकें खातां, हें मी कबूल करितों; पण आपल्या लठ्ठ पोटाला पुरेल इतकें धान्य अगर भाजीपाला पैदा करण्याजोगी जमीन पृथ्वीवर आहे. असें असून तुमची व्यर्थ तक्रार कां ?" यावर डॉक्टर जॉन्सन ह्मणाला "हें पहा, तुमची पृथ्वी ह्मणजे काय आहे? अचल तारे आणि सूर्य यांमधील अंतर मोजतांना, ज्योतिषशास्त्रांत पृथ्वी ह्मणजे एक बिंदु आहे असें मानिलें जातें. आणि

या बिंदूपैकीं—पृथ्वीपैकीं, तीनचतुर्थांश भाग पाण्यानें व्यापलेला आहे. त्याशिवाय वाळवंटाचीं मैदानें, टेंकड्या, दगड, तळीं, सरोवरें आणि लंडनसारखीं मोठमोठीं शहरें इत्यादिकांनींहि बरीच जागा व्यापलेली आहे. शिवाय सडका, आगगाडीचे मार्ग आणि रस्ते इत्यादिहि बरीच जागा व्यापतात. हें सर्व भागून कांहीं थोडी जागा उरते असें समजा; पण या राहिलेल्या जमिनीच्या तुकड्यावर उदरनिर्वाह करणारे कितीतरी पक्षी आहेत, मुंग्या आहेत, घोडे आहेत, हत्ती आहेत. यांचाहि उदरनिर्वाह राहिलेल्या जमिनीवर चालला पाहिजे. मनुष्याच्या वांट्याला मग फारच थोडी जमीन येते, आणि या जगांत मनुष्यें किती तरी आहेत. फक्त एका लंडनच्या लाखों लोकांकडे पहा. या सर्वांचा चरितार्थ या बिंदुरूपी पृथ्वीवरच चालला पाहिजे. असें जर आहे, तर मग, माझें समाधान होईल इतकें अन्न कसें पैदा होईल? या माझ्या तर्कशास्त्रानें माझी निराशा होते, आणि मला जरूर असलेलें अन्न उत्पन्न करण्यास जमीन न मिळाल्यानें मी खचित मरणार असें मला वाटतें."

तो मनुष्य ह्मणाला "डॉक्टर, तुमचें तर्कशास्त्र वरवर बरोबर दिसतें खरें; पण वस्तुतः तें तसें नाहीं. तुमचें तर्कशास्त्र कसेंहि असो, पृथ्वी तुमचें पोषण करण्यास समर्थ आहे." डॉक्टर जॉन्सन ह्मणाला "महाराज, माझी तक्रार जर व्यर्थ आहे, तर आपलीहि सबब तशीच आहे. मला पृथ्वीपासून जर माझा आहार मिळतो, तर तुह्माला आध्यात्मिक आहार घेण्यास—ईश्वराकडे लक्ष्य लावण्यास काल साहाय्य करील (तुह्माला वेळ मिळेल)." आध्यात्मिक गोष्टीविषयीं हल्लींच्या सुधारलेल्या काळांत वेळ मिळत नाहीं, अशी जे लोक सबब पुढें आणितात, त्यांनां 'राम' हेंच (डॉक्टर जॉन्सननें दिलेलें) उत्तर देतो. तुह्मीं वेळेचा सदुपयोग केला, तर हल्लींच्या परिस्थितींतहि आपली आध्यात्मिक उन्नति करून घेण्यास तुह्मांला पुष्कळ वेळ आहे.

एकदां एक मनुष्य घोड्यावर बसून दूरच्या गांवीं चालला होता. वाटेंत एका विहिरींतून कांहीं शेतकरी रहाटानें पाणी ओढीत असलेले

त्याला दिसले. तो आपल्या तहानेलेल्या घोड्याला पाणी पाजण्यासाठीं त्या विहिरीजवळ आला. पण, रहाटाचा करकर आवाज ऐकून घोडा बुजून गेला, आणि तो कांहीं पाणी पिईना. असें झाल्यावर, रहाटाची करकर बंद करा, असें त्या मनुष्यानें शेतकऱ्यांनां सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं रहाट थांबवून आवाज बंद केला. पण, त्या आवाजाबरोबर विहिरींतून पाणी येण्याचेंहि बंद झालें, आणि घोड्याला कांहीं पाणी मिळेना. हें पाहून तो मनुष्य ह्मणाला "तुह्मीं किती चमत्कारिक लोक आहां! मीं तुह्मांला आवाज बंद करण्यास सांगितलें, पाणी बंद करण्यास सांगितलें नाहीं! वाटसरूच्या घोड्याला पाणी पिऊं देण्याइतकीहि दया तुमच्या अंगीं नाहीं काय?" ते शेतकरी ह्मणाले "महाराज, माफ करा. आपल्या घोड्याला पाणी प्यावयाला मिळावें अशी आमची मनापासून इच्छा आहे; पण, ती आह्मांला पूर्ण करतां येत नाहीं. आपल्या घोड्याला पाणी पाहिजे, तर तुह्मीं त्याला थापटून, चुचकारून आवाज चालू असतांना पाणी प्यावयाला लाविलें पाहिजे. कारण, आह्मीं आवाज बंद केला—रहाट बंद केला, ह्मणजे पाणीहि थांबलेंच, ह्मणून समजा. रहाट सुरू असला ह्मणजे त्याच्या आवाजाबरोबर पाणी येत असतें."

त्याचप्रमाणें 'राम' तुह्मांला सांगतो, कीं, जर तुह्मांला वेदान्ताचा--आत्म्याचा साक्षात्कार घ्यावयाचा असेल, तर तो तुह्मीं सर्व तऱ्हेच्या आवाजांत--त्रासांत घेतला पाहिजे. आवाज--त्रास नाहीं, अशी स्थिति या जगांत तुह्मांला केव्हांहि मिळणार नाहीं. तुह्मी पाहिजे तर हिमालयांत अगर दुसरीकडे कोठेंहि जाऊन रहा. तेथेंहि तुमच्यामागें त्रास व दगदग आहेच, ह्मणून समजा. संसाररहाटाच्या—संसारचक्राच्या आवाजांतच तुह्मांला आत्मसाक्षात्कार घेतला पाहिजे. बिकट आणि प्रतिकूल अशा परिस्थितींतूनच थोर पुरुष उदयाला आले आहेत. परिस्थिति जितकी कठिण आणि प्रतिकूल असेल, तितकें तिच्याशीं झगडून लोक अधिक सामर्थ्यवान् होतात. ह्मणून आम्हीं बाह्य संकटें आणि विपत्ति यांचा सत्कार करावा. 'आपदः सन्तु नः शश्वत्

–आमच्यावर संकटें नेहमीं येवोत' असा जो वर एका ईश्वरभक्तानें मागितलेला आहे, त्यांतील मर्म हेंच आहे. परिस्थिति कशीहि असो, तुह्मी वेदान्ताप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करा, ह्मणजे ती तुह्मांला अनुकूल होत जाईल; तुह्मी तिचे स्वामी व्हाल. समाजाची तुह्मांला भीति वाटते काय? जगाचें तुह्मांला दडपण वाटतें काय ? पण तुह्मी जगांत राहतां कोठें ! प्रत्येकजण स्वतः निर्माण केलेल्या लहानशा सृष्टींत राहत असतो. आपलें घर, आपली ज्ञात एवढेंच कित्येकांचें जग असतें. त्याहून त्यांनां अधिक माहीत नसतें. या विस्तीर्ण जगांत रहा. तुमच्यावर जें दडपण पडतें, तें या विस्तीर्ण जगाचें नसून तुह्मीं स्वतः निर्माण केलेल्या क्षुद्र सृष्टींचेंच असतें. क्षुद्र सृष्टि सोडून तुह्मी या विस्तीर्ण जगांत आलां, ह्मणजे तें तुह्मांला अनुकूल होऊं लागतें.

खरें काम ह्मणजे काय आहे, याचा आह्मीं नीट विचार केला असतां, स्वतः निर्माण केलेली सृष्टि आह्मांला नीट समजेल. या देशांत 'वेळ मिळत नाहीं, फुरसत नाहीं,' अशी तक्रार नेहमीं ऐकूं येते. पण खरें पहावें, तर लोकांनां इतका वेळ मिळतो, कीं, तो कसा घालवावा–तो जातां जात नाहीं–अशा चिंतेंत कांहीं असतात, व अशांनां पाहून 'रामा'ला मौज वाटते. खरें काम ह्मणजे काय, याविषयीं गैरसमज असल्यामुळें हा सर्व घोंटाळा होतो. तुह्मी जें कांहीं करतां तें खरोखरी काम नसतें. निरनिराळे लोक कामाची व्याख्या निरनिराळी करितात. तुह्मी सरळ रस्त्यावरून चालूं लागलां, किंवा एकादा चेंडू सपाट जाग्यावरून जाऊं लागला, तर तें कांहीं काम नव्हे; जेव्हां तुह्मी टेंकडीवर, सपाटीपासून उंचीवर जाऊं लागतां, तेव्हांच तुह्मी काम करूं लागतां, असें शास्त्रज्ञाचें, शिल्पविद्याविशारदाचें ह्मणणें आहे. मानसशास्त्राप्रमाणें पाहिलें, तर तुह्मी जें कांहीं करितां, त्यांत तुमचें मन असलें, तरच तें काम, एरवीं नव्हे. श्वासोच्छ्वास, रुधिराभिसरण यांसारख्या क्रिया मानसशास्त्राप्रमाणें कामाच्या व्याख्येंत येत नाहींत.

कामाची योग्य कल्पना यावी, ह्मणून मानसशास्त्रवेत्ते एक उदाहरण सांगतात. लष्करीखात्यांत नोकरी करून पेनशन मिळविलेला एक वृद्ध शिपाई होता. कवाइतीचीं कामें त्याच्या इतकीं अंगवळणीं पडून गेलीं होतीं, कीं, तीं त्याच्या हातून एकाद्या यंत्राप्रमाणें होत असत. एकदां तो शिपाई हातांत दुधाची चरवी आणि पक्वान्नाचें ताट घेऊन रस्त्यानें चालला होता. त्याची मौज करावी ह्मणून एका थट्टेखोरानें 'Attention' ( हुशार ) हा शब्द जोरानें पुकारला. हा शब्द ऐकतांच त्या शिपायानें आपल्या हातांतील जिन्नस फेंकून देऊन हात आपल्या अंगाच्या दोन्ही बाजूंला ठेवून तो 'Attention'च्या स्थितींत उभा राहिला. आजूबाजूच्या लोकांनां ही एक मोठी गम्मत झाली. त्या शिपायानें कांहीं क्रिया केली खरी, पण मानसशास्त्राच्या दृष्टीनें पहातां त्या अनैच्छिक क्रियेंत त्याचें मन नसल्यामुळें त्यानें कांहीं काम केलें नाहीं.

आतां 'राम' तुह्मांला विचारतो, कीं, एका दिवसांत तुह्मी किती तास खरें काम करितां ? तुह्मी खातांजेवतां, हिंडतांफिरतां आणि तशा अनेक क्रिया करितां. पण यांत तुमचें मन नसल्यामुळें या सर्व क्रियांची खऱ्या कामांत गणना होत नाहीं. तुमच्या हातांनीं होणाऱ्या क्रियेंत जर तुमचें मन किंवा लक्ष्य नाहीं, तर तुह्मी तेवढी वेळ फुकट दवडल्याप्रमाणेंच आहे. या वेळेचा तुह्मांला सदुपयोग करितां आला असता. एकाद्या क्रियेंत तुह्मीं आपलें अर्धे लक्ष्य घातलें, तर अर्धेंच काम तुह्मीं केलें, असें होतें, व उरलेलें अर्धे लक्ष्य दुसऱ्या कांहीं कामाकडे गुंतलेलें असतें. तसेंच एकाद्या क्रियेंत तुमचें बिलकूल लक्ष्य नसेल, तर तुमचें सर्व लक्ष्य तुह्मांला दुसऱ्या कामाकडे वेधतां येतें. शिवाय, तुमच्याकडून अशा रीतीनें बरेंच काम होऊन तुह्मांला तुमच्या आयुष्यांत बराच फायदाहि होतो. हें विधान खालील गोष्टीवरून तुह्मांला चांगलें समजेल.

एकदां दोन मित्रांची रस्त्यांत गांठ पडली. त्यांपैकीं एक दुसऱ्याला ह्मणतो "चल, आपण देवालयांत कीर्तन ऐकावयाला जाऊं." दुसरा त्याला

ह्मणतो "छे, छे, कीर्तन ऐकण्यांत काय फायदा? खेळावयाला गेलेलें फार चांगलें." दोघांची एकवाक्यता न झाल्यामुळें पहिला कीर्तनाला गेला, आणि दुसरा खेळण्यास मैदानाकडे गेला. पण, देवालयांत कीर्तन ऐकण्यास गेलेल्याचें चित्त कीर्तनाकडे लागेना, आणि हरिदासानें सांगितलेलें एकहि वाक्य त्याला कळेना. त्याला त्यामुळें पश्चात्ताप झाला, आणि आपण येथें कां आलों असें त्याला वाटूं लागलें; व आपला सोबती इतर संवगड्यांबरोबर मोठ्या आनंदानें खेळत असेल, अशी कल्पना मनांत येऊन त्याचें सर्व चित्त मैदानाकडे लागलें. त्याला देवालयांतील दोन तास दोन युगांप्रमाणें भासले.

इकडे खेळावयाला गेलेल्या त्याच्या मित्राला मनाजोगती सोबत मिळाली नाहीं, यामुळें त्याला गमेनासें होऊन कसेंसेंच वाटूं लागलें. जर मित्राबरोबर आपण देवालयांत गेलों असतों, तर काय बहार झालीअसती? आतां तिकडे जावें, तर उशीर फार झाला. असे विचार मनांत येऊन तो तेथेंच राहिला. तो मैदानावर जरी होता, तरी त्याचें सर्व लक्ष्य देवालयांतील कीर्तनाकडे होतें. दोन तासांनंतर त्या दोघांची पुनः रस्त्यांत गांठ पडली, आणि त्यांपैकीं एक दुसऱ्याला ह्मणतो "मी देवालयांत आलों नाहीं, हें फार वाईट केलें." लगेच दुसरा ह्मणतो "मी मैदानाकडे आलों नाहीं, हें कांहीं बरें झालें नाहीं." यावरून असें पहा, तुमचे देह असल्याठिकाणीं तुमचीं मनें असत नाहींत. आतां व्याख्यान ऐकावयाला बरीच मंडळी जमलेली आहे, पण त्यांपैकीं कितीजण खरोखर या दिवाणखान्यांत आहेत? मन चंचल आहे आणि तें बायकामुलांकडे, आप्तेष्टांकडे, एका स्थळाहून दुसऱ्या स्थळाकडे, एका विषयापासून दुसऱ्या विषयाकडे भटकत असतें.

जेव्हां तुह्मी मनानें कोणतीहि गोष्ट करितां, तेव्हांच तुह्मी ती गोष्ट करितां, असें मानसशास्त्राचें ह्मणणें आहे. एकादी क्रिया तुह्मी देहानें करीत असतां, त्यावेळीं तुमचें मन जर तींत नाहीं, तर तुह्मीं ती क्रिया न केल्यासारखीच आहे. उदाहरणार्थ, तुह्मी देवालयांत प्रार्थना कर-

ण्याच्या उद्देशानें गेलां, आणि तेथें तुमचें मन जर प्रार्थनेकडे लागलें नाहीं, तर तुह्मीं प्रार्थना केली नाहीं, असेंच ह्मणावयाला पाहिजे. कदाचित् तुह्मी रस्त्यांत चालत असतांना जरी तुमचें चित्त परमेश्वराकडे लागेल, तरी देखील तुह्मी प्रार्थना केल्यासारखें होईल. गुन्हेगार आणि पापी समजले जाणारे लोकहि, त्यांचीं मनें परमेश्वराकडे लागलेलीं असल्यामुळें खरोखर पवित्र आणि धार्मिक असतात. केव्हां-केव्हां धार्मिक आणि पवित्र समजले जाणारे लोक तसे नसतात. कारण, त्यांचीं मनें वाईट असतात.* केव्हांकेव्हां दुष्ट लोकांची भर-

---

* एका देवालयाच्या बाजूला एक संन्यासी राहत असे. त्याच्यासमोर एका गणिकेचें घर होतें. त्या घरांत जमत असलेली नेहमींची जत्रा पाहून संन्याशानें तिला बोलावून आणून तिची निर्भर्त्सना करून तिला ह्मटलें "तूं फार पापी आहेस ! तूं अहोरात्र पापकर्म करितेस. तुझी गति पुढें किती तरी वाईट होणार !" त्या गरीब गणिकेला आपल्या कर्मांचा फार पश्चात्ताप झाला, आणि तिला फार वाईट वाटून तिनें आपल्या मनांत ईश्वराची प्रार्थना करून क्षमा मागितली. पण तिचा गणिकेचा धंदा वंशपरंपरागत चालत असल्यामुळें तिला आपल्या उदरनिर्वाहासाठीं दुसरा कोणताहि धंदा करितां येईना. ह्मणून जेव्हांजेव्हां तिच्या देहाकडून पापकर्म घडे, तेव्हां तिला अधिकाधिक पश्चात्ताप होई, आणि ती परमेश्वराची क्षमा वारंवार मागत असे. संन्याशानें पाहिलें, कीं, आपल्या उपदेशाचा तिच्यावर कांहीं परिणाम झाला नाहीं. तो मनांत ह्मणाला, कीं, या एका जन्मांत तिच्या घरीं किती लोक येतात हें पाहूंया. आणि त्या दिवसापासून जेव्हां कोणी एकादा तिच्या घरीं जाई, तेव्हां एक खडा टाकून संन्यासी त्याची मोजणी करी. कांहीं दिवसांनीं तेथें एक मोठा खड्यांचा ढीग जमला. एके दिवशीं त्या ढिगाकडे बोट दाखवून संन्यासी तिला ह्मणाला "बाई, हा ढीग तूं पाहतेस ना ? मीं तुला गेल्या खेपेला पापकर्में करूं नको ह्मणून सांगितलें होतें, तेव्हांपासून तूं तीं पापकर्में चालू ठेविलीं आहेस, आणि यांतील प्रत्येक खडा त्यांची साक्ष देत आहे."

आपल्या पापकर्मांचा संचय पाहून ती गरीब बिचारी कांपूं लागली, आणि ती अगदीं दीन आणि अनाथ होऊन रडरडून परमेश्वराची प्रार्थना करूं लागली,

भराट होते असें दिसतें. पण अशा लोकांची भरभराट त्यांच्या दुष्टपणामुळें होत नसून, ती ते आपल्या अंतःकरणांत ईश्वराचें स्मरण करितात, यामुळेंच होते. यास्तव लोकांच्या बाह्य वर्तनापासून आह्मीं कोणतेंहि अनुमान काढूं नये; आणि चोरांनां व खुनी मनुष्यांनां कमी लेखूं नये.

आपल्या लहानपणीं ऐकलेली हिंदुस्तानांतील एका प्रसिद्ध चोराची गोष्ट 'राम' आतां सांगणार आहे. ही गोष्ट 'रामा'समक्ष त्यानें दुसऱ्या

---

कीं, "हे परमेश्वरा, मला या पापमय जीवितांतून तूं कां सोडवीत नाहींस?" परमेश्वरानें तिची प्रार्थना ऐकिली, आणि त्याच दिवशीं यमराजानें तिची सुटका केली. देवाच्या अतर्क्य इच्छेनुरूप त्याच दिवशीं त्या संन्याशालाहि यमराजानें नेलें. स्वर्गाहून विष्णुदूत आले, आणि ते त्या अनुतापी गणिकेच्या सूक्ष्म देहाला वैकुंठास घेऊन गेले. यमलोकाहून यमदूत आले आणि त्यांनीं त्या संन्याशाच्या सूक्ष्म देहाला बांधून पाताळांत नेलें. गणिकेचें नशीब पाहून संन्यासी ओरडला "हाच काय देवाच्या घरचा सूक्ष्म न्याय! मीं माझें सारें आयुष्य तपश्चर्येंत आणि दारिद्र्यांत घालविलें, त्याचें नरकवास हें मला फळ मिळालें; आणि साऱ्या आयुष्यांत दुष्कर्में करणाऱ्या त्या गणिकेला मात्र स्वर्गवास मिळत आहे!" हें ऐकून विष्णुदूत ह्मणाले "देवाचे हुकूम नेहमीं न्यायाला अनुसरून असतात. जसें पेरावें तसें घ्यावें. मान आणि कीर्ति मिळविण्याच्या आशेनें तूं आपलें आयुष्य दांभिकपणांत आणि पोकळ डौलांत घालविलेंस. तुला पाहिजे तें ईश्वरानें दिलेलें आहे. तुझें अंतःकरण कधींहि खऱ्या कळकळीनें ईश्वराकडे लागलेलें नव्हतें. त्या गणिकेच्या देहाकडून जरी पापकर्में घडत होतीं, तरी ती अहोरात्र खऱ्या कळकळीनें ईश्वराची प्रार्थना करीत असे. तिच्या आणि तुझ्या देहाला लोकांकडून कसा सत्कार मिळत आहे तें खालीं पहा. तुझ्या देहानें कधींहि पाप केलें नाहीं म्हणून त्यावर हार आणि माळा घालून वाजतगाजत लोक तुझा देह नदीतटाकीं नेत आहेत; पण पापकर्म करणारा तिचा देह गिधाडें आणि कोल्हीं फाडून खात आहेत. पण ती अंतःकरणानें फार पवित्र होती, म्हणून ती आतां उत्तम लोकाला जात आहे. तुझें अंतःकरण नेहमीं तिच्या पापकर्मांची गणती करण्याकडे लागलेलें असल्यामुळें तें फार अपवित्र झालें, आणि तुला नरकवास प्राप्त झाला. तूंच खरी गणिका—ती नव्हे!"

—श्रीरामकृष्णांचीं बोधवचनें.

एकाला सांगितली. एका श्रीमान् मनुष्याच्या घरीं पुष्कळ जवाहीर आलेलें आहे, अशी त्या चोराला बातमी लागली. तेव्हां तें चोरून आणण्याचा त्यानें बेत केला. पण त्या श्रीमंताचें घर फोडून आंत कसें शिरावें, हें त्याच्या नीटसें लक्ष्यांत येईना. पुष्कळ विचार करून शेवटीं त्यानें एक युक्ति शोधून काढिली. त्या श्रीमंताच्या घराजवळच एक मोठा वृक्ष होता, आणि त्या वृक्षाची एक डहाळी त्या श्रीमंताच्या घराच्या चौथ्या मजल्याच्या एका खिडकीसमोर होती. रात्र होतांच त्यानें वृक्षाच्या चौथ्या मजल्यासमोरील डहाळीला एक दोरी बांधून ट्रॅपिझ (झोंपाळा) तयार केला, आणि त्या ट्रॅपिझवरून त्यानें बरेच झोंके घेतले. उन्हाळा असल्यामुळें त्या घरांतील लोक सहाव्या मजल्यावर निजलेले होते. चौथ्या मजल्यांत कोणी नव्हतें. अशी अनुकूल स्थिति असल्यामुळें ट्रॅपिझ खिडकीपाशीं येतांच त्यानें लाथ मारून खिडकी उघडण्याचा प्रयत्न केला. कांहीं लाथा झाडल्यावर खिडकी मोडून पडली, आणि तो चोर आंत शिरला. नंतर त्यानें खालीं दोऱ्या सोडून आपल्या सोबत्यांनांहि वर घेतलें. मग जवाहीर कोठें असावें याचा तो विचार करूं लागला. त्यानें आपलें मन एकाग्र केलें, आणि बहुधा जवाहिरासारखे जिन्नस सुरक्षित जागीं न ठेवितां कोणालाहि शंका देखील येणार नाहीं अशा उघड जागींच ते ठेवलेले असतात, हें त्यानें विचाराअंतीं ठरविलें, आणि तो अशा क्षुल्लक जागा शोधूं लागला. शोधितांशोधितां एका ठिकाणीं जमिनींत पुरून ठेवलेलें जवाहिर त्याला मिळालें. इतक्यांत त्यानें वरच्या मजल्यावर होत असलेला कसलासा आवाज ऐकला. चोरानें यावेळीं झालेली आपल्या मनाची स्थिति सांगितली ती 'राम' केव्हांहि विसरणार नाहीं. जवाहिर मिळाल्यावर चोरांनीं जो आवाज ऐकला, त्या आवाजानें त्यांच्या अंगांत कांपरें भरलें, त्यांचें अंग भयानें थरथरूं लागलें, व आतां आपलें मरण आलें, यावेळीं यःकश्चित् उंदीरहि आपणांला मारूं शकेल, असें तो चोर ह्मणाला. आणि खरोखर तो वरल्या मजल्यावर झालेला आवाज उंदरांनीं केलेला होता!

त्यावेळीं त्या चोराला व त्याच्या सोबत्यांनां फार पश्चात्ताप झाला. त्यानें आपला सर्व भार परमेश्वरावर टाकिला. आपलें भयंकर कृत्य, आपला देह, आपलें मन हें सर्व तो विसरला, आणि त्यानें अशी प्रार्थना केली, कीं, 'हे परमेश्वरा, माझें रक्षण कर. मी यापुढें साधु किंवा संन्यासी होईन आणि माझें सारें आयुष्य तुझ्या सेवेंत घालवीन. हे देवा, मला तार.' अशी अत्यंत खरी आणि कळकळीची प्रार्थना त्याच्या अंत:करणांतून बाहेर आली–त्याच्या रोमरोमांतून ती प्रगट झाली, तो त्यावेळीं ईश्वर-मयच होऊन गेला. त्याचा परिणाम शेवटीं काय झाला? सर्व आवाज थांबला आणि तो आपल्या मित्रांसहित सुरक्षितपणें बाहेर पडला.

या गोष्टीपासून आह्मीं काय धडा घ्यावा? बाह्य आचरणावरून आह्मीं कोणाचीहि परीक्षा करूं नये. मनुष्याची पारख बाह्य कृत्यांवरून न होतां ती त्याच्या विचारांवरूनच होते. दुर्लौकिकाविषयीं प्रसिद्ध असलेल्या घरीं राहणारा मनुष्य साधुहि असूं शकेल. भगवान् बुद्ध एका गणिकेच्या घरीं राहत असत; पण ते फारच पवित्र होते. लोक, ज्या बाईला प्रथम दगड मारण्याला तयार होते, अशा पापी मेरी मॅगडोलिन–बाईच्या घरीं भगवान् ख्रिस्त राहिला होता, आणि ख्रिस्ताला तर परमेश्वराचा अवतार असें मानितात. हिंदुस्तानांतहि ख्रिस्तासारखे महात्मे वाईट लोकांच्या संगतींत राहिले होते; पण ते फारच थोर होते. एकाद्या मनुष्याच्या संगतीवरून किंवा त्याच्या कृत्यांवरून त्याची पारख करूं नका. जसे ज्याचे विचार, तसा तो मनुष्य. तुरुंगांत राहणारे कांहीं मनुष्य स्वर्गसुख अनुभवितात. 'बनियन'नें 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' हें पुस्तक तुरुंगांतच लिहिलें. तुरुंगांत असतांना व दृष्टि नाहींशी झाल्यावर मिल्टनचें महाकाव्य बाहेर आलें. डॅनिअल डीफोनें 'रॉबिनसन क्रूसो' व सर वाल्टरनें 'जगाचा इतिहास' हे ग्रंथ तुरुं-गांतच लिहिले. आमची परिस्थिति अशी असावी, तशी असावी, असें आह्मीं इच्छितों, ह्मणजे जेथें आमचे विचार आहेत तेथेंच आह्मी राहतों.

आतां आह्मी देहविस्मृति–ध्यान किंवा समाधि यांकडे वळूं. तुह्मी आत्मस्वरूपांत लीन झालां, परमात्म्याशीं तुमचें तादात्म्य झालें, कीं, तुह्मांला यश आलें ह्मणून समजा. वरील गोष्टींत चोराला जें यश आलें, तें खऱ्या कळकळीच्या प्रार्थनेमुळेंच होय; आणि जवाहिर कोठें ठेविलें होतें, हें त्याला चित्ताच्या एकाग्रतेवरूनच समजलें. दुसऱ्या शब्दांनीं सांगावयाचें ह्मटलें ह्मणजे, चोरानेंहि वेदान्त आचरणांत आणि- ल्यामुळें त्याला यश मिळालें. आतां कोणाला जर यश मिळवावयाचें असेल, तर हाच मार्ग आहे. चोराला आपल्या दुष्कर्माबद्दल योग्य कालीं प्रायश्चित्त मिळेलच. कारण, चोरी करणें हें पाप आहे. एकादा मनुष्य सर्वस्वीं वाईट असतो, असें ह्मणणें चुकीचें होईल. कारण, चोरांत देखील ईश्वरीतत्त्व आणि कांहीं चांगल्या वृत्ति असतात. तसेंच मिशनरी, स्वामी, गुरु इत्यादिकांमध्येंहि कांहीं वाईट कृत्यें व वृत्ति आढळून येतात. प्रत्येक मनुष्य ह्मणजे बऱ्यावाईटांचें एक चमत्कारिक मिश्रण आहे. कांहीं व्यक्तींनां मान देतांना त्यांच्या चांगल्या बाजूबरोबर वाईट बाजूचाहि आह्मीं विचार करीत नाहीं, हें फार चुकीचें आहे. यासाठीं खऱ्याखोट्याचा निर्णय नेहमीं करीत असावें.

एकाद्या मनुष्याला हल्लींच्या परिस्थितींत आत्मज्ञान कसें करून घेतां येईल? याचें उत्तर त्या मनुष्याच्या स्वभावावर अवलंबून आहे. साधारणपणें किंवा ठोकळमानानें पहातां, मनुष्याचे स्वभाव–त्यांच्या मनाचें समतोलत्व तीन प्रकारचें असतें. १ अस्थिर समतोलत्व; २ स्थिर समतोलत्व; आणि ३ सामान्य समतोलत्व. हें तीन प्रकारचें समतोलत्व कसें असतें, तें आपण पाहूं. एकादी पेन्सिल तुमच्या हातावर किंवा मेजावर उभी ठेवा. एकदोन सेकंद ती पेन्सिल तशीच राहील. पण, लगेच वाऱ्याच्या सूक्ष्म झुळकीनें ती पेन्सिल पडेल. याला अस्थिर समतोलत्व ह्मणतात. पेन्सिल हाताच्या बोटांत धरून लंबकाप्रमाणें हालवूं लागा. कांहीं सेकंद हेलकावे खाऊन पुनः ती एका जागीं स्तब्ध राहील. याला स्थिर समतोलत्व ह्मणतात. यांत समतोलत्व बिघडलें तरी लगेच पुनः

तें स्थिर होतें. तिसरा प्रकार, ह्मणजे पेन्सिल मेजावर आडवी ठेवा. तिचें समतोलत्व केव्हांहि बिघडत नाहीं. या समतोलत्वाला सामान्य समतोलत्व असें नांव आहे. याप्रमाणें मनुष्याच्या मनाचे—मनाच्या समतोलत्वाचे तीन प्रकार असतात. पहिल्या प्रकारचे लोक थोड्याशा कारणानें—बाह्य गोष्टींनीं लगेच क्षुब्ध होतात. त्यांच्या मनाला विश्रांति कशी असते हें माहीत नसतें. दुसऱ्या तऱ्हेच्या लोकांचीं मनें नेहमीं स्थिर व शांत असतात; पण एकदां त्यांचें मन क्षुब्ध झालें, ह्मणजे बराच वेळ तें हेलकावे खात असतें. जगांतील बहुतेक लोक याच वर्गांत मोडतात. एकाद्यानें थोडीशी विषम व प्रतिकूल टीका केली, कीं, आमचें मन क्षुब्ध होऊन जातें, आणि त्या टीकेचें शल्य कित्येक दिवस, नव्हे तर कित्येक महिने अगर वर्षें, आमच्या मनांत एकसारखें रुतत असतें. टीकेला कांहीं फारसा वेळ लागत नाहीं, पण त्या टीकेचा आमच्या मनावरील परिणाम कितीतरी काल टिकतो, आमचें मन बराच काल एकसारखे हेलकावे खात असतें. मनाचे हेलकावे—मनाची क्षुब्धता हा रोग आहे. या रोगाचा तुमच्यावर पगडा बसूं देऊं नका, असें मानसशास्त्र सांगतें. या दुसऱ्या वर्गांतील लोकांनां 'लंबक--लोक' अशी संज्ञा देतां येईल. तिसऱ्या प्रकारचे लोक, ह्मणजे वीर पुरुष, किंवा जीवनन्मुक्त होत. त्यांनां तुह्मी कोठेंहि ठेवा, ते समुद्रावर मोठ्या तुफानांत सांपडोत किंवा घनघोर युद्धांत सामील झालेले असोत, कोणीहि त्यांची स्तुति अगर निंदा करोत, कोणत्याहि गोष्टीनें त्यांचीं मनें क्षुब्ध होत नाहींत, किंवा त्यांच्या मनाची शांति बिलकूल डळमळत नाहीं. ते आरशाप्रमाणें असतात. आरशासमोर तुह्मी उभे रहा, त्यांत तुमचें प्रतिबिंब दिसतें; तेथून तुह्मी आपले पाय उचला, कीं, आरसा आपला पूर्वींसारखाच असतो. त्याप्रमाणेंच या लोकांवर तुमच्या टीकेचा, निंदास्तुतीचा किंवा कोणत्याहि गोष्टीचा परिणाम होत नाहीं. ते नेहमीं 'आत्मन्येवात्मना तुष्ट'--आत्मारामीं रंगलेले असतात. त्यांनां स्थितप्रज्ञ असें ह्मणतात.

'राम' तुह्मांला सांगतो, कीं, जर तुह्मी वेदान्ताचा अभ्यास करून त्याप्रमाणें आचरण ठेवाल, प्रणवाच्या किंवा इतर मंत्रांच्या जपानें आत्मतत्त्वाचें नेहमीं चिंतन कराल, तर क्रमाक्रमानें तुमचें अस्थिर मन स्थिर होत जाईल, आणि शेवटीं तें स्थितप्रज्ञ होईल. चंचल मनाला स्थिर करण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यांपैकीं एक येथें सांगतों. केव्हां-केव्हां 'रामा'पाशीं कांहीं लोक येतात, आणि प्रतिकूल व विषम टीका करून चालते होतात. त्यांचीं कटु भाषणें व टीका यांपासून अलिप्त राहण्याला 'राम' कोणता उपाय योजतो? भगवद्गीतेइतकी प्रसिद्ध नसलेली, पण तिच्या योग्यतेचीच 'अवधूतगीता' हातांत घेऊन 'राम' एकाददुसरा श्लोक वाचतो. एकाच श्लोकानें जन्मजन्मांतरींचे दोष नाहींसे होऊन जातात, एकाच श्लोकानें 'रामा'चें अंतःकरण उचंबळून जातें, मायापटल एकदम दूर होऊन आत्मतत्त्व उदयाला येतें! ह्मणून 'राम' तुह्मांला सांगतो, कीं, अशा प्रकारचें एकादें अत्युत्तम पुस्तक आपल्याजवळ बाळगावें. बायबल, गीता, यांसारख्या उत्तम पुस्तकांतील चांगले उतारे एका नोटबुकांत लिहून ठेवावे, किंवा ते मुखोद्गत करावे; आणि जर एकाद्यावेळीं प्रतिकूल टीकेनें किंवा संगतीनें मन क्षुब्ध होण्याचा प्रसंग आला, तर आपणांला अत्यंत प्रिय असलेला आणि उन्नत करणारा असा कोणताहि भाग किंवा उतारा एकदम तोंडानें ह्मणूं लागावें, आणि आपलें सर्व लक्ष्य त्यावर ठेवून मनाला हेलकावे खाऊं न देतां स्थिर करावें. मनाचे हेलकावे—मनाची क्षुब्धता हा रोग आहे, आणि वर सांगितलेला उपाय त्यावर रामबाण औषध आहे.

# OUT OF MISERY TO GOD WITHIN.

## दुःखांतून निजानंदांत.*

लोकांनां दुःख कां होतें, जगांत दुःख कां आहे, या प्रश्नाचा आज आपण विचार करूं. पण इतिहास, साधुसंतांचीं वचनें आणि विद्वानांचीं मतें इत्यादिकांच्या दृष्टीनें आह्मांला या प्रश्नांचा विचार करावयाचा नाहीं. मोठमोठे तत्त्वज्ञ आणि ग्रंथकर्ते यांनीं आपापल्या अनुभवाप्रमाणें खऱ्याच गोष्टी सांगितलेल्या आहेत, हें खरें आहे; पण जर आह्मीं स्वतः निरीक्षण करून खऱ्याखोट्याचा निवाडा करून अनुभव घेतला नाहीं, तर जगांतील सर्व ग्रंथकर्त्यांच्या ग्रंथांचा आह्मांला कांहीं एक उपयोग होणार नाहीं. एकादा मोठा इतिहासकार, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ यांच्या वचनांचा आधार दाखविण्याची संवय हल्लीं बरीच प्रचारांत आहे, आणि जो वक्ता असे मोठमोठे आधार पुष्कळ दाखवितो, त्यालाच अधिक मान मिळतो. पण ही फार घातुक प्रवृत्ति आहे. आतां, 'रामा'ला स्वतःला काय अनुभव आलेला आहे, व प्रत्येकाला कसकसा अनुभव घेतां येईल, हें आज 'राम' सांगणार आहे.

या जगांतील दुःखाचें मोठें कारण ह्मटलें ह्मणजे आह्मी आमच्या अंतर्यामीं पाहत नाहीं, स्वतः विचार करून आपलीं मतें बनवीत नाहीं, स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास न ठेवितां दुसरे काय ह्मणतात त्यावर विशेष अवलंबून राहतों, स्वतःच्या दृष्टीनें न पाहतां दुसऱ्यांच्या दृष्टीनें पाहतों, हें आहे. महम्मद, बुद्ध आणि कृष्ण यांशिवाय बरींच इतर आराध्यदैवतें आह्मीं निर्माण केलीं आहेत, आणि त्या सर्वांपुढें आह्मी लवत आहों. एकाद्या पोरानेंहि उठावें आणि आमच्या वर्तनावर टीका करावी, एवढेंच आमच्या मनाची समता बिघडण्यास आणि आह्मांला दुःख होण्यास बस्स आहे. दुसऱ्याचे अभिप्राय आणि मतें यांनां आह्मी विशेष मान देतों, आणि त्यांची मर्जी संपादण्यांत आह्मी

* ता. ८ फेब्रुवारी १९०३ इसवी, रविवारीं दुपारीं झालेलें व्याख्यान.

बराच काल घालवितों. दुसऱ्यांकडून चांगलें ह्मणवून घेण्याची खटपट करणें हें सामाजिक आणि धार्मिक दृष्ट्या फार घातक आहे !

हिंदुस्तानांत एका खेडेगांवांत एक खुळा भोळसर मनुष्य होता. होळीच्या सणांत त्याची थट्टा करावी, ह्मणून गांवच्या कांहीं लोकांनीं त्याला गुंगी येईल इतकी दारू पाजविली, आणि त्याच्या एका अत्यंत विश्वासु मित्राकडे त्याला पाठवून दिलें. त्याला पाहतांच मित्रानें एकदम रडणें सुरू केलें आणि त्याला सांगितलें, कीं, "मी आतांच तुझ्या घराहून आलों, तुझी बायको विधवा झाली आहे." हें ऐकून तो भोळसर मनुष्यहि आपल्या पत्नीच्या वैधव्याबद्दल दुःख मानून रडूं लागला. आजूबाजूच्या लोकांनीं, कां रडतोस, असें त्याला विचारतांच तो भोळसर मनुष्य ह्मणाला "माझी बायको विधवा झाली, त्यामुळें मला दुःख होत आहे !" त्यावर ते लोक त्याला ह्मणाले "अरे, हें असें कसें होईल ? तूं जीवंत असतां तुझी बायको विधवा होईल तरी कशी ?" भोळा मनुष्य ह्मणाला "महाराज, आपण चालते व्हा; आपणांला कांहीं कळत नाहीं. माझ्या एका अत्यंत विश्वासु मित्रानें आतांच माझ्या घराहून माझ्या पत्नीच्या वैधव्याची बातमी आणिली आहे." ते लोक ह्मणाले, "पहा, किती भयंकर वेडेपणा हा !"

आपल्या पत्नीच्या वैधव्याचें दुःख मानल्याबद्दल या भोळसर मनुष्याला आह्मी हंसतों, पण जगांतील सर्व धर्म व पंथ, सर्व गर्विष्ठ आणि फ्याशनेबल लोक यासारखाच भयंकर वेडेपणा करीत आहेत. ते आपल्या नेत्रांनीं पाहत नाहींत आणि आपल्या मनांनीं विचार करीत नाहींत. अमर, अविनाशी, शुद्ध, पवित्र, सच्चिदानंद असा आत्मा तुमच्यामध्यें आहे, तरी तुह्मी इतर देवतांची करुणा भाकितां. आणि मला सुख केव्हां होईल, असें ह्मणून अश्रु ढाळीत असतां. फलाण्या साधूनें स्वतःला कृमिकीटक किंवा पापी असें ह्मणवून घेतलें आहे, ह्मणून तुह्मी स्वतःलाहि तसें समजतां, आणि अशा आत्मघाताला--नाशाला मुक्ति असें मानतां. बहुतेक लोक असेच वागत आहेत. पण हें कांहीं

चांगलें नव्हे. अशी घातुक तऱ्हा सोडून द्या. स्वतः आत्म्याला जाणा. तुह्मी लहान असा किंवा मोठे असा, उच्च असा किंवा नीच असा, स्वतःच्या पायावर उभे रहा. प्रत्येक गोष्टींचें स्वतः नीट निरीक्षण करा, ह्मणजे तुह्मी जगांत मोठे आहांत, असेंच तुमचा आत्मा तुह्मांला सांगेल. कांहीं लोक ह्मणतात, कीं, "वेदान्त, बुद्धधर्म 'तुह्मी पापी आहां, पतित आहां, कृमिकीटक आहां,' असा उपदेश करितात;" पण, तुमच्या अंतर्यामीं असलेला आत्मा तुह्मीं स्वतःला तसें कधींहि मानूं नये, असें सांगतो. तुमच्या ईश्वरत्वाचा साक्षात्कार घ्या.

गिरि खारीचा वाद जुंपला; खारीतें गिरि बोलुं लागलाः–
"क्षुद्र तूं परी डौल किती गे!" उत्तर देई तीही वेगेंः–
"प्रचंड होसी खरोखरी तूं, वर्षा व्हावें परि साही ऋतु;
मम स्थानाची क्षिति मज नाहीं, सगळें शोभे अपुल्या ठायीं;
ठावा तव गरिमा मज नाहीं, मम लघिमा परि नच तव देहीं;
चपलताहि तुज अणुभर नाहीं, गुणभेदाचा प्रभाव पाहीं;
मान्य असे मज कीं तूं होशी, व्यूह बिकटसा बहु आह्मांसी;
अटविभार तूं पृष्ठिं वहासी, फोडवे न परि कवची तुजसी!"

—इमर्सन.

तुमचा देह त्या खारीप्रमाणें लहान असेल आणि दुसऱ्याचा देह त्या गिरीप्रमाणें मोठा असेल. स्वतःला क्षुद्र असें समजूं नका. त्या खारीप्रमाणें शहाणे व्हा. तुमच्या लहान देहांचें जें कांहीं या जगांत कार्य आहे, तें मोठ्या देहांकडून होत नाहीं. याकरितां तुह्मीं स्वतःला कमी न लेखतां संतुष्ट रहा आणि सुखी व्हा.

एक गृहस्थ 'रामा'पाशीं आला, आणि आपला वरिष्ठ अम्मलदार नेहमीं आपणाला फार वाईट रीतीनें वागवितो, अशी तक्रार सांगूं लागला. तेव्हां, तूं स्वतःला कमी लेखतोस, ह्मणून तो तुला तशा रीतीनें वागवीत आहे, असें 'रामा'नें त्याला सांगितलें. स्वतःला आह्मी जर मान देऊं, तर दुसरेहि आह्मांला मान देतील. एकाद्या पुस्तकाची किंमत

आह्मीं जर एकच रुपया ठेविली, तर दोन रुपये देऊन तें पुस्तक कोण घेईल? तसेंच तुह्मी स्वतःची किंमत जितकी ठरवाल, त्याहून अधिक मान दुसरा कोणीहि देणार नाहीं. तुह्मी स्वतःची अतिशय मोठी किंमत ठरवा, स्वतःला मोठा मान द्या, आपण ईश्वर आहों असें माना, ह्मणजे दुसरेहि तुह्मांला तसें मानतील. श्रद्धेनें मनुष्य तरतो, असें लोक ह्मणतात. पण बाह्य वस्तूंवर श्रद्धा ठेविल्यास तुह्मी तरणार नाहीं. स्वतःच्या ईश्वरत्वावर—आत्म्यावर विश्वास ठेवाल, तर तुह्मी तराल. वर सांगितलेल्या गृहस्थानें 'रामा'च्या सांगण्याप्रमाणें, आपण ईश्वर आहों असें मानण्याचें आणि त्याप्रमाणें साक्षात्कार घेण्याचें—प्रार्थना करण्याचें सुरू केलें. तोंडानें नुसतीं स्तोत्रें ह्मणणें, ह्मणजे प्रार्थना नव्हे; आपण ईश्वर आहों असें मानणें, आणि तसा साक्षात्कार घेणें, हीच खरी प्रार्थना. अशा रीतीनें त्यानें कांहीं काल अभ्यास केल्यानंतर त्याचा वरिष्ठ अंमलदार त्याला मान देऊं लागला आणि चांगल्या रीतीनें वागवूं लागला. एके दिवशीं तो अंमलदार कांहीं कारणामुळें खिन्न होऊन त्याच्याकडे आला असतां त्यानें त्याला मोठ्या गमतीनें आणि आनंदानें सांगितलें, कीं, "महाराज, आपला पगार माझ्या पगाराहून मोठा आहे; आणि माझ्या हातून होत नाहीं असें काम आपण करीत आहां, हें खरें आहे. यास्तव मला तुमची आवश्यकता आहे. पण माझीहि तुह्माला तशीच आवश्यकता आहे. मी किंवा माझ्याऐवजीं दुसरा कोणी कां होईना, तो तुह्माला पाहिजेच. माझ्या जागीं कोणीतरी तुह्माला हवा होता, ह्मणूनच तुह्मीं मला बोलावणें पाठविलेंत, आणि मलाहि कांहीं गरज असल्यामुळें मींहि आपली नोकरी पतकरिली. वस्तुतः मी आपला नोकर नसून मी माझ्या गरजांचा—माझाच नोकर आहें. मी कोणाचीहि हांजी-हांजी करणार नाहीं!" अशा रीतीनें, अशा तोऱ्यानें नोकरी करणें हेंच योग्य आहे. याप्रमाणें पहातां या जगांत कोणी कोणावर अवलंबून नाहीं. जो तो आपल्या गरजांचा, स्वतःचा चाकर आहे. बाह्यतः आह्मी जरी पराधीन दिसलों, तरी वस्तुतः आह्मी स्वतःचेच दास असतों.

हें तत्त्व जाणून तुह्मी मुक्त कां होत नाहीं ? एकाद्या देवावर, किंवा ख्रिस्त, महंमद, बुद्ध, कृष्ण इत्यादि महात्म्यांवर तुह्मीं आपली भिस्त कां ठेवावी ? प्रत्येकजण स्वतंत्र आहे–मुक्त आहे. ही मुक्तीची कल्पना तुह्मीं नीट अवगत करून घेतलीत, ह्मणजे तुह्मांला सुख होईल.

पूर्वी आशिया खंडांत एक राजा होता. लोकांनीं त्याला मुजरा केला नाहीं, तर तो फार संतापत असे. एका निस्पृह साधूनें मुजरा न केल्याबद्दल कैद करून तो त्याला ह्मणाला "तूं फार मगरूर आहेस, माझी सत्ता तुला माहीत नाहीं ? मी तुला ठार करून टाकीन." साधूनें त्याचा धिक्कार करून ह्मटलें "हे राजा, तूं मूर्ख आहेस ! मला ठार करण्याची शक्ति तुझ्या अंगीं नाहीं. मी माझा धनी आहें. तुझा अवमान करून माझा देह सुळावर चढविणें हें माझ्याच हातीं आहे. माझी सत्ता पहिली आहे." याप्रमाणें, तुह्मी, आपण आपले धनी आहों असें माना, स्वतःच्या दृष्टीनें पहा, आपण समर्थ, ईश्वर आहों, स्वतंत्र--मुक्त आहों असा अनुभव घ्या.

आपण कोण आहों याचें चांगलें ज्ञान नसल्यामुळें, आपलें खरें स्वरूप माहीत नसल्यानें लोकांनां दुःख होतें. जोंपर्यंत अज्ञान आहे, आह्मांला आमच्या खऱ्या स्वरूपाची ओळख पटली नाहीं, तोंपर्यंत आह्मांला दुःख होणार. अज्ञानाचा नाश व दुःखाचें निवारण कसें करावें ? अज्ञान अंधकाराप्रमाणें आहे. एकाद्या अंधेऱ्या खोलींत चोहों बाजूंनीं धोंडे फेंकले, मारे सोट्याचे तडाखे दिले, तावदानें फोडिलीं, टेबलें आपटलीं, सामान इकडचें तिकडे हलविलें आणि खोलींतील मंडळींनां एकसारखें शिव्याशाप देत सुटलें, तर अंधार कांहीं नाहींसा होणार नाहीं. दिवा आंत आणा आणि मग अंधार कोठें आहे ? त्याप्रमाणें या जगांत तुह्मीं कितीहि संपत्ति मिळविली, कितीहि मोठ्या आणि सुंदर हवेल्या बांधल्या, जमीनजुमला कितीहि संपादन केला, तरी जोंपर्यंत तुमच्या खोलींत, तुमच्या अंतःकरणांत ज्ञानदीप पेटला नाहीं, तोंपर्यंत अज्ञान नाहींसें होणार नाहीं, आणि तुमच्या दुःखाचें निवारणहि पण होणार नाहीं.

पूर्वी, हिमालयाच्या एका भागांत कांहीं रानटी लोकांची वस्ती होती. त्यांनां विस्तवाची कल्पना नसून ते लोक वाळलेले मासे, फळें इत्यादिकांवर आपला उदरनिर्वाह करीत असत. त्यांच्या वस्तीपाशीं एक मोठी गुहा होती, व त्या गुहेंत त्यांचे कांहीं पूर्वज गडप झालेले होते. तेथेंच ते रहात असावेत, असें त्यांनां वाटल्यामुळें त्या गुहेविषयीं त्यांनां फार आदर वाटत असे. पण, गुहेंत अतिशय अंधार असल्यामुळें आंत जाण्याला त्यांनां भय वाटे. गुहेंत अंधकाररूपी राक्षस बसला आहे अशी त्यांची समजूत झाली, आणि त्या राक्षसाला कसा मारावा, याविषयीं त्यांनां मोठी काळजी पडली. त्या लोकांतील कांहीं शहाण्यांनीं सुचतील तितके उपाय सुचविले. त्यांपैकीं मुख्य असे होते:—१ अंधकार-राक्षसाशीं युद्ध करून त्याला ठार करावें; २ त्याला शरण जाऊन त्याची प्रार्थना करावी; ३ सर्वांनीं उपवास करावा; ४ दानधर्म करावा इत्यादि. याप्रमाणें त्यांनीं पुष्कळ प्रयत्न करून पाहिले; पण त्यांची डाळ कांहीं शिजेना. इतक्यांत तेथें एक दुसरा मनुष्य आला. त्यानें आपण कांहीं उपायानें राक्षसाला पळवितों असें सांगितलें; आणि त्यानें बांबूच्या लांब काठ्या, फाटके कपडे, चिंध्या आणवून दिवट्या तयार केल्या, आणि गारगोटी व चकमक यांच्या आघातानें विस्तव करून दिवट्या पेठविल्या. प्रथम विस्तव पाहतांच, हें काय आहे असें त्या लोकांनां आश्चर्य वाटलें, आणि ते ह्मणाले "आमच्या शहाण्यांनीं सुचविलेले सर्व उपाय आह्मीं करून पाहिले, आतां तुमच्या या उपायानें यश येईल असें आह्मांला वाटत नाहीं." त्यावर तो मनुष्य ह्मणाला "बाबांनों, मी सांगतों तसें करून तरी पहा, आणि नंतर बोला. या दिवट्या घेऊन आंत घुसा, ह्मणजे राक्षस एकदम पळून जाईल; आणि जर कदाचित् राक्षस तुमच्या दृष्टीला पडलाच, तर त्याचे कान धरून त्याला येथें आणा."

यावर पुष्कळांचा विश्वास बसेना. त्यांच्यापैकीं जे कोणी धीट होते, त्यांनीं दिवट्या घेऊन गुहेंत जाण्याचें कबूल केलें, आणि ते त्याप्रमाणें गुहेंत गेले; तों काय चमत्कार! राक्षस कोठेंच दिसला नाहीं. त्यांनीं

गुहेचे कोनेकोपरे, फटी, छिद्रें, सर्व भाग तपासून पाहिले. दिवट्या पाहतांच अंधकारराक्षसानें तेथून यःपलायन केलें. त्याप्रमाणेंच अज्ञान हें आमच्या अंतःकरणरूपी गुहेंतील अंधकारराक्षस आहे, व तें भीति आणि दुःख उत्पन्न करीत आहे. सर्व चिंता, काळजी, दुःख हें सर्व आमच्या आंतच असतें, बाहेर किमपि नसतें. तुह्मांला कोणीं कांहीं शिव्या दिल्या किंवा वाईट बोलले, तर त्याचा तुह्मीं स्वीकार करून त्याला आंत घेतलें ह्मणजे तुह्मांला त्यापासून दुःख होतें, व तुह्मीं त्याचा स्वीकार नाहीं केल्यास तुह्मांला त्यापासून यत्किंचित्‌हि त्रास होत नाहीं. रस्त्यावरून जात असतां पुष्कळ लोक 'रामा'विरुद्ध उद्गार काढीत असतात; पण 'राम' त्यांकडे बिलकूल लक्ष्य देत नाहीं, आणि 'रामा'वर त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं. वेदान्ताप्रमाणें स्थितप्रज्ञ मनुष्याच्या मनाची शांति कशानेंहि बिघडत नाहीं. जे तुमच्याविषयीं वाईट बोलतात किंवा तुमची जे निंदा करतात, त्यांची तुह्मी कींव करा; पण स्वतःला हीन, दीन किंवा पतित असे लेखूं नका. आपलें ईश्वरत्व—आपला आत्मा जाणा. आत्म्याचें—ईश्वराचें निरंतर ध्यान करा. आत्मज्ञानाशिवाय इतर सर्व कांहीं अज्ञान आहे, पूर्ण अंधकार आहे.

तुह्मीं स्वतः आंतील अंधार—अंतःकरणांतील अज्ञान नाहींसें करण्याचें मनांत आणिल्याशिवाय, तेहतीस कोटी ख्रिस्त या जगांत अवतीर्ण झाले तरी तुह्मांला कांहीं फायदा होणार नाहीं. दुसऱ्यावर अवलंबून राहूं नका. विशिष्ट चर्च किंवा संस्था यांत सामील होणें, ख्रिस्त, कृष्ण किंवा इतर आराध्यदेवता यांनां भजणें, यापासून कांहीं चांगलें निष्पन्न व्हावयाचें नाहीं. हवा तर या सर्व पद्धतींचा अनुभव घेऊन पहा. उपाय एकच आहे, दुसरा नाहीं. तो उपाय ह्मटला ह्मणजे, प्रकाश —खरें ज्ञान, आपल्या ईश्वरत्वाविषयीं खरी श्रद्धा हाच होय. कुलीन स्त्रिया आणि सभ्य गृहस्थ यांच्या स्वरूपांत असलेल्या माझ्या आत्म्यांनों, प्रकाश किंवा ज्ञान, ह्मणजे सत्याचा इतका अनुभव घेणें, कीं, बाह्य नामरूपें आमच्या वांट्याला नाहींशीं व्हावीं, किंवा आंतील आत्मवस्तु

दाखविण्याइतकीं पारदर्शक बनावीं. साक्षात्कारी किंवा अनुभवी मनुष्य क्षुद्र देह किंवा अहंकार यांकडे बिलकूल पाहत नाहीं. देह किंवा अहंकार ह्मणजे अज्ञान किंवा भ्रम होय असें त्याला वाटतें. आत्म्या-शिवाय--ईश्वराशिवाय दुसरें कांहीं त्याला दिसत नाहीं. सत्य—आत्मा किंवा ईश्वर सर्वत्र पाहणें, ह्मणजे अज्ञान नाहींसें करणें, आणि भीति, चिंता यांपासून मुक्त होणें होय.

माझ्या प्रिय आत्म्यांनों, ईश्वरांनों, शत्रुमित्र असे वाटणारे सर्व लोक माझेच आत्मे आहेत. बाह्य रूपांकडेच तुह्मी पाहूं नका, तुमची दृष्टि आंत वळवा. सर्व शरीरांत, तसेंच आपल्याहि शरीरांत ईश्वराचा साक्षात्कार घेणें, ईश्वर व आपण एक आहों असा अनुभव घेणें, याचें नांव ज्ञान. आत्मा ह्मणजे ईश्वर, व तो सर्व ठिकाणीं भरलेला आहे असा प्रत्यय घ्या, ह्मणजे सर्व अडचणी, सर्व चिंता नाहींशा होतात, आनंदीआनंद होतो व नंतर त्या स्थितीचें वर्णन करवत नाहीं. तुह्मांला या स्थितीची उत्कट जिज्ञासा झाली, ह्मणजे ती तुह्मांला प्राप्त होते.

ज्योतिषशास्त्रांतील गणितें करितांना, निरनिराळ्या ताऱ्यांमधील अंतर मोजतांना, आंकडे इतके कांहीं वाढतात, कीं, आमची पृथ्वी ह्मणजे एक बिंदु, शून्य आहे असें समजावें लागतें. त्याप्रमाणें तुह्मी सत्याचा—आपण सूर्याचा सूर्य, प्रकाशाचा प्रकाश आहों—देवांचा देव आहों, असा अनुभव घेऊं लागलां, ह्मणजे हे सर्व तारे, आकाशगंगा इत्यादि शून्यवत् होतात. असें झाल्यानंतर या जगांतील बागुलबोवा-( सुख--दुःखें ) तुह्मांला काय करणार—तो कसा भेडसाविणार ?

सत्याचा अनुभव घ्या, सत्य आचरणांत आणा, सर्वांगांत तें भिनवा, ह्मणजे तुह्मांला कोणीहि हलवूं शकणार नाहीं. **'यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणाऽपि विचाल्यते.'** हजारों सूर्यांचा किंवा चंद्राचा नाश होऊंद्या, ज्ञानी किंवा साक्षात्कारी मनुष्य यत्किंचित्हि न डगमगतां खडका-प्रमाणें अचल राहील. त्याला दुःख किंवा त्रास कशानेंहि होणार नाहीं.

पण, सर्वांत मोठें आश्चर्य हें, कीं, असा तुमचा आत्मा देदीप्यमान, अनंत, आनंदघन असून तुह्मी त्याच्याकडे दुर्लक्ष्य करितां. तुमच्या नेत्रांवरील आवरणानें--अज्ञानानें आत्मरवि झांकला जातो; यास्तव दुबळें करून सोडणाऱ्या या अज्ञानाला दूर सारा, आणि आपण सूर्याचा सूर्य, प्रकाशाचा प्रकाश आहों याचा अनुभव घ्या. तुह्मी असा अनुभव घेऊं लागलां, म्हणजे सर्व कांहीं सरळ आणि सुरळीत होतें.

सपाट जमिनीवर उभें राहून पाहिलें असतां, कांहीं घरें इतर घरांहून फार उंच दिसतात, कांहीं वृक्ष व रस्ते इतर वृक्षांहून व रस्त्यांहून लहान दिसतात. पण, आह्मी एकाद्या उंच टेंकडीवर जाऊन याच वस्तूंकडे पाहूं लागलों, तर त्यांचा पूर्वीं दिसणारा उच्चनीचभाव नाहींसा होतो, आणि सर्व वस्तु सारख्याच दिसतात. त्याप्रमाणें आध्यात्मिक वैभवाच्या शिखरावर आह्मी चढूं लागलों, सत्याचा--आत्म्याचा अनुभव घेऊं लागलों, ह्मणजे शत्रुमित्र, हितकर्ता अहितकर्ता इत्यादि भेदभाव मावळूं लागतात; आणि या भेदभावामुळें उत्पन्न होणाऱ्या चिंता, भीति, काळजी, त्रास हे नाहींसे होऊं लागतात. भेदभाव नष्ट झाले, ह्मणजे सत्याची पूर्ण प्रचीति येते. आत्मा किंवा ब्रह्म हेंच काय तें सत्य, व इतर सर्व मिथ्या, असें वाटूं लागतें.

मातृहत्या, मनुष्यहत्या इत्यादि अनेक गुन्हे किंवा पातकें आहेत. प्रत्येकामध्यें असलेलें ईश्वरीतत्त्व जर आह्मीं ओळखिलें नाहीं, तर आमच्या हातून ईशवध किंवा आत्मवध होतो. जेव्हां एकाद्याला आह्मी बाप, बंधु, पुत्र, शत्रु, मित्र असें ह्मणतों, त्याच्यामधील ईश्वराला जाणत नाहीं, त्याच्या देहाकडेच विशेष लक्ष्य देऊन त्याच्यामधील ईश्वराला विसरतों, तेव्हां आह्मांला ईशहत्येचें पातक लागतें. ईशहत्या हेंच मोठें अज्ञान आहे, आणि तेंच जगांतील सर्व दुःखांचें कारण आहे. लोकांनीं या सत्याचा--प्रत्येकामधील ईश्वराचा अनुभव घेतला नाहीं, तर तें स्वप्नवत् होऊन जाईल. सत्याचा अनुभव घ्या आणि सुखी व्हा. ह्मणजे, तुह्मांला

अनेक चमत्कार दिसून येतील. सूर्य, चंद्र, तारे इत्यादि सर्व तुमचे हुकूम पाळतील. नेटानें प्रयोग करून पहा ह्मणजे समजेल. जो सर्वांशीं आपलें ऐक्य अनुभवितो, सर्वत्र ईश्वर पाहतो, तो खरा सुखी, धन्य होय !

ज्याप्रमाणें गुहेंत शतकानुशतकें दडलेला अंधकार दिवा आणितांच नाहींसा होतो, त्याप्रमाणें मनुष्याच्या अंतःकरणांत आत्मज्ञानाचा दिवा पेटतांच जन्मापासूनचे सर्व दोष नाहींसे होतात, अशा अर्थाचा एक श्लोक संस्कृतांत आहे.

याविषयीं 'रामा'चा स्वतःचा अनुभव असा आहे, कीं, 'रामा'समोर आलेल्या मनुष्यांत 'राम' जेव्हां ईश्वर पाहतो, तेव्हां 'रामा'ला दुःखं होत नाहीं; पण, जेव्हां 'राम' त्या मनुष्याचा देह किंवा व्यक्ति यांकडेच लक्ष्य देतो, तेव्हां 'रामा'ला दुःख होतें. अशा तऱ्हेच्या पुष्कळ ठेंचा खाऊन दोन्ही तऱ्हेचे अनुभव मिळवून 'राम' आतां इतका शहाणा झाला आहे, कीं, 'रामा'ला आतां स्वप्नांत देखील कोणीहि ईश्वराव्यतिरिक्त दिसणें संभवनीय नाहीं. हे सर्व देह माझेच आहेत. तुमच्यामध्यें माझा आत्मा—ईश्वर आहे असें 'रामा'नें पाहिलें, ह्मणजे तुह्मांलाहि त्याप्रमाणें वाटलें पाहिजे.

मजनून नांवाच्या एका राजपुत्राला फारशी कवींनीं यारश्रेष्ठ अशी पदवी दिलेली आहे. त्याच्यासारखें प्रेम दुसऱ्या कोणींहि केलें नसेल. पण, त्याचें प्रेम आपल्या प्रियेवर—लैलीच्या देहावर होतें. लैली दृष्टीला न पडल्यामुळें मजनून वेडा होऊन गेला आणि अरण्यांत भटकूं लागला. सुरू, गुलाब, हरिण इत्यादिकांनां आपली प्रिया मानून तो यांनां आलिंगन देण्याकरितां धांवूं लागला. आपला पुत्र वेडा झाला आहे, असें ऐकून राजा त्याच्या शोधार्थ वनांत गेला, आणि पाहूं लागला, तों आपला पुत्र एका ठिकाणीं निश्चेष्ट पडलेला आहे, असें त्याला आढळून आलें. मग राजानें त्याला शुद्धीवर आणून विचारिलें "बेटा, तूं मला ओळखतोस का ? मी तुझा बाप आहें." मजनून शून्य-

दृष्टीनें आपल्या बापाकडे पाहूं लागला, आणि ह्मणाला "बाप ह्मणजे काय ?" त्याला त्याच्या प्रियेशिवाय दुसरें कांहींच दिसत नव्हतें. मजनूनला ज्याप्रमाणें आपल्या प्रियेशिवाय दुसरें कांहीं दिसत नव्हतें, त्याप्रमाणें, आईबाप, इष्टमित्र, बंधुभगिनी पतिपत्नी इत्यादि सर्वांमध्यें ईश्वराव्यतिरिक्त दुसरें कांहीं न दिसणें हा साक्षात्कार होय. जेव्हां तुह्मांला सर्वत्र ईश्वर दिसतो, तेव्हां तुह्मीहि ईश्वर होतां.

मजनून जीवंत असेतोंपर्यंत त्याची प्रिया त्याच्या दृष्टीला पडली नाहीं. फारशी कवि असें सांगतो, कीं, पुढें मजनूनच्या मृत्यूनंतर त्याला ईश्वरासमोर नेण्यांत आलें. ईश्वरानें त्याला ह्मटलें "हे मूर्खा, तूं देहावर —जड वस्तूवर इतकें प्रेम कां केलेंस ? तूं तुझ्या प्रियेवर केलेल्या प्रेमाच्या एक लक्षांश प्रेम जरी माझ्यावर केलें असतेंस, तर मीं तुला इंद्रपद खचित दिलें असतें." मजनूननें उत्तर दिलें "महाराज, माफ करा, मीं आपल्यावर प्रेम करावें असें जर आपणाला वाटत होतें, तर आपण माझी प्रिया—लैली होऊन कां आलां नाहींत ?" प्रेमाविषयींच्या कोटिक्रमांत मजनून ईश्वरालाहि हार गेला नाहीं ! सत्याविषयीं—आत्म्याविषयीं आमचें प्रेम मजनूनप्रमाणें अत्युत्कट असावें.

हें असें प्रेम किंवा साक्षात्कार घेऊन आह्मांला काय करावयाचें आहे ? आह्मी आमच्या तुरुंगांत—संसारांत सुखी आहों, आमचें सर्व कांहीं ठीक चाललें आहे, असें तुह्मी ह्मणाल; पण 'रामा'चें ह्मणणें असें आहे, कीं, तुह्मी कदाचित् सुखी असाल; परंतु, अत्युत्कट प्रेम—साक्षात्कार हें तुमचें ध्येय आहे, आणि त्या ध्येयाकडे तुह्मांला गेलें पाहिजे. तर मग, आगगाड्या, विजेच्या गाड्या आणि विमानें यांत बसून तुह्मीं तेथें कां जाऊं नये ? पायपिटी करीत, रस्त्यावरील धूळ खात, आपला वेळ दवडीत जाण्यांत काय फायदा आहे ? तुह्मीं ध्येयाकडे लवकर जावें अशी निसर्गाची योजना तुमच्या नेहमींच्या परिस्थितींत आढळून येत नाहीं काय ? जेव्हां एकादा मनुष्य गंभीर, शांत व स्वस्थ असतो, तेव्हां त्याचें कांहीं तरी चांगलें होतें; त्याला कांहीं तरी चांगली बातमी

कळते, किंवा इष्ट असा फेरफार घडून येतो. या यशानें जर तो मनुष्य फुगून गेला, आणि याचें त्याला अतिशय महत्त्व वाटूं लागलें, कीं, त्याच्या परिस्थितींत पुनः फेरबदल होतो, आणि जो कांहीं फायदा झालेला असतो, तो नाहींसा होतो. कायदा असा आहे. या कायद्याचें कोणत्याहि ग्रंथांत विवेचन केलेलें नाहीं, तरी तो अबाधित आहे. एकादी वस्तु आमच्या अंतःकरणांत भरली, आमची त्या वस्तूवर आसक्ति जडली, ह्मणजे कांहीं कालानें ती आमच्याकडून हिरावून घेतली जाते, आणि त्यामुळें आह्मांला दुःख होतें. ही स्थिति प्राप्त झाल्यानंतर आमच्यापैकीं कांहींजण परिस्थितीला दोष देऊन तिच्याशीं भांडूं लागतात. तेव्हां त्यांच्यावर अधिक कठिण प्रसंग येऊं लागतात; आणि नंतर ते ह्मणतात "अहो, संकटें एकटीं दुकटीं न येतां मिळून येतात!" याप्रमाणें कांहीं काल दुःख भोगल्यावर निरिच्छता, ईश्वरशरणागति, मनाची समता किंवा शांति प्राप्त होते; आणि परिस्थिति निरभ्र व अनुकूल होऊं लागते. पुनः त्यांची समता बिघडते आणि पुनः विपत्ति येऊं लागतात. याप्रमाणें विपत्ति आह्मांला धर्माकडे—आमच्या ध्येयाकडे नेतात.

याप्रमाणें आमच्या आयुष्यांत 'दिवसानंतर रात्र, रात्रीनंतर दिवस' या न्यायानें सुखदुःखांचें हें रहाटगाडगें एकसारखें चालूच आहे. जोंपर्यंत बाह्य नामरूपांवर आमची आसक्ति आहे, तोंपर्यंत हें सुखदुःखांचें रहाटगाडगें आमच्यामागें आहे. आमच्या अंतर्यामीं असलेल्या आत्मरवीचा साक्षात्कार करून देणें हाच या सुखदुःखांचा उद्देश आहे. पृथ्वीवर दिवस आणि रात्र हीं आहेत, पण सूर्यावर रात्र नाहीं; तिकडे सर्वदां प्रकाश, दिवसच आहे.

आतां सुखदुःखें आत्मरवीचा साक्षात्कार कशीं करून देतात, हें आपण पाहूं. प्रथम जेव्हां आह्मांला सुख झालें, तेव्हां आह्मी स्वस्थ, शांत ह्मणजे आत्मरूपीं लीन होतों. आत्मस्वरूपांत—ईशस्वरूपांत आह्मी मग्न

झालें, ह्मणजे आह्मांला सर्व सुखें प्राप्त होतात. तसेंच जड ऐहिक-मायिक नामरूपांवर आमची आसक्ति जडली असतां आमच्यावर विपत्ति येतात व आह्मांला त्रास होतो. हा धडा आह्मांला दुःखापासून मिळतो. जडवस्त नामरूपें क्षणभंगुर आहेत, त्यांवर आह्मीं आसक्ति ठेवूं नये, असा इषारा दुःखें आह्मांला देतात. जगाच्या इतिहासांत अशा तऱ्हेचीं पुष्कळ उदाहरणें तुह्मांला आढळतील. शेक्सपिअरच्या 'व्हेनिसचा व्यापारी' ( Merchant of Venice ) या नाटकांत, जोंपर्यंत पोर्शिएच्या देहावर अॅन्टोनिओची आसक्ति होती, तोंपर्यंत त्याला सुख झालें नाहीं. पण, पुढें करंड्यांची निवड करितांना तो एका अवर्णनीय स्थितींत शांत, स्वस्थ असा होता, आणि तेव्हांच त्याला सुख झालें. निसर्गाशीं–आत्म्याशीं आपलें ऐक्य झालें असें सर्व सुखें सांगतात. ऐहिक, मायावी वस्तूंवर आसक्ति ठेवूं नये, सर्व वस्तूंमध्यें असलेल्या ईश्वरीतत्त्वाला विसरूं नये, अशी अकरणरूप बाजू दुःखें शिकवितात. सुखदुःखें वेदान्त शिकवितात. कांहीं लोकांचा या तत्त्वावर विश्वास नसला ह्मणून काय झालें? खरोखर, या तत्त्वाचा लोक अनुभव घेत नाहींत, ह्मणून ते दुःखी आहेत. तुह्मी अनुभव घ्या आणि सुखी व्हा.

हिंदुस्तानांत अमेरिकेइतकीं यंत्रें नाहींत. मातीचीं भांडीं करतांना प्रथम चिखल पायांनीं तुडवून त्याला आंतून एक आसरा देतात, आणि मग थोपटण्यानें थोपटून मातीला भांड्याचा आकार देतात. त्याप्रमाणें संसारांतील निरनिराळीं दुःखें, ह्मणजे बाह्य आघात होत, आणि सुखें ह्मणजे आंतील आसरा होय. या सुखदुःखांच्यायोगें आमचें शील बनत जातें. हीं सुखदुःखें आमच्या अंतर्यामीं असलेलें आत्मतत्त्व प्रगट करितात, आमच्यामधील ईश्वरीतत्त्वाचा विकास करितात. कांहींहि होवो, देह जावो अथवा राहो, आत्मा–ईश्वर आह्मांला जाणिलाच पाहिजे. हें जर तुह्मीं केलें नाहीं, तर आघातामागून आघात, दुःखांमागून दुःखें हीं तुमच्यावर येतील.हा प्रकार टाळावयाचा असेल, तर आत्म्याचा–ईश्वराचा साक्षात्कार करून घ्या. तुमचें ध्येय तें हेंच आहे.

आनंदनिधाना, रामा सौख्यघना । शुद्ध शांतिपूर्णा निर्विकल्पा !
आनंदासी नोहे भंग कशानेंहि । अवरोध तोहि मद्वृत्तीसी.
दास माझे, पक्षी नरसुरवृंद । माझा ब्रह्मानंद शब्दातीत.
येथें तेथें सर्व स्थळीं परिपूर्ण । 'कोठें' या शब्दा न थारा जेथें;
आतां नंतर मी सदा परिपूर्ण। 'कदा' या शब्दा न थारा जेथें—
हें, तें, आणि जें काय, त्यांचि व्यापियलीं । तें काय शब्दा—
पैलीकडे तें मी.
आदि मध्य अंत ऊर्ध्व मीच व्याप्त । 'कैसा' शब्दातीत एकचि मी.
एक पांच आणि शत सर्व अंक । संख्यातीत एक आणि सर्व.
प्रमेय प्रमाता प्रमाण ही दृष्टि । न लाभेचि पुष्टि सत्यत्वाची.
होतों आहें आणि सर्वदां असेन । अस्तिपणासी न सांपडे मी.
आनंदघन मी सत्यस्वरूप मी । जेथें नाहीं तो मी तूंहि नाहीं.

लोक जेव्हां 'रामा'कडे येतात आणि त्याच्या देहाला मान देतात, तेव्हां 'रामा'ला चीड येते. स्तुति, खुशामत किंवा संपत्ति यांपासून मिळणाऱ्या आनंदापेक्षां कितीतरी शेंकडोंपट आनंद 'रामा'च्या अंतर्यामीं आहे, आणि त्यामुळें संपत्ति, कीर्ति, ऐश्वर्य इत्यादिकांच्या द्वारीं आनंदाकरितां भीक मागत फिरण्याची 'रामा'ला कांहीं जरूरी नाहीं. 'रामा'च्या अंतर्यामीं अलोट आनंद आहे. अहो, आत्म्याचें श्रवण, मनन, निदिध्यासन करा, अनुभव घ्या, म्हणजे ऐहिक संपत्ति आणि कीर्ति यांच्यामागें लागण्याची आवश्यकता राहणार नाहीं.

हिंदुस्तानांत एका बाईला नऊ पुत्र होते. एके दिवशीं तिच्या घरावरून एक साधु जात असतां तिनें त्याला भिक्षा घातली, व त्यानें तत्काळ ' माई, अष्टपुत्री सौभाग्यवती भव ' (तुला आठ पुत्र होवोत) असा आशीर्वाद दिला. पण, त्या बाईला नऊ पुत्र असल्यामुळें तिला हा आशीर्वाद शापाप्रमाणें वाटला. यास्तव तिनें साधूपाशीं दुसरा आशीर्वाद मागितला. पुनरपि त्या साधूनें 'अष्टपुत्री भव' असाच आशीर्वाद दिला. तो ऐकून त्या बाईला वाईट वाटलें, आणि ती त्वेषानें

त्या साधूला बोलूं लागली. इतक्यांत आजूबाजूचे लोक जमले आणि चौकशीअंतीं त्यांनां असें कळलें, कीं, तंट्याचें मूळ साधूच्या आशीर्वादांत असून आशीर्वादाचा विचार करून पाहतां तो आशीर्वाद नसून शापच आहे. हें कळल्यावर लोकांनां फार आश्चर्य वाटलें. त्या बाईप्रमाणें 'रामा'-च्या अंतर्यामीं अलोट--अपरंपार आनंद आहे. कोणत्याहि ऐहिक वस्तूंवर तुह्मी अवलंबून न राहतां त्या आनंदाचा उपभोग घेऊन मुक्त व्हा.

हिमालय पर्वतावरील कमळाप्रमाणें देह नकळत, कोणाच्या दृष्टीला न पडतां—कोणाकडून प्रतिष्ठा न मिळवितां वाढो; तो सुळावर चढो किंवा तुरुंगांत जावो; समुद्राला अर्पण होवो अथवा सूर्याच्या प्रखर उष्णतेनें त्याचें भस्म होऊन जावो; रामाचा तो अपरंपार आनंद केव्हांहि कमी होणार नाहीं. अभिमान, मोह, औदासीन्य टाकून द्या आणि त्या आनंदाचा उपभोग घ्या. ईश्वरांचा ईश्वर, देवांचा देव व्हा. तत्त्वमसि !

## THE LAW OE LIFE ETERNAL.

## सनातन जीविताचा कायदा.*

'राम' कोणत्याहि मिशनचा नाहीं. सर्व कार्य ईश्वराचें आहे. बुद्ध, ख्रिस्त यांसारख्या महात्म्यांचीं उदाहरणें घेऊन आम्हांला काय करावयाचें आहे? परमेश्वराच्या कायद्याप्रमाणें, आम्हीं मनाचें अनुसंधान ठेवावें. बुद्ध आणि ख्रिस्त यांच्या अनुयायांनीं आणि मित्रांनीं त्यांनां सोडून दिलें. सात वर्षांच्या तपश्चर्येपैकीं, शेवटलीं दोन वर्षें बुद्धानें पूर्ण एकान्तांत काढिलीं, तेव्हां त्याला प्रकाश—ज्ञान मिळालें. त्यानंतर त्याचे पुष्कळ शिष्य होऊं लागले व बुद्धानें त्या सर्वांचा स्वीकार केला. संभावित उपदेशकांच्या मतांनीं आणि विचारांनीं वळले जाऊं नका. त्यांचा उपदेश परमेश्वरी कायद्याला अनुसरून असता, तर आजपर्यंत त्यांनीं अनेक बुद्ध निर्माण केले असते!

मधांत सांपडलेली माशी, नेटानें आणि निश्चयानें हळुहळू आपले पाय सोडवून घेते, त्याप्रमाणें व्यक्ति, नामरूपें यांवरील आसक्ति आह्मीं नाहींशी केली पाहिजे; एकामागून एक संबंध सुटून गेले पाहिजेत, सर्व बंधनें तोडून टाकिलीं पाहिजेत. शेवटीं मरणसमयीं आह्मांला सर्व कांहीं कष्टानें सोडिलें पाहिजे.

कायद्याचें निर्घृण चक्र एकसारखें फिरत आहे. जो कायद्याप्रमाणें आचरण करितो, तो त्या चक्रावर आरूढ होतो; पण, जो कायद्याविरुद्ध—परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध वागतो, तो त्या चक्राखालीं चिरडून जातो, आणि त्याला अतिशय असह्य वेदना सोसाव्या लागतात. हा कायदा ह्मणजे त्रिशूल आहे. तो अहंकाराला चिरून सोडतो. जो कोणी आपण होऊन अहंकाराला सुळावर चढवितो, त्याला हें जग नंदनवन होतें; इतर सर्वांनां तें नरकप्राय होतें. हा कायदा अग्नीसारखा आहे.

* यांतील भाग स्वामींनीं नारायणस्वामींनां पत्रांत लिहिलेला होता, आणि पुढें त्यांत फेरफार करून तो प्रसिद्ध करण्यांत आला होता.

तो सर्व स्नेह आणि आसक्ति जाळून टाकितो; सर्व दोष भस्म करून मनाला तो स्वच्छ करितो.

धर्माची व्याप्ति आहाराइतकी आवश्यक आणि सार्वत्रिक आहे. नास्तिकाला आपली पचनक्रियासुद्धां माहीत नसते. कायदा आह्मांला कोरडे लगावून जागें करितो, तरवारीच्या धारेवर आह्मांला धार्मिक करितो. कोणालाहि तो सोडीत नाहीं. कायदा एक सत्य आहे. बाकी सर्व मिथ्या आहे. सर्व नामरूपें सत्यसागरांतील—कायद्याच्या समुद्रांतील बुडबुडे आहेत. जें सदा असतें, तें सत्य होय. या जगामध्यें, नामरूपें, नातेंगोतें, संस्था, सभा हीं त्रिशूलाप्रमाणें—कायद्याप्रमाणें चिरस्थायि नाहींत.

भ्रमिष्ट आणि अदूरदर्शी लोक कायद्यापेक्षां बाह्य नामरूपांवर अधिक प्रेम कां करितात? त्यांनां अज्ञानामुळें नामरूपें चिरस्थायि वाटतात, आणि कायदा मेघाप्रमाणें चंचल वाटतो. 'कायदा ( त्रिशूल )—शिव ( त्रिशूली ) सत्य आहे; व्यक्ति, नामरूपें मिथ्या आहेत,' असा धडा निसर्गमाता संकटें, विपत्ति यांच्याद्वारें लोकांनां शिकविते. लोक जर हा धडा शिकतील, तर त्यांचें कल्याण होईल. आयुष्यांतील सुखकर व कठिण प्रसंग, सुखदुःखें हीं, आपल्या वैभवाकडे लोकांची दृष्टि लागावी, ह्मणून विहारजींनीं ( शिवांनीं ) धारण केलेलीं सोंगें आहेत.

शत्रुमित्रांच्या बाह्यरूपांवर जेव्हां आह्मी विश्वास ठेवितों, तेव्हां तीं रूपें आह्मांला दगा देतात आणि फसवितात. पण, 'त्यांचा हेतुच तसा आहे, त्यांचा स्वभाव वाईट आहे,' असें ह्मणून जेव्हां आह्मी उसनें फेडूं लागतों, तेव्हां आह्मी अधिकच घोंटाळा करितों. ईश्वराला जें सत्यत्व द्यावयाचें, तें चुकीनें शत्रुमित्रांच्या बाह्य आकृतींनां आह्मीं दिलें, ही आमची पहिली चूक. त्यानंतर, आह्मीं रागावणें, द्वेषानें सूड घेऊं पाहणें, ह्मणजे त्या चुकीला दृढ करणें आणि अधिक दुःखाला आमंत्रण देणें होय. सावध रहा. हा त्रिशूल ( पूर्ण त्याग, शिव ) आमचें ध्येय आहे. आणि हें ध्येय दगडापेक्षां घट्ट आणि कणखर आहे, ह्मणून शिव दगडी लिंगाच्या प्रतिमेनें चांगला दर्शविला जातो. विसराळू मनाला तो दगडा-

हूनहि जोरानें मान देऊन सावध करितो. त्याचें नेहमीं ध्यान करणें हें अत्यावश्यक आहे,

या कायद्याला किंवा ईश्वराला, मुसलमान आणि ख्रिस्ती लोक दक्ष* आणि रौद्र असें ह्मणतात, तें बरोबर आहे. या जगांतील कोणत्याहि वस्तूवर कोणीहि आपलें मन ठेवून पहावें, ह्मणजे लगेच त्याच्यावर ईश्वरी कोप होतो. हें सत्य लोकांनां लवकर कळत नाहीं, याचें कारण त्यांनां बरोबर निरीक्षण करितां येत नाहीं, हेंच आहे. कोणत्याहि गोष्टीमध्यें, त्या गोष्टीचें कारण पहावयाचें त्यांनां माहीत नसतें. शिवाय स्वतःच्या चुका त्यांनां दिसत नाहींत, आणि सर्व दोष ते दुसऱ्याच्या माथीं लादूं पहातात. आपल्या विचारांचा, मनोविकारांचा आणि त्यांच्या परिणामाचा, निरपेक्ष तिऱ्हाईतपणानें, साक्षी या नात्यानें त्यांनां विचार करितां येत नाहीं. नामरूपांवर आह्मीं विश्वास ठेविला, ईश्वराला जें सत्यत्व द्यावयाचें तें आह्मीं खोट्या वस्तु व व्यक्ति यांनां दिलें, ईश्वराच्याऐवजीं प्रतिमांनांच आह्मीं मान दिला, ह्मणजे आमचा दगा--नाश झालाच पाहिजे. अन्वय–व्यतिरेकानें अनात्मवस्तूंची अनित्यता सिद्ध होते.

पुष्कळदां, लोकांच्या वचनांवर ईश्वरापेक्षां अधिक श्रद्धा ठेवून त्यांनां आपल्या वचनांप्रमाणें वागूं न देण्याचें आह्मी कारण होत नाहीं काय ? कायदा विसरून मुलांच्या देहावरच विशेष प्रेम करून आम्ही त्यांचा नाश करीत नाहीं काय ? ईश्वरावर ठेवण्याची निष्ठा मित्रांवर ठेविल्यानें आम्ही त्यांनां बेइमानी करीत नाहीं काय ? पुष्कळदां आह्मी आमच्या गुरूंनां, आमच्यावर आणि त्यांच्यावर असलेल्या आमच्या श्रद्धेवर विश्वास ठेवावयाला लावून, त्यांच्या उच्च आध्यात्मिक स्थानावरून खालीं ओढून आणीत नाहीं काय ? बायकांवरच सारें अंतःकरण ठेविल्यामुळें आमच्या कुटुंबांत गृहकलह आणि तंटेबखेडे कितीतरी होत असतात ! ईश्वरापेक्षां दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीला अधिक महत्त्व द्याल तर तुमचें अंतकरण विदीर्ण होईल.

---

* घायर=मत्सरी, दक्ष Jealous. काहर=भयंकर, रौद्र Terrible.

सटरफटर उदाहरणें सोडून द्या. ज्यांनीं आपलीं अंतःकरणें, श्रीकृष्ण परमात्म्याच्या रूपावर लाविलीं होतीं, अशा गोपिकांचें उदाहरण पहा. त्यांनां आपल्या चुकीबद्दल रक्ताचे अश्रु ढाळावे लागले. पतिव्रताश्रेष्ठ सीतेनें आपल्या रामाचें रूप ( देह किंवा आकृति ) खरें मानिलें, आणि या चुकीचें तिला प्रायश्चित्त भोगावें लागलें. खऱ्या रामानें—अमूर्त रामानें —परमात्म्यानें तिला याबद्दल अरण्यांत सोडून दिलें.

ब्रह्म तं परादाद्योऽन्यत्रात्मनो ब्रह्म वेद
क्षत्रं तं परादाद्योऽन्यत्रात्मनो क्षत्रं वेद
लोकास्तं परादुर्योऽन्यत्रात्मनो लोकान्वेद
देवास्तं परादुर्योऽन्यत्रात्मनो देवान्वेद
भूतानि तं परादुर्योऽन्यत्रात्मनो भूतानि वेद
सर्वं तं परादुर्योऽन्यत्रात्मनो सर्वं वेद

इदं ब्रह्म, इदं क्षत्रं, इमे लोका, इमे देवा, इमानि भूतानि, इदं सर्वं, यदयमात्मा ॥ ६ ॥

—बृहदारण्यकोपनिषत्.

"आत्म्याशिवाय अन्य ठिकाणीं ब्राह्मणवर्गाला जो पाहतो, त्याला ब्राह्मणवर्ग सोडून देतो; आत्म्याशिवाय अन्य ठिकाणीं क्षत्रियवर्गाला जो पाहतो, त्याला क्षत्रियवर्ग सोडून देतो. आत्म्याशिवाय अन्य ठिकाणीं लोक, देव, भूतें व सर्व कांहीं जो पाहतो, त्याला लोक, देव, भूतें आणि सर्व कांहीं सोडून देतें. हा ब्राह्मणवर्ग, क्षत्रियवर्ग, हे लोक, हे देव, हीं भूतें, हें सर्व कांहीं हा आत्मा होय."

मोहक वस्तु, या श्रीकृष्णाच्या लहान गोजिरवाण्या मूर्तीप्रमाणें आहेत. मनोरूपी राक्षसानें त्या वस्तूंनां गट्ट केलें, ह्मणजे त्या वस्तु राक्षसाचें पोट फाडून टाकितात; आणि असें झालें, ह्मणजे लोक ह्मणतात, आमचा घात झाला, आमचें हृदय विदीर्ण झालें. पण तुह्मी नामरूपांला प्रथम कां भुललां? सत्यावरच प्रेम करा, ईश्वरालाच चिकटून रहा, ईश्वराचें ध्यान करा, ईश्वर व्हा. खरें जीवित तें हेंच. बाह्य नामरूपांचा त्याग

केल्याशिवाय तुह्मांला, सत्याची–खऱ्या प्रेमाची ओळख होणार नाहीं. बाबांनों! 'ला इलाह इल्लल्लाह' देव एक सत्य आहे, बाकी सर्व मिथ्या आहे. 'ईश्वराशिवाय दुसरें सत्य नाहीं,' याच तत्त्वाचा महम्मद, बुद्ध, ख्रिस्त आणि आमचे प्राचीन ऋषि यांनीं निरनिराळ्या शब्दांत उपदेश केलेला आहे. श्रोत्यांनां हा उपदेश जर अनुभवानें पटला नसता, किंवा सर्व युगांतील खऱ्या कळकळीच्या, ज्ञानी भक्तांनां याची सत्यता अनुभवानें दिसून आली नसती, तर हा उपदेश आजपर्यंत टिकला नसता.

त्यागाचा कायदा उग्र व सत्य आहे. हा लटका आभास नव्हे. महात्म्यांच्या आणि पुढाऱ्यांच्या काल्पनिक भ्रमानें, राष्ट्रांचीं राष्ट्रें फसलीं जाणार नाहींत, आणि विक्षिप्त धर्मवेड्यांच्या लहरीनें शतकांचीं शतकें झुललीं जाणार नाहींत.

लोकांनां आपल्या दुःखाचें खरें कारण–कायद्याबरहुकूम न वागणें, हें कळत नाहीं. यामुळें ते रोगाच्या बाह्य चिन्हांशीं–परिस्थितीशीं झगडूं लागतात. अंधुक स्वप्नें जशीं कोणी फारशीं लक्ष्यांत ठेवीत नाहींत, त्याप्रमाणें लोकांनीं केलेली निंदा किंवा स्तुति किंवा लोकांचें वर्तन विसरून टाका. स्वप्नें चांगलीं असतील, किंवा वाईट असतील; आह्मी त्यांच्याशीं भांडत बसत नाहीं. जठर तंग झाल्यामुळेंच कुस्वप्नें पडतात. यास्तव जठराकडेच आह्मांला लक्ष्य दिलें पाहिजे. याप्रमाणेंच आह्मांला भेटणाऱ्या वाईट किंवा चांगल्या लोकांचा विचार न करितां आह्मीं आपली आध्यात्मिक स्थिति सुधारावी. वरपांगी यशापयश तुमच्या आणि ईश्वराच्या आड येऊं नये. ज्यांची क्षमा केली असतां आह्मांला समाधान न वाटेल, असे मोठे दोष किंवा चुका मुळीं नाहींत.

ईश्वरापेक्षां अधिक महत्त्व दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीला देऊं नका. ईश्वरासारखें दुसऱ्या कशाला मानूं नका. प्रशंसा, टीका आणि रोग हे आत्म्याला लागू आहेत, असें मानिलें, तर ते फार घातक होतात. आपण ईश्वर आहों असें माना, आणि निजानंदाचीं गाणीं ह्मणा. रोग हे ईश्वराचे दूत आहेत, असें 'राम' मानितो. त्याप्रमाणें

प्रशंसा, टीका यांनां माना. वरिष्ठ सरकारच्या हुकुमानें रोग 'रामा'ला असें बजावितात, कीं, 'या घरांतून–देहभावनेंतून एकदम बाहेर नीघ !' दरबारांतील सिंहासनावर मी आरूढ झालों, कीं, रोग माझी आज्ञा पाळितात; पण, या खोपटांत–देहभावनेंत शिरलों, कीं, ते मला कोरडे मारतात, आणि भोंसकतात.

ज्या राष्ट्रांचे कायदे, या त्रिशूलाच्या कायद्याला अनुसरून नाहींत, तीं राष्ट्रें लवकरच राम ह्मणतात–विलयाला जातात. मारवाड्याप्रमाणें खासगी हक्कांचें स्तोम माजविणें–हें माझें आहे, तें माझें आहे, कायद्यानें तें मला दिलें आहे इत्यादि ह्मणणें, ह्मणजे खऱ्या कायद्याच्या विरुद्ध वागणें होय. खऱ्या कायद्याप्रमाणें एकच हक्क–परमात्मा आहे, आणि इतर दुसरे हक्क झूट आहेत. हा एकच हक्क किंवा तत्त्व दुसऱ्या कोणालाहि समजलें नाहीं, तरी निदान संन्याशानें तें आचरणांत आणावें.

हा कायदा सर्वव्यापी आहे. तो आत्मा–विश्वात्मा आहे. तो अहंकाराला मारून टाकितो. अहंकार मारून टाकणें हें निर्दय दिसतें खरें; पण या निर्दयपणांतच प्रेमाचें सार आहे. कारण, अहंकाराला मारल्यानेंच सनातन जीविताचें–खऱ्या आत्म्याचें पुनरुत्थान होतें. अहंकाराला उराशीं बाळगून आपल्याला परमात्म्याचे हक्क मिळावे ह्मणून जो यत्न करितो, तो अभिमानगिरीवर गिधाडांकडून फाडिला जातो–त्याचा नाश होतो. वेदान्तांतील मुक्ति ह्मणजे देहभावना, अहंकार यांचा त्रिशूलाच्या कायद्यापासून बचाव किंवा सुटका नव्हे. तसें समजणें ह्मणजे ईश्वरालाहि खालीं ओढणें–देवा(God) ला कुत्रा ( Dog ) बनविण्यासारखें आहे. या चुकीमुळेंच लाखों जीवांचा नाश होत आहे, आणि अनेक लोक नैराश्यवादांत शिरत आहेत. कायदा उलट केल्यामुळें क्षणोक्षणीं लाखों अंतःकरणें विदीर्ण होत आहेत. कायद्यापासून सुटका करून घ्यावयाची असेल, तर कायद्याप्रमाणें आचरण करा, कायदा बना, 'शिवोऽहं 'चा साक्षात्कार घ्या.

वस्तुस्थिति, आंकडे, नामरूपें यांवर विश्वास ठेवणारा मनुष्य इंद्रियांच्या नादीं लागतो, आणि फेंसावर आपली इमारत रचल्यामुळें शेवटीं नाश पावतो. पण, जो आपल्या अंतःकरणांत, '**ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या**' हा सिद्धान्त, हा कायदा सत्य मानितो, आणि त्याप्रमाणें वागतो, तो आपली इमारत खडकावर बांधितो.

> **पहा, ब्रह्मशक्ती असे पूर्ण सत्य,**
> **अणी सर्व कांहीं जगत् हें असत्य;**
> **मनीं वागवा कायदा हा जगास,**
> **'सुचैतन्यशक्ती' असें नाम यास.**

या देहाला लोक कांहींहि नांवें ठेवोत—देह गर्विष्ठ, स्वार्थी, प्रसंगाप्रमाणें वागणारा वगैरे काय वाटेल तें ह्मणोत, त्याला लाथ मारोत, त्याचा अवमान करोत किंवा त्याला ठार करोत, त्याची मला विश्वात्म्याला काय पर्वा !

> **असें मी खरा सत्य रे आनिवार,**
> **पहा मी असें कायदाही कठोर;**
> **मला जाणणें मानणें शब्द माझा,**
> **नसे भेद या दोन्हि कीं कर्मकाजा.**
> **जनीं जो पहा मानतो मद्वचाला,**
> **झणीं तो जगीं पोंचतो वैभवाला;**
> **जरी कोणिही जाइ माझ्याविरुद्ध,**
> **तरी चीड येई न, होई न क्रुद्ध.**
> **मला कोण केव्हां न लेखी जनीं रे,**
> **न चिंता कदापी न मानीं मनीं रे;**
> **तरी जाण कीं, जो उपेक्षी मला रे,**
> **करीं नाश त्याचा धिरें पूर्ण मी रे.**

ही शुष्क भीति नव्हे. तें भ्यासुर सत्य आहे. लोकांच्या मनोवृत्तींविषयीं आणि विचारांविषयीं जितका आह्मी आदर बाळगतों, तितका तरी

आदर सत्याविषयीं (कायद्याविषयीं–ईश्वराविषयीं) आह्मीं बाळगावा. ईश्वरी कायद्याशीं आह्मी एकनिष्ठपणें वागल्यानें, दुसऱ्या कोणाला दुःख झालें तर त्याबद्दल आह्मी जबाबदार नाहीं. कांहींहि होवो, कायदा आह्मीं मोडूं नये हेंच अतिशय महत्त्वाचें आहे. आमच्या मित्रांच्या आणि नातलगांच्या लहरीप्रमाणें, पण कायद्यांविरुद्ध आह्मी वागूं लागलों, तर आमचें व त्यांचें नुकसान होतें. त्यांच्यावर व आमच्यावर आह्मीं आपत्तींनां बोलावून आणितों. सत्याइतका, ईश्वराइतका जवळचा आप्त दुसरा कोणी नाहीं!

**वयं सोमव्रते तव मनस्तनुषु बिभ्रतः**

—यजुर्वेद.

"हे परमेश्वरा, तुझ्यासाठींच आह्मीं आमच्या शरीरांत मन ठेविलें आहे."

वैदिककालीं, कुमारिका अग्नीसभोंवतीं जमून बद्धांजलीनें हा श्लोक ह्मणत असतः--

**त्र्यंबकं यजामहे सुगंधिं पतिवेदनम् ।**
**उर्वारुकमिव बंधनादितो मुक्षीथ मामुतः ॥**

"सुगंधी, सर्वसाक्षी पतीला जाणणाऱ्या अशा परमात्म्याचें आह्मी यजन करितों. तूसापासून धान्याची जशी मोकळीक होते, तशी आमची येथून (पित्याच्या घरांतून) सुटका होवो, तेथून (पतीपासून) केव्हांहि न होवो."

प्राचीन आर्यकुमारिकांची ही प्रार्थना 'रामा'च्या' अंतःकरणांतून--बेंबीच्या देंठापासून निघत आहे, आणि त्या प्रार्थनेबरोबर अश्रुहि भराभर बाहेर पडत आहेत. हे ईश्वरा, हे कायद्या, हे सत्या! जर माझ्या डोक्यांत आणि हृदयांत तुझ्याशिवाय दुसरा विचार राहिला असेल, तर तूं तीं दोन्ही छेदून टाक! माझ्या धमन्यांत आणि शरीरांत तुझ्याशिवाय दुसरा विचार वहात असेल, तर माझें रक्त तत्काळ गोठून जावो!

अहं जानि गर्भं धमा
त्वमजासि गर्भधम् ।

"ज्याप्रमाणें स्त्री पुरुषापासून, त्याप्रमाणें मी तुझ्यापासून शिकेन. हे कायद्या, हे सत्या, मी तुझ्या अगदीं जवळ येईन, तुझ्या ओंठांतील आणि शरीरांतील रसाचें आकर्षण करीन. तुझ्यापासून गर्भ–( ज्ञान ) धारणा करून येईन."

'रामा'चें कायद्याशीं, त्रिशूलाशीं लग्न झालें नाहीं काय? आतां दुसरे संबंध, दुसरे विचार हे व्यभिचाराप्रमाणें नाहींत काय?

ही कांहीं अंधप्रेरणा नव्हे, किंवा दुसऱ्यांनां ठकविण्याची स्वार्थी पॉलिसी (मसलत, डावपेंच) नव्हे. खासगी संबंधाच्या, नात्याच्या संकुचित मर्यादेंत तुह्मी 'रामा'ला कां ओढूं पाहतां? त्या बिचाऱ्यानें असें काय केलें आहे? त्याला रिकामा सोडा, त्याचा नाद सोडा, तुमच्या कल्याणासाठीं त्याला निराळा सोडा, त्याला एकांतांत राहूंद्या. यांत तुमच्या देशाचें आणि मानवजातीचें कल्याण आहे. तुह्मीं त्याच्या शरीराची जोपासना केली नाहींत, तर तो एकान्तांत मरून जाईल, असें तुह्मांला वाटतें काय? छे, देव सत्य आहे, आणि ईश्वरी इच्छेप्रमाणें जीवित कंठण्यांत कांहींच त्रास नाहीं; आणि ईश्वराचें कार्य झालें नाहीं, तोंपर्यंत 'रामा'चा देह कधींहि पडणार नाहीं.

कोणत्याहि आध्यात्मिक व्रतांत व्यत्यय आणणें बरोबर नव्हे. आपण आणि आपलें ध्येय–प्रियकर ( परमात्मा ) यांमध्यें तो दुसऱ्या कोणाला–मृत्यूलाहि आड येऊं देणार नाहीं. इतिहासाच्या धर्मबाह्य–देवबाह्य वाचनापासून उत्पन्न झालेल्या कल्पनेप्रमाणें आपला जीवितक्रम कोणींहि ठरवूं नये. वरपांगी 'रामा'विषयीं–'रामा'च्या देहाविषयीं तुमचें प्रेम–तुमचा आदर आतां पुरे करा. खऱ्या रामाचा–विश्वात्म्याचा हा अपमान आहे. आतां दूर सरा. नामरूपांच्या स्वप्नांतून जागे व्हा. ईश्वरी कायद्याप्रमाणें वागून रामानें अग्निमांद्यविकाराला जसें घालवून दिलें, तसें देहभावना आणि अहंकार ( व्यक्तिभावना ) यांनां घालवून द्या. आत्मरवीचे किरण

पाहून विषयवासना जाळून टाका. आपलें अंतःकरण खऱ्या रामानें—
—आनंदरूपी परमात्म्यानें आकंठ भरून ठेवा, तेथें ऐहिक कामनांनां थारा देऊं नका. 'प्रियकरावांचून दुसरा कोणताहि विचार माझ्या हृदयांतून मला बाहेर घालवूं द्या.'

दुसऱ्या कोणत्याहि इंद्रियविषयाइतका तरी परमात्मा गोड नाहीं काय? काल्पनिक वस्तूप्रमाणें परमेश्वरावर प्रेम केलें असतां, त्याच्याकडून आपणांला प्रत्युत्तर मिळणार नाहीं, अशा शंकेनें लोक परमेश्वरावर प्रेम करण्याला कांकूं करितात—डळमळतात. ही शंका ह्मणजे निवळ अज्ञान होय. हे प्यार! त्याचें अंतःकरण तुझ्या अंतःकरणाबरोबर एक-समयावच्छेदेंकरून एकदम उचंबळतें.

शत्रुमित्रांच्या वागणुकीचें मर्म किंवा कारण, त्यांच्यामध्यें पाहूं नका. खरें कारण तुमच्यापाशीं, तुमच्या आत्म्यापाशींच असतें—याचा नीट विचार करा.

पक्ष्याचें पिलूं उडण्यास शिकत असतां, दगडावर किंवा झाडाच्या फांदीवर बसतें; पुनः लगेच तेथून उडून, दुसऱ्या तशाच आधारावर जाऊन बसतें. जमिनीवरील आधार सोडून उंच हवेंत त्याला उडतां येत नाहीं. त्याप्रमाणें, ब्रह्मविद्येंत--ज्ञानांत जो नवशिक्या असतो, तो कोणत्याना कोणत्यातरी एका वस्तूवर किंवा व्यक्तीवर आपला सर्व भार ठेवीत असतो. ऐहिक आधारावर अवलंबून राहण्याचें तो सोडून देत नाहीं. अनुभवी—ज्ञानी ऐहिक वस्तूच्या वैयर्थ्याला—दग्याला परमात्म-स्वरूपांत बुडी घेण्याचें साधन बनवितो. आपला प्रत्येक लहानसहान अनुभव परमात्मस्वरूपांत लीन होण्याचें निमित्त आहे, असें मानणें यांतच धर्माची कला—खुबी--खरा धर्म आहे. वर भिन्न दिसणाऱ्या वस्तु एकाच प्रकारच्या—एकाच तत्त्वाच्या असल्यामुळें, एका वस्तूचा त्याग करण्याचा प्रसंग आला, ह्मणजे सर्व वस्तूंचा मनानें त्याग केला पाहिजे, अशी ही निशाणी--इशारा आहे, असें ज्ञानी समजतो.

त्रिशूल--स्वार्थी अहंकाराचा नाश, हा कायदा आहे. हें सत्य आहे, हें जो जाणत नाहीं, तो अगदीं मठ्ठ डोक्याचा असला पाहिजे. त्रिशूल, व्यक्ति, अहंकार, नामरूपें यांनां झुगारून देतो. अहंकार झुगारून देणें ह्मणजे सनातन जीविताचें--आत्म्याचें पुनरुत्थान होय. सनातन जीविताचा अनुभव घ्या. सदैव रहा. नमस्कार !

# DEATH IN LIFE.

## देहविस्मृति.

'राम'नें जेव्हां लाहोर सोडिलें, त्या वेळीं तो विष्णुपुराणाचें फारशी भाषांतर वाचीत होता. विष्णुपुराण हा अद्वैत वेदान्तावरील एक अत्युत्तम ग्रंथ आहे. या ग्रंथाच्या फारशी भाषांतरावरून लॅटिन भाषेंत भाषांतर झालें होतें, आणि या लॅटिन भाषांतराचा उल्लेख इमर्सन, थोरो आणि त्यांच्यासारख्या विद्वान् गृहस्थांनीं आपल्या लेखांत केला आहे. या फारशी भाषांतरावरून पंजाबी भाषेंतहि विष्णुपुराण केलेलें आहे. पंजाबी विष्णुपुराणाचा आधार घेऊन, त्यांत सुधारणा करून काळी-कांबळीबोवांनीं 'अनुभवप्रकाश' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. काळी-कांबळीबोवांची अंतःस्थिति कशी होती, आध्यात्मिक उन्नतीच्या किती उच्च भूमिकेवर ते होते, हें या पुस्तकावरून समजतें. त्यांचे कपडेलत्ते आणि घरदार, ह्मणजे एक काळें कांबळें; जो फारसा शिकलेला नव्हता, आणि एकाच कुटुंबावर आपला भार पडूं नये ह्मणून जो दारोदार भिक्षा मागत हिंडत असे, अशा एकाच मनुष्याच्या (काळीकांबळी बोवाच्या) नांवानें आज लाखों रुपयांचें काम, कांहीं गाजावाजा न होतां कसें होत आहे, याचें वर्म त्या ग्रंथांत पहावयाला मिळतें. काळीकांबळी-बोवांच्या नांवानें, जोरानें वाहणाऱ्या मोठ्या नदीवर पूल बांधणें, रस्ते करणें, धर्मशाळा बांधणें, शिक्षण देणें, हिमालय पर्वतावर आणि खालीं तप्त वालुकामय मैदानावर बेकार लोकांनां काम देणें, इत्यादि कामें होत आहेत.

बेत, युक्त्या आणि मसलती यांच्यायोगें धूर आणि धुकें यांशिवाय दुसरें कांहीं मिळत नाहीं, कांहीं निष्पन्न होत नाहीं. ऐहिक योजनेच्या द्वारें कांहीं खरें काम होत नाहीं. परमार्थाच्या द्वारें खरें काम होतें. कांहीं लोकांनां शहरांतील दाट वस्तींत राहिल्यानें नकळत दैवी स्थितींत जातां येतें; कांहींजणांनां ती स्थिति एकान्तवासांत समजून मिळते. कित्येकांनां

ही स्थिति विपत्तिरूप वरानें मिळते. कित्येकांनां ग्रंथ लिहितांना, प्रभूकडून अंतःकरणांत प्रेरणा होते; कित्येकांनां व्याख्यानें देत असतां ईश्वराकडून प्रकाश मिळतो; कित्येकजण रणभूमीवर ऐन माऱ्याच्या वेळीं देहभावना सोडून देतात आणि वीरपुरुष होऊन जगापुढें येतात; कित्येक चित्रलेखनाचें काम करीत असतां अनंत सौंदर्याकडे वळतात. चोराला देखील घरफोडीच्या कामांत यश यावयाचें असेल, तर देहभावना सोडून अनन्तांत चित्त एकाग्र केलें पाहिजे. संपत्तीला खरें मानणें, तिचा अपहार करणें, या पापाबद्दल त्या चोराला कायद्याप्रमाणें शिक्षा होईल, यांत शंका नाहीं.

आह्मी जितके जागृत—अनन्तांत लीन असतों, तितकें आमच्या हातून काम होतें. अनन्तांत लीन होणें हेंच काम करितें. एकान्त, युक्त्या, बेत यांच्यायोगें कांहीं काम होत नाहीं. अज्ञानी चरित्रकार बाह्य परिस्थितीकडे लक्ष देतात, आणि चरित्रनायकाची लिहिण्याची तऱ्हा अशी होती, त्याचे इतके अनुयायी होते ह्मणून त्याला यश आलें, असें सांगतात. त्यांनां यशाचें मर्म माहीत नसतें. ज्या झाडाखालीं बसून मी लिहीत आहें, त्या झाडावर कोणते पक्षी बसले आहेत यांवर माझें काम अवलंबून आहे, असें त्यांनां वाटतें! बाह्य परिस्थिति आणि प्रसंग यांची कांहीं मातबरी नाहीं. वीराला जो जय मिळाला, तो आंतील देवता इंद्र आणि बाहेरील देवता वरुण यांच्यामुळें मिळाला (सुदासमिद्रावरुणावसावतम्—ऋग्वेद), असें जें प्राचीन ऋषीनें ठरविलें, तें बरोबर आहे.

बुल्लाशहानें सांगितल्याप्रमाणें, प्रत्यहीं चिमण्यांनीं गरुडपक्ष्यांचा फन्ना उडविलेला आहे—ह्मणजे आमचे मोठमोठे बेत सहज ढांसळतात, असें आह्मी पाहतों. ख्रिस्तानें सांगितल्याप्रमाणें, निरुपयोगी ह्मणून टाकलेल्या विटांचा, भव्य इमारतीच्या कोणशिलेच्या जागीं उपयोग करण्यांत येतो. बाह्य परिस्थिति, ऐहिक किंवा व्यावहारिक ज्ञान यांचें आमच्या यशांत कांहीं अंग नसतें. आमचे संबंध, मैत्री, संपत्ति, आशा,

वचनें इतर साधनें—थोडक्यांत सांगावयाचें, ह्मणजे हें आमचें जग हा सर्व निवळ भ्रम किंवा फसवणूक आहे. त्यांचें वैयर्थ्य सिद्ध करण्याला शंकराचार्यांची किंवा सुरेश्वराची सूक्ष्म बुद्धि नको. डोळस मनुष्याला आलेला थोडासा अनुभव शतघ्नीप्रमाणें या वेदान्ताची गर्जना करितो.

तत्त्वमस्यादिवाक्यानां स्वतःसिद्धार्थबोधनात् ।
अर्थान्तरं न संद्रष्टुं शक्यते त्रिदशैरपि ॥

आमचा महात्मेपणा, आमच्या सुधारणा, मान, कामें, संबंध हे सर्व गेल्या रात्रींतील—जन्मांतील स्वप्नें, काल्पनिक खेळ किंवा आभास होत. खऱ्या 'रामा'शीं—आत्मारामाशीं आमचें पटेनासें झालें, ह्मणजे आह्मांला मार्ग दिसेनासा होतो. आह्मी सत्याचा, कायद्याचा मार्ग चुकतों, आणि त्यामुळें आह्मांला दुःख होतें. तेच आह्मी सन्मार्गांत—देवांत असलों, ह्मणजे योग्य उपाय, योग्य प्रेरणा, योग्य प्रवृत्ति आमच्या अंतः-करणांत आपोआप उद्भवतात, आणि आह्मांला सुंदर देखावे, पर्वतांचीं रम्य शिखरें, श्रमापहारी स्वच्छ शांत झरे, वैभव आणि पावित्र्य यांकडे नेतात; किंवा आमच्यामधील आनंदी प्रकाश, आपण होऊन रम्य जीवित आणि प्रेम यांचें आकर्षण करितो.

वैदिककालांतील मोठमोठ्या भव्य आणि उदात्त यज्ञांच्या बुडाशीं अहंकारत्यागाचा धडा होता. देहविस्मृतीचा—अहंकारत्यागाचा कायदा, प्राचीन ऋषींनां रुद्राप्रमाणें उग्र, निष्ठुर आणि सत्य वाटत होता. त्याची अवहेलना करा, ह्मणजे तुमच्या हृदयांत आणि बाजूला झटकन् त्याचे बाण येऊन भिडलेच, ह्मणून समजा.

नमस्ते रुद्रमन्यव उतोत इषवे नमः ॥
बाहुभ्यां उत ते नमः ॥

"हे रुद्रा (कायद्या), तुझ्या क्रोधाला नमस्कार! तुझ्या अचुक बाणांनां नमस्कार, तुझ्या बाहूंनां नमस्कार असो!"

आमच्या प्रत्येक लहानसहान अनुभवांत सबंध इतिहास दडविलेला असतो. आह्मांला तो बरोबर वाचतां येत नाहीं. एकादा गरीब पॉल

( गृहस्थ ) होणें हें जितकें सोपें आहे, तितकें, बुद्ध किंवा ख्रिस्त यांसारखें मोठें होणेंहि सोपें आहे. योग्य किंमत–आपला अहंकार टाकणें आणि ईश्वराला आमच्याद्वारें काम करूं देणें—मात्र दिली पाहिजे. एका म्यानांत दोन तरवारी ठेवितां येत नाहींत. आमच्यावर लादलेल्या स्तुतिनिंदांकडे दुर्लक्ष्य करण्याला आम्ही शिकलों, कांहींतरी धडपड करावी या ज्वरापासून आम्ही मुक्त झालों, यश मिळविणें हें आमचें ध्येय नसलें, सत्य प्रतिपादन करण्यापेक्षां सत्य होण्याकडे आमच्या प्रयत्नांचा रोंख वळला, सूर्याप्रमाणें कांहीं श्रेय न घेतां आम्ही काम करूं लागलों, तर आह्मी देवांचे देव बनून जाऊं! लोक आमच्याविषयीं काय ह्मणतात, त्यावर विश्वास ठेवण्यास आम्हीं सुरू केलें, ह्मणजे आमची प्रगति खुंटलीच. जग हें मिथ्या आहे, आणि लोकांची टीकाहि तशीच आहे. परमात्मा एक सत्य आहे.

विस्तव जसें सोनें स्वच्छ करितो, त्याप्रमाणें दुःख हें शीलाच्या वाढीला आवश्यक आहे, असें कांहीं लोकांनां वाटतें. प्रयत्न केल्याशिवाय प्रगति होत नाहीं, अशी निसर्गाची योजना दिसून येते. आतांपर्यंत असा प्रकार असेल, पण तो तसाच पुढें चालू कां रहावा ? नवीन जन्माच्या–उत्पत्तीच्या स्थितीला गेल्याशिवाय कोणतेंहि रासायनिक द्रव्य लागू होत नाहीं, त्या द्रव्याची क्रिया सुरू होत नाहीं. बीज प्रथम नाश पावून मूलसत्त्वाच्या–पदार्थाच्या स्थितीला गेल्यावर वाढूं लागतें. दोन धातु जोडावयाच्या असल्या, ह्मणजे त्या वितळेतोंपर्यंत तापवाव्या लागतात, आणि नंतर सांधाव्या लागतात. त्याप्रमाणें बाह्य परिस्थितीवर अवलंबून राहणारा मनुष्य भावि यश, आशा यांनीं प्रथम उत्तेजित होतो, आणि नामरूपांवर विशेष भिस्त ठेवून काम करूं लागतो. इतक्यांत त्याच्या मस्तकावर कांहीं आघात ( विपत्ति ) होतात, आणि त्या आघातांच्या–विपत्तींच्यायोगें तो वितळून जाऊन आपल्या मूलस्थितीला येतो, नवीन जन्माला येतो. खऱ्या जीविताची शर्त किंवा अट अशा रीतीनें पाळली गेल्यामुळें, त्याला नंतर यश येऊं लागतें. लोक कांहींहि ह्मणोत,

कायदा जर सत्य आहे, तर देहविस्मृतीच्या–ध्यानाच्या मार्गापासून, कोणत्याहि रीतीनें कां होईना, च्युत झाल्यामुळेंच खिस्ताला इतकें दुःख सोसावें लागलें. पण, थोड्याशा छलानें तो सावध झाला, आणि क्रूसावर चढविण्यापूर्वी, तो पुनः परमात्मध्यानांत इतका कांहीं मग्न होऊन गेला, कीं, पुढें तो सदैव अमर झाला. पण, छल आणि दुःख यांच्यामागून नेहमीं सुख आणि यश हीं येतातच, असा नियम नाहीं. बहुतेकदां एका दुःखाच्यामागें अनेक दुःखांची परंपरा असते. पहिल्या विपत्तीनें आह्मी सावध झालों, तर आह्मांला आनंद व प्रकाश मिळतो; पण, गैरसावध आणि मूढ राहून आह्मी कायदा मोडूं लागलों, तर आमच्यावर अनेक प्रहार होऊं लागतात, आणि विपत्ति आह्मांला पूर्णपणें घेरून टाकितात. विपत्तीमुळें जे वितळून जातात, अहंकार नाहींसा करून पुनर्जन्माला येतात, तेच या युद्धांत टिकतात आणि यशस्वी होतात. पूर्वीं वाफेच्या एंजिनांनां गव्हर्नर ( नियामक सांचा ) नसे, त्यामुळें वाफेकडून काम करून घेणें फार कठिण जाई. पण, अलीकडे गव्हर्नरचा शोध निघाल्यामुळें शक्तीचा अपव्यय न होतां वाफेच्या एंजिनाकडून पाहिजे तसें काम करून घेतां येतें. त्याप्रमाणें, आमच्या जीविताचा गव्हर्नर--कायदा मिळाल्यामुळें, दुःखानें जनावराप्रमाणें मनुष्यजातीवर अम्मल चालविण्याचें आतां कांहीं कारण उरलें नाहीं.

देहभावनेंत राहून काम करणें हा कोणत्याहि ऐहिक राष्ट्राच्या अनुशासनपद्धतीप्रमाणें गुन्हा होत नाहीं. पण, सर्वशक्तिमान् प्रभूच्या अनुशासनदृष्टीनें हाच काय तो एक गुन्हा आहे, आणि इतर गुन्हे किंवा दोष या एका गुन्ह्याचीं निरनिराळीं अंगें आहेत. **‘एका देहात्मबुद्धीपाशीं, वसती पातकांच्या राशी.’** रोग एकच आणि उपायहि एकच आहे. **‘ब्रह्म सत्यं, जगन्मिथ्या’** हा वेदान्ताचा कायदा मोडणें हें सर्व रोगांचें, पापांचें मूळ कारण आहे. आपलें ईश्वरत्व मिळविणें,

आत्म्याचा–ईश्वराचा साक्षात्कार घेणें हाच काय तो सर्व रोगांवर–पापांवर रामबाण उपाय आहे.

'रामा'चा हा उपदेश, एका विविक्तसेवी संन्याशाची बडबड आहे, व त्याचा संसारी गृहस्थांनां काय उपयोग आहे, असा कोणी आक्षेप घेतील. जलाशयांतील पाण्यांत झाडझुडपें किंवा वनस्पति नसतात, ह्मणून आपल्या पिकांनां या जलाशयांतील पाणी पाजवूं नये, असें शेतांनीं ह्मणणें समंजस होईल काय? 'राम' फक्त प्रत्येकाचें जीवन असलेला असा कायदा सांगतो. रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, मानसशास्त्र आणि जगांतील इतर शास्त्रांतील सर्व कायदे हे त्या एका कायद्याचीं निरनिराळीं रूपें आहेत. एकदां आत्मरवीचा उदय झाला, सर्व वस्तूंचें खरें स्वरूप एकदां आह्मांला समजलें, ह्मणजे जगांतील सर्व कार्यकारण-भाव–सर्व कायदे ग्रहोपग्रहांप्रमाणें आमच्याभोंवतीं फिरूं लागतात. इतकेंच नव्हे, मातेच्यामागें क्षुधित बालकाप्रमाणें आमच्या पाठीला लागतात.

'यथेह क्षुधिता बाला मातारं पर्युपासते'

–सामवेद.

मूल ज्याप्रमाणें सहज रीतीनें आणि यथाक्रमानें चालावयाला शिकतें, त्याप्रमाणें मनुष्यानें आपलें मरण पहावयाला शिकलें पाहिजे.* आपलें मरण पाहणें, ह्मणजे आपला एकदेशीपणा, अहंकार नाहींसा करून टाकणें होय. अहंकाराचा ठाव पुसून काढिल्यावर, चाकर, चाकर नव्हे; शिष्य, शिष्य नव्हे; मित्र, मित्र नव्हे; शत्रु, शत्रु नव्हे;

*आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां, तो झाला सोहळा अनुपम्य.
आनंदें दाटलीं तिन्हीं त्रिभुवनें, सर्वात्मकपणें भोग झाला.
एकदेशीं होतों अहंकारें आथिला, त्याच्या त्यागें झाला सुकाळ हा!
फिटलें सुतक जन्ममरणाचें, मी माझ्या संकोचें दुरी झालों!
नारायणें दिला वसतीस ठाव, ठेवूनियां भाव ठेलों पायीं.
तुका ह्मणे दिलें उमटूनि जगीं, घेतलें तें अंगीं लावूनियां.

राजा राजा नव्हे; अशी स्थिति प्राप्त होते, आणि सर्वत्र ईश्वर दिसतो. अशी स्थिति प्राप्त झाली ह्मणजे सर्व जग आपणाला अनुकूल होऊं लागतें. भपक्यावर, बाह्य नामरूपांवर विश्वास ठेविला, ह्मणजे जगाचें व आमचें पटत नाहीं. अहंकार शाबूत ठेवून आमच्या देहाचा बचाव करावा, आणि 'जशास तसें' या न्यायानें प्रतिकार करावा, असें जोंपर्यंत आह्मांला वाटतें, तोंपर्यंत आह्मी मृत असतों. मानभंजक आणि अपमानकारक टीकेनें मन विकृत न होणें—अशा टीकेकडे दुर्लक्ष करणें, याशिवाय मोठे-पणाची दुसरी कसोटी नाहीं.

जेव्हां एकादा गृहस्थ वकिली सोडून न्यायाधीशाच्या जागीं जातो, तेव्हां त्याच्याशीं कोर्टांतील सर्व लोकांचें पूर्वींचें वर्तन बदलून जातें. त्याप्रमाणें आह्मीं वकिलाचा (स्वार्थी) बाणा सोडून जेव्हां परमात्म्याची (निरपेक्ष) वृत्ति स्वीकारतों, तेव्हां जगाला आपले संबंध बदलून टाकावे लागतात; आणि जहाज किती जरी हाललें, तरी होकायंत्राचा कांटा जशी एकच दिशा दाखवितो, त्याप्रमाणें जगांतील सर्व संबंध आह्मांला अनुकूल होतात. ते संबंध आह्मांला केव्हांतरी फसवितात काय? तुह्मीं तुमच्यामधून--तुमच्या मनांतून ईश्वराला घालवून दिल्यास, ते तसें करितात. जनावरें व अज्ञानी माणसें, हीं विषयवासनांनीं प्रेरित झालेलीं असतात—त्यांनां नामरूपें दिसतात. सत्य किंवा कायदा दिसत नाहीं. ज्ञानी माणसांनां कायदा स्पष्ट दिसतो, सत्य वाटतो आणि अज्ञ लोकांनां दिसणारीं नामरूपें त्यांच्या दिव्य ज्ञानांत लोपून जातात.

> या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
> यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥
>
> —गीता.

---

* जे रात्री सर्व भूतीं । ते समयी योगी जागती ॥
जेथें भूतांची जागृती । ते रात्री मुनीसी ॥

—मुक्तेश्वर.

## SUBLIME COURTESY-THE LAW.

## उच्च शिष्टाचाराचा नियम.

"अब्राहामला जीवंत जाळीत असतां तो अग्नीला ह्मणाला 'हे अग्नि, अहंकाराचा एक तसू जर माझ्या अंगांत असेल, तर माझें शरीर बेशक जाळून टाक, भस्म करून टाक.' अग्नि थंड झाला, जणूं काय, त्यानें असें उत्तर दिलें, कीं, महाराज आपण जगा, वांचा, आणि मला आपल्या पायाशीं मरण पावूंद्या."

शिष्टाचाराचा दिव्य कायदा असा आहे. ईश्वर, सभ्यतेमध्यें कोणालाहि हार जाणार नाहीं.

रुचं ब्राह्मं जनयन्तो देवा अग्रे तदब्रुवन्।
यस्त्वेवं ब्राह्मणो विद्यात्तस्य देवो असन वशे ॥

—यजुर्वेदसंहिता.

सर्वाण्येनं भूतान्यभिक्षरन्ति ।

—बृहदारण्यकोपनिषत्.

सर्वेऽस्मै देवा बलिमावहन्ति ।

–तैत्तिरियोपनिषत्.

"उत्पत्तीच्या वेळीं देव ब्रह्मदेवाला सांगूं लागले--याप्रमाणें जो कोणी ब्रह्माला जाणील, त्याच्या ताब्यांत आह्मी (देव) राहूं. सर्व प्राणी त्याच्यामागें जातील. सर्व देव--(कायदे) त्याला बलिदान देतील."

# A GREAT OBJECTION TO VEDANTA.

# वेदान्तावर एक मोठा आक्षेप.

वेदान्त आमच्या सर्व मनोवृत्ति, आमची सौंदर्यविज्ञानदृष्टि नाहींशी करितो. आप्तइष्टांची कांहीं पर्वा न करितां निसर्गाप्रमाणें सरळ वागून आह्मीं बधिर, स्पर्शानभिज्ञ व्हावें, असा तो उपदेश करितो.

होय. तो असें करितो. वेदान्ताच्या—सत्याच्या भक्तांनां सत्य—ब्रह्म इतकें खरें वाटलें पाहिजे, कीं, त्यापुढें इतर वस्तु, व्यक्ति, कार्य-कारणभाव, लोकमत इत्यादि सर्व कांहीं नाहींसें झालें पाहिजे. पण, मानवी किंवा पशुवृत्ति नाहींशा झाल्या, तर त्यांच्या जागीं दैवीवृत्ति उद्भवूं लागतात. कृत्रिम दिवे नाहींसे होतात, आणि सर्व जगाला उल्हसित करणारा, सर्वांनां सारखें लेखणारा असा हंसतमुख सूर्यप्रकाश —आत्मप्रकाश त्यांच्या जागीं येतो.

एक मोठा साक्षात्कारी इंग्लिशमन (एडवर्ड कार्पेंटर) ह्मणतो, कीं, मला पूर्वीं हें खरें वाटलें नसतें, पण आतां मला तसा अनुभव आला आहे. स्वतःविषयीं विचार करण्याचें सर्वस्वीं सोडून दिल्याशिवाय सौख्य मिळणार नाहीं. मात्र या कामीं कच्चेपणा अगदीं उपयोगी नाहीं. क्षुद्र अहंकाराचा--मीपणाचा एक खडा जरी उरला, तरी तो सौख्य-पयोनिधि नासून टाकील. हें काम कठिण नाहीं, असें मी ह्मणत नाहीं. पण त्यावांचून दुसरा मार्ग नाहीं.

पुष्कळ वर्षांचे बेत आणि हेतु टाकून द्या; नांव, कीर्ति, स्तुति, मान यांनां सोडा; प्रिय नातलगांपासून दूर व्हा. प्रिय असलेला अहंकार हातमोज्यांप्रमाणें दूर सारा. रोग, भीति, आदराची आशा, यांनां झुगारून द्या, आणि अशा तऱ्हेनें विदेही होऊन ( तुमच्यामधून ) बाहेर निघा, पुष्कळ वर्षें तयार केलेल्या टरफलाचा—देहाचा अभिमान सोडा. निस्पृह व निरपेक्ष होऊन ज्ञानमार्गानें अनंताच्या—मुक्तीच्या दरबारांत या.

सर्व मालमत्तेचा मनानें त्याग करा, दरिद्री आणि अकिंचन व्हा, व पहा चमत्कार! तुह्मी सर्व वस्तूंचे–विश्वाचे स्वामी–समर्थ व्हाल.

**श्रीश्च ते लक्ष्मीश्च पत्न्यावहोरात्रे पार्श्वे नक्षत्राणि रूप-**
**मश्विनौ व्यात्तम् । इषन्निषाणामुम् ।**

—यजुर्वेद.

" श्री आणि लक्ष्मी तुझ्या पत्न्या, दिवस व रात्र तुझी उजवी व डावी बाजू, नक्षत्रांचें तेज तुझें रूप, द्यावापृथिवी हे तुझे हंसतांना उघडलेले ओंठ होतील. कांहीं इच्छा असेल, तर अशी इच्छा कर."

# बृहदारण्यकम्.*

## (७) वैवाहिक स्थिति चष्म्यांप्रमाणें असावी.

चष्म्यांतून आह्मी सर्व कांहीं पाहतों; पण, नेत्रांनां चष्म्यांचें ओझें होत नाहीं, किंवा चष्मे त्यांनां कोणताहि अडथळा आणीत नाहींत. दृष्टीच्या आड येण्याऐवजीं उलट ते दृष्टीला साहाय्य करितात. आमचे नेत्र आणि इतर वस्तु यांमधील पडदा न होतां चष्मे त्या वस्तु स्पष्टपणें दाखवितात. पति आणि पत्नी यांचा संबंध असाच असावा. एकमेकांचा परस्परांनां अडथळा होऊं नये. पण उलटपक्षीं प्रत्येकानें एकमेकांमधून सर्व विश्व पाहिलें पाहिजे. उभयतांचा संबंध इतर कोणत्याहि प्रकारचा नसून, वेदान्तांतील तत्त्वाप्रमाणें केवळ आध्यात्मिकच असेल, व जर दोघेंहि देहाभिमान, परिस्थिति, रीतिभाती, चाली, मनोविकार आणि व्यासंग यांनां दूर सारून परस्परांमधील आत्मतत्त्वच पहात राहतील, तर मात्र हें शक्य आहे.

श्वास आमच्या इतक्या समीप आहे, कीं, त्याचें अस्तित्व आह्मांला भासत नाहीं. याप्रमाणेंच आमची वैवाहिक स्थिति पूर्ण ऐक्याची असावी. ना बंधन, ना ओझें; एकामुळें दुसऱ्याला चिंता करण्याचा प्रसंग येऊं नये. दोघेंहि मुक्त! एकाच्या विचारानें दुसऱ्याला खालीं ओढतां कामा नये. तूर्त संसारी लोकांमध्यें बायकोच्या विचारानें नवऱ्याच्या आध्यात्मिक उन्नतीला बाधा होत आहे. उलटपक्षींहि प्रकार सारखाच.

हिंदुस्तानांत कांहीं ठिकाणीं पुरुष व स्त्रिया डोळ्यांत सुरमा घालितात. सुरम्याचा उपयोग दृष्टीची शक्ति वाढविण्याकडे होतो. सुरमा डोळ्यांत

---

* लाला अमीरचंदांनीं प्रसिद्ध केलेल्या ‘ अनुभवकानन ’ नांवाच्या इंग्रजी रामतीर्थांच्या समग्र ग्रंथांत बृहदारण्यक ( Forest Talks ) विषयाचीं तेरा प्रकरणें दिलीं आहेत; यांपैकीं पहिलीं सहा आमच्या पहिल्या भागांत आलीं असून बाकीचीं या भागांत दिलीं आहेत.

राहतो; पण तो दृष्टीआड येत नाहीं. सुरमा डोळ्यांत आहे असें वाटूं लागतांच, त्यांत कांहीं बिघाड झाला आहे असें समजावें. पोट आहे असें आपणांला वाटूं लागतांच, त्यांत कांहीं तरी विकृति ( विकार ) झालेली असतेच. नियम असा आहे.

"माझी आठवण आपणांला होते काय?" असा प्रश्न 'रामा'च्या पत्नीनें विचारिला. 'रामा'नें उत्तर दिलें "छे, 'राम' कधींहि आठवण ठेवीत नाहीं." आपल्याहून भिन्न अशाच व्यक्तीचें स्मरण होतें. तुमचे नेत्र, तुमचें नाक, तुमचे हात यांची तुह्मांला आठवण आहे काय ? कधींहि नाहीं. ते पूर्णपणें तुमचेच आहेत. जेव्हां एक व्यक्ति दुसऱ्याशीं पूर्ण तादात्म्य पावते, तिचा एक जीव होऊन जातो, तेव्हां तिला दुसरींचें स्मरण होत नाहीं. हें थोडेंसें अधिक स्पष्टपणें सांगितलें पाहिजे.

मित्राकडून पत्र आलें, ह्मणजे आह्मांला तें कितीतरी प्रिय वाटतें. तें कोठें ठेवूं, कोठें नको, असें होऊन जातें. मित्रामुळेंच आह्मांला तें पत्र इतकें आवडतें. याप्रमाणेंच नवराबायको हीं परस्परांनां परमेश्वराकडून आलेल्या पत्राप्रमाणें असावीं. पतीचा देह, ह्मणजे ईश्वराकडून आलेलें पत्र किंवा चित्र, असें वाटावें, आणि या भावनेनेंच पत्नीनें पतीच्या देहावर प्रेम करावें, देहाला मान द्यावा; पण तो देह, ह्मणजे नुसतें पत्र किंवा चित्र होय; मूळ वस्तु नव्हे ! याप्रमाणें तिनें मूलभूत परमेश्वराला पतिद्वारा भजावें. तिला पति ह्मणजे परमेश्वराचें चिन्ह किंवा देवाचें चित्र असा वाटावा. रात्रौ देहाच्या आलिंगनाबरोबर आध्यात्मिक विचारसरणी मनांत येत नसेल, तर दिवसा तरी तिनें ही उणीव भरून काढावी. प्रत्येक आलिंगनाबरोबर, आपण परमात्म्यालाच कवटाळीत आहों, असा विचार तिच्या मनांत यावा. हे प्रकाशा ! माझ्यापाशीं ये; मी प्रकाशाला आलिंगन देतों. याला तुह्मी आनंद किंवा पूर्ण पावित्र्य अथवा अखिल विश्वाशीं पूर्ण तादात्म्य ह्मणा. हे देवा ! ज्ञानस्वरूपा ! मजजवळ ये; मी तुझा स्वीकार करितों. याप्रमाणें प्रत्येक गोष्ट, प्रत्येक वस्तु परमेश्वराचें चिन्ह आहे, असें समजावें. हा विचार

रात्रीं मनांत आला नसेल, तर दिवसा तरी त्याचा अनुभव घ्यावा. हें पूर्ण ऐक्य, हें लग्न, याची नुसती भावना मनांत बाळगा. परमात्म्याला–परमेश्वराला–कडकडून आलिंगन द्यावें, सर्व विश्व हें आपलें शरीर, आपण ह्मणजे हें सर्व कांहीं, अशी भावना सदैव बाळगावी. याप्रमाणें शारीरिक संबंधाकडे बिलकूल लक्ष्य देऊं नका; एका देहाच्या विचाराचें, चिंतेचें ओझें दुसऱ्यावर लादूं नका, पण खऱ्या आत्म्याशीं–परमात्म्याशीं नेहमीं संलग्न व्हा, असें वेदान्त आर्जवून सांगतो. परमात्मा–सत्ता, ऐक्य, प्रेम, विश्वैक्य हीं माझ्यामध्यें आहेत, मी तें सर्व आहें, मी तो आहें, आणि तो मी आहे, असें नेहमीं ध्यान करा, ह्मणजे तुमचें खरें लग्न कोणाशीं झालें आहे, तो–ह्मणजे वनस्पति, वृक्ष, नद्या, प्रत्येक वस्तु यांमधील आत्मा–ह्मणजे परमात्मा–तुमच्या दृष्टीला पडेल.

## (८) नव्याणवाचें जाळें.

नव्याणवाच्या जाळ्यांत सांपडूं नका, असें ह्मणतात, याचा अर्थ काय ?

एका लहानं झोंपडींत एक नवराबायकोचें जोडपें फार सुखानें रहांतं असे. खरोखरच तें जोडपें आनंदानें आणि सुखानें काळ कंठीत होतें. नवरा सारा दिवस खपे, आणि दोघांच्या पोटापुरती मीठभाकर कशीबशी मिळवी. त्याला दुसरी कोणती इच्छा अगर महत्त्वाकांक्षा नव्हती. ईर्ष्या किंवा द्वेष त्याच्या मनांत नव्हता. आपलें काम भलें, कीं, आपण भले, अशी त्याची स्थिति होती. त्याच्या शेजारीं एक श्रीमंत गृहस्थ रहात असे, तो मात्र सुखी नव्हता; नेहमीं तो चिंताग्रस्त असे. एकदां एक साधु तेथें आला, आणि त्या दोघांची राहणी पाहून त्यानें त्या श्रीमंताला सांगितलें, कीं, "तुझ्या चिंतेचें कारण तुझी सर्व मालमत्ता होय."

त्याच्या मालमत्तेनें त्याला पूर्णपणें घेरून टाकिलें होतें. एकसारखें त्याचें मन एका वस्तूपासून दुसऱ्या वस्तूकडे धांवे. गरीब शेजाऱ्याकडे बोट दाखवून साधु ह्मणाला "त्याच्याकडे पहा, त्याच्याजवळ कांहीं पुंजी नाहीं; पण पहा त्याचा चेहरा कसा आनंदानें प्रफुल्लित असून त्याच्या

हातापायाचे स्नायु कसे सुदृढ दिसतात. उल्हसित वृत्तीनें तो नेहमीं आपलें काम करीत फिरत असतो."

हें सुख त्या श्रीमंताला केव्हांच मिळेना. दुसऱ्या लोकांनां इष्ट वाटेल अशा रीतीनें त्यानें आपल्या जिंदगीची व्यवस्था ठेविली होती. एकदां साधूच्या ह्मणण्याची प्रतीति पहावी, असें त्या श्रीमंताच्या मनांत येऊन त्यानें साधूच्या संमतीनें एक नव्याण्णव रुपयांची थैली कोणाला न समजतां हळूच त्या गरिबाच्या झोंपडींत ठेवून दिली. दुसऱ्या दिवशीं पहातात, तों झोंपडींत चूल पेटली नाहीं; नाहींतर दररोज तेथें चांगली चूल पेटत असून त्या चुलीवर निढळाच्या घामानें मिळविलेल्या पैशानें आणलेल्या जिनसांचे खाण्याचे कांहीं पदार्थ तयार होत असत. त्या दिवशीं विस्तव पेटवून त्यांनीं अन्न शिजविलें नाहीं. एवढेंच नव्हे, पण त्यांनीं उपवास केला. असें पाहून दुसऱ्या दिवशीं सकाळीं श्रीमंतासह साधु तेथें गेला, आणि "काल झोंपडींत चूल कां पेटली नाहीं?" असें विचारूं लागला. त्या गरिबाला साधूपुढें कांहीं छपवितां येईना, आणि चूल न पेटविण्याचें खरें कारण त्याला सांगावें लागलें. तो ह्मणाला "यापूर्वीं मला थोडे पैसे मिळत, आणि तेवढ्या द्रव्यानें माझा चरितार्थ उत्तम रीतीनें चाले; पण काल आह्मांला नव्याण्णव रुपयांची एक थैली सांपडली. तेव्हां आमच्या मनांत असा विचार आला, कीं, शंभर रुपयांची रक्कम होण्याला एकच रुपया कमी आहे, त्याअर्थीं उपवास करून तो रुपया जमवावा; असें वाटून कांहीं दिवस उपवास करावा, असें आह्मीं योजिलें, व ह्मणून काल आह्मीं उपवास सुरू केला." श्रीमंतांच्या चिक्कूपणाचें--कृपणतेचें गुह्य हें आहे. त्यांनां जसजसा पैसा अधिक मिळतो, तसतसे ते अधिक कृपण व दरिद्री होतात. नव्याण्णव रुपये मिळाले, कीं, त्यांनां शंभर रुपये हवे आहेत, नव्याण्णव हजार रुपये मिळाले, कीं, एक लाख त्यांनां पाहिजेत!

## (९) स्तुतीचें जाळें.

बेंजामिन फ्रांकलिननें आपल्या जीवनवृत्तान्तांत लहानपणींचा एक अनुभव सांगितला आहे. फिलाडेल्फिया येथें एके दिवशीं घराहून

शाळेंत जात असतां, वाटेंत त्याला एक लोहाराचें दुकान लागलें. त्या दुकानांत उत्सुक मुलाप्रमाणें बेंजामिननें डोकावून पाहिलें, तों, लोहार आपलें काम करीत होता, असें त्याला दिसून आलें. मुलांसमोर कोणतीहि गोष्ट किंवा विचार आला, ह्मणजे त्यांतच तीं गढून जातात. पाकीट घेऊन बेंजामिन शाळेला जात होता; पण लोहाराचें काम पाहून तो शाळा विसरला. लोहारानें मुलाची उत्सुकता पाहिली, त्यावेळीं तो हत्यारें पाजळीत बसला असून त्याचा मुलगा कांहीं कामाकरितां कोठें बाहेर गेला होता. आपल्या कामांत हा इतकें लक्ष्य घालतो, असें पाहून लोहारानें बेंजामिनला जवळ बोलावून ह्मटलें "तूं किती चांगला हुषार मुलगां आहेस बरें!"

या स्तुतीनें बेंजामिन फुगून गेला. तो खूष झाला आहे, असें पाहून लोहार त्याला ह्मणाला "तूं एवढें (साणीचें) चक्र फिरविशील काय?"

बेंजामिननें एकदम चक्र फिरविण्याला सुरुवात केली. मुलें स्वभावतःच तरतरीत असतात, आणि त्यांनां काम करणें आवडतें. त्यांनां खूष केलें, ह्मणजे पाहिजे तीं कामें तीं करतील. बेंजामिन चाक एकसारखें फिरवीत आहे आणि लोहारानें त्याची स्तुति चालविली आहे, असा बराच काल गेला. लोहारानें चाकू, सुऱ्या, वगैरे बऱ्याच हत्यारांनां धार पाजवून घेतली. इतक्यांत बेंजामिन दमला, आणि त्याला शाळेची आठवण होऊन येथून निघून जावें, असें वाटूं लागलें; पण लोहार त्याला कांहीं केल्या सोडीना. त्यानें स्तुतीचा मारा एकसारखा चालू करून त्याला खूष करण्याचा सपाटा चालविला. तो ह्मणाला "बेटा, तूं फार शहाणा आहेस. तुला शाळेंत पंतोजी कधींहि मारीत नाहींत. तूं तरतरीत आहेस. दुसरीं मुलें तीन तासांत जो अभ्यास करितात, तितका तूं अवघ्या एका तासांत करतोस. पंतोजी तुझ्यावर रागावत ह्मणून कधींच नाहीं. तूं इतका चांगला आहेस," इत्यादि.

याप्रमाणें बोलत बऱ्याच हत्यारांनां धार पाजण्यांत आली. अर्धें काम झाल्यावर येथून पसार व्हावें, असें बेंजामिनच्या मनांत आलें; पण

त्याला तसें करितां येईना. शाळा दहा वाजतां सुरू झाली आणि बेंजामिनची सुटका बारा वाजतां झाली! दोन तास उशीर केल्यामुळें बेंजामिनला बराच मार मिळाला. तो आधींच काम करून दमलेला होता. त्याचे हातपाय फार दुखूं लागले. नीट होण्याला त्याला चांगला एक आठवडा लागला. त्याचे धडे मागें पडले व बरेंच नुकसान झालें. यापुढें कोणीं जर त्याची स्तुति केली, तर "आणखी एका हत्याराला धार पाजावयाची आहे," हा विचार त्याच्या मनांत येई. ही गोष्ट घडल्यानंतर बेंजामिन फ्रांकलिन कधींहि स्तुतिजालांत सांपडला नाहीं.

## (१०) आयुष्याचें महत्त्व.

" रोटी तेरा धुंडत आवे मनमें पाव विश्राम,
दाने दानेपर लिखा है खानेवालाका नाम. "

एक साधु कांहीं मुलांनां आपल्याजवळ असलेले पैसे वांटणार होता. पुष्कळ गरीब लोक याचना करीत तेथें आले; पण त्यांनां तो कांहींच देईना. शेवटीं हत्तीवर बसून एका राजाची स्वारी तेथें आली. साधूनें राजा बसल्या ठिकाणीं हौद्यांत पैसे फेंकून दिले. साधूचें हें विलक्षण कृत्य पाहून राजाला चमत्कार वाटला. साधु ह्मणाला "राजा, सर्वांत गरीब असा तूं—त्या तुझ्याकरितां ते पैसे आहेत."

" आपण सर्वांत गरीब कसे ? " राजानें विचारलें.

त्यावर तो साधु ह्मणाला "राजा ! तुझी मालमत्ता पुष्कळ असल्यामुळें व आणखी अधिक पैसा व अधिक राज्य मिळावें अशी हांव बाळगल्यामुळें तूं सर्वांत दरिद्री आहेस ! "

एक श्रीमंत मनुष्य आपल्या तिजोरींत पुष्कळसें द्रव्य मोजून बंदोबस्तानें ठेवीत असतां त्याला एका साधूनें विचारलें " तूं हें काय करीत आहेस ? "

श्रीमंत ह्मणाला "महाराज, आपणाला काय काळजी आहे ? लोक आपल्याला पोशीत आहेत. बरें, जरी एखाद्या वेळेला त्यांनीं पोशिलें

नाहीं, तरी आपण देहाची यत्किंचित्‌हि पर्वा करीत नाहीं; पण आह्मांला वेळेनुसार उपयोग व्हावा ह्मणून थोडेंबहुत द्रव्य सांठवून ठेविलें पाहिजे."

हें ऐकून साधु स्तब्ध राहिला.

दुसरे दिवशीं त्या श्रीमंताला साधूच्या दरिद्री झोंपडीकडे जाण्याचा प्रसंग आला. तेथें साधु एक मोठा खळगा खणून मोठ्या प्रयासानें सुंदर, वाटोळे दगड आणून रचीत आहे, असें त्याला आढळून आलें. तें पाहून त्यानें विचारिलें "स्वामी, स्वामी, आपण हें काय करीत आहां?"

साधूनें ह्मटलें "सुंदर दगड जमा करीत आहें. हे किती वाटोळे आहेत पाहिलेना ?"

पुनः श्रीमंतानें हंसून विचारिलें "महाराज, दगड जमा कां करितां ? येथें नजीकच पर्वत दगडांनीं भरून गेला आहे!"

त्यावर साधु ह्मणतो "मी गरजेसाठीं ते जमा करितों. कधींतरी मला ते लागतील. पर्वत केव्हांतरी पृथ्वीच्या पाठीवरून नाहींसे होतील, ह्मणून मी दगड जमवून सांठवून ठेवितों."

श्रीमंत ह्मणतो "हें कसें शक्य आहे ? पृथ्वीच्या पाठीवरून दगड कसे वाहून जातील, नाहींसे होतील ?"

साधु त्या श्रीमंतावर धांवून जाऊन ह्मणतो "तूंच मला हें शिकविलेंस ! मूर्खा, अन्नानें भरलेलें तुझें ताट देव तुझ्यापुढें ठेवणार नाहीं, अशी वेळच केव्हांहि येणार नाहीं. सोनें, रुपें यांचा संग्रह करण्यांत आपली सर्व शक्ति व आपला अमोलिक वेळ खर्च करण्यांत काय फायदा आहे ? माझ्यापासून हा धडा शीक. अशा दुरुपयोगासाठीं, उधळपणानें खर्च करण्याकरितां आयुष्य दिलेलें नाहीं, आणि तें क्षुद्र काळजींत व चिंतेंत खर्च करतां कामा नये."

## (११) ईश्वरविषयक कांहीं खुबीदार प्रश्नोत्तरें.

एकदां एक काजी आपल्या बादशहाला भेटण्यासाठीं आला. तो काजी एका प्रांताचा गव्हर्नर होता, आणि बादशहा त्याला बराच मान देत

असे. काजीची परीक्षा पहावी, असें बादशहाच्या मनांत आलें. बादशहा कांहीं विद्वान् नव्हता, पण काजीचा द्वेष करणाऱ्या आणि त्याची जागा पटकावूं पाहणाऱ्या इसमांनीं कांहीं प्रश्न बादशहाला सुचवून दिले.

काजी समोर येतांच बादशहानें विचारिलें "देवाचें मुख कोणत्या दिशेला आहे, देव कोठें असतो, तो काय खातो आणि काय करतो ? या प्रश्नांचीं उत्तरें समाधानकारक दिल्यास आपणाला बढती मिळेल." असेंहि बादशहानें सांगितलें.

बादशहानें विचारलेले प्रश्न फार कठिण असावेत, असें काजीला वाटलें. आणि त्यानें बादशहाची स्तुति व खुशामत करून प्रश्नाचीं उत्तरें देण्याला आठ दिवसांची मुदत मागून घेतली.

एकसारखा आठ दिवस काजीनें त्या प्रश्नांविषयीं विचार केला; पण त्याचा कांहींच निश्चय होईना. बादशहाला चोख उत्तरें कशीं द्यावीं, हें कोडें कांहींकेल्या त्याला उलगडेना. सरतेशेवटीं आठवा दिवस उजाडतांच मुदत वाढविण्यासाठीं आपण आजारी आहों, असा त्यानें बहाणा केला. काजीच्या नोकरानें येऊन काजीची प्रकृति कशी आहे, याची चौकशी केली. काजी ह्मणाला "जा निघून ! मला त्रास देऊं नका; मी मृत्युपंथाला लागलों आहें !"

नोकर ह्मणाला "मला खरी स्थिति कळवा; आपल्याला त्रास, दुःख होण्यापेक्षां मला मरण पत्करलें."

काजीनें त्याला सर्व हकीगत सांगितली. नोकर हलक्या कामावर होता, तरी तो काजीचा खरा शिष्य असून विद्वान् व वेदान्त जाणणारा होता. तो ह्मणाला "मला प्रश्नांचीं उत्तरें अवगत आहेत. काजीसाहेबांनीं बादशहाकडे जाण्याला मला लेखी हुकूम द्यावा; प्रश्नांचीं उत्तरें बादशहाला समाधानकारक मिळालीं नाहींत, तर आपल्याऐवजीं मी मरण्यास तयार आहें."

काजी मनांत कांकूं करूं लागला; इतक्यांत बादशहाचा दूत तेथें आलाच. त्याला पाहून काजीचें धाबें दणाणून गेलें. लगेच त्यानें

आपल्या नोकराला बादशहाकडे जाण्याची परवानगी दिली. नोकरानें आपले उत्तमोत्तम कपडे, ह्मणजे नुसत्या चिंध्या अंगावर गुंडाळिल्या. आणि बादशहापाशीं येऊन "खाविंद, अपल्याला काय पाहिजे ? आपल्याला काय विचारावयाचें आहे ?" असें ह्मटलें.

बादशहा ह्मणाला "तुझ्या धन्याला विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें तुला देतां येतील काय ?"

नोकर ह्मणाला " हो, येतील. पण खाविंदांनां माहीत आहे, कीं, प्रश्नांचीं उत्तरें देणारा गुरु होय, आणि प्रश्न विचारणारा शिष्य होय. आमच्या मुसलमानी धर्माप्रमाणें गुरूला उच्चासन दिलें पाहिजे, आणि शिष्यांनें खालीं बसलें पाहिजे."

बादशहानें हें मान्य करून त्याला उंची वस्त्रें देऊन आपल्या सिंहासनावर बसविलें, व तो स्वतः सिंहासनाच्या पायऱ्यांवर बसला, आणि ह्मणाला "पण, एक गोष्ट ध्यानांत ठेवा. आपल्याकडून उत्तरें चोख मिळालीं नाहींत, तर मात्र मृत्यूशीं आपली गांठ आहे."

नोकर ह्मणाला "तें तर ठरलेलेंच आहे !"

बादशहानें पहिला प्रश्न विचारला "देव कोठें असतो ?"

याचें नुसतें उत्तर दिलें, तर बाशहाला समजणार नाहीं, ह्मणून त्या नोकरानें एक गाय आणविली आणि त्याला विचारलें "गाईला दूध असतें काय ?"

बादशहा ह्मणाला "हो, अर्थात्."

"दूध कोठें असतें?"

"ओटींत ( स्तनांत )."

गुरु ह्मणाला "चूक आहे. दूध गाईच्या सर्व शरीरांत असतें."

नंतर तिचें थोडेंसें दूध काढविण्यांत आलें.

"लोणी कोठें आहे? दुधांत लोणी आहे काय?"

"होय."

"पण तें कोठें आहे, मला दाखवा."

बादशहाला तें दाखवितां येईना.

नंतर तो ह्मणाला "तुह्माला लोणी कोठें आहे तें सांगतां येत नाहीं, तरी तें आहे असें तुह्मी मानतां; वस्तुतः दुधांत सर्व ठिकाणीं लोणी आहे, त्याप्रमाणें ईश्वर अखिल विश्वांत भरलेला आहे. दुधांत जसें लोणी, गाईंत जसें दूध, त्याप्रमाणें विश्वांत सर्वत्र ईश्वर आहे. दूध हवें असेल, तर गाय पिळली पाहिजे, तिचें दोहन केलें पाहिजे; त्याप्रमाणें ईश्वर हवा असेल, तर (ईश्वराच्या प्राप्तीसाठीं) तुह्माला तुमच्या अंतःकरणाचें दोहन केलें पाहिजे."

गुरूनें नंतर विचारलें "बादशहा, तुझें समाधान झालें काय?"

बादशहानें उत्तर दिलें "होय, आपण दिलेलें उत्तर बरोबर आहे."

पूर्वीं ज्यांनींज्यांनीं ईश्वर सातव्या आठव्या स्वर्गांत असतो असें बादशहाला सांगितलें होतें, ते सर्व बादशहाच्या मर्जींतून उतरले. त्यांचें ह्मणणें चूक आहे, असें आतां त्याला स्पष्टपणें कळून आलें.

नंतर दुसरा प्रश्न विचारण्यांत आला. "देवाचें तोंड कोणत्या दिशेला —पूर्वेला, पश्चिमेला, उत्तरेला किंवा दक्षिणेला आहे?"

हा प्रश्नहि चमत्कारिक होता. ईश्वर ह्मणजे एक पुरुष किंवा व्यक्ति आहे असें बहुतेक लोक मानीत असत.

गुरु ह्मणाला "बरें, एक दिवा आणा."

एक मेणबत्तीचा दिवा पेटविण्यांत आला.

गुरूनें दाखविलें, कीं, "दिव्याच्या ज्योतीचें तोंड पूर्वेला, पश्चिमेला, उत्तरेला किंवा दक्षिणेला नसून सर्वत्र सारखें आहे."

बादशहाचें समाधान झालें.

त्याचप्रमाणें ईश्वर हा सर्व दिशांप्रत सारखा प्रकाशणारा आमच्या अंतःकरणांतील प्रकाश आहे.

नंतर तिसरा प्रश्न पुढें आला.

" देव काय करितो ? "

गुरु ह्मणाला " बरें, काजीला येथें आणा. "

काजी येऊन पहातो, तों आपला चाकर सिंहासनावर बसलेला आहे! नंतर त्यानें बादशहाला काजीच्या नेहमींच्या जागीं, व काजीला नोकराच्या जागीं बसविलें, आणि तो स्वतः सिंहासनावर बसून ह्मणाला "पहा, याप्रमाणें ईश्वर सर्व घडामोडी, फेरफार करीत आहे. तो रंकाचा राव, रावाचा रंक, काजीचा नोकर, नोकराचा काजी करीत आहे. हाच प्रकार सर्व जगांत घडून येत आहे. एकादें कुटुंब वर चढतें, नंतर पुनः तें खालावतें आणि त्याच्या जागीं दुसरें कुटुंब येतें. कांहीं कालपर्यंत एकाद्या मनुष्याची सद्दी असते. त्यानें हातांत माती घेतली तरी तिचें सोनें होतें. त्याचा तो काल संपला, कीं, दुसरा मनुष्य त्याची जागा पटकावितो. असाच क्रम दिवसेंदिवस, वर्षानुवर्ष चाललेला आहे. याप्रमाणें या विश्वांत सदैव फेरबदल–स्थित्यंतर चाललें आहे."

लगेच त्या नोकराला काजीची जागा देण्यांत आली.

## (१२) ग्रीसेल्देची गोष्ट.*

एक तरुण, विद्वान् आणि उदार असा राजपुत्र एका देशांत नुकताच गादीवर आला होता. बरींच वर्षें लोटलीं, तरी तो लग्न करून घेईना. त्यानें लग्न करून घ्यावें अशी प्रजेची इच्छा होती. कारण, गादीला कोणीतरी वारसदार हवा होता. प्रजेनें फार आग्रह केल्यावर राजानें एका अटीवर लग्न करण्याचें कबूल केलें. ती अट ही, कीं, नवरी स्वतः आपण पसंत करणार. त्या देशांत लग्नाच्या बाबतींत कोणालाहि स्वतंत्रता नव्हती. रूढि तर स्वयंवराच्या विरुद्ध होती, आणि राजाच्या मनांत तर आपल्या इच्छेप्रमाणें नवरी पसंत करावी, असें होतें. आपण हट्टानें जर राजाच्या ह्मणण्याला

---

* ही गोष्ट क्यांटबरी कथेंतील एका चतुर प्रवाशानें आपल्या श्रोतृवृंदाच्या करमणुकीसाठीं सांगितली होती.

रुकार दिकार दिला नाहीं, तर तो आपलें सर्व आयुष्य ब्रह्मचर्य-व्रतांतच कंठील; त्यापेक्षां त्याला आतां त्याच्या मर्जीप्रमाणें वागूं देणें चांगलें, असा प्रजेनें विचार करून, त्यानेंच नवरी पसंत करावी, असें ठरविलें. लग्नसमारंभाची तयारी जारीनें सुरू झाली. सरदार, जहागिरदार आणि कामगार लोकांनीं आपापल्या परीनें शक्य तितकी खटपट केली. प्रत्येक कामाची व्यवस्था उत्तम रीतीनें ठेवण्यांत आली. ठरलेल्या दिवशीं सैन्यहि तयार झालें. सर्वांनीं उंची तऱ्हेचे पोषाख करून ते गाड्यांत,व विविध वाहनांत बसून चालले होते.राजा मध्यें हत्ती-वर बसला होता. अर्धें सैन्य उजव्या बाजूला व अर्धें डाव्या बाजूला चाललें होतें. राजाच्या हुकुमाप्रमाणें सर्व सेना चालली होती. गच्च व घनदाट जंगलांतून सर्वांनां जावें लागलें. 'हा राजा, सरोवर, वृक्ष किंवा दगड यांच्याशीं लग्न लावणार आहे काय ?' असें लोक आपसांत कुज-बुजूं लागले. सरतेशेवटीं ते सर्व अरण्यांतील एका प्रदेशांत आले. तेथें एक लहानसा आश्रम होता, व त्यासमोर स्वच्छ स्फटिकाप्रमाणें पाणी असलेलें तळें होतें. तळ्याच्या कांठावर सुंदर भव्य नैसर्गिक बगीचे होते, आणि त्यांतील एका वृक्षावरील झोंपाळ्यावर एक वृद्ध मनुष्य विश्रांति घेत पडला होता. या वृद्धाबरोबर लग्न लावणार काय, असें थट्टेनें कांहीं लोक आपसांत कुजबुजले. आश्रमासमीप हत्ती येतांच राजानें थांबण्याचा हुकूम सोडला. इतक्यांत तेथें एक सुंदर, सुरूप अशी कुमारिका येऊन, वृद्ध मनुष्य विश्रांति घेत पहुडला होता त्या झोंपाळ्याला झोंके देऊं लागली.

सिंहासनारूढ होण्याच्या पूर्वीं राजा अरण्यांत पुष्कळदां आलेला होता, आणि ही कुमारिका आपल्या कामांत फार दक्ष आहे, असें त्याला आढळून आलें होतें. ती आपल्या वडिलाची मनापासून काळजी घेत असे. पाणी आणून ती त्याला स्नान घाली, आणि स्वयंपाक करून ती त्याला जेवूं घाली. झाडलोट, भांडीं घांसणें इत्यादि सर्व कामें तीच करी. काम करतांना ती नेहमीं मधुर स्वरानें गाणाऱ्या कोकिळेप्रमाणें आनंदी, उल्हासी आणि तेजस्वी दिसे. या तिच्या आनंदी स्वभावाचा

राजाच्या मनावर परिणाम झाला होता, आणि लग्न करीन तर इच्याशींच करीन, असा त्यानें संकल्पहि केला होता.

ही प्रचंड सेना पाहून त्या मुलीला फार आश्चर्य वाटलें. पुष्कळ वेळां आश्रमावरून घोड्यावर बसून जाणारा इसम, तोच हा राजा असेल, ही कल्पना तिच्या मनांत आली नाहीं. हें सर्व काय आहे, असें तिनें आपल्या बापाला पुसिलें. त्यानें सांगितलें, कीं, "हा राजा कन्येच्या--नवरीच्या शोधार्थ दूरदेशीं चालला आहे."

इतक्यांत राजा हत्तीवरून उतरून त्या वृद्ध मनुष्याजवळ आला, आणि त्यानें त्याला शिष्टाचाराप्रमाणें प्रणिपात केला. "बेटा, तुला काय पाहिज़े आहे ?" असें त्या वृद्धानें विचारतांच राजाचा चेहरा प्रफुल्लित होऊन तो ह्मणाला "आपण मला आपला जामात करावें, अशी माझी मागणी आहे."

ह्मातार्‍याचा आनंद गगनांत मावेना. तो ह्मणाला "राजा, तूं चुकतोस; माझ्यासारख्या भिकार्‍याची मुलगी वरण्याची इच्छा तूं कां करतोस ? आह्मी गरीब, दरिद्री आहों."

राजानें उत्तर दिलें "माझें या मुलीवर जसें प्रेम जडलें आहे, तसें दुसर्‍या कोणावरहि नाहीं."

"अशी स्थिति असेल, तर ती तुझीच आहे," तो वृद्ध ह्मणाला.

हा वृद्ध मनुष्य उत्तम वेदान्ती असून त्यानें आपल्या मुलीला आपलें बरेंच ज्ञान शिकविलें होतें. "या मुलीच्यासाठीं द्यावयाला लागणारी वरदक्षिणा आपल्यापाशीं नाहीं. फक्त आपण आशीर्वाद मात्र देऊं," असें त्यानें राजाला सांगितलें.राजानें आपल्या नवरीला उत्तम वस्त्राभरणें दिलीं, आणि तीं अंगावर घालण्यास सांगितलें. तिनें त्याप्रमाणें केलें. ती कन्या राज्याच्या घरीं रिक्तहस्तें गेली नाहीं.तिनें वरदक्षिणा आपल्याबरोबर घेतली. ती कोणती असेल असें तुह्मांला वाटतें? रत्नें, दागिने ठेवण्याला दिलेल्या एका पेटींत तिनें आपल्या बापानें दिलेले जुने कपडे-चिंध्या घातल्या. आतां तो वृद्ध मनुष्य तेथें एकटाच उरला. त्याच्या तैनातीला एक नोकर ठेवण्यांत आला. याशिवाय दुसर्‍या कशाचीहि त्याला अपेक्षा नव्हती.

राजानें त्या कन्येला राजवाड्यांत आणिलें. ही कन्या गरीबांच्या कुळांतील आहे, यामुळें बऱ्याच मानकऱ्यांनां हा संबंध आवडला नाहीं. आपल्यापैकीं एकाद्याची कन्या राजानें वरावी, असें त्यांच्या मनांत होतें; पण या गरीब कन्येनें ती जागा पटकाविली. तिच्याविषयीं प्रथम सर्वांच्या मनांत हेवा उत्पन्न झाला. या गरीब कन्येपुढें आपण आतां कसें लवावें, असें त्यांनां वाटूं लागलें; पण, आपल्या गोड स्वभावानें, सौम्य व प्रेमळ वर्तनानें त्या नूतन राज्ञीनें सर्वांनां मोहून टाकिलें. हळुहळू सर्वजण राणीवर प्रेम करूं लागले. कशीहि परिस्थिति येवो, राणी आपली निर्विकार आणि शांत असे.

थोड्या वर्षांत राणीला एक कन्या झाली. राजाराणींनां फार आनंद झाला. कन्या सुमारें तीनचार वर्षांची होतांच राजा राणीकडे आला, आणि सांगूं लागला, कीं, "राज्यांत बंडाई उत्पन्न होणार आहे, आणि हें बंड फार अनिष्ट दिसतें." याचें कारण काय, असें राणीनें विचारतां त्यानें सांगितलें, कीं, "मीं जेव्हां तुझ्याशीं लग्न केलें, तेव्हां मानकरी, प्रधान, सरदार इत्यादि मंडळीच्या मनांत हेवा उत्पन्न झाला, आणि आतां या गरीब कुळांत उत्पन्न झालेल्या आईपासून निर्माण झालेल्या कन्येला राज्यपद मिळणार आहे, ही कल्पना त्यांनां सहन होत नाहीं. राज्यपद उत्तम कुळांत जन्मलेल्यालाच मिळावें, आणि यास्तव आपण मुख्य प्रधानाचें मूल दत्तक घ्यावें, अशी त्यांची इच्छा आहे. आपली कन्या थोर झाल्यावर सर्वांच्या आग्रहानें दुसरें मूल दत्तक घेतलें, तरी पुढें दोघांमध्यें वांकडें येणारच. काय तडजोड करावी याबद्दल पुष्कळ विचार करून पाहिला. या कन्येला मारून टाकिल्याशिवाय दुसरा मार्गच दिसत नाहीं."

नंतर ग्रीसेल्दा राणीनें उत्तर दिलें "आपल्याबरोबर राज्यपदाचा उपभोग घ्यावा, अशी माझी मुळीं इच्छाच नव्हती. माझी इच्छा मीं आपलीच केली आहे. माझें व्यक्तित्व, मीपणा मीं आपल्यांत मिसळून टाकिला आहे. त्यापैकीं जें कांहीं शेष राहिलें आहे, तें आपल्या मर्जी-विरुद्ध जावें ह्मणून नव्हे, तर आपल्या सेवेसाठीं ह्मणून ठेवून घेतलें

आहे. आपल्या मर्जीप्रमाणें कन्येची व्यवस्था करा. खरें ह्मणाल, तर ती माझी कन्या, असें माझ्या अंतःकरणानें केव्हांच घेतलें नाहीं."

आपल्या पतीविषयीं तिची भक्ति कशी होती, आणि त्याच्याशीं तिची वागणूक कशी होती, याचें हें उत्तर चांगली साक्ष देतें.

दुसऱ्या दिवशीं मध्यरात्रीं त्या कन्येला उचलून नेण्यांत आलें, आणि तिला मारेकऱ्याच्या हवालीं केली आहे, असें राजानें कांहीं वेळानें कळविलें. राणीची वृत्ति अगदीं शांत, आनंदी आणि उल्हसित, जणूं काय कांहींच घडलें नाहीं, अशी होती. कोणत्याहि बाह्य परिस्थितीनें चलबिचल न होणें, हाच वेदान्त.

राजाला नंतर वाटलें, कीं, प्रत्येकजण आतां खूष होऊन जाईल. पुढें एकदोन वर्षांत राजाला एक पुत्र झाला. त्या मुलावर सर्वांचें प्रेम जडलें; पण तो पांचसहा वर्षांचा होतो न होतो, तोंच राज्यांत पुनः गडबड सुरू झाली.

राजा ह्मणाला "तूर्त परिस्थिति अशी आहे, कीं, तसें न केलें तर राज्यांत यादवी सुरू होईल, ह्मणून या मुलालाहि मारिलें पाहिजे."

हें ऐकून राणी हंसून आपल्या उल्हसित वृत्तीनें ह्मणाली "माझा खरा आत्मा ह्मणजे हें राष्ट्र आहे. माझें खासगी असें कांहीं नाहीं. मी सूर्याप्रमाणें नेहमीं देत असतें, कांहीं घेत नाहीं."

आह्मांला कोणतीहि इच्छा नाहीं व कशाचीहि आसक्ति नाहीं, तर आमचा आनंद कशानें कमी होणार? सूर्याप्रमाणें आह्मीं नेहमीं देत आणि प्रकाशित असावें. झालें. त्या मुलाचीहि व्यवस्था लावण्यांत आली. पुढें थोड्या वर्षांनीं राणीला तिसरें मूल झालें. पण तें तीनचार वर्षांचें होतांच त्याचीहि तीच गत झाली.

राणीनें आपली उल्हासित वृत्ति कशी कायम ठेविली? राजवाड्यांत आल्यापासून दररोज ती आपल्या खोलींत जात असे, आणि उंची वस्त्राभरणें काढून टाकून, पेटींत राखून ठेवलेले आपले जुने कपडे, चिंध्या

अंगावर घालून या साध्या वेषांतच आपण कोण आहों, याचा—अध्यात्म्याचा विचार ती करीत असे, व साक्षात्कार घेत असे. शेक्सपीयरनें ह्मटलें आहे, कीं, "मुकुट धारण केलेलें मस्तक काळजी आणि चिंता यांनीं त्रस्त व दडपून गेलेलें असतें." पक्ष्याप्रमाणें सरोवरतटाकीं गानविहार करणारी आपण अरण्यकन्यका आहों, हें ती केव्हांहि विसरली नाहीं. राजवाड्यांत जरी तिची स्वतंत्रता नाहींशी झाली, तरी तिला त्याबद्दल यत्किंचित् वाईट वाटलें नाहीं, व तिनें स्वतःला तेथील कोणत्याहि व्यवहारांत जखडून घेतलें नाहीं. कोणत्याहि वस्तूवर तिनें आपली आसक्ति ठेविली नाहीं. तिनें स्वतःला—आत्म्याला नेहमीं भोंवतालच्या परिस्थितीपासून अलिप्त ठेविलें. ईश्वरचिंतनांत ती सदैव मग्न असे. याप्रमाणें सर्व वासना, आसक्ति यांनां दूर सारून तिनें आपली आत्मोन्नति साधिली. 'कर्तव्य' असें तिला आतां कांहीं राहिलें नाहीं. ती सर्व बंधनांपासून मुक्त झाली. उदारसान, खिन्न होण्याचा प्रसंग तुह्मांवर आल्यास, तुह्मी सर्व आसक्ति, संबंध, इच्छा, गरजा टाकून द्या, ह्मणजे तुह्मी मुक्त व्हाल. याप्रमाणें राणीनें राजवाड्यांत असेतोंपर्यंत आपली उल्हसित वृत्ति कायम ठेविली होती.

एका रात्रीं राजा तिच्यापाशीं येऊन ह्मणूं लागला, कीं, आमचीं अपत्यें मारून कसें चालणार? दत्तकाची कल्पनाहि मला पसंत नाहीं. मीं पुष्कळ विचार केला, आणि मीं दुसरें लग्न केल्याशिवाय निर्वाह नाहीं, त्याशिवाय मला शांतता मिळणार नाहीं, असें माझें ठाम मत झालें आहे."

राणीनें या गोष्टीला खुषीनें संमति दिली. कारण तिचें सुख दुसऱ्यावर—राजावर अवलंबून नसून स्वतःवरच अवलंबून होतें. आपल्या आत्म्यापासून—अंतरात्म्यापासून तिला सर्व कांहीं सुख मिळत असे. पति, पिता आणि अपत्यें यांपासून तिनें सुखाची अपेक्षा केली नाहीं.

तिची समाधानवृत्ति पाहून राजाला आश्चर्य वाटून "तूं पुढें काय करशील?" असें त्यानें विचारिलें.

तिनें ह्मटलें "आपली इच्छा तीच माझी इच्छा."

राजा ह्मणाला "तूं येथें राहशील, तर घरीं कलह माजेल; याकरितां तूं अरण्यांत जावें हें बरें."

लगेच तिनें उंची वस्त्राभरणें काढून टाकिलीं, आणि आपलीं जुनीं वस्त्रें परिधान करून अरण्याचा मार्ग सुधारिला. ती मोठ्या खुषीनें आणि आनंदानें आपल्या बापाकडे गेली. बापहि तिच्याप्रमाणें आनंदांत होता. राजानें ठेविलेला नोकर पुनः परत राजाकडे पाठविण्यांत आला.

पुढें एके दिवशीं राजा त्या आश्रमावरून जात असतां, त्याच्या मनांत तिच्याविषयीं दया उत्पन्न होऊन तिचें सांत्वन करावें, ह्मणून तो तिकडे वळला, आणि पहातो तों ती हंसतमुख आणि आनंदी आहे. सांत्वनाची जरूरीच राहिली नाहीं. "राजवाड्यांत येऊन नूतन भार्येचें स्वागत करिशील का?" असें राजानें विचारितांच तिनें आपखुषीनें होकार दिला. दुसऱ्या लग्नाची सर्व व्यवस्था तिच्याकडे सोंपविण्यांत आली, आणि ती तिनें इतकी चोख ठेविली, कीं, सर्व लोक फार खूष झाले. नवीन नवरी लवाजम्यानिशीं मोठ्या थाटानें आणि वैभवानें वाजतगाजत आली, आणि ग्रीसेल्दा व इतर स्त्रिया यांनीं तिचें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. ग्रीसेल्दा आणि नवीन नवरी यांची भेट झाल्यावर ग्रीसेल्देनें मातेप्रमाणें तिचें चुंबन घेऊन तिला आलिंगन दिलें, आणि आपल्या कन्येप्रमाणें ती तिच्यावर प्रेम करूं लागली. भावी राज्ञीचें सौंदर्य पाहून सर्व स्त्रिया मोहित झाल्या; पण जुन्या राज्ञीचें नैतिक सौंदर्य, मनाची समता वगैरे पाहून सर्वांनां फार आश्चर्य वाटलें. भावी राज्ञीनें बरोबर आपले दोन लहान बंधु आणिले होते. त्या देशाच्या रूढीप्रमाणें लग्नाप्रीत्यर्थ सर्व लोकांनां एक मोठी मेजवानी देण्यांत आली. ग्रीसेल्देकडे मेजवानीची सर्व व्यवस्था होती. ग्रीसेल्देचा शांत, उल्हासी चेहरा पाहून सर्वांचीं अंतःकरणें विरघळलीं, आणि सर्वांच्या नेत्रांतून अश्रु एकसारखे येऊं लागले. लग्नसमारंभ आटपल्यावर तिनें परत अरण्यांत जावें, ही कल्पना त्यांनां असह्य झाली. जसजशी मंडळी भोजन करूं लागली, तसतसे ग्रीसेल्देविषयीं विचार पार मावळत चालले; पण सरते

शेवटीं जेव्हां ती मंडळीचा निरोप घेऊं लागली, आणि पुनः जरूर लागल्यास मला खुशाल पाचारावें अशी राजाची विनंति करूं लागली, तेव्हां सर्व स्त्रियांचीं हृदयें विदीर्ण झालीं, आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. कृतकर्माबद्दल—आपल्या निष्ठुरपणाबद्दल त्यांनां आतां पश्चात्ताप झाला, आणि त्या ह्मणाला “ बाई, तूं भिकाऱ्याची मुलगी नाहींस, तर देवकन्या आहेस !” नंतर त्यांनीं राज्यांत शांतता राखण्यासाठीं तिनें आपलीं मुलें कशीं मारूं दिलीं, हें सांगितलें. तो वृत्तान्त ऐकून भावी राज्ञी रडूं लागली. ती ह्मणाली “तुमची कन्या आणि मुलगे मारले गेले, आणि मला रक्ताच्या नदींतून येथें यावें लागलें.”

नंतर सर्वजण राजाची निर्भत्सना करूं लागले. राजा उठून ह्मणाला “ कुलीन स्त्रिया, मानकरी व इतर जनहो, ग्रीसेल्देशिवाय बाकी तुह्मी सर्वजण येथें रडत आहां. सुखदुःखांच्या मिश्रणानें माझीहि स्थिति तशीच झाली आहे. प्रजाजनहो, मी तुह्मांला दोष देत नाहीं. तुह्मी माझीं लेंकरें आहांत. माझे नेत्र अश्रूंनीं भरलेले आहेत. पण ते दुःखाचे अश्रु नसून आनंदाचे आणि प्रेमाचे आहेत. तुमचे अश्रुहि तसेच होऊंद्यात.”

नंतर ग्रीसेल्देकडे वळून तो ह्मणाला “ सर्व राज्यांत तूंच एकटी सुखी आहेस. तूं अशीच नेहमीं सुखी आणि आनंदी रहा.”

नंतर लोकांनां सर्व गोष्टींचा खुलासा सांगण्यांत आला. नूतन वधू व तिचे बंधु हीं जवळच्या एका राजाचीं दत्तक मुलें होतीं. वस्तुतः हीं मुलें राजा आणि ग्रीसेल्दा यांचीं होतीं. त्यांनां मारेकऱ्यांच्या ताब्यांत दिल्यावर अशा सुंदर व तेजस्वी मुलांनां ठार मारण्यास त्यांचें मन तयार होईना. त्यांनीं तीं मुलें नजीकच्या दुसऱ्या राज्यांत सोडून दिलीं. तेथील राजाला हीं पोरकीं मुलें सांपडलीं, आणि त्याला स्वतःचें मूलबाळ कांहीं नसल्यानें हीं कोणातरी राजाचीं असावींत, असें जाणून त्यांनां आपलींच मुलें असें मानून त्यानें तीं लहानाचीं थोर केलीं. सर्वांनां हा खुलासा ऐकून फार आनंद झाला. आपली कन्या राजाला वरणें शक्यच नव्हतें, तेव्हां ग्रीसेल्दा हीच राणी झाली; आणि तिच्या मुलांनां गादी प्राप्त झाली.

या गोष्टीवरून ईश्वर उदार आहे, आणि तो आपलीं ऋणें (निष्काम कृत्यें) सव्याज फेडतो, हें सिद्ध होतें.

याप्रमाणें प्रत्येक विवाहित स्त्रीनें प्रेमाकरितां सर्वसंगपरित्याग करावा. यालाच पतिव्रता आणि पत्नीव्रत असें ह्मणतात. याचा अर्थ असा, कीं, पतीमध्यें पत्नीनें वास करावा, आणि पत्नींत पतीनें असावें. स्त्रीनें आपल्या पतीला ईश्वर मानावें, तिनें आपला देह आणि आपलें मन पतीला अर्पण करावें, आणि त्यानें पत्नीमध्यें वसणाऱ्या ईश्वराला वाहून घ्यावें. यांत व्यक्तिविषयक किंवा स्वार्थी असें कांहीं नाहीं. हिंदुस्तानांत लग्नसमारंभ कांहीं ठिकाणीं नदीतटाकीं खुल्या हवेंत होतो. रम्यं वारा वाहत असतो आणि सूर्य वर तळपत असतो. पाणिग्रहणांत मुख्य कल्पना ही असते, कीं, नवरी आपला हात पतीच्या हातांत देते, आणि तिचा व आपला असे दोन्ही हात, पति परमेश्वराला अर्पण करितो. ग्रीसेल्देप्रमाणें स्त्रियांनीं असंग राहून स्वतःला ईश्वराला—आत्म्याला अर्पण करावें.

पुरुषांनींहि तसेंच करावें. पति पत्नींत, पत्नी पतींत याप्रमाणें दोघेंहि परस्परांत लीन झालीं, पूर्णपणें मिसळून गेलीं, तर वैवाहिक स्थितींत सुख झाल्याशिवाय राहणार नाहीं. प्रेम आणि आयुष्य सुखावह होणें याचें गुह्य, आपलें व्यक्तित्व विसरणें, पूर्ण तादात्म्य पावणें यांत आहे.

## (१३) राम आनंदांत मग्न.

आत्म्याला जन्म नाहीं, सूक्ष्म शरीराला जन्म आहे. देव किंवा आत्मा जन्मातीत आहे. विश्व हें माझें शरीर आहे, सर्व हवा माझा श्वास आहे, वृक्ष माझे केंस होत, नद्या माझ्या धमन्या आणि पर्वत माझ्या अस्थि आहेत.

कांहीं स्थळीं संध्याप्रकाश बराच वेळ असतो, आणि कांहीं ठिकाणीं सूर्य लवकर क्षितिजावर येतो. तुह्मीं आपल्या मर्जीला येईल त्याप्रमाणें मधल्या ठिकाणीं किंवा वाटेल तेथें रहावें. इच्छा ही शक्ति आहे. प्रकाश, उष्णता, विद्युत् व ध्वनि हीं शक्तीचीं निरनिराळीं रूपें आहेत. परमाणु

शक्तीचीं केंद्रें आहेत, असें लायबनिझ ह्मणतो. जड पदार्थ ही माझी इच्छाशक्तिच आहे. बर्फ हें पाणी आहे, पाणी तर पाणीच आहे. त्याप्रमाणें मी आकार आहें, व आकारांत राहणाराहि पण मीच आहें. आपण सर्व कांहीं आहों, ही भावना जागृत करा. योगज्ञान तुह्मांला शोधीत आलें पाहिजे. प्रत्येक वस्तु तुह्मांप्रत आली पाहिजे. लोकांचा सुषुम्नानाडीविषयीं गैरसमज आहे. मुख्य मार्ग सोडून ते आडमार्गानें जात आहेत. आठाचे आंकडे ( ∞ ) एकावर एक सारखे ठेविले, ह्मणजे छिद्रांच्या अगर दुव्यांच्या योगानें दोन मार्ग तयार होतात. या मार्गांवरून इडा, पिंगला या दोन नाड्यांची कल्पना सहज होईल. या नाड्या खुल्या कशा कराव्या, याविषयीं ग्रंथांत पुष्कळ विवेचन केलें आहे. या विषयाचें बारा वर्षे अध्ययन केलेल्या एका इसमाला 'रामा'नें यांतील गुह्य सांगितलें. त्यानें लगेच दुसऱ्या दिवशीं येऊन कळविलें, कीं, "इतक्या थोड्याशा अवधींत मीं पुष्कळ साध्य केलें, आणि पूर्वीपेक्षां ध्येयासमीप अधिक पोहोंचलों." सुषुम्नानाडी कशी खुली करावी, अशा विचारांत जे लोक आपला वेळ घालवितात, ते आपण होऊन आडमार्गानें जातात. अन्न पोटांत जातें, ऑक्सिजन आणि जाठररस यांशीं संयोग पावतें, आणि नंतर अन्नमार्गांतून जाऊन सर्व शरीराचें पोषण करितें. या सर्व क्रिया कशा घडतात, हें समजून घेण्याची आवश्यकता नाहीं. अन्न ज्याप्रमाणें स्वतःची काळजी घेतें, त्याच्या क्रियांविषयीं आह्मांला कांहीं काळजी किंवा दगदग करावी लागत नाहीं, त्याप्रमाणें साक्षात्काराची तीव्र इच्छा झाली, ह्मणजे 'राजयोगा'पासून तुह्मांला फायदा होत नाहीं. तुह्मी योग्यादिशेनें प्रयत्न करा, ह्मणजे सर्व मार्ग खुला होईल. श्वासाच्या निरोधासारख्या निरर्थक गोष्टीविषयीं तुमचा वेळ दवडूं नका. त्यापासून तुमचा फायदा होणार नाहीं; असा निरर्थक मार्ग स्वीकारून कोणालाहि आपलें मन एकाग्र करतां येणार नाहीं. श्वासनिरोधानें मन ताब्यांत येईल असें समजणें ही चूक—खोटें तर्कशास्त्र आहे. श्वासाचा—प्राणाचा निरोध केला असतां

मनाचा निरोध होतो, असें प्रत्येक शास्त्रज्ञ सिद्ध करूं पहातो. आधीं मनाचा निरोध करा, ह्मणजे प्राणाचा निरोध आपोआप होईल.

लोकांच्या सूचनांनां न जुमानतां 'रामा'नें या ह्मणजे लोकविरुद्ध मार्गानें प्रयत्न केला. त्यानें या विषयाचा अभ्यास प्रचारांतील वहिवाटीप्रमाणें करण्याचें नाकारिलें. त्यानें मनाचा निरोध केला, प्राणाचा–श्वासाचा निरोध आपोआप झाला. एकदां 'रामा'नें एका तळ्यांत बुडी मारिली. दुसऱ्या मित्रांनींहि बुड्या मारिल्या. पण ते लवकर वर आले, आणि पाहतात तों 'राम' नाहीं. त्यांनां वाटलें, कीं, 'राम' बुडाला असावा, किंवा सुसरीनें त्याला खाऊन टाकिलें असावें. ते फार भयभीत झाले. कांहीं वेळानें 'राम' वर आला, आणि इच्छाशक्तीच्यायोगें श्वासाचा निरोध करितां येतो, हें त्यानें सिद्ध करून दाखविलें. सारभूत अशा आत्मतत्त्वांत (सदैव चिंतन) राहून साक्षात्कार प्राप्त करून घेण्याचा, आणि सरूपता–ईश्वराशीं तादात्म्य–साध्य करून घेण्याचा प्रयत्न करा. श्वास किंवा प्राण, तो तर तुमचा नोकर आहे. विश्वांतील प्राणांवरहि तुमचा ताबा आहे. 'माझ्या छोट्या, माझ्या छबुकड्या,' असें ह्मणून आई आपल्या मुलाला छोटाच (देहात्मत्वभावनेनें) बनवून टाकिते. या सर्व स्वप्नांतून–निद्रेतून जागे व्हा.

मी ईश्वर आहें ही भावना जागृत करा! विश्वाचा स्वामी, ब्रह्मांडाचा नायक! याच मुख्य गोष्टीचा तुह्मीं अनुभव घेतला पाहिजे. सूर्यांचा सूर्य, प्रकाशांचा प्रकाश मीच आहें. नर-नारी, राव-रंक, श्रीमंत-गरीब, तुह्मी कां बरें आहां? कारण तुमची तशी भावना झाली आहे ह्मणून. आपण देव आहों असें तुह्मांला वाटूंद्या, ह्मणजे तुह्मी देवच व्हाल. घर बांधावयाला पुष्कळ वेळ लागतो; पण तें मोडावयाला एक क्षण पुरे. आपला तुरुंग तयार करण्यास तुह्मीं पुष्कळ वेळ खर्च केलात, आतां तो मोडून टाका. देवांचा देव तुह्मी आहां. खऱ्या देवाचा–आत्म्याचा अनुभव घ्या. पहा, तुह्मांपुढें अनेक ब्रह्मांडें कशीं पसरलीं आहेत. सूर्य क्षितिजावर येण्यापूर्वींचा पहांटेचा देखावा मनाला प्रसन्न आणि

उन्नत करणारा असतो, आणि मन तसें झाल्यावर त्याला आनंदगिरीच्या उच्च शिखरावर नेऊन बसविणें सोईचें होतें. गिल्लीच्या-चिनीच्या एका टोंकाला मारून ती आपण थोडीशी वर उडवून, नंतर जोरानें दुसरा टोला देऊन तिला आकाश दाखवितों; त्याचप्रमाणें मनाला थोडेंसें उन्नत करून त्याला आध्यात्मिक वातावरणांत फेंकून द्या, ह्मणजे तें थेट ईश्वराप्रत पोहोंचेल. पक्ष्याचें मंजुळ गाणें, वाऱ्याचा शीतलपणा, उल्हासकारक हवा, व झऱ्याचें झुळझुळ वाहणें, यांच्यायोगानें मनाला स्वाभाविकपणें प्रथमचें उन्नयन मिळून प्रसन्नता वाटते. ही प्रसन्नता उत्पन्न झाल्यावर अंतःकरणापासून-एकदिलानें उच्चारलेल्या प्रणवमंत्राच्या गानानें मनाला उच्च भराऱ्या मारूंद्या.

आरशाप्रमाणें बालरवीकडे द्वैतदृष्टीनें नव्हे—तर पूर्ण अद्वैतदृष्टीनें पहा. परमात्मा हा मीच; माझा आत्मा आहे. मी तो आहें. स्त्रिया आपलें मुखकमल आंगठ्यावरील आरशांत पहातात. त्यांनां आरसा दिसत नाहीं, तर आपलें मुखकमल आपल्यासमोर आहे असें त्यांनां दिसतें. बाहेर दिसलेलें मुखकमल आपलेंच आहे, अशी त्यांची खात्री असते. त्याचप्रमाणें सूर्य हा आपला आत्मा आहे, असें वेदान्त्याच्या प्रत्ययाला येतें. सूर्य माझी छाया आहे, मी प्रणवाचा अर्थ आहें; वाणी, ओंठ, भावना व कृति हेंच सांगतात.

'मुला, इकडे ये!' या तुमच्या शब्दांत जोर नाहीं. पण तुमच्यापासून बराच काल दूर असलेलें आणि ज्याला पहाण्याविषयीं तुह्मी फार उत्सुक आहां, असें एकादें मूल तुमच्या दृष्टीला पडतांच, 'ये बेटा, इकडे ये' असें तुह्मी तुमच्या प्रत्येक रोमांतून, नाडींतून ह्मणतां, लगेच तुह्मी त्याच्याकडे धांव घेतां, त्याला घट्ट कवटाळितां. हीच तुमच्या अंतःकरणाची किंवा खऱ्या कळकळीची भाषा. शरीराच्या प्रत्येक तंतूतून ॐकाराचें गान करा. प्रथम सावकाश सुरू करा. प्रारंभीं आवाज घशांतून येतो, नंतर छातींतून. नंतर खालून खालून पृष्ठवंशाच्या मुळापासून येतो. नंतर तेथें विद्युच्छक्तीचा आघात होतो व सुषुम्नामार्ग (?)

खुला होतो, श्वासोच्छ्वास तालबद्ध होतो आणि सर्व रोगबीजें भस्म होऊन जातात. चंद्राचा ज्याप्रमाणें सूर्याशीं संबंध आहे, तसाच सूर्याचा आपल्याशीं आहे, असें वेदान्ती समजतो. बाह्यतः चंद्र स्वयंप्रकाश आहेसा वाटतो, पण वस्तुतः चंद्राचा सर्व प्रकाश सूर्यापासून येतो. त्याचप्रमाणें सूर्यहि स्वयंप्रकाश वाटतो, पण त्याचें तें वैभव आणि तेज माझ्यापासूनच येतें.

स्वप्नामध्यें आह्मी पुष्कळ वस्तु पहातों. उदाहरणार्थ, विद्युद्गोल किंवा हिरा. प्रकाशाशिवाय कांहीं दिसत नाहीं, आणि वस्तुदर्शन होण्यास स्वप्नांत प्रकाश नाहीं. तर मग स्वप्नांत हिरा दाखविणारा प्रकाश कोणता? तो आत्म्याचा प्रकाश. स्वप्नांतील सूर्याचें वैभव ह्मणजे तुमचाच प्रकाश होय. माझ्या वैभवांतूनच सूर्याचें वैभव दृग्गोचर होतें. याप्रमाणें वेदान्त्याची भावना असते. या जड सृष्टींतील सूर्य प्रकाशाचा—ज्ञानाचा द्योतक आहे. ह्मणून सूर्याकडे पाहिलें असतां, मी प्रकाशाचा (ज्ञानाचा) प्रकाश आहें, असें मला वाटतें. सूर्य शक्तीचा द्योतक आहे. तो सर्व ग्रहांनां आपल्याभोंवतीं फिरावयाला लावितो आणि सर्वांनां जीवन देतो.

प्रणवाचा साक्षात्कार घेण्याची दुसरी तऱ्हा.

| | | | |
|---|---|---|---|
| ॐ | अ=सत्ता, जीवित. | (सत्) | सच्चिदानंद. |
| | ऊ=प्रकाश, ज्ञान. | (चित्) | |
| | म्=आनंद, सुख. | (आनंद) | |

संकेतलिपीप्रमाणें पहातां प्रणव (ॐ) सूर्यामध्यें सुवर्णाक्षरांनीं लिहिला आहे. प्रणव (ॐ कार) आणि सूर्य (जड चिन्ह) हे माझ्या प्रतिमा किंवा अक्षरें आहेत.

सूर्य हा सौंदर्याचा द्योतक आहे. तो सर्व ग्रहांनां आपल्याकडे ओढतो. तो किती तेजःपुंज आणि प्रकाशमान आहे! तो आनंदाचाहि द्योतक आहे. मी सत्य, वैभव, आनंद आहें, याचा अनुभव घ्या. सर्व गुणधर्म माझेच आहेत. ते मीच आहेत. सच्चिदानंद मी आहें. सूर्य

हा माझी वेडीवांकडी प्रतिमा आहे. मी प्रणवाला भजत नाहीं. प्रणव मला भजतो. सर्व ग्रह आणि इतर गोल ज्याभोंवतीं फिरतात, तो सूर्य मीच आहें. मी कूटस्थ आणि सनातन आहें! आपले सर्व भाग दाखविण्याकरितां, आपलें सर्वस्व व्यक्त करण्याकरितां, हें सर्व विश्व माझ्यासमोर गरगर फिरत आहे. सूर्य माझ्याकरितांच माझ्यासमोर प्रकाशतो. ख्रिस्ताचें अंतःकरण, शेक्सपीयरचा मेंदू आणि प्लेटोचें मन हीं सर्व माझ्याच वैभवावर पुष्ट होतात, आणि माझ्याच प्रकाशाचें प्राशन करितात. लोकांनां वाटतें, कीं, सूर्यामुळें स्नायु चलनवलन पावतात, आणि त्यांनां काम करितां येतें. माझ्या दिव्य सत्तेमुळेंच हें सर्व कांहीं घडून येतें.

सूर्याचा सूर्य, प्रकाशाचा प्रकाश यांतच—आत्म्यांतच–रहा. माझ्या सत्तासागरापासून सर्व लाटा उत्पन्न होतात. मी बादशहांचा बादशहा आहें ! सर्व भूपालांच्या रूपानें, पुष्पांच्या रूपानें मी प्रगट होत आहें. सूर्यकिरणांमध्यें मीच स्मित करितों. वीरांच्या स्नायूंनां मीच चलन देतों. सर्वत्र माझीच इच्छा परिपूर्ण होत आहे. माझ्या साम्राज्यामुळें आणि वैभवामुळें प्रत्येक प्राण्याला त्याचें अन्न मिळत आहे, आणि पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरत आहे!

कुविचार आणि ऐहिकवासना यांनां माझ्यासमोर येण्याचा हक्क नाहीं. क्रोध लोभ इत्यादि क्षुद्र तमोरूपी मनोविकारांनां माझ्या पवित्र सान्निध्यांत येण्याचा हक्क नाहीं. उच्च व नीच या सर्वांत मी व्यापून आहें, प्रेक्षक, नट आणि सूत्रधार मीच आहें. येशूमध्यें मीच आहें, अत्यंत नीचामध्यें मीच आहें. मी सर्व कांहीं आहें. तुमचा वासनाविषय मीच आहें. घनगर्जितामध्यें मीच निनाद करितों. क्षुब्ध समुद्रामध्यें मी तांडव करितों. फ्रांकलिन, न्यूटन, केल्व्हीन आणि इतर प्रेषित यांचीं हृदयें मीच आहें. उपवनें आणि देखावे यांचे उगमस्थानहि माझ्याशिवाय अन्य कोणी नाहीं. अशा प्रकारच्या भावनेनें ॐ काराचा —प्रणवाचा–अर्थ वर दिल्याप्रमाणें माना. क्रम सोपा आहे. प्रणवाचें गायन करा, अर्थ आचरणांत आणा आणि ईश्वराप्रमाणें तो कृतींत

दाखवा. क्षुद्र वासनांनां लवणें हें स्वाभिमानशून्यतेचें लक्षण आहे. आपल्या वैभवांत आणि तोऱ्यांत चाला. ऐहिक वासनांनीं जर तुह्मी त्रस्त किंवा क्षुब्ध झालां, तर तुह्मी प्रणवाचें गान करीत नाहीं, हें सहज सिद्ध होतें.

सुषुम्ना, सहस्रारकमल इत्यादि गोष्टींविषयीं तुह्मी आपली वेळ दवडूं नका. सर्व कांहीं तुह्मांला प्राप्त होईल. तुमची विलक्षण प्रगति होईल. चिंता, काळजी, अस्वस्थता यांनां झुगारून लावा. सर्व ज्ञान तुह्मांला मिळेल. सर्व विश्व तुमच्याकडे स्वतः होऊन येईल. प्रत्येक पदार्थ तुह्मांला शरण येईल. वांकड्यातिकड्या आडमार्गांचा मात्र स्वीकार करूं नका, तसें केल्यास तुह्मांला पश्चात्ताप होईल.

# THE ANCIENT SPIRITUALISM OF INDIA.

## हिंदुस्तानची प्राचीन दिव्यदृष्टि.*

कुलीन स्त्रिया व सभ्य गृहस्थ यांच्या रूपांत असलेल्या प्रियकरांनों —ईश्वरांनों,

मी अमेरिकेला प्रथम आल्यावेळीं, सियाटल येथें उतरलों. तेथें स्पिरिच्युॲलिस्ट लोकांनीं‡ माझें प्रथम स्वागत केलें. सियाटल येथील कांहीं स्पिरिच्युॲलिस्ट लोक माझे प्रिय–जिवलग मित्र आहेत. आरगान प्रांतांत पोर्टलंड येथें स्पिरिच्युॲलिस्ट लोकांनीं माझ्या व्याख्यानांची सर्व व्यवस्था केली. याशिवाय दक्षिण अमेरिकेंत मला कांहीं उत्तम स्पिरिच्युॲलिस्ट भेटले. एकंदरींत अमेरिकेंतील स्पिरिच्युॲलिस्ट लोक फार उदार, थोर मनाचे, कनवाळु आणि खरे ख्रिश्चन ( धार्मिक ) आहेत, असें माझें मत आहे. अमेरिका सोडण्याच्या सुमाराला, माझें प्रथम स्वागत केलेल्या आपल्याच मंडळींत मी उभा आहें, आणि त्यांच्यासमोर पुनः भाषण करण्याची संधि मला प्राप्त झाली आहे, हें पाहून मला फार समाधान होत आहे.

मित्रमंडळी हो, आज आह्मी दाट नभोमंडळाखालीं, वृक्षाच्या दाट मेघमंडपांत बंधु या नात्यानें जमलेले आहों. आज 'हिंदुस्तानांतील प्राचीन दिव्य दृष्टि' याविषयीं प्रथम विवेचन करून नंतर दुसऱ्या विषयाकडे आह्मी वळूं.

हिंदुस्तानची प्राचीन दिव्यदृष्टि, या देशांतील स्पिरिच्युॲलिस्ट लोकांच्या पद्धतशीर संस्थेसारखी कांहींशी आहे, असें जरी नाहीं, तरी हिंदुस्तानच्या प्राचीन धर्मग्रंथांमध्यें दिव्यदृष्टीविषयीं ठिकठिकाणीं उल्लेख

---

* ता. १८ जुलै १९०४ इसवी रोजीं झालेलें व्याख्यान.

‡ अमेरिकेंत व विलायतेंत मरणोत्तर मनुष्याची स्थिति कशी असते, याची शास्त्रीयदृष्ट्या चौकशी करणाऱ्या आणि मृत व्यक्तीशीं दळणवळण ठेवणाऱ्या लोकांनां स्पिरिच्युॲलिस्ट अशी संज्ञा आहे.

सांपडतात. मीसुद्धां दिव्यदृष्टीप्रमाणें लिहीत, बोलत आणि काम करीत आहें. भगवद्गीतेविषयीं तुह्मीं सर्वांनीं बरेंच ऐकिलें आहे. ही भगवद्गीता कुरुक्षेत्रावर भारतीय युद्धाच्या आरंभीं श्रीकृष्णांनीं अर्जुनाला सांगितली. कुरुक्षेत्राहून सुमारें दोनशें मैल लांब असलेल्या संजयानें कुरुक्षेत्रावरील सर्व इत्थंभूत हकीगत—श्रीकृष्णानें अर्जुनाला सांगितलेली गीताहि —धृतराष्ट्राला सांगितली. संजयाला हें कसें करितां आलें ? व्यास गुरूच्या अनुग्रहानें त्यालाहि दिव्यदृष्टि मिळाली होती. ज्याचें वाचन किंवा परिशीलन केलें असतां परमात्म्याशीं तादात्म्य किंवा ऐक्य झाल्यावांचून राहत नाहीं, असा या जगांत 'योगवासिष्ठ' नांवाचा एक अत्युत्कृष्ट वेदान्त-ग्रंथ आहे. हा ग्रंथहि दिव्यदृष्टीचें फल होय. महर्षि वाल्मीकीलाहि या दिव्यदृष्टीचा लाभ झाला होता, आणि त्यानें आपलें 'रामायण' नांवाचें वीरकाव्य शेंकडों वर्षें आधींच लिहून ठेविलें होतें.

महाभारतांत बाणासुर राजाची कन्या ' उषा ' हिची गोष्ट सांगितलेली आहे. हिच्या स्वप्नांत एक दिव्य पुरुष दिसला, आणि त्याच्यावर हिचें प्रेम बसलें. पुढें स्वप्नांतील पुरुष न मिळाल्यामुळें ती एकसारखी झुरणीला लागली. राजानें वैद्याचीं औषधें, मंत्रतंत्र इत्यादि पुष्कळ उपाय करून पाहिले, पण राजकन्या कांहींकेल्या सुधारेना. राजकन्येची चित्रलेखा नांवाची एक हुषार दासी होती. तिनें मात्र राजकन्येच्या विकाराचें खरें कारण ताडिलें. हिला कामविकाराची बाधा झालेली आहे, हिचें मन कोणा पुरुषावर जडलें आहे, अशी तिनें आपली खात्री करून घेतली. ती चित्रकलेंत मोठी पटाईत होती. तिनें त्यावेळच्या जगांतील मनुष्यांचीं, देवदानवांचीं चित्रें काढावयाला सुरुवात केली. तिन्ही लोकांतील सर्व चित्रें काढिलीं, तरी उषेच्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं. पुढें द्वारकेंतील श्रीकृष्णाचें चित्र काढतांच, उषेची नाडी जोरानें वाहूं लागली. श्रीकृष्णाच्या मदन नामक पुत्राचें चित्र काढिल्यावर तर तिची नाडी अधिकच जोरानें चालूं लागली, आणि मदनपुत्र अनिरुद्ध याचें चित्र काढितांच उषेचें अंतःकरण एकदम उचंबळूं लागलें, आणि तिनें

आपली मान लज्जेनें खालीं घातली. याप्रमाणें राजकन्येच्या रोगाचें खरें कारण समजून आलें, व तिचा अनिरुद्धाशीं विवाह करण्यांत आला. येथें असा प्रश्न उद्भवतो, कीं, चित्रलेखेनें त्यावेळचे सर्व देवदानव आणि मनुष्यें पाहिलीं होतीं काय ? पाहिलीं नसतील, तर त्या सर्वांचीं चित्रें तिनें कशीं काढिलीं ? ती परमात्म्याशीं—सर्वेश्वराशीं तादात्म्य पावली होती, तिला दिव्यदृष्टि मिळालेली होती, त्यामुळें सर्व कांहीं तिला अवगत झालें होतें. या प्रकारचीं अनेक उदाहरणें देतां येतील; पण, तसें करण्याची आवश्यकता नाहीं. जगांतील सर्व ज्ञान प्राप्त करून देणारी वस्तु किंवा शक्ति, अंतर्दृष्टि किंवा दिव्यदृष्टि आहे, इतकें सांगितलें असतां पुरे होईल. वेदान्तांत सांगितलेल्या या दिव्य दृष्टीचें अनेक सुंदर दृष्टांतांच्या योगानें स्पष्टीकरण करितात. ग्रंथांचा अभ्यास आणि गुरु यांच्या द्वारें मिळालेलें ज्ञान या दोहोंचा भेद दाखविण्यासाठीं मी एक गोष्ट सांगतों.

एका राजाला आपला राजवाडा रंगवावयाचा होता. त्यासाठीं पुष्कळ चितार्‍यांचे अर्ज आले. त्यांपैकीं दोन चितारी पसंत ठरून दोघांपैकीं राजवाडा रंगविण्याचें काम कोणाला द्यावें, याविषयीं त्या दोघांची परीक्षा घेण्याचें ठरलें. समोरासमोर असलेल्या सारख्या दोन भिंती राजवाड्यांत होत्या. प्रत्येकानें एकेका भिंतीवर पंधरा दिवसांत चित्रें काढून आपलें काम दाखवावें, असा त्या दोघां चितार्‍यांनां हुकूम करण्यांत आला. एकाचें काम दुसर्‍याला दिसूं नये, ह्मणून भिंतीसमोर पडदे बांधून दोघांनीं आपलें काम सुरू केलें. पहिल्या चितार्‍यानें महाभारतांतील मोठमोठ्या सुंदर देखाव्यांच्या चित्रांनीं भिंत रंगवून टाकिली. दुसरा चितारी काय करीत होता हें आपणांला पुढें कळेल. दोन आठवड्यानंतर राजा परिवारासहित चितार्‍यांचें काम पाहण्यासाठीं आला. पडदे उघडून पहिल्या चितार्‍याचें काम पाहिल्यावर प्रत्येकजण आश्चर्यचकित झाला, आणि ह्मणूं लागला ‘किती सुंदर काम! यालाच बक्षिस द्यावें.’ नंतर दुसर्‍या चितार्‍याचें काम पाहण्यासाठीं त्याच्या भिंतीजवळील पडदे उघडण्यांत आले, तों काय चमत्कार सांगावा! ‘अहाहा!’ हा शब्द प्रत्येकाच्या तोंडून

निघाला, सर्वांचें श्वसन बंद झालें. सर्वांचे नेत्र त्या भिंतीकडे एकसारखे लागून राहिले. असें त्या भिंतीवर होतें तरी काय? पहिल्या चितान्यानें काढिलेलीं सर्व चित्रें या दुसऱ्या भिंतीवर होतीं, पण त्यांत फरक इतकाच होता, कीं,पहिल्या भिंतीवरील चित्रें कांहींशीं भरभरीत ओबडधोबड दिसत होतीं, आणि दुसऱ्या भिंतीवरील चित्रें इतकीं साफ, स्वच्छ आणि तकतकीत होतीं, कीं, जर एकादी माशी तेथें बसावयाला गेली तर ती सुद्धां निसटून पडेल, असें वाटत होतें. इतकें तें काम सुंदर वठलें होतें. शिवाय दुसराहि एक विशेष गुण दिसत होता. दुसऱ्या भिंतीवरील चित्रें भिंतीच्या आंत तीन यार्डांवर काढिलेलीं आहेत असें दिसे.

दुसऱ्या चितान्यानें असें चोख काम कसें केलें? तो एकसारखा, पंधरा दिवस भिंत स्वच्छ व साफ करण्यांत खपत होता.त्यानें ती भिंत घोटूनघोटून स्वच्छ आरशाप्रमाणें केली. पहिल्या भिंतीवरील सर्व चित्रांचें प्रतिबिंब दुसऱ्या भिंतींत आरशाप्रमाणें पडलें.

याप्रमाणें ज्ञान मिळविण्याचे दोन मार्ग आहेत. त्यांपैकीं एक, वरील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें पहिल्या भिंतीवर चित्रें काढण्यासारखा आहे; ह्मणजे, भूगर्भशास्त्र, ज्योतिषशास्त्र, धर्मशास्त्र आणि इतर शास्त्रें यांतील चित्रें ह्मणजे माहिती किंवा विचार आपल्या डोक्यांत भरून घेणें, हा होय. हा एक ज्ञानार्जनाचा मार्ग झाला. या मार्गानें तुह्मांला ज्ञान मिळवितां येईल; पण, प्यारे भाई, याशिवाय दुसरा एक मार्ग आहे. या मार्गांत विचार भरून घेण्याची—आंत लादण्याची क्रिया नसते, तर अंतःकरणावरील मळ झाडून टाकून तें पूर्ण स्वच्छ आणि पवित्र ठेवावें लागतें, व तें परमात्म्यांत लीन करावें लागतें. इमर्सननें ह्मटल्याप्रमाणें—

‘तवात्मा निसर्गाचिये अंतराशीं
स्फुरोंदे, तदा ऊकले गुह्यराशी’ *

---

*“Heave thine with nature’s heaving breast
And all is clear from east to west.” —Emerson.

सर्वेश्वराशीं तादात्म्य पावण्याचा मार्ग हाच आहे. वाल्ट विटमन ह्मणतो, कीं, सर्वेश्वराशीं ऐक्य बाणल्याशिवाय आह्मांला सर्वेश्वराचें ज्ञान होत नाहीं.

न ईशऐक्याविना होत साचें
अह्मां ज्ञान तें ईश–सर्वेश्वराचें.†

जगांतील मोठमोठे कल्पक आणि बुद्धिमान् पुरुष यांनां ज्ञान कसें प्राप्त झालें? या देशांत पुष्कळ प्रोफेसर, धर्मशास्त्रज्ञ, 'डॉक्टर ऑफ डिव्हिनिटी,' पदव्या मिळविलेले पंडित, रेव्हरंड आणि धर्मोपदेशक आहेत, आणि त्यांनीं आपल्या आयुष्यभर मोठमोठ्या ग्रंथांचें अध्ययन केलेलें आहे; पण, ख्रिस्तासारखा सुंदर आणि अपूर्व उपदेश यांपैकीं कितीजणांनां करितां येतो, हें सांगा पाहूं? अमेरिकेंत इतके उत्तम लेखक आणि वक्ते होऊन गेले, पण अमेरिकेंत झालेल्या सर्व व्याख्यानांत आणि भाषणांत, सप्तशब्दांच्या भाषणाइतकें जोरदार व्याख्यान दुसरें कोणतेंहि झालें नाहीं! हें सप्त शब्दांचें व्याख्यान तुह्मां सर्वांनां माहीत आहे. 'मला स्वातंत्र्य द्या, किंवा मरण तरी द्या.'‡ हेंच तें भाषण होय. गणिताचे, तत्त्वज्ञानाचे इतके प्रोफेसर होऊन गेले, पण त्यांपैकीं कितीजणांनीं न्यूटनच्या 'प्रिन्सिपिया' नांवाच्या लहान सुंदर ग्रंथासारखा दुसरा एकादा ग्रंथ लिहिला आहे? गणितग्रंथांपासून न्यूटनला जें ज्ञान मिळालें, त्याची योग्यता, त्यानें जें ज्ञान जगाला दिलें त्या मानानें कांहींच नाहीं. न्यूटनला हें ज्ञान कोठून मिळालें? त्याला हें दुसऱ्या उगमापासून–उच्चतत्त्वापासून मिळालें असलें पाहिजे. शेक्सपियरचे ग्रंथ (नाटकें) बी. ए., एम्. ए. च्या क्लासांतील विद्यार्थ्यांनां वाचावे लागतात. गरीब बिचारा शेक्सपियर कोणत्याहि विश्वविद्यालयाचा ग्रॅज्युएट नव्हता. पण त्यानें लिहिलेले ग्रंथ ग्रॅज्युएट होण्यापूर्वीं लोकांनां वाचावे लागतात. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेन्सर कोणच्याहि विश्वविद्यालयांत पसार झाला नव्हता. आपण जबरे वाचक असाल, असें

† Unless you feel all, you cannot know all—Walt Whitman.

‡ Give me liberty or give me death.

कोणीं एकानें विचारतां, तो ह्मणाला "नाहीं महाराज, इतरांप्रमाणें मी जबरा वाचणारा असतों, तर मी त्यांच्याप्रमाणें मठ्ठ किंवा शंख झालों असतों." या उदाहरणावरून असें दिसतें, कीं, ज्यांनींज्यांनीं शास्त्रांची किंवा ज्ञानाची प्रगति केलेली आहे, त्यांनां आपली कल्पना किंवा अपूर्व ज्ञान, त्या कालीं अस्तित्वांत असलेल्या ग्रंथांपासून मिळालेलें नाहीं; तर मग, असा प्रश्न उद्भवतो, कीं, ही अपूर्व कल्पनाशक्ति किंवा ज्ञान येतें कोठून?

प्यारे भाई! नीट विचार करा. तुमच्यामधील सत्यांत--आत्म्यांत--ईश्वरांत लीन झाल्यानें--त्याच्याशीं ऐक्य पावल्यानें हें ज्ञान मिळतें. सर्व सुखाचा, जीविताचा, प्रकाशाचा, आनंदाचा उगम तुमच्यामध्यें आहे, तुमचा आत्मा आहे. सर्व ज्ञान, सर्व सुख आमच्या अंतर्यामीं आहे, असा कांहीं काल एकान्तांत बसून विचार करा, ह्मणजे तुह्मांला अनुभव येईल.

हें अपूर्व ज्ञान किंवा दिव्यदृष्टि प्राप्त करून घेण्यासाठीं पूर्वीं हिंदुस्तानांत कोणत्या मार्गाचें अवलंबन करीत असत, हें मी सांगतों. वेद देवानें किंवा ऋषींनीं लिहिले आहेत, असें हिंदु लोक समजतात. याचा अर्थ असा घ्यावयाचा, कीं, जेव्हां ऋषींनीं वेद लिहिले, तेव्हां ते देहभावनारहित झाले होते, आणि त्यांनीं आपल्या अहंकाराचा समूळ त्याग केला होता. या स्थितींत जीं आध्यात्मिक तत्वें त्यांनां दिसलीं, त्यांच्या अनुभवाला आलीं, तीं त्यांनीं वेदांत ग्रथित केलीं. ह्मणून ऋषींनां 'मंत्रद्रष्टे' असें ह्मणतात. हिंदुधर्मग्रंथांत असेंहि लिहिलें आहे, कीं, सर्व वेद वृक्षाप्रमाणें प्रणव--बीजापासून उत्पन्न झाले. या दोन्ही विधानांचा मेळ कसा घालावयाचा? मेळ घालितां येतो, व तो प्रकार असा आहे:--जेव्हां लोकांनां अहंकारविरहित स्थितींत स्फूर्ति, दिव्यज्ञान--दिव्यदृष्टि पाहिजे असते, तेव्हां ती त्यांनां प्रणवाच्या गानापासून मिळते.

प्रणवमंत्राचें गान ह्मणजे त्या मंत्राचा नुसता तोंडानें उच्चार करणें नव्हे. त्याहून त्यांत कांहीं अधिक आहे. कंठांतून व ओंठांमधून प्रणवाचा उच्चार

होत असतां मनानेंहि तो समजूनउमजून केला पाहिजे, व उच्च भावनांनीं–वृत्तींनीं प्रेरित होऊन अंतःकरणानेंहि तो ह्मटला पाहिजे. या तीन प्रकारांनीं प्रणवाचें गान चाललें, ह्मणजे प्रकाशाशीं आमचें ऐक्य होतें, आह्मांला ज्ञानाचा साक्षात्कार होतो. पूर्वीं ऋषि अशा प्रकारें प्रणवमंत्राचें गान करीत, आणि दिव्यदृष्टि प्राप्त करून घेत. प्रणवमंत्राचा अर्थ काय आहे, त्याची व्याप्ति काय आहे, याविषयीं सविस्तर विवेचन दुसऱ्या खेपेला करितां येईल; आज प्रणवाच्या गानावर–ध्वनीवर स्फूर्ति किंवा साक्षात्कार कां अवलंबून आहे, हें आपण पाहूं.

ईश्वर, शब्दाला--आवाजाला मान देतो काय, अशी शंका प्रत्येकाच्या मनांत आली असेल. ॐ हें परमात्म्याचें अत्यंत स्वाभाविक आणि खरें नांव आहे, असें 'राम' आतां सिद्ध करणार आहे. ॐ हा शब्द कोणत्याहि एका विवक्षित भाषेचा नाहीं. हिंदूंनीं या शब्दाचा स्वीकार केला, ह्मणून तो संस्कृतभाषेंतील शब्द आहे, असें सिद्ध होत नाहीं. इतर संस्कृतशब्दांप्रमाणें या शब्दाला विभक्तीचे किंवा दुसरे कोणतेहि प्रत्यय लागत नाहींत; यावरून तो संस्कृत शब्द नव्हे, असें दिसतें. तो निसर्गाचा शब्द आहे, निसर्गाचा मंत्र आहे, तो स्वतःसिद्ध शब्द आहे. हा संस्कृतभाषेंतील हिंदुलोकांचा शब्द आहे, ह्मणून त्याचा त्याग करणें, ह्मणजे ' आपला तो बाब्या आणि लोकाचा तो कारटा'*हा न्याय लागू करून सद्वस्तूचा त्याग करण्यासारखें आहे. याकरितां हिंदुलोकांचा हा शब्द आहे, तो संस्कृतभाषेंतील आहे, ह्मणून तो तुह्मीं टाकून देऊं नये. प्रत्येक मूल या आवाजाबरोबर जन्मतें. जन्मतःच मूल कोणता शब्द प्रथम उच्चारितें? अं ऊं ओम् किंवा मं अं ऊं मं तीन्ही आवाजांचा ॐकारांत अंतर्भाव होतो. फ्रेंच किंवा संस्कृतभाषेंत अ+ऊ याचा संधि ओ असा होतो. तेव्हां ॐ हा शब्द घेऊन प्राणी परलोकांतून येथें जन्माला येतो. कोणता शब्द उच्चारल्यानें रोग्याला बरें वाटतें? अहः अहं

* That orthodoxy means my doxy, and your doxy is heterodoxy.

हाच तो शब्द. अतिशय वेदना होत असतां, अह अहं, ॐ, हा शब्द रोग्याच्या तोंडांतून एकसारखा निघत असतो, आणि त्यापासून त्याचें दुःख कमी होत असतें. मुलांनां अतिशय आनंद झाला, ह्मणजे तो आनंद 'ओ ओ' ( ओम् याचा भाग ) शब्दानें बाहेर पडतो. तसेंच, उत्तरेस पागोटें, रुमाल किंवा टोपी; दक्षिणेस बूट किंवा जोडा; पूर्व-पश्चिमेस शरीराची एकेक बाजू आणि एकेक बाहु, याप्रमाणें पांचसहा फूट लांब चकबंदींतून—देहभावनेंतून बाहेर पडून अंहकारविरहित झाल्यावर, तुह्मांला एक अवर्णनीय स्थिति प्राप्त होते. ही स्थिति ॐ शब्दानें चांगली दर्शविली जाते, आणि या स्थितींत हा शब्द बाहेर पडूं लागतो. या शब्दाला सर्वच भाषांत प्रमुख स्थान आहे. तुमच्या भाषेंतील Omnipresent, Omnicient, Omnipotent 'सर्वविभु, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्' इत्यादि परमात्म्याचीं जीं मधुर नांवें आहेत, त्यांचा आरंभ (Om ॐ) या शब्दानेंच होतो. तसेंच, तुमच्या प्रार्थनेंत, भाषण संपलें, कीं, तुह्मीं 'आमेन' असें ह्मणतां. पर्शियन आणि अरबी लोक 'अमिन' असें ह्मणतात. प्रार्थना आटोपून भाषण खुंटलें, ह्मणजे 'आमेन, आमीन' हे शब्द तुह्मांला मौनवृत्तींत --ध्यानांत, ह्मणजे परमात्म्याजवळ नेऊन सोडतात. या स्थितीचें वर्णन हिंदुलोकांनीं असें केलेलें आहे—'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह' ( जेथून मनासह वाणी निराशेनें परतते ). आमेन, आमीन हे शब्द या शब्दाचेच अपभ्रंश आहेत. तेव्हां, हें परमेश्वराचें अत्यंत स्वाभाविक नाम आहे, हें सिद्ध होतें.

आणखी एक गोष्ट. तुमच्या श्वसनक्रियेबरोबर कोणता आवाज होत असतो, हें तुह्मीं पाहिलें आहे काय? नसल्यास आतां पहा. एकान्तीं बसून जोरानें श्वसनक्रिया करा. श्वास आंत घेतांना, सो असा आवाज निघतो ना? श्वास बाहेर सोडतांच, हं असा आवाज होतो, नाहीं बरें? ह्मणजे, तुमच्या श्वसनक्रियेबरोबर 'सोऽहं' असा ध्वनि निघत असतो. 'सोऽहं' याला संस्कृतांत अर्थ आहे, आणि हा अर्थ इंग्रजी भाषेनेंहि

घ्यावा. इंग्लिश, फ्रेंच, स्कॅन्डेनेव्हियन, रशियन, ग्रीक आणि फारशी या भाषा संस्कृत भाषेपासूनच झाल्या आहेत, या संस्कृत भाषेच्या लेकी आहेत, असें भाषाशास्त्रानें—शब्दशास्त्रानें (Philology) सिद्ध केलें आहे. तेव्हां, मातेचें धन लेकीला घ्यावयाला काय हरकत आहे? 'सो' ह्मणजे तो आणि 'हम्' ह्मणजे मी; तेव्हां सोऽहं ह्मणजे 'मी तो आहें,' 'अहं ब्रह्मास्मि.' 'सोहं' शब्दांत दोन व्यंजनें 'स' आणि 'ह' आहेत, आणि बाकी स्वर आहेत. स्वरांचा आवाज मुख्य, स्वतंत्र असतो, आणि व्यंजनांचा उच्चार स्वरांच्या साहाय्यावांचून होत नाहीं. परतंत्र किंवा पराधीन व्यंजनें 'स' आणि 'ह' काढून टाकिलीं असतां, 'सोहं' यांपैकीं ॐ हाच स्वरबद्ध शब्द शिल्लक राहतो, आणि श्वसनक्रियेंत हाच ध्वनि मुख्य आहे. यावरूनहि हें सिद्ध होतें, कीं, तुमचें आंतील जीवित किंवा तुमचा अंतरात्मा अगर सकलांनां जीवित देणारा परमात्मा याचें अत्यंत स्वाभाविक नाम ॐ हेंच आहे.

प्रणवाच्या गानानें उच्च, सूक्ष्म लहरि कशा उत्पन्न होतात, आणि आपली उन्नति कशी घडून येते, याचा आणखी थोडासा शास्त्रीयदृष्ट्या विचार करूं.

ध्वनि दोन प्रकारचे आहेत. व्याकरणांत या दोन प्रकारच्या ध्वनींनां स्पष्ट किंवा व्यक्त ध्वनि—वर्णात्मकध्वनि, आणि अस्पष्ट किंवा अव्यक्त ध्वनि—ध्यानात्मक ध्वनि अशीं नांवें आहेत. वर्णात्मक ध्वनि वर्णमालेच्या अक्षरांनीं स्पष्टपणें उच्चारिला जातो. ध्यानात्मक ध्वनि तसा उच्चारिला जात नाहीं. वर्णात्मक ध्वनीचा मेंदूशीं, मेंदूच्या ज्ञानसंबंधीं विषयाशीं संबंध असतो; आणि ध्यानात्मक ध्वनीचा अंतःकरणाच्या वृत्तीशीं संबंध असतो. वर्णात्मक ध्वनीचें क्षेत्र फार संकुचित असतें. उदाहरणार्थ, मी येथें आपणाशीं इंग्रजी भाषेंत बोलत आहें. ज्यांनां इंग्रजी समजत नाहीं, त्यांनां माझें भाषण कांहींच समजणार नाहीं; पण ज्यांनां इंग्रजी चांगलें येतें, त्यांनां माझें भाषण कळेल; इतरांनां कळणार नाहीं. दुसरा एकादा मनुष्य माझ्यापाशीं येऊन फारशी अगर संस्कृत भाषेंत बोलूं लागला, तर तो काय

ह्मणतो, हें तुह्मांला समजणार नाहीं. पण समजा, तोच मनुष्य रडूं लागला, तर त्याला कांहीं वस्तूची गरज आहे किंवा तो दुःखांत आहे, हें तुह्मांला समजतें. एकादा मनुष्य तुमच्यापाशीं येऊन संस्कृत, फारशी अगर जपानी भाषेंत बोलूं लागला, तर त्याचें ह्रद्गत तुह्मांला कळत नाहीं; पण, तो मनुष्य हंसूं लागला, तर तें कळतें. तेव्हां एकाद्याचें रडणें किंवा हंसणें हें जरी अक्षरांनीं न उच्चारितां येण्याजोगें–ध्यानात्मक ध्वनीचें असलें, तरी ते ध्वनि आपलें ह्रद्गत दुसऱ्यांनां कळवितात, आणि आपलें काम करितात. लहान अर्भकाला कोणत्याहि भाषेंत बोलतां येत नाहीं. पण त्याची प्रेमाची भाषा सर्वांनां समजते. येथें एक मांजर आलें आहे, असें समजा. 'येथून निघून जा' असें त्या मांजराला फारशी, संस्कृत, अरबी किंवा इंग्लिश भाषेंत सांगितलें, तरी त्याला तें कांहीं कळणार नाहीं. पण हातानें टाळी वाजवा, कीं, तें पळालेंच. वर्णात्मक ध्वनीपेक्षां ध्यानात्मक ध्वनीनें कोणतेंहि काम लवकर, तत्काळ होतें. ध्यानात्मक ध्वनीची भाषा सार्वत्रिक आहे, आणि तिचीं पाळेंमुळें मेंदूच्या पलीकडे, खालीं आहेत. सतराव्या व अठराव्या शतकांतील तत्त्वज्ञ, मनुष्यांमधील नियामक शक्ति ( शक्तीचें केंद्र ) मेंदूंत कोठेंतरी असावी, असें समजत होते; पण आतां त्यांची चूक सर्वांनां अगदीं स्पष्ट कळून आली आहे, आणि शक्तीचें केंद्र ( आत्मा ) ह्रदयाच्या नाडीचक्रांत आहे, असें आधुनिक तत्त्वज्ञांच्या नजरेला आलें आहे. ह्मणून ध्यानात्मक ध्वनीची भाषा मेंदूच्या पलीकडून–ह्रदयांतून येते, आणि ती बहुतेक सर्वांनां समजते, असें आह्मी ह्मणतों. एक स्त्री असें ह्मणतांना मीं ऐकिलें आहे, कीं, "तुह्मी मला चर्चमध्यें उपदेश ऐकवूं शकणार नाहीं, संगीत ऐकवूं शकाल." चर्चमध्यें लोकांनां उपदेशापेक्षां संगीत अधिक आवडतें, असा तुमचा सर्वांचा अनुभव असेल. हें असें कसें होतें ? चर्चांतील उपदेश ( वर्णात्मकध्वनि ) मेंदूपर्यंत जातो, आणि संगीत ( ध्यानात्मक ध्वनि) त्याच्या पलीकडे ह्रदयापर्यंत जातें, आणि तुमचें दुःख हरण करून तुह्मांला तत्काल शांत करितें. ईस्ट आरोरा येथें माझा एक मित्र आहे.

त्याच्या कारखान्यांतील मजुरांत कांहीं भांडण झालें, कीं, लगेच तो काम थांबवितो, आणि अर्धा तास कोणाकडून तरी तो पियानो वाजवितो. त्याच्यायोगें अर्ध्या तासांत भांडण मिटलें जाऊन सर्व कांहीं पूर्वीप्रमाणें सुरळीत चालूं लागतें. संगीताचा, रणवाद्याचा रणभूमीवर कसा परिणाम होतो, हें सर्वांनां माहीत आहे. ग्रीकदेवता अपोलो याच्या संगीतापासून 'ट्राय' नामक शहर उत्पन्न झालें आहे, असें ह्मणतात. तसेंच इटालीच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या मोहिनी वनदेवता ( Sirens ) यांविषयीं तुह्मीं ऐकिलें आहे. या वनदेवता आपल्या संगीताच्यायोगें समुद्रावरून येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांनां मोह घालीत, आणि लोक फसून त्यांच्या जाळ्यांत सांपडले, कीं, तीन दिवसपर्यंत त्यांनां नानातऱ्हेचे भोग देऊन चवथ्या दिवशीं त्यांनां ठार मारून टाकीत असत. त्यांच्या संगीताचा मोह इतका विलक्षण होता, कीं, चवथ्या दिवशीं आपण मरणार, असें माहीत असूनहि लोक त्यांच्या जाळ्यांत आपण होऊन सांपडत ! ग्रीकपुराणांतील कालिओप देवतेचा पुत्र आरफस कवि हा इतकें कांहीं मनोहर गात असे, कीं, वाहणारे झरे त्याचें गाणें ऐकावयाला थांबत, आणि सिंह, गाय, लांडगा, मेंढा इत्यादि जनावरें त्याच्याजवळ धांवून येत, आणि आपापसांतील नैसर्गिक वैर विसरून गाणें ऐकत उभे राहत ! सेंट सेसीलियानें आपलें गाणें ऐकावयाला एका देवदूताला खालीं आणिलें असें सांगतात. पण, आरफस हा मर्त्य प्राण्यांनां स्वर्गाला नेत असे, त्यांना उन्नत करीत असे; त्यामुळें त्याची योग्यता सेंट सेसीलियाहून अधिक आहे. संगीत ह्मणजे काय? संगीत हा ध्यानात्मक ध्वनीचा प्रकार आहे, आणि त्याचा प्रभाव किती विलक्षण आहे! कांहीं विशिष्ट ध्वनीचे विशिष्ट परिणाम असतात, हें आधुनिक शास्त्र सिद्ध करितें; आणि शास्त्राला जरी चांगलें सिद्ध करितां आलें नाहीं, तरी ध्यानात्मक ध्वनीचे विलक्षण परिणाम घडून येतात, ही गोष्ट सत्य आहे. प्रणवाचें गान हाहि ध्यानात्मक ध्वनीचा प्रकार आहे; आणि विश्वात्म्याशीं—परत्म्याशीं तादात्म्य घडवून देण्याची या ध्वनींत—प्रणवाच्या गानांत विल-

क्षण शक्ति आहे, असें अनुभवानें सिद्ध झालें आहे. हें जरी शास्त्राला आज सिद्ध करितां आलें नाहीं, तरी शास्त्राची प्रगति होत राहिली असतां पुढेंमागें त्याला हें सिद्ध करून दाखवितां येईल. मध्यंतरीं सत्य तें सत्यच राहील. अनेक युगांच्या अनुभवाच्या कसोटीला उतरलेलें हें वेदान्तरत्न मीं आपल्यापुढें ठेविलें आहे. त्याची योग्य पारख करून त्याचा आपण स्वीकार करावा. उपरिनिर्दिष्ट मार्गानेंच हिंदुलोकांनीं प्राचीनकालीं दिव्यदृष्टि—अंतर्दृष्टि मिळविलेली होती.

# THE CIVILISED WORLD'S SPIRITUAL DEBT TO INDIA.

## सुधारलेल्या जगावर हिंदुस्तानचें आध्यात्मिक ऋण.*

आज सकाळीं विद्यार्थ्यांशीं भाषण करीत असतां 'रामा'च्या तोंडांतून असे सहज उद्गार निघाले, कीं, "मी कधीं जन्मलेला आहें, असें मला आठवत नाहीं. खरोखर मी अज आणि अमर आहें, आणि मी कधींतरी मरेन, अशी माझी खात्री जगांत कोणाकडूनहि करवणार नाहीं."

हिंदुस्तानाविषयीं बऱ्याच चमत्कारिक गोष्टी येथें उपलब्ध आहेत. परवां मिनापालीस येथें भाषण झाल्यावर एक स्त्री 'रामा'पाशीं आली, आणि विचारूं लागली, कीं, "स्वामीजी, हिंदी स्त्रिया अद्याप आपलीं मुलें गंगेंत सुसरीला टाकीत नाहींत काय?"

मीं तिला सांगितलें "हे देवि, मलाहि गंगेंत टाकून दिलें होतें; पण, तुमच्या बायबलांतील जोनाप्रमाणें† मी पोहून आलों!"

खरी खरी हकीगत अशी आहे, कीं, मी गंगेच्या उगमापासून तिच्या मुखापर्यंत पायानें हिंडलों आहें; माझ्याबरोबर सहल करावयाला येणारांनां माझा हा लहान देह रोज चाळीस मैल चालूं शकतो हें माहीत आहें. गंगेच्या तीरावरून मी एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत गेलेलों आहे, आणि ती पवित्र नदी इतकी स्वच्छ, पवित्र आणि जोरानें वाहणारी आहे, कीं, तिच्यामध्यें नक्र किंवा सुसरी राहणें अशक्य आहे, शास्त्रीय दृष्ट्या अशक्य आहे. सुसरी घाणेरड्या गढूळ प्रवाहांत राहतात. गंगेंत त्या केव्हांहि दृष्टीला पडत नाहींत. खोट्या कंड्या पिकविणारांची धन्य आहे!

येथें एका हिंदु विद्यार्थ्यावर चमत्कारिक खटला झाला होता. त्याचें मला परवां सियाटल (वाशिंग्टन) येथून पत्र आलें. एका स्पिरिच्युअल

---

* ता. २९ जुलै सन १९०४ रोजीं झालेलें व्याख्यान.

† हा ज्यू लोकांचा एक देवदूत होता, आणि याला जहाजांतून समुद्रांत फेंकून दिलें होतें.

संस्थेंतून तो आपल्या घरीं जावयाला निघाला होता. त्या वेळीं तो ज्या डब्यांत बसला होता, त्याच डब्यांत एक तरुण मुलगी येऊन बसली. तीं दोघेंहि एकाच स्टेशनवर उतरलीं; कारण दोघांचीं घरें जवळच कोठेंशीं होतीं. एक तासानंतर एका पोलिसनें त्या विद्यार्थ्याला पकडलें. सहा तास त्याला तुरुंगांत काढावे लागले. दुसरे दिवशीं त्याची चौकशी झाली. मुलीची फिर्याद अशी होती, कीं, "काळ्याकुळकुळीत, पाणिदार आणि चमत्कारिक अशा नेत्रांनीं त्या विद्यार्थ्यानें माझ्याकडे पाहिलें; त्यामुळें मला मूर्च्छना आल्यासारखें होऊन मी अगदीं घाबरून गेलें." हे देवा! गरीब हिंदूंनीं अमेरिकेंत येण्यापूर्वीं आपले डोळे कोठें ठेवावे? या देशांतील कांहीं भागांत हिंदूंविषयीं अशा कांहीं विचित्र कल्पना प्रचलित आहेत.

आतां आपण दुसऱ्या, ह्मणजे चांगल्या बाजूचा विचार करूं. पूर्वीं, हिंदुस्तानांत अतोनात संपत्ति भरलेली आहे, हिंदुस्तान हें संपत्तीचें माहेरघर, सुवर्णभूमि आहे, अशी ख्याति सर्व यूरोपभर पसरलेली होती. त्यामुळें यूरोपांतील लोक हिंदुस्तानांत संपत्ति मिळविण्याकरितां येण्याचा प्रयत्न करूं लागले. कांहीं वायव्य दिशेच्या मार्गानें आले. कोलंबसाच्या मनांत हिंदुस्तानचा जवळचा मार्ग शोधून काढावा असें होतें; आणि त्या मार्गाच्या शोधांत असतां त्यानें अमेरिका खंड शोधून काढिलें. आधिभौतिक संपत्तीविषयीं हिदुस्तानाबद्दलचा मोह पूर्वीं सर्वांनां पडला होता. फारशी व ग्रीक लेखकांनीं हिंदुस्तानच्या देवालयाविषयीं जे वृत्तान्त लिहून ठेविले आहेत, ते मी आपणांला वाचावयाला सांगतों. एका देवालयांत तर दहा हजार नोकर होते, आणि त्या देवालयाचें छत हिऱ्यामोत्यांनीं मढविलेलें होतें, असें त्या लेखकांनीं वर्णन केलेलें आहे. तुह्मांला ऐतिहासिक पुरावा हवा असल्यास, तुह्मीं वारन हेस्टिंग्स आणि लॉर्ड क्लाइव्ह यांच्याविषयींचीं एडमंड बर्कचीं भाषणें जरूर वाचावीं, अशी मी शिफारस करतों.

हिंदुस्तानच्या बौद्धिक संपत्तीविषयीं मला बरेंच सांगतां येईल. हिंदुस्तानांत एका आंधळ्या मनुष्याला स्मरणशक्तीचे विलक्षण प्रयोग करून दाखवितांना मीं पाहिलेलें आहे. पन्नाससाठ जण त्या आंधळ्याभोंवतीं बसले होते. आणि इंग्लिश, अरबी, हिंदी भाषेंतील उताऱ्यांची एकेक ओळ क्रमाक्रमानें त्याला सांगत होते. त्या सर्वांनीं आपले उतारे किती किती ओळीचे आहेत, हें त्या आंधळ्याला आधीं सांगून ठेविलें होतें. तेरावी आणि चवदावी पाळी झाल्यानंतर तो आंधळा त्यांतील दोघांजणांला ह्मणाला "महाराज, आपले उतारे आतां संपले. ते तेरा आणि चौदा ओळींचेच आहेत." सर्वांच्या पाळ्या झाल्यावर सर्व उतारे एकहि चुकी न करितां त्यानें बरोबर ह्मणून दाखविले!

मानसशास्त्रांतील शोधहि आतां कांहीं सांगतों. हिंदुस्तानांत एक स्वामी होते, ते पांच मिनिटें अगदीं निश्चेष्ट, मृतवत् रहात होते. मीं हिमालयांत कांहीं स्वामी कित्येक महिने मृतवत् पडलेले पाहिले आहेत. एका स्वामीनें तर सहा महिने आपणाला पुरून घेतलें होतें. त्यानंतर त्याला उकरून काढून त्यानें सांगून ठेवलेल्या उपायानें त्याला शुद्धीवर आणण्यांत आलें. बाबांनों, या गोष्टीचा नीट विचार करा. एक मनुष्य (ख्रिस्त) तीन दिवसांच्या मरणानंतर पुनः उठला. त्यामुळें, त्या एका व्यक्तीवर आपली श्रद्धा साऱ्या यूरोपनें ठेविली आहे; हिंदुस्तानांत मरणोत्तर सहासहा महिन्यांनीं उठणाऱ्या व्यक्ति आहेत. पण, आह्मी त्यांनां फाजील महत्त्व देत नाहीं. मरणोत्तर पुनः उठणें ही कांहीं खरी आध्यात्मिक उन्नति किंवा खरा परमार्थ नव्हे. ती इंद्रियविज्ञानशास्त्र आणि मानसशास्त्र यांतील एक शास्त्रीयपद्धति किंवा तऱ्हा आहे. हल्लींच्या तुमच्या डॉक्टरांनां ही पद्धत कळत नसेल, तर त्यांनीं आपल्या शास्त्रांचा अधिक अभ्यास करावा, आणि शहाणे व्हावें. आह्मी अशा गोष्टीला अगदीं योग्य तेवढेंच महत्त्व देतों.

परवां एक गृहस्थ 'रामा'पाशीं आला, आणि सांगूं लागला "स्वामीजी, तुमचें तत्त्वज्ञान, तुमचा धर्म यांच्या चर्चेनें आह्मांला आतां त्रास देऊं

नका. आतां ती कटकट पुरे. तुमचा धर्म आतां जुना झाला नाहीं काय?" जणूं काय सत्य हें चंचल, नेहमीं बदलणारें आणि जीर्ण होणारें आहे!

मीं त्याला ह्मटलें "बंधो, यूरोप आणि अमेरिका यांच्या भरभराटीचें खरें कारण आपणांला माहीत आहे काय? आमचा धर्म (वेदान्त) जीवंत आहे, आणि तो करणरूप बाजूवर–विधीवर जोर देतो, व तुमचा धर्म अकरणरूप बाजूवर–निषेधावर–तूं हें करूं नको, तें करूं नको–यावर जोर देतो." अमेरिकेच्या भरभराटीचें खरें कारण कोणतें आहे आणि अमेरिकेचा धर्म कोणता आहे, याचा आपण विचार करूं, असें मीं त्याला सांगितलें. मुलगा गळ्यांत ताईत बांधतो, आणि यश आलें, तर स्वतःच्या परिश्रमामुळें आणि अपयश आलें तर ताईतांतील दोषामुळें आलें, असें ह्मणतो. यशापयशाचें खरें कारण तो शोधीत नाहीं. तुमचा धर्म तुह्मीं ताईताप्रमाणें गळ्यांत बांधून घेतला आहे. ख्रिस्तीधर्म किंवा चर्चधर्म हा कांहीं तुमच्या सुधारणेचें आणि भरभराटीचें कारण नव्हे. खरें कारण दुसरेंच आहे. ऐतिहासिक दृष्ट्या आपण या प्रश्नाचा खल करूं. ख्रिस्तीधर्माचा यूरोपांत प्रसार होण्यापूर्वीं आजच्या यूरोपप्रमाणें आणि अमेरिकेप्रमाणें सुधारलेलीं आणि उदयालाआलेलीं बरींच राष्ट्रें होतीं. इजिप्त आणि आणि चीन हे देश सुधारलेले होते, आणि कांहीं कलांच्या बाबतींत यूरोपला चीन किंवा इजिप्त यांची बरोबरी आज देखील करतां येणार नाहीं. हिंदुस्तान तर राहो, पण इराण, ग्रीस, रोम हीं राष्ट्रेंहि फार सुधारलेलीं होतीं. आणि हीं राष्ट्रें ख्रिस्ती नव्हतीं. ख्रिस्ती धर्मानेंच जर सुधारणा आणि आधिभौतिक संपत्ति हीं मिळतात, तर ख्रिस्ती धर्माचा प्रसार होण्यापूर्वीं ख्रिस्ती नसलेल्या राष्ट्रांची भरभराट आणि सुधारणा कशी झाली, तें सांगा.

बाबांनों, व्यासपीठावर नेहमीं उपदेशिल्या जाणाऱ्या नरकाच्या अग्नीनें–नरकाच्या यातनेच्या भीतीनें तुमची उन्नति झाली नाहीं; वाफेचीं आणि विजेचीं यंत्रें, छापखाने, जहाजें, आगगाड्या इत्यादि-

कांच्या शास्त्रीय अग्नीपासूनच तुमची भरभराट झाली आहे. इंग्लंडचा प्रसिद्ध पुरुष डॉक्टर जान्सन ह्मणतो "एकाद्या मुलानें एका खिडकींतून पाहिलें आणि आपण दुसऱ्या खिडकींतून पाहिलें एवढें जरी त्यानें बदलून सांगितलें, तरी त्या मुलाला चाबकानें खरपूस चोप दिला पाहिजे!" त्याप्रमाणें मी तुह्मांला विचारतों, कीं, जेव्हां तुह्मी खरें कारण सोडून देऊन दुसरें भलतेंच कारण सांगतां, तेव्हां तुह्मांला कोणती शिक्षा द्यावी? तुमची आधिभौतिक उन्नति, शास्त्रांचा अभ्यास, शास्त्रीय शोध यांपासून झाली आहे. यांपैकीं कोणताहि शोध कोणा धर्मोपदेशकानें लाविला नाहीं. जेम्स वाट, जार्ज स्टीफनसन, बेंजामिन फ्रांकलिन, थामस एडिसन यांपैकीं कोणीहि रेव्हरंड, डाक्टर, पाद्री, धर्मोपदेशक होते काय? यांपैकीं कोणीहि जरी 'शुभवर्तमाना'चे उपदेशक असते, तर शुभवर्तमानानें तुमची आधिभौतिक उन्नति झाली, असें कांहींसें ह्मणतां आलें असतें. एका धर्मोपदेशकानें बंदुकीच्या दारूचा मात्र शोध लाविला आहे.

एवंच, ख्रिस्तीधर्मानें किंवा त्या धर्मांतील विशिष्ट तत्त्वानें तुमची उन्नति झाली नाहीं, हें सिद्ध होतें. ज्याप्रमाणें ख्रिस्तीधर्म यूरोप आणि अमेरिका यांच्या आधिभौतिक उन्नतीला कारण झाला नाहीं, त्याप्रमाणें हिंदुधर्म हिंदुस्तानच्या आधिभौतिक अवनतीला कारण झाला नाहीं. तुमच्या किंवा कोणत्याहि राष्ट्राच्या भरभराटीचें खरें कारण ह्मटलें ह्मणजे खरी आध्यात्मिक उन्नति किंवा खरा परमार्थ हेंच आहे. खरा धर्म किंवा परमार्थ हा बाह्यविधि, विशिष्टमतें, विशिष्टपंथ, बाह्य आवरण यांहून निराळा आहे. व्यासपीठावरील उपदेश आणि त्याप्रमाणें चालीरीति यांनां न जुमानतां अमेरिकेंत खरा धर्म वाढत आहे, आणि त्यामुळें अमेरिकेची भरभराट होत आहे. तूं अमुक कर, अमुक करूं नको, अशा तऱ्हेच्या विधिनिषेधक आज्ञांनीं तुमच्या आध्यात्मिक उन्नतीची वाढ न करितां ती खुंटविली आहे. अशा तऱ्हेच्या आज्ञा आह्मांला खालीं ओढितात, आणि आमचें स्वातंत्र्य हिरावून घेतात.

## हिंदुस्तानचें आध्यात्मिक ऋण.

जगाच्या इतिहासांत खरा परमार्थ कोठें उत्पन्न झाला, हें मी आतां आपणांला सांगतों. खरा परमार्थ किंवा खरा धर्म याला वेदान्त असें ह्मणतात. जगांतील बहुतेक सर्व धर्मांची इमारत एकाद्या व्यक्तीवर उभारलेली आहे. ख्रिस्तीधर्म ख्रिस्तावर, कानफ्युसीआनिझम ( चिनीधर्म ) कानफ्युसीयसवर, बौद्धधर्म बुद्धावर, झोरास्ट्रॉआनिझम ( पारशीधर्म ) झोरास्टरवर व मुसलमानीधर्म महम्मदावर अवलंबून आहे. पण, वेदान्त कोणत्याहि व्यक्तीवर अवलंबून नसून केवळ तत्त्वांवर अवलंबून आहे. वेदान्त ह्मणजे वेदाचा—ज्ञानाचा अंत, ज्ञानाचें—आत्म्याचें शास्त्र. या शास्त्राचा—वेदान्ताचा अभ्यास रसायनशास्त्राप्रमाणें केला पाहिजे, असें वेदान्त सांगतो. ल्व्हॉयझर, बॉइल, रेनाल्ड्स, डेव्ही इत्यादि रसायनशास्त्रज्ञांवर सर्व भार टाकून तुह्मी कोणत्याहि रसायनशास्त्रांतील ग्रंथाचा अभ्यास कधींहि करीत नाहीं. तुह्मी रसायनशास्त्राचा ग्रंथ वाचतां, आणि त्याप्रमाणें प्रयोग करून पहातां. पाणी हें ऑक्सिजन आणि हायड्रोजन या दोन वायूंचें बनलेलें आहे, असें तुह्मी प्रयोग करून पाहिल्यावर खरें मानितां. त्याप्रमाणें दुसऱ्या व्यक्तीच्या आधारावर अवलंबून असलेला धर्म खरा नव्हे. स्वतः च्या आधारावर—अनुभवावर अवलंबून असलेला धर्मच सत्य होय. रसायनशास्त्राप्रमाणें वेदान्तांतील तत्त्वांचा तुह्मीं अनुभव घेऊन पहावा, आणि नंतर त्यावर विश्वास ठेवावा, असें माझें ह्मणणें आहे. तुह्मीं धर्मांतर करावें, एकदम वेदान्तावर विश्वास ठेवावा, असें मी सांगत नाहीं. ज्याप्रमाणें गंगा, ब्रह्मपुत्रा इत्यादि मोठ्या नद्या हिमालयांत उगम पावतात, त्याप्रमाणें हा वेदान्त—हें तत्त्वज्ञान हिमालयांतून–हिंदुस्तानांतून उत्पन्न झालें आहे. यूरोपांतील पंडित, वेदान्तावरील ग्रंथ ( वेद, उपनिषदें, ब्रह्मसूत्रें वगैरे ) ख्रिस्तापूर्वीं—इसवी सनापूर्वीं—सुमारें चार हजार वर्षांपूर्वीं लिहिले असावेत असें ह्मणतात. ख्रिस्तापूर्वीं चार हजार वर्षें जगाची उत्पत्ति झाली आहे, या चुकीच्या मतामुळें–धर्मवेडामुळें हे पंडित अंधारांत चांचपडत आहेत. ‘रामा’नें वेदांचा अभ्यास केला आहे, आणि

हें पंडितांचें मत चुकीचें आहे, असें तो वेदान्तर्गत प्रमाणांवरून सिद्ध करून देईल. पंजाब विश्वविद्यालयांत मी हायर मॅथेमॅटिक्सचा (गणित विषयाचा) प्रोफेसर होतों, आणि तेथें मी डायनॅमिक्स (गतिशास्त्र), ॲनॅलिटिकल हायड्रोस्टेटीक्स (जलस्थितिशास्त्र), ॲस्ट्रानमी (ज्योतिषशास्त्र), ट्रिग्नामेट्री (त्रिकोणमिति) इत्यादि विषयांवर व्याख्यानें देत असें. याशिवाय वेद वाचीत असतां, वेदकालीन ओरियन आणि इतर नक्षत्रें यांच्या स्थितीविषयीं वारंवार केलेले उल्लेख मला आढळून आले आहेत. त्यावरून गणित करून पहातां वेद सुमारें इसवी सनापूर्वी निदान आठ हजार वर्षें अगोदर लिहिले असावेत, असें सिद्ध होतें. आतां तुह्मी कॅनव्हसच्या--(कागदाच्या) पुराव्यावर विश्वास ठेवणार, किंवा नक्षत्ररूपि अक्षरें आणि गणितसिद्धान्तरूपी लिपि यांच्या ईश्वरनिर्मित प्रत्यक्ष पुराव्यावर विश्वास ठेवणार, हें ठरवा.

हा विषय फार गहन आहे; यास्तव राहिलेल्या थोड्या वेळांत मुख्य मुख्य गोष्टींचें—तत्त्वांचें मी विवेचन करणार आहें.

इसवी सनापूर्वी सुमारें चार हजार वर्षें ग्रीक लोक हिंदुस्तानांत येऊं लागले. त्यांनीं आपल्या प्रवासाची हकीगत लिहून ठेविली आहे, व त्यांपैकीं कांहीं वर्णनें मीं वाचिलीं आहेत. या वर्णनांमध्यें असें लिहिलें आहे, कीं, त्यावेळीं हिंदुस्तानचे लोक आदर्शरूप होते. ते कधींहि खोटें बोलत नसत. बायका आणि पुरुष यांचे हक्क सारखे होते. ठिकठिकाणीं पर्वतावर आणि अरण्यांत उत्तम विद्यापीठें होतीं. आधिभौतिक संपत्तीविषयींहि त्यांनीं बरेंच वर्णन लिहून ठेविलें आहे. या देशांत विश्वासघातकीपणा आणि अपवित्रपणा पूर्वी माहीत नव्हता, असें ते ह्मणतात. हिंदी दर्शनांविषयीं त्यांनीं आपलें चांगलें मत प्रदर्शित केलें आहे. अशी सर्व स्थिति पाहून ग्रीक लोक मोहित होऊन गेले. हिंदुस्तानांतील मोठमोठ्या ग्रंथांपैकीं कांहीं ग्रंथ स्त्रियांनीं लिहिले आहेत, असें दिसून येतें. त्या वेळच्या एका धर्मपरिषदेंत एका मोठ्या तत्त्वज्ञाच्या

भाषणसमयीं एक हिंदुस्तानांतील स्त्री अध्यक्ष होती.* कांहीं कांहीं उत्तम, उदात्त आणि सुंदर स्तोत्रें स्त्रियांच्या अंतःकरणांतून निघालीं आहेत. सत्याची धारणा—स्थापना प्रथम स्त्रियांपासून झाली, असें वाल्ट विटमनचें ह्मणणें मला पसंत आहे.‡

हिंदुस्तानांतील सर्व संस्थांची अवनति कशानें झाली? हिंदुस्तानांत मूर्तिपूजा कशी शिरली? मूर्तिपूजा ही मूळची हिंदुस्तानची नव्हे. हिंदु लोक मूर्तिपूजक आहेत, असें मिशनरी लोक सांगतात. पण वेद, काव्य, व्याकरण, गणित, संगीत, शिल्पशास्त्र इत्यादि कोणत्याहि शास्त्राच्या ग्रंथांत मूर्तिपूजेविषयीं यत्किंचित्‌हि उल्लेख नाहीं. मूर्तिपूजा हिंदुधर्माचें अंग नाहीं. तर मग ही मूर्तिपूजा आली कोठून? हिंदुस्तानांत मूर्तिपूजा ख्रिश्चन लोकांनीं आणिली, हें विधान कदाचित् चमत्कारिक वाटेल; पण तें मी अंतर्बाह्य प्रमाणानें सिद्ध करणार आहें. आणि याविषयीं मी स्वतंत्र लेख लिहिणार आहें. लोकांनीं इतिहासाचा हा भाग नीटसा पाहिला नाहीं. अंतर्बाह्य प्रमाणांवरून मी असें सिद्ध करतों, कीं, ख्रिस्तानंतर चवथ्या व पांचव्या शतकाच्या दरम्यान कांहीं रोमन क्याथोलिक ख्रिश्चन हिंदुस्तानांत आले. यांनां सेंट थॉमस ख्रिश्चन असें ह्मणतात; आणि हे लोक अद्याप दक्षिण हिंदुस्तानांत आढळतात. या लोकांनीं हिंदुस्तानांत मूर्तिपूजा सुरू केली. अंतर्गत प्रमाणांवरून असें दिसतें, कीं, मूर्तिपूजेचा कट्टा भक्त रामानुजाचार्य याचा गुरु सेंट थॉमस ख्रिश्चन लोकांपैकीं एकजण होता. ज्या पहिल्या मूर्तीला या लोकांनीं नमन केलें, ती मला माहीत आहे; आणि त्या मूर्तीचें मुख पौरस्त्यांच्या मुखाप्रमाणें नाहीं. यावरून मूर्तिपूजेचा उगम ख्रिस्ती धर्मांतच आहे, हें सिद्ध होतें. ख्रिस्ती लोकांनीं मूर्तिपूजा हिंदुस्तानांत नेली; पण, आज हिंदुस्तानांत ते लोक—ख्रिस्ती मिशनरी मूर्तिपूजेचा निषेध करितात; आणि कांहीं ख्रिस्ती लोक मूर्ति तयार करून पैसे मिळवितात. मूर्तींचा लोकांवर

---

* हीं माणसें याज्ञवल्क्य आणि गार्गी असावींत, असें वाटतें.

‡ Truth is first conceived of woman. —Walt Whitman.

अधिक परिणाम होईल किंवा शुभवर्तमानाचा होईल, हें ठरविणें आपल्या हातीं आहे.

पुनः हिंदुस्तानांत स्त्रियांनां गुलामाप्रमाणें वागवितात, त्यांनां पडद्यांत ठेवितात, बुरखा घ्यावयाला लावितात, असेंहि तुह्मांला पुष्कळ सांगण्यांत येतें. ही पडद्याची चाल हिंदुस्तानांत कशी आली, याविषयीं दोन शब्द सांगतों. एके कालीं हिंदुस्तानावर राज्य करणारे मुसलमान राजे फार अनीतिमान् होते. अविवाहित अशी हिंदु स्त्री पाहिली, कीं, ते तिला भ्रष्ट करीत, आणि उचलून घेऊन जात. यामुळें पुष्कळ स्त्रियांनां फार त्रास सोसावा लागला. तेंव्हां हा त्रास आणि हें दुःख टाळण्यासाठीं बालविवाहाची अनिष्ट चाल प्रचारांत आली. तसेंच, रस्त्यांत उघड्यानें चालणें हें विवाहित स्त्रियांनां देखील फार धोक्याचें होतें, त्यांनांहि भ्रष्टतेचें भय होतेंच. त्यामुळें बुरख्याची–पडद्याची चाल सुरू झाली. जेथेंजेथें मुसलमानी सत्ता विशेष होती, तेथेंतेथें ही पडद्याची चाल होती, आणि हल्लींहि थोडीबहुत आहे. हिंदु राजांच्या कारकीर्दीत ही चाल मुळींच नव्हती.

माझ्या प्रियकरांनों, हिंदुचें आणि तुमचें मांसरक्त एकच आहे. त्यांच्या भाषेपासून तुमची भाषा उत्पन्न झाली आहे. त्यांची कातडी भिन्न असेल, तर ती उन्हानें काळवंडली असेल, एवढेंच; पण अंतरंग सारखेंच. चेहऱ्यांत जरी थोडासा फरक असला, तरी तुह्मी दोघे एकच आहांत.

ग्रीसपासून यूरोपनें आपली सुधारणा आणि आध्यात्मिक उन्नति करून घेतली, हें कोणीहि समंजस मनुष्य नाकबूल करणार नाहीं. पण प्यारे भाई, ग्रीक लोकांनीं आपली सुधारणा, आपलें तत्त्वज्ञान कोठून आणिलें? प्लेटो, सॉक्रेटिस, पायथागोरास यांचे ग्रंथ आणि त्यांबरोबरच हिंदूंचें तत्त्वज्ञान तुह्मी वाचा, ह्मणजे आत्म्याचें अमरत्व, पुनर्जन्म इत्यादि ग्रीक कल्पना हिंदूंच्या तत्त्वज्ञानामधून अर्ध्यामुर्ध्या घेतलेल्या आहेत, असें तुह्मांला आढळून येईल. हिंदूंच्या तर्कशास्त्राशीं आरि-

स्टटलचें तर्कशास्त्र ताडून पाहिलें असतां, आरिस्टाटलचें तर्कशास्त्र फारच उणें आहे, असें तुह्मांला दिसून येईल. हिंदूंच्या न्यायग्रंथांमध्यें निगमन ( Deductive Logic ) आणि आगमन ( Inductive Logic ) या दोन्ही भागांचें चांगलें विवरण केलें आहे. ग्रीक आणि यूरोपियन तर्कशास्त्राच्या ग्रंथांत फक्त निगमनपद्धतीचें विवेचन आहे. वुइल्यम जोन्स हा यासंबंधीं असें ह्मणतो, कीं, “ग्रीक लोकांचे लेख आणि हिंदूंच्या तत्त्वज्ञानाची सरळ व्यापकपद्धति यांची तुलना करून पाहिली असतां, ग्रीक लोकांनीं आपलें ज्ञान हिंदूंच्या तत्त्वज्ञानापासून घेतलें आहे, असें वाटल्यावांचून राहत नाहीं.”

तुमच्या बायबलांतील जुना करार आणि नवा करार यांत भेद काय? “मी आणि माझा पिता एकच आहोंत; मी त्यांत—परमात्म्यांत राहतों, खेळतों, आणि जगतों; प्रथमारंभीं शब्द होता, तो ईश्वरापाशीं होता, आणि तो ईश्वरच होता; ज्यानें पुत्राला पाहिलें, त्यानें पित्यालाहि पाहिलें; प्रभूचें राज्य—सत्ता तुझ्या अंतर्यामीं आहे; स्वतःप्रमाणें शेजाऱ्यावर प्रेम करा.” अशा प्रकारचीं वाक्यें नवीन करारांतच आहेत. “माझें मांस खा, आणि माझें रक्त प्राशन करा; असें केल्याशिवाय तुह्मी तरणार नाहीं.” असें ख्रिस्तानें नवीन करारांत ह्मटलें आहे. याचा अर्थ लोकांनीं भलताच केला आहे. मांस खाऊन आणि रक्त पिऊन सोडण्याऐवजीं —देहभावना नष्ट करण्याऐवजीं—लोकांनीं हेंच आराध्यदैवत केलें आहे. तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान आणि युक्ति यांच्यायोगें याचा अर्थ कोणीहि बरोबर करूं शकेल. वेद वाचा, ह्मणजे वरील वाक्यांतील कल्पना किंवा उपदेश हजारों वर्षांपूर्वीं केलेला आहे, असें तुह्मांला आढळून येईल. ख्रिस्ताचें पुनरुत्थान आणि त्याचा पर्वतावरील उपदेश हासुद्धां हिंदु व वेदान्तिक आहे, यासारख्या गोष्टी हिंदूंच्या वेदान्तांत आहेत.

येथें निकॉलस नोटोविच नामक एका रशियन गृहस्थानें लिहिलेला —मूळ फ्रेंचवरून इंग्रजींत भाषांतर केलेला—येशू ख्रिस्ताचें अज्ञात चरित्र (The unknown Life of Jesus) हा ग्रंथ वाचण्यास मी आपणांला

शिफारस करितों. हा ग्रंथकार तिबेटमध्यें गेला होता, आणि तेथील मठांतील हस्तलिखित कागदपत्रांच्या आधारें त्यानें हा ग्रंथ लिहिला आहे. तुह्मीं हा ग्रंथ वाचला ह्मणजे त्यांतील विधानांची सत्यता तुह्मांला पटल्याशिवाय राहणार नाहीं. ख्रिस्ताच्या आठव्या वर्षापासून तों तहत तिसाव्या वर्षापर्यंतची हकीगत बायबलांत नाहीं. ख्रिस्ताच्या या कारकीर्दीतील माहिती वरील ग्रंथांत दिलेली आहे. त्यानें हीं वर्षे हिंदुस्तानांत काढिलीं. ही गोष्ट खरी असो वा खोटी असो, हिंदूंचें तत्त्वज्ञान, प्रत्यक्ष नाहीं तरी अप्रत्यक्ष रीतीनें, जेरुसलेमला गेलें असलें पाहिजे. कारण, ख्रिस्ताचीं कृत्यें व त्याचा उपदेश हा वेदान्ताचा-हिंदु तत्त्वज्ञानाचा अस्पष्ट प्रतिध्वनि आहे.

‘ स्वतःप्रमाणें आपल्या शेजाऱ्यावर प्रीति करा, ’ असें तुमच्या बायबलांत सांगितलें आहे; पण आह्मीं असें कां करावें, याचें कारण कांहीं सांगितलेलें नाहीं. हर्बर्ट स्पेन्सरनें सांगितल्याप्रमाणें, जेव्हां एकाद्या मुलाला “तूं अमुक कर, तमुक करूं नको,” असा आह्मी हुकूम सोडतों, तेव्हां त्या मुलामधील श्रेष्ठत्वाचा--बुद्धीचा आह्मी अपमान करतों. धाकदपटशा न दाखवितां समजून सांगितलें असतां, मुलगा तुह्मांला हवें तें आपण होऊन करितो; पण, तुह्मीं त्याच्याकडून सक्तीनें काम करून घेऊं लागलां,ह्मणजे त्याच्या बुद्धीची—त्याच्या हृदयांत वास करणाऱ्या आत्म्याची अप्रतिष्ठा होते.“तुझें नांव काय?” असें एका मुलाला विचारतां तो ह्मणाला “आई नेहमीं मला ह्मणते, करूं नको, खबरदार (Don't);तेव्हां ‘करूं नको ’ हेंच माझें नांव असावें.” ‘ शेजाऱ्यावर स्वतः प्रेम करा ’ असें तुह्मी जेव्हां सांगतां, तेव्हां मीं तें कां आणि कसें करावें, हेंहि तुह्मीं मला सांगितलें पाहिजे. डॉक्टर ऑफ डिव्हिनिटीसारख्या मोठमोठ्या पदव्या मिळविलेले मोठमोठे धर्मोपदेशक आणि पाद्री, हिंदुलोकांचा मनापासून तिटकारा करितात, तेव्हां मीं माझ्या शेजाऱ्यावर कसें प्रेम करावें ? विधिनिषेधात्मक आज्ञांचा जगांत फार प्राचीन कालापासून उपदेश केलेला आहे. कानफ्युशस, झोरास्टर, कृष्ण, ख्रिस्त यांनीं पुष्कळ उपदेश केला; पण जग कांहीं सुधारलें नाहीं. तें होतें तसेंच

आहे. कुत्र्याचें शेंपूट बारा वर्षे नळकंडींत घाला, आणि नंतर बाहेर काढून पहा; तें आपलें पूर्वीसारखें वांकडें तें वांकडेंच. जगाची स्थिति अशीच आहे.

येथें मला एक गोष्ट आठवते. कोणीं एकानें एका फकिराजवळ वशीकरणाचा मंत्र मागितला. फकिरानें तो दिला, आणि त्याला सांगितलें, कीं, "तीनदां माळ जपल्यानें मंत्र सिद्ध होईल; मात्र माळ जपत असतां वानरांचा विचार मनांत आणितां कामा नये."

थोडासा प्रयत्न केल्यावर तो बिचारा फकिराजवळ येऊन सांगूं लागला "गुरुमहाराज, माकड माझ्या स्वप्नांत देखील नव्हतें; परंतु, आपण बजाविल्यामुळें आतां तें कांहींकेल्या मला सोडीत नाहीं!"

तात्पर्य हें आहे, कीं, 'हें कर, तें करूं नको; अमुक कर, तमुक करूं नको,' या कांहीं परमेश्वराच्या आज्ञा नव्हत. ज्यांनां आह्मीं 'पशुवृत्ति' ह्मणून नांव ठेवितों, त्या कामवासनांमध्यें बैल, गाई, सिंह, वाघ इत्यादि जनावरांच्यामागें 'अमुक कर, तमुक करूं नको,' अशा हुकुमांची ब्याद नसल्यामुळें, तीं, मनुष्यांहून या बाबतींत अधिक निर्मळ ( पवित्र ) असतात. 'स्वतःप्रमाणें शेजाऱ्यांवर प्रेम करा,' या उपदेशांत एक 'कां'चा दुवा चुकलेला आहे. प्रेम कर, ह्मणून नुसतें बजाविलें, तर कोणी कोणावर प्रेम करीत नाहीं. वेदान्तामध्यें हें सत्य नऊ निरनिराळ्या रीतींनीं फारच सुंदर प्रतिपादन केलेलें आहे. वेदान्ताच्या ग्रंथांतील या विवेचनाचें थोडक्यांत तात्पर्य असें आहे, कीं, तुझा आत्मा हा सर्वांचा, विश्वाचा आत्मा आहे. तुझ्या शेजाऱ्याचा आत्मा आणि तुझा आत्मा एकच आहे. जेव्हां माझा शेजारी आणि मी एकच आहें, असें मी जाणतों, तेव्हां मी स्वतःसारखें माझ्या शेजाऱ्यावर स्वाभाविकपणें प्रेम करितों. बायबलापेक्षां वेदान्तांत हें सत्य किती स्पष्ट आणि उत्तम रीतीनें सांगितलें आहे पहा. मानसशास्त्राचे नियम समजून घेणें फार इष्ट आहे. विस्तवाला स्पर्श करूं नको, असें एकाद्या मुलाला सांगा; तें मूल हटकून विस्तव धरितेंच. पण, विस्तवाला स्पर्श केल्यास तुझा

हात पोळेल आणि तुला इजा होईल, असें त्याला सांगा; तें मूल कधींहि विस्तवाला शिवणार नाहीं. डोळ्यांसमोर विहीर पाहून कोणीहि तींत उडी टाकणार नाहीं. जेव्हां तुह्मी, स्वतःप्रमाणें शेजाऱ्यावर प्रेम करा असें नुसतें मला सांगतां, तेव्हां मी त्याच्यावर प्रेम करणार नाहीं. पण, माझा शेजारी आणि मी एकच आहों, असें जेव्हां तुह्मी मला समजावून सांगतां, तेव्हां मला त्याच्यावर प्रेम केल्यावांचून राहवत नाहीं.

शुभवर्तमानांतील उपदेशाचा यूरोपावर तमोयुगामध्यें कांहीं परिणाम झाला नाहीं. खिस्तीधर्म अस्तित्वांत होता, तरी तमोयुग—इ. स. ५०० ते १५००—सुमारें हजार वर्षे आपला अम्मल चालवीत होतें; अशा वेळीं यूरोपला जागृत करण्यासाठीं एकादी प्रेरणा पाहिजे होती. तुह्मीं जर इतिहास वाचला असेल, तर तमोयुग आणि मध्ययुग यांचें प्राबल्य विद्येच्या पुनरुज्जीवनानें (Renaissance) नाहींसें झालें, असें तुह्मांला दिसून येईल. हें पुनरुज्जीवन कोणत्या विद्येचें झालें ? खिस्ती नसलेल्या ग्रीक व रोम विद्यांचें; आणि ग्रीक व रोम विद्यांचा उगम तर हिंदुस्तानापासून आहे. तेव्हां यूरोपला किंवा जगाला सुधारण्याची प्रेरणा अप्रत्यक्षपणें हिंदुस्तानाकडून मिळाली.

हल्लीं अमेरिकेंत न्यू थॉट—नूतन विचार—खिश्चन सायन्स, थिआसफी, स्पिरिच्युऑलिझम वगैरे प्रकार दृष्टीला पडतात. हे सर्व कोठून आले ? जीवंत किंवा विदेही अशा हिंदु उपदेशकांपासून अगर शोपेनहारसारख्या तत्त्वज्ञांच्या लेखांपासून हे सर्व प्रकार प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हिंदुस्तानापासून आले आहेत. राजकीय इतिहासांतील नूतन विचार ह्मणजे प्रतिनिधिसत्तात्मक राज्य आणि समाजवाद (Democracy and socialism) हे सुद्धां वेदांतील विशिष्ट विचार आहेत, हें मी सिद्ध करून दाखवीन. ‘वेदान्त आणि समाजवाद,’ ‘राष्ट्रांची उन्नति आणि अवनति’ यांवर मीं स्वतंत्र निबंध लिहिले आहेत. यांमध्यें या विषयाचें मीं सविस्तर, साधार विवेचन केलेलें आहे.

अमेरिकेंत न्यू थॉटचा पुरस्कर्ता ह्मटला ह्मणजे इमर्सन होय. त्यानें लोकांनां सत्याचा–परमार्थाचा उपदेश केला, आणि तो त्यांनां फार आवडला. इमर्सनचा आध्यात्मिक पिता ह्मणजे गुरु हेनरी. डी. थोरो हा होय. थोरो इमर्सनपेक्षां अधिक कल्पक आहे. कार्लाइलकडूनहि इमर्सनला प्रेरणा झाली. कार्लाइल, इमर्सन, थोरो, वाल्ट विटमन इत्यादिकांनां स्फूर्ति किंवा प्रेरणा कोठून झाली ? कार्लाइल, रस्किन यांनीं, कँट, शोपेनहार आणि फिश स्वेडेनबर्ग या तत्त्वज्ञांचे लेख वाचले होते; आणि हे तत्त्वज्ञ हिंदुतत्त्वज्ञानानें प्रेरित झाले होते, हें तर प्रसिद्ध आहे. शोपेनहार आपल्या एका ग्रंथांत ह्मणतो, कीं, "या जगांत वेदान्ताइतका उच्च आणि उन्नतिकारक धर्म किंवा तत्त्वज्ञान नाहीं ! वेदान्त ( उपनिषदें ) माझ्या जीविताचा आसरा होय, आणि तो माझ्या मरणोत्तरहि मला सुखसमाधान देईल !" वेदान्ताला त्यानें हा किती मोठा मान दिला आहे ! त्याच्या ग्रंथांत ठिकठिकाणीं वेदान्तांतील तत्त्वज्ञानाचा उल्लेख आहे. व्हिक्टर कझीन नांवाचा फ्रेंच तत्त्वज्ञ ह्मणतो, कीं, "प्राचीन हिंदु लोकांनां खऱ्या देवाचें ज्ञान पूर्ण होतें, यांत कांहीं शंका नाहीं. त्यांचे विचार, त्यांचें तत्त्वज्ञान इतकें कांहीं श्रेष्ठ, उदात्त, सत्य, बरोबर आहे, कीं, यूरोपियनांचे लेख त्यांच्याशीं ताडून पाहतां दोनप्रहरच्या सूर्यापुढें चमकणाऱ्या काजव्याप्रमाणें ते फिक्के पडतात." दुसऱ्या एका ठिकाणीं तो ह्मणतो "पौरस्त्य, विशेषतः हिंदुस्तानचें तत्त्वज्ञान आणि काव्य यांविषयींचे उत्तम ग्रंथ लक्ष्यपूर्वक वाचतांना, आह्मांला बरींच श्रेष्ठ तत्त्वें आढळून येतात, आणि त्या तत्त्वांपुढें आमचे यूरोपियनांचे प्रयत्न फारच फिक्के दिसतात." यावरून हिंदूंचें तत्त्वज्ञान फार श्रेष्ठ आहे. दुसऱ्या कांहीं ठिकाणीं असेच प्रशंसापर उद्गार हिंदूंच्या तत्त्वज्ञानाविषयीं त्यानें काढलेले आहेत. हिंदु तत्त्वज्ञानापुढें यूरोपियन तत्त्वज्ञान फारच खुजें दिसतें, असें सांगून आणखी इतर प्रशंसापर उद्गार श्लेजेल नामक तत्त्वज्ञानेंहि काढिले आहेत. मॅक्स मुलर ह्मणतो, कीं, "शोपेनहारसारख्या मोठ्या तत्त्ववेत्याच्या विधानाला दुजोरा पाहिजे असेल, तर

माझ्या सर्व आयुष्यभर केलेल्या सर्व धर्मांच्या आणि तत्त्वज्ञानांच्या अभ्यासाच्या बळावर तो दुजोरा मी नम्रपणें देतों. जीवित व मरण हीं दोन्ही सुखावह व्हावीं, हाच जर धर्माचा किंवा तत्त्वज्ञानाचा उद्देश असेल, तर या कामीं वेदान्तासारखें आपल्या उपयोगीं पडणारें दुसरें कांहीं नाहीं!" सर एडविन आरनोल्ड यांच्या ग्रंथांत याविषयीं बरीच माहिती आहे. ती आपण वाचावी, असें मी सुचवितों. थोरो 'वॉल्डन' नामक आपल्या ग्रंथांत आणि आपल्या पत्रांत वेदान्ताचा ठिकठिकाणीं उल्लेख करतो. अमेरिकेंत न्यू थॉटचा उगम थोरोपासून आहे. इमर्सन, इंग्लंडहून अमेरिकेस परत यावयाला निघाल्यावेळीं स्टेशनवर कार्लाइलनें त्याला भेटीदाखल एडविन जोन्सनें केलेल्या भगवद्गीतेच्या भाषांतराचें पुस्तक दिलें. कँटच्या पूर्वीं गीतेचें भाषांतर लॅटिन, फ्रेंच आणि जर्मन भाषेंत झालेलें होतें. कँटनें सर्व यूरोपियन तत्त्वज्ञानाचें पुनरुज्जीवन केलें. दिक्, काल, कार्यकारणभाव यांविषयींच्या प्रागनुभवज्ञानाचें ( A priori Character ) समर्थन करतांना कँटला हिंदुतत्त्वज्ञानापासून साहाय्य मिळालें आहे.

हे सर्व लोक दुसऱ्याच्या ग्रंथाची चोरी करणारे किंवा अनुकरण करणारे आहेत, असें माझें ह्मणणें नाहीं. अमेरिकेच्या किंवा दुसऱ्या लोकांनीं स्वतः विचार शोधून काढिले, किंवा त्यांनीं ते हिंदुस्तानापासून घेतले, तरी तें सारखेंच आहे. या जगांत नूतन असें कांहींच नाहीं.

खरा समाजवाद ( Socialism ) हिमालयांतील स्वामींमध्यें आज आढळून येतो. इंग्लंडच्या एडवर्ड कारपेंटरला, त्याचा समाजवाद हिंदूंपासून मिळाला. तुह्मांला नवीन वाटणारा न्यू थाट--नूतन विचार--हिंदूंचा पुरातन जुना विचार आहे. तुह्मांला तो पूर्ण--पुरातन विचार--विचाराचें केंद्र--पूर्ण सत्य अद्याप मिळालेंच नाहीं. तुह्मांला आणखी कांहीं दिवस वाट पाहिली पाहिजे. कारण, हिंदूंच्या कांहीं उत्तमोत्तम ग्रंथांचें भाषांतर अद्याप झालेलें नाहीं. उदाहरणार्थ, तुमच्या न्यू थॉटविषयीं पूर्ण माहिती असलेला 'योगवासिष्ठ' नामक ग्रंथ. तो ग्रंथ ह्मणजे

विशद, व्यापक, न्यायशास्त्राला अनुसरून लिहिलेलें एक काव्यच आहे. गणिताचे ग्रंथसुद्धां हिंदुस्तानांत अशाच तऱ्हेनें लिहिलेले आहेत; त्यामुळें विद्यार्थ्यांनां ते ग्रंथ वाचतांना कंटाळा न येतां मोठी मौज वाटते.

या जगांत तुह्मीं आपलें काम आनंदानें करावें. तें कसें करावें, याविषयीं मला आठवलेला एक दृष्टांत मी येथें सांगतों. एका उद्यानांत कांहीं मजूर लोक मार्गावरील खडी फोडीत आहेत. ते काबाडकष्ट करीत आहेत, आणि त्यांचीं मनें—अंतःकरणें उदास झालीं आहेत. त्याच उद्यानांत एका बाजूला कांहीं राजपुत्र टेनिस खेळत आहेत. राजपुत्रांच्या अंगांतून मजुरांपेक्षांहि अधिक घाम येत आहे, पण ते आपलें काम आनंदानें करीत आहेत. या जगांत तुमची वृत्ति त्या टेनिस खेळणाऱ्या राजपुत्रांप्रमाणें असावी. त्यांचें काम ह्मणजे आनंदाचा खेळ आहे. राजपुत्रांसारखी वृत्ति असावी, ह्मणजे आपला उद्योग धंदा, आपलें काम सोडून द्यावें, असा अर्थ नव्हे; आपलें काम तर करीत राहिलेंच पाहिजे. मात्र कामाविषयीं आपली वृत्ति बदलावी—ह्मणजे काम उदास आणि कंटाळवाणें न वाटतां तें टेनिसच्या खेळाप्रमाणें वाटावें; असें झालें, ह्मणजे तुह्मांला फार सुख, आनंद होईल; आणि तुह्मी आपल्या दैवी स्वरूपांत राहाल. तुह्मी आत्मस्वरूपाच्या गंधतरूवर व सुरतरूवर आरूढ झालां, ह्मणजे तुमच्यामधून दिव्य संगीत आणि विलक्षण कामगिरी हीं आपोआप बाहेर पडूं लागतील. जें कांहीं ओढूनताणून आणिलेलें असतें, तें कधींहि जोमदार नसतें. सूर्यापासून जसा प्रकाश, गुलाबापासून जसा सुगंध, बर्फाच्छादित पर्वतशिखरें, पर्वतावरील प्रवाह आणि झरे यांपासून जसा थंडावा, हीं सर्व जशीं सहज निघतात, त्याप्रमाणें हे सच्चिदानंदांनों! तुमच्यामधून प्रकाश ( ज्ञान ), प्रेम, आनंद आणि शांति यांनां सहज बाहेर पडूंद्या!

ॐ शांतिः शांतिः शांतिः !